आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

**Maharashtra Institute of Educational Planning and Administration [MIEPA], Aurangabad**



# Leadership Practices of School Heads

**2020 - 2021**

# Inspiration

## Hon.Vandana Krishna

Additional chief secretary,School Education and Sports Department,

Govt,of Maharashtra

## Hon.Vishal Solanki

Commissioner[Education], Maharashtra state, Pune

## Hon.Rahul Dwivedi

State Project Director,M.P.S.P., Mumbai

## Hon.Dinkar Temkar

Director,State Council Of Education Research And Training, Maharashtra, Pune

## Chief Editor

### Dr. Neha Belsare

Director,

Maharashtra Institute of Educational Planning and Administration [MIEPA], Aurangabad

## Editor

### Shri. Ramakant Kathmore

Deputy Director,

Maharashtra Institute of Educational Planning and Administration [MIEPA], Aurangabad

## Co-Editor

### Dr. Jyoti Kulkarni

Coordinator

Maharashtra Institute of Educational Planning and Administration [MIEPA], Aurangabad

## Assistant Editor

### Dr. Manjusha Yadnik

Consultant

Maharashtra Institute of Educational Planning and Administration [MIEPA], Aurangabad



डॉ. नेहा बेलसरे, संचालक,

मिपा, औरंगाबाद

# संपादकीय

आजचे युग हे जागतिकीकरण, खाजगीकरण व आधुनिकीकरणाचे युग आहे. प्रत्येक क्षेत्राच्या कक्षा रुंदावत आहेत. नवनविन शोध लागत आहेत. तसेच शिक्षणक्षेत्रातही बदल होत आहेत. ज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत. ज्ञानाचा प्रस्फोट वाढत आहे. या जागतिक बदलात आपला भारतीय युवक मजबुतीने उभा रहावा यासाठी भारतीय शिक्षणातही आमुलाग्र बदल घडत आहेत. आमचे शाळाप्रमुख व शिक्षकही बालकांच्या मजबूत पायाभरणी साठी धडपडत आहे. विविध मार्गांनी बालकास सक्षम करत आहेत. त्याबरोबरच भावनिक, सामाजिक व मानवी मूल्य जपण्यास, ती अंगिकृत करण्यास, अनुकूल वातावरणाची निर्मिती शाळाशाळातून करीत आहेत. बालकांना वैविध्यपूर्ण अनुभव देणारी केंद्रे म्हणून शाळा विकसित करीत आहेत, ही आपल्या सर्वांसाठी आनंददायी बाब आहे.

सध्या निर्माण झालेल्या कोरोनाच्या परिस्थितीत सारे जग स्तब्ध झाले आहे. अशा परिस्थितीतही आमचे शिक्षक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी नाविन्यपूर्ण मार्ग शोधून काढत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान अवगत करून विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहोचवीत आहेत. त्यांच्या या सृजनशीलतेचा प्रवास शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व घटकांपर्यंत पोहोचावा यासाठी महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद मार्फत शाळेचे नेतृत्व करणारे मुख्याध्यापक, शिक्षक यांचे हे कार्य या फ्लिप बुकच्या माध्यमातून येथे आपणासमोर मांडत आहोत. यातूनच प्रेरणा घेऊन एखादा नवा विचार सार्वत्रिक होईल आणि नवीन यशाचा मार्ग शोधून त्या वाटेवर विद्यार्थ्यांना घेऊन जाण्याचे बळ आजच्या मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यामध्ये निर्माण होईल असा विश्वास आहे.

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद मार्फत संपूर्ण महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, अनुदानित शाळा, शासकीय आश्रम शाळा, विद्यानिकेतन या सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या शाळा, वेगळा मार्ग यशस्वीपणे स्वीकारणाऱ्या व सकारात्मक, शाश्वत बदल घडवून आणलेल्या शाळांकडून केस स्टडीज मागविण्यात आल्या. यात प्राथमिक, माध्यमिक शाळांच्या ज्या केस स्टडीज प्राप्त झाल्या. त्यातून प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येकी दोन अशा 72 मराठी माध्यमाच्या शाळा व 3 इंग्रजी माध्यमाच्या शाळा अशा सर्वोत्कृष्ट 75 केस स्टडीज ची निवड करण्यात आली. या निवड करण्यात आलेल्या शाळांच्या केस स्टडीज चा समावेश फ्लिप बुक मध्ये करण्यात आला आहे.

या केस स्टडीज वाचतांना आपणास लक्षात येईल की केवळ शाळेत जाणे, पुस्तकी अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षा घेणे, एवढेच काम शाळा, शालेय नेतृत्व व शिक्षक करीत नाहीत तर त्याहीपलीकडे यशस्वी जीवन जगण्याची कला ते शिकवत असतात. येथे मंदिरांचे बांधकाम थांबवून शाळेचे बांधकाम व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी धडपडणारे गावकरी आपल्याला भेटतील, तर शाळेच्या विद्यार्थ्यांना मैदान मिळावे यासाठी सलग सहा वर्षे डोंगर खोदून ‘ एकला चलो रे ’ असे म्हणत नंतर गावातील सर्व

तरुणांना घेऊन मैदान तयार करणारे ध्येयनिष्ठ मुख्याध्यापक अचंबित करून जातील. त्याच बरोबर समाजापासून लांब असणाऱ्या आदिवासींना जीवन कौशल्य, जसे दात घासणे ते आंघोळ करणे पर्यंत शिकवणारे शिक्षक देखील येथे आहेत. केवळ जीवनकौशल्य शिकवून थांबले नाहीत तर त्यांचे सुप्तगुण ओळखून 'मेडल', मिळविण्यापर्यतचा गौरवास्पद प्रवास आपणास यात वाचता येईल. कोरोना काळात स्वतःचा टी. व्ही. स्वतःच्या गाडीत बसवून गावाच्या मैदानात शिक्षण उपलब्ध करून देणारे खंदे मुख्याध्यापक व शिक्षकही आपल्याला भेटतील. ही तर केवळ उदाहरणे आहेत. महाराष्ट्रातील या सर्व 75 शाळांच्या गौरवगाथा वाचल्यानंतर आपल्याला किमान 75 नवीन कल्पना, नवीन मार्ग अनुभवायला मिळतील. यासर्वांच्या पुढे जाऊन आपणासही या देशाच्या भविष्यासाठी, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी काही भन्नाट व भक्कम पायाभरणी साठी कार्य करण्याची प्रेरणा, उर्जा व सकारात्मक विचार मिळतील. तसेच त्याप्रमाणे कृती आपल्या कडूनही घडतील.

पुढील वर्षी याहीपेक्षा उत्तुंग कामगिरी करून आपली शाळा या केस स्टडीजच्या फ्लिप बुकमध्ये सामील होईल यासाठी निकोप स्पर्धात्मक वातावरण व आत्मविश्वास सर्व शाळाप्रमुख व शिक्षकांमध्ये या फ्लिप बुकच्या वाचनाने निर्माण होईल हे नक्की.

**" वेगळी वाट, वेगळा प्रयत्न, वेगळा ध्यास, वेगळा विश्वास यातून देशाच्या भवितव्याचा विकास, यासाठी धडपडतोय आमच्या शाळाप्रमुख व शिक्षकांचा श्वास. "** अश्या शाळेतील प्रत्येक मुलाचे भवितव्य घडवून राष्ट्रविकासाच्या कामात प्रामाणिक योगदान देणाऱ्या मुख्याध्यापकांचे व शिक्षकांचे मनापासून अभिनंदन!

## धन्यवाद.

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | शाळेचे नाव | मुख्याध्यापकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | जि.प.प्रा.शाळा दिघेवस्ती, ता. राहुरी, जि. अहमदनगर. | श्रीमती. मंगला धोंडीबा कलगुंडे | 1-5 |
| ०२ | जि.प.प्रा.शाळा हॅरिसन ब्रँच, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर. | श्री. नवनाथ पांडुरंग सूर्यवंशी | 6-11 |
| ०३ | महानगर पालिका उच्च प्रा. शाळा क्र.22, कृषिनगर, जि. अकोला. | श्री. अर्जुन मनोहर हिंगमीरे | 12-17 |
| ०४ | जि.प.वरिष्ठ प्रा. उर्दू शाळा, सिरसोली, ता.तेल्हारा, जि. अकोला. | श्री. वजाहत अलीम अब्दुल समद | 18-22 |
| ०५ | जि.प.प्रा.मराठी शाळा,जामुननाला,ता.चिखलदरा, जि.अमरावती. | श्री. महेंद्र गुरूबकस पाल | 23-26 |
| ०६ | नगर परिषद प्राथमिक मराठी शाळा क्र.4, दुर्गानगर, ता. मोर्शी, जि. अमरावती. | श्रीमती. सविता दिपक शिंदे | 27-31 |
| ०७ | जि.प.प्रा. शाळा, सावंगी संगम, ता. चांदूररेल्वे, जि. अमरावती. | श्री. सतीश सुधाकर धाडसे | 32-36 |
| ०८ | जिल्हा परिषद प्रशाला, लोहगांव, ता.पैठण, जि. औरंगाबाद. | श्री.उद्धव बापुराव गरड | 37-40 |
| ०९ | जि. प. उच्च प्रा. शाळा, बोरगाव, ता.गंगापूर, जि. औरंगाबाद. | श्री. प्रवीण लोहाडे | 41-44 |
| १० | जि.प.उच्च प्रा.शाळा,मुंबापुरवाडी,ता.खुलताबाद, जि. औरंगाबाद. | श्री. प्रकाश हेमलाल राठोड | 45-47 |
| ११ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जरेवाडी, ता. पाटोदा, जि. बीड. | श्री. गोविंद कदम | 48-52 |
| १२ | जि. प. प्राथमिक शाळा, कुंबेफळ, ता.अंबेजोगाई, जि.बीड. | श्रीमती. ललिता व्यंकटराव जाधव | 53-56 |
| १३ | जि.प. डिजिटल पब्लिक स्कूल,पवनी, जि.भंडारा. | श्री. शिवशंकर घोडीचोर | 57-60 |
| १४ | जि. प. प्राथमिक शाळा, झाडगाव, ता. साकोली, जि. भंडारा. | श्री. काशीनाथ जयकुमार राऊत | 61-65 |
| १५ | भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळा, वरखेड, ता.चिखली जि. बुलडाणा. | श्री. शरद बंगाळे | 66-71 |
| १६ | जि.प. मराठी उच्च प्रा. शाळा, वझर, ता. खामगांव, जि.बुलडाणा. | श्री. विलास सदाशिवराव वानखेडे | 72-76 |
| १७ | जि. प. उच्च प्राथमिक शाळा, पालडोह, ता. जिवती, जि.चंद्रपूर. | श्री. राजेंद्र उदेभान परतेकी | 77-81 |
| १८ | सावित्रीबाई फुले सेमी इंग्रजी शाळा,म.न.पा.चंद्रपूर जि.चंद्रपूर. | श्री. नागेश दादाजी नीत | 82-86 |
| १९ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खलाणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. | श्री. चंद्रकांत पुंडलिक डिगराळे | 87-91 |
| २० | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निकुंभे, जि.धुळे. | श्री. अशोक सिताराम पाटील | 92-96 |
| २१ | जि. प. उच्च् प्रा. शाळा, छल्लेवाडा, ता.अहेरी, जि. गडचिरोली. | श्री. सुरजलाल लिंगाराम येलमुले | 97-101 |
| २२ | जि.प.उच्च् प्राथमिक शाळा, मोहुर्ली, ता.मुलचेरा,जि. गडचिरोली. | श्री. एम.जी. मददीवार | 102-105 |
| २३ | जि.प.वरिष्ठ प्रा. शाळा,परसोडी,ता.सडकअर्जुनी,जि. गोंदिया. | श्री. हिवराज निताराम परशुरामकर | 106-111 |
| २४ | जि. प. प्राथमिक शाळा, ठाणाटोला, ता.आमगाव, जि. गोंदिया. | श्री. शिवाजीराव बडे | 112-116 |
| २५ | जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा, डिग्रस क-हाळे, जि. हिंगोली. | श्री. एकनाथराव हनवतराव क-हाळे | 117-121 |
| २६ | जि.प. उच्च प्राथमिक शाळा, वसई, ता. औंढा (ना.), जि. हिंगोली. | श्री. झनक पांडुरंगराव लोंढे | 122-126 |
| २७ | जि. प. केंद्रीय प्रा. शाळा,बेटावद बुद्रुक, ता.जामनेर, जि.जळगाव. | श्री. शांताराम कडू सपकाळ | 127-129 |
| २८ | जि. प. डिजिटल प्रा. शाळा, बोदवड, ता.मुक्ताईनगर,जि.जळगाव. | श्री. सुनील रमेशराव बडगुजर | 130-134 |
| २९ | जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, चिंचखेडे बुद्रुक, ता.मुक्ताईनगर, जि. जळगाव. | श्री. गणेश यशवंत कोळी | 135-138 |
| ३० | सरस्वती माध्यमिक विद्यालय, गोंदेगाव, जि.जालना. | श्री. सचिन प्रभाकर देशमुख | 139-142 |
| ३१ | कै.मारोतराव देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टेंभुर्णी, ता.जाफराबाद, जि. जालना. | श्री. समाधान वामनराव दुनगहू | 143-147 |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | विद्या मंदिर बानचीवाडी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर. | श्री. पी. एस. कानकेकर | 148-150 |
| ३३ | मराठी विद्यामंदिर, कलिवडे, ता. चदगड, जि. कोल्हापूर. | श्री. दत्तात्रय जोतिबा भाटे | 151-154 |
| ३४ | अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, जाऊ , ता.निलंगा, जि. लातूर. | श्री. दत्तात्रय शंकरराव मुखम | 155-160 |
| ३५ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारूनगर, मुरुड, जि.लातूर. | श्री. तानाजी शंकर रोंगे | 161-164 |
| ३६ | एस.एल.अँड एस.एस गर्ल्स हायस्कूल, ठाकूरद्वार, मुंबई. | श्रीमती. शमिका राजेश आजगावकर | 165-171 |
| ३७ | जि.प.उच्च प्राथमिकशाळा,कोंढासावळी, ता.काटोल, जि.नागपूर. | श्री. अरुण वासुदेवराव पांडे | 172-175 |
| ३८ | जि.प.उच्च प्राथमिक शाळा, सिरसोली,ता. मौदा, जि. नागपूर. | श्री. अमृत रंगराव कांबळे | 176-181 |
| ३९ | जि.प.प्राथमिक शाळा,कारवाडी, अर्धापूर, जि. नांदेड. | श्री. संतोष मारुतीराव राऊत | 182-184 |
| ४० | जि.प.प्राथमिक शाळा,रहाटी(बु.), ता.भोकर,जि.नांदेड. | श्री. आलूरवाड रविकुमार राजारेड्डी | 185-187 |
| ४१ | भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय निवासी शाळा, तोरणमाळ, ता. धडगांव, जि. नंदुरबार. | श्री. सुधीर विजयराव पाटील | 188-192 |
| ४२ | जिल्हा परिषद शाळा, प्रकाशा, ता.शहादा, जि. नंदूरबार. | श्री. रविंद्र भाईदास पाटील | 193-197 |
| ४३ | शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा, कनाशी, ता.कळवण, जि.नाशिक. | श्री. सुभाष जगन्नाथ बावा | 198-202 |
| ४४ | शा. माध्यमिक आश्रमशाळा,पारेगाव,ता.चांदवड,जि. नाशिक. | श्री. प्रभाकर बन्सीधर अहिरे | 203-207 |
| ४५ | जि.प.प्राथमिक शाळा, कदमवाडी, ता.तुळजापूर,जि. उस्मानाबाद. | श्री. बापुराव बब्रुवान मोरे | 208-211 |
| ४६ | जि. प. प्राथमिक शाळा, रामकुंड, ता. भूम,जि. उस्मानाबाद. | श्री. दादासाहेब अभिमान साळुंके | 212-214 |
| ४७ | जि.प. उच्च प्राथमिक शाळा, कोचाळे, ता.मोखाडा, जि. पालघर. | श्री. दिनकर पांडुरंग फसाळी | 215-218 |
| ४८ | जिल्हा परिषद शाळा, पावळेपाडा, ता. डहाणू, जि.पालघर. | श्री. रवींद्र मंगीलाल जाधव | 219-225 |
| ४९ | भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जि.प. प्राथमिक व माध्यमिक शाळा, बोरगव्हाण, ता. पाथरी, जि. परभणी. | श्री. बी.एम. गिल्डा | 226-229 |
| ५० | भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा जि.प. प्राथमिक शाळा, माळीवाडा, ता. पाथरी, जि. परभणी. | श्री. सुभाष नामदेव चिंचाणे | 230-234 |
| ५१ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विठ्ठलवाडी, ता.दौंड, जि.पुणे. | श्री. दत्तात्रय प्रभाकर दिवेकर | 235-240 |
| ५२ | छत्रपती शाहू महाराज माध्यमिक विद्यालय, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड. | श्री. मोहन चिंधू पाटील | 241-246 |
| ५३ | डॉ.सी.डी.देशमुख माध्यमिक विद्यालय, रोहा जि.रायगड. | सौ. ज्योत्स्ना बाळासाहेब कदम | 247-251 |
| ५४ | भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जि.प.आंतरराष्ट्रीय शाळा अंजनवेल नं.२(कातळवाडी), ता.गुहागर, जि. रत्नागिरी. | श्रीमती ममता विचारे | 252-256 |
| ५५ | जि.प.आदर्श प्राथमिक शाळा, पाचल,ता.राजापूर, जि.रत्नागिरी. | श्री. नितीन प्रभाकर पांचाळ | 257-262 |
| ५६ | अजितराव घोरपडे विद्यालय, कळंबी, ता.मिरज,जि.सांगली. | श्री. दादासो नरसगोंडा पाटील | 263-269 |
| ५७ | जि. प. प्राथमिक शाळा, शिवणी, ता. कडेगाव, जि.सांगली. | श्री. तानाजी रामचंद्र देशमुख | 270-274 |
| ५८ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अपशिंगे (मि.), जि. सातारा. | श्री. राजेंद्र गायकवाड | 275-279 |
| ५९ | जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा,पेंबर,ता.कराड, जि.सातारा. | सौ. राजेश्री मिलिंद तोडकर | 280-285 |
| ६० | केंद्रशाळा खारेपाटण नं.१, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग. | श्री. प्रदिप दत्ताराम श्रावणक | 286-290 |
| ६१ | श्री देवी सातेरी हायस्कूल, वेतोरे, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग. | सौ. स्वाती रविंद्र वालावलकर | 291-295 |
| ६२ | जि.प.आदर्श प्रा.शाळा माळेवाडी(अ),ता.माळशिरस, जि.सोलापूर. | श्री.दत्तात्रय चतुर्भुज कोरे | 296-299 |

| | | | |
|---|---|---|---|
| ६३ | जिल्हा परिषद प्रशाला, माढा, ता. माढा, जि.सोलापूर. | श्री. नागेश नरसिंह खेडकर | 300-302 |
| ६४ | जि.प.सेमी इंग्लिश उच्च प्रा.शाळा,रहाटोली,ता.अंबरनाथ,जि.ठाणे, | श्री. मिलिंद श्रीरंग कांबळे | 303-308 |
| ६५ | जिल्हा परिषद शाळा, शेलवली (बांगर), ता.शहापूर, जि. ठाणे. | श्री. बाळू कान्हू धानके | 309-314 |
| ६६ | जि.प. उच्च प्राथमिक शाळा, लाहोरी, ता. समुद्रपूर, जि. वर्धा. | श्री. कमलाकर विठ्ठलराव ठाकरे | 315-316 |
| ६७ | जि. प. प्रा. शाळा सुलतानपूर ,ता. हिंगणघाट, जि. वर्धा. | श्रीमती. शुभांगिनी मनोहरराव वासनिक | 317-321 |
| ६८ | जि. प. प्राथमिक केंद्रशाळा, कारखेडा, ता.मानोरा, जि. वाशीम | श्री. गोविंद मनोहरराव पोतदार | 322-325 |
| ६९ | जि.प.उच्च्न प्राथमिक केंद्रशाळा, निजामपूर, रिसोड, जि.वाशिम. | श्री. अर्जुन कृष्णाजी वरघट | 326-330 |
| ७० | जि. प. प्राथमिक शाळा, सातेफळ, ता.कळंब, जि. यवतमाळ. | श्री. हेमंत लक्ष्मणराव शेंडे | 331-334 |
| ७१ | जि.प. प्राथमिक शाळा, सुकळी,ता.कळंब, जि. यवतमाळ. | श्री. अमोल सुभाषराव पालेकर | 335-341 |
| 72 | Z.P. High school, Bazar Sawangi, Tal. Khultabad, Dist. Aurangabad. | Mr. Vijay Ananda Raut | 342-344 |
| 73 | Anand Nagar English Mumbai Public School, Dahisar East, Mumbai. | Mrs. Jagruti Pritam Wade | 345-348 |
| 74 | Vikas Night School and Jr. College, Vikhroli East, Mumbai. | Mr. Narendra Haribhau Shirke. | 349-354 |
| 75 | Z.P Primary School, Wadgaon Bande, Tal. Daund Dist. Pune. | Mrs. Sunita Vijay Katam | 355-359 |

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दिघेवस्ती, ता.राहुरी, जि. अहमदनगर

**ई-मेल :–** zppsdighewastidhanore@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :–** श्रीमती.मंगला धोंडीबा कलगुंडे **ई-मेल :–** mangalakalagunde@gmail.com



**जि.प.प्रा.शाळा दिघेवस्ती, शाळेची ईमारत**

**“केल्याने होत आहेरे – आधी केलेचि पाहिजे”**

वरील संतवचन सत्यात उतरवण्यासाठी कोणतीही गोष्ट प्रामाणिकपणे, अविरतपणे करत राहिले तर ती साध्य होते. या उक्तीचा तंतोतंत परिचय घ्यायचा असेलतर, अहमदनगर जिल्ह्यात आदर्शाचा, यशाचा, गुणवत्तेचा मानदंड उभाकरणारी शाळा म्हणून राहुरी तालुक्याच्या व संगमनेर तालुक्याच्या सीमेवर असलेली धानोरे गावाची दिघेवस्तीची जि.प.प्राथमिक शाळा म्हणजेच सर्व सामान्यांची, गरिबांची शाळा होय .शाळेच्या या यशामध्ये सर्व माजी मुख्याध्यापक, माजी उपक्रमशील शिक्षक, ग्रामस्थ, व पालकांचा सिंहाचा वाटा आहे. शाळेच्या विकासामध्ये दानशूर, शिक्षण प्रेमी ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, तसेच शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे. शिक्षकांच्या आवाहनाला प्रतिसाद देत श्री जनार्दन, श्री जयराम,श्री परशुराम, श्री जालिंदर,श्री आनंदराव, श्री यशवंत या दिघे बंधूचे बहुमोल योगदानातून लाखो रुपयांची पाच गुंठे जागा बक्षीसपत्र रूपाने शाळेस प्राप्त झाली आहे. वस्तीवरील मुलांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी सुरु झालेली क्लास शाळा सन१९६६ मध्ये एका शिक्षकाने सुरु झालेली छप्पर वजा झोपडीत भरणारी १८ पटाची शाळा आज १९०पटाची इयत्ता पहिली ते चौथीची ग्रेडपात्र मुख्याध्यापक व पाच उपशिक्षकांची टुमदार इमारत असणारी शाळा बनली आहे.

शाळेच्या प्रगतीत उत्तरोत्तर भरच पडत आहे. शाळेच्या चार भिंतीमध्ये शिक्षण न देता विद्यार्थ्यांना अनुभव, कृतिशीलतेवर, सहअध्ययन, आवडी निवडी, सुप्त गुणांना, व आत्माविष्काराला संधी उपलब्ध करून दिली जाते. शालेय नेतृत्वामध्ये विद्यार्थ्यांना संधी दिली जाते. उद्याचा आदर्श नागरिक घडविण्याची पायाभरणी शाळेतूनच झाली पाहिजे. समता, स्त्रि-पुरुष समानता, बालसंरक्षण व बालअधिकार इत्यादी साठी विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात. महिला मेळाव्याचे आयोजन, शाळा व्यवस्थापन समितीमध्ये मुलगा मुलगी यांना सदस्यत्व दिले आहे. शाळेमध्ये सूचनापेटी व तक्रारपेटी बसवली आहे. बालअधिकारासाठी गुप्त मतदान पद्धतीने दरवर्षी प्रत्यक्ष **शालेय मंत्रीमंडळ निवडणूक** पारपाडली जाते. लोकशाहीचा पाया भक्कम करण्यासाठी हक्क व कर्त्यव्याची जाणीव होण्यासाठी मंत्रीमंडळाला शपथ दिली जाते. शालेय मुख्यमंत्र्याच्या निवेदनाची दखल घेऊन ग्रामपंचायतने भव्य स्टेजची पूर्तता करून दिली आहे.





# धानोरेत चिमुकल्यांची निवडणूक

**शाळेमध्ये पार पडलेल्या मंत्रीमंडळ निवडणुकिची छायाचित्रे व प्रसिद्धी पत्रक**

**मुख्याध्यापक व शिक्षकांचा स्वविकास :-** मुख्याध्यापक व शिक्षकांनी शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता वाढवल्या आहेत. तालुका स्तरापासून ते राज्यस्तर तसेच केंद्रसरकारच्या CCRT प्रशिक्षणाचाही लाभ घेतला आहे. नवोपक्रमांचे लेखन व कृतीसंशोधने सादर केली आहेत. सर्व शिक्षकांनी शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता वाढवल्या मुळे नियोजन व व्यवस्थापनात सुसूत्रता येऊन संघबांधणी झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी फायदा झाला. शिक्षकांनी केलेले लेखन, शालेय भाषणे, प्रज्ञाशोध मार्गदर्शिका, यशवंत शिष्यवृत्ती, प्रश्नपत्रिका संच, इत्यादीची निर्मिती, शैक्षणिक लेख लिहिले तसेच विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर प्रशिक्षणात तज्ञ मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली. त्यामुळे शाळेला व शिक्षकांना खालील पुरस्कार प्राप्त झाले.

**शाळेला प्राप्त पुरस्कार :-** ग्रामीण विभाग जि.प.आदर्श शाळा प्रथम क्रमांक पुरस्कार सन -२०००, स्वच्छ विद्यालय पुरस्कार सन २०१७, ISO प्रमाणपत्र सन २०१४-१५, स्वच्छ सुंदर शाळा पुरस्कार [मालपाणी परिवार ] सन २०१७, विद्यावर्धिनी उत्कृष्ट शाळा पुरस्कार, ग्रामीण गुणवत्ता विकास कार्यक्रम सन २०१४-१५ जिल्हा प्रथम.


**शिक्षकांना प्राप्त पुरस्कार** :- खाजगी संस्था, पंचायत समिती, जिल्हा परिषद व राज्य शिक्षक पुरस्कार यावर सात शिक्षकांनी नाव कोरले आहे. शालेय गुणवत्तेत वाढ होणेसाठी प्रशिक्षणामुळे खूप मदत होते. भाषा-गणित अध्ययन समृद्धी, SMART PT, गणित संबोध, सेवांतर्गत प्रशिक्षणे, निष्ठा, CCRT, मुल्यशिक्षण, इंग्रजी विषयाचे MOOC व TAG आदी प्रशिक्षणामुळे शिक्षकांचे ज्ञान अद्यावत होऊन अध्ययन अध्यापनात सकारात्मक बदल घडून आले.तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशिक्षणामुळे खूप फायदा झाला आहे.





**शाळेतील शिक्षक पुरस्कार स्वीकारतांना**

**तंत्रज्ञानाचा वापर :-** तंत्रज्ञानामुळे अवघे जग मानवाच्या मुठीत आल्याचे भासू लागले आहे. प्रशासकीय कामकाजात संगणकाचा वापर केला जात आहे. तसेच दैनंदिन अध्यापनात ई-लर्निंग, प्रोजेक्टर, इंटर ACTIVE बोर्ड, झूम APP, दीक्षा APP, यांचा वापर तसेच स्वनिर्मित व्हिडीओ, ऑनलाईन टेस्ट शिक्षकांनी बनवल्या आहेत.



**तंत्रज्ञानाच वापर करून कोविड-१९ काळातील online शिक्षण**

**अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील बदल व अध्ययन निष्पत्ती :-** अध्ययन अध्यापन प्रक्रिया ही बालक केंद्रित असली पाहिजे.विद्यार्थी केंद्रबिंदू मानून पाऊल टाकले तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीणविकास होणे फारसे अवघड नसते, याचा प्रत्यय या शाळेने दाखवून दिला आहे. ABL शिक्षण पद्धती, गटपद्धती, सहाध्यायी शिक्षण, यामुळे पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यापूर्वी राष्ट्रीय ग्रामीण, ग्रामीण सर्वसाधारण व जिल्हापरिषद गुणवत्ता यादीत ७५ विद्यार्थ्यांनी स्थान पटकावले आहे. खाजगी प्रकाशनांच्या प्रज्ञाशोध परीक्षेतही ६४ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. महाराष्ट्र राज्य बाल चित्रकला तसेच जि.प.च्या विविध गुणदर्शन स्पर्धेत सातत्याने पंचवीस वर्षापासून तालुकास्तर व जिल्हास्तरावर अनेक बक्षिसे मिळवली आहेत. सातत्याने शाळा सिध्दी अ श्रेणी मिळवली आहे.

**कोविड-19 शाळा बंद - पण शिक्षण सुरु :-** शासनाच्या या उपक्रमाची काटेकोर पणे अंमलबजावणी सुरु आहे. सर्व वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे व्हाटसएप ग्रुप बनवून दररोज ऑनलाइन लिंक, टेस्ट, PDF स्वरुपात अभ्यास पाठवला जातो .व स्वाध्याय पुस्तिकाही पुरवल्या असून पालकांच्या मदतीने सोडवल्या जातात. फोन, ग्रहभेट, याद्वारे मार्गदर्शन केले जाते. इयत्ता दुसरी ते चौथी वर्गाचे नियमित झूम मिटिंग लेक्चर्स होतात. इयत्ता पहिलीच्या मुलांना मुळाक्षरे अंक यांचे व्हिडीओ स्वतः बनवून पाठवले जात आहेत. ऑनलाइन वक्तृत्व, चित्रकला इत्यादी स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रमाणपत्रे वाटप केली आहेत. यावरूनच शाळा बंद - पण शिक्षण सुरु याची प्रचीती दिसून येते.




**शाळेतील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कवितांचा संग्रह**

**बालमनाचा आरसा सुंदर चित्र –काव्य बालकलाकृती :-** इयत्ता चौथी भाषा विषयातील अध्ययन निष्पत्तीनुसार विद्यार्थांना स्वविचार कविता रूपाने मांडण्याची संधी दिली. तसेच वर्गशिक्षिका श्रीमती उदावंत यांनी लेखनाविषयी मार्गदर्शन केले त्यातूनच खेळ,वृक्षारोपण,सुट्टीची धमाल,गणेशोत्सव आदी विषयांच्या सुंदर३४ कवितांची निर्मिती या बाल साहित्यिकांनी केली. या कविता संग्रहाचे प्रकाशन मान्यवरांचे हस्ते होऊन YOU TUBE FLIPBOOK स्वरुपात उपलब्ध आहे.

https://onlinefliphtml5.com/xcnpp/wgpl/?1599652321049#.X1jCXVacH-

**लोक सहभागातून विकास :-** शालेय व्यवस्थापन समिती, पालकसंघ सहभाग ,समाज सहभाग, माजी विद्यार्थी सहभाग यातून विद्यार्थी व शाळा विकासात मोठे बदल झालेले आहेत. शाळेच्या भौतिक गरजांचे सुक्ष्म नियोजन शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षक पालक संघ करतात. शाळेची प्रगती तसेच गुणवत्तेमुळे, उपक्रमशीलतेमुळे, सातत्याने नाविन्याचा ध्यास असल्या कारणाने SMC, शिक्षक-पालक संघ व शिक्षकांचे प्रयत्नांमुळे तार कंपाउंड, RCC भव्य प्रवेशद्वार, ISO रंगकाम, बालोद्यान खेळणी, पाण्याच्या टाक्या, साउंड सिस्टीम, शालेय फर्निचर, धान्य कोठ्या, माजी विद्यार्थी दिनेश दिघे यांच्याकडून प्रोजेक्टर, इंटर ACTIVE बोर्ड, लोकप्रतिनिधी यांचेकडून २ संगणक संच, प्रोजेक्टर, प्रिंटर तसेच शाळेचा वाढता नावलौकिक ऐकून श्रीमती जयश्री कोते [ऑस्ट्रेलिया निवासी ] यांनी पण EPSON कंपनीचा सत्तर हजार रुपये किमतीचा प्रोजेक्टर शाळेस भेट दिला. सर्व वर्गात ईलर्निंग सुविधा प्राप्त करून दिलेली असून त्यानुसार दैनंदिन अध्यापन केले जाते. शाळेमध्ये दिक्षाॲप तसेच प्रोजेक्टर वापरले जाते. त्यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ झाली आहे. श्री.दिनकर दिघे व श्री कैलास दिघे यांनी प्रिय व्यक्तीच्या स्मरणार्थ दीड लाख रुपयांचे बहुउद्देशीय सभागृह बांधून दिले. विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यासाठी सुमारे ३० हजार रुपयांच्या ठेव पावत्या केलेल्या आहेत. शाळा पातळीवरील बालआनंद मेळाव्याची संपूर्ण बक्षिसे सामाजिक संस्था देते. याप्रमाणे आजवर लाखो रुपयांचा लोकसहभाग शाळेने मिळवला आहे.




**विविध स्पर्धांमध्ये बक्षीस पटकाविलेले शाळेचे विद्यार्थी**

**राज्य व जिल्हा स्तरावरील स्पर्धांमध्ये शाळेची वाटचाल :-** जि.प.विविध गुणदर्शन किलबिल गट हस्ताक्षर स्पर्धे मध्ये जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक शाळेने पटकावला. जि.प.विविध गुणदर्शन किलबिल गट वेशभूषा स्पर्धे मध्ये जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांक शाळेने पटकावला. मराठी राजभाषा दिन स्वरचित कविता वाचन स्पर्धे मध्ये जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांक शाळेने पटकावला. राज्यस्तरीय online वक्तृत्व लहान गटातून राज्य स्तरावर तृतीय क्रमांक शाळेने पटकावला. योगासने बालगट, वेशभूषा किलबिल, वैयक्तिक गीतगायन किलबिल, गोष्ट सादरीकरण बालगट, यास्पर्धामध्ये आपला सहभाग नोंदवला. राज्यस्तरीय online बालवक्ता लहान यास्पर्धे मध्ये राज्य स्तरावर उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असून, शाळा हे गावचे भूषण असते, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे ‘दिघेवस्ती [धानोरे]’ शाळा होय. विविध स्पर्धा, शिष्यवृत्ती, प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी उतुंग, घवघवीत यश मिळवूण गुणवत्तेचे संवर्धन खेड्यातील छोट्याशा वस्ती शाळेतील शैक्षणिक संकुलात केलेले दिसून येते. शिक्षक केवळ शिक्षणतज्ञ असून चालत नाहीतर तो तन्मय, तत्पर, तल्लीन, तद्उपासक व ततसेवकही असावा लागतो. याची प्रचिती या शाळेतील शिक्षकांमध्ये दिसून येते. शाळेला मिळणारे यश हा योगायोग नसून सातत्याने घेतलेल्या परिश्रमाचे ते नित्य मिळणारे फळ आहे, हे या शाळेने दाखवून दिले आहे.

**“SUCCESS REQUIRES HARD WORK, TRAINING AND DISCIPLINE,**

**IF YOU CAN COPE WITH ALL THESE, OPPORTUNITIES ARE EVREYWHERE.”**

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. सुभाष वसावे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, अहमदनगर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हॅरिसन ब्रँच (जे.कुंभारी), ता. कोपरगाव, जि. अहमदनगर

**ई.मेल :-** zppsharisonbranch1212@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री.नवनाथ पांडुरंग सूर्यवंशी **ई.मेल :-** suryawanshinavnath3@gmail.com



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हॅरिसन ब्रँच शाळेची इमारत**

**शालेय नेतृत्व :-** **'फळाफुलांचा मळा पाहिजे, आनंदाचा सोहळा पाहिजे,**

**गावात एक वेळ देऊळ नसले तरी चालेल, पण एक आदर्श शाळा पाहिजे.'**

अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात नगर - मनमाड या हायवेने पाटाच्या कडेने थोड आत गेलं कि, रस्त्याने तूमच्या स्वागताला हजर असतात आंब्याची,लिंबाची व जांभळाची झाडे अन् त्याच्या जोडीला पाटातून खळाळत वाहणारे पाणी. यापाटाच्या कडेला उंचउंच बदामाच्या वनराईत व निसर्गाच्या सानिध्यात असणारी जि.प. प्राथमिक शाळा हॅरिसन ब्रँच. या शाळेचा इतिहासही मोठा रंजक आहे. हॅरीसन ब्रँच शाळा हि १२/१२/१९३६ मध्ये इंग्रज अधिकारी हॅरिसन याने जेऊर कुंभारी येथे सुरु केलेली शाळा. हॅरिसन हा इंग्रज अधिकारी या चारीवर पाटकरी म्हणजेच चारीचे पाणी सोडायला नेमणूक केलेला अधिकारी होता. या परिसरात त्याने पाटाच्या कडेने आंब्याची, लिंबाची, तसेच जांभळाची भरपूर झाडे लावली होती. सदर शाळेचा जिर्णोद्धार गावातील ज्येष्ठ नागरीक लहानूभाऊ नागरे यांनी करुन, स्वतःची जागा शाळेसाठी दान करून १० खोल्यांची भक्कम अशी इमारत L आकारात बांधून दिली. शाळेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या तत्कालीन गृहमत्र्यांच्या हस्ते केले होते. एकेकाळी कोपरगाव तालुक्यातील सर्वात मोठी असलेली शाळा आपलं अस्तित्व टिकवायचा प्रयत्न करते आहे.

अशा स्थितीत सन २०१७-१८ ला आलेले नवीन शिक्षक श्री.नवनाथ सूर्यवंशी यांनी शाळेला पुन्हा ते वैभव मिळवून देण्याचा, शाळेचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचा मानस पक्का केला. कारण या शाळेत येणारी सर्वच मुले अनुसूचित जाती जमातीतील, मजुरी करणाऱ्या पालकांची होती. शाळेतील ९०% मुले दीड कि.मी. वरून पवारवस्ती (जेऊर कुंभारी) येथून हायवे ओलांडून येत असत. या दृष्टीने सहकारी शिक्षिका मनिषा शिंपी यांच्या सहकार्याने शालेय व्यवस्थापन समितीची पुनर्गठण केले. त्यांच्या सहकार्यातून ज्या शैक्षणिक व भौतिक सुविधांची कमतरता आहे त्या निश्चित करण्यात आल्या. विद्यार्थी गुणवत्ता विकास, शैक्षणिक व भौतिक सुविधा यावर चर्चा करण्यात आली.यासाठी गावातील शिक्षणप्रेमी,दानशूर व्यक्ती, माजी विद्यार्थी यांच्या भेटी घेऊन शाळेसाठी मदत घेण्याचे नियोजन करण्यात आले.




**शाळेतील शिक्षक स्व-विकासासाठी प्रशिक्षण घेताना**

**मुख्याध्यापक व शिक्षकांचा स्व-विकास :-** रवींद्रनाथ टागोर यांच्या सुवचना नुसार "एखादा शिक्षक जर स्वतःच अध्ययन करत नसेल, तर तो योग्य प्रकारे अध्यापन करतो आहे असे म्हणता येणार नाही.एखाद्या दिव्याची स्वतःची वात जर जळत नसेल तो दुसरा दिवा कधीही पेटवू शकणार नाही, ज्या शिक्षकाने स्वतःच्या विषयाचा अभ्यास थांबविलेला आहे, आपल्या ज्ञानात जो भर घालत नाही, तो केवळ ठराविक पाठच विद्यार्थ्यांना शिकवीत राहतो, असा शिक्षक त्यांच्या मनात माहिती साठवायला मदत करू शकेल, पण त्यांच्या मधील स्फुल्लिंग चेतवू शकणार नाही." या सुवचनानुसार शाळेतील दोन्ही शिक्षकांनी शैक्षणिक अर्हता वाढवली आहे. शाळेत जीवन शिक्षण, किशोर, वर्तमानपत्र यांचे नियमितपणे वाचन करत असतात. शासनाच्या वेगवेगळया उपक्रमात, प्रशिक्षणात व वेबीनार मध्ये सहभागी होऊन शिक्षक व विद्यार्थी समृद्ध होत असतात. तसेच शाळेचे मुख्याध्यापकांचे शैक्षणिक व सामाजिक विषयांवर अनेक मासिके व वर्तमानपत्रांतून लेख प्रसिद्ध होत असतात. एक तास वाचनाच्या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थी व शिक्षक मधल्या सुट्टीत अवांतर वाचनाची पुस्तके वाचत असतात.

स्व विकासासाठी मागील दोन वर्षात घेतलेली प्रशिक्षणे खालीलप्रमाणे आहेत:-

१) Mitra ( mind in training for right awareness)अनापान साधना

२) निष्ठा प्रशिक्षण ३) सर्वंकष सातत्यपूर्ण मूल्यमापन ४) ज्ञानरचनावाद प्रशिक्षण

५) वाचन लेखन गणित विकास कार्यक्रम ६) तंत्रस्नेही प्रशिक्षण ७) गणित संबोध प्रशिक्षण

८) बालस्नेही प्रशिक्षण ९) योगसाधना व प्राणायम शिबीर १०) शाळाबाह्य प्रशिक्षण

**अध्ययन निष्पत्ती** :- अध्ययन निष्पत्ती म्हणजे एखादा विशिष्ट वर्ग किंवा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी जे ज्ञान किंवा कौशल्य मिळवितात याबाबतची गुणात्मक किंवा संख्यात्मक माहिती. आमच्या शाळेत अध्ययन अध्यापन पद्धती ही विद्यार्थी केंद्रित असते. विद्यार्थी गटागटाने वैयक्तिक अभ्यास करतात, शिक्षक सुलभकाची भूमिका पार पाडत असतात. अध्ययन अध्यापना साठी शैक्षणिक साहित्य, प्रत्यक्ष अनुभवांचा वापर शाळेत केला जातो. पाठ्यपुस्तकातील छोटे छोटे प्रयोग विद्यार्थी स्वतः करून बघतात. शाळेच्या विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रभेटी आयोजित केल्या जातात. तंत्रज्ञानाचा अध्यापनात पाठ्यघटकाच्या गरजेनुसार वापर केला जातो. यामध्ये शैक्षणिक व्हिडीओ, karaoke mic, विविध app चा वापर, virtual field trip, ब्लूटूथ स्पीकर,प्रो जेक्टर यांचा वापर केला जातो.




**विद्यार्थी प्राप्त ज्ञानाच्या आधारे प्रयोग करताना**

**शाळेच्या विकासात शाळेच्या व्यवस्थापन समिती तसेच पालकांचा सहभाग :-** आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक हे सर्व मजुरी करणारे असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. ते जरी शाळेसाठी आर्थिक मदत देऊ शकत नसले तरी आपल्या परीने श्रमदानात सक्रीय सहभाग देत असतात. पालकांच्या सहकार्यातून शालेय कंपाउंड रंगकाम, तसेच परसबाग निर्मिती व शाळेच्या भौतिक सुविधेत सुधारणा करण्यात मोलाचा वाटा असतो. कोरोना कालावधीत शाळा बंद असताना पालक शाळेत येऊन शाळेच्या परिसराची स्वच्छता स्वतःहून ठेवत होते.




**शाळेची निगा राखताना पालक**

**लोकसहभाग :-** शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी १०४०० एवढा निधी लोकसहभागातून मिळवला आहे. त्यातून शाळेसाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्यात आली.

**शाळेत राबविलेले नवोपक्रम :-** विद्यार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन आनंददायी व मनोरंजक होण्यासाठी शाळेमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये 'स्व' ची जाणीव, समानानुभूती, समस्या निराकरण, निर्णयक्षमता, परिणामकारक संप्रेक्षण, व्यक्तीव्यक्तीमधील सहसंबंध, सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, भावनांचे समायोजन, ताणतणावांचे समायोजन या जीवन कौशल्याला अनुरूप उपक्रमांची रेलचेल आमच्या शाळेत वर्षभर चालू असते. जुलै

महिन्याच्या सुरुवातीला टोमॅटो,वांगी,मिरची,अंबाडी,पालक,शेवगा व कडीपत्ता अशी रोपे स्वखर्चाने आणून विद्यार्थी व पालकांच्या मदतीने शालेय परसबाग तयार केली आहे. ज्याचा वापर शालेय पोषण आहार तयार करताना शाळेस होतो.



**skype चा वापर करून नायजेरिया व व्हियेतनाम या देशातील शाळेच्या विद्यार्थी व शिक्षकांशी संवादसाधताना**

**तंत्रज्ञानाचा वापर :-** हॅरीसन ब्रँच शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्हिडीओ, ऑडीओ कविता, गोष्टी, गाणी ऐकवल्या जातात व दाखवल्या जातात. एखादा घटक स्पष्ट झाला नसेल तर त्याबाबत अधिक माहिती आंतरजाल चा वापर करून व्हिडीओ द्वारे दाखविला जातो. google form चा वापर करून विद्यार्थ्यांचे अनुधावन केले जाते. इतर देशातील विद्यार्थ्यांशी व शिक्षकांशी mystery skype द्वारे भाषिक खेळ इतर शाळेतील विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद केला जातो. संगणकातील paint tool, word document, संगणकाविषयी माहिती दिली जाते. शाळेचे मुख्याध्यापक स्वतः तंत्रस्नेही असल्याने ते शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाचा वापर तर करतातच पण केंद्रातील तसेच तालुक्यातील शिक्षकांसाठी त्यांनी कार्यशाळा घेतल्या आहेत. वेळोवेळी शिक्षण परिषदेमध्ये तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर याविषयावर तज्ञ मार्गदर्शक म्हणूनही काम पाहतात. शाळेचे सर्वप्रकारचे अहवाल, पोषण आहार, मासिक अहवाल संगणकावर करून पाठवले जातात. शाळेचा स्वतःचा मेल आयडी असून शाळेचा शिक्षणधारा ब्लॉग व युट्यूब वर शाळेच्या उपक्रमांचे फोटो व व्हिडीओ वेळोवेळी अपलोड केले जातात.

**शालेय मंत्रिमंडळ निवडणुकीसाठी EVM चा वापर -** आमच्या जि.प.शाळेत शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच शालेय मंत्रिमंडळ निवडणूक voting machine aap TAB चा वापर करून करण्यात आली.

**परिपाठ व अध्यापनासाठी CKARA OKE MI चा वापर –** संगीतमय परिपाठ होण्यासाठी कराओके माईक फारच उपयुक्त होत आहे. ग्रामीण भागात वीज भारनियमनामुळे विजेचे लपंडाव चालू असतात. त्यावर उपाय म्हणून कमी खर्चात ब्लूटूथ माईक वापरून आमच्या शाळेने परिपाठात व अध्यापनात रंजकता आणली आहे.

**व्हिडिओ निर्मिती –** शिष्यवृत्ती परीक्षेसंदर्भातील शैक्षणिक व्हिडीओ तसेच शाळेच्या वेगवेगळया उपक्रमांचे व्हिडीओ शाळेच्या 'शिक्षणधारा' या youtube channel वर अपलोड केले.

**वेबसाईट -** शाळेच्या www.shikshandhara.com या ब्लॉगवर शाळेतील उपक्रम तसेच पालक, विद्यार्थी व शिक्षकां साठी उपयुक्त माहिती वेळोवेळी अपडेट केली जाते.

**Skype in the classroom** – Microsoft च्या या उपक्रमांतर्गत आमच्या शाळेतील विद्यार्थी जगातील कोणत्याही

देशातील विद्यार्थी व शिक्षकांशी संपर्क साधून संवाद साधतात. भाषेची अडचण असूनही एकमेकांच्या भावना समजावून घेऊन mystery Skype सारखे उपक्रम आमच्या शाळेत राबविले जातात.

**VR BOX - VR BOX** चा वापर करून विद्यार्थ्यांना virtual reality चा अनुभव करून दिला जातो. त्यासाठी मोबाईल मध्ये VR Thrills, VR Abyss, VR Jurassic अशाप्रकारचे app घेऊन अध्यापनात योग्य प्रमाणात वेळोवेळी तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर केला जातो.



**लेखिका अंजली अत्रे यांच्याशी video conference द्वारे संवाद साधतान**

**लेखक आपल्या भेटीला -** शाळेत राबविलेल्या उपक्रमाची तालुकास्तरीय तंत्रस्नेही प्रशिक्षणात माहिती करून दिली. 'मिठाचा शोध' पाठाच्या लेखिका अंजली अत्रे यांच्याशी video conference द्वारे संवाद साधून, सदर उपक्रमाविषयी मार्गदर्शन केले. तसेच virtual field trip च्या माध्यमातून yellow stone national park ला भेट. flip grid च्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांचा video द्वारे विविध उपक्रमात सहभाग घेण्यात आला. त्यामुळे इतर शिक्षकही आवर्जून आपल्या शाळेत सदर उपक्रम राबविताना दिसून येतात. तालुकास्तरावर तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करण्या संदर्भात ज्या कार्यशाळा घेतल्या त्या कार्यशाळा मध्ये आमच्या शाळेतील शिक्षकांना मार्गदर्शन करायची संधी मिळाली.

**शालेय गुणवत्ता :-** शालेय गुणवत्ता वाढीसाठी शासनाने निर्धारीत केलेली प्रशिक्षणे वेळोवेळी घेण्यात आली. विविध प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्ती प्रगतीत वाढ होऊन अध्यापन शास्त्रीय ज्ञानाच्या संदर्भात चांगले आकलन आणि कौशल्ये प्राप्त झाली, शाळेतील शाळा आधारित मूल्यांकनाच्या अंमलबजावणी साठी आवश्यक घटक समजले. विद्यार्थ्यांच्या सशक्त सर्वंकष विकासा करिता कोणती सामाजिक, वैयक्तिक वैशिष्टे गरजेची आहेत, तसेच विद्यार्थी केंद्रित व सर्वसमावेशक वातावरण शाळेत कसे निर्माण करावे, हे प्रशिक्षणातून चांगल्या पद्धतीने समजले. सुरक्षित आणि आरोग्यदायी शालेय वातावरण निर्मिती करिता कोणत्या कृती आवश्यक आहे हे समजले.उदा. ज्या मुलांना लिहिण्यात अडचण येत आहे त्यांच्याकरिता ict चा वापर केला. विद्यार्थ्यांमध्ये परस्परांबद्दल खरी आपुलकी, आदर याबद्दल विद्यार्थ्यां मध्ये संवेदनशीलता रुजवण्यासाठी विद्यार्थ्यांचे लिंग, सामाजिक, सांस्कृतिक, पार्श्वभूमी आणि क्षमता लक्षात न घेता वर्गातील विद्यार्थ्यांचे गट करून अभ्यास घेतला जातो. कला शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये संवेदनाद्धारे अनुभूती घेण्याला प्रोत्साहन दिले जाते. यात आमच्या शाळेवर बालआनंद मेळावा, परिपाठाच्या वेळी कृतियुक्त कविता गायन, पाठाशी संबधित छोटी नाट्ये, नाट्यीकरण यांचे सादरीकरण करून घेतले जाते. कार्यानुभव विषयांतर्गत शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी सुंदर, सुबक अशा घरांच्या

व आकाशकंदिलाच्या प्रतिकृती बनविल्या आहेत. विद्यार्थ्यांकडून झाडाच्या पानांपासून वेगवेगळया कलाकृती बनवून घेतल्या जातात. पाठ्यघटकांशी संबधित अधिकची माहितीसाठी दीक्षा app चा वापर केला जातो.



**शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम एका दृष्टीक्षेपात**

**तालुका, जिल्हा व राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी उपक्रम :-** शाळेतील विद्यार्थी विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये सहभागी होत असतात. तालुकास्तरावर शाळेतील विद्यार्थ्यांनी वेशभूषा स्पर्धेत सन २०१८-१९ व २०१९-२० मध्ये द्वितीय क्रमांकाने बक्षीस मिळवून शाळेच्या नावलौकिकात भर पाडली. तसेच शाळेचे मुख्याध्यापक यांनी गणित विज्ञान प्रदर्शनात सलग ७ वर्षापासून 'जागर लोकसंख्या शिक्षणाचा' या विषयांतर्गत जिल्हा स्तरापर्यंत जनजागृती करुन क्रमांक पटकावला आहे. मतदान जनजागृतीसाठी **'पत्रास कारण कि'** हा उपक्रम राबवून 21 सेकंदाची जनजागृती व्हिडीओ बनवून जि.प.नगर स्पर्धेत सहभाग घेतला. तसेच दसरा या सणाला आपट्याची पाने न वाटता मतदान जनजागृती विषयक घोषवाक्य आपट्यांच्या पानांच्या आकारात तयार करून पालक व मतदारांमध्ये वाटून जनजागृती केली. मुलांना पत्रलेखनाची ओळख व्हावी व कुटुंबातील नात्यांतील हरवत चाललेला संवाद 'पत्रास कारण कि' हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना लेखनास प्रवृत्त केले. असे विविधरंगी उपक्रम या शाळेत राबवण्या येतात. यामुळेच शाळेत विद्यार्थी उपस्थिती शंभर टक्के असते. या शाळेतील सर्वच मुले गुणवत्तेच्या बाबतीत सरस आहेत. आजही आमची शाळा भक्कम पाय रोवून उभी आहे. शाळेची गुणवत्तेकडे यशस्वी वाटचाल सुरु आहे.

**शाळेच्या उपक्रमासंदर्भात u tube लिंक :-** https://youtu.be/GQYgzPLYNk0

https://youtu.be/bq1Iufjapb0 https://youtu.be/j8Ex72eb0bE

https://youtu.be/3GjYayxC8gI https://youtu.be/526s_aYwlgk

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. सुभाष वसावे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, अहमदनगर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# महानगर पालिका उच्च प्राथमिक शाळा क्र.22,कृषिनगर,अकोला.

**ई-मेल :-** 160881.dhore.@mahaeschool.ac.in

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री.अर्जुन मनोहर हिंगमीरे **ई-मेल :-** arjunhingmire91@gmail. Com




**म.न.पा.उच्च प्राथमिक शाळा क्र.22,कृषिनगर,अकोला शाळेची इमारत**

अकोला शहरातील कृषीनगर ही वस्ती प्रसिद्ध आहे, ती गुन्हेगारी, गुंड लोकांची वस्ती म्हणून. येथेच वसलेली आहे ती महानगरपालिकेची उच्च प्राथमिक शाळा क्र.22. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या पण आर्थिकदृष्ट्या गरीब, मजुरी करणाऱ्या लोकांची मुले या शाळेत शिकतात. अशा परिस्थितीत ही शाळा आर्थिकदृष्ट्या गरीब लोकांच्या मुलांसाठी माणूस म्हणून घडविण्याच्या दृष्टीने यथार्थ प्रयत्न करीत आहे. शाळा हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचे प्रत्याभरण करणारे अत्यंत महत्त्वाचे संस्कारकेंद्र मानले जाते. प्रत्येकाच्या विकासात शाळेने केलेली पायाभरणी, दिलेले ज्ञान आणि संस्कार यांचे मोठे योगदान असते. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची गोडी निर्माण करणे, त्यासाठी त्यांना विविध उपक्रमांत सहभागी करून घेणे ह्यासाठी शाळेतील शिक्षक झटत असतात. याचदृष्टीने महानगर पालिका उच्च प्राथमिक मराठी शाळा क्र.22,कृषीनगर,अकोला ही शाळा सातत्याने प्रयत्न करीत आहे. येथील पालकांमध्ये व्यसनाधिनता, गुन्हेगारी, अस्वच्छता, अंधश्रद्धा, शिक्षणाप्रती अनास्था आहे. अशा परिस्थितीत मुलांना शिकत ठेवणे, त्यांचा सर्वांगीण विकास साधने हे आव्हान स्वीकारून येथील शिक्षक व मुख्याध्यापक कसोशीने प्रयत्न करीत आहेत.

**शाळेच्या विकासासाठी निर्धारित केलेली चतु:सुत्री पुढीलप्रमाणे :-**

1) विद्यार्थी सहभाग 2) पालक सहभाग 3) लोक सहभाग 4) शिक्षक सहभाग



**शाळेतील विद्यार्थ्यांचा कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभाग**

**विद्यार्थी सहभाग :-** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचे चार उद्देश डोळ्यासमोर ठेवूनच ही शाळा वाटचाल करीत आहे. १) स्वतःला ओळखायला शिकवणे २) स्वतः शिकण्यास प्रवृत्त करणे ३) स्वतः काहीतरी कृती करायला शिकणे. ४) सर्वांसमवेत सहिष्णुतेणे जगायला शिकणे. ही उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवूनच ही शाळा प्रयत्न करीत आहे. जेणेकरून शिक्षणासोबत माणूस घडू शकेल, गुन्हेगारी नष्ट होईल. यादृष्टीने येथे विविध आनंददायी अभ्यासपूरक उपक्रमांत विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतल्या जाते. विविध शालेय, सहशालेय उपक्रम, मूल्यवर्धन उपक्रम तसेच अध्ययनपूरक उपक्रमांत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढल्यामुळे सभाधिटपणा, आत्मविश्वास, मूल्य संवेदनशीलता, चिकित्सक बुद्धी, सर्जनशीलता, प्रामाणिकपणा इ. गुण कौशल्यांचा विकास झाला. (मूल्यवर्धक परिवर्तन व्हिडिओ लिंक https://youtu.be/5OV0hPbF5Y) परिपाठ तसेच विविध दिन विशेषा अंतर्गत येणाऱ्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविला आहे. (https://youtu.be/4yeC9uzduXo, https://youtu.be/4ty0QhJdNzU). शाळेत गैरहजर राहणाऱ्या मुलांना शाळा स्वतःची आहे असे वाटू लागले. शिक्षकांप्रती आदर वाटू लागला. खेळातून अभ्यास ही संकल्पना मुलांना भारी आवडली. शाळेत स्वलिखित कृतीयुक्त गीतांच्या माध्यमातून मुलांना आकर्षित केले. हळूहळू मुलांचे उपस्थितीचे प्रमाण वाढले आणि मुले अभ्यासाकडे वळली. बाल संरक्षनाच्या हेतूने शाळेत विविध कार्यक्रम आयोजित केल्या जातात. जेणे करून मुले लैंगिक अत्याचारास बळी पडणार नाहीत. ह्या कार्यक्रमांतर्गत दामिनी पथक तसेच बाल कल्याण समितीची मदत घेतली जाते. दिव्यांग मुलांची सुद्धा ही शाळा विशेष काळजी घेते. शासनाकडून होणाऱ्या मदतीसाठी वेळोवेळी पाठपुरावा करते. सेरेब्रल पालसी ह्या आजाराने त्रस्त असलेला निखिल व्हील चेअर दिल्यामुळे शाळेत येऊन अभ्यास करू शकत आहे. (निखिलच्या वाचनाची व्हिडिओ लिंक- https://youtu.be/-bPjaTn_XH8).

**'आमची बचत-आम्हाला परत'** ह्या धरतीवर येथील मुलेच बचत बँक चालवतात. व त्यातून स्वत: साठी शैक्षणिकसाहित्य घेतात.

**वाचन कट्टा :-** शाळेत शिक्षकांनी मोठ्या मुलांच्या मदतीने चौदाखडी तोरणासोबतच वर्गनिहाय,विषयनिहाय वाचन कार्डे बनवली. ह्यात प्रत्येक मुलाच्या क्षमतेनुसार विभाग बनवले. साधे शब्द ते जोडाक्षर युक्त शब्द, सोपी वाक्ये ते कठीणवाक्ये, उतारे, शब्दडोंगर, प्रश्नोत्तरे इ. सर्व बाबींचा या वाचन कट्ट्यात समावेश केला आहे.



**वाचन कट्ट्यासाठी तयार केलेले वाचन साहित्य**

**तंत्रज्ञानाचा अध्ययन अध्यापनात वापर:-** शाळा डिजिटल झाल्यामुळे क्लिष्ट कठीण संबोध सुलभ करता आले. **(व्हिडिओ लिंक- https://youtu.be/kfNkePIUjys )** तंत्रज्ञानाचा वापर करून 'वर्गात अवतरली सूर्यमाला' ही भौगोलिक अनुभूती मुलांना दिली. शिक्षक टेक्नोसेव्ही झाल्यामुळे ई साहित्यही तयार होऊ लागले आहे. यात शब्द, वाक्ये, उतारे, शब्दडोंगर, इंग्लिश स्टोरीज, गणिती उदाहरणे यांच्या pdf, व्हिडीओज तयार केलेले आहेत. शाळेतील शिक्षिका अपर्णा ढोरे याचे स्वतःचे यू ट्यूब चॅनेल आहे ह्यात शाळेचे सर्व उपक्रम आहेत.



**वर्गात सूर्यमालेचा प्रत्यक्ष अनुभव घेताना मुले**

कोविड काळात ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहिलेली मुले ऑफलाईन शिक्षणामुळे पुन्हा प्रफुल्लित झाली. आपल्याकडे स्मार्टफोन नाही ही भावना त्यांना अस्वस्थ करीत होती,पण शिक्षिका अपर्णा ढोरे ह्यांनी मुख्याध्यापक अर्जुन हिंगमीरे यांच्या सहकार्याने घरोघरी जाऊन अध्यापन सुरू केले, शैक्षणिक साहित्य पुरविले. घरी अध्ययनास सहाय्य ठरतील असे लमीनेशनयुक्त कार्डे व स्वाध्याय कृतीपत्रिका तयार करून मुलांपर्यंत पोहोचविल्या. हा ऑफलाईन पुढाकार मुलांना स्वयं अध्ययन करण्यास पुरेसा होता. तसेच वाटप केलेल्या शैक्षणिक साहित्या मुळे त्यांच्या घरी छोटी शाळाच तयार झाली.

**लॅमीनेशन युक्त स्वयं अध्ययन कार्डे :-** त्यानुसार प्रथम विद्यार्थ्यांच्या अध्ययनस्तरानुसार गुगल डॉक्स, वर्ड मध्ये अभ्यासक्रमानुसार pdf तयार करून त्याच्या प्रिंट्स काढल्या. त्याला लॅमिनेशन करून ही अध्ययन कार्डे बनवली. तो अभ्यास मुलांकडून करवून घेण्यासाठी पालकांना प्रेरित केले. सोबतच स्व खर्चाने वह्या,पेन,पेन्सिली अशा आवश्यक वस्तूंचेही वाटप केले. या काळात शाळेमध्ये कोविड केंद्र असल्यामुळे, तसेच शाळेच्या परिसरात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे, मुलांपर्यंत काड्र्स आणि शै. साहित्य पोहोचविणे फार अवघड होते. शाळेतील शिक्षिकेने प्रत्येक घरी जाऊन स्वतः मुलांना अध्ययनात येणाऱ्या अडचणींचे निराकरण केले आणि अजूनही करीत आहेत. या कामी मुख्याध्यापक तसेच शाळा व्यवस्थापन सदस्यांची फार मोलाची मदत लाभली. ISER पुणे व SCERT द्वारा दर शनिवारी घेण्यात येणाऱ्या मैत्री करू या विज्ञान गणिताशी या कार्यशाळेची प्रेरणा घेऊन मुले घरी वेगवेगळे प्रयोग करीत आहेत. तसेच बालदिनी म्हणजे 14 नोव्हेंबर 2020 ला झालेल्या राज्यस्तरीय इ बालसाहित्य संमेलनात अकोला जिल्ह्यातून इयत्ता सातवीची विद्यार्थिनी आकांक्षा विनोद कांबळे ही सहभागी झाली होती. अशा प्रकारे सर्वांगीण विकासाचा आलेख उंचावतच आहे.

(https://drive.google.com/file/d/138E7660PblsRA_p6RFTJ_HdoqybKARHG/view?usp=drivesdk)



**कोविड काळात विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन शिक्षक शिकविताना**

**पालक सहभाग :-** शाळा तुमचीच आहे हा विश्वास येथील शिक्षकांनी पालकांना दिला. येथील शिक्षक शाळेतच नाही तर वस्तीत जाऊन समुपदेशनाचे काम करू लागली. पती पत्नींतील वाद,भांडणे सामोपचाराने मिटल्यामुळे अनेक मुलांना आपले आईवडील एकत्र मिळाले. शाळा सुटल्यावर पालकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करणे,हे ही काम शिक्षक करू लागले. येथील शिक्षकांनी काही पालकांना व्यवसाय उभा करण्यास आर्थिक सहकार्य सुद्धा केले आहे. ज्या पालकांची शिक्षणाबाबत अनास्था,मुलांकडे दुर्लक्ष होत आहे त्यांच्या मुलांनीच पालकांकडे लक्ष द्यायचे ही क्लृप्ती केली. त्यांच्या जाणीवजागृती साठी पथनाट्य वस्तीत जाऊन मुलांनी व शिक्षकांनी सादर केले. पालकांसाठी शाळेत आरोग्य शिबिरे, व्यसनमुक्ती उद्बोधन,खेळ स्पर्धा आयोजित केल्या. **'शाळा माझ्यासाठी आणि मी शाळेसाठी'** ही भावना तयार झाली. लोक सहभागातून शाळेचं बदललेलं रुपडं प्रत्येकाला शाळेकडे खुणावत आहे. फक्त तक्रार करण्यासाठी येणारे पालक कल्पक सूचना देण्यासाठी शाळेत यायला लागले.

**पालक मैत्रीण उपक्रम :-** कोविड काळात पालक मैत्रीण उपक्रम खूपच प्रभावी ठरला. त्यातीलच काही पालक मैत्रीणी हुशार आणि 10 वी,12 वी शिकलेल्या असल्यामुळे त्यांची कोविड काळात मुलांना शिकवण्यासाठी मदत घेण्यात आली. जवळपासची मुले बोलवून मोकळ्या जागेत शिकवणे सुरू झाले. त्यांना खडूफळा, इ.साहित्य शाळेने दिले. याकामी दिक्षाताई भारसाकळे,

ज्योतिताई कांबळे तसेच इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी आकांक्षा, निकिता ह्यांची मोठी मदत झाली. इयत्तेनुसार विषयनिहाय,विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार स्वयंअध्ययन कार्डे तयार करून प्रत्येकाच्या घरी त्याचा संच दिल्या जात आहे. रोज कामावरून आल्यावर आपले मूल अभ्यास करेल ह्याची जबाबदारी पालकांकडे देण्यात आली.



**पालक मैत्रीण उपक्रमा अंतर्गत दिक्षाताईच्या घरची शाळा**

**लोकसहभाग :-** खाजगी शाळा किंवा कॉन्व्हेंट्स मध्ये तेथील भौतिक सोयी सुविधांमुळे लोक आकृष्ट होतात. त्यामुळे शाळेतील शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी शाळेचा कायापालट करण्याचे ठरविले. ह्यासाठी नगरसेविका सुनीताताई अग्रवाल यांचे भरीव सहकार्य मिळाले. त्यांनी त्यांच्या निधीतून शाळेचे नूतनीकरण केले. शाळेची इमारत सुसज्ज व सुंदर झाल्यामुळे परिसरातील सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. शाळेच्या इतर सुविधेसाठी लोकसहभागातून सुधारणा करण्यात आल्या. शाळेला वॉटर प्युरीफायर, पाण्याची टाकी, लॅमीनेशन मशीन, व्हाईटबोर्ड, वाचनालयासाठी पुस्तके, विद्यार्थ्यांना लागणारे शैक्षणीक साहित्य, विविध आरोग्य शिबिरे, आधुनिक स्वच्छतागृह इ. सुधारणा केल्या. विद्यार्थी अध्ययन कोपरा, शैक्षणिक सहलीचे आयोजन, सांस्कृतिक कार्यक्रम लोकसहभागातून पार पाडले जातात. कोविड काळात लोक सहभागातून शाळेत प्रिंटर, विषयनिहाय कार्डे ठेवण्यासाठी लाकडी रॅक घेण्यात आले, प्रतिष्ठित लोकांचे वाढदिवस मुलांना शैक्षणिक साहित्य देऊन शाळेत साजरे केल्या जातात. शाळेच्या विकास समितीत अशा प्रतिष्ठित लोकांचा समावेश केला आहे. शाळेच्यावतीने त्यांना ऋणनिर्देश पत्र दिल्या जाते. इनव्हील क्लब, रोटरी क्लब, इतर सामाजिक संस्था ह्यांनी देखील शाळेच्या प्रगतीवर खुश होऊन शाळेला भरपूर मदत केली आहे.



**पंजाबराव कृषी विद्यापीठ अंतर्गत आयोजित कृषी व तंत्रज्ञान प्रदर्शनीला विद्यार्थ्यांची भेट**

**शिक्षक सहभाग :-** मी एक शिक्षक आहे, शिक्षण हा माझा स्वधर्म आहे, विद्यार्थी हे माझे दैवत आहेत. ह्या उक्तीनुसार येथील शिक्षकांचे वर्तन आहे. या शाळेतील शिक्षक उच्चशिक्षित तसेच टेक्नोसेव्ही असून शाळेची गुणवत्ता वाढवण्यावर भर देत आहेत. विविध अध्यापनाची तंत्रे व कौशल्यांद्वारा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणत आहेत. शाळा आणि शाळेचा परिसर अंतर्बाह्य स्वच्छ होण्यासाठी प्लॅस्टिकमुक्ती, कचरामुक्ती , शिवीमुक्ती अभियान सुरू केले आहे. बंद पडणारी ही महानगर पालिकेची शाळा पुनरुज्जीवित होण्याचे श्रेय शिक्षक आणि मुख्याध्यापकांना जाते. मुलांमध्ये प्रामाणिकपणा हे मूल्य रुजविण्यासाठी प्रामाणिक रिक्षाचालकाला शाळेत बोलवून त्याच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. या रिक्षाचालकाने 50000 रू. असलेली बॅग त्या मालकाला परत केली होती. असे विविध संस्कारात्मक अनुभूती मुलांना नकळत देण्याचे काम या शाळेतील शिक्षक करीत आहेत. मुलांना कौशल्यधिष्ठित शिक्षण मिळावे यासाठी पंजाबराव कृषी विद्यापीठ अंतर्गत आयोजित कृषी व तंत्रज्ञान प्रदर्शनाला आवर्जून मुलांना नेले जाते. जेणेकरून त्यांच्यातील कौशल्य विकसित व्हावे.




**विद्यार्थ्यांच्या मदतीने बनविलेले शैक्षणिक साहित्य**

यावर्षी एस.सी.इ.आर.टी. मार्फत झालेल्या बालकांचे हक्क व सुरक्षा विषयक प्रशिक्षण, विज्ञान व गणिताच्या कार्यशाळा, नवोपक्रम अहवाल लेखन, मार्गदर्शन कार्यशाळा, नवीन शैक्षणिक धोरण 2020 प्रशिक्षणामुळे शिक्षकांना व मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांसाठी कार्य करण्यास नवप्रेरणा व ऊर्जा मिळाली. विद्यार्थ्यांना नवनवीन अध्ययन अनुभूती देण्यासाठी गुगल क्लासरूम सारखे आधुनिक तंत्रज्ञान हे शिक्षक शिकत आहेत. **विद्यार्थी हा केंद्रबिंदू असेल तर शिक्षक हा मानबिंदू असला पाहिजे**, त्याच्या कार्याचा ठसा समाज मनावर उमटला तर समाजात त्याची प्रतिमा नक्की उंचावेल, या दृष्टीने शिक्षक सकारात्मकतेने व एकजुटीने काम करीत आहेत.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती. प्रेरणा मोरे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, अकोला | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक उर्दू शाळा, सिरसोली, ता.तेल्हारा, जि.अकोला

**ई-मेल :-** zpumssirsoli@gmail.com

**मुख्याध्यापकांचे नाव :-** वजाहत अलीम अब्दुल समद **ई-मेल :-** wajahataleem4@gmail.com



**जि. प. वरिष्ठ प्राथमिक उर्दू शाळेची इमारत**

जि. प. वरिष्ठ प्राथमिक उर्दू शाळा, सिरसोली ही तेल्हारा पंचायत समितीतील डिजिटल शाळा आहे. शाळेतील शिक्षकांनी २०१६ पासून विविध उपक्रम राबवून शाळेची प्रगती केली आहे. शाळा प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत २०१६ ते २०१९ पर्यंत सतत शिक्षकांच्या मेहनती मुळे १००% प्रगत घोषित झाली आहे. शाळेमध्ये शाळा विकासाचे नियोजन केले जात असून शाळेतील विकास कामे, विद्यार्थ्यांची प्रगती, शाळेचा शैक्षणिक दर्जा कसा वाढेल याकडे अधिक लक्ष दिले. शाळेमध्ये करावयाच्या खर्चाच्या सर्व बाबींचे नियोजन शाळा विकास नियोजना अंतर्गत करण्यात आले.

इयत्ता पाचवी व आठवीचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत दरवर्षी सहभागी होत असून ९०% विद्यार्थी शिष्यवृतीस पात्र होतात. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता पाचवीच्या सात विद्यार्थ्यांचा व इयत्ता आठवीच्या सात विद्यार्थ्यांचा समावेश जिल्हा गुणवत्ता यादी मध्ये झाला. शाळेसाठी डिजिटल स्कूल सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आले असून, शाळेचे १९६२ पासूनचे सर्व रेकॉर्ड सॉफ्टवेअर मध्ये अपलोड करण्याचे काम सुरु असून कोणत्याही प्रकारची माहिती वन क्लीक वर उपलब्ध होणार आहे .

शाळा विकास नियोजना प्रमाणे जी कामे करावयाची असतात त्यासाठी शासकीय निधीची वाट न पाहता शाळेचे मुख्याध्यापक वजाहत अलीम सर स्वतः सर्व आर्थिक खर्च उचलतात. शाळेच्या विकासासाठी व विद्यार्थ्यांसाठी शाळेने खालील विकासकामे व विविध उपक्रमे राबविली आहेत. १) शाळासिद्धी मध्ये 'अ' श्रेणी २) डिजिटल शाळा (१००% वर्ग खोल्या डिजिटल ) ३) बोलके आवार व बोलक्या भिंती. ४) शाळेची बाग ५) विद्यार्थ्यांना मान्यवरांचे मार्गदर्शन ६) विविध संस्थांद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत ७) विविध स्पर्धा ८) शिष्यवृत्ती परीक्षेत ९०% विध्यार्थी जिल्ह्या गुणवत्ता यादी मध्ये ९) शाळेचा ब्लॉग १०) शाळेचे यु ट्यूब चॅनल ११) शाळेचे अँप १२) विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम अपलोड असलेले मेमरी कार्ड १३) शाळेतील शिक्षकांचा डाएट द्वारे राबविण्यात येणार्या उपक्रमा मध्ये सहभाग १४) लॉकडाऊनच्या काळात विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण व मार्गदर्शन.१५) विद्यार्थ्यांसाठी बँक १६) गाव हागणदारी मुक्त करण्यासाठी शिक्षकांचा सहभाग. १७) शैक्षणिक साहित्य प्रदर्शना मध्ये सहभाग.




**शाळेची डिजिटल वर्गखोली**

**डिजिटल शाळा :-** अध्ययन अध्यापनात नवीन तंत्रज्ञानाचा वापर व्हावा या हेतूने शाळेने संपूर्ण वर्गखोल्या डिजिटल करण्याचा संकल्प केला. सर्व प्रथम वजाहत सर व नदीम सर यांनी सर्व वर्गात स्वतः शैक्षणिक चार्ट संगणकावर डिझाईन करून भिंतीवर लावले. त्यासाठी लोकवर्गणी करण्यात आली. वर्गणीतून १ प्रोजेक्टर दोन होमथेटर खरेदी करण्यात आले. तसेच वजाहत अलीम सर यांनी एक प्रोजेक्टर, एक साऊंड सिस्टिम भेट दिली. नदीम बेग सर यांनी एक प्रोजेक्टर शाळेला भेट दिले. अश्याप्रकारे मुख्याध्यापक, शिक्षक, व पालकांच्या सहकार्याने पूर्ण शाळा डिजिटल केली. विशेष मान्यवरांच्या हस्ते उद्-घाटन सोहळा पार पडला. डिजिटल वर्गामुळे अध्यापनामध्ये शिक्षक इंटरनेट, व्हिडिओज, कलरचार्ट इ. साहित्याचा वापर करतात ज्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये आनंदायी वातावरण निर्माण होते.



**शाळेचा हिरवीगार परिसर**

**शाळेची बाग** :- शाळेच्या बागेमुळे शाळेची शोभा वाढली, आनंददायी वातावर्णाची निर्मिती झाली, पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला, शाळा डिजिटल झाल्यानंतर सर्व शिक्षक, शाळा व्य. समिती, व गावकर्यांच्या सहकार्याने शाळेत आनंदायी वातावरणासाठी, पर्यावरण जागृती साठी, शाळा परिसरात विविध प्रकारची रोपे, फुलांची झाडे, लॉन ,वृक्षारोपण करण्यात आले. त्यासाठी मैदानात नदीतला गाळ, काळी माती टाकण्यात आली. महाबीज

अकोल्याच्या प्रयोगशाळेतून सर्व रोपे, झाडे इ. खरेदी करण्यात आले. १०००० लिटर पाण्याची टाकीची व्यवस्था करण्यात आली. ठिबक सिस्टिम बसविण्यात आली.



**विद्यार्थ्यांना रोलर बोर्ड वाटप करताना**

**रोलर बोर्ड वाटप :-** सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना रोलरबोर्ड, खडू व डस्टर वाटप शाळे मार्फत करण्यात आले. गणित व इतर विषयांचा अभ्यास घरी करण्याची आवड विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे, सध्या कोरोना मुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी शाळेने सुरु केलेला रोलर बोर्ड वाटपाच उपक्रम फलदायी ठरला. रोलर बोर्डचा वापर करून विद्यर्थी आनंदाने घरी अध्ययन करतात. गणिताचा सराव करतात.



**शाळेचे विद्यार्थी विज्ञानाचे प्रयोग करताना**

**विज्ञान प्रयोग शाळा :-** इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयात आवड निर्माण व्हावी, सर्व प्रकारच्या उपकरणाची ओळख व्हावी, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा या हेतूने विविध उपकरणे, विविध प्रकारची मॉडेल खरेदी करण्यात आले. विद्यार्थ्यांना घेतलेले सर्व साहित्य प्रयोगासाठी उपलब्ध करून दिले. सर्व विद्यार्थी विविध साहित्याचा उपयोग करून आनंदाने प्रयोग करतात.

**जिल्हा स्तरीय ऑनलाईन टेस्ट सिरीज :-** लॉक डाऊनच्या काळात विद्यार्थ्यांना सराव करण्यासाठी व चाचणी घेण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला यांच्या नेतृत्वाखाली "ऑनलाईन टेस्ट" उपक्रम राबविण्यात आला. त्यात आमच्या शाळेतील शिक्षकांनी सर्व विषयांसाठी चाचणी बनविली. त्या चाचणीचा लाभ अनेक जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी घेतला.



**सुसज्ज संगणक कक्ष**

**सुसज्ज संगणक कक्ष निर्मिती :-** विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्याकरिता शाळेत संगणक कक्षाची निर्मिती करण्यात आली. कक्षात एकूण आठ संगणक बसविण्यात आले असून, इंटरनेट ची सुविधा उपलब्ध आहे. प्रत्येक संगणक सोबत हेडफोन ची व्यवस्था करण्यात आली . कार्यालयीन कामासाठी ऑलइनवन संगणक, ऑलइनवन प्रिंटर खरेदी करण्यात आले. संगणक कक्षासाठी एकूण खर्च १२४७४०/- वजाहत अलीम सर यांनी उचलला. संगणक कक्षाचा फायदा असा झाला कि शाळेतील इयत्ता पाचवी ते आठवी पर्यंतचे सर्व विद्यार्थी संगणक हाताळतात. इंटरनेटचा उपयोग शैक्षाणिक कामासाठी करतात.



**विद्यार्थ्यांना मेमरी कार्ड वाटप करताना**

**अभ्यासक्रम असलेले मेमरी कार्ड वाटप :-** लॉकडाऊनच्या काळात शाळा बंद ... शिक्षण चालू या उपक्रम अंतर्गत सहावी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे व्हाट्सअँप, यु-टयूब द्वारे वर्ग घेण्याची सुरुवात करण्यात आली. यावेळी असे लक्ष्यात आले कि ऑनलाइन वर्गात सर्व विद्यार्थी सहभागी होत नाही. त्यावेळी पालकांना संपर्क केला असता असे लक्षात आले कि आर्थिक परिस्थिती मुळे सर्व पालक नेटपॅकचे रिचार्ज करू शकत नाही या मोठ्या आव्हानावर मात करण्यासाठी इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना ८ जी बी चे मेमरी कार्ड मध्ये डिजिटल अभ्यासक्रम अपलोड करून वाटप करण्यात आला. या उपक्रमाद्वारे शिक्षक फोन करून विद्यार्थ्यांना कोणता पाठ पाहायचा ते सांगतात व विद्यार्थी त्याचे पालन करतात अश्या प्रकारे अध्ययन अध्यापनाचे कार्य सुरु आहे .

**शाळेचे यु-टयूब चॅनल :-** इयत्ता सहावी ते आठवी पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना लॉकडाऊनचा काळात शाळा बंद असतांना शिकता यावे यासाठी यु-ट्युब चॅनल सुरु करण्यात आले. चॅनल वर विज्ञान व गणिताचे पाठानुसार व नियोजनानुसार व्हीडिओ बनवून अपलोड करण्यात आले. याचा लाभ महाराष्ट्रातील सर्व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना झाला. **BLOG LINK :-** https://www.youtube.com/channel/UCdQsybjGAATjl-JIZy-C-OA

**शाळेचा ब्लॉग :-** विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अध्ययन अध्यापना साठी शैक्षणिक साधने उपलब्ध व्हावी या हेतूने **MY SCHOOL** नावाने ब्लॉग तयार करण्यात आला. ब्लॉग मध्ये शैक्षणिक चार्टस, व्हीडीओ, PDF नोट्स, ऑनलाईन टेस्ट, गणित वर्कशीट इ. ई-साहित्य वर्गानुसार उपलब्ध आहे. तसेच शिक्षकांसाठी विविध लिंक, शैक्षणिक साहित्याचे फोटो, शाळा परिसरात लावण्यासाठी शैक्षणिक चार्टस इ. साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. आता पर्यंत या ब्लाँग वर १०००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी भेटी दिल्या आहेत. **BLOG LINK :-** http://wajahataleem.blogspot.com

**शाळेचा मोबाईल अँप :-** विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अध्ययन अध्यापनासाठी शैक्षणिक साधने उपलब्ध व्हावी या हेतूने **SCHOOL TOUCH** नावाने मोबाईल अँप तयार करून प्ले स्टोर वर विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले. मोबाईल अँप मध्ये शैक्षणिक चार्टस, व्हिडिओ , PDF नोट्स , ऑनलाईन टेस्ट, गणित वर्कशीट इ. ई-साहित्य वर्गानुसार उपलब्ध आहेत. तसेच शिक्षकांसाठी विविध लिंक, शैक्षणिक साहित्याचे फोटो, शाळा परिसरात लावण्यासाठी शैक्षणिक चार्टस इ. साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. आता पर्यंत मोबाईल अँप १००० पेक्षा जास्त लोकांनी डाऊनलोड केलेला असून चांगला प्रतिसात मिळाला आहे. **App Link :-** https://play.google.com/store/apps/details?id=school.touc



**विद्यार्थ्यांना ज्ञानरचनावादी पद्धतीने शिकविताना**

**ज्ञानरचनावादी शाळा :-** विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाप्रती आवड निर्माण व्हावी, अध्ययन अध्यापन साठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे या हेतूने शाळेचे सहा वर्ग ज्ञानरचनावादी करण्यात आले. प्रत्येक वर्गात शैक्षणिक चार्टस, शैक्षणिक साहित्य, जमिनीवर पेंटिंग इ. बनविण्यात आले. प्रत्येक वर्गात विषयानुसार, पाठानुसार साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. ज्ञानरचनावादी वर्गासाठी शिक्षकांनी आपला सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांच्या प्रगती साठी शाळेतील शिक्षक अहोरात्र मेहनत घेत असतात. त्यामुळेच आज शाळेचा नावलौकिक सर्वत्र वाढत आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती प्रेरणा भ. मोरे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, अकोला. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा,जामुननाला,ता.चिखलदरा,जि.अमरावती

**ई मेल :-** zpschooljamunnala@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री. महेंद्र गुरूबकस पाल **ई-मेल:-** mahe007@gmail.com



**जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा,जामुननाला शाळेची इमारत**

आधुनिक झगमगाटाच्या जगापासून शेकडो दूर असलेल्या निर्सगाच्या कुशीत वसलेल्या, चिखलदरा सारख्या दूर्गम भागात, आदिवासी परिसरात वसलेली आमची शाळा म्हणजे सातपुडा पर्वतामधील अमरावती जिल्हयातील चिखलदरा तालुक्यातील एक लहानसं गाव. गावात सर्व आदिवासी भागातील कोरकु जमातीचे लोक राहतात. येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे हातमजुरी व डोंगराळ भागात शेती करणे हा आहे. या गावातील लहान मुलांना सुसंस्कारीत करणारी त्यांना घडवणारी 'ज्ञानमंदीररूपी शाळा म्हणजे जिल्हा परिषद प्राथ. मराठी शाळा जामुननाला' शाळेची स्थापना 1991 मध्ये झाली. शाळेच्या सर्व परिसरात हिरवळ होती. छान पैकी बाग तयार केली होती. सुंदर डेरेदार वृक्ष लावले होते. शाळेचा परिसर हिरव्या झाडांमुळे एकदम प्रसन्न दिसत होता.

सर्वच काही चांगले दिसत असतांना काही उणिवा जाणवल्या. शाळेतील सर्व विद्यार्थी आदिवासी असल्यामुळे प्रामुख्याने सर्वात मोठी समस्या होती ती म्हणजे अस्वच्छता तसेच निटनेटकेपणा, वक्तशिरपणा, समानता व आपुलकी या बाबींचा अभाव दिसला आणि या उणिवा दूर करण्यासाठी आम्ही आमचे प्रयत्न सुरू केले. शालेय मुलांच्या स्वच्छतेकरीता मुलांना गणवेश अनुदानातून व तसेच आम्ही दोन्ही शिक्षकांनी स्वत: रक्कम जमा करून चांगल्या प्रकारचे शालेय गणवेश व कवायत गणवेश असे दोन प्रकारचे गणवेश, टाय-बेल्ट व ओळख पत्र अशी खरेदी मुलांकरीता करण्यात आली. तसेच पंचायत समिती मधील कर्मचारी व अधिकारी यांना विनंती करून मुलांकरीता बुट व मोजे मिळवून घेतले. अशाप्रकारे आमच्या मुलांचा संपूर्ण गणवेश तयार झाला. तरी सुध्दा रोज आंघोळ करणे व स्वच्छतेचा फारसा संबध नसलेल्या आदिवासी मुलांचा स्वच्छ गणवेश व बुट घालण्याकरीता प्रतिसाद मात्र अत्यल्पच होता. यात सुधारणा करण्याकरीता आम्ही पालक मेळावा व महिला मेळाव्याचे आयोजन केले. मुलांशी वारंवार संवाद साधून त्यांना स्वच्छ व निटनेटके राहण्यास मार्गदर्शन केले इतकेच नव्हे तर रोज मुलांच्या घरी जाऊन त्यांना प्रथम आंघोळ करायला लावण्यापासून सुरूवात केली. तसेच परिपाठात स्वच्छ विद्यार्थ्यांचे व पालकांचे पुष्प देऊन स्वागत करण्यास सुरूवात केली. अशाप्रकारे काही दिवसानंतर सर्व विद्यार्थी स्वच्छ व निटनेटके येऊ लागले.



**स्वच्छ व नीटनेटक्या गणवेशातील शाळेचे विद्यार्थी**

आदिवासी मुलांना पैश्यांची, बचतीची सवय लावण्याकरीता आम्ही शाळेत मुलांमार्फत बचत बँक चालविण्याचा प्रयत्न केला. त्याकरीता बचत बँकेत पैसे टाकण्याची, काढण्याची पावती व बचत पुस्तके लेखन करण्याचे काम मुले स्वत:हून करू लागली. शाळेतील मुलांमध्ये श्रमदानाचे मूल्ये रूजवण्याकरीता मुलांकडून शाळेत परसबाग तयार करण्यात आली. शाळेतील मुलांना पुरक व पौष्टीक आहार मिळावा याकरीता फळभाज्या, पालेभाज्या देणारी परसबाग तयार केली.

**लोकसहभाग** :- शाळेत अधिक सुविधा मिळण्याकरीता पालकांसोबत वारंवार चर्चा करण्यात आली. त्यातून गावातील लोकांनी शाळेकरीता वनहक्क समिती मार्फत मुलांना खिचडी खाण्याकरीता प्लेटस, संगणक संच मिळवून दिले. तसेच गावांतील लोकांनी, शिक्षकांनी ग्रामपंचायत मधून शाळेला टिव्ही, प्रोजेक्टर, साऊंड सिस्टीम मिळवून दिले. पालकांच्या मदतीने दरवर्षी शाळेत बालमेळावा, सांस्कृतीक महोत्सवाचे, विविध स्पर्धांचे आयोजन करण्यास सुरूवात केली. वेळोवेळी पालकांशी व ग्रामपंचायतीशी संपर्क साधून शाळेत विद्यार्थांकरीता चांगल्या भौतिक सुविधा, शाळेत विद्युतीकरण, शाळेची संरक्षण भिंत, विद्यार्थी संख्येप्रमाणे मुतारी व शौचालय, डिजीटल वर्गखोली, स्मार्ट रूम, विविध ॲपद्वारा शिक्षण अशा सुविधा उपलब्ध करून घेतल्या त्यामुळे शाळा अत्याधुनिक झाली. विद्यार्थी शाळेत रमू लागले.




**शाळेच्या विकासासाठी लोकसहभाग**

शिक्षकांच्या मित्रांकडून विद्यार्थ्यांना शालेय बॅग उपलब्ध करून देण्यात आल्या. बांधीलकी संस्था, अमरावती मार्फत थंडीच्या दिवसात शालेय स्वेटर मिळवून दिले. रोटरी क्लब अमरावती मार्फत थंडीच्या दिवसात गावातील लोकांना ब्लँकेट व मुलांना गरम कपडे प्राप्त करून दिले. वर्ल्ड व्हिजन या संस्थे मार्फत विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य उपलब्ध करून दिले. शिक्षकांनी स्वत: विद्यार्थ्यांना लेखन साहित्य उपलब्ध करून दिले.

**विषयनिहाय नवोपक्रम:-** शाळा 100 टक्के प्रगत करण्याच्या दृष्टीकोणातून विषयनिहाय नवोपक्रम राबविण्यात येतात. भाषा विषयाकरीता विद्यार्थ्यांना अक्षर वाचन, शब्द वाचन, गटागटातून शिक्षण, स्वयंम अध्ययन कार्ड देण्यात आले. गणित विषयाकरीता अंकज्ञान, पाढे, गणितीय क्रिया या करीता गणित पेटी, भाषा पेटी, त्यासोबत नवनविन व्हिडीओ, टिव्ही, भाषा चित्र  अंक कार्ड चित्र इत्यादि चा उपयोग करण्यात आला. इंग्रजी विषयाकरीता चित्र कार्ड व मुळाक्षरे कार्ड याचा उपयोग केला. इंग्रजी शब्द संपत्ती वाढविण्याकरीता शिक्षक हजेरी घेतांना विद्यार्थी YES सर म्हणण्या ऐवजी फुलांची नावे, झाडांची नावे, रंगाची नावे ,प्राण्याची नावे, फळांची नावे, पक्ष्यांची नावे, अवयवांची नावे व इतर शब्दांचे स्पेलींगसह म्हणण्याचा उपक्रम घेण्यात आला. याकरीता विद्यार्थी आधीच्या दिवशी कोणता विषय व कोणता वर्ग राहिल याची निश्चीती करतात व ते स्पेलिंग सह म्हणतात. या नवोपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची इंग्रजी शब्द संपत्ती वाढण्यास मदत झाली. गावातील 10 वी व 12 शिकलेले विद्यार्थी शाळेच्या विद्यार्थ्यांना गृह अभ्यास करून घेण्यासाठी दररोज गावाच्या मध्यभागी घेउन बसू लागले. अशा प्रकारे विविध नवोपक्रमाद्वारे शाळेच्या विद्यार्थ्यांना प्रगत करण्याचा प्रयत्न आम्ही केला.



**गावातील 10 वी 12 शिकलेले विद्यार्थी शाळेच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास घेताना**

**तंत्रज्ञानाचा उपयोग :-** जामुननाला येथे कोणत्याच मोबाईलचे नेटवर्क नाही. त्यामुळे आम्हाला शाळेत इंटरनेटचा वापर करता आला नाही. तरी आम्ही USB व मोबाईल मध्ये जतन करून शालेय ऑडीओ–व्हिडीओ, कविता, गाणी, पुस्तकातील पाठ चित्रांसह विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले. यासर्व तंत्रज्ञानाचा, टि.व्ही व प्रोजेक्टरचा उपयोग करून अध्ययन-अध्यापन केले जाते. शाळेतील सर्व अहवाल व प्रशासकीय कामे संगणकाद्वारे केले जाते. तसेच विद्यार्थ्यांचे फोटोसह वार्षिक, तोंडी व लेखी, गुणपत्रक व प्रगती पत्रक ही कामे संगणकाद्वारे केले जाते.

**शिक्षकांचा स्वविकास:-** आमच्या स्वविकासाठी तसेच शालेय गुणवत्तेत वाढ होण्यासाठी विविध शैक्षणिक संस्थेमार्फत दिली जाणारी प्रशिक्षणे आम्हाला लाभदायक ठरलेली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने TAG , भाषा व गणित पेटी, निष्ठा इत्यादी प्रशिक्षणांचा उल्लेख करता येईल. आम्ही शाळेत वर्गनिहाय, विषयनिहाय शैक्षणिक साहित्य तयार केले. त्यामध्ये बांबू पासून साहित्य तयार करणे, लाकुड काम, मातीचे काम, कागद काम, हार्डबोर्ड व माऊंटबोर्ड पासून चार्ट, कार्ड, चौरस डब्बे,

चित्र तयार करणे अशा प्रकारे अनेक कौशल्य विकसीत करून साहित्य तयार केले. विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे माहीती देण्याकरीता शिक्षकांनी स्वत: तंत्रज्ञानाचे कौशल्य विकसीत करून विद्यार्थ्यांना त्याचे अनुभव दिले.

**विद्यार्थी संपादणूक :-** मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत सतत प्रयत्न केला जात आहे. शाळेचा परिसर लहान असला तरी मुलांना मैदानी खेळ खेळण्यासाठी गावातील शाळेजवळच्या रिकाम्या जागेचा उपयोग शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने करण्यात येवू लागला. त्यात लंगडी, धावणे, खो-खो, कबड्डी इत्यादी खेळांचा सराव घेवून मुलांना बीट स्तरीय पासून तर तालुका स्तरापर्यंत च्या स्पर्धेत सहभागी होता आले आहे.

**यशस्विता :-** सन 2018-19 मध्ये राबविण्यात आलेला 'सन्मान प्रेरणेचा व सन्मान गुणवत्तेचा' उपक्रमामध्ये तालुका स्तरावर प्रथम क्रमांकावर शाळेची निवड झाली. सन 2018-19 मध्ये सलाम मुंबई अंतर्गत तंबाखु मुक्त शाळा करण्यात तालुक्यातून प्रथम क्रमांक. सन 2018-19 मध्ये 'स्वच्छ आदत स्वच्छ भारत' कार्यक्रमांतर्गत शाळेने उल्लेखनीय कार्य केले. सन 2018-19 मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेत वर्ग 5 वीतील विद्यार्थी 100% पात्र.




**भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी यांची शाळेला भेट**

या सर्व केलेल्या कामाची पावती आम्हाला मिळाली जेव्हा आमच्या शाळेत भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी मा.सौ.मिताली शेटटी मॅडम व मा.विकास मीना साहेब व मा. सौ.वर्षा मीना मॅडम यांनी प्रत्येक्ष शाळेला भेट देऊन आपल्या अभिप्रायामध्ये शाळेचे कौतूक केले. **"मेलघाट मे पहिली बार इतना अच्छा और सुंदर स्कूल देखने को मिला है."** तसेच सन्मान प्रेरणेचा व सन्मान गुणवत्तेचा कार्यक्रमाची तपासणी करण्यासाठी शिक्षण सभापती मा.श्री.जयंत वसंतराव देशमुख व त्यांची टीम यांनी विद्यार्थ्यांची प्रगती व शाळेची पाहणी केली असता उत्कृष्ट शाळा म्हणून शाळेचा उल्लेख केला. अशा प्रकारे आम्ही विविध उपक्रम राबवून शाळेला सुंदर प्रगत व डिजिटल बनविण्याचा प्रयत्न केला आहे. आमची शाळा प्रगत करण्यासाठी आमचे गटशिक्षणाधिकारी, सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी, सर्व गट साधन केंद्रातील साधन व्यक्ती, समिती अध्यक्ष व सदस्य गण व शाळेतील सर्व मुले-मुली या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांच्या सहकार्यातून आमची प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. पवन मानकर** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, अमरावती. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## नगर परिषद प्राथमिक मराठी शाळा, क्र.4 दुर्गानगर, ता.मोर्शी, जि.अमरावती.

**मुख्याध्यापकाचे नाव:-** श्रीमती सविता दिपक शिंदे **ई-मेल:-** savitashindeamt@gmail.com



**नगर परिषद प्राथमिक मराठी शाळा क्र.4 शाळेची इमारत**

'मोर्शी' हे गाव अमरावती जिल्हयातील अप्पर वर्धा नलदमयंती सरोवर असलेले orange city म्हणुन प्रख्यात शहर आहे. येथे मोठया प्रमाणात मत्स्य व्यवसाय चालतो. येथे तीन प्रमुख नदया असुन वर्धा आणि माळू या दोन नदया नल-दमयंती सरोवराला मिळतात. अशा या वैशिष्टयपुर्ण शहराच्या दक्षिणेला दूर्गानगर येथे आंतराष्ट्रीय दर्जा मिळालेली नगर परिषद प्राथमिक मराठी शाळा क्र.4, वसलेली आहे. कमीत कमी 25 कि.मी. अंतरावरून मुले या शाळेत शिक्षणासाठी येतात. 1992 मध्ये शाळेची पटसंख्या जेमतेम बोटावर मोजण्या एवढीच होती. फारश्या भौतीक सुविधा, वर्गखोल्या पुरेशा नव्हत्या. शाळेत क्रीडांगण असून देखील त्याचा उपयोग मुलांच्या खेळण्यासाठी होत नव्हता. पिण्याच्या पाण्याची पुरेशी सुविधा नव्हती. अशावेळी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार आठविले, **"गुरूजींनी ऐसे दयावे धडे । आपुला आदर्श ठेवूणी पुढे । विद्यार्थी तयार होतात चहूकडे । राष्ट्र होई तेजस्वी ।"** त्यांचा हा विचार डोळया समोर ठेऊन आम्ही शाळेत शाळा व्यवस्थापन समिती, माता-पालक संघ, शिक्षक–पालक संघ तसेच पाल्यांच्या आजी-आजोबांना सुध्दा आमंत्रीत करण्यात आले. सभेत पटसंख्या वाढविण्याच्या दृष्टीकोनातून चर्चा करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीमधील सदस्य व आम्ही सर्व शिक्षकांनी प्रत्यक्ष घरोघरी जाऊन भेटी घेतल्या. 100% गुणवत्तेबाबत पालकांना विश्वास दिला.



**शाळा व्यवस्थापन समितीची सभा**

याचाच परीणाम म्हणून शाळेची 8 जानेवारी 2018 ला सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, लोणावळा येथे 'तेजस' करीता निवड झाली. जिल्हास्तरावर शिष्यवृत्ती परीक्षेत, M.T.S.E परीक्षेत, नवोदय परीक्षेत, गणित संबोध स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांना यश मिळाले. चित्रकला, हस्तकला, सांघिक खेळ, वैयक्तिक खेळ, क्रीडा स्पर्धा, संगीत, कराटे, लांब उडी, इत्यादी विविध स्पर्धेत विद्यार्थी जिल्हा व राज्यस्तरावर पात्र झाले. शारीरिक व बौध्दिक स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, शुद्धलेखन स्पर्धा, स्वच्छता गीत व नाट्य स्पर्धा, ऑलिम्पियाड, विज्ञान इंस्पायर्ड अवॉर्ड, विज्ञान प्रदर्शनात सहभाग व क्रमांक मिळवू लागले. दैनंदिन उपक्रम राबवून, उत्तरोत्तर पटसंख्या वाढविणारी एकमेव नगर परिषद शाळा क्र.4 म्हणून ख्याती निर्माण झाली.




**विविध स्पर्धांमध्ये बक्षिस पटकाविलेले शाळेचे विद्यार्थी**

**लोकसहभाग:-** लोकसहभागातून 3 वर्ग डिजिटल 2.75 लाख देणगी प्राप्त झाली आहे. शैक्षणिक उठाव अंतर्गत शाळेला संपूर्ण वर्गात 10000/- किंमतीचे पंखे व खुर्च्या प्राप्त तसेच 50000 रुपये किंमतीचे डेस्क-बेंच व गोदरेज कपाट देणगी स्वरूपात मिळाले आहे. न.प.दुर्गानगर उत्कृष्ट शाळा म्हणून शासनाकडून 5000/- किंमतीचे ट्रिगार्ड व पालकांकडून जादा वर्ग घेण्याबद्दल शाळेला कडुनिंब, पिंपळ, कडू बदाम, इ.172 वृक्षाकरीता 15,000 रुपयांचे ट्रिगार्ड लोक सहभागातून मिळालेल आहे. विद्यार्थ्यांच्या वाढदिवशी चॉकलेट ऐवजी पुस्तके,स्वच्छता विषयक साहित्य घेण्याकरीता 30,000/- रुपये जमा झाले आहेत. तसेच लोक सहभागातून जेष्ठ पालकांकडून 40,000/- पर्यंत सिमेंट बेंचेसची व्यवस्था व लोकवर्गणीतून शाळेत चार संगणकाची व्यवस्था 1,40,000/- करण्यात आली. मुलांना शाळेत चप्पल ठेवण्याकरिता प्रत्येक वर्गाला चप्पल स्टँड खरेदी करण्याकरीता 1,40,000/- इतका निधी उभारण्यात आला. गुणवत्तापुर्ण माजी विदयार्थी मेळावा घेण्यात आला असून माजी विद्यार्थी सहभागातुन 50,000/- निधी प्राप्त झाला. सेवानिवृत्त शिक्षक व मुख्याध्यापक मेळावा यांच्या सहभागातून 30,000/- निधी मिळाला. विविध स्पर्धात्मक गुणवत्तापुर्ण कलात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन शिक्षक व लोकसहभातून 40,000/- निधी मिळाला. गुणवत्तापूर्ण विशेष विद्यार्थी व विशेष समाजातील व्यक्ती यांचे सत्कार समारंभाकरिता लोकसहभाग 30,000 निधी मिळाला. विद्यार्थ्यांना अवांतर मार्गदर्शनांकरिता समाजातील सर्व क्षेत्रांतील

तज्ञांना आमंत्रित करून विशेष मार्गदर्शन घेण्या करिता लोकसहभाग 35,000 निधी मिळाला. सिनटेक्स टाकी 2000, लाऊड स्पीकर साहित्य 5000, निधी मिळाला. पिण्याच्या पाण्याकरीता आरोची व्यवस्था 45000/ निधी मिळाला. शाळेत विद्यार्थ्यांकरीता योगा साहित्य व खेळ साहित्य लोकसहभागातून 70,000 निधी मिळाला.



**लोकसहभागातून वृक्षारोपण**

**विद्यार्थ्यांचा विकास व नवोपक्रम :-** दरवर्षी 'शब्द साक्षात्कार" हस्तलिखित, तसेच कवितासंग्रह विद्यार्थी व शिक्षकाकरिता सुप्त गुणांना वाव देण्याकरिता हा नवोपक्रम घेतला जातो. परिपाठला विद्यार्थी 100% हजर असण्याकरिता आठवड्याच्या सुरवातीला नावीन्यपूर्ण उपक्रम, विज्ञान प्रयोग, पक्षी, संत, अंतराळ, शहरे, वृक्ष, यांची माहिती दिली जाते. प्रत्येक दिवशी नवीन सामूहिक प्रार्थना, सुविचार देशभक्ती गीत नावीन्यपूर्ण सामान्य ज्ञान यांची माहिती दिली जाते. प्रत्यक्ष मतदान संपूर्ण 1 ते 5 इयतेच्या विद्यार्थी सहभागातून घेण्यात आले. त्यातून शालेय मंत्रिमंडळ स्थापन करण्यात आले. बिस्कीट डेकोरेशन, मनोरे स्पर्धा, गितगायन ,भावगीत स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, शुद्धलेखन, वक्तृत्व स्पर्धा, अभिनय स्पर्धा, नृत्य, नाट्य स्पर्धा, सुविचार कथन स्पर्धा, क्रीडा स्पर्धा घेण्यात येतात. शारीरिक व बौद्धधिक स्पर्धांमध्ये विशेष नैपुण्य प्राप्त मुलांचे सत्कार घेण्यात येतात. इंग्लिश स्पोकन स्पर्धा यात विशेष नैपुण्य प्राप्त मुलांचे सत्कार घेण्यात येतात. निरोप समारंभ, सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांचे सत्कार विद्यार्थी व शिक्षक वाढदिवस समाजातील आदर्श व्यक्तींचा गुणगौरव सत्कार समारंभ घेण्यात येतात. इयत्ता 3 ते 5 विद्यार्थ्यांकरिता मोफत संगीत दालन उपलब्ध करून देण्यात आले. परिपाठा मधून प्रत्येक विध्यार्थ्यांना गटानुसार संचालन करण्याची संधी देण्यात येते. विज्ञान प्रयोग, इतर प्रत्यक्ष अनुभव देऊन वैज्ञानिक व व्यावहारिक दृष्टिकोण निर्माण करून सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात येतो. संस्कार व सामान्य ज्ञान विषयात विद्यार्थी परिपूर्ण करण्याकरिता माहितीचे दृढीकरण व सराव व त्यातून विद्यार्थ्यांचा विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात येतो.



**विविध स्पर्धांमध्ये व परिपाठामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग**

**शाळेची यशस्वी वाटचाल:-** गतिमंद विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना विशेष जादा मार्गदर्शन केल्या जात असल्यामुळे शाळेची गुणवत्ता वाढून स्पर्धा परीक्षेत विद्यार्थी गुणवत्ता यादीत असतात. त्यामुळे शाळा जिल्हा व राज्यस्तरावर नावारूपास आली. इयत्तावर क्षेत्र भेटीतून प्रत्यक्ष अनुभवातुन गटपद्धत असल्यामुळे विद्यार्थी नेतृत्व करतात. सभाधीटपणा, कार्यकुशलता, यांचा प्रत्यक्ष दैनंदिन जीवनाशी सहसंबंध जोडतात. मुक्त व मूलभूत हालचाली कवायती अध्ययन निष्पत्ती व दृढीकरण, सराव, वारंवारीता निरीक्षण व कृतीतुन सक्षमीकरण क्रीडा ध्यान, खेळ, योग, आनापान यातून ताणतणाव कमी करण्याचा प्रयत्न करून विद्यार्थ्याच्या शारीरिक व मानसिक विकासातून विद्यार्थी घडविण्यात येतात. डिजिटल व दीक्षा तंत्रज्ञान व कृतीशीलतेला वाव मिळाल्यामुळे विद्यार्थी तंत्रज्ञानात निपुण होतो. प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्तेकडे वैयक्तीक लक्ष असल्यामुळे नगर परिषद शाळा क्रमांक 4 च्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस यशाच्या शिखराकडे वाटचाल करीत आहे. राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत कु.ओजस्वी अमित आहाळे हिने द्वीतीय क्रमांक पटकावलेला आहे. तसेच सं.गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने आयोजीत केलेल्या बालकवी संमेलनामध्ये दुसरा क्रमांक पटकावलेला असून शाळा नावलैकिकास आलेली आहे. जिल्हा स्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत 13 विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत यश प्राप्त केले आहे. कोरोना काळात Online वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठया उत्साहाने भाग घेतले. लोकमतद्वारा आयोजीत संस्काराचे मोती या स्पर्धामध्ये सुध्दा घवघवीत यश मिळविले आहे


प्रज्ञाशोध परीक्षेत न.प. शाळेचे घवघवीत यश


नगरपरिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचे यश


निवड/नियुक्ती/सुयश

ओजस्वी शहाळे

मोर्शी : राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत स्थानिक दुर्गानगर नगर परिषद शाळा ४ ची विद्यार्थिनी ओजस्वी अमित आहाळे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. ही स्पर्धा ऑनलाईन झाली. तिने यशाचे श्रेय वडील अमित आहाळे व आई प्रिया आहाळे यांना दिले आहे. मुख्याध्यापक सविता शिंदे व शिक्षकांनी तिचे कौतुक केले.

**शालेय यशाचे शिल्पकार यशस्वी विद्यार्थी**

**मुख्याध्यापक व शिक्षकांचा स्व-विकास:-** स्व-विकासासाठी विविध विषयाच्या तज्ञ मार्गदर्शकांना बोलवून व्याख्याने आयोजीत केली. नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेचे Online वर्ग घेतले. Tag प्रशिक्षण, निष्ठा प्रशिक्षण, अध्ययन निष्पत्ती प्रशिक्षण, गणित व भाषा अध्ययन समृध्दी प्रशिक्षण, तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेतले. याचप्रमाणे अवांतर पुस्तकांचे वाचन केले. स्व-लेखन केले. पाठयपुस्तकाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुध्दा लिखानाची सवय लागली. तालुकास्तरावर जी-जी प्रशिक्षणे झाली त्या प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष अध्यापनामध्ये समावेश केला जातो. याचीच प्रचीती म्हणून 2016–17 ला मुख्याध्यापिका सौ. सविता दीपक शिंदे यांना 'सावित्रीबाई फुले राज्यपुरस्कार' देण्यात आला.



**मुख्याध्यापिका सौ.सविता दीपक शिंदे 'सावित्रीबाई फुले राज्यपुरस्कार' स्वीकारताना**

विद्यार्थी जीवन म्हणजे भावी राष्ट्रजीवना मध्ये निर्माण होणारी फुलांची कळी, तीला जसे रंग, संग, संस्कार द्याल तशी ती कळी बहरेल, तिचा सुगंध राष्ट्र धर्म-कर्मावर उत्तमरीतीने फैलणार हीच आम्हा शिक्षकांची यशस्वीता.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री.पवन मानकर** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, अमरावती. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावंगी संगम, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती.

**मुख्याध्यापक :** **श्री.सतीश सुधाकर धाडसे** **ई-मेल:** dhadses40@gmail.com



**शाळेचे प्रवेशद्वार**



**शाळेचा बोलका व्हरांडा**

अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील '100% उपस्थिती असणारी शाळा' म्हणून जि.प.प्राथमिक शाळा, सावंगी संगम, ची ओळख आहे. आज तालुक्यात भौतिक सुविधे सोबतच गुणवत्तेमध्येही तालुक्यातील पहिली शाळा ठरली आहे. जिल्ह्यातील चांदुर रेल्वे ते नांदगाव खंडेश्वर या तालुक्यांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यापासून पश्चिमेस पाचशे मीटर अंतरावर सावंगी संगम हे जवळपास शंभर घरांचे छोटेसे गाव. गावाची लोकसंख्या 584 इतकी आहे. खोलाट, राईहुई व धानोरी या तीन नद्यांच्या ऐतिहासिक संगमाने नावारूपास आलेले गाव म्हणजे सावंगी संगम. शाळेकडे चौफेर नजर टाकली असता शाळेत करण्यासारखे भरपूर बदल लक्षात येत होते. शाळेला मोठे पटांगण होते, झाडे-झुडपे होती. विद्यार्थी होते पण गरज होती या सर्वांना आकार देण्याची. शालेय परिसर, शैक्षणिक गुणवत्ता, पालकांशी सहसंबंध या प्रश्नाची उकल शालेय विकासात महत्वाची ठरली. या करिता शालेय नेतृत्वाद्वारे समस्त गावकऱ्यांना शाळेचे महत्व पटवून दिले. विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास, शाळेची भौतिक स्थिती या विषयी लोकांना जागृत करून महिला मेळावा, वृक्षारोपण, गाजर गवत निर्मूलनात सहभाग, ग्रामस्वच्छता अभियानात सहभाग या सामाजिक उपक्रमाद्वारे शाळा गावामध्ये व गावकऱ्यामध्ये पोहचविण्यास मदत झाली. परिणामत: शाळेच्या भौतिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये शाश्वत बदल घडून आले.



**स्वच्छता अभियान व वृक्षारोपण**

**मुख्याध्यापक व शिक्षक स्वविकास -** दोन  शिक्षकी शाळा असल्यामुळे शाळे विषयी प्रत्येक निर्णय सहशिक्षका सोबत चर्चा करूनच घेतला जातो. विद्यार्थ्यांना दृकश्राव्य अध्यापनाचे अनुभव देण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करणे गरजेचे होते. याकरिता KINEMASTER, POWER DIRECTOR यासारख्या APP चा उपयोग करण्याचे कौशल्य शिक्षकांनी आत्मसात केले. विद्यार्थ्यांचे वाढदिवस स्क्रीन वर दाखविण्याकरिता KINEMASTER या APP वर निर्मिती करणे व त्याला समर्पक आवाज देऊन व्हिडीयो प्रभावी बनविण्याचे तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना भाषा आपली वाटावी म्हणून स्वलिखीत शब्द पट्ट्या आणि वाक्यपट्ट्या यांचा संच तयार करण्यात आला. गणित संबोध प्रशिक्षण, अध्ययन निष्पत्ति, भाषा अध्ययनपूरक साहित्य यासारख्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून कौशल्य विकसनास मदत झाली. परसबाग, बालआनंद मेळावा यासारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शाळेविषयी जिव्हाळा निर्माण झाला. यामुळे विद्यार्थी शाळेची भौतिक वास्तु, शाळेतील साहित्य याची काळजी घेऊ लागले.




**शाळेत नित्यनियमाने साजरे होणारे विद्यार्थी वाढदिवस व  स्वयंअध्ययन**

**वाढदिवस लिंक :**   https://youtu.be/-sMAcS0urOk

**अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतील बदल -** आम्हाला असे जाणवले की,विद्यार्थी व पालक शाळेविषयी, शिक्षणा विषयी विशेष काळजी घेत नाही. यामुळे विद्यार्थ्याबरोबर पालकांना देखील जागृत करणे गरजेचे होते. त्यासाठी पालकांना भेटून मुलाबद्दल त्याचे अध्ययन –अध्यापन आणि गृहकार्य याविषयी चर्चा केली. यामध्ये सातत्य राखून नियमितपणे पालकांशी संवाद साधण्यात  आला. त्यामुळे पालकांचा शिक्षकाविषयी व शिक्षणाविषयी दृष्टिकोन बदलण्यास मदत झाली. विद्यार्थी हळूहळू गृहकार्य करू लागली, नीटनेटकेपणे शाळेत येऊ लागली. अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये बदल करताना विद्यार्थी स्वयं- अध्ययनातून कसे शिकतील? याचा प्रकर्षाने विचार करण्यात आला. त्यासाठी विशिष्ट कालावधीचे उपक्रम राबविण्यात आले. मराठी विषयासाठी शब्दपट्ट्या- वाक्यपट्ट्या तयार करण्यात आल्या, त्याच्या मदतीने शब्दवाचन, शब्दांना  पूरक शब्द, त्यांचे लेखन, त्यापासून वाक्य तयार करणे ते इतरांना वाचण्यास लावणे. परिणामत: नवनवीन शब्द घेऊन मुले वाक्य तयार करू लागली. जोडाक्षरयुक्त शब्दपट्ट्या तयार करून घरी वाचन-लेखना करिता देण्यात आल्या. गणिताच्या संकल्पना गणित पेटीच्या मदतीने कृतियुक्त पद्धतीने समृद्ध करण्यात आल्या. परिसर अभ्यास बद्दल जाणीव जागृती करताना प्रत्यक्ष परसबाग आणि फुलझाडे, बागकामाचे अनुभव देण्याचा प्रयत्न केला. आठवड्यातून एक दिवस इंग्रजीतून संवाद करणे, तसेच कृतीच्या माध्यमातून छोटी-छोटी परिचित वाक्य तयार करणे व सांगणे याचा सराव घेतल्यामुळे इंग्रजी विषयाची आवड तयार झाली. दर शनिवार दप्तररमुक्त शाळा यासारखे उपक्रम राबविले.




**लोकसहभागातून विकसित झालेल्या बाबी**

**लोकसहभाग:-** सुरुवातीला शाळेचा भौतिक विकास हा महत्त्वाचा मुद्दा असल्याचे आढळले. शालेय इमारतीला कंपाउंड करणे, त्याला गेट बसविणे, पाणीपुरवठा, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी डिजिटल साहित्याची व्यवस्था करणे, यासारखे महत्त्वाच्या आणि जिकरीच्या समस्या होत्या. संबंधित समस्या बाबत शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ यांना अवगत करण्यात आले. त्यामुळे शाळेला लोकवर्गणीतून 90 हजार रुपये एवढा निधी प्राप्त झाला. त्यातून शाळेचे तारेचे कंपाऊंड तयार झाले. गावातून थोर आदर्श पुरुषांचे 20 फोटो शाळेला सप्रेम भेट म्हणून देण्यात आले. ग्रामपंचायत व्यवस्थापनाशी संपर्क करून शाळेला मुबलक पाणी मिळावे याकरिता मागणी करण्यात आली, तेव्हा ग्रामपंचायत ने मोफत 24 तास शाळेला पाणी मिळेल या पद्धतीची नळ योजना तयार करून दिली. विविध प्रकारचे व्हिडिओ, विद्यार्थ्यांच्या ॲक्टिव्हिटी, क्यूआर कोडच्या माध्यमातून पाठाचे सादरीकरण यासाठी शाळेत एल.सी.डी. टीव्ही असणे गरजेचे होते. त्यासाठी तत्कालीन सरपंच श्री मंगेश भाऊ शिंदे यांनी शाळेला एल.सी.डी. टीव्ही ग्रामपंचायत मार्फत मिळवून दिला. यामुळे आज शाळेतील विद्यार्थी तंत्रज्ञानाच्या जोडीने शिक्षणाचा आनंद घेत आहेत.



**मेहंदी स्पर्धा**



**शाळेतील उपक्रम**

**शाळा उपक्रम लिंक:-** https://youtu.be/19oK96mvTU

**नवोपक्रम व शालेय गुणवत्ता -** शालेय गुणवत्ता सतत वाढविण्यासाठी मुलांच्या अंगभूत सुप्तगुणांना चालना देणे, मुलांना विचार करायला प्रेरित करणे, त्यांना बोलक करणे, कृतिशील करणे, एकाग्रता साधता येणे यादृष्टीने विचार करून विविध प्रकारचे उपक्रम शाळेकडून राबविल्या जातात. यामध्ये शाळा प्रवेशोत्सव, बालसंसद, दप्तरमुक्त शाळा, स्वलिखित शब्दपट्ट्या, शुद्धलेखन व सुंदर हस्ताक्षर, दीपावली उत्सव, मेहंदी स्पर्धा, तंबाखूमुक्त शाळा अभियान, ग्रामस्वच्छता अभियान, रक्षाबंधन, विद्यर्थ्यांचे ओळखपत्र, महिला मेळावा, वकृत्व स्पर्धा, बैलपोळा सण साजरा करणे, यासारखे उपक्रम राबविल्यामुळे गावाला शाळा आपली वाटू लागली. विशेषत: खालील नवोपक्रमाचा खूपच फायदा झाला.




**बालसंसद निवडणुकीत विद्यार्थ्यांचा जल्लोषात सहभाग**

**बालसंसद video लिंक :** https://youtu.be/0uxFNLdv3uU

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर :-** शाळेतील विविध कार्यक्रमाचे व्हिडिओ तयार करून ते मुलांना टीव्ही वर दाखवण्यात येतात. इंग्रजी ऍक्टिव्हिटी, संवाद, छोटे छोटे व्हिडिओ मुलांना दाखविण्यात येतात. व्हाट्सअप ग्रुप द्वारे पीडीएफ च्या माध्यमातून शालेय पाठ्यक्रमाच्या कृतीपत्रिका सोडवूण घेण्यात येतात, कोरोना काळामध्ये तब्बल 2000 एवढ्या कृतीपत्रिका विद्यार्थ्याकडून सोडवूण घेण्यात आलेले आहेत. QR कोडचा उपयोग करून संबंधित पाठ्यक्रम चलचित्रांच्या मदतीने समजून घेण्यास मुलांना खूपच उपयोग होतो. दीक्षा APP चा उपयोग करून मुले स्वत: पाठ्यक्रम समजून घेतात. GOOGLE FORM वर तयार केलेल्या चाचण्या विद्यार्थी मोबाइलचा उपयोग करून सोडवतात. प्रशासकीय कामकाजा मध्ये तंत्रज्ञानाचा उपयोग करून शालेय माहिती प्रशासकीय विभागाला पाठवली जाते. मुलांचे स्कॉलरशिप, नवोदय फॉर्म, विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती, स्कूल पोर्टल इत्यादी सर्व सगळी कामे शाळेतूनच केली जातात. प्रशासकीय अहवाल संगणक अणि संगणकीकृत पद्धतीने तयार करून पाठवले जातात.

**शालेय गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रशिक्षणाचा लाभ -** गणित संबोध प्रशिक्षण, परसबाग प्रशिक्षण, इंग्रजी भाषा अध्ययनपूरक साहित्य प्रशिक्षण, अध्ययन निष्पत्ति प्रशिक्षण, टॅग व कॅप प्रशिक्षण, अध्ययन निष्पत्ति प्रशिक्षण यामुळे शाळेची व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत झाली. शाळेच्या गुणवत्तेमध्ये झालेले हे शाश्वत बदल यामुळे शाळेची पटसंख्या वाढली. शाळेने तालुका स्तरावर सन्मान प्रेरणेचा, सन्मान गुणवत्तेचा या तालुकास्तरीय उपक्रमात प्रथम क्रमांक पटकाविला. याकरिता शाळेला 21 हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.




**शिक्षण विद्यार्थ्यांच्या दारी उपक्रमात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारतांना**

https://m.facebook.com/story.php?story_fbid=830722464456050&id=100025549114138&sfnsn=wiwspwa

**सन्मान गुणवत्तेचा या उपक्रमात तालुक्यातून प्रथम -** कोरोंना काळात मा. गटशिक्षणाधिकारी श्री.मुरलीधर राजनेकर साहेब यांच्या प्रेरणेतून तालुक्यांमध्ये राबविण्यात आलेल्या शिक्षण विद्यार्थ्यांच्या दारी या उपक्रमांमध्ये गावातील प्रत्येक घराच्या भिंतीवर शालेय घटकांचे व माहितीचे लेखन करून विद्यार्थ्यांना त्याचे वाचन करणे, ते इतरांकडून वाचून घेणे, त्याबाबत माहिती देता येणे, परस्पर संबंध जोडता येणे, यामुळे विद्यार्थ्याला शैक्षणिक प्रवाहात जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमांमध्ये शाळेने केलेल्या उत्तुंग कार्याची दखल घेऊन केंद्रातून प्रथम पुरस्काराने गौरविण्यात आले. शाळेने घेतलेली ही उत्तुंग भरारी सतत अवकाशाला गवसणी घालत राहील असा आम्हास दृढ विश्वास आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. पवन मानकर** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट,अमरावती. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव, ता.गंगापूर, जि. औरंगाबाद

**मुख्याध्यापकाचे नाव :- श्री. प्रवीण लोहाडे** **ई मेल –** zppsborgaon1@gmail.com




**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव, शाळेचे बोलके प्रवेशद्वार**

औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील बोरगाव नावाच छोटस गावं. औद्योगिक वसाहतीच्या जवळ असूनही थोडसं दुर्लक्षीतचं. गावातील लोकांचा कल अध्यात्माकडे तर प्रगतीशील शेतकर्याचे गावं म्हणून गावाची ओळख. शाळेच्या विकासाच्या दृष्टीने सर्वात आधी कार्यरत शिक्षकांना भेटून चर्चा केली व ग्रामस्थांशी चर्चा केली. शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेतली. चीमुकल्यांशी संवाद साधला आणि अचानक असे जाणवले कि याशाळेत भौतिक सुविधांचा अभाव जरी जाणवत असला तरी  कार्यरत शिक्षकांनी अत्यंत परिश्रमाने अध्यापन कार्य करून या चिमुकल्यांना गुणवंत विद्यार्थी म्हणून ओळख देण्याचे काम केलेले होते. सर्वात आधी इमारतीच्या सुशोभिकरणा पेक्षा शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा परिचय जगाशी व्हावा यादृष्टीने आवश्यक भौतिक व बौद्धिक सुविधा प्राप्त करून देण्याचे मनाशी  ठाम ठरविले. शाळेच्या इमारतीत एकूण ७ खोल्या होत्या. खोल्यांची अवस्था थोडी चिंताजनकच होती. परंतु उपलब्ध परिस्थितीत शाळेला नावारूपाला आणण्याचा ध्यास घेतला. आणि झपाट्याने कामाला लागलो. ग्रामस्थांचा सकारात्मक दृष्टीकोन आणि शिक्षणाबद्दलची आस्था आश्वासक वाटणारी होती.

**शालेय उपक्रम :-  नाविन्यपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा :-** सध्याचे युग हे विज्ञान युग आहे. या युगामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे पडू न देणे हा उद्देश डोळयासमोर ठेऊन शाळेमध्ये समग्रशिक्षा अभियानांतर्गत एक नाविन्यपूर्ण विज्ञान प्रयोग शाळा स्थापन करण्यात आली. या प्रयोगशाळेमध्ये एकूण ५४० प्रयोग आहेत. त्यापैकी  २ ते ३ प्रयोग दररोज शालेय परीपाठामध्ये सदर केले जातात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होण्यास नक्कीच आम्हाला मदत झालेली आहे. कोरोनाच्या काळामध्ये ओस्का बजाज तर्फे प्रत्येक इयत्तेनुसार इयत्ता ३री ते ८वी पर्यंतचे इयात्तनिहाय विज्ञान प्रयोगशाळा देण्यात आली. या उपक्रमांतर्गत शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे गट तयार करून गटप्रमुख हे मोबाईलवरील  ग्रुपवर त्यांनी परिसरातील साहित्यापासून तयार केलेला प्रयोग पाठवितात. विविध विज्ञान प्रदर्शना मध्ये विद्यार्थी त्यांच्या प्रयोगाचे सादरीकरण करतात.



**ओस्का बजाज तर्फे इयात्तनिहाय देण्यात आलेली विज्ञान प्रयोगशाळा**

**अत्याधुनिक संगणक कक्ष तसेच ३१ tab :-** संगणकाच्या युगात विद्यार्थी संगणक साक्षरते पासून दूर राहून कसा चालेल? यादृष्टीने जवळपास १२ संगणक तसेच ३१ tab विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले. यासाठी समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी सहकार्य केले. यात पुढील नावाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल लायन्स midtaun औरंगाबाद १२ tab, टीम jbf ८ tab, नीलम कुमारजी अजमेरा ८ tab , संतोष पेंढारी नागपूर २ tab, मनोज सावजी ३ tab, या सर्व शिक्षण प्रेमींचे शतशः खूप आभार मानावे लागतील.



**शाळेचा सुसज्ज संगणक कक्ष**

**नजरेचे पारणे फेडणारा सांस्कृतिक कार्यक्रम :-** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा असा आपल्या शिक्षण प्रक्रियेचा अंतिम ध्यास आहे. हेच उद्दिष्ट लक्षात ठेऊन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांच्या कलेला वाव देण्यासाठी विविध प्रकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम शाळेत दरवर्षी आयोजित करण्यात येतात. सायंकाळच्या वेळेत राबवण्यात येणाऱ्या या सांस्कृतिक कार्यक्रमाला दरवर्षी जवळपास २ लाख रुपयांच्या बक्षिसांचा वर्षाव होतो. जम्मू पासून ते कन्याकुमारीपर्यंत तसेच गुजरात पासुन ते आसामपर्यंतच्या सर्व संस्कृतींना स्पर्श करण्याचे कार्य या सांस्कृतिक कार्यक्रमातून करण्यात येते. न भूतो न भविष्य असा हा सांस्कृतिक कार्यक्रम असतो असे शब्दोचार ग्रामस्थांच्या तोंडातून निघल्या शिवाय राहात नाही.



**शाळेतील रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमाची क्षणचित्रे**

**ROOM TO READ ग्रंथालय तसेच वाचनालय :-** म्हणतात ना 'वाचन हे मनाचे अन्न आहे'. या उक्तीप्रमाणे रूम टू रीड या संस्थेमार्फत आमच्या शाळेला मिळालेल्या वाचनालयाचा सर्व विद्यार्थ्यांसाठी खूप मोठा फायदा झालेला आहे. वाचनालायामध्ये मुलांच्या क्षमतेचा विचार करून ज्या त्या वर्गानुसार त्यांच्यासाठी वेगवेगळया स्तरांची पुस्तके वाचनालयात आहे. हि पुस्तके अतिशय चित्ररूपी बोलक्या भाषेत आहेत. त्यामुळे मुलानाही वाचनाची आवड निर्माण झालेली आहे. तसेच २०२० मध्ये जागतिक महामारीच्या कोरोना संकट काळामध्येही या संस्थेने दिलेल्या वाचनालयाचा मुलांना फायदाच झालेला आहे. आमच्या शाळेतील प्रत्येक वर्गाच्या वर्ग शिक्षकांनी आपापल्या वर्गाचे WHATS APP ग्रुप तयार केलेले होते. त्या ग्रुपवर आमचे वाचनालयाचे श्री बनसोडे सर हे दररोज एक गोष्ट फ्लिप बुक लिंक द्वारे मुलांपर्यंत पोहोचवत आहे. आमची मुलेही फ्लीपबुक स्वरूपातील गोष्ट अतिशय आनंदाने वाचतात.त्यानंतर त्यावर आधारित प्रश्न देखील विचारले जातात.मुले त्या प्रश्नाची उत्तरे अचूक देतात.अशा पद्धतीने ROOM TO READ संस्थेने दिलेल्या वाचनालयाचा आमच्या शाळेतील मुलांना खूप मोठा फायदा झाला व होईल. त्यामुळे सर्वांच्या वतीने या संस्थेचे खूप खूप धन्यवाद. तसेच आमच्या या ग्रंथालयामध्ये MPSC व UPSC तसेच इतर अनेक स्पर्धा परीक्षेचे पुस्तके देखील आदरणीय आमदार साहेब श्री प्रशांतजी बंब यांच्यातर्फे भेट म्हणून देण्यात आलेले आहे.



**ROOM TO READ संस्थेने दिलेले वाचनालय**

**लोक सहभाग :-** शाळेचे गेट मोडकळीस आलेले होते, शाळेची उत्तोरोत्तर होत असणारी प्रगती बघून गावातील तरून मंडळींनी मनाशी ठरवले आणि शाळेकडून कोणतीही मागणी नसताना, कोणतीही विनंती नसताना जवळपास ५००००

हजार रुपयांचे भव्य असे गेट स्वतःच्या मेहनतीने सरप्राईज म्हणून सुट्टीच्या दिवशी बसवून देण्यात आले. तसेच सुंदर व आवश्यक असे फर्निचर देखील शाळेमध्ये तयार करून दिले. याचा परिणाम म्हणून एकंदरीत सर्वच वातावरण केवळ शाळेच्या बाबतीत सकारात्मक असे बनत जाताना दिसत आहे.

**COVID 19 कोरोना काळात राबवलेला उपक्रम :-** कोरोनामुळे अचानक लॉकडाऊन लागले. विद्यार्थ्यांचा अभ्यास थांबतो कि काय असा प्रश्न पडला. समस्या आली तर समाधान देखील असणारच असा सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन, ज्या काळात माणूस घरच्या बाहेर निघायला घाबरत होता, त्या काळात प्रोटोकॉल पाळून आम्ही विद्यार्थ्यांचे गावातल्या गावात, गल्लीनुसार, त्यांच्या निवासानुसार, गट पाडून गट कार्याची संकल्पना राबवली. सर्व विद्यार्थ्यांची २० गटात विभागणी करून, गावातील शिक्षक प्रेमींची, उच्चशिक्षित पालकांची मदत घेऊन अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया अखंडित चालू ठेवली. या गटांना शिक्षकांच्या भेटीचे नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आली. मास्क वाटप, स्यानीटायझर, सोशल distans या त्रिसूत्रींचा वापर करून हे गटकार्य चालू ठेवले. याचा सकारात्मक परिणाम आम्हा सर्व शिक्षकांना शाळा चालू झाल्यावर जाणवला.



**लॉकडाऊनच्या काळात गटा-गटातून अध्ययन-अध्यापन करताना**

विविध उपक्रमाच्या माध्यामातून आज आमची शाळा नावारूपास आली आहे . कोणतेही संकट आले तरी शाळेतील शिक्षक, पालक, गावकरी, सगळे मिळून त्याचा सामना करतात. कारण "**लहरो से डरकर नौका पार नही होती, कोशिश करनेवालो की हार नही होती.**" अशी ही आमची ग्रामीण भागातील बोरगावची शाळा.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री.योगेश्वर जाधव** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्रशाला, लोहगांव, ता.पैठण, जि.औरंगाबाद.

**मुख्याध्यापकाचे नाव:-** श्री.उद्धव बापुराव गरड **ई-मेल :** uddhavgarad026@gmail.com



**जिल्हा परिषद प्रशाला, लोहगाव शाळेची भव्य इमारत**

“ज्ञानरचनावादी शिक्षण प्रणालीने, घरोघरी ज्ञानाचा दिप लावू या... प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राची कास धरु या, त्यासाठी सदैव कटिबध्द राहू या”... या उक्तीप्रमाणेच विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबध्द अशी जिल्हा परिषद, लोहगांव ची (इ.5 वी ते 10 वी) प्राथमिक आणि माध्यमिक शाळा. गावाच्या एकदम मध्यभागी उभारलेली आहे. माध्यमिक शाळेची स्थापना 1953 साली झाली. शाळेत विद्यार्थ्यांचे मन रमावे आणि शाळेचा परिसर बोलका व्हावा यासाठी आम्ही सर्व शिक्षकांनी काही सामाजिक संस्थाकडे अर्थसहाय्याची मागणी केली. जेणेकरुन शाळेचे वातावरण बोलके होईल. आम्हाला या सामाजिक संस्थकडून रु.50,000/- चे अनुदान प्राप्त झाले. या प्राप्त अनुदानातून आम्ही सर्वप्रथम शाळेला रंग दिला. शाळेच्या गंजलेल्या पत्र्यांना सुध्दा त्यामुळे एक नवे रुप मिळाले. शाळेची रंगरंगोटी व त्यानंतर शाळेच्या भिंतीवर शौक्षणिक चार्टस्, माहिती रेखाटली. आता संपूर्ण शाळा ही बोलकी झाली. शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी स्वखर्चाने शाळेच्या पटांगणात संरक्षक जाळीसह झाडे लावली. त्यामुळे सगळा शालेय परिसर अत्यंत उत्साही, प्रफुल्लीत आणि आनंददायी झाला. या वातावरणाचा सकारात्मक परिणाम शौक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी होऊ लागला. शाळेत विविध उपक्रम राबवून शाळेची गुणवत्ता वाढवण्यास व शाळा नावारुपास येण्यास मदत झाली.



**शाळेचा फुललेला आनंददायी परिसर**

**शैक्षणिक गुणवत्ता :** 'ज्ञानम परमम् ध्येयम' **'Knowledge is the Supreme Goal'.**

हे आमच्या जिल्हा परिषद प्रशाला, लोहगावचे ब्रीद आहे. याचीच साक्ष विद्यार्थ्यांची गुणवत्ता देते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. ज्ञानरचनावादाचा उपयोग अध्यापनात करण्यात येतो. संगणक, मोबाईल, टि.व्ही. चा उपयोग दैनंदिन अध्यापनात करुन अमूर्त संकल्पना, मूर्त केल्या जातात. शाळेत शौक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शाळेत साज-या होणा-या प्रत्येक कार्यक्रमाला, सर्व विशेष दिनी भित्तिपत्रकाचे प्रकाशन केले जाते. जसे - चांगल्या सवयी, माझा संकल्प, मुल्ये, विविध संत, योगदान भारतीय वौज्ञानिकांचे, वीज वाचवा, जगण्यासाठी झाडे जगवा, पाणी वाचवा, महापुरुषे, देशभक्त, लोकसंख्या वाढीची कारणे व परिणाम, भारतीय प्रजासत्ताकातील माझा ऐतिहासिक औरंगाबाद जिल्हा, शिक्षक आणि पालक यांच्या माध्यमातून विदयार्थी विकास अशा अनेक विषयावर भित्तिपत्रके तयार करुन त्याचे प्रकाशन केले गेले. विविध शौक्षणिक विषय तथा अनेक महत्वाच्या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती मिळावी, माहितीचे संकलन करण्याची प्रवृत्ती जोपासली जावी, विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढावे या अनुषंगाने जिज्ञासा, ज्ञानज्योती अशा विविध आशयाखाली माहिती संकलन पुस्तिका, हस्तलिखिते तयार करुन विद्यार्थ्यांना वाचनासाठी दिले जाते. सामाजिक समस्यांवर जनजागरण व्हावे या उददेशाने विद्यार्थ्यांच्या मदतीने - बेटी बचाओ - बेटी पढाओ, स्वच्छ भारत - स्वस्थ भारत, ओला कचरा - कोरडा कचरा वेगळा करु या, पर्यावरणाचे रक्षण करु या, प्लास्टीक मुक्त भारत, एड्स जनजागृती, रक्तदान करु या- जीवन वाचवू या अशी अनेक सामाजिक संदेश देणारी शुभेच्छा पत्र तयार करुन पालकांना दिली जातात व जनजागरण केले जाते.



**शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी घेण्यात येणाऱ्या उपक्रमात सहभागी विद्यार्थी व शिक्षक**

**शाळा व्यवस्थापन समिती व पालकांचा सहभाग:-** 'गावाला शाळेचा अभिमान असावा,शाळेला गावाचा आधार असावा.' याप्रमाणे शालेय व्यवस्थापन समिती व पालक शाळेच्या विविध उपक्रमात, कार्यक्रमात सहभागी होवून मदतीस सदैव तत्पर असतात. स्नेहसंमेलनात पालकांकडून बक्षिसांच्या रुपात मिळालेला निधी, शाळा विकासासाठी वापरण्यात येतो.

**शाळेचे विशेष उपक्रम:-** कमवा आणि शिका योजने अंतर्गत – विद्यार्थ्यांना भविष्यात सण व उत्सवाच्या निमित्ताने लघुउद्योग उभारता यावा या अनुषंगाने दिवाळी निमित्त शाळेत 2000 मातीच्या पणत्या रंगवून, सजवून विक्री - प्राप्त नफयातून शाळेला 16 खुर्च्या घेतल्या. शालेय परिपाठात नाविन्यपूर्णता - सर्व वर्गाचा सक्रीय सहभाग नोंदवला जातो. दैनंदिन परिपाठात सामान्यज्ञान घेतले जाते. शाळेत पाणी वाचवा, वीज वाचवा, वाहतुकीचे नियम पाळा, अशा अनेक विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन व प्रदर्शन. हेल्थकेअर व ऑटोमोबाईल विभागांचे विविध उपक्रम. 48 विदयार्थीनीचे 'बांबू रिंग नृत्य – भारतीयम्' यातून बेटी बचाओ हा संदेश देण्यात आला. मिशन चांद्रयान - प्रतिकृती बनवून विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर. दैनंदिन अध्यापनात जोडाक्षर वाचन, स्वअभिव्यक्तीसाठी विषय, अनुलेखन - श्रूतलेखन सराव, बोधकथा वाचन, इंग्रजी पेटीचा वापर. इंग्रजी शब्द पाठांतर स्पर्धा, सुलेखन स्पर्धा, रांगोळीतून विज्ञान, चित्रकला स्पर्धा, कमवा आणि शिका योजने अंतर्गत - विविध उपक्रम - अध्ययन अध्यापनात अभ्यास मित्र ही संकल्पना राबविल्यामुळे गुणवत्ता वाढीसोबत विद्यार्थ्यांना अभ्यासात रस निर्माण होत आहे.

**कोव्हीड-19 उपक्रम :-** कोव्हीड-19 मुळे शाळा बंद आहेत पण विद्यार्थ्यांचे शिक्षण चालू आहे. वॉट्सअप ग्रुपव्दारे झुम मिटींग तथा विविध शैक्षणिक व्हिडीओव्दारे विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणले जात आहे. कोरोनापासून सुरक्षित राहण्याचे उपाय या विषयावर इ.5 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांची पोस्टर्स स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करुन जनजागरण करण्यात आले. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.




**करोना काळात विद्यार्थ्यांनी जनजागरणासाठी तयार केलेले पोस्टर**

शाळेच्या मुख्याध्यापकांच्या नेतृत्वाखाली, शालेय व्यवस्थापन समिती, केंद्राचे केंद्रप्रमुख, यांच्या सहकार्यातुन व प्रशालेतील सर्व शिक्षकवृंद यांच्या प्रयत्नातून शाळेच्या यशाची गाथा उंचावत आहे. याचा आम्हाला अभिमान वाटतो. यासर्व उपक्रमाचा उपयोग भविष्यात विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी होईल असा विश्वास आहे.

**जिनके मजबुत इरादे - बने पहचान उनकी**

**मंजील आपही हो जाती है - आसान उनकी....**

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. योगेश्वर जाधव** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथामिक शाळा, मुंबापुरवाडी, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद.

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री. प्रकाश हेमलाल राठोड **ई-मेल :-** prakashrathod123p@gmail.com



**जि.प.उ.प्रा. शाळा, मुंबापुरवाडी शाळेची इमारत**

मुंबापुरवाडी तसे गाव फार छोटे. 100% राजपूत समाजाची वस्ती असलेला हे गाव. शिक्षण आणि शाळेविषयी थोडी उदासीनताच. पण कुठेतरी बदल झाला पाहिजे, हे अंतर कमी व्हावे, हे सातत्याने वाटत होते. आमची शाळा छोटी, वर्ग 1 ते 4, पण मनात हा विचार यायचा शिक्षण म्हणजे काय केवळ मुलांना साक्षर करणे यापुरतेच मर्यादित आहे काय? चौथी नंतर विद्यार्थी काय करत आहेत? कोणत्या शाळेत शिकत आहेत? त्यांच्या भविष्याची वाटचाल काय आहे? हे पाहणे आपलं कर्तव्य नाही काय? आणि या सर्व प्रश्नांना उत्तर म्हणून आम्ही गावातील तरुण मुलांसाठी काहीतरी करायचा निश्चय केला. **शालेय विकास :-** काही करण्यासाठी गावातील मंडळींचे सहकार्य हे अनिवार्य होते. ते मिळवणे तेवढे सोपे नव्हते. मग त्यासाठी आम्ही शाळेचं पूर्णतः भौतिक स्वरूप बदलण्याचा निश्चय केला, कारण झालेला हा बदलच गावाला शाळेपर्यंत घेऊन येईल आणि गाव व शाळा यांच्यातील अंतर कमी होईल असे वाटले. त्यासाठी प्रथम आम्ही डेन्स फॉरेस्ट संकल्पना शाळेत प्रत्यक्षात साकारली. ज्याद्वारे आम्ही तब्बल दीड हजाराच्यावर शाळेत झाडे लावलीच नाही, तर ती जगवली आणि वाढवली सुद्धा.



**शाळेने प्रत्यक्षात साकारलेली डेन्स फॉरेस्ट संकल्पना**

**लोक सहभाग :-** डेन्स फॉरेस्ट करताना आम्हाला शाळेचे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. काळूसिंग कापुसिंग जंघाळे यांचे मोलाचे सहकार्य तर लाभलेच पण त्याच सोबतच प्रशासनाचीही फार मदत झाली. या कामाची दखल घेत इंड्यूरन्स या कंपनीने आम्हाला CSR अंतर्गत मदत करण्याचे ठरविले. त्यांच्याद्वारे आम्ही शाळेतील वर्गखोल्या, स्वच्छतागृह, शालेय मैदान, शाळेचे कुंपण या सर्व सुविधा अद्ययावत केल्या. आम्ही शाळेचे भौतिक स्वरूप पूर्णतः बदलून टाकले.

**समाजोपयोगी अभ्यासिका :-** यावर विचार करताना आमच्या लक्षात आले येथील मुलांना सैनिकी व पोलिस विभाग यांचे विशेष आकर्षण आहे. मग या क्षेत्रामध्ये त्यांना यश मिळवून देण्यासाठी काय करता येईल? या प्रश्नावर विचार करताना आम्हाला अभ्यासिकेचा पर्याय सापडला. पुस्तक अथवा ग्रंथ यासारखा मित्र नाही असे आपण नेहमीच म्हणतो. 'जिथे ग्रंथ कोंडली जातात तिथे राष्ट्र कोंडले जाते'. कपाटाच्या कबरीत गाडले जातात विचारांचे मुद्दे. त्यामुळे अभ्यासिकेतील प्रत्येक पुस्तक विद्यार्थ्यांना निमंत्रणच वाटावे असे असावे. शालेय परिसरातच मग आम्ही या तरूणांसाठी एक सुसज्ज असे ग्रंथालय तसेच अभ्यासिका निर्माण करण्याचे ठरविले. हे ग्रंथालय म्हणजे केवळ येथे पुस्तकांची गर्दीच नव्हे तर ग्रंथालयात विद्यार्थ्यांची गर्दी असायला हवी असे असावे. आज या तरुणांचे आम्ही दोन अभ्यास गट केले सिनियर व ज्युनिअर. त्यांच्या बसण्याची स्वतंत्र अशी व्यवस्था करण्यात आली. या अभ्यासिकेत मुले दिवसभर अभ्यास करत असतात, केवळ जेवणासाठी थोडा अवकाश घेतात. आज जवळपास 25 मुले या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.



**सिनिअर गट**



**ज्युनिअर गट**

**शालेय मैदानाचा विकास :-** शाळेच्या मैदानावर विविध शारीरिक कसरतींची साहित्य उपलब्ध करून दिले. याचा परिणाम असा झाला गावातील तरुण मंडळी शालेय परिसरात निर्माण केलेल्या अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करू लागली. मैदानावर कसरतींचा सराव करू लागली. ही मुले आपसुकच आपल्या ध्येयाप्रती एकनिष्ठ होऊन प्रयत्नशील झाली. या तरुण मुलांना आपल्या ध्येयाप्रती कष्ट करताना पाहून शाळेतील मुले सुद्धा या वयात आपली भविष्याप्रतीची ध्येय निश्चित करू लागली. हळूहळू शाळेप्रती गावाची भूमिका सकारात्मक झाली. आज गावातील दोन तरुण सैनिकी क्षेत्रात कार्यरत झालेले असून, इतर विद्यार्थी पोलीस व सैनिकी क्षेत्रात दाखल होण्यास कसून सराव करत आहेत. आम्हाला व गावकर्यांना सुद्धा खात्री आहे की येणाऱ्या वर्षातच किमान 10 ते 12 तरुण निश्चितच या क्षेत्रात कार्यरत असतील. विशेष म्हणजे आज या तरुणांनी

कोणत्याही सेवेत रुजू झाल्यानंतर पहिले दोन महिन्यांचे वेतन शाळेस देण्याचा मानस करून शाळेप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली आहे. निश्चित ही बाब गाव व शाळा यांना भविष्याप्रती आश्वस्त करणारी आहे.



**शाळेच्या मैदानात कसरतीचा सराव करताना तरुण**

आज आम्ही सार्थ अभिमानाने हे सांगू शकतो आमची शाळा जरी 1 ते 4 वर्ग असणारी असली तरी आमच्या कार्याची मर्यादा मात्र फार व्यापक झाली आहे. शाळा हे गाव आणि गावकऱ्यांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडवू शकणारी संस्था आहे. आमची अभ्यासिका आमच्या सर्व उपक्रमांचा मुकुटमणी असून याद्वारे गावाचे भविष्य बदलेल हे सांगण्यास भविष्यवेत्त्याची गरज नाही, कारण **आमच्या मुलांना उज्ज्वल भविष्याकडे नेण्यासाठी शाळा हाच त्यांच्या भविष्याचा पासवर्ड आहे.**


मार्गदर्शन
**श्री. योगेश्वर जाधव**
नोडल अधिकारी,
डायट, औरंगाबाद.

समन्वयन
**डॉ. ज्योती कुलकर्णी**
समन्वयक,
मिपा, औरंगाबाद.

प्रेरणा
**डॉ. नेहा बेलसरे**
संचालक,
मिपा, औरंगाबाद.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जरेवाडी, तालुका.पाटोदा, जिल्हा.बीड

**ई-मेल :–** zppsjarewadi@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री.गोविंद कदम **ई-मेल :–** govindkadam1967@gmail.com




**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जरेवाडीची विस्तीर्ण मैदान असलेली इमारत**

जरेवाडी हे बीड जिल्हयातील पाटोदा तालुक्यातील डोंगराच्या कुशीत वसलेले एक छोटे गाव. 60 कुटुंबे असलेले जेमतेम 400 लोकवस्तीचे गाव. गावातील ग्रामस्थांची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक. ऊसतोडणीसाठी 90% लोक स्थलांतर करतात. या शाळेचा कायापालट केला तो एका ध्येयवेड्या शिक्षकाने. त्यांचे नाव आहे श्री. संदिप पवार. शिक्षक एक आणि मोडकळीला आलेली एक खोली, अशी शाळेची आवस्था होती. त्यातही अनेक विद्यार्थी गैरहजरच असत. अज्ञान, अंधश्रद्धा तसेच व्यसनांचे प्रमाण गावात अधिक होते.मुले साधारणत: 4 थी पर्यंत अथवा शेजारच्या गावात जाऊन इ. 8 वी पर्यंत शिकत होते. मुलींचे शिक्षण घेण्याचे प्रमाण अतिशय कमी होते. शिवाय मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण अत्यंत जास्त होते. गावात पिण्याच्या पाण्याची कुठलीही व्यवस्था नव्हती. गावात जाण्यासाठी रस्ते ही नव्हते. ते हजर झाले त्यावेळी, कुठल्याही ग्रामस्थाची भेट न घेता थेट त्यांनी कामाला सुरुवात केली. त्यांचे हस्ताक्षर सुंदर असल्याने त्यांनी स्वत:च्या खर्चाने शाळेचे सुशोभिकरण केले. वर्गामध्ये तरंगतक्ते लावले. शालेय परिसरातील भिंती रंगवून अधिक बोलक्या केल्या. या कृतीचा परिणाम विद्यार्थी व ग्रामस्थांवर सकारात्मक झाला. त्यानंतर त्यांनी सर्व ग्रामस्थांना बोलावून शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले. गावकऱ्यांनी शाळेसाठी तन-मन-धन अर्पण करण्याचे वचन दिले, ते आजही अबाधित आहे. या नंतर त्यांनी विद्यार्थ्यांकडे लक्ष केंद्रित केले. गप्पा, गाणी, गोष्टी यांच्या माध्यतातून शाळेविषयी गोडी निर्माण केली. विद्यार्थ्यांचा अध्ययनस्तर व अध्ययनाच्या गतीनुसार गटनिहाय बहुवर्ग पदधतीने ते अध्ययन अध्यापन करु लागले. लवकरच मुले शाळेत नियमित येऊ लागली. स्वच्छता ठेऊ लागली, आत्मविश्वासाने बोलू लागली. हळुहळू शाळेमधील विद्यार्थी संख्या व शिक्षक संख्या वाढत गेली. शाळेमध्ये पाचवी, ते आठवीचे ही वर्ग सुरु झाले.




**शाळेच्या विविध उपक्रमात गावकऱ्यांचा सहभाग**

**लोकसहभाग :-** सुरुवातीला एकटे असणारे पवार सर, आता इतर शिक्षकांच्या मदतीने काम करु लागले. ग्रामस्थांनी शाळेसाठी पिण्याच्या पाण्याची सोय तात्काळ उपलब्ध करुन दिली. ग्रामस्थांनी मोठे पाणी शुद्धिकरण यंत्र (Water Fillter) उपलब्ध करुन दिले. शिवाय शाळेमध्ये सुसज्ज Hand wash Station ही आहे. ग्रामस्थांनी श्रमदानाने शाळेसाठी छोटसं मैदानही उपलबद्ध करुन दिलं. हळूहळु आठवडयातून काही दिवस ग्रामस्थ शाळेत येवून श्रमदान करु लागले. शिवाय जमेल तशी शाळेला आर्थिक मदतही करु लागले. आत्तापर्यंत जरेवाडी ग्रामस्थ व इतर पालक यांच्या लोकसहभागातून शाळेने 27 लाख रुपयांचा निधी ऊभा केला. त्यामुळेच आज शाळेमध्ये 20 सुसज्ज खोल्या आहेत. 713 विद्यार्थी शाळेत शिकत आहेत. 21 शिक्षक त्यांना अध्ययन अध्यापन करत आहेत. शाळेचे क्षेत्रफळ छोटं असलं तरी शाळेमध्ये उत्तम किचनशेड आहे. शिवाय या किचनमध्ये लागणारा सर्व किराणा ग्रामस्थांच्या मदतीने व्यवस्थित ठेवला जातो.



**जरेवाडी शाळेतील विज्ञान प्रदर्शन**

**शालेय विकास :-** शाळेची स्वत:ची विज्ञान प्रयोगशाळा आहे. व विद्यार्थी दररोज सकाळी शालेय परिपाठामध्ये विविध प्रयोगांचे प्रात्यक्षिक दाखवतात. आणि प्रयोगातील कारणमीमांसाही उलगडून दाखवतात. शाळेला नाविण्यपूर्ण विज्ञानकेंद्र सुद्धा स्थापन करण्यात आले आहे. या विज्ञानकेंद्रामध्ये अत्याधुनिक वैज्ञानिक उपकरणे आहेत. त्याचा विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापनात खूप उपयोग होतो. शाळेमध्ये स्वतंत्र कलाकुसर कौशल्य कक्ष आहे. या कक्षामध्ये विद्यार्थी टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवतात. विद्यार्थ्यांच्या सर्जनशिलतेला वाव देण्यासाठी हा कक्ष खूपच उपयुक्त ठरत आहे. आमच्याकडे विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांनीच चालवलेले आदर्श स्कुल बँक आहे. बँकेत प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वत:चे खाते आहे. विद्यार्थी हे ठराविक वेळेत पैसे जमा करु शकतात आणि काढू सुद्धा शकतात. विद्यार्थी हेच बँकेचे सर्वेसर्वा आहेत. प्रत्येक आर्थिक वर्षात खातेदार विद्यार्थ्यांना त्यांच्या ठेवीवर व्याज मिळते. बँकेला झालेला नफासुद्धा विद्यार्थ्यांना वाटला जातो.




**जरेवाडी शाळेत मान्यवरांची मुलाखत**

**विद्यार्थी विकास :-** दरवर्षी शाळेमध्ये एप्रिल महिन्यात सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमातुन पालक व ग्रामस्थ यांच्या माध्यमातुन प्रती वर्षी सुमारे दोन लाख रुपये शाळेला मिळतात. हा निधी शाळेच्या विकासासाठी खर्च केला जातो. दररोज सकाळी शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यां मार्फत मुलाखत, नाटक, संभाषण, विषयज्ञान तपासणी अशा विविध उपक्रमांसह पंचेचाळीस मिनिटांचा शालेय परिपाठ सादर केला जातो. प्रत्येक विद्यार्थ्याला या परिपाठामध्ये सहभाग घेण्याची संधी मिळते. दोन दिवस अगोदर विद्यार्थी शिक्षकांच्या सहाय्याने परिपाठाची तयारी करतात. स्वत: कथालेखन करतात, कविता सादर करतात. विविध मान्यवरांची मुलाखत सुद्धा घेतात. त्यासाठी शाळेतील शिक्षक स्वत:चा अतिरिक्त वेळही शाळेसाठी देतात शाळेमध्ये वर्षभर विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये पोस्टर मेकिंग स्पर्धा, हस्तकला कौशल्य स्पर्धा, वाचन तास, भाषण स्पर्धा , सामान्यज्ञान परिक्षा, इंग्रजी संभाषण, विज्ञान क्लब, यांचा समावेश होतो. शाळेतील शिक्षक नवोदय विद्यालय परिक्षा, शिष्यवृत्ती परिक्षा अशा विविध स्पर्धा परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांकडून करुन घेतात. आत्तापर्यंत शाळेच्या 70 विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परिक्षांमध्ये यश संपादन केले आहे. गणितातील उदाहरणे सोडवण्याचे काम शक्यतो विद्यार्थ्यांना आवडत नाही. पण ही आवड निर्माण करण्याचे काम शाळेतील गणित विभागाचे प्रमुख उद्धव पवार सर मोठ्या कल्पकतेने करत आहेत. इयत्ता 6 वी ते 8 वीच्या विद्यार्थ्यांसाठी Math

Talent Search ही साप्ताहिक परीक्षा घेतली जाते. यात एकूण 25 प्रश्नांना 50 गुण असतात. गणितातील मुलभूत संकल्पना वर्गस्तर संकल्पना, तर्क, शाब्दिक उदाहरणे, व्यवहारातील उदाहरणे अशा विविध घटकांचा समावेश यामध्ये केलेला असतो. पाठ्यांशासोबत भौमितीक रचना, वर्ग, वर्गमूळ, आलेखवाचन, पोस्ट व बँक व्यवहार, नाणी व चलन इत्यादिंचा सुद्धा गणित अध्ययन-अध्यापनात समावेश केला जातो. याचा फायदा विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परिक्षांमध्ये होतो आणि त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागतो. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या निमित्ताने जरेवाडी शाळेने विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या टाकाऊ पासून टिकाऊ साहित्याचे हस्तकला प्रदर्शन भरवण्यात येते. यामध्ये नारळाच्या करवंटीपासून बनवलेली कलाकुसर, विणकाम, मातीकाम, तरंगचित्र या वस्तू प्रदर्शनात मांडण्यात आल्या. शिवाय दरवर्षी दिवाळीच्या दिवसांमध्ये, आकाश कंदील निर्मिती कार्यशाळा, भेटकार्ड निर्मिती कार्यशाळा, दिवाळीच्या फराळाचे वाटप असे उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात.



**जरेवाडी शाळेतील हस्तकला प्रदर्शन**

**सामाजीक बांधिलकी :-** केरळ राज्यात ज्यावेळी खूप मोठा पाउस पडला, मोठ्या प्रमाणात झालेल्या पर्जन्यवृष्टीमुळे जीवित व वित्तहानी झाली. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी समाज, ग्रामस्थ, पालक यांच्याकडे मदतीचे आवाहन केले. यातून शाळेकडे मदतनिधी म्हणून 21500/- रुपयांचा निधी जमा झाला. हा निधी शाळेने केरळ मुख्यमंत्री कार्यालयाला सुपुर्द केला. आणि सामाजिक बांधिलकी जपली.

**तंत्रज्ञानाचा वापर :-** जरेवाडीत शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी एक संघटन उभा केले आहे. जरेवाडी शाळेतील प्रत्येक वर्गासाठी स्मार्ट टिव्ही उपलब्ध करुन देण्याचे काम या माजी विद्यार्थ्यांनी केले आहे. कोरोना असतानाही "शाळा बंद शिक्षण सुरु" या उपक्रमांतर्गत शाळेत अध्ययन-अध्यापनाचे कार्य सुरु आहे. DIKSHA App च्या माध्यमातून शासनाने पाठवलेला आभ्यासक्रम विद्यार्थ्यांना दिला जातो. विद्यार्थी ते पाहून सोडवतात. गुगलमिट ॲपच्या माध्यमातून सद्या 3 री ते 8 वी साठी गणित, विज्ञान आणि इंग्रजी विषयां बरोबरच स्कॉलरशिप परीक्षांचे देखील ऑनलाईन तासिका सुरु आहेत. दर रविवारी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन चाचणी सोडवून घेतली जाते. अभ्यासक्रमातील पाठांवर आधारित व्हिडिओ

विद्यार्थ्यांच्या Whats app ग्रुपवर टाकले जातात. त्यानुसार विद्यार्थी गृहपाठ स्वाध्याय लेखन करतात. शाळेतील शिक्षक आपल्या विषयाची चाचणी गुगल फॉर्मद्वारे तयार करुन विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतात. शाळेतील काही शिक्षकांचे स्वतंत्र युट्यूब चॅनल असून त्यामार्फत देखील विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत सहभागी होतात.

**शाळेच्या उत्तुंग यशाचा आलेख :- देखने ते हातं, ज्यांना निर्मितीचे डोहळे I मंगलाने गंधलेले, सुंदराचे सोहळे II**

कवी बा.भ. बोरकर यांच्या कवितेतील या सुप्रसिद्ध ओळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जरेवाडी या शाळेला तंतोतंत लागू पडतात. 25 वर्षांपूर्वी 24 पटसंख्या 01 शिक्षक, 01 वर्गखोली असणाऱ्या या शाळेचे रुपांतर आज 713 विद्यार्थी, 18 शिक्षक, व 20 वर्गखोल्या असणाऱ्या सुसज्ज अशा दुमजली इमारतीत झाले आहे. हे घडून आले आहे ते, या शाळेतील ध्येयवेडे शिक्षक संदिप पवार सर यांच्यामुळे. त्यांना साथ देणारे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी, क्षेत्रिय अधिकारी यांच्यामुळे. संदिप पवार सरांच्या या कार्याची दखल, राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. त्यांना भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. जरेवाडी शाळा बीड जिल्हयातील पहिली तर विभागातील दुसरी ISO बहुमान मिळालेली शाळा ठरली आहे. शाळासिद्धीमध्ये सुद्धा शाळेला 'अ' दर्जा प्राप्त आहे.




**राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते स्वीकारतांना शाळेचे ध्येयवेडे शिक्षक संदिप पवार**

अग्निपंख फाऊंडेशन, श्रीगोंदा जिल्हा अहमदनगर तर्फे राज्यस्तरीय, डॉ. अब्दुल कलाम आदर्श शाळा पुरस्कार जरेवाडी शाळेला प्राप्त झालेला आहे. या शिवाय, ग्राम-विकास अभियान, गुणवत्ता विकास अभियान, जिल्हास्तरीय महोत्सव, सर्वांगिण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम आदी क्षेत्रामध्येही शाळेला विविध मान सन्मान प्राप्त आहेत. यावरुन भविष्य काळातही शाळेची यशस्वी वाटचाल शिक्षण क्षेत्रात दिपस्तंभ ठरु शकेल याची प्रचिती येते.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
| --- | --- | --- |
| **श्री.सचिन चव्हाण** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, बीड. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुंबेफळ, ता.अंबेजोगाई, जि.बीड

मुख्याध्यापकाचे नाव:- **श्रीमती ललिता व्यंकटराव जाधव** ई-मेल:- lalitajadhav7748@gmail.com




**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेची इमारत**

शिक्षण ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाचा विचार आणि व्यवस्था यांच्या संबंधातील गुणवत्ता जोपासण्याचे कार्य शाळेमधून होत असते. या स्पर्धात्मक संगणकीय युगात आपले मुल सर्वगुणसंपन्न व्हावे व त्याने उच्चतम यश मिळवावे या विचाराने प्रेरित बीड जिल्ह्यातील पहिली आंतरराष्ट्रीय शाळा म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शाळा कुंबेफळ या शाळेचा उल्लेख केला जातो. कुंबेफळ हे गाव अंबाजोगाई तालुक्यातील आंबा शुगर फॅक्टरी पासून साधारणतः पाच किलोमीटर अंतरावर आहे. अंबाजोगाई तालुक्याच्या पश्चिमेस वसलेले सुमारे तीन हजार लोकसंख्येचे हे शहरालगतचे गाव आहे. ग्रामीण सांस्कृतिक परंपरेचे आवरण असलेले हे गाव शैक्षणिक प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. बहुतांश पालक शेतकरी आहेत. मजूरवर्ग, लहान-मोठे व्यावसायिक, कमी प्रमाणात असलेला नोकरवर्ग एकवटून समाज विकसित झाला आहे. या टुमदार गावात आमची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वसली आहे .

**शालेय विकास :-** शाळेच्या विकासासाठी शिक्षकांनी एकजुटीने विविध उपक्रम राबविले. शिक्षकांनी नटखट कलादालन, बालवाचन, टाकाऊ वस्तू पासून टिकाऊ वस्तू निर्मिती, मासिक बालसभा, लेखन स्पर्धा इत्यादी उपक्रम राबवून शाळेचे वातावरण उत्साही व आनंददायी बनवले. 2015 या शैक्षणिक वर्षात श्रीमती उषा मुकेशचंद्र रामधामि या राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या आदर्श शिक्षिका यांनी शाळेतील मुख्याध्यापक पदाचा पदभार स्वीकारला आणि एक वर्षाच्या कालावधीत त्यांनी शाळा नावारूपाला आणण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. 22 जून 2015 च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या शासन निर्णयानुसार कुमठे बीट, सातारा या शाळेला आमच्या शाळेतील सर्व शिक्षकांनी भेट दिली. त्यामुळे शिक्षकांमध्ये नवचैतन्याची लाट पसरली. या भेटीने प्रेरित होऊन आमच्या शिक्षकांनी शाळेतील सर्व वर्गखोल्या ज्ञानरचनावादी पद्धतीने सुशोभित केल्या. शाळेच्या भिंती बोलक्या केल्या. त्यामुळे अशा ज्ञानरचनावादी अध्ययन अध्यापन पद्धतीच्या वापरामुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्या चेहऱ्यावर अध्ययनाचे समाधान दिसू लागले. आणि शाळेच्या प्रगतीचा आलेख उंचावला.

**लोकसहभाग:-** शाळेच्या या प्रवासात ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळा व्यवस्थापन समिती, गावाचे आजी माजी सरपंच, शिक्षक स्टाफ, ग्रामपंचायत सदस्य, पालक आणि शिक्षण प्रेमी यांनी शाळेचा कायापालट केला. मध्यमवर्गीय आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल पालकांची मुले शाळेत येतात. श्रमिक व मजूर वर्गाचे पालक आपले पाल्य शिक्षकांच्या विश्वासावर सोपवून निश्चिंत मनाने घराबाहेर पडतात. अशा पाल्यांसाठी ग्रामस्थ व शिक्षक यांनी सर्वांगीण शिक्षणाचा विडा उचलला आहे. गावच्या माजी सरपंच यांनी प्रयत्न करून आयडीबीआय बँकेतर्फे शाळेसाठी अनुदान प्राप्त केले. त्यातून शाळेसाठी सुसज्ज व आधुनिक शौचालय बांधले. शाळेत हॅन्डवॉश स्टेशन उभे केले. यातील सांडपाण्यावर परसबाग फुलवली. शाळेत ई-लर्निंग करण्याचा विचार समोर आला.मग शिक्षकांनी 18000 रुपये सरपंचांनी 5000 रुपये व अन्य गावकर्यांनी सुद्धा यासाठी काही निधीचे योगदान दिले. या योगदानातून शाळेत ई-लर्निंग सभागृह सुसज्ज झाले. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांची अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक रंजक व आनंददायी झाली. तसेच लोकसहभागातून शाळेकडे आजपर्यंत तीन लाख रुपये रक्कम जमा झालेले होते. या निधीतून शाळेत किरकोळ दुरूस्ती करण्यात आली. इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले. शाळेची रंगरंगोटी करून शालेय परिसर सुशोभित करण्यात आला. शाळेमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी वॉटर फिल्टर बसवण्यात आले. शाळेत स्वच्छतागृह यांची संख्या वाढवण्यात आली. तसेच वीजेच्या प्रश्नावर तोडगा म्हणून शाळेला इनव्हर्टर बॅटरी भेट देण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी शाळेच्या अग्र भागाचे लोखंडी कमान शाळेला भेट स्वरूपात दिली. शाळेत अशा टप्प्या टप्प्याने एकूण 20 वर्गखोल्या तयार होत गेल्या. असा शाळेचा कायापालट झाल्याने शाळेला आयएसओ मानांकन प्राप्त झाले. त्यामुळे तालुक्यातील प्रथम आयएसओ होण्याचा बहुमान शाळेला मिळाला आहे.



**लोकसहभागातून शाळेतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वितरण कार्यक्रम**

**आनंददायी शिक्षण:-** शाळेमध्ये मासिक लेखन स्पर्धा, प्रश्नमंजूषा, विद्यार्थी यांचा वाढदिवस साजरा करणे, योगासने, चिकट पुस्तके, बाल मासिके, विद्यार्थी हस्तलिखिते, क्षेत्रभेट, शैक्षणिक सहल, महिला किशोरी मेळावे, मीना राजू मंच असे विविध उपक्रम राबवले जातात. तसेच माजी विद्यार्थी यांचा यशोगाथा उपक्रम सुद्धा राबवला जातो. त्यातून अठरा ते वीस हजारांची रक्कम जमा होते ही रक्कम शाळेच्या विकासासाठी वापरली जाते. मनोरंजनातून शिक्षण आणि शिक्षणातून मनोरंजन या उद्देशाने शाळा विविध सहशालेय उपक्रम राबवत आहे. यामध्ये राखी व आकाश कंदील बनवण्याची

कार्यशाळा, विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम, तसेच बालसाहित्य मेळावा, ग्रंथदिंडी, विविध शालेय क्रीडा स्पर्धा, आनंदनगरी, अपूर्व विज्ञान मेळावा, वेशभूषा स्पर्धा अशा अनेक उल्लेखनीय उपक्रमांचा समावेश करावा लागेल. आणि म्हणूनच एक उपक्रमशील शाळा म्हणून दैनिक लोकमत ने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुंबेफळ तालुका अंबाजोगाई या शाळेची दखल घेतली आहे.

शाळेमध्ये शिक्षकांनी मार्च-एप्रिल महिन्यात शाळेच्या नियमित वेळे व्यतिरिक्त थांबून जमिनीलगत तीन फूट उंचीच्या भिंतीला स्वतः रंगरंगोटी केली.शाळेचा बाहेरील परिसर आकर्षक केला. अंबाजोगाई शहरातील एका बचत गटाने शाळेला भेट दिली. सर्व सदस्यांनी शाळा पाहणी केली. शालेय स्वच्छ परिसर, हिरवागार परिसर, चंचल विद्यार्थी व आनंददायी वातावरण पाहून ही मंडळी भारावली. त्यांनी शाळेचे सर्व वर्ग डिजिटल बॅनर ने सजवून देण्याची जबाबदारी घेतली. वर्गातील भिंतीवर डिजिटल बॅनर लावण्यात आले. काही भिंती चित्रकाराने रंगवल्या. पाहता पाहता शाळेचे सर्व वर्ग अतिशय बोलके व जिवंत झाले. दुग्धशर्करा योग असा जुळून आला की 1 मे या महाराष्ट्र दिनाच्या शुभ मुहूर्तावर शाळेला आयएसओ मानांकन प्राप्त झाले .


महाराष्ट्र इंटरनॅशनल एज्युकेशन बोर्डाचे कुंबेफळच्या जि.प.प्रशालेत शिक्षण

**शाळेतील विविध उपक्रमाची दैनिक लोकमतने घेतलेली दखल**

**शिक्षक सहभाग:-** सध्या शाळेची कीर्ती सर्वदूर पसरली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील नामांकित संस्था आमच्या शाळेला भेटी देत आहेत. त्यातच मानवलोक या सेवाभावी संस्थेने शाळेला टॉय बँक भेट दिली. तसेच अभिजीत जोंधळे व त्यांचे सहकारी गुंडाळे सर यांनी त्यांच्या मैत्री पुस्तकांची या उपक्रमा अंतर्गत शाळेला भेट दिली. त्यांनी मुलांसाठी पुस्तके भेट दिली आणि मराठी विषयाच्या तासिका घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेची गुणवत्ता पाहून शासनाने शाळेला सुसज्ज विज्ञान प्रयोग शाळा भेट दिली. याठिकाणी आता विद्यार्थी स्वतः प्रयोग करतात, निष्कर्ष काढतात, आणि साहित्य हाताळतात.



**शाळेतील विद्यार्थी विज्ञानाचे प्रयोग करताना**

प्रगत शाळा सिद्धी अंतर्गत शाळेला 'अ' श्रेणी प्राप्त झाली. शाळेतील शिक्षकांची धडपड पाहता ग्रामस्थांनी शिक्षकांवर विश्वास दाखवून शाळा आंतरराष्ट्रीय करण्याचा निर्णय घेतला. शाळा गुणवत्ता तपासणीसाठी समिती आली आणि सन 2018-19 च्या मे महिन्यात शाळेला आंतरराष्ट्रीय संलग्नता प्राप्त झाली. जिल्ह्यातील मराठी माध्यमाची पहिली आंतरराष्ट्रीय शाळा हा बहुमान शाळेला मिळाला आणि शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा विराजमान झाला. इयत्ता पहिली ते तिसरीच्या वर्गासाठी आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम राबविण्यात आला. प्रशिक्षित शिक्षक, ज्ञानरचनावादी अध्ययन-अध्यापन, जिज्ञासू व चिकित्सक विद्यार्थी, सहकार्यासाठी तत्पर असलेले ग्रामस्थ या सर्वांमुळे शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला. याची दखल बालभारतीने घेऊन शाळेला व्हर्च्युअल क्लासरूम भेट दिली. त्यामुळे ग्रामीण भागातून मुलांना बालभारतीशी संवाद साधण्याची संधी मिळाली. विजेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे ग्रामपंचायतीने शाळेस सोलर उपकरण भेट दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया अविरत चालू राहिली.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात सदुपयोग**:- आज कोरोना महामारीच्या सावटाने शिक्षण प्रक्रियेस घेरले परंतु त्यावरही मात करत - 'शाळा बंद, पण शिक्षण सुरू ' या उपक्रमांतर्गत शाळेचे अध्ययन अध्यापनाचे कार्य सुरू राहिले . दिक्षा ॲप , युट्युब चॅनेल, गुगलमीट, व्हाट्सअप ग्रुप यांच्या माध्यमातून ऑनलाइन तासिका सुरू करण्यात आल्या. शाळेबरोबरच शालाबाह्य स्पर्धा परीक्षांचे देखील मार्गदर्शन शिक्षक करत आहेत. तर रविवारी गुगल फॉर्म द्वारे चाचणी विद्यार्थी सोडवत आहेत. आमचे शिक्षक 100% गुणवत्ता व प्रगत शाळेचे स्वप्न साकारण्यासाठी सतत प्रयत्नशील होते, यापुढेही राहणार आहेत. संघभावनेची मशाल हाती घेऊन पुढे पुढे जात आहेत.

**"संघटन ही शक्ती है l संघटन ही सार है ।संघटन नही तो सबकुछ बेकार है"...!!!**

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री.सचिन चव्हाण** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, बीड. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद डिजिटल पब्लिक स्कूल,पवनी, जि.भंडारा.

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री.शिवशंकर घोडीचोर **इ-मेल:-** zpdpspauni@gmail.com



**जि.प.डिजिटल पब्लिक स्कूल,पवनी शाळेची इमारत**

आज नवनवीन उपक्रमांसाठी संपूर्ण जिल्हा ज्या शाळेकडे बघतो, ती जि.प.डिजिटल पब्लिक स्कूल, पवनी. शाळेची स्थापना पारतंत्र्यकाळात 1916 ला करण्यात आली, त्यावेळी शाळेचे नाव कन्या शाळा असे होते. कालांतराने शाळेचे नाव बदलवून जि.प.प्राथमिक शाळा, पवनी असे करुन मुलांनाही प्रवेश देण्यात आले. कमी पटसंख्येमुळे ही शाळा बंद होणार म्हणून कुणी शिक्षकही या शाळेत यायला तयार नव्हते. पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेतून काढायला सुरुवात केली. आदरणीय गटशिक्षणाधिकारी, शिक्षक यांनी असा निर्णय घेतला की, पवनी शहरातील एकमेव ही जिल्हा परिषदेची शाळा बंद पडू द्यायची नाही. त्यासाठी किमान 21 पर्यंत पटसंख्या वाढविणे गरजेचे होते. विद्यार्थी मिळविण्यासाठी शिक्षकांनी अभूतपूर्व निर्णय घेतला. 13 जुन पासून उन्हाळी शिबिर सुरु करण्यात आले. शिबिरात हळुहळु मुले यायला लागली. शेजारपाजारची 25 ते 30 मुले दररोज सकाळी आठ ते दहा वाजेपर्यंत शिबिरात सहभागी होऊन, विविध कृतींमध्ये भाग घेऊ लागली, खेळू लागली एकंदरीत शाळेत मुले आता रमू लागली होती. मनात एकच हुरहूर, उन्हाळी शिबिरात आलेली मुले आज शाळेत येतील की नाही? पण केलेल्या कामाचे चीज झाले, परिपाठ सुरू होईपर्यंत पूर्वप्राथमिक व प्राथमिक चे असे एकूण 25 विद्यार्थी शाळेत हजर होते. या शाळेत शिक्षक रुजू झाले हे पालकांना माहित झाल्यानंतर त्यांनी आपली मुले आमच्या शाळेत दाखल केली. एकट्याने नाही तर एकजुटीने काम केले तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेलाही लाजवेल असे कार्य होऊ शकते. हे दाखवून दिले आहे, भंडारा जिल्ह्यातील जि.प.डिजिटल पब्लिक स्कूल पवनी या शाळेने. जुन 2017 ला पटसंख्या 6, शिक्षक 0 अशी स्थिती असताना आज याच शाळेत 134 पटसंख्या झालेली आहे.




**उन्हाळी शिबिरात सहभागी मुले**

**शाळेत करण्यात आलेले बदल :-** ज्या नावाने पालक शाळेकडे साधे पाहत पण नव्हते, गैरसमजातून का असेना भटकत नव्हते, त्या शाळेचे नाव बदलवून जि.प.डिजिटल पब्लिक स्कूल, पवनी असे करण्यात आले. त्या नंतर सक्षम उपक्रमात शाळेची निवड करण्यात आली आणि २१ व्या शतकातील कौशल्ये आणि तंत्रज्ञान याची अंमलबजावणी शाळेत सुरु झाली मा.गटशिक्षणाधिकारी सुवर्णलता घोडेस्वार व मा.नरेश टिचकुले,विस्तार अधिकारी यांनी पुढाकार घेऊन शाळेला tab घेऊन दिले आणि तसेच तत्कालीन भंडारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री सुहास दिवसे सरांनी जिल्ह्यातील 135 शाळांना आमच्या शाळेचे जि. प. डिजिटल पब्लिक स्कूल असे नाव दिले. या शाळेचा गणवेश निळा पांढरा असा होता, तो बदलून पालकांच्या मदतीने मिल्की व्हाईट शर्ट, टाय,शाळेचा लोगो असलेला बेल्ट, चेक्स असलेली हाल्फ पँट तसेच बुधवार व शनिवार साठी ब्ल्यू लोअर व रेड टीशर्ट असा गणवेश बनविला.




**शाळेच्या बदललेल्या गणवेशात विद्यार्थी**

**शाळेतील विविध उपक्रम:-** पवनी शहरात जिल्हा परिषदेची ही शाळा आहे, हे लोकांना माहिती करून द्यायचे होते, त्यासाठी शाळेला घरापर्यंत नेता येईल असे उपक्रम सुरू केले. शाळेतील प्रत्येक गोष्ट, उपक्रम, विद्यार्थी शाळेत कशी शिकतात हे पालकांना माहित व्हावे यासाठी पालकांचा PARENTS OF ZPDPS PAUNI या नावाचा व्हाटस् अप गृप तयार करण्यात आला, याद्वारे दररोजच्या अपडेट्स जास्तीत जास्त पालकापर्यंत पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. शाळेचा ब्लॉग

(www.zpdpspauni.blogspot.in) तयार केला, ज्यात शाळेविषयीची ईतंभुत माहिती व ऑनलाईन अडमिशन ची सोय करण्यात आली. शाळेत मुले टिकावी व शिकावी यासाठी नवनवीन प्रकल्प, उपक्रम सुरू केले. दिनांक तो पाढा, Bag less Super Saturday, an hour for Society, चालता बोलता, एक दिवस-एक प्रश्न, समस्या आठवड्याची, पालकांची कार्यशाळा, पालकांची रात्र शाळा, संविधान वर्ष, विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे वाढदिवस साजरे करणे, समर कँप इत्यादी. व्हाट्सअप, फेसबुकच्या माध्यमातून त्यांचा प्रचार व प्रसार केला. पालक आपल्या पाल्यांना विविध कृतींमध्ये सहभागी होतांना पाहून खूप खुश झाले, त्यांचा आनंद दर महिन्याला होणाऱ्या पालक सभेत ते बोलून दाखवायचे, हे ऐकून आणखी कार्य करण्याची प्रेरणा मिळायची.




**आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोगकरून अध्यापन व अध्ययन करताना**

**शाळेचे स्नेहसंमेलन:-** शाळा स्थापनेला शंभर वर्षे झाली होती, त्यानिमित्ताने यावर्षी निव्वळ विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर पालकांसाठीही स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. प्रत्येक पालकांनी स्वतः पैसे गोळा केले, कार्यक्रमाचे नियोजन केले, विविध स्पर्धेत भाग घेतला, एवढेच नव्हे तर रंगमंचावर बहारदार नृत्यही पालकांनी व शिक्षकांनी सादर केले. शाळेत होणारे उपक्रम पवनी येथील नागरिक सोशल मिडियावर बघत होते ज्यामुळे शाळेची लोकप्रियता वाढत गेली.




**स्नेहसामेलनात शिक्षक व पालक एकत्रित सादरीकरण करताना**

या शाळेत केलेल्या कार्याची दखल घेत शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीला शिक्षणाच्या वारीत प्रदर्शनाची संधी मिळाली. राज्यस्तरातून आलेल्या मान्यवरांनी सर्व टीम चे अगदी भरभरून कौतूक केले. किशोर मासिकात शाळेतील मुलांचा सहभाग असतो. त्यातील प्रश्नसंच सोडवून घेणारी आजही जिल्ह्यातील एकमेव शाळा आहे.



**शिक्षणाच्या वारीतील सहभाग**

श्री रोकडोबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था तथा श्री साई गणेश मिलिटरी फाउंडेशन रुद्धापाटी ता. अहमदपूर जि. लातुर यांच्या संयुक्त विद्यमाने 22 डिसेंबर 2019 रोजी राज्यस्तरीय गुरुगौरव शिक्षकरत्न पुरस्कार देऊन शाळेच्या मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला. आज घडीला जि.प.डिजिटल पब्लिक स्कूल, पवनी येथे नर्सरी ते इयत्ता चौथी पर्यंतचे वर्ग आहेत, शाळेचा उत्कर्ष हा सर्व टिमची सेवाभावीवृत्ती, सर्व विद्यार्थ्यांचा शाळेवरील विश्वास, तसेच पालकांचे सहकार्य यांच्यामुळे झालेला आहे. यापुढेही शाळेचा उत्कर्ष असाच होत राहो हीच आशा.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री.गुलाबराव राठोड** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, भंडारा | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झाडगाव, ता.साकोली, जि.भंडारा.

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री.काशीनाथ जयकुमार राऊत **ई-मल:-** raut.kashinath@gmail.com



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झाडगाव शाळेची सुंदर इमारत**

**शाळा विकास नियोजन:-** शाळेचा काया पालट घडवुन आणण्यासाठी शाळा प्रमुखाचा विकास, विकासाची आवश्यक उदिष्टे गरजेची आहेत. शाळा ही अध्ययनाची संघटीत संस्था आहे. जेथे बालकाचे संगोपन कृती प्रवण राहुन केले जाते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झाडगाव येथिल मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या सहविचार प्रक्रियेतून शालेय कामाचे वार्षिक नियोजन तयार करून, व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात आले. त्यानुसार कामाची जबाबदारी सुध्दा वाटुन देण्यात आली. प्रत्येक शिक्षक व समिती सदस्य हे तत्परतेने आपल्याला सोपवलेले काम पुर्ण करतात. प्रत्येक महिन्याच्या अखेर त्या महिन्यातील कामाची संपन्नता तपासण्यासाठी मासिक पालक सभेचे आयोजन करण्यात आले.

**शाळा परिवर्तनाची प्रक्रिया :-** सक्रीय अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियेला शाळेचे निसर्ग सौंदर्याने नटलेले ठिकाण अतिशय कारणीभुत ठरून विद्यार्थी विकासाची गुरूकिल्ली बनले आहेत. त्यातच चिमुकल्या झाडगाव येथील शाळा झाडगावच्या परिवर्तनाचा पाया ठरली आहे. जि.प.प्राथमिक शाळा झाडगावचे ईवलेसे रोपटे हे विशालकाय वृक्ष होत आहे. त्यात प्रामुख्याने शालेय नेतृत्व तसेच संघात्मक नेतृत्व ह्या बाबी शाळा विकासात महत्वाच्या ठरत आहेत. पाठांतराची पध्दती नाकारून अध्ययन हे आनंददायी आणि कृतिशील बनविले आहे. पालक सहभागाद्वारे विद्यार्थी केद्रीत, कृती केद्रीत सहभागी अध्ययन अनुभव, नाटीका, प्रकल्प, चर्चा, संवाद-परिसंवाद, निरिक्षण, भेटी इ. द्वारे शाळा परिवर्तन करत शाळा प्रशासन यांनी यशस्वी वाटचाल केलेली आहे. शाळेत होणा-या विविध स्पर्धामध्ये पण पालक सहभागी होऊ लागले. शालेय नाविण्यापूर्ण उपक्रमांनी व पालकांच्या योग्य सहभागाने घराला शाळेचे व शाळेला घराचे रूप प्राप्त झाले.



**शाळेच्या परिवर्तनात सहभागी होऊन माता पालक श्रमदान करताना**

**स्व-विकासासाठीचे प्रयत्न:-** आम्ही झाडगाव जिल्हा परिषद शाळेला मुख्याध्यापक समवेत दोघेच शिक्षक आहोत. त्यात आम्ही असा विचार केला की, प्रगती साधायची असेल तर त्या साठी स्वत:चे ज्ञान वाढविणे गरजेचे आहे. असे ज्ञान वाढवित राहणे म्हणजेच स्व: विकास साधणे होय. त्यासाठी एक संधी चालून आली ती म्हणजे सन २०१८-१९ मध्ये RAA औरंगाबाद तर्फे आमच्या एका शिक्षकाची Tag Co-ordinator पदी नियुक्ती झाली त्यामुळे त्याना औरंगाबाद द्वारे वर्षभरात विविध प्रशिक्षणाला उपस्थित राहता आले. त्यानंतर Tag Group ला मार्गदर्शक म्हणून ते काम करू लागले. ह्यामुळे आम्हा दोघांचाही स्व:विकास होण्यास मदत होवून आम्हास नविन संकल्पना अवगत झाल्या. त्याचा शालेय विद्यार्थी विकासावर सकारात्मक परिणाम जाणवला. स्व:विकासासाठी निष्ठा प्रशिक्षण हे उत्तम साधन ठरले अतिशय प्रभावी व परिणामकारक रितीने चालणारी ही निरंतर प्रक्रीया आहे.



**शाळेतील विद्यार्थी सामाजिक उपक्रमात सहभागी**

**अध्ययन अध्यापन प्रक्रीयेत घडवून आणलेला बदल :-** दोन शिक्षकी शाळा असल्या कारणाने बहूवर्ग अध्यापन पध्दतीचा अंगीकार करणे आम्हाला क्रमप्राप्त ठरले. कमी पटसंख्या असलेल्या झाडगाव शाळेत आम्हाला प्रत्येक विद्यार्थ्याकडे व्यक्तीगत लक्ष देणे सोपे झाले. पालक भेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निर्माण झालेल्या अडचणिंवर सहज मात करता आली. गुरूदेव रविंद्रनाथ टागोर यांच्या शांतीनिकेतन शिक्षण प्रणालीशी सुसंगत अशी शिक्षण प्रक्रिया प्रारंभ करून वर्गाबाहेर शिक्षण सुरू झाले. परिसर भेटीच्या माध्यमातून शालेय अध्ययन अध्यापन प्रक्रियेची सांगड घालण्यात आली. शिक्षण प्रक्रियेत विविध उपक्रमांमुळे विविध संस्कार व शिस्तीची रूजवणुक तर झालीच त्याच बरोबर शालेय अध्ययन अध्यापनातील घटक. शाळा बचत बॅंक, शालेय दैनंदीन परिपाठ, परिसर स्वच्छता इत्यादी उपक्रमांनी शिक्षण सोपे झाले. नियमीत अध्ययन अध्यापनाला तत्रंज्ञानाची साथ मिळाली. संगणकावर मुलांचा सराव सोपा होऊ लागला. विविध शालेय घटकाशी संबधीत व्हिडीओ, खेळ, माहीती देणारे चित्र प्रदर्शन. शाळेत उपलब्ध प्रोजेक्टरच्या माध्यमातुन द्रुकश्राव्य होवू लागले. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासात रममाण होऊ लागले.




**मातीकाम करून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तु**

**विद्यार्थी बदल :-** विद्यार्थ्याच्या पायाभुत भाषा विषयक अडचणी संपूष्टात आल्या. १०० टक्के विद्यार्थी वाचन करू लागले. गणितीय क्रिया करणे सोपे झाले. इंग्रजी वाचन सहज झाले. विविध नाविण्यापूर्ण उपक्रमात सहभागी झाल्यामुळे बोलण्याचा, संवाद साधण्याचा आत्मविश्वास वाढला. विद्यार्थ्यात झालेल्या बदलांमुळे पालक वर्ग आनंदीत झाला. भाषा, गणित, इग्रजी, सामान्य ज्ञान, इत्यादी विषयात क्षमता प्राप्ती झाली. वर्तमान पत्र वाचनालयातील पुस्तकांचे वाचन करण्यात गोडी निर्माण झाली. विद्यार्थ्यामध्ये सकारात्मक बदल घडून आणण्यासाठी शाळेत विविध उपक्रम सुरु केले. ज्यात शाळा प्रवेशोत्सव, माता-पिता पुजन सोहळा,स्वातंत्र्यदिन सोहळा, एक दिवस शाळेचा, एक वार विषयाचा, बचत बॅंक, शालेय वस्तु भांडार, खरी कमाई (शालेय बाजारपेठ), व्यवसायीक मार्गदर्शन, परिसर भेट, माझी लाडकी लेक, विद्यार्थी वाढदिवस, माजी विद्यार्थी

मेळावा, संस्कार शिबिर, शालेय स्नेहसंम्मेलन, बालसभा, सामान्यज्ञान स्पर्धा, राष्ट्रीय सण व जयंत्या, शालेय परसबाग, कच-याची होळी, आरोग्य शिबीर, चावळी वाचन, स्वयंसेवक मार्गदर्शन, स्वच्छ भारत मिशन, बॅगलेस शनिवार, यातील दोन उल्लेखनीय उपक्रम म्हणजे:-



**विविध प्रकारच्या बिया संकलीत करून सिडबॉल बनवताना विद्यार्थी**

**वृक्षरोपण व वृक्षरक्षाबंधन :-** 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या उक्ती प्रमाणे दरवर्षी शाळेत प्रतिविद्यार्थी एक झाड लागवड करून ते झाड दत्तक देवून विद्यार्थ्यांना वृक्षसंगोपनाची जबाबदारी दिली जाते. रक्षाबंधनाच्या कार्यक्रमाचे औचित्य लक्षात घेवून वृक्षरक्षाबंधन कार्यक्रम घेतला जातो. सोबतच रानात सिडबॉल पसरविल्या जातात, त्यासाठी सत्राच्या शेवटी विविध प्रकारच्या बिया संकलीत करून सिडबॉल तयार केले जातात.

**फिरते माता वाचनालय :-** आई ही संपूर्ण कुटुंबाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे आई शिकली असता, संपूर्ण कुटूंब शिक्षित बनते. याधरतीवर आईला वाचनाचे साहीत्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शाळेने शालेय वाचनालयातील साहीत्य आईसाठी उपलब्ध करून देण्यासाठी फिरते माता वाचनालय सूरू केले. त्यात दर पधंवाड्याला साहीत्य पुरविल्या व परत घेतल्या जाते.




**फिरत्या माता वाचनालयाचा लाभ घेताना माता**

शाळेत सर्व नवनवीन पध्दतीचा अंगीकार केल्यामुळे शालेय पटसंख्या वाढू लागली. येथील नाविण्यपूर्ण उपक्रमाचा आपल्या मुलांनाही फायदा मिळावा यासाठी पालकवर्ग आतुर झाला. २० ते २२ पटाची शाळा आता ३० पटसंख्येची झाली. झाडगाव व्यतीरीक्त आसपासच्या गावातून देखील विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतला. त्यामुळे पंचक्रोशीत आकर्षनाचा विषय ठरला आहे. जिल्हा परिषद शाळा, झाडगाव  नव्यानेच विविध कृतीयुक्त बाबींनी नावारूपास आलेली आहे. नानाविध उपक्रम आणि अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील व्हिडीओ आपणाला ह्या पोस्टच्या माध्यमातून पाहायला मिळतील. आवडेल तो व्हिडीओ आपण लिंकला टच करून पाहू शकता.

**शाळा उपक्रम मालीका झाडगाव** https://youtu.be/4pclqFtkSbs

| **मार्गदर्शन** | **समन्वयन** | **प्रेरणा** |
|---|---|---|
| **श्री.गुलाबराव राठोड** | डॉ. ज्योती कुलकर्णी | डॉ. नेहा बेलसरे |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, भंडारा. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळा,वरखेड,ता.चिखली,जि. बुलडाणा.

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री.शरद बंगाळे **ई-मेल :-** twarkhed@maa.ac.in



**भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळा, वरखेड शाळेचा परिसर**

**शैक्षणिक परिवर्तनाच्या वाटा निवडतांना :-** भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जिल्हा परिषद शाळा, वरखेड, ता.चिखली, जि. बुलढाणा या शाळेची दिवसेंदिवस होत चाललेली प्रगती ही एक दिवसात घडून आलेला चमत्कार नाही तर त्यासाठी शाळेतील प्रत्येक घटकाने प्रचंड मेहनत घेतली आहे. तालुक्याच्या ठिकाणापासून १८ किलोमीटर अंतरावर वरखेड येथे ही शाळा आहे. जेथे १ ते ८ वर्ग आहेत. २०१७ पर्यंत गावातील तेवढे विद्यार्थी शाळेत येत व शिक्षण घेत होते. परंतु शाळेने विविध उपक्रम यशस्वीपणे राबवण्यास सुरुवात केली. त्यामुळे या शाळेत आजूबाजूच्या जवळपास पंचवीस गावातून विद्यार्थी येऊ लागले.

**अत्याधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर**: wi-fi सुविधा शाळेत या सत्रात सुरू झाली आहे. व प्रत्येक वर्गात इंटर ऍक्टिव्ह बोर्ड, प्रोजेक्टर सह इटरनेट जोडणी केली आहे. प्रत्येक शिक्षकाकडे लॅपटॉप आहे. शाळेत ३२ कॉम्पुटरचा सुसज्ज संगणक कक्ष आहे. शाळेत झेरॉक्स मशीन आहे. शाळेच्या संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कमरे बसविलेले आहेत. विद्यार्थ्यांसाठी शाळेत शिक्षण घेण्यासाठी एकूण ६२ अँड्रॉइड टॅब उपलब्ध आहे. प्रत्येक वर्गाचे वर्ग शिक्षक हे विद्यार्थी व पालकांच्या व्हॉट्सअँप ग्रुप द्वारे संपर्कात राहून विद्यार्थ्यांना दररोज घरी अभ्यास देतात. तो अभ्यास पूर्ण करून विद्यार्थी शिक्षकांना व्हॉटसअप वर फोटो काढून पाठवतात शिक्षक गरज असल्यास त्यासंदर्भात मार्गदर्शन करतात. ऑनलाईन टेस्ट तयार करून ती विद्यार्थ्यांना सोडवण्यास सांगतात. केंद्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केलेले दीक्षा ऍप, युट्युब, गूगल, बोलों ऍप हे देखील ई-लरनींग साठी उपयोगी ठरत आहे. प्रत्येक वर्गाच्या गृपवर शाळेचे मुख्याध्यापक व व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आहेत. परंतु आता केंद्र प्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी प्राथमिक, यांना देखील प्रत्येक वर्गाच्या व्हॉट्सअँप ग्रूपवर अॅड्करून घेण्यात आले आहे. लॉकडाऊन च्या काळात शिक्षकांची व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे आढावा बैठक दर आठवड्याला घेतली जाते.



**सुसज्ज संगणक कक्ष**

**उपस्थिति ध्वज:-** शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढावी यासाठी उपस्थिति ध्वज नावाचा एक उपक्रम सुरू केला. ज्या वर्गाची उपस्थिति १००%, त्या वर्गाचा ध्वज सर्वात उंच फडकवला जातो. त्यामुळे प्रत्येक वर्गात उपस्थिति वाढण्यासाठी स्पर्धा निर्माण झाली. शाळेत प्रत्येक वर्गासाठी एक उपस्थिति ध्वज असून ज्या वर्गातील उपस्थिती 100% असेल तो ध्वज पुर्णपणे वर राहतो व अनुपस्थिति च्या प्रमाणात ध्वज खाली येतो.आपल्या वर्गाचा ध्वज खाली येऊ नये म्हणून गैरहजर मुलांना घरी जाऊन बोलवून आणायला लागले. यामुळे थोड्याच दिवसांत शाळेची उपस्थिती 100% राहू लागली. शाळेच्या प्रांगणात दर्शनी भागात हे सप्त ध्वज रोज मोठ्या दिमाखाने फडकतात.

**सामान्य ज्ञान:-** विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्यामध्ये प्रत्येक दिवशी पाच ते दहा याप्रमाणे एकूण महिन्यात 100 ते150 असे प्रश्न सूचना फलकावर लिहून दिल्या जातात. विद्यार्थी ते प्रश्न आपल्या वहीत लिहून घेतात. प्रत्येक दिवशी परिपाठाच्या वेळेस विद्यार्थ्यांना दहा ते पंधरा प्रश्न विचारून त्यांनी वाचलेल्या प्रश्नांची उजळणी घेतली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान या विषया अंतर्गत दिलेली माहिती चिरंतन लक्षात राहते. अशा प्रकारे चाचण्या घेणे, प्रश्न उत्तरे लिहून देणे, विडिओ दाखवणे, फोटो दाखवणे, चर्चासत्र घडवून आणणे आणि परिपाठामध्ये प्रश्नांची उजळणी घेणे या प्रकारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत जातात. भौगोलिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, चालू घडामोडी, थोर महापुरूष, समाजसेवक, राज्यकर्ते, संत अशा स्वरुपात सर्व ज्ञान विद्यार्थ्यांना मिळते.



**सामान्य ज्ञान चाचणी देताना विद्यार्थी**

**स्पोकन इंग्लिश:-** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेली इंग्रजी भाषे विषयीची भीती दूर करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी तसेच इंग्रजी भाषेला जागतिक भाषेचा दर्जा असल्या कारणाने इंग्रजीमध्ये विचारांची देवाणघेवाण करता विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून दैनिक परिपाठ इंग्रजी मध्ये सादर करणे. विद्यार्थ्यांनी आपापसात अनौपचारिकरीत्या एकमेकांशी इंग्रजीमध्ये संवाद साधणे. यासारखे उपक्रम शाळेत सुरु केले.

**बचत बॅंक** - म्हणतात ना, 'थेंबे थेंबे तळे साचे' तशी अनुभुती विद्यार्थ्यांच्या अंगी यावी म्हणून आमच्या शाळेने हा उपक्रम मागील अनेक वर्षां पासून सुरु केला आहे. यात प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचे स्वतंत्र पासबुक, अकाऊंट नंबर देण्यात आले आहे. वर्गातील एक विद्यार्थी व्यवस्थापकाचे कामकाज पाहतो त्याच्या मदतीला अजून एक उपव्यवस्थापक नेमला आहे.

**ऑलम्पियाड स्पर्धा परीक्षा:-** 'असाध्य ते साध्य करता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे।।' बालवयापासून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची ओळख करून देऊन त्यांच्यामध्ये सहकार्य, स्पर्धा, या नैसर्गिक गुणांचे उदात्तीकरण करण्यासाठी शाळेत शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय प्रवेश परीक्षा, ऑलम्पियाड स्पर्धा परीक्षा, सराव वर्गांचे आयोजन केले जाते. सन २०१९-२० या शैक्षणिक सत्रात इंग्रजी, गणित, विज्ञान ऑलांपियाड स्पर्धा परीक्षेत शाळेतील २८ विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदक,१५ विद्यार्थ्यांनी रजत पदक तर २० विद्यार्थ्यांनी प्रोत्साहणपर प्रशस्तिपत्र पटकावले आहेत. यामुळे खरोखरच शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवल्या गेला आहे. शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या समन्वयातून शाळेच्या शैक्षणिक विकासाची घोडदौड अविरतपणे सुरू राहून वरखेड शाळा सर्वोत्कृष्ट ठरत आहे.

**शैक्षणिक सहल:-** मुलांना आपण इतिहास भूगोल, सामान्य ज्ञान भाषा यासारखे विषय शिकवतो या सर्व गोष्टींचे मुलांना सखोल व प्रत्यक्ष ज्ञान मिळावे, प्रत्यक्ष अनुभूति मीळावी,यासाठी शाळा दरवर्षी शैक्षणिक सहलीचे आयोजन करते. शाळा दरवर्षी शैक्षणिक सहलीचे आयोजन करते त्यामुळे मुलांना विविध भौगोलिक माहिती मिळते, विविध भाषा, वेगवेगळे धर्म ,त्यांच्या चाली रीती, प्राणिसंग्रहालय , बगीचे, वेगवेगळया प्रकारचे किल्ले, अजिंठा लेण्या, वेरूळलेण्या,
यासर्व ठिकाणची माहिती व सखोल ज्ञान मिळते.

**सायन्स व्हॅली:-** विद्यार्थी दशेत मुलांना विज्ञान विषयाची आवड तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होणे यासाठी विद्यार्थ्यांची "विज्ञान दूत " म्हणून निवड करण्यात येते. नुक्तेच " महाराष्ट्र शासन" यांनी आपल्या शाळेची दखल घेत सुसज्ज अशी 10लक्ष रूपयांची "नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्र" अंतर्गत प्रयोग शाळा दिली आहे.




**शाळेची सुसज्ज प्रयोगशाळा**

**संगीत अकॅडमी**:- संगीत हा मानवी जीवनाचा पाया आहे. विद्यार्थ्यांमध्ये संगीत विषयाची आवड निर्माण करणे. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी मुलांची गटनिहाय विभागणी करण्यात आलेली आहे. आठवड्यातील तीन दिवस दुपारी चार ते पाच या वेळेत मुलांचा सराव घेतल्या जातो. यातूनच मुलांना गायन वादनाच्या परीक्षांसाठी बसवल्या जाते.

**सांस्कृतिक कार्यक्रम:-** विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच सांस्कृतिक व सर्वांगीण विकास व्हावा सोबतच सभाधीटपणा, नेतृत्व, अशा गुणांचा विकास व्हावा व एक आदर्श नागरिक निर्माण होण्याच्या दृष्टिकोनातून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा येण्याच्या दृष्टिकोनातून शाळेमध्ये वक्तृत्व स्पर्धांचे हिंदी इंग्रजी व मराठी अशा विविध भाषांमधून आयोजन केले जाते



**विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी**

**आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम:-** ग्रामीण भागातील मुलांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने शासनाने राज्यातील उपक्रमशील शाळांमधून शाळा निवडून आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ स्थापन केले अशा शाळेमध्ये उपक्रमशील शिक्षक, शाळेप्रति समर्पण असणारे शिक्षक, काम करण्याची जिद्द असणारे शिक्षक, अशा लोकांची निवड करून आंतरराष्ट्रीय शाळा निर्माण केल्या. अशा सर्व शिक्षकांचे मुंबई येथे प्रशिक्षण पुर्ण झाले. शाळेत आतापर्यंत महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ यांनी तयार केलेला अभ्यासक्रम शिकविला जातो जो अभ्यासक्रम कृतीयुक्त व जीवनाशी निगडित असा आहे.

**स्वच्छता दूत**:- पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची स्वच्छतादूत म्हणून निवड करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याला पाच कुटुंब नेमून देण्यात येऊन, दर शनिवारी मुलांनी या कुटुंबाला भेट देऊन शौचालय, स्वच्छता, परिसर स्वच्छता इत्यादी विषयक

माहिती दिली. या विद्यार्थ्यांचे ओळखपत्र तयार करून त्यांना स्वच्छता दूत म्हणून शाळेने पूर्ण गावात पाठवले. याचा परिणाम म्हणून आज गाव हागणदारीमुक्त झाले असून संपूर्ण गाव स्वच्छ व सुंदर झाले आहे.

**व्यायाम शाळा:-** विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहील या दृष्टिकोनातून त्यांना नियमित व्यायाम करण्याची सवय लावण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत 7 लक्ष रुपये किंमतीची सुसज्ज व्यायामशाळा शाळेला मिळाली आहे. सध्या या व्यायाम शाळेचा फायदा शाळेतील विद्यार्थी सोबतच गावातील नागरिक सुद्धा घेत आहेत.

**सेंद्रिय खत प्रकल्प** :- शालेय परिसर स्वच्छता ही दैनंदिन चालणारी प्रक्रिया आहे यामुळे शालेय परिसरातील पाने-फुले कागद कचरा गोळा करून एका खड्ड्यात टाकल्या जातो व त्यापासून सेंद्रिय खत निर्माण केले जाते या खताचा वापर शाळेतील परसबागेसाठी केला जातो.




**शाळेतील कचर्यापासून सेंद्रिय खत निर्मिती**

**हॅण्डवॉश स्टेशन:-**दर दहा विद्यार्थ्यांमागे एक खंडवा स्टेशन निर्माण करण्यात आले असून विद्यार्थी नियमितपणे हात धुण्यासाठी याचा वापर करतात त्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राहते.

**स्वच्छ मुलगा स्वच्छ मुलगी:-** प्रार्थना झाल्यानंतर दररोज स्वच्छ व सुंदर कपडे, शालेय गणवेश, टाय, सॉक्स शुज, परिधान केलेली एक मुलगा व एक मुलगी यांची निवड करण्यात येते त्यांना एक मेडल दिल्या जाते व दिवसभर ती त्याच्या गळयात असते ज्यामुळे ज्यांना हे मेडल मिळाली त्या विद्यार्थ्यांना आनंद होतो व या प्रक्रियेमुळे स्वच्छ व सुंदर राहण्याचा प्रयत्न करतात.

**आकर्षक खेळणी**:- मुलांना शाळेविषयी गोडी निर्माण करण्यासाठी व त्यांचे मनोरंजनासाठी शाळेत लोकसहभागातून जवळपास तीन लक्ष रुपये किमतीची खेळणी बसवण्यात आलेली आहे.

**अँटी फायर स्टेशन:-** शालेय पोषण आहार सुरक्षितेसाठी शाळेत अँटी फायर स्टेशन असून या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**पक्षी पाणवठे**:- मुक्या प्राण्यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये भूतदया निर्माण करण्याच्या उद्देशाने शाळेमध्ये विविध ठिकाणी पक्ष्यांसाठी पाणवठे निर्माण करण्यात आले असून, त्याच्यामध्ये हे पाणी टाकणे व स्वच्छता राखणे याबाबतचे काम विद्यार्थी स्वतःहून करत आहेत. यामुळे शालेय परिसरात पक्षांचा किलबिलाट असतो.

**सूचना व तक्रार पेटी**:- विद्यार्थी व पालकांना त्यांच्या तक्रारी व सूचना मांडण्यासाठी शाळेने सूचना व तक्रार पेटी हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. आठवड्यातून एक दिवस शनिवारी यातील सूचना व तक्रारींची दखल घेतली जाते.

**शाळेला मिळालेले सन्मान:-** विदर्भातील पहिली ISO शाळा, जिल्ह्यातील पहिली आंतरराष्ट्रीय शाळा, साने गुरुजी स्वच्छ शाळा प्रथम पुरस्कार प्राप्त, वेगवेगळया क्रीडा प्रकारात केंद्र तालुका जिल्हा स्तरावर सहभाग नोंदवून अनेक विद्यार्थ्यांना प्राविण्य प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.




**विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी सतत झटणारा शाळेतील शिक्षकवृंद**

वरखेड जिल्हा परीषद आंतरराष्ट्रीय शाळा विविध उपक्रम राबवून आपली गुणवत्ता टिकवून आहे. त्यामुळे या शाळेत आजूबाजूच्या जवळपास पंचवीस गावातून विद्यार्थी येतात. आणि शाळेत गुणवत्ता पूर्ण शिक्षण घेतात.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ.रवी जाधव** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, बुलडाणा. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, वझर, ता.खामगांव, जि.बुलडाणा.

**मुख्याध्यापकाचे नांव:-** श्री.विलास सदाशिवराव वानखेडे **ई-मेल:-** vilaswankhede07@gmail.com




**जि.प. मराठी उच्च प्राथमिक शाळा, वझर, शाळेची इमारत**

शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा दर्जा अधिक उंचवण्यासाठी कृतीयुक्त शिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर, विदयार्थी आरोग्य सुधारणा, भौतिक सुविधा व चार भिंतीबाहेर शिक्षणाची आवश्यकता होती. शाळा विकास नियोजन अंमलबजावणी करण्याकरीता सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती बैठक बोलावून विदयार्थी व शाळा विकासासाठी बांधणी करण्यात आली, विदयार्थ्यांच्या अध्ययन निष्पतीमध्ये वाढ होण्यासाठी शिक्षक व शिक्षणतज्ञ यांच्या सहकार्याने विविध उपक्रमांचा अंगीकार करण्यात आला. त्यामध्ये वाढदिवस, लोकसहभाग, उपस्थिती ध्वज उपक्रम, कृतीयुक्त शिक्षण, शैक्षणिक सहल व क्षेत्रभेट, वॉटर बेल उपक्रम, STUDY AT HOME इत्यादी.

**वाढदिवस उपक्रम व लोकसहभाग:-** शाळेत अभिनव, प्रेरणादायी, स्तुत्य व अनुकरणीय असा वाढदिवस उपक्रम सातत्याने चालू आहे. दप्तराच्या ओझ्याने चिमुकल्यांचा जीव टांगणीला लागला असताना ‘ओझ्याविना शिक्षण’ या उपक्रमासाठी आमच्या शाळेतील एका शिक्षकाने स्वत:च्या वाढदिवसाच्या निमित्त 10 स्वतंत्र कप्पे असणारे प्लायवूडचे कपाट, प्रथमोपचार पेटी शाळेला भेट म्हणून दिली आहे.




**शाळेत वाढदिवस उपक्रम साजरा करतांना**

वाढदिवसानंतर मुन्नाभाऊ राठी यांनी नवागतांच्या स्वागतासाठी 30 दप्तरांचे वाटप जि.प.वझर शाळेत सन 2019-20 या सत्रात केले आहे. NATIONAL DOCTOR'S DAY यानिमित्त डॉ.मंगेश ढोबेकर MS नेत्रतज्ञ यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाचे वातावरण निर्माण व्हावे. 'वैज्ञानिक दृष्टिकोन, तात्त्विक, तर्कशुद्ध विचार, मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजावे. याविचाराने 11500/-रु. खर्चून शाळेसाठी प्रयोगशाळेची निर्मिती करण्यात आली आहे.



**शाळेची विज्ञान प्रयोगशाळा**

वझर शाळेच्या विकासासाठी गावकर्यांनी खारीचा वाटा या उपक्रमाअंतर्गत शाळेसाठी, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक वस्तू टिकास, फावडे, टोपले, हातोडा इ. दिल्या आहेत. व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त भिंतीवरील डिजीटल घडयाळ भेट दिले.एका विद्यार्थीनीच्या वडीलानी शिक्षण उपयोगी म्हणून 'WHITE BOARD' भेट दिले. कै.रामसिंग पवार यांचे स्मृतिप्रित्यर्थ यांचे तर्फे शाळेतील विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देणार्या कलामंचासाठी "स्टील रिलींग" 55 फुट स्वखर्चातून दिली आहे. शाळेतील शा.पो.आ.समितीचे पदाधिकारी यांनी त्यांच्या पुतणीच्यावाढदिवसानिमित्त SINGING MIKE शाळेला सप्रेम भेट दिले आहे. वाढदिवस उपक्रमास उत्तम प्रतिसाद मिळाला त्यातून शाळा समृद्ध होत गेली. जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्रासाठी जि.प.वझर शाळेत 'उपस्थिती ध्वज' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे.प्रत्येक वर्गासाठी एक झेंडा असून ज्या वर्गाची परीपाठाला 100% उपस्थिती राहील त्या वर्गाचा झेंडा उंच ठेवण्यात येतो.

**हसत खेळत आनंददायी कृतियुक्त शिक्षण उपक्रम:-** प्रत्येक विद्यार्थ्यांना हवीहवीशी वाटणारी शाळा. विद्यार्थ्यांना जे आवडेल, जे करावंसं वाटेल, ते म्हणजेचं हसत खेळत, आनंददायी, कृतियुक्त शिक्षण या शाळेत आहे. पण हे करताना विद्यार्थ्यांमध्ये नकळतपणे जबाबदारीची जाणीव कशी निर्माण होईल आणि ती आपली कामं जबाबदारीनं कशी पार पाडतील याचा उत्तम अनुभव शाळेत दिला जातो.




**शाळेचा उपस्थिती ध्वज**

वर्ग पहिलीच्या विद्यार्थ्यांना डावा, उजवा, पुढे मागे हयासारखी पायाभूत संकल्पना अगदी हसतखेळत कृतियुक्त गाण्यातून वर्गशिक्षक सुरेश राऊत यांनी विद्यार्थ्यांना चार भिंतीच्या बाहेर जाऊन दिली आहे. प्रत्येक विद्यार्थी उत्तमोत्तम असावा, यासाठी कृतियुक्त, आनंददायी, सृजनात्मक शिक्षणाबरोबर नवनिर्मितीचे शिक्षण दिले जाते. शिक्षण निरस नसावं, त्याचं ओझं वाटू नये, विद्यार्थ्यांना आवडावं, भविष्यात उपयोगी पडावं, सगळं शिक्षण प्रत्यक्ष कृतीतून, आनंददायी, प्रयोगातून झालं की ते विसरलं जात नाही, म्हणूनच अनुभव व कृतियुक्त शिक्षणाची योग्य सांगड घालून विद्यार्थ्यांना सक्षम बनविले जात आहे.

**सहल व क्षेत्रभेट:-** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ही सहल म्हणजेच आनंदाची, प्रेक्षणीय स्थळे पाहण्याची, अभ्यासाची आगळीवेगळी पर्वणीचं होती. तसेचं याशिवाय शैक्षणिक सहली मुले विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांना चार भिंतीबाहेरील शिक्षणमिळाले आणि त्यामुळे त्यांच्यात शिक्षणाची ओढ निर्माण झाली. शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांच्या निरिक्षण शक्तीला वाव मिळाला.



**दौलताबाद किल्ला सहल**

**वॉटर बेल:-** मुलांचा दिवसातील पाच ते सात तासांचा कालावधी शाळेत जातो. या कालावधीत शरीराला पाण्याची अनेकदा गरज असूनही अभ्यास, खेळ यामुळे अनेक विद्यार्थी पाणीच पित नाही. विद्यार्थ्यांना पाणी पिण्याची आठवण करून देण्यासाठी तीन वेळा ही बेल वाजवली. पाणी पिण्याची आठवण करून देण्यासाठी सौर उर्जेवर चालणारी घंटा 'वॉटर बेल' वाजविण्यात आली. **"विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी होऊ नये खेळ, ISO जि.प.वझरची शाळा वाजविते बेल"**



विविध

समाजभान • विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी वझर येथील शिक्षक बंधूंचे कार्य

स्मार्ट फोन घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन शिकवतात शिक्षक राऊत बंधू

विद्यार्थ्यांना लागली अभ्यासाची गोडी

विद्यार्थी झाले पुस्त अध्यापनाकडे आकर्षित



शिक्षकांनी स्वखर्चातून राबविला आरोग्यदायी 'वॉटर बेल' उपक्रम!

**शाळेतील उपक्रमांची दखल वृत्तपत्रकानी घेतली**

**STUDY AT HOME उपक्रम:-** सध्या संपूर्ण भारतात कोरोना विषाणू मुळे वर्क फ्रॉम होम केले जात आहे. सर्व शाळांना सुट्टया दिल्या आहेत, सर्व विद्यार्थ्यांसाठी STUDY AT HOME अशी परिस्थिती पुढील काही दिवस असणार आहे. म्हणून मग आपल्या पाल्यांचा विद्यार्थ्यांचा अभ्यास अखंड चालू रहावा याकरीता स्वनिर्मित विविध विषयानुसार शैक्षणिक व्हिडीओ तयार करुन सर्व विदयार्थ्यांना मोबाईलच्या माध्यमातून दाखवित आहोत. सर्व शिक्षकांचे व्हाट्स अप ग्रुप आज विदयार्थ्यांना उपयोगी ठरत आहे. स्वनिर्मित इंग्रजी, मराठी, हिंदी कवीता लिंकद्वारे विद्यार्थ्यांना दाखवत आहे. तसेच ग्रुपवरुन विद्यार्थ्यांना कोरोना विषयी काळजी व दक्षता याविषयी सुचना दिल्या जात आहेत.

गोष्टींचा शनिवार या कोरोना काळातील उपक्रमासाठी जि.प.म.उ.प्रा.शा.वझर,कें.गणेशपूर पं.स.खामगाव जि.बुलढाणा वर्ग 2 रा विद्यार्थ्यांना 'छान छान गोष्टींचे पुस्तके वाटप' केली. पालकांनी गोष्टींच्या पुस्तकांचे विद्यार्थ्यांकडून वाचन करुन घेतले. मिस्ड् कॉल दया गोष्ट ऐका यासाठी व्हाटस अप ग्रुपच्या माध्यमातून पालकांना संदेश पाठविले.080-6826-4443 या नंबरवर मिस्ड कॉल दया आणि ऐका.यामुळे विद्यार्थी मोबाईलवर गोष्टी ऐकत आहे. युटयुबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गोष्टी पाठविल्या. 'टिचकी मारा अन् कथा ऐका' चला कथा ऐकूया, संस्कारमूल्ये जपुया याप्रमाणे लिंक विद्यार्थ्यांना उपयोगी ठरल्या. 'गोष्टींचा शनिवार' या सुंदर उपक्रमामुळे शिक्षणाशी जोडले आहेत. शिक्षकांनी वर्ग पहिली व वर्ग दुसरीच्या विदयार्थ्यांसाठी इंग्रजी विषयाची उपक्रम पुस्तिका स्वहस्ते तयार केली.

स्मार्ट फोन अभावी शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत जाऊन त्यांना शिक्षणाचे धडे देण्याचे कार्य कोरोनाची भीती न बाळगता येथील शिक्षक करीत आहे. यावरून आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता दिसून येत आहे. ज्या विद्यार्थ्याजवळ शैक्षणिक साधने नाहीत, अशा विद्यार्थ्यांना स्वखर्चाने शैक्षणिक साधने उपलब्ध करून देत आहे. कोरोनाच्या संसर्गाच्या भितीपोटी पालक आपल्या पाल्याला शाळेत पाठवायला तयार नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, त्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी सरकारकडून विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण द्यावे असे सुचित करण्यात आले आहे. यात अनेकांजवळ स्मार्ट फोन नाही. इंटरनेट सेवेची रेंज नाही. इंटरनेटचे रिचार्ज मारण्यासाठी पैसे नाही. अशा असंख्य अडचणींना विद्यार्थ्यांनी शिक्षण तरी कसे द्यावे असा प्रश्न शिक्षकांसमोर निर्माण झाला. आपल्या शाळेतील अशा समस्याग्रस्त विद्यार्थ्यांना आमचे शिक्षक ऑफलाइन पद्धतीने शिक्षण देत आहे. पाच ते सात विद्यार्थ्यांचे गट तयार करुन समाज मंदिर, मंदिर याठिकाणी मार्गदर्शन केले जात आहे. ज्या विद्यार्थ्याजवळ स्मार्ट मोबाइल नाही किंवा मोबाइल असूनही विविध कारणांमुळे ऑनलाइन शिक्षण पाहू शकत नाही. अशा विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना वैयक्तिकरीत्या मार्गदर्शनाबरोबर स्वतःच्या स्मार्ट मोबाइलवर शैक्षणिक व्हिडीओ दाखवत आहे. पहिल्या व दुसऱ्या वर्गातील गरीब व गरजू २० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य स्वखर्चातून दिले आहे. गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्षा, शिक्षणतज्ञ या कार्याचे कौतुक केले आहे.

**उपक्रमाची यशस्वीता:-** डोंगराळ, दुर्गम भागातील विदयार्थी उपस्थिती 100% झाली व 100% गुणवत्ता 'उपस्थिती ध्वज' उपक्रमातून शक्य झाली. आमचे विदयार्थी जिल्हास्तरावर कबड्डी स्पर्धेत चमकले, निबंध स्पर्धेत झळकले, विज्ञान प्रदर्शनामध्ये प्रयोग करतांना आढळले. ओझ्याविना दप्तर, White board, Singing Mike, विज्ञान प्रयोगशाळा, प्रथमोचार पेटी, क्रिडारत्न, कलारत्न, विदयार्थी विकास व शाळाविकास लोकसहभागातून पूर्ण झाले. तंत्रस्नेही अध्यापनातून शैक्षणिक गुणवत्ता वाढली. वॉटर बेल उपक्रमामूळे विदयार्थी आरोग्य सुधारणा झाली. शालेय गुणवत्ता वाढ होण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, बुलडाणा मार्फत राबविलेले प्रशिक्षण, निष्ठा प्रशिक्षण या प्रशिक्षणाचा फायदा झाला. शाळा विकासात शिक्षक पालक संघ, माता पालक संघ व सर्व पालकांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले त्यामुळेच शाळेच्या यशस्वीतेची पताका उंच उंच फडकत आहे.

**पाठशाळा असावी सुंदर | जेथे मुली मुले होती साक्षर |**
**काम करावयासि तत्पर | शिकती जेथे प्रत्यक्ष || ५९ ||**

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. रवी जाधव** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, बुलडाणा. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, पालडोह, ता.जिवती, जि.चंद्रपूर.

**ई-मेल :-** zpschoolpaldoh1991@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नांव** : श्री.राजेंद्र उदेभान परतेकी **ई-मेल :-** rajendraparteki1983@gmail.com



**जि.प.उच्च प्राथमिक शाळा,पालडोह,शाळेची इमारत**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,पालडोह, ता.जिवती म्हणजे तेलंगाणा-महाराष्ट्र सिमेला लागुन असलेला भाग, जो आदिवासी अतिदुर्गम नक्षलग्रस्त भाग, जो डोंगराळ रस्ते जे नीट नाहीत, वाहनांचा दुर दुर पर्यंत संबंधच नाही, असा हा भाग. त्यातीलच आमची शाळा म्हणजे, डोंगर उतारावर वसलेली शाळा, ज्या ठिकाणी नीट उभे सुध्दा राहता येत नव्हते. गावाची लोकसंख्या जेमतेम 385 व शाळेचा पट 22 अशी आमची प्राथमिक पालडोह शाळा, शाळा द्विशिक्षकी, दोन वर्ग खोल्या मुले मात्र कमी असल्याने शिकविण्यात मन लागत नव्हते. वरून शाळा होती ती डोंगराच्या अगदी कडयाला लागुन त्या शाळेच्या मैदानावरून घसरून कधी पडेल याची काहीच शाष्वती नव्हती. तरीदेखील मुलांना आनंददायी शिक्षण देण्याची सुरूवात केली. जे हुशार विदयार्थी होते ते इयत्ता 5 वी च्या शिक्षणाकरीता 3 किलोमीटर अंतरावर असलेल्या टेकामांडवा येथे शिक्षण घेण्यासाठी डोगर चढत पायदळ डोंगराळ पाऊलवाटेने रोज ये-जा करत होती. तेव्हा ही मुले कधी रस्त्यात खेळत असायची आणि ओळखीचा परिसर व शाळेला जाण्याचा कंटाळा यामुळे ह्याच भागात खेळत बसायची. या सर्व गोष्टींचा विचार करून आम्ही आमच्या शाळेला आमच्या केंद्रातील इतर शाळेंच्या बरोबरीने नेण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू झाले. मुलांना खेळण्यासाठी मैदान नव्हते तर 2010 पासुन तो पहाड खोदण्यास सुरूवात केली. दररोज सायंकाळी 4 ते 5 या वेळेत आम्ही तो पहाड खोदायला सुरूवात केली. कधी दुपार नंतर असे करून आम्ही 6 वर्षे पहाड खोदुन मैदान तयार केले. त्यात मुलांचा खुप मोठा वाटा होता कारण फारसे यात पालकांचे योगदान मिळत नव्हते. तर आम्ही खोदायचो नि मुले उतारावर ती माती टाकायची असे करून आम्ही सुरूवातीला मुलांच्या माध्यमातुन शाळेत बदल घडविण्याचा प्रयत्न सुरू केला.




**डोंगर खोदून तयार केलेले शाळेचे मैदान**

**शाळेची अभिनव संकल्पना:-** ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण कसे मिळतील, याकरीता 365 दिवसाचा मुद्दा अंमलात आणला तेथुनच 365 दिवस चालणा-या शाळेच्या प्रवासाला सुरूवात झाली. मुले सर्व 365 दिवस आनंदाने शाळेत येवू लागली. शाळेत फक्त शैक्षणिकच कार्य होत नव्हते तर त्यात विविध अंगांचा समावेश करण्यात आला. आता जबाबदारीही मोठी झाली होती. 365 दिवस चालणारी शाळा, म्हटल्याने काय विशेष चालते? हे पाहण्यासाठी शिक्षक, पालक, अधिकारी यांच्यात उत्साह निर्माण झाला होता. परत समोर मोठी आव्हाने येत होती. कारण विदयार्थांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे यासाठी 365 दिवस चालणा-या शाळेचा प्रवास सुरू केला होता. पण पालकांच्या आशा वाढत असल्याने फक्त शिक्षणच नाही तर विदयार्थांना कला,सांस्कृतिक,मैदानी या माध्यमांतुन विदयार्थाचा सर्वांगिण विकास साधण्यास सोपे झाले होते. आता वर्गही वाढतच होते. सोबतच मुलांचे प्रवेश सुध्दा वाढायला लागले होते. पालकांचा ओढा शाळेकढे वाढत होता. त्यासाठी कारणीभुत या शाळेतील काही वैशिष्टयपुर्ण उपक्रमही त्यात ही शाळा 365 दिवस चालणारी शाळा, हा होय. सोबतच या शाळेचा प्रवास पहाटे 4.30 वाजेपासुन रात्री 8.00 पर्यंत चालतो. विशेष म्हणजे यात पहाटे मैदानी खेळाची तयारी करण्यासाठी तीन गावातील विदयार्थी एका ठरलेल्या ठीकाणी एकत्र यायचे. मग सर्व विद्यार्थ्यांना 6 किलोमीटर धावणे, 100 मीटर, 200 मीटर सराव, योगा, थाळी फेक, गोळा फेक, खो-खो अशा वैयक्तिक आणि सांघिक खेळाचा सराव घेतला जात असे. त्यानंतर 9.00 वाजता शाळा भरवली जात असे. सकाळी 9.00 ते 10.00 एक तास पुरक मार्गदर्षन हे उपक्रम राबवित आहे. यात विदयार्थीच विदयार्थांना शिकवितात. हा उपक्रम मागील 9 वर्षापासुन शाळा राबवित आहे. यात गट तयार करून दिले आहेत. त्या गटामध्ये मराठी, इंग्रजी, गणित या विषयांचा समावेश होतो. विदयार्थी आपल्या गटात बसुन शिकतात. त्यानंतर जे विदयार्थी मित्र आहेत ते आठवडयातुन दोनदा शिकविलेल्या भागावर चाचणी घेतात. त्यात जे विदयार्थी विशेष प्रगती करतात ते पुढील गटात जावुन बसतात. यानंतर विदयार्थाचा 11.00 पर्यंत परिपाठ चालतो. हा परिपाठ जवळपास 1 तास चालतो. ज्यात 21 घटक घेतले जातात. विशेष म्हणजे हा परिपाठ तिन्ही भाषेमधुन घेतला जातो. शाळेतील दैनंदिन अभ्यास आणि शालेय विषय आटोपल्यानंतर सायंकाळी 4.30 ते 5.30 पर्यंत विदयार्थांना पुरक मार्गदर्शन असते आणि हे पुरक मार्गदर्शन विदयार्थी मित्र घेत असतात. या नाविन्यपुर्ण उपक्रमाची दाखल हिंदी सोशल मिडीयाने देखील घेतली.




**सोशल मिडीयाने घेतलेली शाळेची दखल**

**लोकसहभाग:-** आम्ही गेल्या 8 वर्षापासुन सातत्याने गावातील,शालेय व्यवस्थापन समिती, माता-पालक, शिक्षक,पालक यांच्या माध्यमातुन वार्षिक नियोजन आराखडा तयार करून तो कसा पुर्ण करता येईल. यासाठी आम्ही लोकसहभाग, लोकवर्गणी या मांध्यमातुन ठोस अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. सन 2019-20 मध्ये शाळेचा पट हा 183 वर जाऊन पोहोचला होतो. शाळेला वर्ग खोल्या सुध्दा मिळाल्या पण या बांधण्यासाठी शाळेला अपुरी जागा होती. शाळा कुठे बांधावी हा प्रश्न शाळेसमोर उभा राहीला होता. सर्वप्रथम आम्ही शालेय व्यवस्थापन समिती समोर हा प्रश्न मांडला त्यांनी या विषयावर चर्चा केली. शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व पदाधिका-यानी, सदस्यांनी गावातील लोकांसमोर हा प्रश्न मांडला, त्यावर गंभीरपर्ण चर्चा करण्यात आली. तेव्हा शेत मालक श्री.विठ्ठल माने यांनी आपली जमीन शाळेला देण्यासाठी होकार दिला. परंतु परिस्थिती हलाकिची असल्याने त्यांनी चिंता दर्शवली. यावर गावक-यांनी आपल्या परीने का होईना शाळेच्या जागेसाठी आम्ही जवळपास तुम्हाला 2 लक्ष रूपये देवू असे सांगितले. प्रती घरातून रूपये 2000 देण्याची कबुल करण्यात आले. ज्या लोकांकडे पैसे नव्हते त्यांनी आपापल्या घरचा कापुस मोजुन दिला. जवळपास 1 लक्ष 60 हजार रूपये मिळाले होते. आता उर्वरीत रकमेसाठी गावकर्यांनी चक्क हनुमानजी च्या दानपेटीतील 40 हजार रूपये शाळेच्या जमीनीसाठी दिले.



**शाळेच्या विकासासाठी गावकर्यांनी दिलेला सहभाग**

**शालेय विकास :-** शाळा स्वच्छ करणे, मुलांना खेळात सहभागी करून घेणे. शालेय स्पर्धेत त्यांना सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. बीटावरून त्यांना प्रथम द्वितिय असे पुरस्कार खेळात मिळण्यास सुरूवात झाली. मागील सत्र 2019-20 मध्ये आम्ही 6 शिक्षक 4 खोल्या नी 183 विदयार्थी होतो. शाळेत एक चांगले युनिट तयार झाले होते. सर्वांनी आपापल्या परीने शाळेस वेळ देण्यास सुरूवात केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पांरपरीक अध्यापन पध्दतीच्या पलीकडे जाऊन नवनवीन तंत्रज्ञानावर आधारीत अध्यापन पध्दतींची वापर सुरु केला. ज्यात मोबाईल, स्क्रीन मिररींग, चा वापर इत्यादी गोष्टीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली. शाळेतील प्रत्येक वर्गात स्मार्ट टि.व्ही. आहे. सोबतच आम्हाला जिल्हा परिषदेकडुन प्रोजेक्टर आणि संगणक मिळाले आहे. याचा फायदा विद्यार्थ्यांना सर्व विषय सखोलपणे अभ्यासायला मिळतात. विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास व्हावा याकरीता जिल्हा परिषद कडुन मोठया प्रमाणावर शैक्षणिक साहित्य उपलब्ध होत आहेत. तसेच ते साहित्य कशी हाताळावी याकरीता डाएट कडुन प्रशिक्षण दिली जात आहेत. यामुळे शाळेत सकारात्मक बदल दिसुन येत आहे. मुले स्वतः त्या शैक्षणिक सांधनांचा वापर करू लागले आहेत.



**शाळेला प्राप्त झालेली शैक्षणिक साधने**

**शाळेची याशोगाथा:-** सकाळच्या व्यायामापासुन सांयकाळच्या विविध उपक्रमासहीत सरावामुळे आज शाळा सलग 5 वर्षापासुन बीट स्तरावर जनरल चॅम्पीयन ठरली आहे. आणि तालुक्यावर सलग 3 वेळा जनरल चॅम्पियन बनली आहे. शाळेतील 4 विदयार्थानी मागील वर्षी लांबउडी, उंचीउडी आणि गोळा फेक मध्ये राज्य स्तरावर उंच झेप घेतली.

या कोविड-19 च्या काळात शाळेतील झालेल्या कार्याबद्दल विविध सन्मानही मिळाले, यात डॉ. गिरीधर काळे सामाजिक प्रतिष्टान तर्फे दिला जाणारा 'सेवार्थ सन्मान' मिळाला, रोटरी क्लब, चंद्रपूर कडून 'नेशन बिल्डर अवार्ड' देऊन सन्मान झाला. तसेच संविधान जागरण मंच चंद्रपूर यांचेकडून 'आदर्श शिक्षक' म्हणुन सन्मानचिन्ह देऊन शाळेच्या मुख्याध्यापकाना गौरवण्यात आले. सोबतच सर फाऊंडेशन तर्फेही 'आदर्श शिक्षक' पुरस्कार मिळाला.



**शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये पटकाविलेली बक्षिसे**

आपण जेव्हा एखादया सेवेसाठी तत्पर होतो, ती सेवा करण्यासाठी सुरूवात करतो, उदात्त विचाराने आपण ज्यावेळी प्रेरीत होतो, तेव्हा त्या रस्त्याची सुरूवात खडतरच होते. त्यांत अनेक कष्ट सहन करावे लागतात. त्यात अनेक अडचणी येतात, समस्या येतात, लोकांच्या नकारात्मक मानसिकतेचा सामना करावा लागता, परंतु नंतर मात्र हेच सर्व चित्र पालटलेल दिसते. लोकांची मानसिकता बदलते. समस्या, संधीत बदलतात. लोक जुळतात, एक हाताला अनेक हात लागतात. त्याचे रुपांतर आपल्या यशात निर्माण होते. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ,पालडोह,पं.स.जिवती,जि.चंद्रपूर या शाळेचे उपक्रम पाहण्यासाठी खालील लिंक पहा:- https://youtu.be/9MTBuI_qOFg चंद्रपुर पालडोह 24taas.com https://youtu.be/X8UWeh8ZqZs

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. प्रल्हाद खुणे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, चंद्रपूर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## सावित्रीबाई फुले सेमी इंग्रजी शाळा,महानगर पालिका,चंद्रपूर.

**ई-मेल:-** saviphulepschoolcmc@gmail.com

**मुख्याध्यापक:-** श्री.नागेश दादाजी नीत **ई-मेल:-** n10neet@gmail.com





**सावित्रीबाई फुले सेमी इंग्रजी शाळा,म.न.पा.चंद्रपूर शाळेची इमारत**

**गुणवत्तेची उंच भरारी:-** सामान्य कुटुंबातील विध्यार्थ्यांना कॉन्व्हेंटच्या धरतीवर शिक्षण मिळावे. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे. यासाठी बदलाची सुरुवात करण्यात आली. शिक्षकांनी पालकांना भेटणे, त्यांना शिक्षणाचे महत्व समाजावून सांगणे, त्यांचे शिक्षणाचे हक्क समाजवून सांगायचे, त्यांची मने वळविण्याचे कार्य जोमाने सूरू ठेवले. महानगरपालिका प्रशासनाकडून शाळेच्या रंगरंगोटी, डेक्स-बेंचची व्यवस्था करण्यात आली. विद्यार्थी पटसंख्या वाढविण्या करिता विभिन्न उपायोजना तयार करून प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकरिता राबविण्यात आल्या. पालकांचा कल हा इंग्रजी माध्यम शाळांकडे असल्याचे पाहून शाळेच्यावतीने सेमी इंग्रजीचे वर्ग KG-1, KG-2 काढून इंग्रजी माध्यमाच्या कॉन्व्हेंटच्या धरतीवर विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यास सुरूवात केली.

सावित्रीबाई फुले शाळा महानगरपालिका चंद्रपूर या शाळेत सन 2014 साली केवळ 74 विद्यार्थी शिक्षण घेत होते. व केवळ 3 शिक्षक अध्यापनाकरित होते. मात्र आज घडीला या शाळेत 829 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एकुण 15 शिक्षक कार्यरत आहेत. 2016 पासुन दरवर्षी शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांची पटसंख्या पूर्ण झाली असल्या कारणाने “प्रवेश बंद” करावा लागतो.

**शालेय गुणवत्तेच्या विकासात पालकांचा सहभाग:-** शाळेचा विकासासाठी पालकांना विश्वासात घेणे आवश्यक होते. त्यासाठी शाळेचा शैक्षणिक, वार्षिक आराखडा पालकांच्या समोर सादर करणे सुरु केले. वारंवार पालक सभा, पालक संपर्क आणि पालक भेटी यावर जोर देण्यात आला. त्यामुळे पालकांमध्ये शाळेविषयी आपूलकी निर्माण झाली. विद्यार्थी व पालकांना शाळेकडे आकर्षित करण्याकरिता शाळेचा परिसर, शाळा आकर्षक करण्यात आली. अभ्यासासोबतच

विद्यार्थांच्या कलागुणांचा विकास होण्यासाठी मनोरंजनात्मक खेळ, मैदानी खेळ, नृत्य, नाट्य, गायन, ड्रील संचालन यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून त्यांच्या कलागुणांना चालना देण्यात आली. सर्वांना समान संधी देण्यासाठी खेळ सांस्कृतिक कार्यक्रम यात सर्वांचा सहभाग घेण्यात आला. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व आपुलकी वाढीस लागली. दैनंदिन व्यवहार, गृहउद्योग, बांबुकाम, सुतार काम, आदी माहिती देण्याकरिता विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट, व्यवसाय भेट यासारख्या उपक्रमांचे नियोजन करून प्रत्यक्ष भेटी, निरीक्षण करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यास मदत झाली.





**पालक सभेस मोठ्या संख्येने पालकांची हजेरी**

**पालक सहभाग :-** पालक सहभागामुळे शाळेच्या भौतिक तसेच गुणवत्ता वाढीसाठी फायदा होत असतो. आज शाळेत लोक सहभागातून प्रत्येक वर्गाला ॲन्ड्राईड टिव्ही संच लागले आहे. पाच ई- लर्नींग लागले आहे. त्यासाठी वारंवार पालक सभा, हळदीकुंकु कार्यक्रम यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन करून शाळा विकासात त्यांचा सहभाग वाढविला आहे. शाळेत राबवायचे प्रयोग, योजना, उपक्रम आणि करावयाचे आवश्यक बदल यासाठी पालकांचा सहभाग आवश्यक असतो. त्यासाठी शाळेत माता-पालक संघ, शिक्षक-पालक संघ, व्यवस्थापन समिती, शालेय पोषण आहार समिती, सुरक्षा समिती, परिवहन समिती अशा समित्यांच्या माध्यमातून शाळेचा विकास नेहमीच होत असतो. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाकडून विद्यार्थ्यासाठी भौतिक सुविधा, मुलां-मुलीकरिता स्वतंत्र मुत्रीघर, शौचालय, शाळेच्या बोलक्या भिंती, पाण्यासाठी ट्यूबवेल, आरो-मशीन, संगणक कक्ष यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक उपक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला. हा शैक्षणिक आराखडा शिक्षकांनी पालकापर्यंत पोहोचवून, पालकसभा घेऊन सादर केला. शाळेत सुरुवातीला 1 ते 4 वर्ग होते शाळेतील विद्यार्थीची शैक्षणिक गुणवत्ता पाहुन पालकांच्या आग्रहास्तव आज शाळा नर्सरी ते 10 वी पर्यंत वाढविण्यात आली. नर्सरी ते KG-II चे शिक्षण मोफत देण्यात येते.



शाळेला नाविण्यपूर्ण विज्ञान केंद्र असून विद्यार्थी नवनवीन प्रयोगाचे प्रात्याक्षिक करून दाखवितात.



मुलांचे ज्ञानविश्व समृद्ध करणारी शाळा

प्रयोगशील शाळा

1984

275 235

शाळेच्या प्रगतीची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

**शाळेमध्ये राबविले जाणारे विविध उपक्रम:-** शाळेच्या विकासात शालेय उपक्रमांचा सिंहाचा वाट असतो. हे लक्षात घेऊन शाळेत नवनवीन उपक्रम राबविण्यात येतात. ज्यात नवागतांचे स्वागत, आदर्श परिपाठ, दिनांकानुसार पाढा, कथाकथन, एक विषय देऊन त्यावर आपले मत व्यक्त करणे, सामान्य ज्ञानावर आधारीत प्रश्न, विविध स्पर्धा, स्नेहसंमेलन, शिक्षक पालक मेळावा, स्वच्छ शाळा सुंदर शाळा, क्षेत्रभेटी, मकर संक्रात निमित्य हळदीकुंकू, महिला मेळावा, बालसभा, बाल आनंद मेळावा, विज्ञान मेळावा, मीना राजू मंच, स्काऊट गाईड, मुल्यधिष्ठीत शिक्षण, शिष्यवृत्ती व नवोदय परिक्षा, NMMS परिक्षा, नवरत्न स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, बाल संस्कार शिबीर, इत्यादी सारखे विविध उपक्रम शाळेत राबविले जातात .14 फेब्रुवारी मातृ-पितृपूजन या उपक्रमाद्वारे मुलगा आपल्या आई-वडिलांशी कसा जवळीक साधतो त्यांच्याविषयी त्यांच्या मनात काय भावना निर्माण होतात. आईवडिलांची पुजा करून त्यांना प्रणाम करून एक नवचैतन्य निर्माण होतो मुल संस्कारी बनलीत. मातीपासुन गणपती, बैल, मातीची भांडी, दिवे तयार करणे हा एक नाविण्यपूर्ण उपक्रम आहे. जेणेकरून विद्यार्थी माती घेऊन मातीपासुन अशा विविध वस्तू तयार करतात. या सर्व उपक्रमांचा फायदा विद्यार्थ्यांना भविष्यात उपयोगी ठरू शकतो.



शालेय उपक्रमात सहभागी विद्यार्थी व पालक

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर :-** दिक्षा अॅप द्वारे सर्व विषयांच्या संकल्पना स्पष्ट करून त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या प्रवाहात आणले. विषयपुरक व्हिडीओ, माहिती, युट्युबच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य शाळेमार्फत केले जाते. प्रत्येक वर्गाचे whats up ग्रुप तयार केलेले आहेत. त्याग्रुपवर विविध शैक्षिणिक लिंक्स,व्हीडीओ,याद्वारे माहिती देण्यात येते. इलर्निगद्वारे अध्ययन अध्यापन करण्यात येते.त्यासाठी शाळेच्या वर्ग खोल्या डिजिटल करण्यात आल्या आहेत. कोरोनाच्या काळात सुद्धा शिक्षण बंद न पाडता ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्याच्या घरीजाऊन शिक्षण त्यांच्यापर्यंत पोहचवले जात आहे. विविध ऑनलाईन स्पर्धे मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होऊन शाळेचे नावलौकिक करीत आहे.



**विद्यार्थी डिजिटल शिक्षणाचा लाभ घेताना**

**शालेय गुणवत्तेत वाढ होण्यासाठी काही प्रशिक्षणे लाभदायक ठरली**:- ज्ञानरचनावादाच्या 25 निकषाद्वारे शिक्षण विद्यार्थ्यांना दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा विकास घडून येते आहे. विद्यार्थ्यांमधील कल्पकतेला चालना मिळाली. ई बालसंस्कार हे सुद्धा प्रशिक्षण विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी लाभदायक ठरले. विद्यार्थ्यांमध्ये संस्कार कसे रूजवायचे या संस्कारातून त्यांच्या गुणवत्तेत कसा बदल होतो हे या प्रशिक्षणाद्वारे समजून आले. अध्ययन स्तर या प्रशिक्षणातून विदयार्थी कोणत्या स्तरावर आहे याचे ज्ञान होऊन त्यांच्यावर उपचार करता आले. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये किमान क्षमता प्राप्त झाल्या. मुल्यवर्धन प्रशिक्षणाच्या आधारे शिक्षकांनी विद्यार्थ्या मध्ये विविध मुल्ये रुजवुन त्यांच्यात बदल घडवुन आणला. वर्ग नियम, शांततेचा संदेश, अडथळा खेळ, सहयोगी पद्धत, जोडी चर्चा या प्रशिक्षणातून गुणवत्तेत वाढ झाली. निष्ठा प्रशिक्षणातुन एका विषयाची इतर विषयांशी सांगड कशी घालावी याचे प्रशिक्षण मिळाले. गणित प्रशिक्षण अध्ययन् निष्पत्तीवर आधारीत संबोध स्पष्ट, भाषा प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्याना भाषा कशी अवगत करायची हे समजले.

**जिल्हा विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तरावर यशस्वी उपक्रम, क्रीडाप्रकार, कलाप्रकार स्पर्धा यात 2 वर्षात मिळालेले नैपुण्य:-** महानगरपालिका स्तरावर विविध खेळात शाळेतील विद्यार्थ्यांनी खो-खो, कबड्डी, रिले रेस तसेच सांस्कृतिक स्पर्धेत सतत दोन वर्ष नैपुण्य प्राप्त केले आहे. तसेच महानगरपालिका स्तरावर 2 वर्षापासून नवरत्न स्पर्धेत नैपुण्य प्राप्त केले आहेत.

नागपूर विभागातर्फे टाकाऊ वस्तुपासुन कशाप्रकारे कलाकृती साकारता येते त्यात सावित्रीबाई फुले शाळेच्या विद्यार्थ्यांनी कलामंच स्पर्धेत भाग घेऊन प्रथम क्रमांक पटकविला आहे. इंन्सपायर अवार्डसाठी इयत्ता 10 वीची विद्यार्थीनी धनश्री सचिन बांगडे हिची निवड झालेली आहे. क्रीडानैपुण्य प्राप्त, स्वच्छता अभियान मध्ये सतत दोन वर्ष प्रथम क्रमांक. ग्रामगीता स्पर्धेत 5 ते 10 वर्गाचे विद्यार्थी सहभाग BYJU'S स्पर्धेत प्रत्येक 5 ते 10 वी तील विद्यार्थ्यांचा प्रथम क्रमांक.



**मा.शिक्षणआयुक्त विशाल सोळंकी यांच्या हस्ते आळंदी, पुणे येथे सावित्रीबाई फुले सेमी इंग्रजी शाळेला 'आदर्श शाळा' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**

शाळेच्या विविध उपक्रम पाहण्यासाठी पुढील लिंकला भेट द्यावी. https://youtu.be/BAQcreSppNk

https://youtu.be/YHsDkONgOi0 https://youtu.be/yM8Mt9ypC-g

https://youtu.be/SBnHOkgfctc https://youtu.be/Jws17RsFeto

**"शाळेला मनामध्ये एक वेगळच स्थान आहे. कितीही दुर गेलो तरी शाळा आमची शान आहे."**

शाळेने तयार केलेले ब्रीद वाक्य. एकच ध्यास **" उत्तुंग गुणवंत भरारीचा "** या ब्रीद वाक्याप्रमाणे शाळेचा प्रत्येक विद्यार्थी उत्तुंग भरारी घेत असतो. शाळा यशाची परंपरा टिकवून ठेवण्यासाठी सतत धडपड करीत असते. लोकसहभागातून शाळा समृध्द होत आहे. गुणवंत विद्यार्थी घडत आहेत. या यशोगाथेत उल्लेख केलेल्या सर्व बाबीप्रमाणे शाळेची प्रगतीकडे वाटचाल होत आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. प्रल्हाद खुणे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, चंद्रपूर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खलाणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

**मुख्याध्यापक -** श्री. चंद्रकांत पुंडलिक डिगराळे **Email-** cpdigrale2205@gmail.com



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खलाणे शाळेची इमारत**

आज उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य शाळा म्हणून नावारुपास आलेली जिल्हा परिषद मराठी शाळा खलाणे, या शाळेची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात झालेली आहे. 2017 मध्ये फेब्रुवारी महिन्या पासूनच जेव्हा दाखल पात्र विद्यार्थ्यांचा शोध घेत गावामध्ये आम्ही फिरलो, पालकांशी संवाद साधला, पॉम्प्लेट छापून घरोघरी वाटले, भलेमोठे बॅनर बनवून त्यावर आमच्या शाळेची वैशिष्ट्ये व आमच्या शाळेची गुणवत्ता याविषयीची हमी देण्यात आली. असे मोठे बॅनर गावाच्या दर्शनी भागांना प्रदर्शित करण्यात आले. जेणेकरून बाहेरगावी शिकायला जाणार्या पालकांचा ओढा मराठी शाळेकडे वाढेल व गावातील प्रत्येक मुल हे आपल्या गावातील शाळेत शिकेल हा त्यामागचा उद्देश. 2017 पासून इयत्ता पहिलीचा वर्ग 15 मार्च रोजी सुरु करण्याचे ठरविले. त्यात पालकांना आम्ही हमी दिली की जर 15 मार्च ते 1 मे दरम्यान आपल्या मुलाला आमच्या शाळेमध्ये करमले, त्याची गुणवत्ता वाढली, तरच आमच्या शाळेत पाठवा. अशाप्रकारे पालकांशी संवाद साधत विश्वासात घेत15 मार्च रोजी पहिलीच्या वर्गाचा शुभारंभ भव्य स्वरूपात मुलांना चॉकलेट, बुके देऊन, गावकऱ्यांना, पालकांना बोलावून, मंडप टाकून केला. वृत्तपत्रातून प्रसिद्धी दिली, सोशल मीडियातून प्रसिद्धी दिली. त्यातून जिल्हाभरात 15 मार्च रोजी इयत्ता पहिलीचा वर्ग नियमितपणे सुरू करणारी शाळा म्हणून आमच्या शाळेकडे पाहिले जाऊ लागले. हळूहळू पालकांचा ओढा शाळेकडे वाढू लागला. त्यात एक अडचण होती ती म्हणजे काही अत्यंत सुज्ञ पालक, ते सांगत की सर आम्हाला आमची मुलं इंग्रजी माध्यमात शिकवायचे आहेत. तेव्हा आम्ही आमचे तत्कालीन गटशिक्षणाधिकारी साहेब यांच्याकडे पाठपुरावा केला व ही अडचण मांडली आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून मागणी केली की आमच्या शाळेला सेमी इंग्रजी वर्ग सुरू करता येईल काय? गटशिक्षणाधिकारी साहेबांनी लगेच त्याचा वरिष्ठ पातळीवर आढावा घेतला व जुन 17 पासून सेमी इंग्रजीचे वर्ग आजतागायत सुरू आहेत. आज आमच्या शाळेतील प्रत्येक तुकडी सेमी इंग्रजी वर्गाचीआहे. आज गावातील दाखल पात्र एकही विद्यार्थी बाहेरगावी शिकण्यास जात नाही, याचा आम्हाला, आमच्या ग्रामस्थांना अभिमान वाटतो.




**शाळा प्रवेशा साठी अश्या प्रकारे बॅनरगावातून लावण्यात आले**

**शाळेतील विविध उपक्रम :-** शाळेत आल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागते व घरीच जाऊ नये असे त्यांना वाटू लागते. इतक्या सुंदर व उपक्रमशील पद्धतीने विद्यार्थ्यांवर संस्कार घडविले जातात. शाळा परिवर्तनासाठी आम्ही विविध सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय सण, उत्सव हे विद्यार्थी व पालकांच्या सहकार्याने साजरा करत असतो. होळी सारख्या सणाचे औचित्य साधून तंबाखूजन्य पदार्थ जमा केले जातात. त्यांची होळी केली जाते. विद्यार्थी आणि पालकांसमवेत तंबाखू मुक्तीची शपथ दिली जाते. दहीहंडी सारख्या कार्यक्रमातून फक्त मुलांचे मनोरे न करता आम्ही मुलींनाही मनोरे करून दहीहंडी फोडण्याचे धाडस करायला संधी उपलब्ध करून देतो. आमची शाळा महिला मेळाव्याचे औचित्य साधून गावातील सर्व महिलांचा यथोचित सन्मान करते. या माध्यमातून विद्यार्थ्यांचे आरोग्य, मुलींचे शिक्षण यांसारख्या विषयांवर व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. त्यातून विद्यार्थी, पालक व शिक्षक हे त्रिकुट घट्ट होत जाते व शिक्षणाचे ध्येय, शिक्षणात येणाऱ्या अडचणी आणि शिक्षणातून अपेक्षित असणारे बदल या आंतरक्रियेतून सहज शक्य वाटतात.

**शाळेचा विकास:-** 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे कोणत्याही शिक्षकाच्या मनात एखादी काही युक्ती आली, काही उपक्रम सूचला तर त्याने तो सर्वांसमोर मांडावा. उपक्रम योग्य वाटल्यास आम्ही सर्वजण या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी धडपडत असतो आणि तो उपक्रम सहजपणे यशस्वी करतो. आम्ही सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य मिळून सुट्टीच्या कालावधीत विविध शाळेचा अभ्यास दौरा करून आलो. त्या शाळेत असलेल्या भौतिक सुविधा व गुणवत्ता वाढीसाठी उपयुक्त असणाऱ्या बाबी समजून घेतल्या. भेटीनंतरच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या सभेत यावर मंथन केले की, त्या शाळेतील कोणकोणत्या बाबी आपल्या शाळेत राबविता येतील, निर्माण करता येतील, बदल करता येतील, प्राधान्य क्रमानुसार हळूहळू त्या सुविधा आम्ही आमच्या शाळेत उपलब्ध करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहोत. आरोग्य विषयक, मी कसा दिसतो, मुलांसाठीचे खुले वाचनालय, शाळेचे दर्शनी भागात शाळेची वैशिष्ट्ये, गावाच्या दर्शनी भागात शाळेचे पुरस्कार, वर्गात वाचनीय तक्ते लावणे, संगणक साक्षरतेवर भर, संगीत, कला, कार्यानुभव याविषयासाठी स्वतंत्र दालन निर्माण करून त्यात आवड असलेल्या विद्यार्थ्यांना स्वतंत्र मार्गदर्शन अशा विविध बाबी आम्ही आमच्या शाळेत आज रोजी उपलब्ध करुन घेतल्या आहेत. त्यामुळे एकूणच शाळेकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन बदलला आहे. गावात जर कोणी पाहुणा आला तर त्यांना फेरफटका मारायला आमच्या शाळेत आणले जाते ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

बगीचा, स्वच्छता, बोलक्या भिंती, शाळेवर लिहिलेले तक्ते, विद्यार्थ्यांना खेळण्यासाठीच्या सुविधा आणि बसण्यासाठीची मोकळी बाके, या सर्व बाबींमुळे एकूणच आमची जिल्हा परिषद शाळा म्हणजे सर्वांग सुंदर शाळा आहे.

शाळासिद्धि मूल्यांकनात गेल्या सलग तीन वर्षात आमची जिल्हा परिषद मराठी शाळा 'अ' श्रेणी प्राप्त आहे. शाळेच्या प्रवेशद्वारा पासूनच शाळेचे बाह्यांग हे बोलके, सचित्र, सुंदर अशा तैलरंगांनी रंगविले आहे. प्रत्येक वर्गाच्या वर्गखोल्या वर्गाच्या अध्ययन निष्पत्ती नुसार रंगविलेल्या आहेत. त्याचा परिणाम म्हणजे मध्यान्ह भोजनाच्या वेळेत फावल्या वेळात विद्यार्थी आपल्या आवडीच्या भिंतीजवळ जाऊन त्या अभ्यासाचा सराव, पाठांतर किंवा निरीक्षण करत बसतात.


लोकमत

खलाणे जि.प. शाळेचा उपक्रम : इयत्तानिहाय विद्यार्थ्यांचा केला ग्रुप, पालकांना देण्यात आली सविस्तर माहिती

# विद्यार्थ्यांसाठी 'लर्न फ्रॉम होम' उपक्रमाची सुरुवात

व्हीडीओ कॉलिंगद्वारे समस्यांचे निराकरण

**शाळेच्या उपक्रमांची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल**

खलाणे येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत, 'लर्न फ्रॉम होम' उपक्रमा अंतर्गत शाळा बंद पण शिक्षण सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर आमच्या शाळेने आपल्या अभिनव उपक्रमाअंतर्गत लर्न फ्रॉम होम या तत्वावर आधारित शाळेतील प्रत्येक वर्ग शिक्षकाने आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांचा एक होम लर्निंग व्हाट्सअप ग्रुप बनवून त्यावर दररोज नियमितपणे अभ्यास देत आहेत. अभ्यास पूर्ण झाल्यानंतर गट प्रमुख त्या दिवसाचा पूर्ण झालेला होमवर्क त्या विद्यार्थ्यांसह नोटबुक चा फोटो आपल्या वर्गाच्या ग्रुपवर सामूहिकपणे शेअर करतात. असा हा आमचा खलाने शाळेचा लर्न फ्रॉम होम उपक्रम सुरु आहे.

**शाळेत उपलब्ध सुविधा:-** आमची शाळा डिजिटल शाळा आहे. आमच्या शाळेत एलसीडी प्रोजेक्टर व टॅब आहेत. तसेच साऊंड सिस्टिम असल्यामुळे सर्व वर्गशिक्षक आपापल्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीने अध्यापन करत असतात. विद्यार्थ्यांना अपलोडेड व लाईव्ह व्हिडिओज दाखविले जातात. उदा. चांद्रयान-2 चे लाइव्ह प्रक्षेपण आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना याद्वारे दाखविले होते. एस.आर.पी.एफ, धुळे द्वारा आयोजित भारतीय जवानांचे शस्त्र प्रदर्शनात आमच्या विद्यार्थ्यांना शस्त्र हाताळता आली, माहिती विचारता आली. शाळेत विद्यार्थ्यांना संगणक कक्षात संगणक साक्षरतेचे धडे दिले जातात. तसेच युट्युब हाताळणे, लिंक ओपन करणे, ऑनलाइन टेस्ट सोडविणे, टॅबचा वापर करून आवश्यक माहिती गूगल द्वारा सर्च करणे, ती माहिती सेव्ह करणे, सेंड करणे इत्यादी साध्यासोप्या क्रिया विद्यार्थी सरावाद्वारे सहज करतात. मैदान विद्यार्थ्यांना मोकळे खेळता येईल असे शाळेच्या इमारतीच्या समोरच्या बाजूस व दक्षिणेस मोकळे मैदान आहे. गार्डन व

लॉन्स (हिरवळ) आहे. फेसबुक पेज, युट्युब चॅनेल असलेली शाळा आमच्या शाळेतील तंत्रस्नेही शिक्षकांनी आमच्या शाळेचे 'माझी सुंदर शाळा खलाणे' या नावाने ब्लॉग निर्मिती केलेली आहे. तसेच याच नावाचे फेसबुक पेज व युट्युब चॅनेलसुद्धा सुरू केले आहे. या मीडियाच्या माध्यमातून आम्ही आमच्या शाळेचे उपक्रम तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याचं कार्य करत असतो. आजवर या चॅनलला अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या असून त्यावर सकारात्मक अशा कमेंट्स ही केलेल्या आहेत.

**लोकसहभाग :-** रेफ्रिजरेटर सुविधा असलेली जिल्ह्यातील पहिली शाळा. लोकसहभागातून शाळेच्या मध्यान्न भोजन योजनेतील हिरवा भाजीपाला, फळे इत्यादी टिकवून ठेवण्यासाठी रेफ्रिजरेटर खरेदी केले आहे. आमच्या शाळेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे मुला मुलींसाठीचे स्वतंत्र स्वच्छतागृह, नाशिक येथील 'इ अँड जी' ही संस्था व जिल्हा परिषद धुळे यांच्या सहभागाने बांधून देण्यात आले आहे. वॉटर प्युरिफायर- रोटरी क्लब ऑफ शिंदखेडा यांनी, गावातील सुज्ञ पालकांनी मिळून सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचे ओळखपत्र तयार करून दिले आहेत. रामभाऊ म्हाळगी प्रतिष्ठान व धुळ्याचे डिजिटल शाळांचे प्रणेते हर्षल जी विभांडक यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेला सोलर किट मिळाले आहे. त्याचा फायदा आम्हाला संगणक कक्ष व डिजिटल वर्ग अखंडपणे सुरु ठेवण्यासाठी होतो. शाळेची प्रगती व शाळेच्या विविध उपक्रमांची प्रसिद्धी माध्यमातून मिळालेली ख्याती यामुळे शाळेला विविध संस्थाद्वारा देणग्या, भेटवस्तू स्वरूपात मिळू लागले आहेत.

**आमची शाळा आमचे उपक्रम:-** या शीर्षकाखाली आम्ही दरवर्षी नवनवीन उपक्रम राबवीत असतो. आम्ही साने गुरुजी जयंती निमित्त श्यामची आई कथा माला सुरू केली होती. यात परिपाठाच्या वेळी प्रत्येक शिक्षकाने श्यामची आई या पुस्तकातील एक कथा रोज सांगितली. ग्रेट भेट या सदराखाली आमच्या शाळेत प्रत्येक महिन्याचा एक शनिवार याप्रमाणे वर्षभर समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, त्यात व्यवसायिक, समाजसेवक, उद्योगपती व नावाजलेले अधिकारी डॉक्टर इंजिनियर वकील पीएसआय इत्यादी आदर्श व्यक्ती यांना आमंत्रित करून त्यांच्याशी सुसंवाद साधला जातो. बालतरंग स्नेहसंमेलन खलाणे गावात कधी नव्हे असे मराठी शाळेतील विद्यार्थ्यांचे रात्रीचे स्नेहसंमेलन ऐतिहासिक पणे पार पडले. यात महाराष्ट्राची लोककला, संस्कृती इत्यादी विषयांवर आधारित गीते, नाट्य-अभिनय, कला विद्यार्थ्यांनी सादर केल्या व खलाणेकरांची मने जिंकून घेतली. या कार्यक्रमाला सुमारे पंचवीस हजार रोख रक्कम विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून मिळाली होती. आमच्या शाळेत विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने संगीतमय परिपाठ सादर करीत असतात.यात दररोज नवनवीन प्रार्थना, कृतीगीते, समूहगीते तसेच उपयुक्त माहितीचा खजिना याबाबी सादर करीत असतात. दरवर्षी इयत्ता चौथीचा वर्ग हा आमच्या शाळेतील अखेरचा वर्ग असल्यामुळे त्यांचा निरोप समारंभ आम्ही आयोजीत करत असतो. हा प्रसंग म्हणजे एक भावनिक संवेदनांचा समारंभ असतो असे म्हणता येईल. आमच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र संगणक कक्ष उभारण्यात आला आहे. त्यात एकूण सहा संगणक आहेत. या संगणक कक्षात दैनिक वेळापत्रकाप्रमाणे आपल्या वेळेनुसार वर्गशिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना संगणक कक्षात नेऊन अध्यापन करतात. जून-जुलै महिन्यात दर वर्षी वृक्षारोपण केले जाते. व लावलेल्या वृक्षांचे संगोपन केले जाते. 2019 यावर्षी धुळे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी माननीय राहुलजी रेखावार साहेब यांनी आमच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून

जिल्ह्यात वृक्षारोपण अभियानाचा प्रारंभ केला. यात शाळा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग यांचाही सहभाग होता. जवाहर नवोदय विद्यालयात निवड गेल्यावर्षी आमच्या शाळेतील हर्षल गिरासे या विद्यार्थ्याने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत यश संपादन केले.



**आमचे सामाजिक उपक्रम**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खलाणे ही शाळा आज विविध उपक्रम राबवून धुळे जिल्हातील एक उत्कृष्ठ शाळा म्हणून नावारूपास आलेली आहे. यापुढे देखील शाळेचा नावलोकिक असाच वाढत जाणार आहे अशी आमची खात्री आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. मनीषा शंकरराव देवरे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, धुळे . | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निकुंभे, जि.धुळे

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री.अशोक सिताराम पाटील **ई–मेल:-** nikumbhezpschool@gmail.com



**शाळेची दर्शनी इमारत**

जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळांपैकी एक जिल्हा परिषद शाळा, निकुंभे. जि.धुळे. ही आयएसओ मानांकन प्राप्त शाळा आहे. जि.प.शाळा निकुंभे ही जिल्ह्यातील एक आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. यामागे गावाची साथ, अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व शिक्षकांची मेहनत महत्वपुर्ण आहे. 2013 साली ग्रामस्थांनी मुख्याध्यापकांना पाचवीचा वर्ग सुरू करण्या संदर्भात आग्रह धरला. कारण गावातील बालकांना माध्यमिक शिक्षणासाठी पायपीट करत दुसऱ्या गावी जावे लागत होते. म्हणून पालकांच्या आग्रहाचा आदर राखत पाचवीच्या वर्गाची जबाबदारी स्वीकारली आणि शाळेमध्ये इयत्ता पाचवी चा वर्ग सुरू झाला. यामुळे बालकांची चार किलोमीटरची पायपीट थांबली. शाळेची इमारत व परिसरातील वातावरण बदलासाठी शिक्षकांनी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला. इयत्ता पाचवीच्या मुलांना एक मूल एक झाड दत्तक देण्यात आले. सहा महिन्यांमध्ये शाळेचे रूप बदलले निसर्गरम्य वातावरण तयार झाले.

**लोकसहभाग** - शाळेमध्ये सन 2013 पासून सांस्कृतिक कार्यक्रम सुरू करण्यात आले. शाळेतील प्रत्येक मुलाचा सहभाग या कार्यक्रमात घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी व्यासपीठाच्या उभारणीपासून ते कार्यक्रमाची तयारी, साऊंड सिस्टिम, लाईट व्यवस्था, मेकअप, ड्रेस उपलब्ध करून देणे या सर्व तयारीत पालकांचा सहभाग घेतला. मुलांच्या कलागुणांवर खुश होऊन पालक बक्षिसे व देणग्या देऊ लागले. सन 2013 साली 67 हजार रुपये सन 2014 साली 70 हजार रुपये सन 2015 साली 48 हजार रुपये सन 2016 साली 50 हजार रूपये एवढ्या मोठ्या भरघोस प्रमाणात बक्षिसे व देणग्या पालकांनी दिल्या यातूनच शाळा विकास सुरू झाला. या रकमेतून शाळेत डिजिटल क्लासरूम, संगणक कक्ष, इमारतीला रंगकाम, प्रयोगशाळा इत्यादी संकल्पना साकारल्या गेल्या. शिक्षकांच्या आवाहनाला प्रतिसाद देत पाच वर्षाच्या कालावधीत चार ते पाच लाखाचा लोकसहभाग शाळेला प्राप्त झाला. याच लोकसहभागातून झालेल्या शाळेच्या भौतिक विकासामुळे बालेवाडी पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या महाराष्ट्रातील पहिल्या शिक्षणाच्या वारीत शाळेला 'लोकसहभागातून शाळा विकास' या विषयाचा स्टॉल लावण्याची संधी मिळाली. या वारीमध्ये तत्कालीन शिक्षणमंत्री माननीय विनोद तावडे साहेब व शिक्षण सचिव माननीय नंदकुमार साहेब यांनी शाळेचे लोकसहभागातून केलेल्या भौतिक विकासाचे कौतुक केले.



**शिक्षणाच्या वारीत जिल्हा परिषद शाळा निकुंभेचा स्टॉल**

**विविध अधिकाऱ्यांच्या भेटी व मार्गदर्शन-** शाळेने केलेली नवीन वाटचाल व विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास, इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी मराठी माध्यमात आले. पालकांचा उत्साहपूर्वक सपोर्ट, बालक मेळावे, विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय विविध खेळांमधील यश, शाळा स्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन, ज्ञानरचनावादी शिक्षण, विविध शैक्षणिक उपक्रम, मोठा लोकसहभाग या सर्व बाबींमुळे आमची शाळा धुळे जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्र राज्यात नावारूपाला आली. याची दखल घेऊन दिनांक 27 नोव्हेंबर 2016 रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन शिक्षण सचिव आदरणीय नंदकुमार साहेब यांनी निकुंभे शाळेला प्रत्यक्ष भेट दिली. या भेटीच्या वेळी त्यांच्यासमवेत धुळे जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय देशमुख साहेब तसेच शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी,विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख,जिल्ह्यातील विविध शाळेतील शिक्षक, पत्रकार बंधू-भगिनी या सर्वांनी आमच्या शाळेला भेट दिली. आमच्या शाळेतील चिमुकल्यांचे कौतुक केले व पाठीवर शाबासकीची थाप दिली. शिक्षण क्षेत्रातील सगळेच दिग्गज एकाच वेळी शाळेत आले शाळेची पाहणी करत असताना पालकांशी ग्रामस्थांशी संवाद साधला. मुलांचे कलाविष्कार व सादरीकरण पाहून आनंद व्यक्त केला. वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल झालेल्या मुलांची शैक्षणिक प्रगती पाहून त्यांचा सत्कार देखील केला.



**महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन शिक्षण सचिव आदरणीय नंदकुमार साहेब यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट दिली**

विविध भौतिक सुविधांसोबत शाळेला विस्तीर्ण पटांगण देखील तयार करण्यात आले. याच पटांगणावर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध खेळांचे प्रशिक्षण दिले. ज्यामुळे विद्यार्थ्यांनी जिल्हास्तर व विभाग स्तरावर वेगवेगळया क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळवले. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात देखील शाळेचे नाव विभागापर्यंत गेले. या क्रीडा प्रकारांमध्ये तायकांदो, व्हॉलीबॉल क्रिकेट, कराटे मुलींसाठी स्वतंत्र कराटे असे विविध शारीरिक खेळ विद्यार्थी खेळतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन बौद्धिक विकासासोबत शारीरिक व मानसिक विकास देखील घडून आला.

**प्रत्येक आठवड्यात विविध क्षेत्रातील तज्ञांच्या भेटी -** निकुंभे शाळेमध्ये प्रत्येक आठवड्यात विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या भेटींचे आयोजन केले गेले.समाजासाठी गावासाठी आपण काही देणे लागतो म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांशी त्यांचा संवाद साधला गेला.विद्यार्थ्यांनी त्यांना विविध प्रश्न विचारून त्यांनी केलेली त्यांच्या क्षेत्रातील कामगिरी समजावून घेतली. विद्यार्थी व तज्ञ व्यक्ती यांच्या दिलखुलास गप्पा शाळेमध्ये आयोजित केल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगाने विकास होण्यास मदत झाली. समाजातील समाजसेवक, उद्योगपती, मोठ्या पदावर काम करणारे अधिकारी, वकील, डॉक्टर, पोलिस स्टेशनचे पीएसआय अशा विविध व्यक्तींच्या भेटी आयोजित करण्यात आल्या. किशोरवयीन मुलींना त्यांच्या वयानुरुप समस्यांवर मार्गदर्शन करण्यासाठी स्त्रीरोग तज्ञ, महिला डॉक्टरांचे देखील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या सर्व उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपल्या भविष्या विषयी जागरूकता निर्माण झाली

**मुख्यमंत्री व शिक्षण मंत्र्यांची पालकांशी चर्चा -** दिनांक 15 जून 2016 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस व तत्कालीन शिक्षणमंत्री माननीय विनोदजी तावडे साहेब यांनी आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. या संवादातून बालकांनी मंत्री महोदयांची मने जिंकली. विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती पाहून मंत्रिमहोदयांनी बालकांचे कौतुक देखील केले.


शाबासकी | व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये विद्यार्थ्यांनी साधला थेट संवाद; शिक्षकांचाही गौरव

मुख्यमंत्र्यांसमोर विद्यार्थ्यांच्या शीघ्र कविता अन् कथांचा संगम

व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस तसेच शिक्षण विभागातील अधिकारी.

**व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधतांना**

**शालेय गुणवत्तावाढीसाठी प्रशिक्षणाचा लाभ -** आमच्या शाळेतील शिक्षक नेहमीच विविध प्रशिक्षण घेण्यासाठी तत्पर असतात. कारण प्रशिक्षणाचा फायदा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत होतो हा आमचा ठाम विश्वास आहे. या कालावधीत आम्ही गणित संबोध, मूलभूत वाचन विकास, तंत्रस्नेही शिक्षण, ब्रिटिश कौन्सिल द्वारा दिली गेलेली इंग्रजी विषयाचे प्रशिक्षणं, भाषा गणित अध्ययन साहित्य प्रशिक्षण, अशा विविध प्रशिक्षणाचा लाभ शाळेतील शिक्षकांना झाला. यामुळे प्रत्येक वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ही अधिक चांगली होण्यास मदत झाली. त्यामुळेच शिक्षक व विद्यार्थी यांच्यामधील अंतरक्रिया वाढल्या. विद्यार्थी स्वतः शैक्षणिक साहित्याच्या मदतीने शिकू लागले. विद्यार्थ्यांच्या शिकण्याचा वेग कमालीचा वाढला.

**शैक्षणिक सहल व क्षेत्रभेट -** आमच्या शाळेत दरवर्षी विविध सहली किंवा क्षेत्रभेटीचे आयोजन केले जाते. यामध्ये कृषी विषयक ज्ञान मिळविण्यासाठी विविध शेतांना भेटी, ऐतिहासिक स्थळे धार्मिक स्थळे, भौगोलिक स्थळे यांना भेटी. या सर्व क्षेत्र भेटी किंवा सहलींमध्ये आमच्यासाठी अविस्मरणीय ठरली ती मुंबईची सहल. मुंबईच्या सहली दरम्यान तत्कालीन शिक्षण मंत्री माननीय विनोदजी तावडे साहेब यांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी आमच्या शिक्षक व विद्यार्थ्यांना मिळाली. मंत्रालयात जाऊन तत्कालीन शिक्षण मंत्री विनोद तावडे साहेब यांची फक्त भेट झाली नाही तर या भेटीमध्ये विद्यार्थी व मंत्रीमहोदयां मध्ये समोरासमोर सुसंवाद देखील झाला. या भेटीमध्ये विद्यार्थ्यांनी मंत्री महोदयांना आपल्या शेतातील प्रसिद्ध बोरे व पेरू भेट म्हणून दिले. ही भेट स्वीकारून मंत्रीमहोदयांनी विद्यार्थ्यांना विचारले, की आता माझ्याकडून तुम्हाला काय भेट हवी आहे? आमच्या एका विद्यार्थ्याने तत्काळ उठून उत्तर दिले की, महोदय आमच्या शाळेमध्ये सर्व सुविधा आहेत, आता आम्हाला फक्त एका विज्ञान प्रयोग शाळेची गरज आहे. तावडे साहेबांनी त्या विद्यार्थ्याला तुमच्या शाळेत प्रयोगशाळा नक्कीच येईल असे आश्वासन दिले. आणि त्यामुळे आमच्या शाळेमध्ये आज सुसज्ज अशी विज्ञान प्रयोगशाळा देखील आहे.



**तत्कालीन शिक्षण मंत्री माननीय विनोदजी तावडे साहेब यांच्याशी चर्चा करताना विद्यार्थी व शिक्षक**

**शिक्षण व जीवन व्यवहार यांचा संबंध -** एनसीएफ मधील अपेक्षित बाब म्हणजे शिक्षण व जीवन व्यवहार यांचा संबंध बांधणे. शाळेतील विद्यार्थी ही शेतकऱ्यांची मुले आहेत. शेती व अभ्यासक्रम यांची नाळ जोडणारे उपक्रम शाळेमध्ये राबवले गेले. त्यात वनराई बंधारा, गांडूळ खत तयार करणे, परसबाग निर्मिती भाजीपाला लागवड, भाजीपाल्याची प्रत्यक्ष विक्री

इत्यादी उपक्रम शाळेत घेण्यात आले. गणित व विज्ञान संबोध स्पष्ट होण्यासाठी गावाच्या यात्रेत नारळ विक्रीचे दुकान लावणे, गणिती जत्रा, विज्ञान जत्रा, जादूचे प्रयोग, जादू मागील विज्ञान इत्यादी उपक्रमातून शिक्षण व जीवनव्यवहार यांचा संबंध दृढ करण्याचा प्रयत्न शाळेने केला.




**विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतीचे प्रशिक्षण देताना**

**रेडिओ शिक्षणगंगा -** लॉक डाऊन च्या काळात आमच्या तालुक्याच्या तत्कालीन गटविकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांच्या संकल्पना व मार्गदर्शनातून रेडिओ शिक्षण गंगा नावाचा रेडिओ चॅनल सुरू करण्यात आला. या रेडिओ चॅनल वर जिल्ह्यातील विविध शिक्षक व विद्यार्थ्यांचे कार्यक्रम सादर होत होते. यामध्ये आमच्या शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शाळेतील बऱ्याच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या शैक्षणिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. त्यामुळे लॉकडाउनच्या काळात देखील आमची शाळा सर्व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरली

शाळेतील विविध उपक्रम, शिक्षकांची मेहनत, पालकांचा सहभाग, गावकर्यांचा विश्वास, यामुळे शाळेच्या गुणवत्तेचा आलेख सतत चढता आहे. यापुढे देखील चढता राहील हा आमचा विश्वास आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. मनीषा देवरे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, धुळे. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, छल्लेवाडा, ता.अहेरी, जि.गडचिरोली.

**मुख्याध्यापकाचे नाव:-** श्री सुरजलाल लिंगाराम येलमुले **ई-मेल:-** surajlalyelmule1982@gmail.com




**जि.प.प्रा.शाळा, छल्लेवाडा, शाळेची इमारत**

कोव्हीड या प्रादुर्भावामुळे जगावर खुप मोठी परिस्थिती उद्भवली त्याचा सर्वात मोठा परिणाम सामान्य जनतेवर झाला. सर्वात मोठी हानी कोवळया बालमनावर संस्कार करणाऱ्या शिक्षण क्षेत्रावर झाली. सर्व शिक्षकांच्या मनात जिद्द होती की मुलांचे शिक्षण सुरू ठेवलेच पाहिजे. शाळेतील सर्व शिक्षकांजवळ अनुभवाचा खुप मोठा साठा होता. कोरोना काळात शिक्षण घरोघरी पोहचावे म्हणुन शाळेत चर्चा करुन कठिण परिस्थितीचा सामना करीत अहेरी तालुका मुख्यालया पासुन 45 कि.मी. अंतरावर असलेल्या अतिदुर्गम भागातील शाळा व 182 पटसंख्या असलेली इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतची एकमेव शाळा आहे. या शाळेतील मुलांचा अभ्यास सुरु ठेवण्यासाठी, मुलांच्या मनातील भिती दुर करुन, गावातील पालक व शिक्षित युवकांची मदत घेउन ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षण सुरु ठेवण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम सुरु केले. **शाळा व्यवस्थापन समिती** :- शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेवुन, फोन वर चर्चा करून, शिक्षक पालक गृपची निर्मिती केली. त्यावेळी फक्त 15 पालक गृपवर होते, त्यांनतर पालकांमध्ये रुची निर्माण होऊन, आता 57 पालक गृपमध्ये आहे. या गृपच्या माध्यमातुन अभ्यास पाठवणे व शाळा व्यवस्थापन समितीशी चर्चा करण्याचे काम केले. त्यानंतर लगेच गावात ऑफलाईन व ऑनलाईन शिक्षण पालकांच्या सहकार्याने सुरू केले. गटागटाने मुले शिकु लागली. वरिष्ठांनी केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन मुलांचे शिक्षण सुरू ठेवले. शाळा बंद असली, तरी मुलांचे शिक्षण चालु ठेवण्यास मदत झाली. **वर्ग व विषयमित्र :-** स्तर निहाय विदयार्थ्यांचे गट तयार केले. विषय मित्रांच्या सहकार्याने व गावातील तरुणांच्या सहकार्याने गणित, इंग्रजी, मराठी, विज्ञान या विषयांचा अभ्यास सुरु ठेवला. LIP अंर्तगत मिळालेल्या साहित्यांचा उपयोग करुन विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यास मदत झाली. डायट गडचिरोली अंर्तगत शैक्षणिक ग्रुपवर पाठविण्यात आलेल्या स्वाध्याय माला, घरचा अभ्यास, कृतीपत्रिका यांचा नियमित सराव देवुन ते पालक, शिक्षक व गावातील स्वयंसेवक यांच्या मदतीने तपासुन आपापल्या पद्धतीने जमेल त्या ठिकाणी अध्यापनाचे काम सुरू होते.

शिक्षक पालक ग्रुप निर्माण केल्यामुळे मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग वाढला. पालक मुलांना आपल्या नजरेखाली अध्ययन अध्यापन करायला लावणे, गावातील स्वयंसेवक यांनी मुलांच्या अध्यापनात मोलाचा वाटा उचलुन शिक्षक मित्रांची भुमिका पार पाडली.



**गावातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा अभ्यास घेतांना**

**'जगायचे कसे हे शिकायचे मला' उपक्रम :-** कोरोना काळात मास्क, सॉनिटायझर, सोशल डिस्टंसिंग, हे शब्द नविनच होते याचा परिचय ग्रुपच्या माध्यमातुन व पोस्टर लावुन गावात जागृती करण्यात आली. नियमित साबणाने हात स्वच्छ धुवा, मास्कचा वापर करा, बाहेर फिरणे टाळा, पाणी भरपुर प्या, व्यायाम करा, हा संदेश मुलांपर्यंत पोहचवून, कृतीद्वारे मुलांच्या मनातील भिती नाहीसी केली. जगायच शिकायच मला हा विश्वास निर्माण करण्यात आला याचा परिणाम असा दिसुन आला की मुलांना संस्कारक्षम चांगल्या आरोग्याच्या सवयी लागल्या. मुले आवडीने शिकु लागली. त्याच प्रमाणे स्वच्छता पाळणे, विविध उपक्रम राबवुन मॉस्क, सॉनीटायझर, साबनाने हात धुणे, या सवयी लावण्यामुळे मुले अगदी टापटीप राहू लागली. अभ्यासाची सवय लागल्यामुळे 125 वरुन 182 वर पटसंख्या आणण्यास आम्हाला यश आले.



**गोष्टीचा शनिवार**



**शिष्यवृत्ती मार्गदर्शन**

**गोष्टीचा शनिवार व शिष्यवृत्ती मार्गदर्शन :-** शाळेत वाचनालयाची पुस्तके धुळखात ठेवण्यापेक्षा त्याचा उपयोग मुलांना व्हावा, यासाठी गटात वाचनाची सवय लावण्यासाठी शनिवारी मोहल्यात जावुन गटवार मुलांना बसवुन गोष्टीचा शनिवार घडवून आणला. मुले वाचलेल्या त्या गोष्टीवर पाच ओळी स्व:ता लिहित होते. याचा फायदा मुलांना झाला. त्याच प्रमाणे शिष्यवृत्ती परीक्षा व नवोदय विद्यालय मार्गदर्शन मुलांपर्यंत ॲप्सव्दारे पोहचवुन त्यांच्यात अभ्यासाची गोडी निर्माण केली.

**शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर :-** दिक्षा व गुगल बोलो या दोन डिजिटल प्लॅटफार्म चा वापर करून पाठ्यपुस्तकातील कविता, पाठ, इंग्रजी कथा व इतर माहिती शिकावी म्हणुन काही पालकांच्या मदतीने मुलांचे घरीच शिक्षण सुरू ठेवले. या माध्यमातुन मुलांना बोलते ठेवण्यासाठी मदत झाली. इंग्रजी वाचनाची व युट्युब वरील व्हिडिओ पाहून वाचन करतांनाचे फोटो व व्हिडीओ, मुले घरी अभ्यास करून गृपवर टाकत होते. याची प्रेरणा इतर मुले व पालक घेत होती.

**स्व विकास :-** मुख्याधापक व शिक्षकांनी स्वविकासाठी केलेल्या कार्यात शासनाने आयोजीत केलेले ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण केले. त्याच प्रमाणे आनापान, SCERT पूणे यांनी आयोजित केलेले प्रशिक्षण पुर्ण करुन, मित्र ॲप्सव्दारे मुलांपर्यंत ते पोहचवून त्याचा नियमित सराव लॉकडाऊन व शाळा सूरू असतांना करण्यात येत आहे. दिक्षा अंतर्गत निष्ठा प्रशिक्षण, SCERT कडुन आयोजीत वेबीनार, NEP 2020 प्रशिक्षण, मिपा कडुन इंग्रजी प्रशिक्षण व डायट गडचिरोली अंतर्गत विविध उपक्रम व प्रशिक्षण या लॉकडाऊनच्या काळात पूर्ण केले. कोरोना काळातील Covid 19 शैक्षणीक सर्व्हेक्षण, आठवडयाचा अध्ययन, अध्यापन अहवाल Whatsapp Base स्वाध्ययमाला मुलांकडुन सोडवुन घेणे. बालकांचे हक्क व सुरक्षितता SCERT महाराष्ट्र आयोजीत, सायबर सुरक्षा प्रशिक्षण, सहशालेय उपक्रम NEP 2020 & leadership Webinar Series प्रेरणादायी ठरले निष्ठा ऑनलाईन प्रशिक्षण, मित्र उपक्रम, कोविड विषाणु संसर्ग आणि संकल्पना प्रतिबंध प्रशिक्षण, वेध शिष्यवृत्ती अंतर्गत डायट गडचिरोली यांचे कडून घेतले वेळोवेळी प्रशिक्षण पुर्ण केले. तंत्रस्नेही शिक्षक, राज्य व MTS तंत्रस्नेही शिक्षक गृपच्या माध्यमातुन आयोजित कार्यशाळा पुर्ण करणे. जिल्हा शिक्षक व प्रशिक्षण संस्था गडचिरोली अंतर्गत आयोजित "शाळा बंद पण शिक्षण सुरु" या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या बेविणार मध्ये लॉकडाऊनच्या काळात शाळा स्तरावर केलेल्या उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. सेवा अंतर्गत प्रशिक्षण, अध्ययन समृद्धी प्रशिक्षण, मुल्यवर्धन प्रशिक्षण, एन ई पी इ. चा फायदा झाला.

**अध्ययन–अध्यापन प्रकियेत बदल :-** शाळा चालु असतांना अचानक बंद पडल्या आणि त्याचा परिणाम मुलांच्या अध्ययनावर झाला. परंतु शाळेत विविध उपक्रम राबवून मुलांची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी काम करण्यात आले. अध्ययन अध्यापन हे आनंददायी व गटागटात होवु लागले. त्यामुळे मुलांच्या जवळ जावून ऑनलाईन, ऑफलाईन काम करतांना मुलांना समजून घेण्याची संधी मिळाली. भाषेत अक्षर, शब्द टोपली, चित्र वाचन, लेखन, परिछेद वाचन, माइंड मॅप, गोष्ट सांगणे, याचा फायदा मुलांना अभ्यासात झाला. गणित अंकसंख्या, संख्यावाचन, अंक टोपली, सुटे-गट्टे. त्याच प्रमाणे इंग्रजी विषयात Ward Writing सुधारली, छोटे अक्षरे, व शब्द वाचन मुलांना येवु लागले.





**कृती पत्रिका अध्यापन** **माइंड मॅप पुर्ण करताना विदयार्थी**

**शालेय उपक्रम:-** विभागीय आयुक्त, नागपूर. व प्रथम एज्युकेशन फाऊडेशन, गडचिरोली. आकाशवाणी, नागपूर केंद्र व कैवल्य फाऊंडेशन यांचा शाळेच्या गुणवत्ता विकासात मोलाचा वाटा ठरला. AIR व PRATHAM यांच्या संयुक्त विद्यमाने चालाविता जाणारा उपक्रम 'शाळे बाहेरची शाळा' हा उपक्रम संपुर्ण गावात मंदिराच्या लाऊडस्पिकर वरुन ऐकवीत होतो. त्यातच इ. 8 वी ची मुलगी रक्षा वसंत गुरनुले ही विद्यार्थिनी सहभागी असलेला भाग प्रसारित झाला. तिचे सर्वत्र कौतुक झाले. शाळेबाहेरची शाळा मध्ये सुरजलाल येलमुले प्राथमिक शिक्षक यांची मुलाखत प्रसारित झाली. गावात रक्षा व शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. त्याचा फायदा शाळा बाहेरच्या शाळेने मुलांच्या शिक्षणात खंड न पडु देण्याचे काम केले. हा उपक्रम माझ्या गावात गावकऱ्यांच्या मदतीने अविरत चालू आहे. https://youtu.be/--RPFYV_W1w



छल्लेवाडा जिप शाळेची रक्षा गुरनुले आकाशवाणीवर

गुरुवारी होणार मुलाखत प्रसारित



**वृत्तपात्रांनी घेतलेली दखल** **लाऊडस्पिकरवर कार्यक्रम ऐकवताना**

**लोकसहभाग :-** मागील दोन वर्षापुर्वी लोक सहभागातुन गावकऱ्यांनी शाळेसाठी जागा खरेदी केली. कित्येक वर्षापासुन असलेली ईच्छा गावकऱ्यांनी खरी ठरवत शाळेसाठी स्वत:ची जागा घेतली. त्याच जागेवर शाळेची इमारत उभी राहिली. त्याच ईमारतीच्या उदघाटन प्रसंगी शाळेला भेट देवुन कार्यक्रमाचे उदघाटक अध्यक्ष, जिल्हा परिषद गडचिरोली व अध्यक्ष,

सभापती पंचायत समिती, अहेरी यांनी शाळा व्यवस्थापन पदाधिकारी यांचा, शाळेचा केलेल्या कामाबद्दल, विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते बददल, गौरव केला, प्रोत्साहन दिले. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी या कामात मोलाचे सहकार्य केले.

**उपक्रम व स्पर्धा परिक्षेत नैपुण्य :-** कोरोना लॉकडाऊनच्या काळात, त्या दोन वर्षा आधी 'माझी शाळा स्वच्छ शाळा' हा उपक्रम राबविला, तंबाखु मुक्त शाळा अभियान राबवुन मुलांना व्यसनापासुन दुर केले. महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परिक्षेत फेब्रुवारी 2020 मध्ये घेण्यात आलेल्या परिक्षेत कु. प्रतिक्षा रघु ताटीवार, इ. 8 वी व आदित्य सत्यम गुरनुले इ. 5 वी यांनी शिष्यवृत्ती परिक्षेत गुणवत्ता यादीत येवुन शाळेला गौरव प्राप्त करुन दिले. ग्रंथालय स्पर्धेत तालुक्याचा केंद्रस्तरावरीय प्रथम पुरस्कार मिळाला. ग्रामीण भागातील विद्यार्थी नवरत्न स्पर्धेत केंद्रावरुन तालुकास्तरावर पोहचले. शालेय बालक्रिडा स्पर्धेत कबड्डी व खो-खो स्पर्धेत प्राविण्य पटकाविले आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, पुणे यांनी घेतलेल्या लाकडाऊनच्या काळात बालदिन स्पर्धा व महिला दिन स्पर्धा आयोजीत केली होती, त्यास्पर्धे मध्ये सुध्दा मुलामुलींनी सहभाग घेतला आहे. राज्यस्तरीय वेबिनार, सायबर सुरक्षा, यामध्ये सहभाग घेतला व आनापान प्रशिक्षण मध्ये सुध्दा शाळेतुन मुला-मुलींनी सहभाग नोंदविला.



**विद्यार्थीनीचा सत्कार करताना मुख्यध्यापक**



**प्रोत्साहनपर बक्षिस**

अश्या प्रकारे विविध उपक्रमाच्य माध्यमातून, गावकर्यांच्या सहकार्यातून, विद्यार्थ्यांच्या विकासाची गंगा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, छल्लेवाडा येथून अविरत वाहत राहणार आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. मिलिंद अघोर** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, गडचिरोली. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, मोहुर्ली, ता.मुलचेरा, जि.गडचिरोली.

**मुख्याध्यापकाचे नाव:-** श्री.एम.जी. मददीवार **ई-मेल:-** ab0120826@gmail.com



**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मोहुर्ली शाळेची इमारत**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मोहुर्ली ही पं.स. मुलचेरा येथिल आदिवासी बहुल दुर्गम क्षेत्रात मोडणारी शाळा आहे. शिक्षणासाठी अत्यल्प सुविधा असतांनाही शैक्षणीक क्षेत्रात उपक्रमशिल शाळा म्हणुन नावारुपास आलेली आहे. मागील तीन वर्षापासुन शाळेचा शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावतच आलेला आहे. सामुहिक नेतृत्व, सांघीक कार्य, परस्पर विश्वास आणि उत्तम शैक्षणिक नियोजन व आयोजनामुळे तालुक्यातील उपक्रमशील शाळा म्हणुन नावलौकीक मिळवीला आहे. शाळेतील सर्व शिक्षकांनी मिळून शाळेच्या शैक्षणिक विकासाकरीता अनेक शैक्षणिक नवोपक्रमाचे शाळेत यशस्वी आयोजन केलेले असुन त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर गुणात्मक परीणाम झाल्याचे दिसुन येते.

**नियोजन:-** वर्षाच्या सुरवातीस अभ्यासक्रमाचे गाभाभुत घटक, संविधानात्मक उद्दीष्टे आणि ध्येये, मुल्ये यांचा परीपोष होईल अशाप्रकारे प्रत्येक महिण्यातील उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. स्थानिक परीस्थीतीचा विचार करुन उपलब्ध साधन सामुग्रीचा पर्याप्त वापर व्हावा यासाठी प्रत्येकाचे स्थान निश्चीत करण्यात आले. अभ्यासक्रम, पाठयक्रम, शहसालेय उपक्रम, गाभाभुत तत्वे, मुल्य, नवोपक्रम, याचे नियोजन संघभावनेतुन करण्यात आले.त्यात प्रत्येक घटकात योग्य स्थान मिळेल व गुणवत्तापुर्वक उपलब्ध साधन सामुग्रीचा उपयोग करता येईल या दृष्टिकोणातून विचार करुन जबाबदारी निश्चित करण्यात आली.

**अंमलबजावणी:-** नियोजीत केलेले मुल्ये, उद्दिष्टे आणि ध्येये यांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी उपक्रमांची मालीका निश्चीत करण्यात आली. प्रत्येक महिण्यातील शालेय, सहशालेय उपक्रमांचे नियोजन करुन प्रत्येक शिक्षकांना जबाबदारी वाटुन देण्यात आली. अभ्यासक्रम, पाठयक्रम, सहशालेय उपक्रम, यात शिक्षक, पालक, माता-पालक संघ, मुख्याध्यापक यांना वाटून दिलेल्या जबाबदारीनुसार कार्य करण्यासाठी संघ बांधणी करण्यात येवून काम करण्यासाठी प्रत्येकावर

विश्वासहार्यता दाखविण्यात आली. या सर्व बाबींमुळे अभ्यासक्रम वेळेत पुर्ण झाला. सहशालेय उपक्रामातुन गाभाघटक, मुल्य, सहकार्याची भावना व एकंदरीत विद्यार्थ्यांची शालेय गुणवत्ता वाढीस लागण्यास मदत झाली.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर:-** शालेय व्यवस्थापनात आणि शिक्षण प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाची फार मोठी भुमीका असल्याने त्यांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. मोबाईलचा वापर करुन विविध शैक्षणिक ॲप्स व्दारा अध्ययन अध्यापन प्रक्रिया चालविली जात आहे. दिक्षा ॲप्स, शैक्षणिक वेबसाईट, युटुयुब चॅनेल यांचे माध्यमातून विद्यार्थ्यांना कविता, गाणी, कथा, गोष्टी ऐकविण्यात येतात. त्यामुळे अध्ययन अध्यापन रंजक होवून विद्यार्थी अध्ययनात रममाण होत आहेत.

**शिक्षक पालक संघ:-** शाळा विकासात शिक्षक आणि पालकांचे सहकार्य फार महत्वाचे आहे. जे गाव करी ते राव न करी ही म्हण फार बोलकी आहे. शिक्षक-पालक संघ, शिक्षक-मातापालक संघ, यांच्या नियमित बैठका घेतल्याने विद्याथ्यार्थी गुणवत्ते विषयी पालक जागृत झाले. शिक्षणाची आवड निर्माण झाल्याने शाळेला आर्थिक तसेच अन्य मदत देण्यासाठी हात उभे राहिले. शाळा बंद व शिक्षण सुरु उपक्रमांतर्गत पर्यायी सुविधा म्हणून गावातील गोटुल उपलब्ध करुन त्याची रंगरंगोटी व इतर मदत श्रमदानातून उभी राहिली. गावातील शिक्षण प्रेमी युवकांना शालेय शिक्षणासाठी तथा शैक्षणिक कामा करिता प्रेरित करणे. यासाठी शाळा व्यवस्थापन समितीची मोलाची भूमीका राहिली आहे.

**विद्यार्थी विकास:-** परसबाग, वर्ग स्वछता, परिसर स्वछता, वृक्षारोपन तथा सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये सर्वांना समान संधी देवून समतेची भावना वाढीस लावली. परीपाठातील नेतृत्वाकरीता कमी, जास्त आणि मध्यम बुद्धीमत्तेच्या विद्यार्थ्यांचे गट पाडुन नेतृत्व विकासाला चालना देण्यात आली. दिव्यांग विद्यार्थ्याला विशेष सहाय्य तथा साधने उपलब्ध करुन सर्वसामान्य विद्यार्थ्यां सोबत ज्ञानदानाची संधी देवून समानतेचे मुल्य विकसीत करण्यात आले. मुल्यवर्धन उपक्रम पाहाण्याकरिता लिंक क्लिक करा. https://youtu.be/Pd4-pW_OGNw कोणतेही बालक शाळाबाहय राहाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक होते. त्याकरिता बालसंरक्षण कायद्या अंतर्गत बालकांच्या संरक्षणासाठी बालकांना त्यांच्या हक्काची जाणिव करुन देण्यात आली. महत्वाच्या हेल्प लाईन नंबरचे बॅनर शाळेच्या दर्शनी भागात लावलेले आहेत.

**अध्ययन - अध्यापन प्रक्रियेतील बदल :-** अध्यापनाची विविध साधनतंत्रे, आशय समृधी, शैक्षणीक साहित्याचा प्रभावी वापर, नियमीत स्वाध्याय, ज्ञानरचनावादी अध्ययन -अध्यापन प्रक्रिया, यामुळे अध्ययन निष्पत्ती मध्ये लक्षणीय वाढ झाली. गटपध्दती मुळे प्रत्यक्ष वर्गावर नियंत्रण ठेवणे सोपे झाले. शिक्षक विद्यार्थ्यांचा स्तर जाणून घेवून सुलभक तथा मार्गदर्शकाच्या भुमिकेत असल्यामुळे नैसर्गिक पध्दतीने अध्ययन करणे सोपे झाले. विद्यार्थी आपल्या गतीनूसार आणि स्थितीनूसार ज्ञानरचनावादी अध्ययन-अध्यापन पध्दतीने शिकण्यास प्रेरित झाले. एकंदरीत अध्ययन अध्यापन प्रक्रीया सुलभ, प्रभावी व परिणामकारक झाली.




**लोकसहभाग :-** शाळा विकासात विद्यार्थी केंद्रस्थानी आहे. शिक्षक आणि पालक हे शैक्षणीक वातावरण आणि सुविधा निर्माण करण्यात महत्त्वपुर्ण घटक आहेत. पालकांच्या सहाकार्यातून म्हणजेच लोकसहभागातुन शाळेत परसबाग, हॅन्डवॉशसेंटर, खेळाचे साहित्य, खेळांचे मैदान तसेच शाळेसाठी शिक्षक प्रेमी युवक उपलब्ध करुन देणे इत्यादी काम करण्यात मोलाची भुमीका निभावली आहे.

**शालेय नवोपक्रम :-** शैक्षणीक गुणवत्ता वाढीसाठी शालेय नवोपक्रमाची फार मोलाची भुमीका आहे. जिल्हा परिषद उच्च. प्राथमिक शाळा,मोहुर्ली येथे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी पुढिल प्रमाणे नवोपक्रम राबविण्यात आले.

**टाकाऊ पदार्थापासुन विज्ञान प्रयोगशाळा निर्माण करणे:-** या नवोपक्रमामुळे टाकाऊ पदार्था पासुन शालेय प्रयोगशाळा निर्माण करण्यात आली. विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानीक संकल्पनांचे प्रत्यक्ष निरीक्षण करुन अध्ययन करण्याची संधी मिळाली. वैज्ञानिक दृष्टिकोण वाढीस लागला. स्वनिर्मीत प्रयोग शाळेतील साहित्यांचा वापर करुन विद्यार्थी विज्ञानाचे विविध प्रयोग करतात. विविध वैज्ञानिक संज्ञा, संबोध, नियम, तत्वे या प्रयोग शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहज पडताळून पाहणे शक्य झाले. दैनंदिन वापरातील रासायनिक पदार्थ उदा. पाणी, साखर, चुना, खाण्याचा सोडा, धुण्याचा सोडा, सेंदुर, रेती इत्यादी रसायनांची ओळख झाली. टाकाऊ पदार्थापासुन विज्ञान प्रयोगशाळा पाहाण्या करिता खालील लिंकला क्लिक करा. https://youtu.be/5mjppn-kOdA

**परिसरातून विज्ञान:-** या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिक संकल्पनांचे प्रत्यक्ष निरिक्षण करुन अध्ययन करण्याची संधी मिळाली. उदा. भुरुपे, तलाव, वनस्पतीचे अवयव, पिके, पिकपदधती, वनस्पतीचे वर्गीकरण, खडकाचे प्रकार इत्यादी परीसरातील प्रत्यक्ष निरिक्षणातून शिक्षण देण्यात आले. वास्तव आणि प्रत्यक्ष निरीक्षणातुन अध्ययन केल्यामुळे वैज्ञानीक दृष्टीकोन वाढीस लागला. गुणवत्ता वाढीस लागली. परिसरातून विज्ञान पाहाण्याकरिता खालील लिंकला क्लिक करा. https://youtu.be/OMbW2obb5YA

**गोटुल माझी शाळा:-** जिल्हा परिषद उच्च. प्राथमिक शाळा, मोहुर्ली ही शाळा ग्रामीण आदिवासी भागात असुन फक्त दोन पालकांकडे android mobile phone असल्याने online शिक्षण देणे शक्य नव्हते. त्यावेळी गावातील गोटुलमध्ये

शिक्षणाची प्रक्रिया सुरु ठेवली. गावातील पडीत असलेले गोटुल पालकांच्या श्रमदानातून दुरुस्ती करुन आणि रंगरंगोटी करुन वापरायोग्य करण्यात आले. डायट, गडचिरोली व्दारा पुरविण्यात आलेला स्वाध्याय कृतीपत्रिका विद्यार्थ्यांकडून सोडवून घेण्यात आल्या. CEQUE संस्था, मुंबई व्दारा टिचर इन्व्हेटीव फेलोशिप च्या माध्यमातून विविध कृतीपत्रीका तसेच गणित विषयाच्या नाविण्यपूर्ण पध्दतींचा अभ्यास करण्यात आला.

**शाळेची यशोगाथा** :- 2019-20 या शैक्षणिक वर्षात टाकाऊ पदार्थपासून विज्ञान प्रयोग शाळा या नवोपक्रमास जिल्हा स्तरावर डायट, गडचिरोली येथे तृतीय क्रमांक मिळाला. 2018-19 या शैक्षणिक वर्षात शाळेतील विद्यार्थ्यांचा विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळाला. 2020-21 या शैक्षणिक वर्षात परिसरातून विज्ञान या नवोपक्रमास, राज्यस्तरीय जीवन गौरव मासीक, औरंगाबाद येथे राज्यस्तरावर व्दितीय क्रमांक मिळाला. तालूकास्तरीय क्रिडास्पर्धे मध्ये तसेच सांस्कृतीक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविला. सन 2019-20 या शैक्षणिक सत्रात कु. तृप्ती मुन्नाजी नैताम या विद्यार्थीनीची निवड जवाहर नवोदय विद्यालय, घोट येथे झाली विशेष म्हणजे तालुक्यातून जिल्हा परिषद शाळेतुन नवोदय साठी निवड झालेली एकमेव विद्यार्थीनी आहे. विज्ञान प्रदर्शनात सन 2019-20 या सत्रात शाळेतील विद्यार्थ्यांची जिल्हा स्तरावर निवड झाली. विज्ञान शिक्षक श्री. अशोक डी. बोरकुटे, विषयशिक्षक यांची राज्यस्तरावर विज्ञान प्रदर्शनाकरीता कोकमठाण, जि.अहमदनगर करीता निवड झाली. विशेष म्हणजे शाळेतील सन 2021 या वर्षाकरीता येथिल 3 विद्यार्थ्यांची निवड एकलव्य इंग्रजी मॉडेल स्कुल, अहेरी करीता झालेली आहे.

शाळा ही समाज विकासाचा आरसा आहे. शालेय नेतृत्व विकासात शाळा आणि शिक्षकांची भुमीका महत्वपुर्ण आहे. कोणत्याही उद्दीष्ट पुर्तीसाठी कामाचे नियोजन महत्वाचे असते शालेय गुणवत्ता वाढीस लागण्यासाठी मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, गावातील पालक, शाळा व्यवस्थापन समिती, यांच्या माध्यमातून गुणवत्ता वाढीचे उद्दीष्ट पुर्ण करण्यात येत आहे.


| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. मिलिंद अघोर** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, गडचिरोली. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा  परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, परसोडी, ता. सडकअर्जुनी, जि. गोंदिया.

**ई-मेल:-** zpschool.108@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव:–** श्री. हिवराज निताराम परशुरामकर  **ई-मेल:-** humendra.chandewar@gmail.com




**शाळेचा दर्शनी भाग**

गोंदिया जिह्यात ग्रामीण भागात असलेल्या परसोडी शाळेने सतत नवोपक्रम राबवून शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. शाळेच्या गुणवत्तेसाठी व विकासासाठी उपक्रमांचे योग्य नियोजन, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती, लोकसहभाग, महिलांचा सहभाग, वरिष्ठांचे मार्गदर्शन व शिक्षकांचे नवोपक्रम यातून शाळेचा विकास साध्य करण्यात आला. केवळ शालेय अभ्यासक्रम न शिकविता विविध सहशालेय उपक्रमांची जोड देण्यात आली. विशेष म्हणजे शाळेने गुणवत्ता वाढीसाठी स्पर्धा परीक्षांवर जोर दिला. एकंदरीत विविध उपक्रमांना योग्य दिशा देवून त्यांचा वापर शाळेने विध्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी केला. शिक्षक, पालक, व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने शाळेला **" आमची शाळा आदर्श शाळा"** या उपक्रमात जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून दिला.

**शालेय नियोजनातील संकल्पनात्मक मुद्दे -** ज्ञान, कौशल्य,अभिव्यक्तीचा वापर करून शाळेने अध्ययन निष्पत्ती कशी वाढविता येईल? यासाठी शाळा सुरु होण्याच्या आधीच नियोजन केले. शाळा व्यवस्थापन समितीच्या नियोजनातून सर्वप्रथम शालेय विकास नियोजन तयार करण्यात आले. शाळेमध्ये शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच पूरक अध्ययन संस्कृती निर्माण करण्याचे नियोजन शाळा विकास आराखड्यात करण्यात आले. शाळेत तंत्रज्ञानाचा वापर, गटचर्चा करुन विद्यार्थी शिकला पाहिजे त्याचे नियोजन करण्यात आले. आपल्या शाळेतील विद्यार्थी हा नवोदय, शिष्यवृत्ती, NMMS, प्रज्ञाशोध, सामान्य ज्ञान अशा विविध स्पर्धा परीक्षेत तरला पाहिजे त्याचे नियोजन करण्यात आले. शालेय भौतिक सुविधा, क्रीडांगण, ग्रंथालय, जैविक परसबाग, भौगोलिक भेट, विज्ञान भेट, कंपोस्टखत निर्मिती, पिण्याचे स्वच्छ पाणी इत्यादींचे नियोजन करण्यात आले. एकंदरीत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

**मुख्याध्यापक आणि शिक्षकांचा स्व विकास –** विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी शिक्षकांनी स्व विकास करणे आवश्यक आहे. त्यासाठी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामध्ये या एकाच शाळेतील दोन शिक्षक TAG CO-ORDINATOR आहेत. विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी त्यांची मदत घेतली जात आहे. विद्यार्थ्यांना कठीण वाटणारा हा विषय वेगवेगळया ACTIVITY वापरून सोपा केला आहे. शाळेतील शिक्षकांचा व त्यांच्या कार्यक्षमतेचा मुख्याध्यापकांनी योग्य रीतीने उपयोग करून शाळेला गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यात आले. सर्व शिक्षकानी सामोपचाराने एक मेकांसोबत राहुन योग्य वेळी एकमेकांचे सहकार्य घेवून कार्य केल्यामुळे त्याचा फायदा शाळेसाठी झालेला आहे. परिणामी शाळेचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली आहे.

**अध्ययन अध्यापन प्रक्रियेत बदल –** इयता पहिलीच्या वर्गासाठी गंमत जम्मत वर्ग सुरु केला. गंमत जम्मत वर्गाद्वारे सुरवातीच्या काळात लहान मुलांना गाणी, कविता, खेळ याच्या माध्यामातून शिक्षण देण्यात आले. त्यामुळे त्यांचे उपस्थितीचे प्रमाण वाढले. इयत्ता 1 ते 5 वी तील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानरचनावादाचा वापर करून शिक्षण दिले गेल्यामुळे त्यांच्या संकल्पना स्पष्ट झाल्या. मोठ्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी चर्चात्मक अध्ययन अध्यापन केल्यामुळे त्यांना अध्ययन प्रक्रिया अधिक सुलभ झाली. विद्यार्थ्यांच्या गतीनुसार शिक्षणाची मुभा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले. कृतियुक्त अध्यापनावर शाळेत भर देण्यात आला त्याचा फायदा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी झाला. कृतियुक्त अध्यापानामुळे विद्यार्थी स्वत: शिक्षण घेवू लागला. बालकांच्या समस्या व आवड लक्षात घेता त्यांच्या नुसार अध्यापनात बदल करण्यात आला. सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. तंत्रज्ञान चा वापर अध्यापनात केला तर अध्यापन अधिक प्रभावी होऊ शकते. ICT चा वापर शिक्षणात केल्यामुळे अध्यापन अधिक प्रभावी होऊ लागली. विद्यार्थ्यांचा अधिक सराव व्हावा यासाठी गुगल लिंक च्या माध्यमातून ऑनलाईन चाचण्या तयार करून त्याची लिंक शाळेच्या ग्रुपला पाठविण्यात येत होती. विद्यार्थी घरी लिंक च्या माध्यमातून चाचण्या सोडवत असत. https://forms.gle/G737AAgBZ8XGRwiA7.

**शाळा विकासात लोकसहभाग :–** शाळेच्या विकासात शालेय व्यवस्थापन समितीची भूमिका खूप महत्वाची राहिली आहे. शाळेच्या कोणत्याही उपक्रमाला समितीचा दुजोरा मिळत असे. **"एक दिवस शाळेसाठी"** या अंतर्गत प्रत्त्येक महिन्याला एकदा गावातील पालक शाळेच्या विकास कामात मदत करत असत. श्रमदानातून शाळेचा विकास करण्यात आला. विशेषतः महिला मंडळी च्या सहकार्यातून शाळेची जैविक परसबाग फुलविण्यात आली. ओसाड असलेल्या जमिनीवर गावकार्यांच्या मदतीने मशागत करुन विद्यार्थ्यांना कार्यानुभव विषयातील उत्पादक उपक्रमात्तार्गत परसबागेचे महत्व पटवून देण्यात आले.महिला बचत गटाच्या मदतीने परसबागेत वांगे, टमाटर, पालक, इ. विविध उत्पादन घेतले जाऊ लागले.



**शाळा विकासात पालक सहभाग**

काही होतकरू पालकांनी शाळेतील क्रीडांगनाची सपाटीकरण आपले स्वत:चे ट्रक्टर 7 ते 8 तास लावून मोफत करून दिले. गावातील लोकांच्या सहकार्यातून, सामाजिक जाणीवेतून, रक्तदान शिबीर शाळेत आयोजित करण्यात आले. शाळेने नियोजन केलेल्या या रक्तदान शिबिराचे गावातील लोकांनी भरभरून कौतुक केले.

अशाप्रकारे शिक्षक पालक संघ, शालेय व्यवस्थापन समितीने तसेच पालकांनी श्रमदान, रक्तदान, वस्तुरूप दान केले. एवढेच नाही तर पालकांनी लोकसहभागातून तब्बल दीड लाख जमा करून शालेय विकासात मोलाचे हातभार लावले. लोकसहभागातून शाळेची रंगरंगोटी करण्यात आली. त्यामुळे शालेय परिसर अधिकच आकर्षक बनला.

**नवोपक्रम :-** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शाळेने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. शालेय शिक्षणा बरोबर शाळेत विविध सहशालेय उपक्रम नाविन्यपूर्ण पद्धतीने राबविले. त्याचा फायदा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झाला. विद्यार्थ्यांचा गुणवत्ता वाढीसाठी दैनिक परिपाठ हा उपक्रम राबविला गेला. त्यात इंग्रजी, मराठी आणि हिंदी या तिन्ही भाषेत वेळापत्रकानुसार परिपाठ घेतला गेला. परिपाठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. विद्यार्थां मध्ये स्टेज डेरिंग आली. एकंदरीत विद्यार्थी बोलके झाले. परिपाठात उपस्थिती झेंडा उपक्रम वर्षभर राबविल्याने प्रत्येक वर्गाची उपस्थिती 100 टक्के राहू लागली.



**100% उपस्थिती उपक्रमाचे छायाचित्र**

विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे वाढदिवस दैनिक परीपाठाच्या वेळेस साजरे केले गेल्याने विद्यार्थ्यांची एकमेकाबद्दल आत्मीयता वाढीस लागल्याचे दिसून येवू लागले.परिपाठात विद्यार्थ्यांना कथाकथन, मराठी ते इंग्रजी रूपांतरण, इंग्रजी ते मराठी रूपांतरण असे उपक्रम घेण्यात आले विद्यार्थ्यामध्ये “भूतदया या मूल्याची” रुजवणूक होणाच्या दृष्टीकोनातून शाळेने “पक्ष्यांची पाणपोई” हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला. पण या उपक्रमाची खरी फलश्रुती तेव्हा झाली, जेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्या घरी मातीच्या भांड्यांचा वापर करून पक्ष्यांसाठी पाणपोई घरी सुरु केली. रोज नित्यनियमाने विद्यार्थ्यांनी त्यात पाणी घालून ते आपल्या अंगणात लावले आणि प्राणीमात्रांवरचे प्रेम जगाला दाखवून दिले.




**पक्ष्यांची पाणपोई**

**"गुरुजी आपल्या दारी"**:- या शाळेने 'गुरुजी आपल्या दारी' उपक्रम कोरोना काळात राबविण्यास सुरवात केली. या उपक्रमात गुरुजी स्वत: विद्यार्थ्यांच्या घरी जातांना आधीच तोंडाला मास्क लावून असतात. विद्यार्थी सुद्धा मास्क बांधलेले असतात. घरी गेल्याबरोबर अंगणात ठेवलेल्या साबनाणे स्वच्छ हात धुतल्यावरच विद्यार्थ्यांना सोबत नेलेल्या व्हाईट बोर्डवर मार्गदर्शन करतात. त्या नंतर त्यांना अभ्यास गुहकार्यासाठी देतात. अशा प्रकारे कोरोना विषयक सर्व मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून **"गुरुजी आपल्या दारी"** हा उपक्रम राबवीत आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थी अभ्यास करताना दिसून येत आहेत. कोरोना काळात सुद्धा विद्यार्थ्यांचा ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पद्धतीचा ताळमेळ व समीकरण साधून शाळा बंद पण अभ्यास सुरु या शाळेने ठेवला.




**गुरुजी कोरोना काळात घरी शिकवतांनी**

डॉक्टर ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा मिळावी म्हणून फिरते वाचनालय तयार करून, वाचन दिंडी काढून त्यांना पुस्तके पुरविण्यात आली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी सुद्धा वाचनासाठी पुस्तके घेतली. हा दिवस हात धुवा दिन म्हणून साजरा करण्यात आला. हात धुण्याच्या प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना व पालकांना देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी व ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षांत यशस्वी व्हावे यासाठी नवोदय, शिष्यवृत्ती, प्रज्ञाशोध आणि NMMS सारख्या परीक्षांत ग्रामीण भागातील विद्यार्थी पात्र व्हावेत यासाठी हा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र हा नवोपक्रम सुरु केला.

**शाळेची यशोगाथा :-** ग्रामीण भागात असलेली व आपल्या आजी आजोबांकडे राहणारी खुशबू विलास काठाने ह्या विद्यार्थिनीची नवोदय साठी निवड झाली. ती 3 किमी अंतरावरून पायदळ शाळेत यायची हे विशेष. NMMS परीक्षेत आदिवासी संवर्गात जितेंद्र कैलास कोहळे हा जिल्ह्यात प्रथम आला. इयत्ता 5 वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेत तर विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केले. वर्गात एकूण 22 विद्यार्थी त्यापैकी 12 विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले. 8 विद्यार्थी हे जिल्हा गुणवत्ता यादीत पण आले. शाळेने उत्तुंग झेप घेत जिल्ह्यात आपले नाव उंचावले. स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाले. विद्यार्थ्यामध्ये स्पर्धा परीक्षेविषयी आवड निर्माण झाली.




**जवाहर नवोदय विद्यालय निवड झाल्याबद्दल गुणवंत विद्यार्थी सत्कार**

विद्यार्थ्यांनी घरी अभ्यासात सातत्य ठेवावे म्हणून miss call हा अनोखा उपक्रम सुरु करण्यात आला. विद्यार्थ्यांना घरी रात्री 10 पर्यंत व सकाळी 5 ला अभ्यासास उठत जावे. यासाठी पालकांना विश्वासात घेवून हा उपक्रम सुरु करण्यात आला. विद्यार्थ्यांना रोज रात्री अभ्यास झाल्यावर पालकांच्या मदतीने miss call करायला सांगून सकाळी अभ्यासाला उठल्यावर सुद्धा miss call करायला सांगितले. या उपक्रमाचा फायदा असा झाला कि विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा तास वाढला. आणि त्यांचा अभ्यासाचा वेग वाढला. गावातील ज्येष्ठ व्यक्तीचे अनुभव कथन या उपक्रमाने विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते. आंतरराज्यीय अभ्यास दौर्यासाठी सुद्धा शाळेतील 10 विद्यार्थ्यांची निवड झाली होती. त्यांनी हैदराबाद येथील सांकृतिक व ऐतिहासिक परिस्थितीचा अभ्यास केला. शाळेमध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले गेले. ज्यामुळे विद्यार्थ्यांचा गुणवत्तेबरोबर सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली. नवोपक्रम सर्व शिक्षकांच्या मदतीने शाळा व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली, गावातील लोकांच्या सहकार्याने यशस्वी झाले.

**शैक्षणिक व प्रशासनात तंत्रज्ञानाचा वापर -** प्रज्ञाशोध, नवोदय, शिष्यवृत्ती, NMMS तसेच विविध स्पर्धा परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक यु टूब तयार केले त्यावर ते शाळेच्या तसेच इतर शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. https://www.youtube.com/c/HumendraChandewar https://forms.gle/c1ZF5CfqGTKUnbjf9. विद्यार्थ्यांच्या पालकांचे whats app चे ग्रुप तयार करून त्यावर विद्यार्थ्यांना स्वाध्याय दिला जातो. पालकांच्या मोबाईल वर गृहकार्य जात असल्याने विद्यार्थी पालकांच्या मार्गदर्शना खाली स्वाध्याय पूर्ण करत असत. विद्यार्थ्यांची प्रगती व सभेची नोटीस

सुद्धा पालकांना या माध्यमातून दिली जाते. Whats app ग्रुपला PPT, PDF, YUTUBE, VIDEOS, ZOOM App च्या मदतीने विद्यार्थ्यांचा अभ्यास सुरु ठेवला गेला आहे. कोरोना च्या काळात विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु ठेवण्यासाठी online study या उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. गुगल लिंक च्या माध्यमातून ऑनलाईन चाचण्या घेण्यात आल्या.




**ऑनलाईन वर्ग**

प्रशासकीय कार्यात सुद्धा तंत्रज्ञानाचा वापर शाळेने केला. शाळेची संपूर्ण माहिती संगणकाच्या मदतीने तयार केलेली आहे. शाळेचे face book page- https://www.facebook.com/Z-P-School-Parsodi-Sadak-arjuni101373914758490/

शाळेचा Facebook group मुळे पालकांना शाळेत होत असलेल्या विकास कामाची माहिती मिळत आहे. https://www.facebook.com/groups/221725075711495/permalink/360915591792442/?sfnsn=mo

गोंदिया जिल्ह्याच्या "आमची शाळा आदर्श शाळा" या स्पर्धेत परसोडी शाळा जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आली. शाळेतील विविध उपक्रम यशस्वी उपक्रम झाले. वृत्तपत्र व TV channel ने सुद्धा शाळेची दखल घेतली आहे. पालकांनी शाळेला मोठ्या प्रमाणावर पसंती दिली. कोरोना काळात https://forms.gle/TKwvUD6wQhxh9a3t9 ऑनलाईन पद्धतीने सर्वप्रथम प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यात आली. नंतर पालकांच्या मोबाईल वर संपर्क साधून प्रत्यक्ष प्रवेश देण्यात आला. कोरोना काळात सुद्धा शाळेची पटसंख्या मागिल वर्षापेक्षा तब्बल 50 ने वाढली. ग्रामीण भागातील या शाळेत तालुक्याच्या ठिकाणा वरून विद्यार्थी शिक्षण घ्यायला येत आहेत. हे या जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी गौरवाची बाब आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. नरेश वैद्य** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, गोंदिया. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाणाटोला, ता.आमगाव, जि. गोंदिया.

**मुख्याध्यापकाचे नाव -** श्री. शिवाजीराव बडे **ई मेल-** shivajiraobade1@gmail.com



**शाळा परिसर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाणाटोला**

महाराष्ट्र राज्यातील दुर्गम आदिवासी आणि नक्षलवादाने ग्रासलेला जिल्हा अशी ज्या जिल्हयाची ओळख आहे. गावही अगदी लहान आणि मागासलेले, कष्टकरी, शेतकरी लोकांचीच सारी लेकरे, शाळेच्या भौतिक सुविधांच्या बाबतीत ही बऱ्याच काही सुधारणा करण्यास मोठी संधी होती. याठिकाणी आल्यानंतर आम्ही या शाळेचा कायापालट नक्कीच करणार तो फक्त भौतीक सुविधांचा नाही तर गुणवत्तेचाही, हे आम्ही मनाशी पक्के ठरवले. ही आमच्या सृजनशिलतेसाठी चालून आलेली एक अनमोल संधी आम्ही मानली.शाळेत मुलांना मन लावून शिकवू लागलो, पण मनात काहीतरी आणखी वेगळे करण्याचा, मुलांचा शैक्षणिक विकास प्रगल्भतेने करण्याचा विचार सारखा-सारखा घोळत होता. आपण मुलांना काय देऊ शकतो, जे त्यांच्या संपूर्ण शैक्षणिक प्रवासात त्यांना लाभदायी ठरेल आणि लवकरच यावरचा मार्ग सापडला. सहजच आमच्या वाचनात ब्रिटिश, अमेरिकन आणि विशेषतः इस्त्राईलच्या शिक्षणपध्दती विषयी काही पुस्तके आली. आणि आम्हाला आमचा निश्चित असा मार्ग सापडला. शैक्षणिक प्रयोगांस सुरूवात झाली.

**शालेय नेतृत्वातील संकल्पनात्मक मुद्दे आणि प्रक्रिया:-** शाळेच्या दिवसाची मंगलमय सुरूवात म्हणजे शालेय परिपाठ होय. आम्ही परिपाठाच्या उपक्रमाचा प्रभावी वापर करण्याचे ठरवले. राष्ट्रगीत, प्रार्थना, संविधानाची प्रस्तावना झाल्यानंतर सुविचार, दिनविशेष, बोधकथा त्यानंतर सामान्यज्ञान, असा क्रम ठरला. शालेय परिपाठाचा परिणाम असा झाला की, प्रत्येक दिवशी 100 टक्के उपस्थिती राहू लागली. दिनविशेष या परिपाठातील उपक्रमांतर्गत त्या दिवशी घडलेल्या ऐतिहासिक, वैज्ञानिक, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक घटना विद्यार्थ्यांना सांगू लागलो. बोधकथा यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये त्यांना मिळणाऱ्या भावनिक संस्कारांचा एक मोठा वाटा असतो हे निर्विवादपणे सत्य आहे. आम्ही हा उपक्रम शालेय परिपाठात सादर

करण्याचा निर्णय घेतला ज्या वर्गाचे विद्यार्थी परिपाठ सादर करणार आहेत त्यांच्या मार्फतच एका बोधकथेचे वाचन, कथेचे तात्पर्य आणि त्या कथेवर आधारित प्रश्न असे या उपक्रमाचे स्वरूप ठरवले.



**सामान्यज्ञान उपक्रमाला प्रतिसाद देतांना विद्यार्थी**

परिपाठांतर्गत राबवलेल्या उपक्रम सर्वांत यशस्वी ठरला, तो उपक्रम म्हणजे सामान्यज्ञान. हा उपक्रम, प्रथमतः गाव, तालूका, जिल्हा, राज्य, राष्ट्र आणि जागतिक पातळीवरील माहिती असा प्रश्नांचा व माहितीचा आवाका वाढवत गेलो उदा. त्यामध्ये सूर्यमाला, प्रत्येक ग्रहाचे गुणधर्म, त्यांचा क्रम, महाराष्ट्र राज्य, मुख्यमंत्री, राज्यपाल, राज्याचे क्षेत्रफळ, समुद्रकिनारा, लांबी, रूंदी, राज्याची प्रतिके, अशा अनेक प्रश्नांचा त्यामध्ये समावेश आहे. तसेच भारताचा स्थान, विस्तार, सीमा, भारताच्या शेजारील सर्व देश व त्यांच्या राजधान्या महत्वाच्या नद्या, पर्वत, प्रतिके, राष्ट्रपती, पंतप्रधान, भारतातील सर्व राज्यांच्या राजधान्या, इतिहास या विषयाचा विचार करता महत्वाच्या सनावळया, युध्दे अशा शेकडो प्रश्नांचा यामध्ये समावेश आहे अतिशय कमी कालावधीत म्हणजे फक्त दररोज सकाळी 45 मिनीटांच्या परिपाठात. आपण आणखी देशांच्या राजधान्या मुलांना शिकवल्या तर आणि आम्ही लगेच कामास लागलो. प्रत्येक दिवशी एका अक्षराच्या किमान दोन देश आणि राजधान्या विद्यार्थ्यांस  शिकवू लागलो. त्यासाठी आम्ही जगाच्या नकाशाचा वापर अत्यंत प्रभावीपणे केला.


लोकमत

बुद्धिमत्ता क्षमता विकास : ठाणा शाळेत बढे दाम्पत्यामुळे दरवळतोय ज्ञानाचा सुगंध

## ए फॉर ॲपल नाही 'ए' फॉर ऑस्ट्रेलिया

प्रयोगशील शाळा

दृष्टिक्षेपात शाळा

**शाळेतील उपक्रम  A फॉर ॲपल ऐवजी    A फॉर ऑस्ट्रेलिया**

**अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील बदल व परिणाम :-** विद्यार्थी 1 ते 4 वर्गांचे, ते लहान आहेत. पण आपण आणखी एक हसत खेळत एक प्रयोग साकारावा असे आम्हाला मनोमन वाटत होते. त्या दिशेने अध्यापनात बदल करण्यास सुरूवात केली. उदा. इयत्ता 3 री व 4 थी चे इतिहास, परिसर अभ्यासाचे पाठ उदा. जसे आपली हवेची गरज हा पाठ शिकवत असताना ऑक्सिजन, त्याचे हवेतील प्रमाण, नायट्रोजनचे प्रमाण, एका मिनीटात होणारा श्वासोच्छवास, तसेच अन्नाची गरज हा पाठ शिकवत असताना अन्नातील पोषक घटक, जीवनसत्वे, कोणत्या जीवन सत्वाअभावी कोणता आजार होतो, आजारांची लक्षणे, आजार टाळण्यासाठी कोणत्या अन्नपदार्थांचा आहारात समावेश असावा, आपण केलेल्या अध्यापनाचे आत्मीक समाधान काही निराळेच असते. हा उपक्रम अव्याहतपणे सर्व वर्गांसाठी नियमितपणे सुरू आहे आणि राहणार आहे. प्रात्यक्षिकाच्या, ज्ञानरचनावादाच्या माध्यमाने, त्याचप्रमाणे डिजिटल साधनांच्या माध्यमाने, विद्यार्थ्यांना आम्ही शिकवत गेलो. या सर्व परिश्रमाची परिनिती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमधील अभूतपूर्व बदलातून दिसून आली.



**पाठ शिकवत असताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान**

**शाळा विकासात शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ व पालक सहभाग:-** आपणास असे दिसून येते की कोणत्याही शाळेच्या विकासात त्या शाळेच्या शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालकांचा सहभाग ही बाब अत्यंत महत्वाची आहे. शाळेच्या नावावर सहा एकर भूमी, परंतु सर्व बाजूंना शाळेला अतिक्रमणाचा विळखा पडलेला होता. शाळेच्या मैदानावरच खुप सारी जनावरे बांधलेली असायची. आम्ही विद्यार्थ्यांवर घेत असलेली मेहनत व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तनापासून ते शैक्षणिक प्रगतीपर्यंत सर्वच स्तरावर झालेल्या बदलामुळे पालकवर्ग अत्यंत खुश होता. आम्ही आपल्या मनातील काही संकल्पना शाळा व्यवस्थापन समितीच्या सभेत मांडत गेलो आमच्या सर्व संकल्पनांना सत्यात उतरविण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व पालक अगदी तत्परतेने तयार झाले. आम्ही त्यांच्यासमोर **'शाळेसाठी एक दिवस'** ही संकल्पना मांडली. शाळेला भले मोठे मैदान असले तरी त्यावर प्रचंड प्रमाणावर गवत, झाडे, झुडुपांचे साम्राज्य पसरलेले होते. हे सर्व साफ करून, आवश्यक त्या ठिकाणी मातीचे भराव टाकून पालकांच्या मदतीने शाळेसाठी आज एक खेळाचे उत्तम मैदान तयार झाले. मैदानावर खेळाचे विविध साहित्य बसविण्याची प्रक्रिया सुरू असून आवश्यक साहित्य देखील लोकवर्गणीतून खरेदी करण्यात आले आहे.




**एक दिवस शाळेसाठी या संकल्पनेतून पालकांचे श्रमदान**

**वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन व परसबाग:-** शाळा व्यवस्थापन समिती, पालक व गाव यांच्या मदतीने 2019 च्या पावसाळयात या मैदानाच्या काही भागावर वृक्षारोपन केले. त्यामध्ये साग, आंबा, जांभूळ, वड, पींपळ ही झाडे लावली. पालकांच्या सहभागातूनच प्रत्येक झाडासाठी प्रति पालक एक असे ट्री गार्ड शाळेला भेट दिले. याच ट्री गार्डमुळे शालेय परिसरातील शंभर टक्के झाडे जगली व शाळेच्या सौंदर्यात आणखी भर पडली. त्याचप्रमाणे सर्व पालकांनी असा आग्रह धरला की शाळेच्या परसबागेत उत्पादीत करत असणाऱ्या पालेभाज्यांना रासायनिक खताचा वापर कटाक्षाने टाळायचा त्याअनुषंगाने शाळेच्या मैदानाच्या एका कोपऱ्यात जागा निश्चित करून जैविक खत निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला. अनेक पालेभाज्यांचे उत्पादन पालकांच्या मदतीने घेणे सुरू झाले. आजही शाळेच्या परसबागेची नियमीत, उन्हाळा, दिवाळीच्या अवकाश काळातील व्यवस्था पालकांच्या मदतीनेच पाहिली जाते.

**शैक्षणिक कामकाजात व प्रशासनात तंत्रज्ञानाचा वापर –** आपणास जर विद्यार्थ्यांना प्रभावी अध्ययन अनुभवाने जर समृध्द करायचे असेल, तर तंत्रज्ञानाच्या वापराखेरीज दुसरा प्रभावी मार्ग नाही. त्यासाठी आम्ही स्वतः एक लॅपटॉप खरेदी केला व त्याच्या मदतीने आमच्या शाळेत डिजिटल अध्ययन व अध्यापनाचा शुभारंभ झाला. विद्यार्थी डिजिटल माध्यमांच्या मदतीने शिकण्यात अधिक रस घेतात, एव्हढेच नाही तर अगदी अवघडातील अवघड संकल्पना चुटकीसरशी समजतात. त्याकरिता आम्ही शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचातीच्या माध्यमाने आपल्या शाळेस डिजिटल साहित्य उपललब्ध होईल का ? याचा पाठपुरावा करू लागलो. 14 व्या वित्त आयोगातून शाळेला प्रोजेक्टर, संगणक, व इतर सर्व आवश्यक साहित्य प्राप्त झाले. आज शाळेत अद्ययावत अशी प्रोजेक्शन रूम आहे. ज्यावेळी शाळेतील मुले या प्रोजेक्शन रूममध्ये अभ्यासात गर्क असतात. त्यावेळचा या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून आपण केलेल्या कार्याचे चीज झाले हे समाधान मिळते.

**शाळेसाठी प्राप्त भौतिक सुविधा :-** प्रथमतः शाळेसाठी मुलभूत सुविधा कोणत्या मार्गांनी शाळेस उपलब्ध होतील याचा मागोवा घेतला. याकामी शाळा व्यवस्थापन समिती अतिशय सक्रियपणे पाठिशी होती. शाळेच्या नावलौकीकामुळे ग्रामपंचायत पदाधिकारीही याकामी मोलाची मदत करत होते. या सर्वांचा अतिशय चांगला परिणाम झाला. अल्पावधीतच ग्रामपंचायतीने

शाळेसाठी संरक्षण भिंत, त्याचप्रमाणे शाळेच्या बोअरवेल वर सबमर्शिबल पंप बसवून 200 फुटांरून पाईपलाईन करून शाळेस पाणिपुरवठा अद्ययावत केला. एव्हढेच नव्हे तर हॅन्डवॉश स्टेशन व उच्च क्षमतेचे वॉटर फिल्टरही शाळेत बसवले. तसेच शाळेसाठी मुला मुलींना वेगवेगळे दोन संडास व चार मुतार्यांचे कामही करण्यात आले. अशाप्रकारे सर्वांच्या सहकार्याने शाळेस उपरोक्त सुविधा अल्पावधीतच प्राप्त झाल्या.



**राष्ट्रीय विज्ञान दिन शाळेत जल्लोषात साजरा**

**प्रशिक्षणाचे महत्व व गुणवत्ता वाढ : -** शिक्षण विभागातर्फे आयोजित केली जाणार प्रशिक्षणे अत्यंत लाभकारी ठरतात. निष्ठा सारखी प्रशिक्षणे त्याचप्रमाणे विवीध विषयांची प्रशिक्षणे काळानुरूप आवश्यक आहेत. तसेच एक महत्वाची बाब म्हणजे लॉकडाऊनच्या काळात जी ऑनलाईन प्रशिक्षणे आयोजित करण्यात आली ती प्रभावी ठरली. कारण प्रत्यक्ष राज्य, राष्ट्र स्तरावरील तज्ञांचे मौलीक मार्गदर्शन येथे उपलब्ध झाले. जगाच्या इतिहासात कधी नव्हे ते एव्हढा प्रचंड काळ शाळा बंद राहिल्या. शाळा जरी बंद असल्या तरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, नवोदय, तसेच विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना लाभ व्हावा या हेतूने आम्ही शिवाजी अॅकॅडमी हे यु-ट्युब चॅनल सुरू केले. अल्पावधीतच या चॅनलच्या सबस्क्रायबरची संख्या लक्षणिय वाढली. सर्व व्हिडिओ चॅनलवरती उपलब्ध्ध आहेत.

आमच्या शाळेच्या गुणवत्ता वाढीस शिक्षक, पालक करत असणाऱ्या प्रयत्नांमुळे शाळा व्यवस्थापन समिती व पालकांच्या सहकार्यामूळे शाळेची उत्तरोत्तर प्रगती होत आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
| --- | --- | --- |
| **डॉ.नरेश वैद्य** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, गोंदिया | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, डिग्रस क-हाळे, ता.जि.हिंगोली

**ई-मेल:-** zpcpsdigras.k@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री एकनाथराव हनवतराव क-हाळे **ई-मेल:-** ekarhale@gmail.com



**जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, डिग्रस क-हाळे,शाळेची इमारत**

**"असाध्य ते साध्य I करिता सायास. कारण अभ्यास I तुका म्हणे II**

ही तुकाराम महाराजांची उक्ती सार्थ ठरवत. अगदी अल्पावधीत राज्याच्या नकाशावर स्वत:चा एक वेगळा ठसा उमटवणारी शाळा म्हणजे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा डिग्रस (क-हाळे). असे म्हणतात की, प्रत्येकाच्या डोळयात एक मोठे स्वप्न असते, पण ज्यांच्या डोळयात स्वप्न, मनात जिद्द व अहोरात्र परिश्रम घेण्याची तयारी असते. त्यांचेच स्वप्न सत्यात साकार होतात. डिग्रसची शाळा पाहताना या वाक्याची प्रचिती आपल्याला पदोपदी येते. शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती व समस्त गावकरी यांच्या एकत्रित योगदानाने आज हिंगोली जिल्हयातील एक आदर्श शाळा म्हणून या शाळेने स्थान मिळवले आहे. अनेक विद्यार्थी केंद्रीत उपक्रम राबवत शाळेने दरवर्षी आपल्या यशाचा आलेख चढता ठेवला आहे. शाळेच्या प्रांगणात पाऊल ठेवताच स्वच्छ व सुंदर परिसर. चहु बाजूंनी हिरवाईने नटलेला व विविध रंगाची फुले, भव्य प्रवेशद्वार, आकर्षक दुमजली इमारत अशा अनेक बाबी अत्यंत प्रभावशाली ठरतात. 'स्वच्छतेतून गुणवत्तेकडे ' हे ब्रिदवाक्य शाळेतील प्रत्येक घटकाचा श्वास आहे. शाळेला शालेय व्यसस्थापन समितीने अत्यंत भक्कम पाठिंबा दिला व सर्वांनी मिळुन एक आदर्श शाळा उभारणीचे कार्य हाती घेतले. प्रत्येक गोष्टीची साचेबध्द मांडणी व विकासकामांचे मुद्देसूद नियोजन करून सर्वांची वाटचाल सूरु झाली.

**लोकसहभागातून शालेय विकास:-** शालेय नेतृत्वातील संकल्पनात्मक मुद्दे आणि प्रक्रिया ज्यात शाळा विकास नियोजन, अंमलबजावणी, शाळा परिवर्तनाच्या कोणत्या तत्वांचा अंगीकार केला पाहिजे याचे नियोजन करण्यात आले. आदर्श शाळेचे निकष पूर्ण करण्यासाठी शाळेत काय काय करावे लागेल याचा आराखडा तयार करण्यात आला . तसेच उपलब्ध शाळेत कोणते सामर्थ्य आहेत व त्यांचा कसा उपयोग करता येईल हे जाणून घेतले . सर्वानुमते शालेय विकासाचा रस्ता आखण्यात आला.

शाळेची इमारत सुसज्ज असावी व इतर सर्व भौतिक सुविधा उपलब्ध असाव्यात यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते.शालेय परिसर मोठा असल्याने इमारतीसाठी जागा उपलब्ध होतीच. विविध योजनांमधून शाळा व जिल्हा परिषदेमार्फत प्राप्त निधीतून वर्गखोल्यांचे बांधकाम 2016 मध्ये पूर्ण झाले. अत्यंत प्रशस्त वर्गखोल्या असणारी दुमजली इमारत उभी राहीली. नुकतीच या इमारतीमध्ये आणखी दोन वर्गखोल्यांची भर पडली आहे. गावातील सौ.जिजाबाई केशवराव गोरे यांनी आपल्या मुलाच्या स्मरणार्थ शाळेला दोन वर्गखोल्यांचे बांधकाम करुन दिले. मुख्य इमारतीबरोबरच विद्यार्थी संख्येनुसार पुरेशी व सर्वयोयींनी युक्त स्वच्छतागृहे, संरक्षक भिंत, स्वतंत्र ग्रंथालय, स्वतंत्र विज्ञान दालन अश्या अनेक उल्लेखनीय बाबी सांगता येतील. लोकसहभागातून येथे बसवण्यात आलेले 'हॅंड वॉश स्टेशन' देशपातळीवर अव्वल ठरले आहे.

शालेय परिसरातच भव्य सांस्कृतिक सभागृह लोकसहभागातून उभारले आहे. शाळेतील व तालुक्यातील अनेक कार्यक्रम व प्रशिक्षणे यासाठी हे सभागृह अत्यंत उपयुक्त ठरले आहे. अत्याधुनिक ध्वनिक्षेपक यंत्रणा व सुसज्ज आसन व्यवस्था सर्वांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. शाळेमध्ये स्वतंत्र ग्रंथालय असून त्यात विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी, पुस्तके उपलब्ध आहेत. शिवाय जीवन शिक्षण, किशोर यासारखी मासिके वाचनासाठी उपलब्ध होतात. प्राथमिक शिक्षण हे सर्वस्पर्शी असले पाहिजे.इतर विषयांपेक्षा विज्ञान हा तर अनुभवण्याचा व जगण्याचा विषय आहे. या विचारांनी प्रेरित होऊन शाळेत विज्ञान कक्षाची उभारणी करण्यात आली. दररोज परिपाठात विद्यार्थी प्रयोगाचे सादरीकरण करतात.

याशिवाय शाळेतील सर्व वर्गखोल्या डिजीटल करणे, शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे,शैक्षणिक साहित्याची वैशिष्टपूर्ण मांडणी करणे,सौर पॅनल बसवून विजेच्या बाबतीत शाळेला स्वयंपूर्ण बनविले आहे अशा अनेक वैशिष्टयांमुळे डिग्रसची शाळा जिल्हयाच्या मानबिंदुपैकी एक मानली जाते.




**शाळेतील लोकसहभाग मदत फेरी**




**शाळेसाठी दिलेली देणगी**

**शालेय उपक्रम:-** प्राथमिक शाळा ही लोकशाही शिक्षणाचे पहिले केंद्र असते. संविधानातील मूल्ये सहज रूजवावीत असेच उपक्रम शाळेत आखले जावेत, अशी समाजाचीही अपेक्षा असते. अशा सर्व अपेक्षांना पूर्ण करत शाळेत कायम समता व समानतेची वागणूक दिली जाते. दैनंदिन परिपाठ असो किंवा विज्ञान प्रयोगाचे सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम असो वा कथाकथन स्पर्धा, शाळेतील कामाची विभागणी असो वा शालेय पोषण आहाराचे वाटप असो, प्रत्येक बाबतीत सर्व विद्यार्थ्यांना संधी मिळालीच पाहिजे याकडे सर्व शिक्षकांचा कटाक्ष असतो. काही बाबतीत मागे असणा-या विद्यार्थ्यांना लगेच मुख्य प्रवाहात आणावे यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले जातात. जेंव्हा सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न होतात तेंव्हा त्यातून काही पायंडे पडतात. काही सवयी आपोआपच विद्यार्थ्यांमध्ये रूजत जातात. काही संस्कारांची ठेव सहजच एकमेकांकडे हस्तांतरीत होते. यातुनच

एक शालेय संस्कृती विकसित होत जाते डिग्रस शाळेलाही अभिमानास्पद संस्कृती विकसित झाली आहे. स्वच्छता दूत या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या अंगी वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयींची रूजवणूक झाली आहे. शैाचालयाचा नियमित वापर, वारंवार हात धुणे, हात धुण्याची योग्य पध्दत, शालेय परिसराची स्वच्छता, कचराकुंडीचा वापर इ. साध्या पण महत्वाच्या बाबी नकळतपणे विद्यार्थी अंगिकारतांना दिसतात. पर्यावरण विषयक जागरूकता निर्माण व्हावी म्हणून झाडाची काळजी घेणा-या विद्यार्थ्यांना दरवर्षी ' वृक्षमित्र ' पुरस्कार दिला जातो. वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन यासाठी प्रोत्साहन दिले जाते .मूल्यशिक्षणावर विशेष भर देत वर्षभरात काही उल्लेखनिय कार्य करणा-या विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो.

**मुख्याध्यापक व शिक्षक स्वविकास:-** प्रत्येक व्यक्ती हा आयुष्यभर विद्यार्थी असतो. सतत नाविन्याचा ध्यास घेऊन नवीन काही शिकण्याचा प्रयत्न करत असणे, हीचा खरी शिक्षणाची सुरुवात आहे. हया विचारांचा वारसा घेवून शाळेतील शिक्षक विविध प्रशिक्षणे अत्यंत जबाबदारीने घेतात. नविन तंत्रज्ञान स्वत: शिकून त्याचा अध्ययन-अध्यापनात वापर करतात. सर्व वर्ग डिजिटल असल्याने वर्गातील टिव्ही संचावर विविध शैक्षणिक साहित्य पाहणे, व्हीडीओ लावणे, दिक्षा ॲपचा वापर करणे अशी कामे विद्यार्थीही लिलया करतात. वर्षभरात शाळेतील शिक्षक विषयानुसार विविध प्रशिक्षणे घेतात. 'गणित मुलभूत संबोध प्रशिक्षण' यामुळे इयत्ता आठवीपर्यंतच्या विविध संबोधांचे स्पष्ट आकलन झाले. निष्ठा प्रशिक्षण या प्रशिक्षणाला तर एक सर्वस्पर्शी प्रशिक्षण म्हणता येईल एवढे विविध विषय यात हाताळले गेले. अगदी प्राथमिक संबोधा पासून ते मुल्यमापना पर्यंत व विविध विषयां बरोबरच कला, क्रिडा, कार्यानुभव पर्यंत अनेक बाबींची चर्चा या प्रशिक्षणात झाली. 'मुलभूत संबोध भाषा प्रशिक्षण' या अंतर्गत मराठी तसेच इंग्रजीच्या गुणवत्ता विकासासाठी कोणते प्रयत्न करावेत यावर सविस्तर चर्चा व कृतिआराखडा तयार करण्यात आला. याशिवाय वर्षाच्या अगदी सुरवातीलाच केंद्रस्तरावर अध्ययन निष्पत्ती विषयी चर्चा करण्यासाठी कार्यशाळा घेतली जाते. पायाभूत चाचणीनंतर ज्या शाळांचा निकाल कमी आहे, त्यांच्यासाठी काय प्रयत्न करता येईल यासाठी संमेलन व सहविचार सभा घेतली जाते या सर्व प्रशिक्षणांचा निश्चितच फायदा होतो आहे. 'तंत्रस्नेही शिक्षक प्रशिक्षण' सध्याच्या ऑनलाईन शिक्षणाच्या काळातही या प्रशिक्षणामुळे शिकलेल्या नवीन गोष्टींचा फायदा झाला.



**शाळेतील शैक्षणिक साहित्य**



**शाळेतील शैक्षणिक साहित्य**

**विविध उपक्रम:-** शाळेत विविध नवोपक्रम राबवण्यात आले. काही उपक्रमांचा विशेषत्वाने उल्लेख करता येईल. विद्यार्थ्यांना खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणून विविध क्रिडा साहित्य उपलब्ध करुन ठेवले आहे. क्रिकेटचा सर्व संच, फुटबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, कॅरम, बुध्दीबळ, अशा प्रकारचे साहित्य वापरले जाते. दरवर्षी केंद्र , तालुका व जिल्हास्तरावर विविध क्रिडा स्पर्धाही

घेतल्या जातात. संगित क्षेत्रातही ग्रामिण भागातील पाऊल पुढे पडले पाहिजे यासाठी विविध संगित साहित्य शाळेत उपलब्ध आहे. हार्मोनिअम, तबला, बासरी, इ. साहित्याचा वापर वेळोवेळी केला जातो. याशिवाय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्याने लेझिम, डंबेल्स, टिप-या अशा साहित्याचा वापर करुन प्रात्यक्षिक सादर केले जाते. यासर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कमालिचा आत्मविश्वास दिसून येतो. दर महिन्याच्या तिस-या शनिवारी ' साने गुरुजी कथाकथन स्पर्धा ' आयोजित केली जाते. दररोज सामान्य ज्ञानावर आधारित एकेक प्रश्न देऊन महिनाअखेर स्पर्धा परिक्षेच्या धर्तीवर सामान्य ज्ञान परिक्षा घेतली जाते. याशिवाय ग्रंथालयाचा वापर, विविध प्रकारच्या शैक्षिणिक साहित्यांचा अध्यापनात वापर अशा बाबींचाही उल्लेख करावासा वाटतो. 'वॉटर बेल उपक्रम ' हा एक अभिनव उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला. ठराविक वेळेत वॉटरबेल वाजवून पाणी भरपूर प्रमाणात प्यावे याबाबतची जागरूकता निर्माण केली आहे .



**शाळेतील देशपातळीवर दखल घेतले गेलेले हँडवॉश स्टेशन**

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर:-** संपूर्ण शाळा डिजिटल करण्यात आली आहे. वर्गखोल्यामध्ये 32 इंची LED संच व संगणकाचा संच बसवलेला आहे. दैनंदिन अध्यापनात पाठावर आधारित डिजीटल शैक्षणिक साहित्य टिव्हीवर दाखवता येते. विद्यार्थी QR कोड चा वापर करुन उपलब्ध साहित्य स्वत: पाहतात. दिक्षा ॲप चा वापर शाळेत तसेच घरातही करतात. शाळेत " Read To Me " हा इंग्रजी वाचनाचा अभिनव उपक्रम नियमितपणे घेण्यात येतो. इंग्रजी बोलण्याचा सराव व्हावा यासाठी We Learn English या उपक्रमाच्या ऑडिओ क्लिप शाळेत मुद्दाम उपलब्ध करून घेण्यात आल्या आहेत . दररोज 15 मिनीटांची एक क्लिप विद्यार्थ्यांना ऐकवण्यात येते व त्यावर आधारीत प्रश्नोत्तरांचा वर्गात सराव घेतला जातो. प्रशासकीय कामांसाठी संगणकाचा वापर केला जातो. शाळेतील सर्व शिक्षक MSCIT पूर्ण केलेले असून सर्वांनी टेक्नोसेवी टिचर चे प्रशिक्षणही घेतले आहे.

**शाळेला मिळालेले पुरस्कार :-** शाळेच्या प्रगतीसाठी मुख्याध्यापक, शिक्षक, व्यवस्थापन समिती अहोरात्र झटत असतात. राज्यस्तरावरील अनेक स्पर्धांमध्ये शाळेने आपले स्थान कायम केले.'साने गुरुजी स्वच्छ व सुंदर शाळा' याचा राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार मिळवून डिग्रसच्या शाळेने राज्याच्या नकाशावर अभिमानास्पद स्थान मिळवले. जिल्हा पत्रकार संघाचा दर्पन पुरस्कार शाळेच्या गौरवात भर टाकणारा ठरला. गुणवत्ता विकास कार्यक्रमात डिग्रसची शाळा हिंगोली जिल्हयात प्रथम आली व **'स्वच्छतेतून गुणवत्तेकडे'** हे ब्रिदवाक्य सार्थक ठरवले. स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय स्पर्धेत शाळैने जिल्हयात प्रथम येण्याचा मान पटकावत यशाची परंपरा कायम ठेवली. मागील वर्षी तालुकास्तरावर विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्तीवर आधारीत परीक्षा

घेण्यात आली त्यातही डिग्रसचे विद्यार्थी तालुक्यात प्रथम आले व काही शिक्षकांनाही VIP टिचर चे मानांकन ही मिळाले. कोव्हिड काळात जिल्हा शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात विद्यार्थ्यांचा ऑनलाईन स्पर्धा घेण्यात आल्या त्यात केंद्र , तालुका व जिल्हा पातळीवर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनिय असे यश मिळवले आहे. शाळेला असणा-या विविध मानांकनां बरोबरच शाळेतील काही शिक्षकही जिल्हा, विभाग स्तरावरील विविध शैक्षणिक पुरस्कारांनी सन्मानित आहेत.





**शाळेस मिळालेले विविध पुरस्कार**

**माझी शाळा**

स्वच्छ,सुंदर पवित्रतेचा चढवून अंगी साज, माझा अभिमान माझी शाळा दिमाखात उभी आज,

मातृभाषेचा हात धरुनी गणिताची ही शिखरे पार, इंग्रजीशी तशीच मैत्री शब्दाशब्दात गोडवा फार,

कला,क्रिडा ,कार्यानुभव दिवस असतो सजलेला, किती रंगाच्या छटा घेऊनी उपक्रमांनी नटलेला,

वेळ काळाचे भान कुणाला विद्यार्थी विकास करताना, निरागस हात हाती घेऊन पाऊलात विश्वास भरताना

विज्ञान,साहित्य, प्रयोगही समर्थ आमचे व्यासपीठ, उदया झेपावल आकाशाकडे अशी घडवणे पायाची विट

कणकण हा सजीव इथला खुणविते तुला बाळा l सदा यशाच्या दारी राहो माझी अस्मिता, माझी शाळा ll

गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास घेत सर्वांगिण विकासासाठी धडपडणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डिग्रस अनेकांना प्रेरणादायी आहे. येथील वैशिष्टयपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम, जिल्हा स्तरावर आदर्श ठरलेली बाल वैज्ञानिकांची विज्ञान जत्रा, स्वच्छतेचे व प्रमाणिकपणाचे संस्कार, आपल्या वर्तणूकीतून सिध्द करणारे विद्यार्थी ही शाळेची अमृतमयी ठेवच आहे.

यशोगाथा जि.प.के.प्रा.शा.डिग्रस व्हिडीओ लिंक :-

https://drive.google.com/file/d/1mYz9pPdqlymvX_O2EmkNSlnrnPl_ViPb/view?usp=sharing

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. अंकोश ससाणे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, हिंगोली | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वसई, ता.औंढा(ना.) जि. हिंगोली

ई-मेल: zppsvasau05@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री झनक पांडुरंगराव लोंढे **ई-मेल:-** zanakraolondhe05@gmail.com



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वसई शाळेची इमारत**

जि.प. उच्च प्रा.शाळा वसई ही या परिसरात पट संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणारी शाळा आहे. पालकांशी उत्कृष्ठ सुसंवाद, गुणवत्तापूर्ण अध्ययन अध्यापनाकडे लक्ष देणारी शाळा आहे. अध्ययन अध्यापनामध्ये विद्यार्थ्यांच्या कृतियुक्त सहभागाला महत्व देण्यात येते. विविध स्पर्धा परीक्षांची पुर्व तयारी करून घेण्यात येते. सर्वात जास्त लोकसहभाग जमा करणारी शाळा असून अध्ययन-अध्यापनात इ-लर्निंग चा वापर, तसेच नवोपक्रमाला चालना देणारी शाळा आहे. सांस्कृतिक वारसा जपणारी शाळा अशी या शाळेची ओळख आहे. शालेय नेतृत्वातील संकल्पनात्मक मुद्दे आणि प्रक्रिया ज्यात शाळा विकास नियोजन, अंमलबजावणी, शाळा परिवर्तन करताना समता, समानता, बालसंरक्षण, बालाधिकार, अशा विविध तत्वाचा अंगीकार शाळेने केला आहे.

**विद्यार्थी केंद्रित शिक्षण** :- भारताच्या सर्वांगीण विकासासाठी आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक असतो. शिक्षणप्रक्रियेत विद्यार्थी हा केंद्रबिंदू असतो. शिक्षणात मागे पडलेल्या मुलांना शिक्षणाची गोडी लागायला हवी, यासाठी त्यांना खेळीमेळीच्या वातावरणात हसत खेळत प्रत्यक्ष अनुभव देऊन आनंददायी शिक्षण दिल्या जाते, यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. यासाठी विद्यार्थ्यांना गटपद्धतीने शिक्षण दिल्या जाते. निसर्गरम्य वातावरणात आपापल्या कलेने मुले आत्मविश्वासाने स्वयं अध्ययन करतात. आमच्या शाळेत समानता या तत्वावर आधारित अनेक उपक्रम राबविले जातात. शाळेत मुलामुलींना सामान संधी उपलब्ध करून दिल्या जातात. स्त्रीपुरुष समानता यासाठी गावापासून शाळेपर्यंतच्या प्रत्येक बाबी समजावून सांगितल्या जातात. महिला पालक मेळावे दर महिन्याला घेतले जातात. तसेच महिला स्पर्धा, महिलांसाठी प्रबोधन असे विविध कार्यक्रम शाळा स्तरावर आयोजित केले जातात.

**मुख्याध्यापक व शिक्षकांचा स्व विकास :-** येथे मुख्याध्यापक व शिक्षकांमध्ये संघबांधणी झाल्यामुळे अनेक नवीन उपक्रमाचे आयोजन आमच्या शाळेत केले जाते. शाळेतील सर्व शिक्षक एकमेकांच्या विचारास मान्यता देऊन नवनवीन उपक्रम आमच्या शाळेत राबविले जातात. पूर्वीच्या रटाळ अध्ययन अध्यापन प्रक्रियेला बगल देऊन आमच्या शाळेत अध्ययन अध्यापन प्रक्रियेत बदल करण्यासाठी आम्ही नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. त्यासाठी विविध प्रशिक्षणे शिक्षकांनी पुर्ण केली

आहेत. “DIRECTION IS BETTER THAN SPEED” प्रशिक्षणामुळे कमी वेळात कमी श्रमात अधिक प्रभावीपणे आणि अधिक परिणामकारक अध्यापन करता येते याची प्रचीती आम्हाला आलेली आहे. शाळेतील विद्यार्थी व शिक्षकासाठी TAG प्रशिक्षण एक आगळीवेगळी पर्वणी ठरली आहे. विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची भीती दूर होऊन आवड निर्माण करण्याची किमया या प्रशिक्षणामुळे झाली आहे. मूल्यवर्धन प्रशिक्षण मूल्याचा स्वीकार करून आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहन दिल्या जाते. यामुळे माझ्या शाळेतील मुलांमध्ये स्वयंशिस्त, प्रामाणिकपणा, स्वच्छता व निटनेटकेपणा, वक्तशीरपणा, दयाळूपणा, स्त्री-पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, ऊर्जेची बचत, नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर समता, बंधुता, स्वातंत्र्य, मुलांमध्ये एकोपा इ. गुणांचा व मूल्यांचा विकास झालेला आहे. या मूल्यांचा अंगीकार केल्यामुळे आमच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होत आहे. आनंददायी शिक्षणासाठी ज्ञानरचनावाद ही संकल्पना समोर आली. कृतियुक्त अध्यापनाने आमच्या शाळेतील विद्यार्थी मनोरंजक पद्धतीने अध्ययन करत आहेत. मुलांमध्ये गुणवत्तेची निकोप स्पर्धा लागली आहे, एखादी संकल्पना, कृती येणारा विद्यार्थी दुसर्यांना ती संकल्पना समजावून देण्यासाठी धडपडताना आम्ही पाहत आहोत.





**शाळेतील विद्यार्थी ज्ञानरचनावादी पद्धतीने अध्ययन करताना**

**लोकसहभाग :-** शाळेत नियमित शिक्षक-पालक, शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठका होतात. केंद्रस्तरीय, तालुकास्तरीय, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, आवर्जून प्रशिक्षणास उपस्थित असतात. सद्यस्थितीत आदर्श नावारुपास आलेली वसई शाळा ही शिक्षक-पालक संघ व शाळा व्यवस्थापन समिती मजबूतीची साक्ष देते. आम्ही प्रथम सुशिक्षित शिक्षणप्रेमी नागरिकांचा WHATS APP ग्रुप तयार केला. ग्रुपवर जनजागृती केली. जगात शिक्षणावर चाललेले प्रयोग, विकास, प्रगती लोकांना ग्रुपवर पाठविली. शाळेत सभा, मेळाव्याद्वारे पालकांचे प्रबोधन केले. त्याचबरोबर शाळेत शिक्षकांनी अध्यापनात अमूलाग्र बदल केला. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये बदल दिसायला लागले. प्रत्येक पालक, शाळेला भेट देणारे अधिकारी, पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांची होणारी प्रगती पाहून नवल व्यक्त केले, व शाळेला देणग्यांचा पाऊस सुरु झाला.

प्रथम शाळेला जागा दान मिळवण्यात आम्हाला यश आले. तसेच शाळेच्या भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी गावकऱ्यांनी-पालकांनी सढळ हाताने मदत केली. वृक्षारोपण, मैदान निर्मिती, खेळ साहित्य, किचन शेड उभारणी, हॅन्डवॉश स्टेशन, कॉम्पुटर, कॉम्पुटर लॅब निर्मिती, वीजजोडणी, नळफिटिंग, बागनिर्मिती, ड्रीप इरिगेशन जोडणी, सर्व वर्गात स्मार्ट T.V., वर्गसजावट, अभ्यासिका, शाळेसाठी प्रिंटर, साऊंड सिस्टिम, सांस्कृतिक कार्यक्रम इ. साठी गावकऱ्यांने तसेच सर्व

शिक्षकाने आपला वाटा जमा करून हजारो रुपयातून ही आदर्श शाळा उभी केली आहे. हे कार्य थांबले नसून, लॉकडाऊनच्या काळात सुदधा शाळेच्या 41,218 रुपये लोकसहभाग जमा झाला.



**शालेय विकासासाठी पालकांचा सक्रीय सहभाग**

शालेय गुणवत्ते मध्ये वाढ होण्यासाठी पालक + शिक्षक + विद्यार्थी या तिन्ही घटकात सुसंवाद वाढ होण्यासाठी यांच्या एकत्र सभा आम्ही आयोजित करतो. या सभेत प्रत्येक पालकांच्या पाल्याच्या प्रगतीविषयी अहवाल सर्वांसमोर मांडतो, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडथळे समजू लागले. शाळेत जेव्हा विद्यार्थी अनुपस्थित राहतात तेव्हा शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व शिक्षक पालकांना अनुपस्थितीची कारणे विचारतात. अडीअडचणीची सोडवणूक करतात. विद्यार्थी आजारी असल्यास त्या विद्यार्थ्यांचे वर्गमित्र, वर्गशिक्षक, मुख्यध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य त्यांच्या घरी भेटायला जातात. त्यामुळे शाळेविषयी जिव्हाळा वाढला. आमचे शिक्षक, आमची शाळा, आमचे विद्यार्थी, आमचे पालक असे वर्तुळ तयार झाले आह. याचाच फायदा गुणवत्ता वाढीस झालेला आहे. याची दखल ZEE TV चॅनेल, तसेच वृत्तपत्रांनी घेतली आहे. शिक्षक-पालक सभा व शाळा व्यवस्थापन समिती सक्रिय असल्यामुळेच शाळेचा आलेख चढता आहे.

**शाळेत राबविण्यात येणारे नवोपक्रम:-** आमच्या शाळेत मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी यांनी राबविलेल्या नवोपक्रमाचा शाळेला खूप फायदा झाला. आदर्श परिपाठामुळे विद्यार्थी मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषेतून सूत्र संचालन करू लागले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचा चांगलाच विकास झाला. आमच्या शाळेतील विद्यार्थी दुपारच्या सुट्टीच्या वेळेत निसर्गाच्या सानिध्यात पुस्तक वाचण्याचा आनंद घेतात. शाळेत विद्यार्थ्यांकडून विविध स्पर्धा परीक्षाची तयारी करून घेतल्या जाते, आमच्या शाळेत मंथन स्पर्धा परीक्षा, NMS परीक्षा, नवोदय, शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षाची तयारी करून घेतली जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात भर पडली आहे. आमच्या शाळेत दप्तराविना शाळा हा उपक्रम दर शनिवारी शाळेत राबविला जातो. यादिवशी विविध शैक्षणिक साहित्याच्या मदतीने विद्यार्थी ज्ञानार्जन करतात. तसेच TV वर मुलांना विषयाशी संबंधित Video क्लिप दाखविल्या जातात. शाळेत दरवर्षी पावसाळयात नवनवीन झाडांची रोप तयार करण्यात येतात. विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली रोपांची निर्मिती करतात, त्या रोपांची वाढ झाल्यानंतर त्या झाडांची लागवड आमच्या शाळेत करण्यात येते. यामुळे शाळेत विद्यार्थी संख्येएवढी झाडे शाळेत तयार झाली आहेत, आदर्श परिपाठ, बाल आनंद मेळावा, स्टुडन्ट ऑफ डे, मुक्त वाचनालय, विविध स्पर्धा परीक्षा, शालेय परसबाग, दप्तराविना शाळा, जलसाक्षरता, विविध दिन साजरे करणे, इ-लर्निंग, आम्ही स्वच्छतादूत, स्पर्धा परीक्षा, रोपवाटिका निर्मिती, कान्होबा बचत बँक, कचरा व्यवस्थापन, जिजाऊ ग्रंथ वाचनालय, किलबिल बुक स्टोर, एक दिवस गावासाठी, चॉकलेट बंद

करून मुलांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, विशेष विद्यार्थी कोपरा, सातत्यपूर्ण उपस्थिती, प्लास्टिक मुक्त शाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, महिला हळदी कुंकू कार्यक्रम व महिला क्रीडा स्पर्धा उपक्रम राबविले जातात.





**शिक्षक दिन** **पुस्तक वाचनाचा आनंद**

**तंत्रज्ञानाचा वापर:-** सध्याचे युग हे संगणकाचे युग म्हणून ओळखले जाते. संगणकाचा वापर दैनंदिन जीवनात पदोपदी होत आहे. प्राथमिक शाळा वसई येथे संगणकाची लॅब आहे. संगणक लॅब मध्ये पाच संगणक उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकरिता संगणकाचा वापर शाळेमार्फत केला जातो. विद्यार्थ्यांकडून स्कॉलरशिप, नवोदय विद्यालय, व MTS मंथन या परीक्षांचा सराव घेतल्या जातो. हे विषय शिकविण्यासाठी संगणकाचा वापर शाळेत प्रभावीपणे केला जातो. संगणक हे दृक्श्राव्य माध्यम असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर ज्ञान प्रभावीपणे ठसविले जाते. प्रशासकीय कामकाजात सुद्धा संगणकाचा वापर केला जातो.



**विविध विषय शिकविण्यासाठी संगणकाचा वापर**

आमच्या शाळेत प्रत्येक वर्गात LCD - TV संच आहे, या LCD - TV संचाचा वापर विद्यार्थ्यांना पाठ व कविता समजून सांगण्याकरिता केला जातो, पेन ड्राईव्ह चा वापर करून कृतियुक्त गाणे व कविता TV स्क्रीन वर दाखवले जातात. दुर्बीण या साधनांचा वापर खगोलीय गोलाचे निरीक्षण करण्यासाठी विद्यार्थी करतात या साधनांचा वापर करून विद्यार्थी ग्रहताऱ्यांचे निरिक्षण करतात शाळेतर्फे विद्यार्थ्यांना चंद्राच्या कलेचे निरीक्षण दुर्बिणीद्वारे करण्याची संधी दिली जाते. **"आनंददायी शिक्षणातून, शिकऊ मुलांना अभ्यास, भावी भारत घडविण्या, करू सर्वांगीण विकास."** या ओळीनुसार भावी

भारताचे मजबूत आधारस्तंभ बनवायचे असतील तर सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे, व ते होण्यासाठी आनंददायी शिक्षण महत्वाचे आहे.

**जिल्हा,विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तरावर यशस्वी उपक्रम:-** आमच्या शाळेतील स्काऊट गाईड पथक दरवर्षी मोठ्या उत्साहाने, तयारीने जिल्हा मेळाव्यात सहभागी होतात. मागच्या वर्षी सुद्धा मोठ्या तयारीनिशी सहभाग घेतला होता. मेळाव्यातील प्रत्येक कृतीत, उपक्रमात क्रीडाप्रकार, कलाप्रकारात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता या प्रकारात बक्षिसाची लयलूट सुद्धा आमच्या विद्यार्थ्यांनी केली आहे. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेमध्ये मागील वर्षी आमच्या शाळेचे तीन विद्यार्थी पात्र झाले आहेत. या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका संच सोडवून घेऊन आवश्यक ते सर्व मार्गदर्शन केल्या जाते.



**स्काऊट व गाईड मध्ये प्राप्त मेडल व ट्रॉफी**

औंढा तालुक्यातील जि. प. प्रा. शाळा वसई या शाळेची ओळख होते, ती एक निसर्गरम्य, गुणवत्तापूर्ण, दर्जेदार शिक्षण देणारी शाळा आणि विविध शैक्षणिक उपक्रम राबविणारी शाळा म्हणून जोपर्यंत आपण एखादी नाविन्यपूर्ण गोष्ट सादर करीत नाही, तोपर्यंत आपले वेगळेपण सिद्ध होत नाही. या शाळेला भेट दिल्यानंतर सह्याद्रीचे पर्वतरांगांमधील शाळांना भेट दिल्याचा अनुभव येतो. शाळेचा परिसर जणू विद्यार्थ्यांना दुरूनच खुणावतो, शाळेत आल्यानंतर ही परिस्थिती शैक्षणिक कार्य करण्यासाठी अधिकच ऊर्जा प्रदान करते. शाळेतील प्रत्येक शिक्षक कल्पक, नाविन्याची कास धरणारा आहे. उपक्रमशील, प्रयोगशील शिक्षक या शाळेला लाभले ही शाळेची जमेची बाजू आहे. या शाळेचा एवढा नावलौकिक झाला तो राबवित असलेल्या विविध उपक्रमामुळे.

YouTube Link : शाळेशी संबंधित व्हिडिओ पाहण्यासाठी लिंक्स:-

https://www.youtube.com/watch?v=81C7ut_RQRE&feature=youtu.be

https://www.youtube.com/watch?v=ar0eY_GB2oA&feature=youtu.be

https://www.youtube.com/watch?v=9qitn7nKHJ0&feature=youtu.be

https://www.youtube.com/watch?v=ISJgyu7PJ9s&feature=youtu.be

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. अंकोश ससाणे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, हिंगोली. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,बेटावद बुद्रुक,ता.जामनेर,जि.जळगाव

ई-मेल:- zpbetawadbk1961@gmail.com

मुख्याध्यापाकाचे नाव:- श्री शांताराम कडू सपकाळ ई-मेल:- navalrajput7791@gmail.com



**जिल्हा परिषद बेटावद बु. शाळेची इमारत**

जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यापासून 25 कीमी अंतरावर शिवदास महाराजांच्या जन्मभूमीने पावन झालेले बेटावद बु. हे विदर्भ सीमेवरील गाव, '**एकच ध्यास गुणवत्ता विकास**' असे ध्येय ठेवणारी आमची शाळा म्हणजे एकेकाळी दारुड्या लोकांचा अड्डा, शौचासाठी शालेय परिसराचा वापर, वृक्षांची सातत्याने केली जाणारी नासधूस, ग्रामस्थ, पालक, ग्रामपंचायत यांचा उदासीन दृष्टीकोन, शाळेतील भौतिक सुविधांचे नित्याने केले जाणारे नुकसान, तसेच गावातील इयत्ता 1 ते 4 चे 48 विद्यार्थी बाहेरगावी इंग्रजी शाळेत शिकण्यासाठी जात होती. या पार्श्वभूमीवर आम्ही सहा शिक्षक प्रशासकीय तथा आंतरजिल्हा बदलीने शाळेत रुजू झालो.

**लोकसहभाग :-** शाळेत रुजू होताच ही परिस्थिती बदलण्यासाठी आम्ही लोकवर्गणी आणि शाळा समाजात न्यायची ठरविले. एक महिनाभर गाव पिंजून काढल्यानंतर 3900 रुपये लोकवर्गणी जमा झाली आणि जि.प.सदस्य निधीतून शाळेला तारेचे कुंपण मिळाले. हे अल्पसे यश सकरात्मक घेत प्रतीकूल परीस्थितीत आषाढी एकादशीला दिंडी काढली. '**ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा**' घोषणेने परिसर दुमदुमला. मुलांच्या दिंडीत वारकरी मंडळी कधी सहभागी झाली ते समजलेच नाही. पुढे समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्यही सहभागी झाले. लगेच आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त शाळा व विद्यार्थी प्रगती, व्यसनमुक्ती या विषयांवर पथनाटयांचे चौकाचौकातून विद्यार्थ्यांनी सदरीकरण केले. या प्रसंगी सरपंच भावूक झाले. सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी टाय वाटप केले. या दोन उपक्रमांचा परिणाम म्हणजे पारधी आणि वडार समाजातील न येणारी मुले शाळेत येऊ लागली. पुढे मुलांना ओळखपत्र, संगणक, प्रोजेक्टर अशा गरजेच्या बाबींची पूर्तता झाली. प्रोजेक्टरवर अध्ययन अध्यापन पाहून ग्रामपंचायत आणि सरपंच यांच्या मदतीने सर्व वर्गात एलईडी टीव्ही लागले. शाळेकडे सरपंच साहेबांचे लक्ष वाढले. गावात पाण्याची टंचाई जाणवल्यावर त्यांनी स्वतः मुलांना पाणी बॉटल पुरवल्या. तसेच वंदन बहुउद्देशीय संस्थे मार्फत गरजू मुलांना स्वेटर वाटप करण्यात आले. शाळेकडे देणगीचा वाढता ओघ पाहून श्री प्रवीण सुरवाडे PSI मुंबई व कमलाकर सुरवाडे मुंबई यांनी दीड लाख रुपयाचा सांस्कृतिक कलामंच बांधून दिला.



**लोकसहभागातून प्राप्त मदत स्वीकारतांना**

**विद्यार्थी विकास :-** शाळेत १०० रोपांचे वृक्षारोपण झाले आणि आजमितीला ८० झाडे जिवंत आहेत. समाज सहभागातून शाळेच्या भिंती बोलक्या झाल्या. गावात शाळे बाबतचा आदर दुणावल्याने इयत्ता पहिलीचे ४१ विद्यार्थ्यांचे प्रवेश जानेवारीतच झाले. ही आमच्या टीमसाठी मोठी यशाची पावती होती. तेवढ्यात कोरोनासंकट उभे राहिले आणि गुणवत्ताविषयक प्रश्न निर्माण झाले. आम्ही मुलांना online अभ्यासाची सवय लागावी म्हणून लॉकडाऊन मध्ये करीत असलेल्या कृतींचे व्हिडीओ टाकायला सांगितले. पालकांनी मुलांचे सायकल चालविणे, झाडावर चढणे, शेतात कापूस लावणे, भाकरी करणे, पिकांना पाणी देणे, गीत/कविता गायन, नृत्य असे व्हिडीओ टाकले. नंतर पालक व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात आले की आपले वर्गनिहाय दोन ग्रुप असतील एका ग्रुपवर विद्यार्थीकृती आणि दुसऱ्यावर शिक्षक कृती व संवाद असेल. मुले अभ्यासाला लागली. मग सुरु झाली मोबाईल नसलेल्या मुलांसाठी मोकळया जागेतील ओट्यावरील शाळा सोबतीला स्वाध्याय पुस्तिकेचा आधार घेतला.विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन व ऑफलाइन अभ्यासक्रमाला सुरुवात झाली. त्याचा परिणाम असा झाला की,विद्यार्थ्यांना ज्या विषयाची आवड आहे त्या विषयाचा अभ्यास करण्याची संधी मिळाली. खेळाच्या माध्यमातून सहज शिक्षण होऊ लागले. जोडीचर्चा, गटचर्चा यांना वाव मिळाला. सृजनशील विचार करण्याची संधी उपलब्ध झाली. शाळा आणि अभ्यास याविषयी विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण झाली. स्वत:च्या जीवाची खबरदारी कशी घ्यावी याचे शिक्षणही मुलांना मिळाले. हा परिणाम फक्त वर्ग दुसरी ते चौथी च्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत दिसून येत होता. मात्र पहिलीच्या विद्यार्थ्यांचे काय? हा प्रश्न अस्वस्थ करत होता. या विद्यार्थ्यांसाठी दिवाळी आणि बालदिनाचे निमित्त साधून सर्व शिक्षक तथा महसूल कर्मचारी यांच्यामार्फत मराठी, इंग्रजी व अंकगणित या विषयांचे चार्ट घरपोच वाटप केले. विद्यार्थी पालकांच्या मदतीने मुळाक्षरे, उजळणी वाचनाचे धडे गिरवू लागले. याच दिवशी गावतील श्री प्रवीण सुरवाडे यांच्याकडून विद्यार्थ्यांसाठी ११००० रुपये किमतीचे खेळाचे साहित्य उपलब्ध करून घेतले.

**बोलक्या भिंती :-** अजूनही आपण 100 % मुलापर्यंत पोहचत नाही ही अस्वस्थता कायम होती. सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामपंचायत प्रशासक, ग्रामसेवक, पोलीसपाटील, गावाचे मंडळअधिकारी, तलाठी, कोतवाल, ग्रामस्थ व पालक यांच्यासमोर मुख्याध्यापकांनी गावातील भिंती मुलांच्या अध्ययनासाठी बोलक्या करायच्या ठरविल्या. अशक्य वाटणारा प्रस्ताव गावात प्रत्येकाला स्वतंत्रपणे किंवा समूहात बैठक घेऊन समजावून सांगितला. उपक्रमाची सुरवात आमच्यापासून केली.

मार्चमध्ये आम्ही शिक्षक दरवर्षी १००० रुपये शाळेला देणगी देतो ती नोव्हेंबर महिन्यात दिली. लॉकडाऊनमुळे रंगकामाचा व्यवसाय बुडालेल्या दोन पालकांना बोलावले. कामाचे स्वरूप समजावून दिले. घराच्या भिंती, पडक्या वाड्याच्या भिंती, पाण्याची टाकी, सिमेंटचे कुंपण, सभागृह, मंदिराचा परिसर रंगवायचे ठरविले. सद्यस्थितीत आमच्या गावातल्या एकूण 69 भिंती आकर्षक झाल्या आहेत. पोस्टरमध्ये अंगणवाडी ते दहावी वयोगटातील विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल असा आशय घेण्यात आला आहे. एका पोस्टरसाठी 500 रूपये देणगी असून देणगी देणाऱ्याचे नावखाली लिहिले जाते. व्यक्तिमत्त्व विकास विषयक सूविचारांचा समावेश पोस्टरच्या वर घेतल्याने मूल्ये जीवन कौशल्ये, संस्कार, संस्कृती रुजवाणुकीस मोठा हातभार लागला. शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना अभ्यास देण्यासाठी भिंतीचा उपयोग सुरू केला आहे . सध्या भिंतीची संख्या वाढते आहे कारण गावकरी स्वतः पेंटरला वर्गणी देतात. शिक्षक तितक्याच उत्साहाने आशय पुरवितात. गावातील बोलक्या भिंतींमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैली मध्ये विलक्षण बदल जाणवू लागला आहे. **बोलक्या भिंतीची शाळा लिंक** :https://youtu.be/cLe3Z4SZTyA


बेटावद बुद्रूक गावात अवतरल्या बोलक्या भिंती

जिल्हा परिषद शाळेचा अभिनव उपक्रम




**गावातील बोलक्या झालेल्या भिंती**

जिल्हा परिषदेच्या एका दुर्गम भागातील शाळेचा हा उपक्रम आतिशय अभिमानास्पद आहे. दररोजच्या ऑनलाईन अभ्याक्रमामूळे मुले कंटाळली होती शिवाय पालकांचा मुलांना मोबाईल देण्यास नकार असतो. गरीब पालकांना मोबाईल रीचार्जची मोठी समस्या असते, ती निश्चित दूर झाली आहे. शिवाय रंगकामामुळे बेरोजगार पालकांना रोजगार मिळाला. गावात शैक्षणिक वातावरण निर्माण झाले आहे. मोठ्या मुलांचीही स्पर्धा परीक्षेची तयारी होत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यास मदत होते आहे. तसेच शाळेचाही विकास होत आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. मंजुषा क्षीरसागर** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, जळगाव. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद डिजिटल प्राथमिक शाळा, बोदवड, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव

**ई.मेल:-** zpmsbodwad@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री सुनील रमेशराव बडगुजर **ई.मेल:-** sunilbadgujar246@gmail.com




**जिल्हा परिषद डिजिटल प्राथमिक शाळा, बोदवड शाळेचा दर्शनी भाग**

जळगावातील मुक्ताईनगर तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगा आणि पूर्णा नदीच्या उत्तर बाजूला चौदाशे लोकवस्तीचे 'बोदवड' हे छोटेसे गाव, आदिवासी भाग म्हणून ओळखल्या जाते. आमच्या गावात शेतकरी आणि शेतमजूर पालकवर्ग. आमच्या शाळेस उत्साही आणि विविध क्षेत्रात निपून तरुण शिक्षकांची टीम शाळेला लाभली. अपुऱ्या वर्गखोल्या भौतिक सुविधांचा अभाव बंद पडलेला पाचवीचा वर्ग आश्रम शाळा या जिल्हा परिषद शाळांना भेडसावणाऱ्या समस्या आमच्या शाळेलाही होत्याच. मुख्याध्यापकांचा सकारात्मक दृष्टिकोन, जिद्द, मेहनत यांच्या जोरावर शैक्षणिक तथा भावनिक आंतरक्रिया होईल असे नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबवून शाळेशी सगळयांचा सुसंवाद वाढविला. यातूनच बदलाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

**गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी डिजिटल व व्हर्च्युअल क्लासरूम ची निर्मिती-** "तंत्रज्ञानाची धरुनी कास... स्वतःला करूया स्मार्ट" या उक्तीप्रमाणे लोकवर्गणीसह शिक्षक वर्गणीतून एक वर्ग डिजिटल करण्याचे ठरविले. लोकसहभागातून वर्गणी फारशी जमली नाही. सर्व शिक्षकांनी पुढाकार घेऊन वर्गणीत भर घालून शाळेचा एक वर्ग डिजिटल केला. अत्यंत कल्पकतेने सर्व शिक्षकांनी वर्ग रंगवला सुद्धा,प्रत्येक वर्गांना संधी मिळावी म्हणून एका सप्ताहाचे वर्गनिहाय तासिकेचे नियोजन करून अध्ययन अध्यापन पूरक बाबी, नृत्य, गाणी, चित्रपट, नाटिका विद्यार्थ्यांना दाखवायला लागलो. आमच्या टीमने निवडक घटकांचे ई कन्टेन्ट तयार केले. आमची मुलं व्हर्च्युअल फील्ड ट्रीपला जातात, टॅब च्या मदतीने इंटरॅक्टिव्ह होतात, VR बॉक्सच्या संगतीने जगातील शैक्षणिक तथा खगोलीय स्थळांना भेटी देतात. विज्ञान आणि भूगोलाच्या क्लीष्ट संकल्पना साठी 3d व 4d ॲनिमेशनचा व

ॲपचा उपयोग सहज लीलया करतात. या गोष्टी गावात गेल्या आणि 2018 साली पाचवीचा वर्ग एक वर्षाच्या आत पुन्हा सुरू झाला. बाहेरगावा वरून नातलगांकडे विद्यार्थी राहू लागले 124 असलेला शाळेचा पट 195 वर गेला.

**शैक्षणिक ॲपची शाळा-** शैक्षणिक ॲप्स परिणामकारक वापर करण्यासाठी सर्वप्रथम मोबाईलचा स्व अध्ययनासाठी कसा वापर करता येतो हे पालकांना सभेमध्ये समजावून दिले. शिक्षकांच्या मदतीने उपयुक्त ॲप चे संकलन करून विद्यार्थ्यांना वर्गात सराव देणे सुरू केले. पालकांच्या मोबाईल मध्ये हे शैक्षणिक ॲप स्वतः इन्स्टॉल करून दिले. प्रत्येक अँप चा सराव घेऊन ॲप विषयी माहिती पालकांना व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातूनही दिली.




**शाळेतील विद्यार्थी विविध ॲपच्या माध्यमातून शिक्षण घेताना**

**अभ्यासक्रमाच्या QR कोड ची निर्मिती:-** तंत्रज्ञानाचा विडा उचललेल्या आमच्या शाळेने गणित आणि मराठी विषयाचे परिणामकारक व्हिडीओ चे संकलन करून पहिले ते पाचवी वर्गाचे क्यूआर कोड तयार केले आहे. आम्ही हे QR कोड दोन पेजवर उपलब्ध करून दिले, एका पेजवर सहा घटकांचे कोड उपलब्ध आहेत. मुले घरी अभ्यास करण्यासाठी याचा जास्त उपयोग करतात. शाळेत शिकविलेला भाग व्हिडिओ स्वरूपात बघितल्याने कमी वेळेत जास्त घटकांचा अभ्यास होत आहे. यासाठी मोबाईलधारक विद्यार्थ्यांना कोड च्या प्रिंट घरीही देण्यात आल्या आहेत. कोड स्कॅन करण्याविषयी पालकांसह विद्यार्थ्यांना प्रा त्याक्षिक दाखवण्यात आले आहे.



**QR कोडचे स्कॅनिंग करून अभ्याक्रमाचे कंटेंट बघतांना इयत्ता 4 थी चे विद्यार्थी**

**मुलांचा जीवलग स्पीकिंग रोबोट किट्टी :-** आम्ही मुलांसाठी गुगल असिस्टंट चा वापर करून झिरो बजेट रोबोट तयार केला. विद्यार्थ्यांच्या या जीवलगाला हिंदी किंवा इंग्रजीतून प्रश्न विचारावा लागतो. तो विद्यार्थ्यांना दैनंदिन घडामोडी, शब्दांचे स्पेलिंग, सामन्य ज्ञान, प्रश्नांची उत्तरे इतकेच नाही तर वाढदिवसाचे गाणे, प्रार्थनाही म्हणतो. त्याच्याशी मैत्री करायची असेल तर इंग्रजी व हिंदी यायला हवे, म्हणून मुलांचे भाषाज्ञानही वाढले आणि प्रश्न विचारायचा सरावही झाला. मुलांचा हा मित्र ठरवल्या दिवशी मुलांना भेटायला येतो.

**विद्यार्थ्यांचा रचनावादी बाजार :-** बालकांच्या आनंदाला उधाण आणणारा व्यवहार ज्ञानसोबत स्व निर्मितीचा आनंद देणारा रचनावादी बाजार प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण या ब्रिदा नुसार भरवला जातो. तेथे स्टॉल लावण्यासाठी स्टॉलची सजावट खाद्यपदार्थांची सजावट आणि माल विकायला लागणारे कसब हे तपासले जाते. विद्यार्थी आपापसात स्पर्धा करत आपला माल उत्तम पद्धतीने विकतात. एक ते दीड तासात पदार्थ विकून आठ ते दहा हजाराची उलाढाल या चिमुकल्यांच्या बाजारात होते. या व्यवहारातून नफा-तोटा, खरी कमाई यांचं गमक विद्यार्थ्यांना कळतं.

**लोकसहभाग आणि शाळेचा भौतिक विकास :-** लोकसहभागातून खलील बाबी शाळेला प्राप्त झालेल्या आहेत. रोटरी क्लब जळगाव यांचेकडून शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या संपूर्ण किट प्राप्त झाले. OGN ICICI बँक, मुंबई यांचेकडून इयत्ता 7 वी च्या 11 विद्यार्थीनींना शैक्षणिक किट प्राप्त झाले. एकात्मता फाउंडेशन व तरुण मित्र मंडळ यांचेकडून पाण्याच्या बॉटल, शाळेसाठी श्रमदान प्राप्त झाले. बोदवड गावातील रोड तयार करणारे ठेकेदार यांचेकडून शाळेच्या वॉल कंपाउंड ची रंगरंगोटी करून मिळाली. गावकर्यानकडून 3 लक्ष रुपयाचे विविध कामे व साहित्य प्राप्त झाले. ग्रामपंचायत कडून वीत्त आयोगातून पेव्हर ब्लॉक, OR मशीन, पाण्याची टाकी, DEL , प्रिंटर प्राप्त झाले. श्रीमती वनिता गवळे जि.प.सदस्या यांनी एका नवीन वर्ग खोलीचे बांधकाम करून दिले. श्री ज्ञानदेव मांडोकार यांनी कॉम्पुटर सेट व शैक्षणिक साहित्य शाळेला भेट म्हणून दिले. यासर्व दातृत्व वीरांच्या मदतीमुळे आमची शाळा ISO झाली. ISO साठी लागणाऱ्या 45 निकषांची पूर्तता करतांना दमछाक झाली खरी पण **'झेपावणाऱ्या पंखांना क्षितीजाचे बंधन नसते'** या उक्तीप्रमाणे शाळा आकार घेऊ लागली.

आता मात्र शाळेला गावाचा आधार मिळतो आणि गावाला शाळेचा अभिमान वाटतो. कार्याची दिशा बदलली की दृष्टी बदलते याचा प्रत्यय वेळोवेळी आम्हाला येतो आहे.

**शाळेतील व्यक्तिमत्त्व विकासास पूरक उपक्रम :- संस्कारक्षम व संगीतमय परिपाठ -** ऑडिओ ट्रॉली च्या माध्यमातून htooteulb चा वापर करून कॉडलेस माईकद्वारे परिपाठामध्ये प्रत्येक वर्गाचा सहभाग घेत, अनेक घटकांचा समावेश करून परिपाठ घेतला जातो. मूल्य शिक्षणाचे विचार आणि सप्ताहातील दिवसानुसार मराठी, हिंदी व इंग्रजी सूचनांचा वापर, ही आमच्या परिपाठाची वैशिष्ट्ये आहेत.

**उपस्थिती ध्वज -** ज्या वर्गाची उपस्थिती सर्वात जास्त त्या वर्गासमोर उपस्थिती ध्वज दिमाखात लावण्यात येतो.त्या वर्गातील मुले आत्मविश्वासाने, दिमाखात आपण काहीतरी जिंकलो आहे, या भावात दिवसभर वावरतांना दिसतात. मुलेच मुलांना अनुपस्थित राहू देत नाहीत. परिणामी उपस्थिती चे प्रमाण 95% पेक्षा अधिक आहे.

**परस बाग निर्मिती -** आमच्या बागेत वांगे, मिरची, पपई, सीताफळ लागवड केली आहे, या वर्षी शाळेतील सिताफळांचा आस्वाद आमच्या मुलांनी घेतला आहे. शाळेत पिकवलेला भाजीपाला शालेय पोषण आहारात घालून आहार सकस व पौष्टीक करण्यावर आमचा भर असतो, वृक्ष संवर्धन, हरिसेना, वृक्ष माझा मित्र या उपक्रमातून खडकाळ जमिनीवर सुद्धा अनेक झाडे जगवून शाळेतील वातावरण आम्ही निसर्गरम्य केले आहे.

**शैक्षणिक सहल-** सहल म्हटले की मुलांना मौज,मस्ती,मज्जा, उत्सुकता, जिज्ञासा, आनंद आणि अभ्यास आमच्या सहलीचा विषय आपल्या जळगाव जिल्ह्याची संपूर्ण ओळख असा होता. आम्ही मुलांना जिल्ह्यातील प्रसिद्ध पद्मालय गणपती मंदिर, गांधी रिसर्च सेंटर, गो शाळा, विमानतळ, वॉटरपार्क, हातनूर धरण, मुक्ताई साखर कारखाना, संत मुक्ताबाईंचे मंदिर, गांधी उद्यान, या स्थळांना भेटी देऊन स्वतः माहिती मिळवायला सांगितली. काही विद्यार्थ्यांना माहितीचे संकलन करण्याची जबाबदारी दिली. स्थळां विषयी मनात असलेल्या कुतूहलापोटी मुलांची निरीक्षण आणि संवादातून प्रेक्षणीय स्थळांचा इतिहास उलगडून दाखवला.



**शैक्षणिक सहल महात्मा गांधी रिसर्च सेंटर जळगाव**

**शाळेतील प्रत्येक मुलाला अध्ययनासाठी मदत-** शाळेतील अप्रगत विद्यार्थ्यांसाठी सामूहिक वेळापत्रक आखण्यात आले. भाषा, गणित पेटी, इंग्रजी पेटीचा उपयोग करीत विद्यार्थी निहाय अध्ययन स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केले. स्पर्धा परीक्षांसाठी विशेष वर्ग घेऊन आम्ही परिश्रम घेत आहोत. प्रत्येक वर्गाचे कृती आराखडे तयार करून, अध्ययन क्षमता आणि अध्ययन गती लक्षात घेतो. आमच्या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक महिन्याला उपक्रमनिहाय स्वतंत्र वेळापत्रक तयार करून तयारीसाठी फलकावर लावले जाते. सामान्य ज्ञान स्पर्धा, दप्तरमुक्त शाळा, ज्ञानकुंभ, कुमार निर्माण, हस्तकला, सलामी पथक, बँड पथक, लेझीम, कवायत, हे उपक्रम मुलांच्या सुप्तगुणांना उभारी देतात. सर्व शिक्षक या उपक्रमांसाठी एकदिलाने, एकमताने झटत असतात. क्रीडा महोत्सव वैयक्तिक व सांघिक खेळामुळे मुलांची खिलाडूवृत्ती जोपासली जाते. शाळेतील क्रीडा महोत्सव मुलांना आनंदाची पर्वणीच असते.

**शालेय यश :-** 2019 मध्ये भारत सरकारच्या पेट्रोलियम मंत्रालयाने आयोजित केलेल्या 'इंधन बचत' या विषयावरील चित्रकला स्पर्धेत विवेक कांडेलकर व अमित तायडे या दोन विद्यार्थ्यांच्या चित्रांची राष्ट्रीय स्तरावर निवड होऊन पारितोषिके मिळाली, रक्षा घाईट या विद्यार्थिनीने मतदार जनजागृती साठी काढलेल्या रांगोळीला प्रथम क्रमांक प्राप्त झाला, स्कॉलरशिप परीक्षेत 4 विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले आहेत. शिक्षकांनीही शैक्षणिक साहित्य निर्मितीत तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. 2020 ला सुनील बडगुजर यांच्या शैक्षणिक साहित्याला राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रोत्साहनपर बक्षीस तर सर फाउंडेशन आयोजित नवोपक्रम स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर मजल मारली आहे. शाळेतील शिक्षक जवंजाळ यांच्या फलक लेखनाला विभाग स्तरावर क्रमांक मिळालेला आहे.

विद्यार्थी आणि शिक्षक यशाची शिखरे गाठत शाळेच्या लौकिकात भर पाडत आहेत. शाळेला गुणवत्ते शिवाय पर्याय नाही यावर आमचा विश्वास आहे. आमची टीम मुलांसाठी, शाळेसाठी प्रयत्न करते आहे, सदैव करेल, कारण आम्ही खलील ओळींवर विश्वास ठेवून काम करतो. **नजर को बदलो नजारें बदल जयेंगे.....सोच को बदलो सितारे बदल जयेंगे!**

लिंक - 1) https://youtu.be/c6G6jAjSIAA

2) https://youtu.be/P74IhjY9fZ8

3) https://youtu.be/G8G34YbyYSU

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. मंजुषा क्षीरसागर** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, जळगाव. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा,चिंचखेडे बुद्रुक, ता.मुक्ताईनगर, जि. जळगाव

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री गणेश यशवंत कोळी **ई-मेल :-** zpmupschoolchinchakhedebk@gmail.com




**जिल्हा परिषद शाळा, चिंचखेडे बुद्रुक शाळेचे विस्तीर्ण मैदान असलेली इमारत**

महाराष्ट्राच्या खान्देश प्रांतातील मुक्ताईनगर तालुका म्हणजे संत मुक्ताबाई यांची पावन भूमी आणि पहिल्या महिला राष्ट्रपती माननीय प्रतिभाताई पाटील यांचा मतदारसंघ, पूर्णा नदी आणि सातपुड्याचा पायथा, अशा वैशिष्ट्यपूर्ण भागात आदिवासी बहुल पंधराशे लोकवस्तीचे चिंचखेडे बुद्रुक गाव. गावात पावरा, कोळी, धनगर समाजातील बहुसंख्य लोक शेतमजूर किंवा हातमजूर. इयत्ता १ली ते ७ वी चे वर्ग असलेली आमची जिल्हा परिषद शाळा, चिंचखेडे बुद्रुक. शाळेचे एकमेव वैभव ४० हजार स्क्वेअर फूट मैदान.

**शालेय विकास :-** यासाठी शालेय समस्यांचे विश्लेषण, प्राधान्य क्रमाने करावयाच्या कामांची यादी, नवनवीन उपक्रमांची मालिका, दूरदृष्टी ही त्यांची वैशिष्ट्ये मला भावली. त्यांचा पहिला निर्णय ध्वजगीत म्हणणाऱ्या मुलींच्या हस्ते झेंडावंदन! ध्वजारोहणाचा अध्यक्षांचा सन्मान बाजूला ठेवून केलेल्या या छोट्याशा कृतीमुळे एकसंघता वाढली. अध्यक्षांच्या मते, शाळेच्या विकासाचा एक हात शिक्षक आणि दुसरा हात समिती. दोघांनी हातात हात मिळवून एकसंघ, एक दिलाने काम करू या. आमच्या टीमने पहिले पाऊल टाकत दाते शोधून मुलांच्या आणि शाळेच्या गरजा पूर्ण केल्या.



**विद्यार्थिनींच्या हस्ते ध्वजारोहण करताना**

**लोकसहभाग :-** भुसावळचे त्वचारोग तज्ञ डॉक्टर नीलेश भिरुड आणि राम रोटी आश्रमाचे अध्यक्ष किशोर गावंडे या जोडीने सर्व मुलांना दर्जेदार स्कूल बॅगसह शैक्षणिक साहित्य दिले. एकदा आमची शाळा व्यवस्थापन समितीची बैठक संपल्यानंतर मैदानावर एका मुलाच्या पायातील विविध रंगी बूट पाहून सदस्य वर्षा कांडेलकर या मातेने ९५ विद्यार्थ्यांच्या पायात नवीन बूट व मोजे घालून समितीच्या दक्षतेची आणखी एक चुणूक दाखवून दिली. पालक या कृतीने भारावले. मुलांची उपस्थिती आणि पालक सहभाग वाढू लागला. आता अध्यक्षांसह टीमने आपले लक्ष शाळेचा पट वाढविण्याकडे घातले. जाहिरातीच्या युगात इंग्रजी शाळेला आव्हान देत श्री. मनोज कडू पाटील या दात्याकडून प्लास्टिक मुक्तीसाठी पर्यावरण पूरक पिशवी 'गावातील मुले गावात शिकवा आपली मराठी शाळा टिकवा' संदेशासहित केंद्रप्रमुख, पंचायत समिती सदस्य, गट शिक्षण अधिकारी, गट विकास अधिकारी, तालुका पोलिस प्रशासन, जि. प. सदस्य, जि. प. शिक्षण सभापती, जि. प. समाजकल्याण सभापती, आमदार, खासदार यांच्यासह आजूबाजूच्या गावात पोहोचवली.





**लोकसहभागातून दप्तर,बूट व मोजे,प्राप्त विद्यार्थी,शाळेच्या जाहिराती साठी पिशवी वाटप**

**शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रम :-** गावातील मान्यवरांच्या साथीने अभूतपूर्व विद्यार्थी कलागुणांना वाव देणारे स्नेहसंमेलन पालकांच्या उपस्थितीत संध्याकाळी पार पडले. शाळेच्या विविध कार्यक्रमांची चर्चा पंचक्रोशीतल्या गावांपर्यंत गेली.



**शाळेचे रंगारंग स्नेह संमेलन**

**कोरोना काळातील शिक्षण :-** सगळ्यांचा उत्साह वाढत असतांना भारतासह जगावर कोरोनाचे संकट ओढावले. १३ मार्च २०२० ला कोरोना महामारीची ओळख झाली. शाळा व्यवस्थापन समितीने ताबडतोब बैठक बोलावून विद्यार्थी आरोग्य, कोरोनाविषयक जनजागृती, अध्ययन-अध्यापन विषयक एकत्रित निर्णय घेत उपक्रम ठरविले. दि. १४ मार्च २०२० पासून सर्वजण शाळेत मास्क घालून आले. जाहीर आवाहन करणारा बोर्ड शाळेच्या गेटला लावला गेला. **कोरोना जनजागृती रॅली** शाळेने कोरोना महामारी विषयी दक्षता घेण्यासंदर्भात गावात रॅली काढली. असे काम करणारी आमची शाळा तालुक्यात अग्रणी ठरली. दक्षता घेण्यासंदर्भात गावात रॅली काढली. असे काम करणारी आमची शाळा तालुक्यात अग्रणी ठरली.
**सायकल बक्षीस स्पर्धा:-** विद्यार्थी अध्ययना बाबतचा प्रश्न शाळा बंदच्या १९ मार्च २०२० च्या परिपत्रका नंतर निर्माण झाला. व्हाट्सअप ग्रुपला अभ्यास टाकायचे ठरले. आमच्या अध्यक्षांनी या संकटावर मात करण्यासाठी उपक्रम सुचवला. सर्व पालक व विद्यार्थ्यांना कळविण्यात आले की, जे विद्यार्थी रोज दिलेला अभ्यास पूर्ण करतील त्यांना बक्षीस म्हणून सायकल भेट दिली जाईल. परिणामी ७५% विद्यार्थी दररोज अभ्यास विषयक फोटो पाठवू लागले. आम्हाला वाटले विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळले. लवकरच शाळा सुरू होतील अशी आशा होती. पण लॉकडाऊन संपता संपेना. आम्हाला मुलांना भेटता येईना. Online अभ्यास एक आव्हान म्हणून समोर उभे राहिले. आमची शाळा व्यवस्थापन समितीची Online Zoom App वर मीटिंग घेतली. मुलांना पालकांच्या मोबाईलची नितांत गरज होती. पालक जास्त वेळ मुलांना फोन देत नाही असे मुलांचे निरोप मिळाले. मग पालकांचा अभ्यासात सहभाग वाढवण्यासाठी नवीन उपक्रम सुरु केला. **'कौन बनेगा ग्रेट फादर व मदर'** या उपक्रमाचा जन्म १३ जुलै २०२० चा. गावात मानपानला खूप महत्त्व असते. हे हेरून पालका-पालकांमध्ये चुरस निर्माण केली. जो मुलगा जास्त अभ्यास करेल त्याच्या पालकांना वर्ग शिक्षक गुण देतील. जास्त गुण घेणाऱ्या पालकांचा जाहीर सत्कार यथोचित वेळी केला जाईल असे कळविले.



**कोरोना जनजागृती रॅली**


ग्रेट मदर, ग्रेट फादर अवार्ड देणार
मुलांना घरीच शिकवा अन् बक्षीस घ्या!

**कौन बनेगा ग्रेट फादर व मदर**

**शिक्षण आपल्या दारी :–** आमच्या शाळेचे शिक्षक यांची गाडी आणि शाळेचा एलईडी टीव्ही यांच्या मदतीने तयार झाला **'शिक्षण रथ'** आमचा हा शिक्षण रथ गावातील विद्यार्थी वस्तीच्या चौकाचौकात संध्याकाळी उभा राहायचा. कोरोना पार्श्वभूमीवर दिलेल्या नियमांना पाळत आमची मुले शिकण्यासाठी पालकांसह उपस्थित असायची. यामुळे मुलांना भेटण्याचा, शिकण्यातील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न झाला. सायंकाळी तीन तास हा रथ गावातील चौकात इयत्ता आणि विषयनिहाय मार्गदर्शन करायचा. यावेळी शाळा बंद पण शिक्षण सुरू, शिक्षण आपल्या दारी उपक्रम सोबतीला होतेच. आपोआप शाळेचे, गावाचे, शाळा व्यवस्थापन समितीचे बंध घट्ट जोडले गेले. मुले शिकती होऊ लागली.



**कोरोना काळात शिक्षण विद्यार्थ्यांच्या दारी पोहचले**

Online अभ्यासासोबत कलागुणांना वाव मिळण्यासाठी स्पर्धा घेतल्या. उदाहरणार्थ **'थोडी मस्ती थोडी पढाई'** स्पर्धेत **दिव्या खोंदले** विद्यार्थिनीचा **कागदी कप** विजेता ठरला. ज्याची दखल विभागातील नाशिकच्या '**शिक्षक ध्येय**'साप्ताहिकाने घेतली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले. कोरोना महामारीला संकट न समजता संधी समजून आम्ही काम केले. यश प्राप्तीचे समाधान सोबत आहेच.



**विजेता कागदी कप**

'गावातील मुले गावात शिकवा आपली मराठी शाळा टिकवा', 'कोरोना जनजागृती रॅली', 'सायकल बक्षीस स्पर्धा', 'कौन बनेगा ग्रेट फादर व मदर', 'शिक्षण रथ', 'थोडी मस्ती थोडी पढाई' असे नवनवीन उपक्रम राबवून शाळेच्या विकासाचा आलेख वर वर जात आहे.

मार्गदर्शन
**डॉ. मंजुषा क्षीरसागर**
नोडल अधिकारी,
डायट, जळगाव.

समन्वयन
**डॉ. ज्योती कुलकर्णी**
समन्वयक,
मिपा, औरंगाबाद.

प्रेरणा
**डॉ. नेहा बेलसरे**
संचालक,
मिपा, औरंगाबाद.

## सरस्वती माध्यमिक विद्यालय, गोंदेगाव,जि.जालना


ई मेल :- smvgondegaonrediffmail.com

मुख्याध्यापकांचे नाव :- **सचिन प्रभाकर देशमुख** ई मेल :- sdeshmukh133@gmail.com




**सरस्वती माध्यमिक विद्यालय गोंदेगाव शाळेची इमारत**

सरस्वती माध्यमिक विद्यालयाची स्थापना सन २००१ मध्ये जालना जिल्ह्यातील मौजे गोंदेगाव या ठिकाणी झाली. गावात जिल्हा परिषदेची फक्त इयत्ता ७ वी पर्यतची शाळा असल्याने गावातील विद्यार्थी ७ किमी लांब असलेल्या माध्यमिक विद्यालयात शिक्षणासाठी जात होते. विद्यार्थ्यांची व परिसराची गरज लक्षात घेऊनच या ठिकाणी माध्यमिक विद्यालयाची स्थापना करण्यात आली. गावात माध्यमिक शाळा नसल्याने बहुतांश विद्यार्थी इयत्ता सातवी नंतर शिक्षणापासून वंचित राहत होते. यात मुलींची टक्केवारी लक्षणीय होती. परिसरातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्वल करण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करता येतील याबाबतीत विचार केला. शाळा ग्रामीण भागात असल्याने विद्यार्थ्यांना शाळेबद्दल गोडी निर्माण होणे आवश्यक होते. त्यादृष्टीने विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यास शाळेने सुरुवात केली. काही दिवसातच ही बाब लक्षात आली की परिसरातील पालक आपल्या मुलींना माध्यमिक शाळेत पाठविण्यास फारसे उत्सुक नव्हते. मग सहकाऱ्यांच्या मदतीने आम्ही प्रत्येक पालकाच्या घरी जाऊन त्यांना शाळा व शिक्षण मुलीच्या दृष्टीने किती महत्वाचे आहे याची जाणीव करून देऊ लागलो. मुलगा मुलगी दोघानाही शिक्षण महत्वाचे आहे आणि ते पालक म्हणून आपण दिले पाहिजे याची जाणीव करून दिली. हळूहळू याचे सकारात्मक परिणाम दिसायला सुरवात झाली.

**शालेय विकास :-** सुरुवातीच्या काळात शालेय इमारत भाड्याने घेतलेल्या जागेवर भरत होती. जागेची गरज लक्षात घेता संस्थने विद्यालयासाठी २ एकरचा परिसर भव्य क्रीडांगणासह उपलब्ध करून दिला. भव्य क्रीडांगण उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना क्रीडा सरावास अधिकच वाव मिळाला. विवध क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी नैपुण्य मिळवण्यास सुरुवात केली. भाला फेक, हमर थ्रो या प्रकारात तर राज्य स्तरापर्यंत मजल मारली. सर्वात महत्वाचे म्हणजे सर्वांच्या मदतीने व सहकार्याने मुलींचा सहभागही क्रीडा प्रकारात मोठ्या प्रमाणात वाढला होता. कुस्ती सारख्या स्पर्धांमध्येही मुलींचा सहभाग आमचा उत्साह वाढविणारा होता. क्रीडा प्रकारात विद्यालयाचा नावलौकिक वाढतच होता. एकाच वेळी अनेक क्रीडा स्पर्धांमधून विद्यार्थी राज्यस्तरापर्यंत यशस्वी वाटचाल करत होते. क्रीडा प्रकारात विद्यालयाने विविध स्पर्धामध्ये यश संपादन केलेलं आहे. यात कुस्ती, खो खो, मैदानी स्पर्धा, अथेलीटीक्स अशा स्पर्धांमध्ये यश संपादन केलेलं आहे.



**शाळेचा यशस्वी संघ**

**मुख्याध्यापक व शिक्षकांचा स्व-विकास:-** शिक्षण क्षेत्रात अनेक नवनवीन बदल येऊ घातले होते. आणि हे बदल विद्यार्थी हिताच्या दृष्टीने स्वीकारणे देखील महत्वाचे होते. त्यासाठी मुख्याध्यापकांपासून सर्वांनाच स्वतः मध्ये देखील बदल करणे आवश्यक होते. त्यासाठी स्वतःला समृद्ध बनविण्यासाठी शासनाने आयोजित केलेली अनेक प्रशिक्षणे यशस्वीपणे पूर्ण केली. यामध्ये शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षण, अविरत प्रशिक्षण, ताणताणाव व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, CHESS, या सारखी अनेक प्रशिक्षणे मुख्याध्यापकांसह शिक्षकांनी घेतलेली आहेत. मिळालेल्या विविध प्रकारच्या प्रशिक्षणा मधून सकारात्मक प्रेरणा घेऊन त्याची अमलबजावणी केली गेली. अध्यापनात नवनवीन उपक्रम वापरल्या जाऊ लागले. यासोबतच शिक्षकांनी आपली शैक्षणिक पात्रता वाढविण्यावर देखील भर दिला. आपापल्या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले. ज्यामुळे सर्वांच्याच आशय ज्ञानात भर पडली. शासन स्तरावरून विविध प्रकारची प्रशिक्षणे आयोजित केली जातात. विद्यालातील मुख्याध्यापकांसह शिक्षकांनी विविध प्रशिक्षणे घेतलेली आहेत. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियाना द्वारे आयोजित प्रशिक्षण, विद्या परिषद आणि श्यामची आई फौंडेशन द्वारा आयोजित अविरत प्रशिक्षण, यशदा पुणे आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, बाल सुरक्षा कायद्याचे प्रशिक्षण, अगस्त्या फौंडेशनचे प्रशिक्षण असे अनेकविध प्रशिक्षण घेऊन स्वतःला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व प्रशिक्षणाचा फायदा निश्चितच झालेला आहे. ज्यामुळे शालेय गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली.

**अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर:-** बदलत्या काळाप्रमाणे शिक्षणाची पद्धती देखील बदलत चालली आहे. संगणक व इतर इलेक्ट्रोनिक साधनांच्या सहाय्याने आपण बसल्या जागी माहिती मिळवू शकतो. या माहितीचा उपयोग आपण आपला दर्जा उंचावण्यासाठी, गुणवत्ता वाढविण्यासाठी करणे आवश्यक आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर आपल्या अध्यापन पद्धतीत करणे अनिवार्य झालेले आहे. यासाठी विविध दृक श्राव्य साधनांचा वापर देखील महत्वाचा झालेला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देखील आवश्यक होते अशा वेळी आम्ही सर्वांनी निधी गोळा करून विद्यार्थ्यासाठी एक संगणक खरेदी केले. त्या संगणकावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. आणि आज मितीला विद्यालयात सुसज्ज अशी संगणक प्रयोगशाळा इंटरनेट सुविधा जनरेटर व इन्व्हरटर सुविधेसह सूरु आहे. विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञाना नुसार शिक्षण देण्यासाठी विद्यालयातील ICT संगणक प्रयोगशाळेचा प्रभावीपणे वापर अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत केला गेला. संगणकाचा वापर करून विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे शैक्षणिक व्हिडीओ दाखवून प्रत्यक्ष अनुभूती देण्यात आली. विद्यार्थ्यासाठी ई-लर्निंग सुविधा स्वखर्चातून सुरु केली.विद्यालयात इंटरनेट ची सुविधा वैयक्तिक खर्चातून सुरु करून दिली. विद्यालयात असणारी संगणक प्रयोगशाळेतील सर्व संगणक WIFI तंत्रज्ञानाने जोडणी केले गेले. प्रशासकीय पातळीवर कामकाज करताना देखील तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरु केलेला आहे. प्रशासकीय कामकाज सुलभ होण्याच्या दृष्टीने विद्यालयात प्रशासकीय कामकाजाचे SOFTWARE घेऊन त्यावर कामकाज सुरु केले.

**कृतीशील उपक्रम:-** राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा व राज्य अभ्यासक्रम आराखड्यात दिलेल्या उद्दिष्टांप्रमाणे अध्यापन करण्याच्या दृष्टीने विद्यालयात सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. प्राथमिक ते माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना अध्ययन सुलभ व्हावे यासाठी ज्ञानरचनावाद अत्यंत उपयुक्त पद्धती असल्याचे सिद्ध झाले आहे. या पद्धतीमुळे शालेय गुणवत्तेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. याचा गुणात्मक फायदा दिसून आला. विद्यालयात कृतियुक्त शिक्षण कसे देता येईल,याबाबत विचार केला. त्यातूनच व्यवसायात्मक शिक्षणाची संकल्पना पुढे आली. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या मदतीने विद्यालयातील मुलामुलींना शिलाई मशीन, फोटो फ्रेम बनविणे, वेल्डिंग मशिनच्या साह्याने टेबल बनविणे, सुतारकाम, गवंडीकाम अशी कामे शिकविली. कृतियुक्त आणि वेगळ्या पद्धतीने शिकावयास मिळाल्याने विद्यार्थ्यांची शाळेप्रती ओढ वाढली. विद्यार्थी आनंदाने या सर्व गोष्टी शिकू लागले.



**शाळेत शिलाई काम शिकवण्यासाठी शिलाईचे मशीन उपलब्ध करून दिले**

**सामाजिक सहभाग:-** शाळा हा समाजाचा आरसा असतो असे म्हटले जाते आणि ते सत्यही आहे. यादृष्टीने समाजाचा शाळेशी संपर्क असणे अत्यंत आवश्यक आहे. आणि या बाबीचा विचार करूनच शासन स्तरावरून शिक्षक पालक संघ,शाळा व्यवस्थापन समिती यांची निर्मिती करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. शिक्षक पालक संघाच्या नियमित बैठका शालेय स्तरावरून घेण्यात येतात. यात शालेय गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने विचार विनिमय होऊन त्याची प्रभावी अमलबजावणी राबविली जाते. शाळा ज्या सामाजिक परिसरात आहे त्या परिसरातील गरजा ओळखून शाळेने त्यावर काम करणे गरजेचे आहे. या उदात्त हेतूने विद्यालयाने विविध सामाजिक उपक्रम राबविलेले आहेत. यामध्ये आरोग्य तपासणी, विवध व्याख्यानमाला, मुख्याध्यापकांच्या संकल्पनेतून पाण्याची गरज ओळखून परिसरात विद्यालयाने वनराई बंधाऱ्यांची निर्मिती केलेली आहे. विद्यालयाने तयार केलेल्या वनराई बंधाऱ्यामुळे परिसरातील जलपातळीत चांगलीच वाढ झाली आहे.



**विद्यालयाने तयार केलेला वनराई बंधारा**

विद्यालयाने राबविलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले होते. या वनराई बंधार्याची दखल स्थानिक प्रशासनानेही घेतली होती. विद्यालयाने तयार केलेल्या वनराई बंधाऱ्यात साठलेल्या पाण्याचे जलपूजन करण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्रेरणा देशभ्रतार यांनी भेट दिली होती. विद्यालयाच्या या उपक्रमाबद्दल जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री अनिरुद्ध खोतकर यांनी देखील या कार्याचा गौरव केला होता. सामाजिक वनीकरण अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक व शिक्षक विद्यार्थ्यांच्या मदतीने दरवर्षी वृक्ष लागवड व वृक्ष संवार्धांचा उपक्रम राबवत असतात. विद्यार्थ्यांनी झाडांची काळजी स्वतः घ्यावी यासाठी वृक्ष दत्तक योजना विद्यालयात राबविली जाते. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी याहेतूने विद्यालयात “मी कसा घडलो” हा समाजातील यशस्वी व्यक्तींच्या व्याख्यानवजा मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. यशस्वी लोकांच्या जीवानप्रवासाबद्दल जाणून घेण्यास विद्यार्थी उत्सुक असतात. आणि त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा ते प्रयत्न करताना दिसून आले.



**“मी कसा घडलो” कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना तज्ञ**

वरील सर्व उपक्रमांचा परिणाम म्हणजे शाळेचा नावलौकिक सर्वत्र झाला. शाळेतील विविध उपक्रमांचे अनुकरण इतर शाळेत केल्या जात आहे. शाळेचा हा नावलौकिक असाच टीकवूण ठेवण्यासाठी येथील मुख्याध्यापाक शिक्षक विद्यार्थी व पालक कटिबध्द आहेत.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. शिवाजी साखरे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, जालना. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## कै. मारोतराव देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय टेंभुर्णी, ता.जाफराबाद, जि. जालना.

**ई-मेल:-** marotrao.deshmukh.vidyalay@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री. समाधान वामनराव दुनगहू **ई-मेल:-** v.dungahu@gmail.com



**कै. मारोतराव देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय टेंभुर्णी,शाळेची इमारत**

1952-53 मध्ये टेंभुर्णी येथे नवभारत शिक्षण प्रसारक संस्था त्यामध्ये तत्कालीन शाळेचे अध्यक्ष मारोतराव पाटील देशमुख हे होते, त्यांनी टेंभुर्णी परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे हा हेतू उराशी बाळगला. मारोतराव पाटील देशमुख त्यांच्या मनामध्ये गोर-गरीब विद्यार्थ्यांबद्दल तळमळ होती त्यांना चांगले शिक्षण याच गावात मिळावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांचे सुपुत्र जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय दिनकरराव मारोतराव देशमुख साहेब यांनी वडिलांच्या नावाने शाळा सुरू केली त्यांच्या वडिलांचे गोरगरीब विद्यार्थ्यांना चांगले व मोफत शिक्षण देण्याचे स्वप्न पूर्ण केले. सन 2013-14 मध्ये आमच्या शाळेच्या व्यवस्थापन समितीने शाळेसाठी नवीन इमारत बांधण्याचा निर्णय घेतला यासाठी एक हेक्टर जमीन उपलब्ध करून देण्यात आली. अतिशय सुंदर ठिकाणी निसर्गरम्य वातावरणात जीवरेखा नदीच्या काठी शाळेची इमारत साधारणता 2015 पर्यंत उभी राहिली.

**शालेय विकास :-** शाळा विकास नियोजन करत असताना मी शिक्षणाबरोबरच शाळेच्या परिसराला महत्त्व देण्याचे ठरवले. शाळेचा परिसर कसा सुंदर व प्रसन्न राखता येईल या दृष्टीने व्यवस्थापनाच्या मदतीने शाळेच्या आवारात वृक्षारोपण केले ,तेही खूप मोठ्या प्रमाणात हे करत असताना झाडासाठी तसेच शाळेसाठी पाण्याची आवश्यकता होतीच त्यासाठी शाळेत दोन बोर,एक विहीर सुद्धा खोदण्यात आली. एवढेच नाही तर शाळेमध्ये बायोमेट्रिक प्रणाली, तसेच विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेता सर्व वर्गात व वर्गाबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसविण्यात आलेले आहे आहेत. शाळेमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी पाणी शुद्धीकरण यंत्र बसविण्यात आले. ज्यामुळे विद्यार्थ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळू लागले. शाळेची सुरुवात खूप छोट्या जागेमध्ये चार वर्गखोल्या पासून झाली छोटेसे क्रिडांगण परंतु चांगल्या प्रतीच्या शिक्षणामुळे शाळा हळूहळू नावारूपाला येऊ लागली. मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मेहनत व जबाबदारीने पार पडलेली कर्तव्य होय. विद्यार्थ्यांना शिक्षणात रुची निर्माण करण्यासाठी काय करता येईल त्यांना कशा प्रकारे शिकवता येईल यावर विचार करू लागलो. त्यामधूनच विद्यार्थ्यांना सर्वप्रथम अभ्यासात रुची निर्माण करण्यासाठी आम्ही प्रयत्न केले

निसर्गाच्या सानिध्या मध्ये शिक्षण देण्याचे ठरविले.यामध्ये प्रत्यक्ष अनुभूती, विविध तांत्रिक प्रणालीचा उपयोग करून विद्यार्थ्यांना अभ्यासात आवड निर्माण कशी करता येईल या पद्धतीने प्रयत्न करण्यात आले.हे सर्व करत असताना वेळ कमी पडू लागला त्यामुळे काही अतिरिक्त तासिका देखील घ्याव्या लागल्या. शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थी समान असून सर्वांना चांगल्या प्रकारे कसे शिक्षण देता येईल यावर लक्ष केंद्रीत केले गेले. विद्यार्थ्यांचे संरक्षण त्यांचे अधिकार तसेच शालेय संस्कृती विषयक जाणीव त्यांच्यात निर्माण करण्यात आली.

**स्व विकासासाठी प्रशिक्षण:-** मुख्याध्यापक नात्याने शाळेतील कामाचे नियोजन व व्यवस्थापन करत असताना विविध प्रशिक्षणाचा खूप उपयोग झाला त्यामध्ये नामोल्लेख करायचा झाल्यास जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रम हे प्रशिक्षण खूपच उपयोगी ठरले. यासोबतच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने आयोजित केलेल्या ताणतणावाचे नियोजन हे प्रशिक्षण सुद्धा खूपच उपयोगी ठरले. दुसरे महत्त्वाचे असे की, शालेय शिक्षण विभागाने राबवलेला अविरत प्रशिक्षण कार्यक्रम हा देखील खूपच उपयोगी पडला या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिकते पासून ते त्याच्या मेंदूमध्ये होणारे बदल विद्यार्थ्यांना उद्भवणाऱ्या समस्या त्यातून कशाप्रकारे मार्ग काढायचा व त्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियास कशी दिशा द्यायची हेदेखील चांगल्या पद्धतीने शिकता आले. शिक्षकांनी घेतलेल्या विविध प्रशिक्षणाचा अध्ययन अध्यापन प्रक्रिया त्यांना चांगला उपयोग झाला.

**अध्ययन अध्यापन प्रक्रिया:-** अध्ययन अध्ययन प्रक्रिया सुलभ कशी करता येईल यावर विचार करण्यात आला हे करत असताना यामध्ये काही तंत्रज्ञानाचा उपयोग करता येईल का हे आजमावून पाहिले गेले. त्यासाठी शाळेमध्ये असलेल्या आय सी टी लॅबचा उपयोग केला गेला प्रोजेक्टर च्या साह्याने विद्यार्थ्यांना विविध अध्ययन अनुभूती देण्यात आल्या. कम्प्युटरच्या सहाय्याने तसेच प्रोजेक्टरच्या माध्यमातून ऑडिओ-व्हिज्युअल पद्धतीचा उपयोग करून चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांना समजून सांगता आले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास बौद्धिक, भावनिक, शारीरिक, मानसिक, सांस्कृतिक, नैतिक तसेच आध्यात्मिक विकास कसा होईल याकडे सुद्धा लक्ष दिले जाते. त्यामागील तत्त्वे तथा एखादा घटक निवडून त्याची स्लाईड तयार करून पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन च्या साह्याने संगणकावर दाखवली जाऊ लागली. विद्यार्थ्यांना दीक्षा ॲपचा वापर करून विविध विषयातील घटक शिकवले गेले. पुस्तकातील काही बारकोड च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इंटरनेट द्वारे देखील विविध प्रकारचे ज्ञान प्राप्त होऊ लागले. मानव विकास मिशन च्या माध्यमातून विज्ञान प्रयोग शाळेचे साहित्य शाळेला मिळाले असल्यामुळे या साहित्याचा प्रयोग करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना विविध संकल्पना प्रभावीपणे समजून सांगण्यासाठी त्याचा उपयोग केला गेला. शक्य असेल तेवढे जास्तीत जास्त ज्ञान हे प्रयोगाद्वारे दिले जाऊ लागले.



**विज्ञानाचे प्रयोग करताना शाळेचे विद्यार्थी**

**शालेय उपक्रम:-** ज्यामध्ये शैक्षणिक कंटेंट असलेली कॉम्पॅक्ट डिस्क, डीव्हीडी तसेच यूएसबी पेन ड्राईव्ह उपलब्ध करुन देण्यात आले. इंटरनेट देखील शाळेमध्ये उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पूरक असलेली माहिती मिळू लागली. त्यामुळे त्यांच्यामध्ये रुची निर्माण झाली. शाळेमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आम्ही करत असतो. त्यातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांनावाव देऊन ते शोधण्याचा प्रयत्न देखील शाळेतून केला जातो. सोबतच विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास व्हावा यासाठी शाळेमध्ये विविध स्पर्धा देखील आयोजित केल्या जातात मग त्यामध्ये मैदानी खेळ असेल फुटबॉल, हॉलीबॉल, खो-खो, धावणे या प्रकारच्या स्पर्धांचे देखील आयोजन केले जाते. यासोबतच चित्रकला स्पर्धा रांगोळी स्पर्धा देखील आयोजित केल्या जातात. विविध प्रकारची माहिती मिळण्याच्या दृष्टीने प्रदर्शन देखील आयोजित केले जाते.शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत झालेला बदल दर शनिवारी विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण दिले जाते त्यामुळे विद्यार्थी शारीरिक दृष्ट्या बलवान करण्यासाठी प्रयत्न केला जातो.



**विद्यार्थी योगा करताना**

**लोकसहभाग :-**. पालक सहभागातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत होणाऱ्या बदलांचा विचार केला जातो पालकांच्या सूचनांचा आदर करून विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवल्या जातात.शाळेमध्ये टेंभुर्णी परिसराच्या आजूबाजू मधून विविध खेड्यांमधून विद्यार्थिनींना बरेच अंतर पायी यावे लागत असे, परंतु ही समस्या देखील मानव विकास मिशन अंतर्गत मिळालेल्या सायकली मुळे दूर झाली.



**मानव विकास मिशन अंतर्गत मुलींना मिळालेल्या सायकली**

शाळेच्या क्रीडांगणामध्ये विविध खेळासाठी आवश्यक असलेली मैदाने आखली गेली. त्यामधून चांगले खिलाडी कशी निर्माण करता येईल याचासुद्धा विचार केला गेला. मग त्यामध्ये सांस्कृतिक विभाग असेल या विभागाची जबाबदारी सांभाळण्याची ते काम त्या शिक्षकाने खूप चांगल्या पद्धतीने केले. विद्यार्थ्यांतील विविध कला गुण असतील किंवा कौशल्य असतील ते शोधण्याचे काम त्या शिक्षकांमार्फत केले गेले. नवीन विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळण्यासाठी शाळेतून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. त्यासोबतच पालकांचा देखील सत्कार केला जातो. यामुळे एक पोषक वातावरण तयार होऊन विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण केले जाते. दर दोन-तीन महिन्यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते.



**शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्यविषयक तपासणी करताना**

**शालेय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर:-** शाळेमधील दस्तऐवज व्यवस्थित ठेवणे हे मुख्य काम असल्यामुळे मी सर्वप्रथम शाळेतील सर्व दस्तऐवज संगणकीकृत करून घेतले. त्याचप्रमाणे शिक्षक विद्यार्थी यांचे रेकॉर्ड देखील संगणकामध्ये जतन केले. यामुळे शाळेचे सर्व रेकॉर्ड अद्यावत झाले. तंत्रज्ञानाचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत कसा उपयोग करता येईल याबाबत शिक्षकांसोबत चर्चा केली. त्यांना हे तंत्रज्ञान कशा पद्धतीने वापरता येईल याबाबत मार्गदर्शन केले व त्यांनीही विविध तंत्राचा यामध्ये वापर ज्यामध्ये संगणक असेल, मोबाईल असेल, प्रोजेक्टर तसेच, विविध प्रयोग, क्षेत्रभेटी व सहली, यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मूर्त स्वरूपातील अध्ययन अनुभूती देण्याचा प्रयत्न केला. संगणकावर शिकावयास मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये आवड निर्माण झाली. शाळेत येणारे विद्यार्थी विविध स्तरातून आलेले असल्यामुळे त्यांना बाहेर संगणकाचा कोर्स लावणे आर्थिक दृष्ट्या परवडत नसल्यामुळे शाळेमध्ये त्यांना संगणकाचे शिक्षण दिले गेले.



**शाळेतील सुसज्ज संगणक कक्ष**

**विवीध स्पर्धांचे आयोजन :-** शाळेमध्ये विविध स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे लक्ष दिले गेले. जसे रांगोळी स्पर्धा असतील इतर सांस्कृतिक कार्यक्रम असतील ते देखील विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने राबविली गेली. त्यामधून विद्यार्थ्यांमध्ये स्टेज डेरिंग, प्रतिनिधित्व करणे या प्रकारचे गुण विकसित झाले. व्याख्यानमाला आयोजित केल्यामुळे त्यांना संभाषण कौशल्य अवगत झाले. विविध प्रकारच्या मैदानी स्पर्धा आयोजित करून त्यांचा शारीरिक विकास करण्याच्या दृष्टीने शाळा प्रयत्नशील असते व स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात बक्षिसे देखील दिली जातात. विद्यार्थिनींसाठी रांगोळी स्पर्धा. चित्रकला स्पर्धा देखील घेतल्या जातात त्यातून त्यांचे विविध गुण कौशल्य दिसून येतात. त्याच्या त्या गुणांच्या कौशल्याच्या विकासासाठी शाळा प्रयत्नशील असते विज्ञान प्रदर्शनामध्ये इंस्पायर अवार्ड योजने अंतर्गत शाळेने राज्यस्तरावर देखील प्रतिनिधित्व केलेले असून विविध खेळांमध्ये देखील शाळा तालुकास्तरावर ,जिल्हास्तर, राज्यस्तरावर प्रतिनिधित्व करत असते.







**विद्यार्थ्यांनी मिळवलेली प्रमाणपत्रे**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्नशील असणारी आमची शाळा आज नावारूपास आली आहे. त्यामागे शिक्षकांची मेहनत,विद्यार्थ्यांचा शाळेवर असणार विश्वास, कारणीभूत आहे. आमच्या शाळेचा हा यशस्वी प्रवास असाच पुढेही चालत राहील असा आम्हास विश्वास आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. शिवाजी साखरे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, जालना. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# विद्या मंदिर बानचीवाडी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

**मुख्याध्यापकाचे नाव:-** श्री. पी. एस. कानकेकर **ई-मेल:-** Prakashkankekar@gmail.com



**विद्या मंदिर बानचीवाडी शाळेची इमारत**

**प्रथम ज्ञानमंदिराचा जिर्णोध्दार । मगच ग्रामदैवताच्या मंदिराचा विचार ।।**

बानचीवाडी हे राधानगरी तालुक्याच्या ठिकाण्यापासून अवघ्या तीन किलोमीटर बानचीवाडी एक छोटसं गाव. गावची लोकसंख्या जेमतेम चौदाशेच्या आसपास, गावात शेतीला पाण्याची सोय नसल्यामुळे सर्व उपलब्ध शेती जिराईत, पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली. राधानगरी परिसरातील आठ ते दहा गावांना मजूर पुरवणारे गाव अशी या गावची प्रसिद्धी. या गावात इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे. अशा प्रकारची आर्थिक स्थिती असलेल्या व हातावरचे पोट असलेल्या पालकांची मुले या शाळेत शिक्षण घेत आहेत. तत्कालीन सरपंच व त्या काळातील शाळेतील शिक्षक यांच्या प्रयत्नातून गायरान जमिनी पैकी 25 गुंठे जमीन शाळेच्या नावावर करून घेऊन सात खोल्यांची इमारत उभी केली आहे.

**लोकसहभाग:-** शाळेचा सर्वांगीण विकास करण्याचे ध्येय डोळयासमोर ठेवून, माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून काम सुरू करण्याचे ठरले. योगायोगाने याच दरम्यान गावचे ग्रामदैवत वीर हनुमान या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी ग्रामस्थांनी गावसभेचे आयोजन केले होते. या सभेसाठी आम्हा सर्व शिक्षकांना आमंत्रित केले होते. मंदिराचा आराखडा,जमा करावयाचा निधी याबाबत बरीच चर्चा झाली. सर्व ग्रामस्थांनी आपापले विचार मांडले आणि शेवटी शिक्षकांना विचार मांडण्याची संधी दिली. मंदिर बांधकाम बाबत विचार मांडले आणि तयार केलेल्या शाळा विकास आराखडा ग्रामस्थांच्या समोर सादर केला. आराखड्यातील कामे करणे का गरजेचे आहे तसेच त्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर काय परिणाम होणार आहे, एकंदरीत शाळेचा गुणवत्ता विकास कसा होणार आहे याबाबत शाळेतील सर्व शिक्षकांनी आपले विचार मांडले तसेच ते पटवूनही दिले. ग्रामदैवताचे मंदिर बांधकाम थांबवून शाळेची कामे अगोदर करा असा पुरोगामी विचार शिक्षकांनी मांडलेला पाहून सभा काही काळ स्तब्ध झाली. पुन्हा एक तास या दोन्ही कामांवर चर्चा झाली आणि सर्व ग्रामस्थांनी एक क्रांतीकारी निर्णय जाहीर केला, की **आधी ज्ञानमंदिर, मगच ग्रामदैवताचे मंदिर.** 50 रूपयांपासून 25 हजारांपर्यंत रोख देणगी, वस्तू, श्रमदानाच्या रूपाने गेल्या तीन वर्षांत जवळजवळ सात लाखांचा शैक्षणिक उठाव जमा करून एक समृद्ध

शाळा निर्माण झाली आहे.सर्व ग्रामस्थ, आजी-माजी विद्यार्थी, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, देणगीदार शाळेचे आजी माजी शिक्षक, यांच्या दातृत्वातून आणि श्रमातून शाळेचा कायापालट झाला आहे. शालेय परिसर व वातावरण विद्यार्थ्यांना शिकण्यास उपयुक्त ठरावे, विद्यार्थी जास्तीत जास्त वेळेत शाळेच्या परिसरात रमावेत, विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ व्हावे, शाळेची गुणवत्ता वाढावी यासाठी विकास आराखड्यातील प्राधान्य क्रमाप्रमाणे कामाला सुरूवात केली.

250 फूट लांबीची संरक्षण भिंत, क्रिडांगण सपाटीकरण, स्वागत कमान, स्वागत कमानीचा दरवाजा, शालेय इमारत अंतर्बाह्य रंगरंगोटी, सुंदर बगीचा, मुलांना खेळण्यासाठी बालोद्यान, बोलक्या भिंत, बोलका व्हरांडा, ध्वजस्तंभ, कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, तरंग बगीचा, स्वच्छतागृहांची दुरूस्ती व रंगरंगोटी, तक्रार पेटी, स्वच्छ व शुद्ध् पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, घोषवाक्य पाट्या, सुसज्ज कार्यालय, भव्य रंगमंच, संगणक कक्ष, परसबाग, स्कॅनर आणि प्रिंटर, लोखंडी कपाट, प्रयोगशाळा कपाट, प्रयोगशाळा साहित्य, ग्रंथालय पुस्तके, स्वच्छता गृहासमोरील कठडा बांधकाम व फरशी, स्वयंपाक गृह छप्पर दुरूस्ती, स्वयंपाक गृहासमोरील फरशी, फायबर खुर्च्या, बागकाम साहित्य,साऊंड सिस्टिम, विद्युतीकरण, डिजिटल शैक्षणिक तक्ते, ज्ञानरचनावादी साहित्य, ई-लर्निंग साहित्य, मुला मुलींसाठी स्वतंत्र हँडवॉश स्टेशन, ठिबक सिंचन, शालेय पोषण आहार शिजवण्यासाठी शेगड्या आणि बर्नर इत्यादी कामे करण्यात आली.

**ग्रामपंचायतीच्या सहकार्याने 14 व्या वित्त आयोगातून केलेली कामे –** स्वच्छतागृह नूतनीकरण आणि पाण्याची व्यवस्था, हॅन्डवॉशस्टेशन, 20 नळांची व्यवस्था, एलपीजी गॅस टाकी व शेगडी, आरसीसी वॉल कंपाऊंड गटर सह, पिण्याचे पाणी व बागेसाठी मुबलक पाण्याची सोय, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य, असा एकूण चार लाखाच्या निधीची कामे करण्यात आली.

**शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी शाळेने राबवलेले उपक्रम:-**

**भाषा विकास:-** भाषा विकासासाठी वाचन कोपरा, तरंग वाचनालय, मासिक तसेच वर्तमानपत्रांचे नियमित प्रकट वाचन, प्रकटवाचन स्पर्धा, निबंध लेखन, स्पर्धा, संवाद कथा कविता लेखन कार्यशाळा, वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, हस्ताक्षर सुधारणा कार्यशाळा व स्पर्धा, व्याकरण समृद्धी कार्यशाळा, अध्ययन निष्पत्तीच्या दृढीकरणासाठी विविध अध्ययन अनुभवांची निर्मिती, इंग्रजी प्रकट वाचन याकडे विशेष लक्ष, इंग्रजी लेखनाकडे विशेष लक्ष, ज्ञानरचनावादी साहित्य निर्मिती, भाषा, गणित, इंग्रजी साहित्य पेटी चा अधिकाधिक वापर, साहित्य मांडण्यासाठी विशेष सोय, अध्ययन अध्यापनात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला.

**तंत्रज्ञानाचा वापर:-** शाळेत सर्वच वर्गात इ लर्निंग सुविधा उपलब्ध् आहे. शैक्षणिक दीक्षा ॲप व इतर सॉफ्टवेअरचा वापर नियमितपणे केला जातो. स्वतंत्र संगणक कक्ष आहे. इंटरनेटची सुविधा आहे. सर्व शिक्षकांसाठी वाय-फायची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व वर्गात ऑफिसमधून नियंत्रित साऊंड सिस्टिम कार्यान्वित केली आहे. प्रिंटर व स्कॅनर उपलब्ध आहे. इयत्ता पाचवी ते सातवीचे सर्वच विद्यार्थी संगणक हाताळतात. प्रश्नपत्रिका निर्मिती व छपाई शाळास्तरावर केली जाते. सर्व प्रकारचे प्रशासकीय कामाचे संगणकीकरण केलेले आहे.

**शाळेने राबवलेले काही वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम**

**100% तंबाखूमुक्त शाळा:–** शाळा 100% तंबाखूमुक्त असून कुटुंब तंबाखू मुक्त करण्याची योजना कार्यान्वित केली आहे. विद्यार्थ्यांकडून गावातील संपूर्ण कुटुंबाचे सर्वेक्षण करून घेतले आहे. विद्यार्थ्यांच्या मार्फत त्यांच्या पालकांना या व्यसनापासून परावृत्त करण्याचे काम सुरू आहे

**भंगारातून भारी वस्तू : –** घरातील टाकाऊ, निकामी साहित्य जसे की, प्लास्टिक, काच, लोखंड, फायबर, कापड, पुठ्ठे, इत्यादी साहित्य दर शनिवारी शाळेत घेऊन विद्यार्थी येतात. शाळेत त्यांचे एकत्रीकरण केले जाते. पुन्हा त्या साहित्यातील कोणत्याही कमीत कमी तीन व जास्तीत जास्त पाच वस्तू घेण्यास सांगितले जाते. या वस्तूपासून आपल्या कल्पने प्रमाणे एक टिकाऊ तसेच नावीन्यपूर्ण वस्तू बनवून आणण्यास सांगितले जाते. विद्यार्थी सोमवारी शाळेत येताना सुंदर टिकाऊ वस्तू तयार करून आणतात व त्यांचे परिपाठाच्या वेळी तसेच दुपारच्या वेळेस सादरीकरण केले जाते.

**परसबाग निर्मिती** :– रिलायन्स फाऊंडेशन मुंबई यांच्या आर्थिक मदतीतून व मार्गदर्शक तत्वानुसार तसेच शिक्षण विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत उत्कृष्ट प्रकारच्या परस बागेची निर्मिती केली आहे. सेंद्रिय तसेच जैविक खतांचा वापर तसेच आयुर्वेदिक कीटकनाशकांचा वापर करून भाजीपाला पिकवला जातो.

**सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा पूर्वतयारी –** शाळेत दरवर्षी दुसऱ्या शैक्षणिक सत्रात सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते मात्र या शाळेचे वैशिष्ट्य असे आहे की, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या व पात्रता फेरी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थीची निवड केली जाते. या विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करून त्यांचा आहार, आरोग्य व व्यायाम याकडे अधिक लक्ष देऊन स्पर्धेच्या सुरूवाती पर्यंत सराव करून घेतला जातो. अनेक विद्यार्थ्यांनी आजपर्यंत सांघिक तसेच वैयक्तिक खेळ प्रकारात केंद्र, तालुका व जिल्हा तसेच राज्य स्तरावर यश प्राप्त केले आहे. सांस्कृतिक स्पर्धेत केंद्र, तालुका, जिल्हा स्तरावर यश प्राप्त केले आहे. दरवर्षी वार्षिक विविध गुणदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

**विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व पूर्वतयारी –** इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय व सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा, इयत्ता चौथी व सातवी प्रज्ञाशोध परीक्षा, इत्यादी शिक्षकांचे नियमित मार्गदर्शन, सततचा सराव, विद्यार्थ्यांची जिद्द व चिकाटी यांच्या जोरावर शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.

**शाळेला मिळालेले विविध पुरस्कार व मानसन्मान:-** उत्कृष्ट शैक्षणिक व लोकसहभागा बद्दल जिल्हा परिषद कोल्हापूर कडून विशेष सन्मान,प्राचार्य एम आर देसाई प्राथमिक शिक्षक पतसंस्था राधानगरी यांचेकडून स्वच्छ सुंदर हिरवी शाळा पुरस्कार प्राप्त, जिल्हा परिषद कोल्हापूर शिक्षण विभागाकडून डॉ. जे.पी. नाईक माझी शाळा समृद्ध शाळा. तालुका स्तरावर सलग दोन वर्षे उच्च प्राथमिक गटात तृतीय क्रमांक, शाश्वत विकास चळवळ गारगोटी, तालुका भुदरगड, जिल्हा कोल्हापूर त्यांच्याकडून शिक्षक व ग्रामस्थांचा विशेष सन्मान असे अनेक पुरस्कार शाळेस प्राप्त झाले आहेत.

शाळेच्या यशस्वीतेमुळे विद्यार्थी अधिकाधिक वेळ शाळेतील वातावरणात रमू लागले. परिसरात आनंददायी वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक तसेच कौशल्यात्मक विकास होण्यास मदत झाली. विद्यार्थी उपस्थिती शंभर टक्के तसेच पटनोंदणी शंभर टक्के झाली. गावातील सर्वच्या सर्व विद्यार्थी जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकू लागले. पटसंख्येत वाढ झाली. इतकेच नव्हे तर बाहेरगावाहून या शाळेत मुलांनी शिकण्यासाठी प्रवेश घेतला आहे. हेच या शाळेचे मोठे यश आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. विजय भिसे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, कोल्हापूर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## मराठी विद्यामंदिर, कलिवडे, पो. आंबेवाडी , ता.चंदगड, जि. कोल्हापूर

Email:- mvmkaliwade@gmail.com

मुख्याध्यापक:- दत्तात्रय जोतिबा भाटे. Email :- dattatrayabhate@gmail.com






**मराठी विद्यामंदिर, कलिवडे शाळेची इमारत**

चंदगड तालुका हा पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या कुशितील निसर्गरम्य तालुका. त्यामधील कलिवडे हे गाव कलानिधी गडाच्या कुशित वसलेले आहे. घनदाट जंगल,पावसाचे अतिप्रमाण, जून ते सप्टेंबर चार महिने मुसळधार पाऊस अशा वातावरणात प्रत्येकाला पाऊस हैराण करतो. तसेच जंगली प्राण्यांचा उपद्रव असणारे हे गाव या गावातील इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतची शाळा चार खोल्यात भरत होती.तसेच लगतच एक धनगरवाडा तेथे शिक्षणाची सोय नव्हती नंतर वस्तीशाळेची स्थापना करुन इयत्ता 1 ते 4 ची शाळा आता उभारली आहे. सुरवातीला चार खोल्यात भरणारी शाळा आज सात वर्गखोल्या,स्वतंत्र स्वयंपाकगृह,अद्यावत प्रयोगशाळा, सुसज्ज संगणक कक्ष, प्रशस्त कार्यालय,ग्रंथालय व बालसभागृहाने परिपूर्ण आहे. तसेच तालुक्यामध्ये पहिले आय.एस.ओ. मानांकन मिळवून जिल्हातील आदर्श शाळेचा बहूमान पटकावणारी शाळा विद्यामंदिर कलिवडे .

**शालेय नेतृत्व :-** गावातील सर्व कुटूंबांचा सर्व्हे करुन 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांना शाळेत आणले. त्यांना शाळेत टिकवून सर्वांना दर्जेदार शिक्षण देण्याचे काम आम्ही शाळेतील सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या मार्फत 100 टक्के पटनोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण केले. यामध्ये अनाथ, निराधार, मागासवर्गीय, गरीब अशा सर्व मुलां-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून शिक्षणाचे महत्त्व पटवून शाळेत टिकवले. शालेय परिपाठाच्या माध्यमातून नैतिकमूल्येव संस्कारांची रुजवण केली. यामधे श्लोक, प्रार्थना,समुहगीते, सुविचार,दिनविशेष, सामान्यज्ञान,माझा वाढदिवस यासारख्या विविध उपक्रमातून शालेय संस्कृती रुजवली.

**स्वविकास :-** शाळेत एकूण पाच शिक्षक कार्यरत असून मुख्याध्यापकांनी शालेय व्यवस्थापन हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. तसेच नविन तंत्रज्ञानाची ओळख व्हावी यासाठी MSCIT यासारखे अभ्यासक्रम सर्व शिक्षकांनी केले. शिवाय या तंत्रज्ञानाचा विद्यार्थ्यांना फायदा करुन दिला. त्यामध्ये विद्यार्थांना अभ्यासक्रमावर आधारित स्लाईड शो तयार करुन अध्यापनात रंजकता आणली त्याच बरोबर 17 टॅबच्या मदतीने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष टॅब हाताळण्याचे कौशल्य प्राप्त करुन दिले. तसेच स्मार्ट टीव्ही, संगणक, ईलर्निंग याद्वारे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले. हे करत असताना शाळेतील शिक्षक तंत्रस्नेही बनले.त्याचा शाळा विकासासाठी मोठ्याप्रमाणात फायदा झाला. शासना मार्फ़त आयोजित सर्व प्रशिक्षणांचा विद्यार्थी विकासा साठी व शालेय विकासा साठी चांगल्या प्रकारे उपयोग झाला आहे. निष्ठा प्रशिक्षण,मूल्यवर्धन प्रशिक्षण,गणित

संबोध व इंग्रजी पेटी प्रशिक्षण,अध्ययन निष्पती प्रशिक्षण,शाळा सिद्धी प्रशिक्षण व भाषा विकास प्रशिक्षण या सारख्या प्रशिक्षणा मुळे शालेय गुणवत्तेत वाढ होण्यास मदत झाली



**शाळेतील सुसज्ज संगणक कक्ष**

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर:-** शाळे मध्ये संगणक कक्षाची निर्मिती करुन 5 संगणकाच्या मदतीने विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान देण्यात येते. तसेच शालेय प्रशासकीय कामकाज संगणकावर अद्ययावत ठेवले. अध्यापना मध्ये इयत्ता 1 ली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना टॅब च्या मदतीने अध्यापन प्रक्रीया सुलभ होण्यासाठी मदत झाली.तसेच स्मार्ट टि.व्ही,ई-लर्निंग इ.तंत्रज्ञाचा वापर करून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया रंजक केली.

**अध्ययन - अध्यापन प्रक्रिया :-** सुरवातीला विद्यार्थ्यांमध्ये शाळा व शिक्षकांबद्दल भितीचे वातावरण होते. गावात शिक्षक येताच मुले शाळेत न येता जवळपासच्या जंगलात पळून जात असत. हळूहळू या मुलांना शाळेची आवड निर्माण करून त्यांच्यात असणारी भिती दूर केली. बालस्नेही व आनंददायी अध्यापन पध्द्तीचा वापर केला यामुळे मुलांच्यात नियमित शाळेला येण्याची आवड निर्माण झाली

**ज्ञानरचनावाद :-** शाळेमध्ये ज्ञानरचनावादावर आधारित वर्गवार उपक्रम राबविले आहेत.ज्ञानरचनावादी फळे, लॅमिनेशन्सकार्डस तसेच परिसरातील उपलब्ध असलेल्या साहित्याचा वापर केला जातो. यातून विद्यार्थ्यांच्या मुलभूत संकल्पना व संबोध स्पष्ट झाले असून जिज्ञासावृत्ती वाढली आहे





**ज्ञानरचनावादी पद्धतीने तयार केलेल्या वर्गखोल्या**

इ.1ली च्या विद्यार्थ्यांसाठी स्टडीटेबल ही संकल्पना राबविली असून प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र स्टडीटेबल उपलब्ध करून दिला आहे. स्टडीटेबल वरती लिहिण्याची सोय असल्याने वेगळी पाटी घ्यावी लागत नाही. विद्यार्थ्यांना लिहिण्या-वाचनाची आवड निर्माण झाली आहे. माझाफळा (ग्रीनबोर्ड, व्हाईटबोर्ड) इ.5वी ते 7वीच्या विद्यार्थ्यांसाठी माझाफळा हा उपक्रम राबविला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र फळा असून याचा वापर मुले सकाळी परिपाठाच्या आगोदर झालेल्या घटकांच्या दृढीकरणासाठी करतात. तसेच सहाध्यायी अध्ययन व मूल्यमापन करतात. शाळेतील विद्यार्थ्याची जि.प.ने राबविलेल्या 'ईस्रो भेट' या नाविन्यपूर्ण उपक्रमात विद्यार्थ्याची निवड झाली. तसेच तालुकास्तर प्रज्ञाशोध परीक्षेत इयत्ता 4 थी व 7 वी च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. सन 2019-20 मध्ये ईयत्ता 5 वी शिष्यवृत्तीत राज्य गुणवत्ता यादीत लक्ष्मण विष्णू गावडे याची निवड झाली.




**वर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्टडीटेबलची व ग्रीन बोर्डची व्यवस्था करण्यात आली**

**शाळा विकासात गावचे योगदान:-** शाळा स्तरावर आवश्यक असणा-या भौतिक सुविधासाठी गावातील तसेच गावा बाहेरील दानशुर व्यक्तींच्या सहकार्यातून शाळेचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम शाळेतील शिक्षक,पालक संघ,माता पालक संघ व शालेय व्यवस्थापन समिती यांनी केले.यामध्ये गावातील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमेळावे आयोजित करुन त्यांचा ही सहभाग शाळा विकासासाठी करून घेतला.त्यामध्ये शालेय अंतरंग व बाह्यांग करून घेतले याच बरोबर बोलका व्हरांडा,स्वतंत्र प्रयोगासाठी प्रयोगशाळा,हॅंडवॉश स्टेशन,प्रशस्त कार्यालय,बालसभागृह इ.भौतिक सुविधांची पूर्तता करून घेतली. शाळा आय.एस.ओ करून त्यासाठी भरीव शैक्षणिक उठाव वस्तूरुपाने जवळपास 15 लाखाचा उपलब्ध करुन घेतला व शाळेच्या सर्व भौतिक सुविधा अत्याधुनिक करुन घेतल्या.

माता पालक संघ यांच्या तिमाही बैठका घेतल्या त्यामुळे गावातील मातांची शाळेविषयी आपुलकीची भावना निर्माण झाली. व मुलांच्या शिक्षणात मातांचाही फार मोठा हातभार लागू लागला. वेगवेगळ्या उपक्रमांमुळे पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला व आपल्या पाल्याला आरोग्याची व शिक्षणाची गरज आहे याची जाणिव झाली. याचा परिणाम असा झाला की शाळेपासुन एकही मुल वंचित अगर गैरहजर राहिले नाही.

शिक्षक पालक संघ यांच्या तिमाही बैठका घेऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता व उपस्थिती या विषयी जागृती निर्माण केली.व पालक मेळाव्यांचे आयोजन केले.

**नवोपक्रम:-** शाळेने वेगवेगळया प्रकारचे नवोपक्रम राबविले त्यामध्ये 'मी ज्ञानी होणार' या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना तालुका स्तरावर वेगवेगळया स्पर्धा परिक्षेत सुयश मिळाले.तसेच 'माझी शाळा,माझी परसबाग' या उपक्रमा अंतर्गत वेगवेगळया पालेभाज्या,फ़ळ भाज्या यांची निर्मिती केली.शालेय पोषण आहारामध्ये त्याचा समावेश केला. भौगोलिक परिस्थीतीचा विचार करुन शाळेमध्ये परसबागेची निर्मिती करुन उत्पादित मालाचे गाव बाजार भरवून व्यवसायाचे महत्व पटवून दिले. तसेच लघु उद्योग, कारागिर कारखाने यांना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्यात व्यवसाय विषयी जागृती निर्माण केली.

**शाळेचे नैपुण्य:-** आम्हाला शैक्षणिक कार्यात याचा फार मोठा लाभ झाला. शाळेला ISO मानांकन, स्वच्छ सुंदर हिरवी शाळा, डॉ जे. पी. नाईक माझी शाळा समृद्ध शाळा, राजर्षी शाहू शिक्षण समृद्धी उपक्रम, 100%पटनोंदनी, जि.प.चा आदर्श शिक्षक पुरस्कार अशा अनेक पारितोषिकांनी आमच्या शाळेला सन्मानित करण्यात आले आहे. क्रीडा स्पर्धेत शाळेने दैदिप्यमान यश मिळविले आहे. केन्द्रस्तरिय स्पर्धेत शाळेने सलग 5 वर्षे जनरल विजेतेपद मिळविले आहे. त्याचबरोबर तालुकास्तरीय व जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत आमच्या शाळेने सहभाग घेवून यश मिळविले आहे. क्रीडास्पर्धेबरोबरच सांस्कृतिक स्पर्धेतसुध्दा केंद्रस्तरावर जनरल विजेतेपद मिळविले आहे. त्याचबरोबर तालुकास्तरीय व जिल्हा स्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत आमच्या शाळेने सहभाग घेवून यश मिळविले आहे. शाळेत दरवर्षी स्पर्धा सप्ताह आयोजित केला जातो. यामध्ये शाळा पातळीवर व वर्ग पातळीवर वेगवेगळया विविध, शारिरिक व मनोरंजनात्मक स्पर्धा घेऊन त्यातून आलेल्या क्रमांकांना प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात येते.




**क्रीडा स्पर्धेत व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी विद्यार्थी**

अश्याप्रकारे विविध नवोपक्रम,विविध स्पर्धा, याद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न शाळा करत आहे. तालुक्यामध्ये पहिले आय.एस.ओ. मानांकन मिळवून जिल्हातील आदर्श शाळेचा बहूमान पटकावणारी शाळा विद्यामंदिर कलिवडे आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. विजय भिसे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, कोल्हापूर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, जाऊ ,ता.निलंगा जि.लातूर

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री. दत्तात्रय शंकरराव मुखम **ई मेल :-** grsjau@gmail.com



**अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, जाऊ ,शाळेची इमारत**

राज्यात लातुर जिल्हा हा शैक्षणिक दृष्ट्या प्रगत जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्हयात शिक्षणाच्या संबंधात अनेक उपक्रम आजतागायत यशस्वी झालेले आहेत. आशा नामांकीत जिल्हयात एखाद्या सरकारी शाळेने फक्त ९ ते १० वर्षात नावालौकीक मिळवणे अवघड व अशक्यप्राय बाब होय. पण हे दिव्य महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाच्या अनुसुचीत जाती नवबौध्द मुलींची शासकीय निवासी शाळा जाऊ ता. निलंगा यांनी यशस्वीरित्या हे दिव्य पेलून शिक्षणात "शासकीय शाळा" हा ब्रँड विकसीत केलेला आहे. शाळेची स्थापना जून २०११, शाळा सुरु झाली तेव्हा या शाळेस स्वत:चा एक ही कर्मचारी नव्हता. सन २०१२–१३ पासून कर्मचारी नेमणूक होत गेली. सन २०१४–१५ पासून शाळा मान्यपदाच्या ५०% कर्मचारी वर आजमागायत सुरु आहे. निवासी शाळा जाऊ, ही मुलींची निवासी शाळा आहे. सरकारी निवासी शाळेत जिथे मुले यायला तयार नाहीत. आशा ठिकाणी मुलींचे प्रवेश होणे एक मोठे दिव्य होते. जे प्रवेश झालेत ते टिकवणे त्यापेक्षा मोठे दिव्य होते. याचबरोबर शाळेचे वातावरण, ओसाड परिसर, भव्य इमारत, मुलींची सुरक्षीतता, गुणवत्ता, भोजन, मुलींची निवासी शाळा याबाबत समाजातील पुर्वग्रह या समस्येवर दरमहा होणा-या बैठकीत चर्चा होत. त्यातून मार्ग काढण्यात येत.

**स्व विकासासाठी प्रशिक्षणे:-** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, आणि महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, मिपा औरंगाबाद यांचे मार्फत. "शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, मुख्याध्यापकां साठी दहा दिवसीय ६ दिवसाचे एकूण व २ दिवसाचे ३ टप्पयात प्रशिक्षण लातूर येथे आयोजीत करण्यात आले होते. या प्रशिक्षण दरम्यान मुख्याध्यापकाच्या

नेतृत्व कौशल्यात सकारात्मक बदल, प्राप्त साधन सामुग्री मध्ये शाळेचा विकास, शालेय विकासासाठी समाज घटकाचा सहभाग याबाबीचा पुरेपुर उपयोग कसा करावा या बाबीचे  कौशल्य निर्माण करण्यासाठी या प्रशिक्षणाचा उपयोग झाला.

**नवोपक्रम :-** शासकीय शाळेच्या जनमानसातील प्रतिमेला छेद देण्याचा संकल्प आम्ही केला. त्यासाठी विविध गटसमितीच्या माध्यमातून अनेक उपक्रम यशस्वी करण्याचा निर्णय झाला. शाळेस ४ एकरचा भव्य परिसर असून यात १२०९ चौमीटरची ३ मजली इमारत, व परिसर आहे. अपुऱ्या मनुष्यबळावर लक्ष देऊन काम करुन घेणे जिकरीचे होते म्हणून विदयार्थीनींच्या विविध विषयाच्या समित्या स्थापन केले. यात प्रामुख्याने, स्वच्छता, अरोग्य, अभ्यास, पर्यावरण, वीजबचत,पाणीबचत, मीनामंच, युकोक्लब, भोजन, वसतीग्रह इ. समिती स्थापन करुन प्रत्येक समितीस पालक मार्गदर्शन म्हणुन एक शिक्षक, शिक्षीका देण्यात आले. या प्रमाणे प्रत्यक्ष अंमलबजावणीस प्रारंभ झाला.



**गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार करताना मा. राजकुमार बडोले तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री.**

**आवश्यक तयारी :** मिपा च्या वतीने “शालेय नेतृत्व विकास” कार्यक्रम (SLDP) या १६ दिवसाचे प्रशिक्षण करिता शाळेचे मुख्याध्यापक श्री डी. एस . मुखम यांची निवड झाली. या प्रशिक्षणातील माहिती आपल्या शालेय सहकारी यांना त्यांनी दिली. त्यानुसार एक कालबध्द कार्यक्रम आखला यासाठी शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनात बदल करण्यात आला. शाळेचे सर्व कर्मचारी यांनी स्वत:च्या क्षमता, बलस्थान, कच्चेदुवे यावर लक्ष केंद्रीत करुन ‘स्व’ चा विकास करणे जिथे आवश्यक आहे तिथे आमच्यात बदल व कार्यक्षमता वाढवली. शाळेतील वर्गाच्या अध्ययन व अध्यापन प्रक्रीयेत बदल करण्यासाठी वर्गरचना, दप्तरविना शाळा, पालक, शिक्षक सारखे उपक्रम हाती घेतले. या कामी शिक्षक, विद्यार्थीनी प्रतिनिधी यांच्यात नेतृत्व निर्माण करुन विविध संघ (समिती) तयार करुन त्याची बांधणी केली. विद्यार्थीनी प्रतिनिधी, शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती, वरिष्ठ कार्यालय व मुख्याध्यापक यांच्या समन्वयाने भागीदारीचे नेतृत्व तयार केले. शालेय विकास योजनेचा वर्षभरासाठीचा आराखडा तयार केला. मुख्याध्यापक यांनी या कामी समन्वयाकाची भूमिका पार पाडली.शाळेची स्वच्छता, पाणी बचत मोहीम, वृक्षारोपण,

गुणवत्ता वाढीसाठी छोटे छोटे गट तयार करण्यात आले. या गटात उत्तम प्रकारची अंतर क्रिया घडविण्यात आली. अन्य शाळेत असे उपक्रम झाले त्याठिकाणी क्षेत्र भेट दिली. त्यांचे अनुभव ऐकले त्यांच्या चुका आम्ही टाळल्या. यानंतर ठराविक प्रतिनिधी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक यांचे सोबत चर्चा केली त्यांनी यातून काही घटक निवडून त्यावर समग्र चर्चा केली. याबाबत चिंतन केले,उपक्रम राबविताना प्रत्येक टप्प्यावर तज्ञ मत घेऊन आढावा घेण्यात आला. उपक्रमातील त्रुटी दूर करत यशस्वीते साठी नव्याने आराखडे तयार करुन मार्गक्रमण केले. त्यानुसार जबाबदारीचे विभाजन करुन नवोपक्रमास सुरुवात झाली.




**"महाराषट्र शासन युनिसेफ यांच्या वतीने "स्वच्छ विद्यालय स्वच्छ महाराष्ट्र मोहीम" या माहिती पुस्तक प्रकाशीत करण्यात आले आहे. शाळेच्या स्वच्छतेची दखल घेत शाळेच्या पाच फोटोना स्थान दिले".**

**उपक्रम : -** शाळेच्या विकासासाठी विद्यार्थी समिती व मार्गदर्शक म्हणून एक शिक्षक देण्यात आले, नियोजनानुसार प्रत्येक समिती आपले काम करु लागली. समितीतील विद्यार्थीनी यांना आपली समिती कशासाठी स्थापना झाली आहे. तिचे कार्य काय आहे. हे माहिती नसल्याने त्या गोंधळून जात. यावर त्यांना त्यांचे पालक शिक्षक मार्गदर्शन करुन कामतडीस घेवून जात. यामुळे विद्यार्थीनीत असा बदल झाला की, आपण ही शाळेच्या कामी येऊ शकतो. आपणास शाळा विचारते. या आनंदाने, समर्पनाच्या भावनेने काम करतात. त्यांच्यात एक वेगळीच ऊर्जा कार्यरत असते.इ.१०वी वर्गाचे गणीत/विज्ञान/इंग्रजी या विषयाचे सकाळी व संध्याकाळी ज्यादा तास घेण्यात आले. इयत्ता ६ वी ते ९ वी मधील गणित, इंग्रजी विषयात साधारण अभ्यास असणा-यासाठी ज्यादा तास पालक-शिक्षक, संकल्पना राबवून विद्यार्थीनींना वैयक्तिक मार्गदर्शन करुन त्यांची प्रगती साधण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या कला संचनालय मार्फत घेण्यात येणा-या एलिमेंटरी व इंटरजिमियट परीक्षेस विद्यार्थीनी मोठ्या प्रमाणात भाग घेवून यश संपादीत केले आहे. पेट्रोलीयम मंत्रालय नवी दिल्ली भारत सरकार मार्फत घेण्यात आलेल्या सन २०१९ च्या स्पर्धेत कु. प्रगती बाबुराव सुर्यवंशी हीने ५००० रुपयाचे बक्षीस मिळविले. शाळेने आपली गुणवत्ता व दर्जा सिध्द करत ISO मानांकन प्रमाणपत्र मिळविले. यामुळे शाळेच्या लौकीकात मोठी भर पडली. शाळेत वाचनकट्टा, ग्रंथमित्र, खुले वाचनालय, एक दिवस पुस्तक मुक्त शाळा, चला संगणक शिकु, या उपक्रमात रॅपीड टयुटरच्या माध्यमातुन इयत्ता ६ वी पासून विद्यार्थीनींना टायपिंगचे प्रशिक्षण देण्यात येते. समग्र शिक्षाच्या अनुदानातुन ९० दिवसाचे कराटे प्रशिक्षण मुलींना देवून, स्वरंक्षणाचे धडे देण्यात आले

आहे. मीनामंच, यूकोक्लब, माझे झाड-माझी बाग, पाणीदुत, स्व्चछतादूत, वनमित्र, We learn English सारख्या TATA ट्रस्टच्या साह्याने उपक्रम शाळेत राबविण्यात येत आहे. यामुळे शाळेतील विद्यार्थीनी इंग्रजी अतिशय चांगल्या प्रकारे कमी वेळात वाचायला व लिहायला शिकले. “चला प्रयोग करुया” उपक्रमातून प्रत्येक विद्यार्थी प्रयोग शाळेत जाऊन प्रयोग करु लागला स्वत:ची निरीक्षण वही ते बाळगतात त्यात त्यांची निरिक्षणे नोंदवितात. सुसज्य भव्य मैदान, दूरचित्रवाणी कक्ष, प्रयोगशाळा, अभ्यासिक ग्रंथालय, संगणक कक्ष, खेळाचे साहित्य, सुंदर बगीचा, रोपवाटीका, मियावाकी पध्दतीने वृक्ष लागवड, हॅन्डवॉश स्टेशन, स्वच्छबाथरुम, उत्कृष्ट व रुचकर भोजन, गरम पाणी अंघोळीसाठी, पिण्यासाठी R.O फिल्टरचे पाणी, अभिरुप शास्त्रज्ञ, मुलाखत, गटचर्चा, प्रश्नमंजूषा, स्पर्धा परीक्षा ओळख, स्नेहसंमेलन, शाळेच्या बोलक्या भिंती, प्रोजेक्टर, E लर्निंग, डिजीटल अभ्यासक्रम, e लायब्ररी, विदेशी लेखकांची इंग्रजी भाषेतील पुस्तके, क्रीडास्पर्धा, जलदूत इ. उपक्रम शाळेत राबविण्यात येतात.





**पहिल्या फोटो मध्ये श्री प्रकाश जावडेकर तत्कालीन केंद्रीय मानव संसाधन विकासमंत्री. यांच्या शुभहस्ते “स्वच्छ विद्यालय पूरस्कार” स्विकारताना शाळेचे मुख्याध्यापक श्री.डी.एस. मुखम व विद्यार्थीनी.**

**दुसर्या फोटो मध्ये नवी दिल्ली येथे स्वच्छ विद्यालय शाळेच्या फोटो प्रदर्शनात निवासी शाळा जाऊच्या फोटो चे कौतुक करताना मा. प्रकाश जावडेकर तत्कालीन मानव संसाधन विकास मंत्री.**

**स्वच्छतादूत : -** ‘मनाची स्वच्छता खूप महत्वाची आहे‘ आपला परिसर व आपले मन स्वच्छ राहवे हे एक चांगल्या विद्यार्थ्याचे लक्षण आहे. इमारत व परिसर घाणी मुळे गलिच्छ दिसून येत. अस्वच्छते मुळे अध्ययनात विद्यार्थी लक्ष देत नसत, यामुळे शाळेचा परिसर स्वच्छ ठेवणे व विद्यार्थ्यात स्वच्छतेचे संस्कार घडविणे ही काळाची गरज होती, शाळेत २०० निवासी विद्यार्थीनी असून शाळेतील विदयार्थीनी सतत अजारी पडत. म्हणून शाळेच्या स्वच्छता समितीने संघबांधणी करुन एक कालबध्द कार्यक्रम हाती घेतला. यासाठी शास्त्रीय पद्धतीने हात धुण्याचे प्रशिक्षण देऊन ती सवय अंगीकारली. “हात धूणे” हा उपक्रम हाती घेतला. हॅन्डवॉश स्टेशन मूबलक तयार केले. तिथे हात धुवण्यासाठी साबण, पाणी, रुमाल ठेवून याचा वापर नित्यनियमाने सुरु केले. जेवणा पूर्वी व शौचानंतर हात धुणे हा संस्कार अंगीकारला, शौचालयाचा नियमित वापर, कचराकुंडीचा वापर, शुन्य कचरा ही संकल्पना यशस्वी केली. सॅनेटरी पॅड बर्नींग मशीन, कंम्पोस्ट खत उपक्रम, स्वच्छता बाबत

जनजागृतीसाठी, निबंध, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य इ, राबविले. "स्वच्छता दूत" म्हणून विद्यार्थीनीची नेमणूक करुन घरी, गावात जनजागृतीची जबाबदारी दिली. निवासी शळेतील विद्यार्थी घरी गेल्या नंतर घरच्यांना व नातेवाईकांना स्वच्छतेची माहिती देऊन स्वच्छ राहण्याचा सल्ला देतात. यामुळे विद्यार्थीनीं आजारी पडत नाहीत. शाळेत उपस्थीती वाढली, अभ्यासात प्रगती झाली, त्यांची रोगप्रतिकार शक्ती वाढली व त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. त्यातुनच "स्वच्छ विद्यालय" स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेत देशभरातील ३ लाखा पेक्षा जास्त सहभागी शाळेतून पारितोषीक पटकावले.

**जलदूत : -** लातूर शहराला रेल्वेने पाणी पुरवठा केल्याची घटना आम्ही पाहीली होती. ही घटनाच आमच्यासाठी प्रेरणादायी ठरली. याच्या जोडीला दरवर्षी शाळेला पाणी टंचाईचा सामना करावा लागायचा. शाळेत निवासी २०० विद्यार्थी असल्याने दररोज १०,००० लिटर पाण्याची आम्हाला गरज असे. यावर उपाय म्हणून सर्वप्रथम आमच्या वस्तीगृह समीतीने शाळेस पाणी पुरवठा करणा-या बोर जवळ श्रमदानाने २ लाख लिटर क्षमतेचा साठवण तलाव तयार करुन शाळेच्या परिसरातील व इमारती वरील पाणी या तलावात शोषखंड्यात प्रथम मूरवूण तलावात जाईल अशी सोय केली. शाळेत रेनवाटर हर्वेस्टींग केले. शाळेच्या परिसरातील भूजलपातळी वाढावी यासाठी ३००० पेक्षा जास्त झाडे जगवली. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये व पृथ्वीचे तापमान वाढू नये यादृष्टीने शाळेने जलदूत तयार केले आहेत. या जलदूता मार्फत आपल्या गावात पाणी बचत, वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन ही कामे होतात. पाण्याचा पुन्हः वापर. जलसाक्षरता, गरजे पूरता पाण्याचा वापर इ. बाबी कटाक्षाने पाळले यामुळे शाळेने पाण्याच्या टंचाईवर मात केली. या कार्यक्रमाची दखल घेवून दि. २५.०२.२०१९ ला भारत सरकारने शाळेचा राष्ट्रीयजल पूरस्कार देवून गौरव केला.



**भारत सरकारचा राष्ट्रीय पातळीवरील "जलपुरस्कार २०१८" श्री अर्जुनसिंह मेघवाल तत्कालीन जलशक्ती मंत्री यांचे शुभहस्ते स्वीकारताना श्री. डी. एस. मुखम मुख्याध्यापक, श्री. जी. श्रीकांत तत्कालीन जिल्हाधिकारी लातूर, श्री. संभाजी पाटील निलंगेकर तत्कालीन पालक मंत्री लातूर व शाळेतील शिक्षक वर्ग.**

**वृक्षमित्र : -** शाळेचा परिसर हा माळरानाचा आहे. तो फुलवण्या करिता शाळेच्या पर्यावरण समितीने एक आराखडा तयार केला. यात संपूर्ण शाळेने सहभाग घेत नियोजनबद्ध पदध्त्तीने बगीचा तयार करण्याचा निर्णय झाला. यातूनच आजमितीस शाळेत ३००० पेक्षा जास्त झाडे लागवड व संगोपन केले आहेत. लॉन असलेले मोठे मैदान आहे. जून मध्ये “मियावाकी“ पद्धतीने वृक्ष लागवड करुन, दोन हरीतपट्टे विकसित करण्यात आले आहेत. दत्तक वृक्ष संकल्पना राबवीली. या उपक्रमाची दखल घेत महाराष्ट्र शासनाने दिनांक १५-८-२०१९ रोजी “छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार” देवून गौरव केला.



**श्रमदानातुन दोन लाख लिटर क्षमता असलेला साठवण तलाव तयार करण्यात आला. यात पावसाचे जमा झालेले पाणी.**

**यशोगाथा : -** ज्या शाळेत मुले प्रवेश घेत नाहीत आशा मुलींच्या शासकीय शाळेत मुली प्रवेश घेवू लागल्या. पालकांना आपल्या मुलीचा प्रवेश या शाळेत असावा असे वाटू लागले यामुळे दरवर्षी इ. ६ वी साठी फक्त ४० जागेसाठी २०० पेक्षा जास्त विद्यार्थीनींची नोंदणी होऊ लागली. सन २०१७-१८ चा **भारत सरकारचा व महाराष्ट्र शासनाचा “ स्वच्छ विदयालय पुरस्कार”** शाळेस मिळाला. सन २०१८ चा भारत सरकारचा **“राष्ट्रीय जलपुरस्कार”** शाळेस प्रदान झाला. शाळेतील वृक्षलागवड व संगोपन उपक्रमाची दखल घेवून २०१७ चा महाराष्ट्र शासनाचा **“छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार”** शाळेस देऊन गौरविण्यात आला. सन २०१८–१९ चा **महाराष्ट्र शासनाचा “आदर्श शिक्षक पुरस्कार”**शाळेचे मुख्याध्यापक श्री. डी. एस. मुखम यांना देऊन सन्मानीत करण्यात आले आहे. बालभारती व **युनिसेफमार्फत** प्रकाशीत **“स्वच्छ विदयालय स्वच्छ महाराष्ट्र मोहीम”** या पुस्तकात शाळेच्या स्वच्छतेची दखल घेवून **५ फोटोना** स्थान देण्यात आले. गुणवंत विद्यार्थीनीचा व मुख्याध्यापक श्री. डी.एस.मुखम, यांचा सलग तीन वर्षे तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री यांचे हस्ते सत्कार. शाळेची प्रतिमा सह राज्याच्या सामाजिक न्याय विभागाचे नावलौकीक केले आहे. शाळेने आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त केल्याने ISO मानांकन प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय स्तरावरील चित्रकला स्पर्धेत विदयार्थीनीस ५०००/रु चे पारितोषीक मिळाले आहे. शिष्यवृत्ती NTS सह अन्य परीक्षेत उज्वल यश प्राप्त झाले आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. आर. एन. गिरी** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, लातूर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारूनगर, ता.मुरुड, जि.लातूर

**मुख्याध्यापकाचे नाव:-** तानाजी शंकर रोंगे **ई - मेल:-** parunagarzp@gmail.com



**पारुनगर शाळेची सध्याची इमारत**

सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत इ.स.2004 मध्ये केवळ 23 विद्यार्थी घेऊन सुरू झालेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारूनगर, मुरुड, ता. जि. लातूरने अल्पावधीतच राज्यभरात नावलौकीक मिळवत 1127 विद्यार्थी पटसंख्या व 30 शिक्षक इथपर्यंत मजल मारली. 23 ते 1127 हा प्रवास बऱ्याच जणांना काल्पनिक व अद्‌भुत वाटत असला तरी तो सत्य व वास्तव असाच आहे. शाळेने एवढी अविश्वसनिय कामगिरी केली तरी कशी हा सर्वांच्याच औत्सुक्याचा विषय ठरेल. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शाळेचे दोन वर्गखोल्यांचे बांधकाम अजून अपूर्ण असल्यामुळे शेजारच्या अंगणवाडीच्या एकाच खोलीमध्ये अंगणवाडीसह शाळा भरवावी लागायची. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये प्रभारी मुख्याध्यापक म्हणून माझ्यावर जबाबदारी पडली. शाळेला घंटासुद्धा नव्हती. शाळा कधी भरते, कधी सुटते हे आजूबाजूच्या घरांना सुद्धा कळत नव्हते. बाजारात जाऊन भंगार साहित्यातून एक गोलाकार लोखंडी चकतीची घंटा तयार करुन घेतली व दुस-या दिवशी स्वतःच ती शाळेची ऐतिहासिक पहिली घंटा- हो पहिलीच घंटा वाजवायला सुरु केली आणि सुरू झाला एक प्रवास.

शाळेच्या एका बाजूला मध्यमवर्गीय वस्ती होती. परंतु तेथील लोकांचे शाळेकडे दुर्लक्षच होते. मुरूड हे एक मोठे गाव असल्याने पूर्वीच्याच दहा-बारा शाळा होत्या. तरीसुद्धा विद्यार्थी मिळविण्यासाठी घरोघरी भेटी दिल्या. कामाची जिद्द, चिकाटी व सातत्य सोडले नाही. अनेक पालकांना गुणवत्तेची हमी देत विश्वासात घेतले व त्यांच्या पाल्यांना शाळेत प्रवेश घ्यायला भाग पाडले. स्वतःच्या मुलाला शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश दिला. पालकांमध्ये विश्वास निर्माण होऊ लागला व हळूहळू शाळेची पहिली ते चौथीची पटसंख्या 92 पर्यंत नेऊन गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

**विविध उपक्रम:-** प्रतिकूल परिस्थितीत शाळेची वाटचाल सुरु झाली. “वैयक्तिक मार्गदर्शन” हीच यशस्वी शिक्षण प्रक्रियेची गुरुकिल्ली असते हा मंत्र पक्का केला. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगभूत क्षमता लक्षात घेऊन विविध उपक्रम राबवत अल्पावधीतच शाळेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. “नंदादीप शाळा” उपक्रम, इंग्रजी भाषेच्या अध्ययनावर विशेष भर, उत्कृष्ट परिपाठ, कृतीयुक्त

व आनंददायी शिक्षण पद्धती, अध्ययन अनुभवासाठी परिसरातील ठिकाणे व व्यावसायिकांचा वापर, विज्ञानातील गंमतीजंमती, गणितातील कोडी, निसर्गशाळा, चावडीवाचन, विविध शालेय स्पर्धा परीक्षांची परिपूर्ण तयारी, विविध कलागुणांना वाव देणारे साप्ताहिक उपक्रम, प्रदर्शने या व अशा इतर अनेक शालेय व सहशालेय उपक्रमांमधून तयार झालेला पारुनगर शाळेतील प्रत्येक विद्यार्थी हा गावातील इतर कुठल्याही शाळेच्या विद्यार्थ्यांपेक्षा सर्वच बाबतीत सरस ठरल्याचे निदर्शनास आल्याने पालकांनी आपल्या पाल्यांना शाळेत प्रवेश देण्याचे सुरू केले. पुढच्याच वर्षी जूनमध्ये शाळेची इयत्ता पहिली ते चौथीची पटसंख्या वाढली. सर्व शिक्षा अभियानातून आणखी एक वर्गखोली मंजूर झाली. आणखी एका शिक्षकाची शाळेवर नेमणूक केली. आम्हा शिक्षकांचा हुरुप वाढला व नव्या जोमाने आम्ही कामाला लागलो. विद्यार्थीकेंद्रित आनंददायी कृतीयुक्त व अर्थपूर्ण अध्ययन अनुभवांनी विद्यार्थ्यांचे भावविश्व फुलायला लागले, बहरायला लागले. शेजारच्या एका घरातून तात्पुरती वीज जोडून सायंकाळच्या प्रकाशाचीही व्यवस्था करुन घेतली. सर्वांचे एकच ध्येय होते ते म्हणजे “शाळेचा विकास.” त्यासाठी योग्य नियोजन व समर्पण भावनेतून केलेली अंमलबजावणी ही यश तर देणारच होती. शाळेला नवीन दोन शिक्षक रुजू झाले. आता एकूण शिक्षकसंख्या 4 झाली. आता प्रत्येक वर्गाला स्वतंत्र शिक्षक मिळाल्याने व नवीन आलेले शिक्षकही अनुभवी, हुशार व होतकरु असल्याने शाळेच्या सर्वांगीण गुणवत्तेत भर पडू लागली. दरम्यानच्या काळात सर्व वर्गांच्या भिंती बोलक्या करुन घेतल्या होत्या. प्रत्येक वर्गाचे अंतरंग सजले होते, बालस्नेही बनले होते. दरम्यानच्या काळातच इयत्ता चौथी शिष्यवृत्तीचा निकाल लागला होता. शाळेचे दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक बनले होते. सर्वांनाच खूप खूप आनंद व अभिमान वाटू लागला. करत असलेल्या कामाची पावती मिळाली होती. परिश्रमाचे सार्थक झाले होते. सर्वजण नव्या उमेदीने कामाला लागले होते.

अशा परिस्थितीमध्ये शाळेने एक अभूतपूर्व असा निर्णय घेतला. इयत्ता पहिलीची पटसंख्या 56 झालेली होती. त्याच वर्षी नवीन दोन वर्गखोल्या उपलब्ध होताच शाळेने लातूर जिल्ह्यात सर्वप्रथम इयत्ता पहिलीपासून सेमी इंग्रजी माध्यमाचा वर्ग सुरू केला. तत्कालिन गटशिक्षणाधिकारी यांनी स्वखर्चातून शाळेला प्रोत्साहन म्हणून विद्यार्थ्यांना लागणारी पुस्तके व इतर सर्व आवश्यक साहित्य पुरवले. पुढील वर्षी इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू करण्याचे ठरले व पाचवीपासून ही सेमी इंग्रजी माध्यम देण्याचे निश्चित केले. विद्यार्थ्यांसाठी शाळेने 16 एप्रिल ते 31 मे या कालावधीत 46 दिवसांचे “मोफत विशेष उन्हाळी मार्गदर्शन शिबिर” आयोजित केले. सकाळी 6 ते 11 या वेळेत योगासने, प्राणायाम, विवीध व्यायाम प्रकारच्या एका तासिकेसह इयत्ता पाचवी सेमी इंग्रजी माध्यम पूर्वतयारी तसेच इतर वर्गांची स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी करून घेतली.



**विशेष उन्हाळी मार्गदर्शन शिबिरामध्ये योगासने करताना विद्यार्थी व शिक्षक**

इ. स. 2009 च्या जूनमध्ये शाळेची इयत्ता पहिली ते पाचवी ची पटसंख्या 206 वरून 382 पर्यंत पोहोचली. प्रशासनाने याची योग्य दखल घेऊन जूनमध्येच विशेष बाब म्हणून पदनिर्धारण करून तात्काळ शाळेत इंग्रजी माध्यमातून डी.एड. पूर्ण केलेल्या तीन नवीन शिक्षकांची नियुक्ती केली. दरम्यान इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेचे दोन विद्यार्थी 300 पैकी 300 गुण मिळवत राज्यात सर्वप्रथम आले व शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थी व पालकांचा हुरूप वाढला. गावामध्ये ठिकठिकाणी विद्यार्थी अभिनंदनासाठी फ्लेक्स लावले गेले. गावामध्ये असे पहिल्यांदाच घडत होते ते ही एका सरकारी शाळेचे फ्लेक्स...!!!! गावच्या शैक्षणिक पटलावर एका नव्या सरकारी शाळेचा उदय होत होता..!! शाळेच्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी शाळेने यापूर्वीच जादा तासिका व रात्र तासिकांचे आयोजन केले होते. त्याची संपूर्ण जबाबदारी मी माझ्या खांद्यावर घेतली होती. पहिल्याच बॅचचे 6 विद्यार्थी नवोदय साठी पात्र ठरले. शाळेने सतत तीन वर्षे "मोफत विशेष उन्हाळी मार्गदर्शन शिबीर" पुढे चालूच ठेवले. पुढच्याच वर्षी एकाच बॅचच्या 8 विद्यार्थ्यांची नवोदय साठी निवड हा तर उच्चांक ठरला. शाळेची ही परंपरा आजही अखंड सुरूच आहे. आतापर्यंत एकूण 42 विद्यार्थ्यांची नवोदय साठी निवड झालेली आहे.

**समाज सहभाग:-** दरवर्षीचीच होणारी वर्गखोली बांधकामाची अडचण तत्कालिन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी प्रभावीपणे प्रशासनासमोर मांडली व प्रशासनानेही त्याची योग्य दखल घेत विशेष बाब म्हणून एकदमच नवीन आठ वर्ग खोल्यांच्या बांधकामाला मंजूरी दिली. पुढील वर्षभरात अचूक नियोजन व अथक परिश्रमातून बांधकाम पूर्ण झाले. शाळेची इमारतीची समस्या मिटली व पुढे इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत मराठी व सेमी इंग्रजी माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी जिल्हा परिषदेची लातूर जिल्ह्यातील "अग्रगण्य शाळा" असा लौकिक सर्वदूर पोहोचला. आज शाळेमध्ये समाजाच्या सहभागातून व लोकवर्गणीतूनही अनेक भौतिक सुविधा निर्माण झाल्या आहेत.

**शाळेची यशोगाथा:-** दरवर्षी शाळेची पटसंख्या व गुणवत्ता वाढतच गेली. लातूर जिल्ह्यातील 1000 विद्यार्थी असणारी एकमेव प्राथमिक शाळा ठरली. शाळेने जिल्ह्यातील जिल्हा परिषदेची "सर्वात मोठी प्राथमिक शाळा" असा नावलौकिक मिळवला. प्रत्येक वर्गाच्या चार तुकड्या अशा पहिली ते सातवी पर्यंतच्या 28 तुकड्या कराव्या लागल्या. कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण या विषयांच्या अध्यापनासाठी स्वतंत्र तीन निदेशकांची नियुक्ती झाली. ग्रंथालय, सुसज्ज अशी स्वतंत्र विज्ञान प्रयोगशाळा व विविध भौतिक सुविधेसह 30 वर्गखोल्यांची देखणी इमारत आज उभी आहे. अनेक वर्तमानपत्रे, प्रसारमाध्यमे व टीव्ही चॅनलच्या माध्यमातून शाळा संपूर्ण महाराष्ट्रभर पोहोचली आहे.

बदलत्या काळानुसार शाळेने तंत्रज्ञानाशीही जुळवून घेतले आहे. विद्यार्थी आता तंत्रज्ञानाच्या मदतीनेही अध्ययन अनुभव घेत आहेत. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत शाळेने अनेक ठिकाणी सहभाग घेऊन त्यात यश मिळवले आहे. दरवर्षी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दोन-दोन दिवस स्नेहसंमेलनाचे भरगच्च कार्यक्रम सादर केले जात आहेत. शाळेच्या वैभवात दिवसेंदिवस भर पडत आहे. मराठी व सेमी इंग्रजी माध्यमातून दिले जाणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण, विविध शालेय स्पर्धा परीक्षांची परिपूर्ण तयारी व शाळेचा नावलौकिक यामुळे शेजारच्या सुमारे 15 गावातील विद्यार्थीही अनेक वर्षांपासून मोठ्या संख्येने

शाळेत दाखल झालेले आहेत. आता ही शाळा  ख-या अर्थाने "संपूर्ण समाजाची शाळा"झालेली आहे. शाळेची गुणवत्ता व नावलौकीक वाढतच जात आहे. त्याठिकाणी कार्यरत असलेले शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद तसेच समाजातील सर्व घटक तितक्याच समर्पण भावनेतून आजही महत्त्वाची जबाबदारी अखंड पार पाडत आहेत.




**सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी**     **शाळेचे लेझीम पथक**

शाळेच्या या दैदिप्यमान कामगिरी मध्ये सर्व विद्यार्थी, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ तसेच प्रशासन या सर्वांचाच मोलाचा वाटा आहे. सर्वांचा उल्लेख करणे या ठिकाणी केवळ अशक्य आहे. सर्वांच्या एकत्रित, अथक परिश्रमातूनच हे यश साकार झाले आहे. यश मिळवण्यासाठी काहीतरी विशेष वेगळे प्रयोग करावे लागतात असे नसून प्राप्त परिस्थितीमध्ये सर्वांनी मिळून सचोटी व प्रामाणिकपणाने एकत्रितपणे  कार्य केल्यास कोणतेही काम अशक्य नाही. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे ही "पारुनगर ची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा" आहे. पारूनगरची ही जिल्हा परिषद शाळा व तिच्या यशाची परंपरा भविष्यातही अशीच कायम टिकून राहील याची मनोमन खात्री वाटते.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. आर.एन. गिरी** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, लातूर. | मिपा,  औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## एस.एल.अँड एस.एस गर्ल्स हायस्कूल, ठाकूरद्वार, मुंबई

**ई-मेल :–** slandssghs@gmail.com

**मुख्याध्यापिकेचे नाव :-** श्रीमती.शमिका राजेश आजगावकर **ई-मेल:–** ajgaonkarshamika@gmail.com




**एस एल अँड एस एस गर्ल्स हायस्कुलची इमारत**

सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी शाळा काढण्यापूर्वी दोन वर्षे मुंबईमध्ये जगन्नाथ शंकरशेठ यांनी मुलींसाठी शाळा काढलेली होती. या शाळेत सर्व जातीजमातीच्या मुलींना प्रवेश होता. गेल्या २५० वर्षात भारतात अलौकिक चारित्र्याची व कर्तुत्वाची जी माणसे होऊन गेली, त्या सर्व मंडळीमध्ये जगन्नाथ शंकरशेठ यांचे नाव घेता येईल. 1848 साली students literrary and scientific society ची स्थापना केली. आणि स्वतःच्या घरात मुलींची शाळा काढली हि शाळा काढल्याबद्दल लोकांनी त्यांना सळो कि पळो करून टाकले. तरीदेखील त्यांनी शिक्षणाचे आपले कार्य चालूच ठेवले. ज्या शिक्षणाने आपण घडलो ते शिक्षण आज सर्वांना सहज उपलब्ध नाही, हे नानांनी जाणले होते. त्यासाठीच शिक्षण सर्वांपर्यंत पोहचण्यासाठी प्रयत्न नानांनी सुरू केले. देशातील मुलांना उत्तम शिक्षण मिळायला हवे यासाठी सुरू झालेल्या 'नेटिव्ह स्कूल सोसायटी' नावाच्या पश्चिम भारतातील पहिल्या वहिल्या शिक्षणसंस्थेचे नाना संस्थापक होते. याच संस्थेने पुढे मुलींच्या शिक्षणाचा आग्रह धरला. अर्थातच त्यावेळी त्याला सनातनी लोकांकडून विरोध झाला. नानांनी हा आपल्या अधिकाराने हा विरोध मोडून काढत आपल्या घरात मुलींची शाळा सुरू केली. आजही नानांची ही शाळा 'स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी'च्या रुपाने गिरगावात आपले अस्तित्व टिकवून उभी आहे. एस.एल.अँड एस.एस.गर्ल्स हायस्कूल म्हणजेच स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीची मुलींची ही शाळा इसवी सन 1848 रोजी स्थापन करण्यात आली. एस.एल.अँड एस.एस.गर्ल्स हायस्कूलची प्राथमिक शाळा जगन्नाथ शंकर शेठ प्राथमिक शाळा म्हणून ओळखली जाते. याचे संस्थापक नामदार. जगन्नाथ शंकर शेठ तसेच भाऊ दाजी लाड, दादाभाई नवरोजी यासारख्या मान्यवर मंडळींचा शाळेच्या स्थापनेमध्ये मोलाचा वाटा होता. तसेच एस.एल.अँड एस.एस.सोसायटीची ही माध्यमिक मराठी शाळा इमारत 1884 मध्ये गिरगाव मुंबई ठाकुरद्वार येथे उभारण्यात आलेली मुंबईतील ही पहिली मुलींची शाळा म्हणून ओळखली जाते. अशी

गेली 170 हून अधिक वर्ष ही संस्था आणि शाळा टिकून आहे. आजही या शाळेत विद्यार्थिनी उत्तमरित्या शिक्षण घेत आहेत. एस.एल.अँड एस.एस.गर्ल्स हायस्कूल या नावाने माध्यमिक शाळा ओळखली जाते. विद्यार्थिनीचा सर्वागीण विकास व्हावा हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून आजही मुख्याध्यपिका शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी वृंद यांचे प्रयत्न चालू आहेत.




**शाळेतील विवध उपक्रमात सहभागी विद्यार्थिनी**

**शालेय विकास :-** शाळेतील विद्यार्थी कमी होत होते कारण स्थानिक लोकांचे स्थलांतर,इंग्लिश मीडियम स्कूल, आय सी एस सी बोर्ड, आंतरराष्ट्रीय शाळा इ. विविध कारणांमुळे स्थानिक माध्यमांचे विद्यार्थी कमी होऊ लागले आहेत. विद्यार्थिनी संख्या वाढविणे हे सर्वात मोठे आव्हान शाळेतील अनेक विद्यार्थिनी अत्यंत मध्यमवर्गीय आणि दारिद्रयरेषेच्या पार्श्वभूमीच्या खालील आहेत. त्यापैकी काही विद्यार्थिनी शारीरिकदृष्ट्या दिव्यांग आहेत. प्रथम वर्षात विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी घरोघरी जाऊन विद्यार्थिनी शिक्षण प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आणि विद्यार्थी संख्या वाढवली. विद्यार्थिनींचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी गेल्या तीन वर्षात विविध उपक्रम घेण्यात आले. या अंतर्गत शाळेत होणाऱ्या वार्षिक शैक्षणिक तसेच क्रीडा स्पर्धा, आंतरशालेय क्रीडा स्पर्धा, विविध स्पर्धा परीक्षा तसेच विविध मार्गदर्शन कार्यशाळा यांचे आयोजन करून विद्याथिर्नींचा सर्वागीण विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**शालेय वार्षिक स्पर्धा :-** विद्याथिर्नींचा सर्वागीण विकास साधण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यात शारदा मंडळ अंतर्गत हस्ताक्षर स्पर्धा, मराठी ,इंग्रजी, हिंदी वक्तृत्व स्पर्धा, मनाचे श्लोक व गीता पाठांतर स्पर्धा, शुभदा वाघमारे नृत्य नाट्य स्पर्धा,शालेय वार्षिक क्रीडा स्पर्धा, सुलभा गुंजीकर गायन स्पर्धा. याच बरोबर तालुकास्तरीय, आंतरशालेय, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय स्पर्धासीडी वॉर्ड तालुकास्तरीय रांगोळी स्पर्धा - विद्याथिर्नींचा सहभाग,विज्ञान प्रदर्शन CD WARD ,चित्रकला स्पर्धा - इनरव्हील क्लब बॉम्बे नॉर्थ - विद्याथिर्नींचा सहभाग, एन.सी.पी. ए - उडान फेस्टिवल काला घोडा - 15 विद्याथिर्नींचा सहभाग, एन.सी.पी. ए येथे गाण्यांचे सादरीकरण, नॅशनल स्पॉन्सरशिप तर्फे

आंतरशालेय नृत्य स्पर्धा, यापैकी अनेक स्पर्धांमध्ये पारितोषिके देखील प्राप्त झाली आहेत.ज्यात स्वच्छ शाळा -तिसरे पारितोषिक, Nation Builder Award – Mrs.Nilambari Kamble.(Teacher),Table Tennis – 2nd prize,Hindi essay – 3rd prize,Story telling – 2nd prize,Chess – 3rd prize,Carrom – 2nd prize,arrom jr.group – 1st prize,Nation Builder Award – Mrs.Shamika Rajesh Ajgaonkar.(Principal),Drama – 2nd prize,Rotary youth month activities incharge - सन्मानचिन्ह - Mrs. Nilambari Kamble .




**विविध स्पर्धांमध्ये सहभागी विद्यार्थी तसेच पारितोषिके स्वीकारतांना विद्यार्थी**

**मार्गदर्शन,व्याख्यान,कार्यशाळा :-** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेळोवळी विविध व्याख्याने व कार्यशाळाचे आयोजन केले ज्यात कारगिल शौर्य दिन - लक्ष फाउंडेशन - फिल्म तसेच युद्ध संबंधी माहिती- श्रीमती. अनुराधा प्रभुदेसाई,लिटरसी प्रोग्रॅम- इनरव्हील क्लब बॉम्बे मिड टाउन,कॅन्सर अवेअरनेस - Given Foundation - संतोष कोरी, Burns Awareness - ppt सादरीकरणारतून मार्गदर्शन- श्रीमती मेधा जोगळेकर, स्वच्छता अभियान मार्गदर्शन - श्रीमती कशेलिकर, तन्वी आहेर, स्त्री-आरोग्य या विषयावर मार्गदर्शन, आरोग्य विषयक प्रश्नमंजुषा तसेच सॅनिटरी नॅपकिन्सचे सर्व विद्यार्थिनींना वाटप - श्री. नितीन विष्णू कदम, आंतरराष्ट्रीय योगा दिन-योगाचे महत्त्व–मार्गदर्शन- रूपा संघवी, हस्ताक्षर सुलेखन याविषयी – मार्गदर्शन, फोल्ड स्कोप या पेपर मायक्रोस्कोप याविषयी मार्गदर्शन तसेच कार्यशाळा - थिटे मॅडम आणि त्यांची टीम (माजी विद्यार्थिनी, संस्थेच्या सदस्या, भौतिक शास्त्र प्राध्यापिका KC COLLEGE),'गुड टच बॅड टच स्पर्श' याबाबत पीपीटी सादरीकरणातून मार्गदर्शन - इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे मिड टाऊन, रूबेला गोवर या आजारांविषयी जागरूकता घडविण्यासाठी बीएमसी तर्फे आरोग्य अधिकारी व डॉक्टरांचे व्याख्यानमासिक पाळी मार्गदर्शन - आयुर्वेदिक हॉस्पिटल, 'अन्नपदार्थातील भेसळ, प्रदूषण तसेच गोल्डन राईस या विषयी मार्गदर्शन - थिटे मॅडम आणि त्यांची टीम –(के सी कॉलेज), आवर्त सारणी विज्ञान विषयक मार्गदर्शन – डॉ. सुनंदा करंदीकर, वारली पेंटिंग कार्यशाळा - सुज्ञा

बॅनर्जी ( भरतनाट्य नृत्यांगना आणि माजी विद्यार्थिनी), गणेश मूर्ती कार्यशाळा - मुंबई सकाळ तर्फे, ग्रीटिंग पेंटिंग वर्कशॉप - सुज्ञा बॅनर्जी, नॅशनल स्पॉन्सरशिप तर्फे क्ले वर्कशॉप, व्यक्तिमत्व विकास वर्ग अवंती फाउंडेशन, स्वयम् प्रतिष्ठान कला- कार्यानुभव कार्यशाळा - साबण बनविणे, कागदी पिशव्या व दागिने बनविणे - श्रीम. जान्हवी गुर्जर आणि मनीषा पटवर्धन,फोल्ड स्कोप या पेपर मायक्रोस्कोप याविषयी मार्गदर्शन तसेच कार्यशाळा - थिटे मॅडम आणि त्यांची टीम, वेस्ट मॅनेजमेंट वर्कशॉप - रोटरी क्लब ऑफ मुंबई साउथ, शासनप्रणित कला एवं सांस्कृतिक प्रशिक्षण केंद्र (सी.सी.आर.टी.) द्वारका, दिल्ली वर्कशॉप सात दिवस, कुंभार काम, कागद काम, वारली पेंटिंग, ज्वेलरी मेकिंग, मॅक्रोनी आर्ट, रांगोळी, पेपर मॅशे इ.चा समावेश आहे.




**शाळेतील विविध उपक्रमामध्ये सहभागी विद्यार्थी**

**वैद्यकीय शिबीर /तपासणी :-** शाळेत विद्यार्थिनींच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्या शारीरिक आरोग्य विकासासाठी दरवर्षी इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे मिड टाऊन यांच्यातर्फे शाळेत विद्यार्थिनींर्ची वैद्यकीय तपासणी केली जाते. अनेक डॉक्टर शाळेमध्ये विद्यार्थ्यांची तपासणी करतात. एखाद्या विद्यार्थिनीला पुढे उपचारांची गरज असेल तर पुढील सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. 2018 मध्ये शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत IMA- इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्यातर्फे मिशन पिंक हा कार्यक्रम शाळेत घेण्यात आला. या अंतर्गत आमच्या शाळेच्या विद्यार्थीनींनी बरोबरच इतर शाळांमधील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. - Rotary Club Of Mumbai South

**दिनविशेष :-** शैक्षणिक वर्षामध्ये येणारे सर्व महत्वाचे दिनविशेष यांची माहिती शाळेच्या तळमजल्यावरील फलकांवर लिहिली जाते. ती माहिती विद्यार्थिनींना आवर्जून वाचायला सांगितली जाते. या फलकांचे लेखन शाळेचे प्रयोग शाळा सहाय्यक करतात. या दिनविशेष फलक लेखन उपक्रमामुळे मुलींना प्रत्येक महत्वाच्या दिवसांची माहिती मिळते. याचा त्यांच्या सामान्य ज्ञानासाठी फायदा होतो. मराठी दिन, विज्ञान दिन, राष्ट्रीय हिंदी दिवस, शिक्षक दिन, वाचन प्रेरणा दिन

अशा विविध दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन शाळेत विद्यार्थिनींच्या विकासासाठी केले जाते. वाचन प्रेरणा दिनानिमित्त माजी शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत शाळेमध्ये पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.



**विविध दिनविशेष कार्यक्रमाची क्षणचित्रे**

**विविध स्पर्धा परीक्षा :-** संस्कृती संवर्धन परीक्षा या अंतर्गत कथारूप रामायण, महाभारत तसेच क्रांतिकारक यांवर आधारित परीक्षा घेण्यात येते. यामध्ये विद्यार्थिनींचा उत्तम प्रतिसाद दिसून येतो. या परीक्षेअंतर्गत विद्यार्थिनींना प्रथम, द्वितीय तसेच तृतीय पारितोषिक दरवर्षी प्राप्त होतात. तसेच या परीक्षेमुळे विद्यार्थिनींना आपली संस्कृती, रामायण- महाभारत या कथांच्या माध्यमातून समजायला मदत होते. हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा दरवर्षी विद्यार्थिनींच्या हिंदी विकासासाठी पहिली ते दहावी हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेमध्ये सुद्धा विद्यार्थिनींचा उत्तम सहभाग असतो. विद्यार्थिनींना जास्तीत जास्त गुण या परीक्षेमध्ये प्राप्त होतात. यामुळे हिंदी भाषेचा विकास सुद्धा विद्यार्थिनींमध्ये होतो.

**लोकसहभाग :-** शिक्षणामध्ये लोकसहभाग घेण्याच्या हेतूने या सर्व क्लब्सची शाळेला मदत होत असते. विविध क्लब ट्रस्टस ROTARY CLUB OF MUMBAI SOUTH, INNERWHEEL CLUB OF BOMBAY MIDTOWN,INNERWHEEL CLUB OF QUEENS NECKLACE, INNERWHEEL CLUB OF BOMBAY NORTH,NATIONAL SPONSORSHIP,LIONS CLUB OF CHURCHGATE, IDBI FEDERAL LIFE INSURANCE COMPANY LTD. यांचे सहकार्य शिक्षणामध्ये लोकसहभाग घेण्याच्या हेतूने विविध खाजगी कंपन्यांना आम्ही विनंती केली आणि या विनंतीला मान देऊन IDBI FEDERAL LIFE INSURANCE COMPANY LTD. यांनी आम्हाला सात लाखाचा निधी हा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी आणि शैक्षणिक विकासासाठी उपलब्ध करुन दिला. यामुळे गेल्या तीन वर्षात विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आम्ही विद्यार्थिनींसाठी आयोजित करू शकलो. विविध शैक्षणिक भेटी आयोजित करू शकलो. उत्तम सहलींचे आयोजन करू शकलो आणि हे केवळ आम्हाला शिक्षणामध्ये या संस्थांचा लोकसहभाग घेतल्यामुळेच होऊ शकले.

**इको क्लब** :- इको क्लब अंतर्गत पर्यावरणाशी संबंधित सर्व दिनविशेष साजरे केले जातात. याअंतर्गत वृक्षदिंडी पर्यावरणावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा ,रांगोळी स्पर्धा ,टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनवणे अशा विविध प्रकारचे उपक्रम घेतले जातात. इको क्लब अंतर्गत निसर्ग भेट - माहीम नेचर पार्क या इको क्लब अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांमुळे पर्यावरण संतुलन न ढासळता आपले विविध सण कसे साजरे करावेत याबाबतचे मार्गदर्शन केले जाते. या सर्व उपक्रमांचा विद्यार्थिनींच्या विकासावर उत्तम परिणाम दिसून येतो. मीना राजू मंच अंतर्गत दर आठवड्याला विविध मूल्यांवर आधारित कथा, प्रश्नमंजुषा, विविध खेळ घेतले जातात. यामुळे स्त्री पुरुष समानता या मूल्याची रुजवणूक विद्यार्थिनींमध्ये होते.

**शिक्षकांनी सहभाग घेतलेली प्रशिक्षणे :-** शाळेत घेतल्या गेलेल्या व  शासनामार्फत आयोजित केलेल्या विविध प्रशिक्षणे कार्यशाळा यांमध्ये शाळेचे शिक्षक सहभागी होतात. Tag आणि Tejas यांच्यामार्फत अविरत विषय प्रशिक्षण, ETF - English training, RMSA प्रशिक्षण, पुनर्रचित अभ्यासक्रम, शिक्षणाची वारी, विषय निहाय तालुकास्तरीय प्रशिक्षणे, दिव्यांग प्रशिक्षण, मुंबई एज्युकेट - MEET-  तर्फे ऑनलाईन प्रशिक्षण, रोटरी क्लब अंतर्गत अध्ययन-अध्यापन विकसित होण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण इ. शाळेत होणाऱ्या विविध कार्यशाळांमध्ये तसेच मार्गदर्शनामध्ये सर्व शालेय शिक्षक सहभागी होतात. या सर्व प्रशिक्षण- कार्यशाळेमुळे शालेय शिक्षकांच्या ज्ञानात भर तर झालीच आहे तसेच अध्ययन अध्यापनात अद्ययावत तंत्रांचा वापर, यामुळे विद्यार्थिनींचा शैक्षणिक विकास साधण्यासाठी शिक्षकांनी अद्ययावत तंत्रांचा वापरकेला आहे . शाळेतील काही  शिक्षकांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून इतर शाळेत मार्गदर्शन केले आहे.

**अध्ययन अध्यापनातील बदल :-** कृतियुक्त अध्यापन, ई लर्निंग, तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अध्ययन-अध्यापन, हे सर्व तंत्रांचा वापर करून अध्ययन अध्यापनात बदल घडून आले आहेत. विविध वर्कशॉप्स उर्फ कार्यशाळा आयोजित केल्यामुळे अध्ययन सोपे आणि जवळीक साधणारे वाटले.




**विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या बोलक्या भिंती**

**Covid 19 – परिस्थिती :-** मार्च 2020 ते आतापर्यंत covid-19 परिस्थिती या कालावधीमध्ये आम्ही ऑनलाइन तंत्रज्ञानाचा ऑनलाइन शिक्षणाचा उपयोग केला आणि त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकवत गेलो. सुरुवातीला काही महिने थोडे अडचणीचे गेले कारण तंत्रज्ञानाशी मिळताजुळता घेण्यास थोडं कठीण गेलं. अर्थात नंतर त्याचा सराव होत गेला आणि विद्यार्थिनींना उत्तम रित्या ऑनलाइन पद्धतीने अध्ययन-अध्यापन करू शकलो. याचा परिणाम असा झाला की आमच्या विद्यार्थीदेखील ऑनलाईन पद्धतीने स्वतःच्या ऑडिओ स्वतःचे व्हिडिओ डाऊनलोड करू लागले त्याच्यानंतर शिक्षक आणि मी स्वतः देखील आम्ही उत्तम पद्धतीने गुगल फॉर्म रूपात प्रश्नपत्रिका तयार करू लागलो. त्याचप्रमाणे स्वतःच्या व्हिडिओ देखील तयार करू लागलो. या संपूर्ण covid-19 परिस्थितीमध्ये जास्तीत जास्त टेक्नोसॅवी होत गेलो. आम्हाला तंत्रज्ञानाची चांगली ओळख झाली.





**शाळेने पटकाविलेली गौरव पदके**

आज पर्यंत शाळेने वेगवेगळी उपक्रमे, व्याख्याने, कार्यशाळा घेऊन स्वत:चा एक वेगळा ठसा उमटवला आहे. व मुलीच्या शिक्षणाच्या कक्षा रुंदावण्याचा प्रयत्न करीत आहे. एका अर्थाने सक्षमीकरणाचा प्रयत्न करीत आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती. मनिषा पवार** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, मुंबई. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोंढासावळी, ता.काटोल, जि.नागपूर

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री अरुण वासुदेवराव पांडे **ईमेल:** arunpande0707@gmail.com



**जि.प.उच्च प्राथ.शाळा, कोंढासावळी शाळेचा परिसर**

शाळेची स्थापना १९५३ या वर्षी झाली. शाळेला भव्य असे पटांगण आहे. १४०० लोकसंख्या असलेल्या गावातील हि शाळा. किंबहुना शाळेची पटसंख्या दरवर्षी कमी होण्याऐवजी वाढत आहे. मुख्याध्यापक व सोबतीला कार्य करणारे ५ शिक्षक यांच्या अथक परिश्रमाने शाळा नावारूपास आली. गुणवत्ता वाढीसाठी शाळेबरोबर शाळा व्यवस्थापन समिती, तरुण मंडळी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे. शाळेची उपस्थिती पूर्ण राहण्यास आम्हाला थोडी अडचण होती. या गावात गोसावी समाज आहे. ते वर्षातील बराच काळ भटकंती करतात. मुख्याधापक व सर्व शिक्षक यांच्या प्रयत्नाने उपस्थिती वाढण्यास मदत झाली. आता पालक फिरायला जातात मात्र बऱ्याच मुलांना घरीच ठेवतात व शाळेत पाठवतात.

**शालेय बाग :-** विध्यार्थ्यांना शाळेची ओढ लागावी, शाळेची वातावरण सुंदर व रम्य व्हावे व गुणवत्ता वाढावी म्हणून शाळेत १००० चौरस फूट जागेवर सुंदर बाग तयार करून मुलांना दुपारच्या सुट्टीतही घरी न जाता जेवणानंतर वाचन करायला लावले जाते. शाळेच्या भिंतीच्या बाह्य भागावर आकर्षक रंगरंगोटी करून भिंती बोलक्या करण्यात आल्या आहेत. एकूणच ह्या सर्वांचा विचार करता हे कार्य बालकांच्या हक्काचे संरक्षण होण्यास, गुणवत्ता वाढण्यास व शालेय संस्कृती निर्माण होण्यास उदयुक्त करते असे दिसून येते.



**शाळेची रंगीत बाग**

**स्व विकास :-** शाळेतील सर्व शिक्षक स्वविकास करण्यास नेहमी तत्पर असतात . सर्व शिक्षक पदवी धारक आहेत . आपले ज्ञान अदययावत  ठेवतात व तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यावर भर देतात. मुख्याध्यापक व वर्गशिक्षकांनी ऑनलाईन सर्व प्रशिक्षणे पूर्ण केली. त्या बालकांच्या बालहक्क संरक्षण,नवोपक्रम अहवाल लेखन प्रशिक्षण, व Miepa संस्थेद्वारे घेण्यात आलेल्या नेतृत्व विकास प्रशिक्षणात सहभाग नोंदवून स्वविकास करण्याचे पूर्ण प्रयत्न करण्यात आले.

**शाळेच्या बोलक्या भिंती :-** आम्ही अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ , सोपी व आनंददायी होण्याच्या दृष्टीने शाळेच्या भिंती बोलक्या केल्याचं सोबत गावातील भिंतीही बोलक्या केल्या. हे काम नव्याने हाती घेतले. सर्व विषयांचे चार्ट गावातील भिंतीवर तयार करण्याचा मानस आहे. जेणेकरून संपूर्ण गाव शिक्षणाच्या प्रक्रियेत सहभागी होईल व शैक्षणिक वातावरण निर्माण होईल. मुले चालता बोलता वाचतील त्यामुळे त्यांच्यावर अभ्यासाचा ताण येणार नाही. अभ्यासाची व विषयांची मनात भीती राहणार नाही. अभ्यास आनंदाने केला तर कंटाळा येत नाही व तो कायमस्वरूपी लक्षात राहतो. हे सर्व करताना विद्यार्थी अध्ययन निष्पत्ती पर्यंत कसे पोहचतील याचे ही भान ठेवले आहे. मुलांचा चौफेर विकास व्हावा  व त्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी म्हणून सामान्य ज्ञानावरही भर देण्यात आला आहे.मुलांना सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नावली तयार करून पुरवण्यात आली आहे .



**शाळेच्या बोलक्या भिंती**

**पालक व व्यवस्थापन समितीचा सहभाग :** शाळा,पालक व व्यवस्थापन समिती नेहमीच शाळेचा विकासाचा योजनेत सहभागी असते. दुपारच्या सुट्टीत जेवणानंतर अभ्यास करायला लावणे असो किंवा रात्री अभ्यासाला बसायला लावणे असो त्यांचे नेहमीच सहकार्य असते. शाळा सुंदर करण्यास, ती नेहमी सुंदर राखण्यास संपूर्ण गावकरी सहकार्य करतात. पालकांच्या सहकार्यानेच आम्ही क्रीडा स्पर्धा, सहल, वनभोजन या सारखे उपक्रम राबविणे आम्हाला सोपे जाते .



**व्यवस्थापन समिती  सभा**



**शालेय सहल**

**शालेय नवोपक्रम :** आमच्या शाळेत अनेक नवोपक्रम वेळोवेळी राबविले जातात जसे इंग्रजीच्या प्रत्येक अक्षरापासून तयार होणारे शब्द तयार करून त्यांना भिंतीवर प्रदर्शित करण्यात आले आहे. त्याच बरोबर शाळेतील वस्तुंना लेबलींग करणे. गणित विषयाकरिता भौमितिक आकृत्या शिकविताना कागदाला घडी घालून भौमितिक आकृत्या व रचना यांच्या गुणधर्म विषयी शिकविणे व शिकणे अशा अनेक नवनवीन बाबींचे प्रयोग शाळेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाकरिता करण्यात येतात . शाळेचा परिपाठ घेताना दिनांक तो पाढा,उपस्थितीचे मोजमाप करतांना इंग्रजीत spelling सहित क्रमांक म्हणणे. परिपाठात गोष्ट सांगणे व आदर्श परिपाठ मुलांकडून करून घेणे इत्यादी बाबी आम्ही करीत असतो .




**शालेय उपक्रम**

**शाळेत उपलब्ध सोयी सुविधा :** शाळेमध्ये  डिजिटल क्लास रूमची सोय आहे. सुसज्ज असे संगणक कक्ष आहे.  सुसज्ज अशी नावीन्यपूर्ण विज्ञान प्रयोग शाळा आहे. विद्यार्थ्यांच्या स्वयं अध्ययनासाठी ज्ञान रचनावाद युक्त वर्ग खोल्यातयार करण्यात आल्या आहेत. खेळण्यासाठी भव्य पटांगण आहे, जेथे खेळणी व विविध क्रीडा साहित्य उपलब्ध आहे.  मुलां व मुलींकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह आहेत. पिण्याचा पाण्यासाठी R.O. युक्त स्वच्छपाणी उपलब्ध आहे. शालेय परसबाग जेथील शेंद्रीय पद्धतीने उगवलेल्या भाज्यांचा वापर शालेय पोषण आहारात करण्यात येतो. शाळेचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याकरिता भव्य मंच आहे.



**शाळेचा रंगमंच**



**विज्ञान प्रयोगशाळा**

**क्रीडा क्षेत्रातील कामगिरी :** सतत ५ वर्ष लंगडी या खेळात जिल्हा स्तरावर वरिष्ठ गटात विजेता. २ वेळा उपविजेता शाळेचा संघ कबड्डी या खेळात जिल्हा स्तरावर वरिष्ठ गटात उपविजेता ठरला आहे.

**संपूर्ण गावातील लोक शिक्षणाच्या प्रवाहात :** कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शाळा बंद असतानां सर्वांचे शिक्षण थांबले होते. कोंढासावळी गावात असणारा समाज मात्र यावेळी शिक्षणापासून वंचित होता. कारण त्यांचेकडे कोणतेही माध्यम उपलब्ध नव्हते. मात्र हा गोसावी समाज शिक्षण मिळवण्यासाठी धडपडत होता. नेमके हेच कारण लक्षात घेऊन शाळेतील सर्व शिक्षकांनी शाळेला त्यांच्या दारापर्यंत पोहचवले. या करीता गोसावी समाजातील विद्यार्थी ज्या वस्तीत राहतात त्या वस्तीतील घराच्या मोकळया भिंतीवर वेगवेगळया विषयांचे तक्ते स्वतःच्या हाताने तयार केले. त्याचा असा फायदा झाला की ज्या ज्या वेळेस विद्यार्थी त्या ठिकाणी खेळायचे त्याच वेळी संबंधित तक्त्यांवर लिहलेली माहिती स्वतःहून वाचायचे. तक्त्यांवरील रिकाम्या जागा भरण्याचा प्रयत्न करायचे. त्यामुळे सहजरित्या शिक्षण मिळायचे. हे सर्व करतांना बालकांच्या शिक्षणाच्या हक्काचे संरक्षण व्हावे, ते मूळ प्रवाहात राहावेत हाच उद्देश होता. यात टिलिमिली कार्यक्रम सुरु असताना सकाळी १२ वाजेपर्यंत त्या त्या वर्गातील विद्यार्थी टीव्ही लावून आपापल्या वर्गाचा अभ्यास बघतात याची खात्री करून घेतली. पालकांना जागृत करून त्यांना त्याची माहिती दिली. मुलांशी प्रत्यक्ष संपर्क नसला तरी त्यांनी कुठेतरी लिहलेले वाचावे या करीता गावातील भिंती रंगविल्या. काही दिवस गणित व इंग्रजी या विषयाचे Zoom App वर वर्ग घेतले.




**कोरोना काळात शाळेनी केलेली कामगिरी**

हे सर्व करत असतांना विध्यार्थी अध्ययनाच्या मूळ प्रवाहात कायम राहिले व अध्यापानासाठी धडपडणाऱ्या मुख्याध्यापकासह सर्व शिक्षकांचा उत्साह कायम राहिला आहे व सतत प्रयत्न सुरु आहे. लॉकडाऊनच्या काळात शाळेतील ८० टक्के विद्यार्थ्यांपर्यंत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पोहचण्यास आम्हाला यश आले. आमच्या शाळेत आम्ही प्रोजेक्टर चा उपयोग करून शिकवितो. त्यामुळे विध्यार्थ्यांच्या मूळ संकल्पना पक्क्या होण्यास मदत होते व त्यांना अध्ययन निष्पत्ती पर्यंत नेण्यास मदत होते. गावातील भिंतीवर चार्ट लिहील्यामुळे मुलांना दिसेल तिथे वाचण्याची सवय लागली व त्यांच्या वाचन कौशल्यात वाढ झाली.

अशाप्रकारे आमची जि. प. उच्च प्राथमिक शाळा कोंढासावळी सतत, सदैव व सात्यत्याने विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा म्हणजेच एकूण शाळेचा विकास करण्यास प्रयत्नशील असते. **अशीही आमची शाळा प्रयत्नवादी शाळा.**

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. बालमणी नंदाला** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, नागपूर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सिरसोली, ता.मौदा, नागपूर

**मुख्याध्यापक :-** श्री. अमृत रंगराव कांबळे **ई-मेल :-** amrutkamble1973@gmail.com



**शाळेची इमारत**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सिरसोली येथील गावाची लोकसंख्या जवळपास 1000 आहे. गाव हे नागपूर जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर आहे. शाळेचा शैक्षणिक दर्जा चांगल्या प्रकारे होता, परंतु भौतिक सुविधांच्या बाबतीत शाळा अपूर्ण होती. त्यामुळे ग्रामसभेमध्ये सर्व शाळेच्या भौतिक सुविधांचा लेखाजोगा गावासमोर मांडला सुरुवातीला खूप अडचण निर्माण झाली परंतु "जोपर्यंत शाळा समाजात जात नाही व समाज शाळेत येत नाही तोपर्यंत शाळेचा सर्वांगीण विकास होत नाही." हे माहीत असल्यामुळे समाजातील गावातील लोकांचा सहभाग शालेय कामकाजात वाढवला. पालक मेळावे, महिला मेळावे, सांस्कृतिक कार्यक्रम, सण-उत्सव साजरे करणे असे एक-ना अनेक उपक्रम शाळेत राबवण्यास सुरुवात केली. गावकऱ्यांना देखील शाळे बद्दल आकर्षण निर्माण झाले स्वतःहून गावकरी शाळेकडे यायला लागले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता, कलागुण पाहून आनंदी व्हायला लागले. त्यांच्या मनात शाळेला मदत करण्याची इच्छा मनोमन तयार झाली. सर्वप्रथम विद्यार्थी स्थलांतर तसेच एकही विद्यार्थी शाळाबाह्य होऊ दिला नाही.100% पटनोंदणी,100% उपस्थिती हे उद्दिष्ट पूर्ण केले. गुणवत्ता वाढीकडे लक्ष दिले, शालेय परिसर स्वच्छ केला, शालेय परिसरात झाडे लावली, वातावरण प्रफुल्लित केले, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पूरक पोषण आहार, शालेय परिपाठ याकडे लक्ष देऊन चांगल्या दर्जाचे काम केले. विद्यार्थ्यांमध्ये बदल दिसू लागला, तसाच बदल मग पालकांमध्ये दिसायला लागला, जो पालक 100 रुपये लोकवर्गणी द्यायला तयार नव्हता तो पालक आज शाळेसाठी काहीही करायला तयार आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समिती यांनी वेळोवेळी शाळेसाठी मदत केली.

**शाळा व्यवस्थापन समितीचे सहाय्य :-** शाळेमध्ये भरपूर भौतिक बदल करणे आवश्यक होते. सर्वप्रथम शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये हे सर्व विषय मांडून ह्या समस्या सोडविण्यासाठी नियोजन केले. सर्व पदाधिकारी व अधिकारी यांना विश्वासात घेऊन त्यांच्या मदतीने शालेय भौतिक व शैक्षणिक विकास करण्यासाठी उपयोग करून घेतला. शाळा लगत असलेल्या नाल्याला पूर आल्यावर शालेय परिसरात पुराचे पाणी येत होते त्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत यांना विश्वासात घेऊन, जिल्हा परिषद, नागपूर येथे नेऊन सतत पाठपुरावा करून 90 मीटर नाल्या लगत संरक्षक भिंत बांधण्यात

आली. तसेच शाळे समोरचे लोक शाळेच्या आवारात वाहने ठेवायचे. शाळेच्या आवारात पंचवीस तीस वर्षापासून पानटपरी होती ते समोरील सुरक्षा भिंत बांधायला विरोध करत होते त्यामुळे संरक्षण भिंत बांधताना अडथळा येत होता त्यांची समजूत घालून यावर्षी शाळेसमोर संरक्षण भिंत बांधण्यात आली. तसेच एक वर्ग खोली गळत होती, त्यामुळे तीथे विद्यार्थी बसणे योग्य नव्हती, ती सुद्धा दुरुस्त करण्यात आली.





**व्यवस्थापन समितीच्या सहाय्याने संरक्षण भिंत तयार करण्यात आली**

**स्व विकास :-** स्व विकासा साठी आमच्या शाळेतील शिक्षकांनी वेळोवेळी प्रशिक्षणे पुर्ण केली आहेत. TAG MEETING, BRITISH COUNCIL यासारख्या इंग्रजी विषयाच्या प्रशिक्षणामुळे इंग्रजी अध्यापनासाठी विशेष लाभ झाला. विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयावर अनेक खेळ माहिती झाले. विज्ञान विषयाच्या ट्रेनिंग मुळे शाळेतील साहित्याची हाताळणी व प्रयोग यामुळे विद्यार्थ्यात वैज्ञानिक संकल्पना दृढ झाल्या अध्यापन करताना शिक्षकांना त्याचा लाभ झाला. निष्ठा प्रशिक्षणामुळे विषयातील क्लिष्ट संकल्पना स्पष्ट झाल्या. त्यांचा अध्यापनात वापर करण्यात आला. इतिहासात नाट्य, नाटिका यासारख्या पद्धतीने इतिहास सोपा करून शिकवता आला. शिक्षणातील विविध प्रयोगांचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने शिक्षणाची वारी, नाविन्यपूर्ण उपक्रम, सातारा जिल्ह्यातील कुमठे बिठ, पुणे येथील शिक्षणाची वारी या मधील अनुभव शाळेत राबविले. तसेच स्मार्ट इंग्रजी प्रशिक्षण, आनंददायी शिक्षण प्रकल्प, पुनर्रचित अभ्यासक्रम, अल्प मुदतीचे प्रशिक्षण, प्राथमिक शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, या विषयावरील प्रशिक्षणाद्वारे शिक्षण क्षेत्रात सतत बदल होत असलेल्या बदलांची माहिती मिळाली व स्वतःला अद्यावत होण्यास वाव मिळाला. अशा प्रकारे शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत सकारात्मक बदल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिरसोली येथे झालेला आहे. स्वतःच्या विकासावर लक्ष केंद्रित करता आले.

**विद्यार्थ्यांचा विकास:-** शाळेमध्ये 20 अप्रगत विद्यार्थ्यांना प्रगत करण्यात आले. अध्यापन कौशल्यात वर्ग व्यवस्थापन कौशल्य, संप्रेषण कौशल्य, कथन कौशल्य, स्पष्टीकरण कौशल्य, उदाहरणे व दाखले कौशल्य, वर्णन कौशल्य, अभिनय कौशल्य, समारोप कौशल्य, आंतरक्रिया विषय कौशल्य, प्रश्न कौशल्य,चेतक कौशल्य,प्रबलन कौशल्य, फलक कौशल्य अशा अनेक कौशल्यांचा वापर करून विद्यार्थ्यांची प्रगती करण्यात आली. वर्गात सर्व विद्यार्थी ही कुशाग्र बुद्धिमत्तेचे नसतात, म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा विचार करून त्यानुसार अध्यापन करणे आवश्यक आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन सर्वप्रथम दरवर्षी सुरुवातीला विद्यार्थ्यांचे गट पाडून गटप्रमुख नेमणे प्रत्येक गटामध्ये एक गतिमंद विद्यार्थी घेऊन त्याची जबाबदारी गटाकडे देणे व दर आठवड्यातून या गटाकडून शिक्षकांनी आढावा घेऊन शिक्षकांनी त्यावर मार्गदर्शन करणे. तसेच गतिमंद विद्यार्थ्यांना शिक्षकांनी सुद्धा विशेष लक्ष देऊन हुशार विद्यार्थ्यांच्या प्रवाहात आणून वाचन-लेखन प्रकल्प शाळेत राबवून जे विद्यार्थी अभ्यासात मागे होती त्यांना काही प्रमाणात प्रगत करण्यात आली. त्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम शाळेत राबविण्यात आले.



**विद्यार्थी गट करून अध्ययन करताना**

**शालेय उपक्रम :-** विविध सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी मी कसा दिसतो यासाठी दर्शनी भागात विद्यार्थ्यांना स्वतः स्वतःचे मूल्यांकन करून त्यांच्यामध्ये वर्तन बदल करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी विशेष स्पर्धा जसे धावणे,चित्रकाढणे,पेंटिंगकरणे, दैनंदिनी लिहिणे, स्वयं अनुभव लिहिणे,चित्र वर्णन इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी विकासासाठी निसर्ग शाळा, सहली, वनभोजन चे आयोजन नियमितपणे करण्यात येत आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यार्थी हितासाठी प्रयत्नरत राहून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा स्पर्धाचे, नाटक, स्वतःचे प्रगटन इत्यादीसाठी विद्यार्थ्यांना नियमितपणे संधी देण्यात येत असते.



**सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी विद्यार्थी**



**कवायतीत सहभागी विद्यार्थी**

**लोकसहभाग:-** शाळा विकासात गावाचा सुद्धा मोलाचा वाटा असतो "गावाला शाळेचा अभिमान वाटावा शाळेला गावाचा आधार वाटावा" या म्हणीप्रमाणे शाळा व्यवस्थापन समितीच्या व ग्रामपंचायत च्या सर्व सदस्यांनी थोर पुरुषांच्या तीस फोटो, शुद्ध पाणी पिण्याचे आरो, शाळेला सप्रेम भेट दिले. तसेच ग्रामपंचायत कडे सतत पाठपुरावा करून एका वर्ग खोलीची रंगरंगोटी, एक संगणक संच, प्रोजेक्टर, प्रिंटर मशीन, स्क्रीन प्राप्त करून घेतली. त्याचप्रमाणे लोकवर्गणीतून एक लोखंडी कपाट, चार सिलिंग फॅन, एक संगणक संच, ऑफिस टेबल तसेच किचन शेड दुरुस्ती, दोन वर्ग खोल्यांची रंगरंगोटी करून घेतली जवळपास 30000/- रुपये नगदी रूपात गावाकडून लोकवर्गणी प्राप्त केली.






**लोकसहभागातून जल शुद्धीकरण यंत्र स.भेट व स्वयंपाक गृहाची दुरुस्ती व रंगरंगोटी**

**शाळेची परसबाग:-** आमच्या शाळेत आम्ही शिक्षक व विद्यार्थी मिळून परसबाग फुलवली या उपक्रमातून विद्यार्थ्यांना त्यांची निगा राखणे, परिसरातील कचरा गोळा करून खत तयार करणे इत्यादी कार्यानुभव विषयाची माहिती प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली. मुलांना भाज्या पिकवताना अंकुर, पान, फुल, फळ अश्या वनस्पतींचा जीवनक्रम अनुभवता आला. मुलांमध्ये सामुहिक कामाची आवड निर्माण झाली. शाळेत विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली. त्यात लिंबू, सीताफळ, बोर, फणस, गोडलिंब, पपई,गवतीचहा त्यांचे संवर्धन सुद्धा करण्यात आल्यामुळे आजती झाडे मोठी झालेली आहेत. सावलीसाठी गुलमोहर लिंब अशी झाडे लावण्यात आली. तसेच गुलाब व इतर फुलांचे झाडे लावण्यात आली. परसबागेमध्ये मागील शैक्षणिक वर्षात टमाटर, वांगी, मिरची, शेंगा वगैरे लावण्यात आले होते. या परसबागेचे संवर्धन करण्यासाठी गावातील अनुभवी लोकांचे सुद्धा सहकार्य लाभले. अशाप्रकारे ओसाड असलेले परिसर नेतृत्व बदल होताच निसर्गरम्य करण्यात आले.



# शाळेतच फुलवली विद्यार्थ्यांनी परसबाग

सिरसोलीतील नवा उपक्रम

माध्यान्ह भोजनासाठी व्यवस्था

**परसबागेची वृत्तपत्रांनी घेतली दखल**

**शाळेतील उपक्रम:-** दररोज शाळेत रांगोळी काढणे या उपक्रमामुळे मुला-मुलींना रेखाटन व रंगसंगती ची माहिती झाली. फुलापानांची रांगोळी काढताना मुलांना फार गंमत वाटत होती. ग्रीटिंग कार्ड तयार करणे दिवाळी, नवीन वर्ष, मुलांचे वाढदिवस असे कार्यक्रम असताना ग्रीटिंग कार्ड तयार करणे तसेच पुष्पगुच्छ तयार करणे यातून मुलांची सर्जनशीलता वाढीस लागते यात महत्त्वाचे म्हणजे इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनीही ही मोठ्या पानांवर फुलांची केलेली आकर्षक रचना उल्लेखनीय होती. स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांना समजल्यामुळे परिसर स्वच्छतेत त्यांनी सहभाग घेतला. दररोज आदर्श परिपाठ घेतल्याने मुलांना कथा-कथनांची सवय लागली. प्रत्येक मुलांना समोर बोलण्याची संधी मिळाली. राष्ट्रगीत, प्रतिज्ञा, संविधान, ठळक बातम्या, दिनविशेष यामुळे विद्यार्थांच्या ज्ञानात भर पडते. मौनामुळे एकाग्रता वाढून मनशांती वाढते.



स्वच्छता अभियानात सहभागी विद्यार्थी



परिपाठात सहभागी विद्यार्थी

महिन्यातील 1 ते 31 या दिनांकानुसार दररोज पाढे म्हणत असल्यामुळे अनेक मुलांना पंचवीस ते तीस दरम्यानची पाढे पाठ झाली. त्यांचा गणित क्रीयेमध्ये वापर होतो व विद्यार्थ्यांचा कल गणिताकडे जास्त झूकल्यासारखा दिसून येतो.दररोज दहा नवीन शब्दांची स्पेलिंग पाठ करून सांगणे या उपक्रमामुळे मुलांचे शब्द ज्ञान व शब्दसंग्रह वाढीस लागले. मुलांना चित्रकला स्पर्धेमध्ये चित्र रेखाटण्याची रंग देण्याची माहिती मिळाली विद्यार्थ्यांमध्ये सुबकता व रंगसंगती दिसून आली.विद्यार्थ्याकडून दररोज पंधरा ते वीस ओळी शुद्धलेखन इंग्रजी व मराठी भाषेत लिहून घेण्यात येते त्यामुळे विद्यार्थ्यांची स्पर्धा घेऊन बक्षीस देण्यात येते.स्पर्धा परीक्षा करिता सामान्यज्ञान व गणित क्रियेवर आधारित प्रश्नमंजुषा चे आयोजन करण्यात येते वविद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष देण्यात येत आहे.शाळेत वर्गवार क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येते व विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी विशेष लक्ष देण्यात येते.



अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर

**तंत्रज्ञानाचा वापर:-** शाळेत संगणकाचा व प्रोजेक्टर चा अध्यापनात वापर केल्यामुळे त्यांच्या अमूर्त कल्पना मूर्त करण्यात आल्या. प्रत्यक्ष ऑडिओ विज्युअल अध्यापन झाले. इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित, विषय अभ्यासक्रम डाउनलोड करून त्यांच्या फाईल प्रोजेक्टर वर दाखवल्यामुळे आनंददायी व चिरकाल टिकणारे ज्ञान प्राप्त करून वातावरण निर्मिती झाली. कोरोना काळात विद्यार्थ्यांचे WHATSAPP ग्रूप करून विद्यार्थ्यांना अभ्यास पाठवून विद्यार्थ्यांचे अभ्यासात खंड पडू दिला नाही. SCERT पुणे मार्फत स्वाध्यायमाला विद्यार्थांकडून सोडवून घेण्यात येत आहे. शनिवार ची गोष्ट विद्यार्थ्यांना नियमितपणे ऐकविण्यात येत आहे. READ TO ME APP आणि DIKSHA APP च्या माध्यमातून विद्यार्थी शिकत आहेत. शाळेला डिजिटल बनवले आहे. शाळा बंद पण शिक्षण सुरु यानुसार ज्यांचेकडे ANDROID मोबाईल नव्हते त्यांना कोरोना चे नियम पाळून मोकळया मैदानात OFFLINE शिक्षण देण्यात आले.



**मोकळया मैदानात OFFLINE शिक्षण घेताना विद्यार्थी**

**"NOTHING IS IMPOSSIBLE IN THE WORLD, IT SELF SAYS I AM POSSIBLE"** या म्हणी प्रमाणे आम्ही शिक्षक कामाला लागलो. आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टीकोण, परिस्थितीशी लढण्याचे सामर्थ व प्रत्येकाकडे माणूस म्हणून आपण पाहिल्यास आपण जीवनात किंवा कोणत्याही कार्यात नक्कीच यशस्वी होऊ शकतो.

शिक्षणाद्वारे संपादन केलेल्या ज्ञानाने हे मीणमीणते विद्यार्थी रुपी दिवे पुढे तेजाने प्रकाशित होतील आणि समाजातील अज्ञानरूपी अंधकार नाहीसा करतील ही मुलांकडून अपेक्षा आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. बालमणी नंदाला** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, नागपूर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कारवाडी, ता.अर्धापूर, जि.नांदेड

**ई-मेल :-** zppskarwadi2019@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :** संतोष मारुतीराव राऊत **ई-मेल :-** Santosh.raut95@gmail.com




**जि.प.प्राथमिक शाळा,कारवाडी, शाळेची इमारत**

**शाळा विकास नियोजन :- "जी निर्माण करते जिव्हाळा, तीच खरी शाळा"** हे ब्रीद सांभाळत शाळा विकास नियोजन करताना द्विशिक्षकी शाळा, शालेय व्यवस्थापन समिती तसेच शिक्षणप्रेमी पालकांच्या मदतीने प्रत्येक बालकांना शिक्षणाचा अधिकार मिळालाच पाहिजे. ज्यातून बालकांच्या हक्काचे संरक्षण होईल, शिक्षण प्रक्रिया सुरळीत चालेल,आपली शालेय संस्कृती जोपासल्या जाईल, यासाठी पालकांच्या सहकार्यातून आर्थिक व श्रमदान स्वरुपात लोकवाटा जमवून बालकांना शाळेची गोडी निर्माण होण्यासाठी शाळेच्या भिंती बोलक्या करण्यास सुरुवात केली. आणि यातून शाळेपासून दूर जाणारी पाऊले शाळेकडे वळायला लागली. समता व समानता हे मूल्य विचारात घेऊन अंमलबजावणीस सुरुवात केली.

**स्व-विकासातून संघ बांधणी :-** मुख्याध्यापक, शिक्षक यांनी स्वविकास साधण्यासाठी शैक्षणिक पात्रता वाढवली. सोबतच काळाची गरज लक्षात घेवून संगणक ज्ञान वृद्धिंगत करण्यास सुरुवात करून सहकारी शिक्षक व विद्यार्थी यांच्यात संगणक ज्ञानाचा व वापराचा विश्वास निर्माण केला. विद्यार्थ्यांमध्ये संगणकीय ज्ञानाचा विश्वास निर्माण झाल्यामुळे कोरोनासारख्या भयाण परिस्थितीत Virtual Class च्या माध्यमातून शिकवणे व विद्यार्थ्यांनी Online अभ्यासाचे सूत्र स्वीकारणे हे सहज जमले. शाळा बंद पण शिक्षण सुरु राहिले हा सर्वात मोठा फायदा शाळेस झाला. विविध प्रशिक्षणाचा देखील उपयोग स्व विकासासाठी झाला. ज्यात SCERT आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या माध्यमातून गणित संबोध कार्यशाळा, तंत्रस्नेही निर्मिती कार्यशाळा, DIKSHA App, स्वाध्याय साप्ताहिक सराव, Google Classroom, विज्ञानपेटी मार्गदर्शन या सारख्या अनेक विषयावरील प्रशिक्षणामुळे शिक्षकास समृद्ध होण्यासाठी आणि पर्यायाने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस नक्कीच फायदा होत आहे.

**अध्ययन–अध्यापन प्रक्रिया व परिणाम :-** शालेय नेतृत्व विकासातील मूल्यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली. समता व समानता यातील भेद व साम्य जाणून घेता आले. कोरोनाच्या लॉकडाऊन परिस्थितीत देखील शालेय संस्कृतीची जपणूक होईल याकडे लक्ष देवून Work from home च्य माध्यमातून शालेय उपक्रम राबवले. केवळ स्वाध्यायापुरते मर्यादित न राहता त्या घटकावर स्वतः प्रश्ननिर्माण करणे व Online चाचणी तयार करणे या स्तरावर काही विद्यार्थी पोहोचले आहेत. त्याच विद्यार्थ्यांच्या मदतीने गतिमंद विद्यार्थ्यांना पुढे घेवून जाण्याचे काम आता विद्यार्थीच शिक्षणमित्र म्हणून भूमिका पार पाडत आहेत.

youtube channel link – https://youtube.com/channel/UCdYX8KUR14O1AQtOT6lTjkQ

**शाळा विकासात गावाचा सहभाग व परिणाम :-** शाळा विकास साधावयाचा असेल तर शाळा व्यवस्थापन समिती, माता-पालक शिक्षक संघ व गावातील सुशिक्षित तरुण मंडळी यांच्या सहकार्याशिवाय विकास होऊच शकत नाही. या सर्वांना विश्वासात घेऊन माझे सहकारी मित्र श्री दुधम्बे सरांनी लोकवाटा जमवला. शाळेतील फरशी ऐवजी फ्लोरिंग करण्यासाठी समितीतील मंडळींनी गवंड्याच्या हाताखाली काम करून शिक्षणाबद्दलची आस्था व आपल्या मनाचा मोठेपणा दाखवला.

शाळेची एक चित्रफीत - https://youtu.be/RFm9Ih0K55o




**पालकांचा सहभाग**

**आमची शाळा आमचे उपक्रम :-** ज्याठिकाणी विविध उपक्रमांची मांडणी केली जाते ते विद्यार्थी स्वतःहून अध्ययनशील बनतात हे नक्की अगदी त्याच प्रमाणे आमच्या शाळेत देखील अनेक छोटे छोटे, सहज व सोप्पे उपक्रम राबवले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने आम्ही राबवलेले उपक्रम - वाढदिवस शाळेचा, वाढदिवस विद्यार्थ्यांचा, दैनंदिन फलक लेखन, खेलो बच्चो खेलो, शनिवार–विना दप्तराची शाळा, तंबाखू मुक्त शाळा, आमची बचत बँक, भित्तीपत्रक तयार करणे, गोष्ट ऐकूण प्रश्ननिर्मिती, बिनपैशाची इस्त्री करणे, जलसाक्षरता, महत्व अंग मेहनतीचे, कृषी दिन - शेतात जावून शेतकऱ्यांना मदत, डिजिटल साहित्याचा वापर, मूल्यवर्धन जपणूक, क्षेत्रभेटी, सहज खेळू बुद्धिबळ इ.




**शाळेतील विविध उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग**

**शिक्षणात तंत्रज्ञानाचा उपयोग:-** सर्वात महत्वाचा उपक्रम म्हणजे सध्याच्या उद्भवलेल्या जागतिक संकटात शिक्षण थांबू नये यासाठी दररोज सकाळी 7:30 ते 9:00 या वेळेत मुलांशी गप्पा नावाने संवादातून शिक्षणाकडे नेण्यासाठी Online Virtual Class ज्यामध्ये माझ्याच शाळेतील नव्हे तर राज्यभरातील विद्यार्थी join होतात. या माध्यमातून केवळ पुस्तकातला अभ्यास नव्हे तर विद्यार्थी तंत्रस्नेही बनतील यासाठी आठवड्यातून २ दिवस Virtual तासिका घेतल्या जातात. आज 20 जानेवारी 2021 रोजी या Virtual तासिकेचा 191 वा दिवस संपन्न झाला असून इयत्ता चौथी पाचवीतील अनेक विद्यार्थ्यांना Online test बनवता येत आहेत. तसेच **India map puzzle, Google Docs, Google Translate, Testmoz, Google Map, Google Earth, PDF बनवणे, Zoom/Google meet चे प्रशिक्षण देणे, Google Classroom, Diksha App, Blend Collage app मध्ये छानसे Banner/Poster बनवणे** यासारख्या अनेक गोष्टी विद्यार्थ्यांना सहज जमत आहेत. या सर्व गोष्टीचा त्यांच्यासह इतर अनेक विद्यार्थ्यांना फायदा होत आहे.

**प्रशासकीय कामात तंत्रज्ञानाचा वापर :-** सुट्टीचा सदुपयोग घेत आम्ही शाळेतील सन 1969 च्या पटसंख्येपासून आजपर्यंतच्या सर्व प्रवेश निर्गम नोंदी संगणकात Save केल्या आहेत, ज्यामुळे ग्रामस्थांना प्रवेश निर्गम, TC देणे सोपे होणार आहे. तसेच सर्व सांख्यिकीय अहवालाची नोंद जतन करून ठेवण्यास सोप्पे झाले आहे. Google Form च्या मदतीने माहितीचे संकलन असेल, किंवा जिल्हा परिषद नांदेडचा प्रज्ञाशोध 2021 हा उपक्रम असेल ज्यामध्ये विविध विषयांच्या चाचणी प्रश्नपत्रिका जिल्ह्यातील 5 वी व 8 वीतील सर्व विद्यार्थ्यांना दररोज सकाळी नियमितपणे पाठवल्या जातात.



**शैक्षणिक कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर**

आज आमची शाळा विविध उपक्रमाच्या अंमलबजावानीतून नावारूपास आली आहे. या पुढेही अशीच आपला नावलौकिक टिकवून ठेवेल असा आम्हास दृढ विश्वास आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. श्रीकिशन देशमुख** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, नांदेड. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रहाटी(बु.), ता.भोकर, जि.नांदेड

**ई मेल :** zppsrahati@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :–** श्रीआलूरवाड रविकुमार राजारेड्डी **ई मेल -** ravireddyalluri@gmail.com




**जि.प.प्राथमिक शाळा,रहाटी(बु.) शाळेची इमारत**

**शाळा विकास नियोजन, अंमलबजावणी :–** ‘ही आवडते मज मना पासूनि शाळा ,

लाविते लळा जशी माऊली बाळा '|

वरील उक्तीप्रमाणे शाळेला विद्यार्थ्यांच्या माऊलीसम बनविण्याकरिता शाळेतील सहकारी शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती, पालक व शिक्षणप्रेमी यांच्या सहकार्याने शाळा विकासाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात आली. शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक मूल शिकले पाहिजे या उद्देशाने प्रेरित होऊन पालक, शिक्षक, गावकरी यांच्या आर्थिक सहकार्यातून शालेय परिसर रंगरंगोटी करण्याचे ठरवले. त्याचबरोबर 14 व्या वित्त आयोगाच्या निधीतून शाळा डिजिटल करण्याचा ठराव घेण्यात आला .त्यानुसार लोकसहभागातून जमा झालेल्या निधीमधून शालेय बाहय परिसर, डिजिटल वर्गाच्या भिंती बोलक्या करण्यात आले. यामुळे शालेय परिसर आकर्षक व प्रसन्न वातावरण निर्माण झाले. तसेच लोक सहभागातून 25 लेझीम, लेखन वाचन साहित्य व थोर महापुरुषांच्या प्रतिमा शाळेला भेट स्वरूपात देण्यात आले .

**स्व-विकासातून संघ बांधणी –** स्व-विकास साधण्यासाठी तंत्रज्ञान वापराचे कौशल्य आत्मसात केले. त्याचबरोबर सहकारी शिक्षक व विद्यार्थ्यांनाही तंत्रज्ञान वापराविषयी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांना मोबाईल हा अभ्यासाकरिता कसा वापरावा याचे ज्ञान प्रात्यक्षिकातुन देण्यात आले. त्याचा उपयोग कोरोनाच्या संकटकाळात online अभ्यासासाठी झाला. त्यामुळे online test सोडवणे virtual class च्या माध्यमातून शिकणे व दीक्षा ॲपचा वापर, शैक्षणिक व्हिडिओ पाहणे इ. गोष्टी सहज शक्य झाल्या.

**अध्ययन - अध्यापन प्रक्रिया –** अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी, शालेय नेतृत्व विकासातील मूल्यांची रुजवणूक होण्यासाठी विविध कृती – उपक्रम, शैक्षणिक साहित्य, नवोपक्रम, तंत्रज्ञान यांचा वापर

अध्ययन - अध्यापन प्रक्रियेत करण्यात आला. यामध्ये भाषा, गणित, इंग्रजी पेटीतील साहित्याच्या साह्यायाने प्रभावी अध्यापन करण्यात येते. मुलांना स्वयंअध्ययनास प्रेरित केले जाते त्यातून शालेय संस्कृती जोपासली जाते.

**शालेय उपक्रम :- 'कृती उपक्रमाला जोड तंत्रज्ञानाची, वाढेल रूची परिसर अभ्यासाची'।** शाळेतील नवोपक्रमात तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेऊन तसेच कृतीउपक्रमातून शालेय गुणवत्ता विकास साधला.त्यासाठी खालीलप्रमाणे कृती उपक्रम व शैक्षणिक ॲप वापराचे नियोजन व कार्यवाही केली. EVM Voter machine App द्वारे शालेय मंत्रिमंडळ निवडणूक घेण्यात आली. Galactic Explorer App द्वारे आभासी सूर्यमाला निरीक्षण अनुभूतीविद्यार्थ्यांना मिळाली. Safari central App द्वारे जंगली प्राण्यांची ओळख करून देण्यात आली. Merge object viewer appद्वारे ऐतिहासिक वास्तू व वस्तू यांची ओळख झाली. AR medical App द्वारे आंतेरिंद्रयाची ओळख करता आली. पर्यावरणपूरक पत्रावळी, द्रोण कार्यशाळा घेण्यात आली.बालभवन विज्ञान केंद्र क्षेत्रभेट,पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती कार्यशाळा, असे नवोपक्रम शाळेत राबवण्यात यश मिळाले व शाळेत सकारात्मक बदल झाले. https://youtu.be/so2B_q36Uoc




**पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तसेच पत्रावळी बनवताना विद्यार्थी**

**'कोरोनाच्या संकटकाळी, शिक्षणगंगा विद्यार्थ्यांच्या दारी :-** कोरोना सारख्या संकटकाळात शिक्षण प्रक्रिया अविरत चालू ठेवण्यासाठी विविध तंत्रज्ञान, कृती इ. चे आयोजन केले व शाळा बंद पण शिक्षण सुरु राहिले.त्यामध्ये पुढील प्रमाणे नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाही करण्यात आली. त्यासाठी शाळेचा What's app पालक, विद्यार्थी ग्रूप निर्मिती केली. विविध शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती करून विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी पाठवले. व्हर्च्युअल क्लासच्या माध्यामातून Online क्लास घेतले. Online test देवून त्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतली गेल्या. Zoom मिटिंग द्वारे पालकांशी संवाद साधण्यात आला. Diksha App, शैक्षणिक you tube videos links, Word wall खेळातून अभ्यास, टिलीमिली कार्यक्रम विषयी मार्गदर्शन, करण्यात आले. प्रत्यक्ष विद्यार्थी गृहभेट, स्वाध्याय पुस्तिका वाटप, शिक्षक मित्रांची नेमणूक, या माध्यमातून कोरोन काळातही शिक्षण चालूच होते. मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या सहकार्यातून शालेय नेतृत्व मूल्यांच विकास होऊन शाळा शाश्वत विकासाकडे वाटचाल करत आहे. https://youtu.be/M6R-LrXR4SM

**शाळा विकासात लोकसहभागाचा वाटा :–** गावातील गावकरी, शिक्षणप्रेमी, नवयुवक मंडळ व पालक वर्ग हे वेळोवेळी शाळेला सहकार्य करत असतात. मुख्याध्यापकाच्या सुसंवादातून मार्गदर्शनातून शाळा विकासासाठी श्रमदान आर्थिक

मदतीसाठी नेहमी पुढाकार घेतात. त्यातून शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करणे, शाळा परिसरातील वृक्षांचे संगोपन करणे, शालेय परिसर रंगरंगोटी, क्रीडा साहित्य, स्वच्छता गृहाची दरवाजे इ. कामे करण्यात आली. त्याचबरोबर लॉकडाऊन मध्ये शिक्षक मित्रांनी विद्यार्थ्यांचे शिक्षण चालू ठेवले. विद्यार्थ्यांसाठी विविध कृती उपक्रमाचे आयोजन केले.



**लॉकडाऊन मध्ये शिक्षक मित्रांनी विद्यार्थ्यांचे शिक्षण चालू ठेवले.**

**आमची शाळा आमचे उपक्रम :–** याअंतर्गत वाढदिवस – वृक्षांचा, वाढदिवस–विद्यार्थ्यांचा साजरा केला जातो. परिपाठा अंतर्गत सामान्य ज्ञान–प्रश्नमंजुषा, कृतीयुक्ती गीतातून पाढे म्हणून घेतले जातात. शनिवार-विना दप्तराची शाळा, तंबाखुमुक्त शाळा, क्षेत्रभेट, मध्यान्ह भोजनावेळी श्लोक म्हणणे, दैनंदिन फलक लेखन, बाल आनंद नगरी, अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर, टाकाऊपासून शोभेच्या वस्तू बनवणे, मूल्यवर्धन जपवणूक, थोर महात्म्यांची जयंती पुण्यतिथी, परसबागेची निर्मिती, पथनाट्यातून जनजागृती असे सहशालेय उपक्रम राबवले जातात . https://youtu.be/QIuHSXfWZjw

**प्रशासकीय कामात तंत्रज्ञानाचा वापर :–** विद्यार्थ्यांची माहिती भरणे, गुगल फॉर्मच्या साहय्याने शालेय माहितीचे संकलन करणे तसेच इ.५वी शिष्यवृत्तीसाठी test moz, Google forms मधून प्रश्न निर्मिती इ. तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

**प्रशिक्षणे व त्यांची परिणामकारकता :–** Diksha App, Google classroom, Google tools, Online Nishtha training, स्वाध्याय साप्ताहिक सराव, तसेच SCERT द्वारे होणाऱ्या कार्यशाळा, वेबिनार, चर्चासत्र इ. प्रशिक्षणामुळे शिक्षक समृद्ध होण्यास व शाळेत सकारात्मक बदल, गुणवत्ता विकास होण्यास मदत झाली.

आज शालेय गुणवत्तेत जी वाढ झालेली दिसून येते. त्यामागे शाळेतील शिक्षकांची मेहनत, त्यांची शाळेप्रती असणारी निष्ठा कारणीभूत आहे. शालेय गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी या पुढेही सर्व शिक्षक याच निष्ठेने कार्य करतील असा विश्वास आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. श्रीकिशन देशमुख** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, नांदेड. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय निवासीशाळा, तोरणमाळ, ता. धडगांव, जि. नंदुरबार

**ई-मेल :-** nd1.toranmal.mieb@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री. सुधीर विजयराव पाटील **ई-मेल :-** svpatil87.sp@gmail.com



**नवीन इमारत प्रगतीपथावर**

**शाळेची गरज :-** तोरणमाळ महाराष्ट्रातील दुस-या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण. उंचच-उंच डोंगरद-या नैसर्गिक सौदर्याने नटलेला पुर्णत: आदिवासी बहुल अतिदुर्गम परिसर, तोरणमाळ पर्यंत वाहने जातात, मात्र उंचच-उंच डोंगर असल्याने परिसरातील गावापर्यत जायला रस्ते नाही. 20 ते 25 कि.मी. डोंगरद-या नर्मदा, नदीतील पाण्यात बोटीने जीवघेणा प्रवास करत विखुरलेल्या वस्तीपर्यत पायपीट करत 6 ते 8 तासात आदिवासी बांधव हे तोरणमाळहून आपल्या घरी पोहचत असतात. आरोग्य, शिक्षण, दळणवळण, यात अत्यंत हालाखीची परिस्थिती या भागात दिसून येते. म्हणून नंदूरबार जिल्हयातील अक्कलकुवा, धडगांव अतिदुर्गम भाग असल्याने मानवी निर्देशांकात जिल्हा शेवटच्या क्रमांकावर आहे.

या भागातील भिल्ल व पावरा आदिवासी समाज एकमेंकापासून दूर राहण्याचा वृत्तीमूळे लोकवस्ती मोजकीच व विखुरलेली आहे. आपल्या बालकांचे भविष्याची किंचितही जाणीव नसलेला समाज शिक्षणा पासून दुरच होता. शाळा आहेत परंतू त्यांचा दृष्टीने सोयीच्या नाहीत. बालकांना डोंगरद-या, झाडी मधून यावे लागते. त्यामूळे शाळेत दाखल न झालेले बालकांचे प्रमाण प्रचंड आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'शाळाबाहय मुलांच्या' सर्वेक्षणात धडगांव तालुक्यात 1148 बालके त्यात सर्वाधिक प्रमाण तोरणमाळ केंद्रात 700 हून जास्त बालके शाळाबाहय आढळली. विदारक सत्य बाहेर आल्यावर शासन दरबारी हालचाली सुरू झाल्या. म.प्रा.शि.प. मुंबई यांचे पथक तोरणमाळ केंद्राची भौगोलिक परिस्थिती, समाज, विखुरलेली वस्तीमुळे बालकांच्या शिक्षणातील अडथळे तपासण्यासाठी शिक्षण विभागाचे पथक आपल्या तीन दिवसाच्या दौ-यात शाळा, शिक्षक,पालक,विदयार्थी,समाज यांनी प्रत्यक्ष वस्तीवर जाऊन बालकांना शाळापर्यत येण्याचा रस्ता, पालकांची मनस्थिती याचा संपूर्ण अभ्यास करून अहवाल शिक्षण विभागाचे मा.मुख्य सचिव यांना सादर केला.

22 जून 2013 शासन निर्णयानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार असल्याने प्रत्येक मुलं शिक्षणाच्या प्रवाहात आले पाहिजे. या उद्देशाने दि. 09/06/2017 रोजी म.मुख्य सचिव शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नंदूरबार जिल्हयातील शिक्षण विभागाचे अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेण्यात आली. बैठकीत तोरणमाळ केंद्रातील बालकांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी संपूर्ण सोयीसुविधायुक्त निवासी शाळा सुरू करण्यात यावी याचे मार्गदर्शन करण्यात आले.

**विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक सवयी :-** नंदूरबार जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाने जिल्हयातील शिक्षण विभागाने 15 जून 2017 रोजी शाळेचा श्रीगणेश केला. पहिल्या दिवशी एकूण 62 विदयार्थी प्रविष्ठ

झाले. 8 ते 10 तासाचा पायपीट नंतर प्रथमच चारचाकी गाडीत 4 ते 5 तास बसून आलेली बालके अत्यंत भेदरलेली होती. त्यांच्याकरिता गाडी, इमारत हा पहिलाच अनुभव होता. त्यांमूळे सर्वाकडे शासंक नजरेने पाहत होती. पालक बोलले की अजून ही मुलं बाहेरचे जग पाहिलेले नाही. प्रवासाने थकलेली बालके सायंकाळी पालकाच्या कुशीत निवांत झोपली. खरी कसोटी सुरू झाली ती दुस-या दिवसापासून आरोग्य तपासणी केल्यानंतर केस कापले त्यात प्रचंड उवा व डोक्यात जखमा होत्या. काही मुलं नवस आहे म्हणून केस कापू दिले नाही. बसल्या जागेवर थुंकणे, लघवी करणे, आडोशाला जाऊन शौचालय करणे, बसल्या जागी झोपणे, देव अंगात येतो म्हणून काही मुली 3,4 तास घुमायच्या. वरण, पोळी, मिठाई या पदार्थांना हातही लावत नव्हती. डोक्यात लावायला दिलेले खोबरेल तेल पुर्ण बाटली पिऊन घेणे. नवीन वातावरण असल्याने आजारी पडण्याचे प्रमाण प्रचंड वाढले. चांगल्या सवयी लावतांना अनौपचारीक शिक्षणातुन शाळेची आवड निर्माण करण्यात शिक्षकांना यश आले. त्याचे फलित म्हणजे दिवाळीला सुट्टीला गेलेली बालके पहिल्या दिवशी 90 टक्के उपस्थित होती.

**विद्यार्थ्यांच्या जीवनास दिशा :-** काही बालके हि निवासी शाळा नसती सुरू झाली तर कायमची शिक्षणाला मुकली असती. त्यातील एक **गिता गुला वळवी** शाळाबाहय असल्याने वयानरुप 7 वीत दाखल झाली. आई-वडिलां समवेत मजूरीसाठी बाहेरगावी फिरणे, लहान भावंड सांभाळणे, घराची कामे करणे. या मुळे गिता शाळेपासुन मुकली होती. या शाळेत दाखल होवून ती, पहिल्याच प्रयत्नात **गुवाहाटी** (आसाम) येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावर मैदानी धावण्याच्या स्पर्धेत देशातून पाचवी आली.




**धावण्याच्या स्पर्धेत देशातून पाचवी आलेली शाळेची विद्यार्थिनी**

**काकडया शिवराम चौधरी** ऊर्फ **करण** काकडया म्हणजे खेकडा पहिलीत दाखल झाल्यानंतर त्याच्या वडिलांच्या सांगण्यावरुन त्याच करण हे नामकरण झालं. वडिलांची हलाखीची परिस्थितीमुळे करण वयाच्या पाचव्या वर्षापासून सालदारकीचे काम करायचा तेही महिन्याला 100रु. प्रमाणे बकरी, गुरे यांना चारा टाकणे, चरायला सोडणे, घरात कोणतीही व्यक्ती आली की, त्याला पाणी, जेवण हे सर्व कामे काकडया करायचा. शिक्षक नेहमी काकडया काम करत असलेल्या घरी जायचे एके दिवशी काकडया शिक्षकाला बोलला (मास्तर मे बी शाळाम पडणे से.. ) म्हणजे मला पण शाळेत शिकायचं आहे. योगायोग शाळा सुरु झाली आणि काकडयाचा करण झाला. आता वर्गातला हुशार मुलगा तर आहेच व शिक्षकांसोबत नियोजन करतांना नेहमी पुढे असतो.

**वंदना विक्रमसिंग चौधरी** (दोन गावातील बालकांना आई प्रमाणे सांभाळ करणारी व शाळेत त्याना टिकवणारी)शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये एकाच वर्गातील 63 शाळाबाहय विदयार्थी शाळेत दाखल झाली. त्यांना आई-वडिल, गाव, समाजापासून दूर आणल्यानंतर ते अत्यंत विषण्ण नजरेने इतरांकडे पाहत. इतर विदयार्थी त्यांना आपलेसे वाटतं नव्हते. इतके विदयार्थी एकाचवेळी सांभाळण हे खुप जिकरीचं होते. त्यावेळी शाळेत कधिही न गेलेली वंदनाने पुढाकार घेऊन त्या बालकांना सांभाळलं, आधार दिला. आजारी असतांना काळजी घेतली. आज ती मुलं गुण्यागोविंदान शाळेत रमलीत आनंदात शिक्षण घेत आहेत.**हिरा** व त्याचा लहान भाऊ आंतरराष्ट्रीय शाळेत दाखल झाल्याने घरातील, शेतीतील कामे करणयासाठी माणसं कमी पडायला लागली. वडीलांनी ठरवले की, आता हिरा मोठा असल्याने त्याच लग्न करु दिले कि,

आपल्याला कामात हातभार लागेल. उन्हाळी सुट्टीत सर्व ठरले. जून महिन्यात शाळेत विदयार्थी आल्यावर ही गोष्ट शिक्षकांच्या लक्षात आली. शिक्षकांना सांगून विदयार्थाच्या पालकांना बोलवून त्यांना बालविवाहाचे तोटे व कायदयाने गुन्हा आहे. याची जाणीव करुन दिली व हिराचे लग्न रद्द केले. आज हिरा वर्गातील अत्यंत हुशार मुलगा आहे. आंतरराष्ट्रीय शाळेमुळे हिराच्या जीवनाला कलाटणी मिळाली. **महेश आणि देवा:-** आई-वडिलांच्या व्यसनामुळे दोघ भावडांना दोन वेळेच्या जेवणाची भ्रांत असल्याने मंदिराजवळ बसून भीक मागून दररोजचे लाचार जीवन जगत असलेले भावंड म्हणजे देवा आणि महेश. अशा विदयार्थानी कधी शाळेच तोंड पाहिलेले नाही. ज्यांनी स्वप्नातही पाहिले नसेल की, माझं शिक्षण एका आंतरराष्ट्रीय दर्जा असलेल्या शाळेत होईल. या शाळेने या भावंडाना दिलेली ही संजीवनी म्हणता येईल. गणित विषयाची प्रचंड आवड महेशला असून तो खुप आनंदाने गणिताचा अभ्यास करतो.

**शाळेतील विशेष उपक्रम :-** BASE CAMP: शाळाबाहय विदयार्थ्याकरिता वर्गाच्या पातळीपर्यंत आणण्यासाठी 2 ते 3 महिने बेस कॅम्पच्या माध्यमातून क्षमतापर्यंत पोहचवणे.

BUDDY CLASS: मुलांना एकमेकांचे विचार आदानप्रदान करता यावे यासाठी दर आठवडयाला विषय देवून त्यावर चर्चा करणे.

CIRCLE TIME: वर्गाच्या, शाळेच्या, विदयार्थ्याच्या, वसतिगृहाच्या समस्या घेवून त्यावर मुलांकडून उपाय शोधून सकारात्मक बदल करणे.


CIRCLE TIME


My Vision


Reflection, Notebook

Fun & Learning, शालेय क्रिडा स्पर्धा, नाटयस्पर्धा, रांगोळी, मेहंदी, स्वच्छतादुत, क्षेत्रभेट, सहल, व्यसनमुक्ती, पालकांचे प्रबोधन, आपली स्वच्छता-आपले आरोग्य, इ उपक्रम देखील राबवले जातात.

**स्वविकासाठी शिक्षक,मुख्याध्यापक यांनी केलेले प्रयत्न :–** दैनदिन अध्ययन अध्यापन व शालेय कामकाज यांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करता यावा या साठी शाळेतील सर्व शिक्षकांनी Online ICT चे प्रशिक्षणे घेतलेली आहेत. Expert Skill या ॲपचा वापर करून तंत्रज्ञान कौशले आत्मसात केले.SEL सामाजिक भावनात्मक शिक्षण हे प्रशिक्षण शाळेतील तीन शिक्षकांनी Online घेतले या प्रशिक्षणातून विद्यार्थ्याचा सामाजिक भावनिक विकासासाठी आवश्यक उपक्रम शाळेसाठी राबविण्याची क्षमता शिक्षकांनी प्राप्त केल्या.निष्ठा प्रशिक्षण- सर्व शिक्षकांनी घेतलेलीशाळेत शिक्षकांनी दर बुधवारी P.D. म्हणजे पॅनल डिस्कशन घेतली जाते. या P.D. मध्ये आठवडयाभरातून केलेल्या कामाचे Reflection किंवा आढावा घेतला जातो.तसेच एखादया शिक्षकांनीघेतलेल्या प्रशिक्षणाची किंवा नविन संकल्पनांची इतर शिक्षकांना माहिती देण्याचे सत्र घेतले जाते. या मध्ये शिक्षकांचे छंद, आवडी-निवडी शैक्षणिक अनुभव यासंदर्भात सादरीकरण

करण्याची संधी मिळते. शिक्षकांच्या क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने पॅनल डिस्कशन हा उत्कष्ट उपक्रम शाळेत राबविला जातो. Life Skill – शिक्षकांमध्ये विविध जिवन कौशल्ये विकसित होण्याच्या दृष्टीने Life Skill च्या Activities घेतल्या जातात. संघभावना वाढीस लावण्यासाठी शाळेची कामे गटात किंवा जोडीने वाटून दिली जातात. तसेच नेतृत्वगुण वाढीसाठी आवडीची कामे करण्याची जबाबदारी दिली जाते. Dulingo या सारख्या App चा वापर करून इंग्रजी बोलण्याचा सराव करणे. कुमठेबिट व वाबळेवाडी शाळेस प्रत्येक्ष भेट देऊन तेथील Pedagogy समजून घेतली व अंमलात आणली.

**तंत्रज्ञानाचा वापर :-** दैनदिन अध्ययन अध्यापन प्रक्रिया व शालेय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर प्रभाविपणे केला जातो. विदयार्थी Tab चा वापर करुन अध्ययन करतात. विविध शैक्षणिक ॲपचा वापर करुन अध्ययन करतात. प्रत्येक वर्गात स्मार्ट T.V. व प्रोजक्टर यांचा अध्यापनासाठी वापर होतो

**शाळा विकासासाठी शिक्षक पालक संघ :-** शालेय व्यवस्थापन समिती व पालक, ग्रामस्थ यांची मदत मिळावी यासाठी प्रयत्न केले जातात. सदर शाळा ही नंदुरबार येथे निवासी असून तोरणमाळ परिसरातील विविध गावे व पाडे येथील मुले या शाळा शिक्षण घेतात. त्यामुळे पालक शाळेत नियोजित बैठकीत 100 टक्के उपस्थित राहू शकत नाही. म्हणून मुख्याधापक व शिक्षक या परिसरातील आठवडे बाजाराच्या दिवशी जाऊन सभा आयोजित करतात. किंवा वैयक्तिक पालकांना भेटून विविध विषयांवर प्रबोधन करतात. तुमची मुले शिकतील असा विश्वास पालकांच्या मनात निर्माण करतात. शाळा सुरु झाल्यापासुन मुलामध्ये झालेला बदलाबाबत पालक अभिप्राय देतात.

**शाळेतील नवोपक्रम :-** इतर शाळेपेक्षा एथील नवोपक्र वेगळे परंतु जीवनावश्यक सवयी लावण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत. त्यात मुलांना स्वच्छतेच्या सवयी लावणे. मुलांना दररोज आंघोळ करणे, दात घासणे या सवयी लावणे. शौचालयाचा वापर करणे. हात धुण्याचे महत्तव पटविणे व पध्दत शिकवणे.कपडयांची स्वच्छता. आहाराविषयी जागरुकता याबाबत मुलांचे प्रबोधन करणे. या नवोपक्रमातून विदयार्थ्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला व त्यांनी आरोग्यादायी सवयी अंगीकारल्या.

**अध्ययन व अध्यापन पद्धती :-**

**बोली भाषेकडून प्रमाण भाषेकडे :-** शाळेतील सर्व विदयार्थी आदिवासी बोली भाषा बोलणारे असल्याने सुरवातीला शिक्षकांना अनेक समस्या जाणवल्या परंतू त्यांच्या बोलीभाषेचा आदर करत व त्या मुलांचा भाषेचा स्वीकार करत त्यांना प्रमाणभाषेकडे आणण्याचा प्रयत्न शाळा करते. भाषा समृध्द वातावरण निर्मिती करुन मराठी भाषा बोलण्यास प्रेरित केले जाते. इंग्रजी भाषेची मुलांना भीती वाटते. परंतु LFW सांरखे उपक्रम राबवून मुलांना इंग्रजी वाचन व इंग्रजी बोलण्यास प्रोत्याहन दिले जाते. आंतरराष्ट्री शिक्षण मंडळाचा विषच सुत्रावर आधारित अभ्यासक्रम राबवतांना इंग्रजी विषयाची भीती दूर करणे सहजपणे झाले. यासाठी Youtube वरील Video दाखवणे, LFW कार्यक्रमाचे Video दाखवणे, LFW च्या Online चाचण्या सोडविणे यामुळे विदयार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल आढळून आले. व्यावसायिक शिक्षणाचा पाया घातला जावा व व्यावसायिक कौशल्ये विकसित व्हावे यासाठी शाळेत अनेक नवोपक्रम राबवलेले जातात.सन-2019-20 मध्ये बांगडया तयार करणे. सन-2019-20 मध्ये मास्क तयार करणे. असे अनेक नवोपक्रम राबवलेले जातात.

**वाचन संस्कृतीचा विकास :-** वाचन संस्कृतीचा विकासासाठी वाचनालयाचा वापर जाणीवपूर्वक करावा.यासाठी विदयार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी विविध पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके उपलब्ध केले जातात.

**फन ॲड लर्न FUN & LEAR :-** हा उपक्रम शाळेत राबवला जातो. यामध्ये विदयार्थ्यांच्या आवडी निवडींचा विचार करुन शिकण्याची संधी दिली जाते. संगीत, नृत्य, कला, कागदकाम, मेहंदी, रांगोळी, खेळ, चित्र काढणे. या सारखे दालन उपलब्ध करुन विदयार्थ्यांना विविध विषय शिकण्याची संधी दिली जाते.



**विद्यार्थी नृत्य सादर करताना**

**बडी डे हा उपक्रम BUDDY DAY** :- बडी डे हा उपक्रम शाळेत आठवडयातून एक दिवस राबविला जातो. विदयार्थी घर, परिसर, गाव यांपासून दूरावला आहे त्याच्या भावनांचा विचार करुन त्यांना या दिवशी इतर वर्गातील मुलांबरोबर जोडी करुन त्याच्यासोबत शिकण्याची संधी दिले जाते.



**विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी विद्यार्थी**

**शाळेची यशोगाथा :-** सन-2018-19 या वर्षी देवगिरी वनवासी मार्फत अथलेटिक्स, या देश पातळी स्पर्धेत(**आसाम**) वयोगट 14वर्षा मधील गिता गुला वळवी ही 200मी. धावण्याच्या स्पर्धेत पाचवी आली. सन-2018-19 या वर्षी जिल्हास्तरीय हस्ताक्षर स्पर्धामध्ये रोहित रुपसिंग पावरा हा विदयार्थी जिल्हा पातळीवर 2 रा क्रमांका पटकावला आहे. सन-2018-19 व 2019-20 या दोन्ही वर्षी क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्फत जिल्हा क्रिडा परिषद, नंदुरबार यां आयोजित स्पर्धेत दर वर्षी 4 ते 5 मुले उत्तेजनार्थ असतात.

महाराष्ट्र शासनाने वेळीच दखल घेवून हजारो बालकांचा आयुष्याला कलाटणी दिली. मुलं आंतरराष्ट्रीय स्तरावरचे शिक्षण घेऊन " Local to Global" असा प्रवास करत नक्कीच भविष्यात देशाच नाव मोठ करतील.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. प्रवीण चव्हाण** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, नंदुरबार. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद शाळा, प्रकाशा, ता.शहादा, जि. नंदूरबार

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री रविंद्र भाईदास पाटील **ई-मेल :-** ravi9405873331@gmail.com




**जिल्हा परिषद शाळा, प्रकाशा शाळेची आगळीवेगळी इमारत**

प्रकाशा गाव हे नंदूरबार ते शहादाच्या मध्यावर गोमाई व तापी नदीच्या संगमावर पाच सहा किमी. परिघावर असलेले दाट लोकवस्तीचे गाव. गावाची लोकसंख्या 10,000 च्या आसपास त्यात सर्व समाजाचे सर्व व्यावसायी लोक, तसेच दक्षिण काशी म्हणून असंख्य मंदिरांची उभारणी असलेले प्रसिद्ध गाव. गावात जिल्हा परिषदेच्या मुलांची, मुलींची व उर्दू माध्यम शाळा होत्या. यात आमच्या जि.प.कन्या शाळेत प्रवेश गरीब मजूर वर्गातील फक्त अनु.जमाती प्रवर्गातील मुलींचे. मुख्याध्यापक किंवा शाळा प्रमुख म्हणुन सर्व प्रथम शाळेतील उणीवांचा अभ्यास केला वर्ग वाटणी, काम वाटणी करुन कामाचे नियोजन केले.

**विद्यार्थी उपस्थिती :-** शाळेतील मुलींची नियमित उपस्थीती ही फक्त 40 -50 टक्केच असायची. सर्व प्रथम सर्व लक्ष उपस्थिती वाढविण्याकडे केंद्रीत केले. हे करीत असतांनाही मोठी समस्या होती ती गावाची गावाचा विस्तार जास्त, अरुंद गल्ल्या, टेकड्यांवरील वस्ती, नियमीत बोलावयास जाणे अशक्य. हे करीत असतांना पालक संपर्क वाढविला जनजागृती केली शिक्षणाचे महत्व पटवून दिले. पालकांना प्रोस्ताहित केले वेगवेगळे उपक्रम राबविले. सर्व लक्ष विद्यार्थ्यींनी उपस्थितीवर केंद्रीत केल्याने चांगला प्रतिसाद मिळत गेला. उपस्थिती 80 ते 90 टक्यांनी वाढली.

**डिजिटल शाळा :-** शाळा डिजिटल असली तरी थकित विद्यूत बिल असल्या कारणाने व संगणक नादुरुस्त असल्याने काम होत नव्हते. समग्र शिक्षा अनुदानातुन रुपये 14000/- विज बिल भरणा करुन नियमित सर्व वर्गांना डिजिटल वर्ग खोलीचा माध्यमातून आध्यापन करु लागलो. विद्यार्थीनींना याचे खुपच अर्कषण वाटले. मनोरंजनात्मक तथा कृतीयुक्त अध्यापन होऊ लागल्याने उपस्थितीत सुधारणा होऊन सातत्य राहिले. तथा गुणवत्तेतही सुधारणा होऊ लागली. या खोलीचे ‘कल्पना चावला डिजिटल दालन’ असे नामकरण करण्यात आले आहे.



**मा.मुख्यकार्यकारी अधिकारी, मा.शिक्षणाधिकारी व मा. जि.प.अध्यक्षा यांची'कल्पना चावला डिजिटल दालनास' भेट**

**शाळेतील नावीन्यपूर्ण उपक्रम :-उपस्थिती वृक्ष :–** सर्व वर्गशिक्षकांनी आपआपल्या वर्गात एक फुलझाड रुपी कुंडीत उपस्थिती वृक्ष बनविला आहे. यात वर्गातील विद्यार्थीनी वर्गात येताच आपल्या नावाचे फुल त्या झाडावर लावतात त्याचा फायदा असा होतो की आपल्या नावाचे वाचन होते व मी शाळेत आल्यावर माझ्या नावाचे फुल पान या झाडावर लागते याचा वेगळाच आनंद मुलींना होतो.





**उपस्थिती वृक्षावर आपल्या नावाचे फुल लावताना**

**कृती अध्यापन :-** वर्ग अध्यापनात पुस्तकी अध्यापनाला जोड प्रत्यक्ष कृतीवर भर दुसरी चा भाषाविषयाची "भेळ" ही कविता वर्गात प्रत्यक्ष भेळ बनवून सादरीकरण केले शिवाय मध्यान्ह भोजना बरोबर सर्व विद्यार्थीनींना भेळचे वाटप केले. याचा वेगळाच आनंद मुलींच्या चेहऱ्यावर दिसत होता. व भेळ ही कवीता नव्हे तर एक खाद्य प्रकार मुलींचा कायमचा लक्षात राहीला अशा प्रकारचे अनेक पठ्यांशावर आधारित उपक्रम राबविले जातात.

**क्षेत्रभेट :-** शैक्षणिक सहल, व्यावसायिक भेट, पर्यटन केंद्र भेट या द्वारे स्वानुभवातून शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते. शिक्षण हे फक्त शाळेतच चार भिंतीच्या आत न देता प्रत्यक्ष अनुभव देण्यावर भर दिलेले शिक्षण हे चिरकाल स्मरणात राहते. या उद्देशातूनच विविध क्षेत्रभेटी पालकांच्या मदतिने घडवित असतो.



**विविध क्षेत्रभेटीची क्षण चित्रे**

**भाषा व विषय उपक्रम :-** शाळा आदिवासी बहुल भागात असल्याने मातृ भाषा भिलोरी त्यामुळे साहाजिकच मराठी भाषा शिकण्यात थोडी अडचण यावर मार्ग म्हणून बोली भाषेकडून प्रमाण भाषेकडे उपक्रम चालू केला. विद्यार्थीनींचा बोलीभाषेचा उपयोग करून त्याला पर्यायी प्रमाण भाषा शब्द सांगणे. माईड मॅपिंग गेम यातून शाब्दीक विकास मनोरंजनात्मक पद्धतीने अध्ययन अध्यापन होते. या बरोबर भाषा पेटीतील साहित्य नियमीत वापरल्याने याचा खुप फायदा झाला. इंग्रजी,गणित, या विषयासाठी देखील पेटीतील साहित्य खुपच महत्वाचे ठरले शैक्षणिक साहित्याचा वापर, व्यवहारिक गोष्टी शिकविणे, प्रत्यक्ष अनुभव संपन्न करने यातून गणित विषय तथा त्यातील चारही क्रिया विद्यार्थीनी सहज करतांनाचा अनुभव आला

**कला, कार्यानुभव व शा.शिक्षण :-** हे विषय वेळापत्रकावरच शोभेचे न ठेवता तिन्ही विषयांचे प्रत्यक्ष अध्यापन व कृती घेण्यात येते. कलादालनाचा सदुपयोग होऊ लागला, सर्वप्रकारच्या खेळांचा समावेश प्रत्यक्ष मैदानात होऊ लागला. योग अभ्यास नियमित होऊ लागला. सन 2018 व 2019 केंद्रस्तरीय क्रिडास्पर्धेत सर्वात जास्त विजेते म्हणून घोषित. मोकळया मैदानाचा उपयोग घेऊन सर्वप्रकारचा खेळांचा समावेश करीत विद्यार्थीनी शारिरीक विकास होऊ लागला.



**क्रीडास्पर्धेत विजेती टीम**

**विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास :-** शाळेच्या विकासातही भर घालण्यासाठी नियोजन केले गेले. विद्यार्थीनींमध्ये समानता गुणधर्म येण्यासाठी मुल्य शिक्षणावर अधिक भर देण्यात येतो. शाळेची सुरुवात संगितमय परिपाठाने करून नेहमी विविध

प्रकारचे संस्कृत मराठी श्लोक पठन घेतले जातात. तसेच सर्व थोर महापुरुषांचा जयंत्या पुण्यतिथ्या साजऱ्या करून त्यांचे महत्व समजाऊन देत. सावित्रीबाई फुले जयंति निमित्त विविध उपक्रम  महिला अधिकाऱ्याचे मार्गदर्शन व सत्कार, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, आदी.



**विविध कार्यक्रमात सहभागी विद्यार्थिनी**

**शाळेतील VIP दालन उपक्रम :–** सदर उपक्रमासाठी अतिरिक्त रिकाम्या वर्गखोलीच्या सदुपयोग करून त्यास 'किरण बेदी दालन' नामकरण करून सदर खोलीत अभ्यासिका, कलादान, वाचनालय, प्रयोगशाळा, विषयकोपरे, शैक्षणिक साहित्य निर्मिती व प्रदर्शन, वृत्तपत्र वाचन कक्ष अशी बहुउपयोगी बहुआयामी वर्गखोली तयार करण्यात आली आहे. सदर दालनात नियमित वृत्तपत्र वाचन, मासीके, अवांतर पुस्तके, यांचे वाचन होत असते. कार्यानुभव विषयांकरीता तथा इतर विषयांचे प्रकल्प कार्य याठिकाणी प्रदर्शित केले जातात. यामूळे विद्यार्थ्यांना स्वविकास होत असतो. सुप्त गुणांचा विकास होतो. या वैशिष्टय पुर्ण कार्यास मा.मुख्यकार्यकारी अधिकरी,शिक्षण अधिकारी,जि.प.अध्यक्षा तथा डायटचे अधिव्याख्याते आदिंनी भेट दिली. विद्यार्थीनींनी व शिक्षकांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले.

**शाळेचा भौतिक विकास :-** विविध उपक्रम राबवीत असतांना शाळेचे बाह्यांग आकर्षित करणे आवश्यक होते. त्या दृष्टीने ग्रामपंचातीच्या सहकार्याने नंदूरबार जिल्ह्यातील सर्वात आकर्षक अशी शाळा झाली आहे.  शाळेला 'रेल्वेगाडी लुक' रंगकाम करण्यात आले. त्यामुळे आमची शाळा गावकऱ्यांसाठी सेल्फी पॉईंट ठरली. या रंगकामाचा शिक्षकां बरोबरच शालेय विद्यार्थ्याना व पालकांना खुपच आनंद होता. माजीविद्यार्थीनी, महाविद्यालयीन मुले मुली शाळा पाहण्यास येत होते.



**शाळेचे बदललेले आकर्षक रूप**

कोविड-19 महामारिचा पर्श्वभुमिमुळे शाळा बंद करण्याचे ठरविले. यात आमच्या शाळेने मुलींच्या शौचालयाचे बांधकाम केले. त्यासाठी  ग्रामपंचायत प्रकाशा कडे मागणी केली होती. त्यानुसार त्यांनी 14 व्या वित्ता व आयोगाखाली शौचालय युनिट मंजूर करून त्यांचे बांधकाम केले. आकांशित जिल्हा निधी अंतर्गत वर्ग खोली रंगरंगोटी कामी रु 15000/- अनूदान प्राप्त झाले होते परंतु एवढ्या रकमेत सर्व वर्गखोल्यांना रंगकाम शक्य नव्हते.  त्यासाठी सर्व शिक्षकांनी मिळून रक्कम उभी केले. त्यातून  शाळेस रंगकाम करण्यात आले.

**लोक सहभाग :-** शाळेचा विकास करण्यासाठी गावकऱ्यांची साथ लाभली. यासाठी प्रथम  वरिष्ठ कार्यालयाची परवानगी घेत शाळेतील सर्व रजिस्टर नुतनीकरण करून घेतले यास एकूण खर्च 11000/- रु लोकवर्गणी मिळाली. खेळ साहित्य गावातील व्यवसायी यांनी क्रिडा साहित्य व वादन साहित्य जवळपास 8000/- रु साहित्य भेट दिले. उत्तम सांसकृतिक कार्यक्रमाचे आयोजन केल्यामुळे माजी जि.प.अध्यक्ष यांनी शाळेस 25 फायबर खुर्च्या भेट दिल्या. स्थानिक लॉकडाऊन काळात शाळा बंद असतांना शिक्षणरथ या उपक्रमामुळे गावातील एका व्यापाऱ्याने सर्व मुलींना पेन, वही, व शिक्षकांना पेन वाटप केले होते.

**नवोपक्रम – "सर्वांगीन शैक्षणिक गुणवत्ता विकासाचा शिक्षण रथ"** चार चाकी चालत्या फिरत्या डिजिटल शाळेसाठी स्वतः "शिक्षण रथ". गाडीचा वापर करून विद्यार्थी आकर्षित होण्याकरिता शैक्षणिक साहित्यरूपी डिजिटल बॅनर बनवून गाडीला लावून गाडी सजवली . गाडीच्या मागील बाजूस डिक्कीत ३२ इंची संच बसविला. LED Android T.V, विद्यार्थांपर्यंत आवाज पोहचवण्यासाठी वायरलेस माईक व स्पीकर संच बसविला. हे सर्व विद्युत उपकरणे चालविण्यासाठी इन्व्हर्टर बसविले. विविध शैक्षणिक इयत्तेनुसार विषयानुरूप घटकानुसार ऑडीओ व्हिडीओ प्रदर्शित केले. या शिक्षण रथाच्या कार्याला शाळेतील सर्व सहकारी वृंद तसेच गावकर्यांचे सहकार्य लाभले. हे गाव भौगोलिक दृष्ट्या टेकड्यांवरील वसाहत व अरुंद हाटी बोळ तसेच चढउतारावरील रस्ते यामुळे शिक्षण रथ नेमका कुठे व कसा उभा राहिल याची अडचण होती. यावर मात करीत सावली युक्त सपाट जागा निश्चित केली. विद्यार्थिनी उत्साहाने येवू लागल्या. इंटरनेट कनेक्टीव्हिटी  वेळोवेळी खंडित होत असल्याने ऑफलाईन शिक्षण तथा पेनड्राईव्हवर संग्रहित व्हिडिओ प्रदर्शित करावे लागले. शिक्षण रथाचा नवोपक्रमाणे घरापर्यंत शाळा आणून शिक्षणाचे प्रवित्र काम केले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना एवढी आतुरता निर्माण झाली की ते रथ येण्याच्या अगोदरच तेथील जागा स्वच्छ करणे , सामाजिक अंतरासाठी चौकोन करणे इतर , विद्यार्थिनींना अगोदरच बोलावून  बसविणे, वाट पाहणे, पालकांना सोबत आणणे, शिवाय दुसऱ्या हाटीतही येणे. तक्रार न करणे रथ आल्यावर टाळया वाजून स्वागत करणे. अध्यापन चालू असताना हाटी  मध्येच काही आवाज येत असेल तर मधूनच मागे बसलेली मुलगी  तिथे जाऊन आवाजबंद करण्यासाठी प्रयत्न करीत असे. अश्या पद्तीने समाजाकडून नियमीत सर्व प्रकारची मदत शाळेला मिळत आहे. आज शाळा यामुळे आपला आदर्श टिकवून आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. प्रवीण चव्हाण** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, नंदुरबार. | मिपा,  औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा, कनाशी, ता.कळवण, जि.नाशिक

**मुख्याध्यापकांचे नाव:-** श्री. सुभाष जगन्नाथ बावा **ई-मेल :-** kanashiashram06@gmail.com




**सन २०१५ शालेय इमारत सन २०२१**

**शालेय विकास:-** कनाशी आश्रमशाळेची स्थापना १९७४ मध्ये जरी झाली असली तरी त्याकाळी ती मुली आणि मुलांची आश्रमशाळा होती. मात्र नंतर म्हणजेच १९९९ साली हि शाळा पुर्णतः मुलींची आश्रमशाळा म्हणून अस्तित्वात आली. पूर्वी अगदी जेमतेम बांधकामात अस्तित्व टिकवून असलेली शाळा आज अत्याधुनिक चार मजली इमारतीत दिमाखाने उभी आहे. १५ एकरांत शाळेचा परिसर विस्तारला आहे. शाळेला मुलींच्या सुरक्षेसाठी एक किलोमीटरची दहा फुट उंच सीमाभिंत आहे आणि जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा लावण्यात आले आहे. शाळेत ७५६ मुली शिक्षण घेत असून यात ५७३ मुली या निवासी आहेत. पहिली ते बारावी प्रत्येकी एक वर्ग असलेली ही शाळा आता पूर्णत: सीबीएसई बोर्डाची बनण्यास सुरुवात झाली आहे. शाळेत व्यवसाय शिक्षण योजनेंतर्गत नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मल्टी स्कील फाउंडेशन कोर्स आणि ब्युटी आणि वेलनेस हे दोन अभ्यासक्रम शिकविले जातात. हा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास आयटीआयमध्ये २५ टक्के आणि तंत्रनिकेतनमध्ये १५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. मल्टी स्कील अंतर्गत कार्यशाळा आणि अभियांत्रिकी तंत्रज्ञान, ऊर्जा आणि पर्यावरण, अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान, बागकाम, रोपवाटिका आणि शेती तंत्रज्ञान, वैयक्तिक आरोग्य आणि स्वच्छता हे पाच विषय शिकविले जातात. आदिवासी भागात असूनही संपूर्ण शाळा डिजिटल आहे. वर्गांत स्मार्ट टि.व्ही. आहे. ई -लर्निंगची सुविधा आहे. शासनाच्या योजनेनुसार १०८ क्रमांकाची रुग्ण वाहिका कायम तत्पर असते. यात २ डॉक्टरांचा समावेश असतो. शाळेत सुसज्ज प्रयोगशाळा आणि संगणक कक्ष आहे. शाळेला स्वत:चे असे क्रीडांगण आहे. त्यात वैयक्तिक आणि सांघिक खेळांचे पारंपरिक शिक्षणाबरोबर शाळेत ज्ञानरचनावादानुसार मुलींना घडवले जाते. शाळेत मुलींना शिक्षणासोबतच मैदानातील खेळाचे धडे दिले जातात. तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर इतर स्पर्धांतही विजेतेपद मिळवून जिल्ह्यात आणि राज्यात या शाळेने आपला दबदबा निर्माण केला आहे.





**वेल्डिंग करतांना विद्यार्थिनी** **ड्रिलिंग करताना विद्यार्थिनी**

**विद्यार्थी विकास:-** आजमितीला शाळेत पहिली ते दहावीचे प्रत्येकी एक आणि अकरावी ते बारावी प्रत्येकी दोन वर्ग भरतात. त्यासाठी सुमारे २२ शिक्षक आहेत. २४ जणांचा प्रशासकीय कर्मचारी वर्ग आहे. आताच्या रचनेनुसार एका वर्गात ५० जण बसू शकतात त्यात ४० जण निवासी आणि १० जण अनिवासी विद्यार्थिनी आहेत. शासनांकडून विद्यार्थिनीना वर्गानुसार गरजेच्या आणि शैक्षणिक वस्तूसाठी थेट लाभ हस्तानंतरणद्वारा अनुदान जमा होते. यात निवासी आणि अनिवासी दोन्हींना हे फायदे मिळतात. वर्षातून दोनदा हा लाभ मिळतो. ५०० च्या वर असलेल्या निवासी मुलींची संख्या पाहता शासनाने नवीन वसतिगृहासाठी परवानगी दिली असून त्यानुसार चार मजल्याची दोन सुसज्ज वसतीगृह उभी राहत आहेत. त्यात सर्व सुविधा असणार आहेत. या आश्रमशाळेत आसपासच्या १३ आदिवासी पाड्यातून मुले शिकायला येतात. पारंपरिकरित्या उच्च शिक्षणाच्या पदव्या घेऊनही शहरातील तरुण नोकरीसाठी वणवण भटकतात. नोकरी मिळाली नाही तर पदरी निराशा पडते. अशा परिस्थितीत पदवी असूनही हाती कौशल्य नसते. अशा वेळी कौशल्य असण्याची गरज ओळखून शासनाने कौशल्यविकासावर भर दिला. कनाशी येथील आश्रमशाळेतील मुली वेल्डिंग मशीन, ड्रिल मशीन यांची एखादया मुरलेल्या कारागिरांसारखे वेल्डिंगचा गॉगल चढवून बिनधास्तपणे मुली वेल्डिंग करताना दिसतात. यातून त्यांनी घरगुती चप्पल स्टॅन्ड, घडवंची, खेळण्यातील पलंग, पाळणा, स्टूल, रॅक, टेबल आदी वस्तू कलाकुसरीने बनवल्या आहेत. हे बनवण्यासाठी जरी खर्च आला असला तरी त्यातील कौशल्य आणि मेहनत मात्र अनमोल आहे. या वस्तूंची अत्यल्प किमतीत बाजारात विक्री केली जाते. शाळेतील छोटी छोटी दुरुस्तीची कामे जसे प्लंबिंग, ड्रिलिंग, किरकोळ रंगकाम, बांधकाम, सुतारकाम, इलेक्ट्रिक दुरुस्ती, वर्गात फळा, घड्याळ लावणे आदी कामे मुलीच करतात. एक प्रकारे शाळा आणि परिसराची देखभाल या विद्यार्थिनीच करतात. सर्वांच्या श्रमाने शालेय आवारात एक सुंदर शेतीही फुलवली आहे. शास्त्रशुद्धपद्धतीने खतांचा वापर न करता ही शेती केली जाते. यातील पिकविलेला भाजीपाला हा गावाच्या आठवडी बाजारात विकला जातो, त्यातील बहुतांश माल शिक्षकच विकत घेतात आणि उरलेला भाजीपाला आश्रमशाळेच्या वसतिगृहातील निवासी मुलींच्या खानावळीत वापरात येतो. शेतीप्रमाणेच मुलींनी शाळेच्या परिसरात सुंदर बागही तयार केली आहे.

हा बगीचा भूमितिक पद्धतीने बनवेलेला आहे. त्यात विविध पद्धतीची झाडे आणि फुलझाडे आहेत. बगीच्यातील झाडांवर पक्षांसाठी घरटी, ट्रे टांगून त्यांच्यासाठी दाणा-पाण्याची व्यवस्था केली आहे. बगीच्यातील रंगवलेल्या झाडांचे खोड पाहताक्षणीच लक्ष वेधून घेतात. त्यावर आता अक्षर गिरवून त्यांना बोलते करण्याचं काम सुरू आहे. या निमित्ताने झाडे आणि मुलींमध्ये संवादाचे एक नवे पर्व सुरुं होणार आहे. शाळेने दरवर्षी १०० झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. व्यतिरिक्त किरकोळ डागडुजी बांधकाम करून दुरुस्तीचे कामही या शाळेत मुलीच करतात.



**शाळेच्या आवारात प्लॉट तयार करून, वाफे करून पिकांची लागवड करताना**




**'दाबेली' स्टॉल.**

**शालेय उपक्रम :-** अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान अंतर्गत विविध खाद्यपदार्थ तयार करण्याचे कसबही मुलींनी आत्मसात केले आहे. पॉपकोर्न, वेफर्स, टोमाटो सॉस, खारे शेंगदाणे, गव्हाची बिस्किटे, ओली भेळ, मिसळ, दाबेली, पाववडे, वडापाव, पाणीपुरी, तिळाचे लाडू बनवून त्यांची विक्री करून शंभर टक्के नफा कमविला जातो. कनाशी गावातूनही या मुलींच्या उपक्रमांना सक्रिय साथ असते. त्यांनी बनवलले पदार्थ असो किंवा त्यांच्या कडून वेल्डिंग, प्लंबिंग, ड्रिलिंग आदी कामे असो यात ते त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विक्री अथवा सेवा घेतात. एक प्रकारे शिका आणि कमवा योजना सक्रियपणे चालताना येथे दिसते आहे. या कामातून आलेला नफा हा शाळेत स्थापन करण्यात आलेल्या मल्टिस्किल को-ऑप बँकेत जमा केला जातो. चांगले काम करणाऱ्या विद्यार्थिनीस यातून रोख बक्षीसही दिले जाते. त्यातून नवीन कामासाठी हे बँकेतील जमा पैसे भांडवल म्हणून तयार केले जातात. बँकेचे सर्व व्यवहार या विद्यार्थिनीच सांभाळतात. बँकेचा खाते उघडण्याचा फॉर्म, पैसेभरण्याची काढण्याची स्लीप भरण्यापासून ते हिशोब ठेवण्याचे काम येथील मुलीच करतात. या बँकेतील ठेवीवर त्यांना वार्षिक १२ टक्के व्याजही दिले जाते.शाळेचा दिनक्रम चालू ठेवण्यासाठी विविध पदाधिकारी विद्यार्थिनीमधूनच नेमण्यात आले आहेत. मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, सफाईमंत्री वसतीगृहासाठी सुद्धा नेमकी अशीच व्यवस्था करण्यात आली आहे. ते आपली जबाबदारी नेमकेपणाने आणि काळजीपूर्वक पार पाडतात. याठिकाणी वसतिगृहात जवळपास दररोज दोन्ही वेळेला सातशे विद्यार्थ्यांचा स्वयंपाक तयार केला जातो. त्यात डाळ-भात आणि एक पालेभाजी व पोळी असा बेत असतो. दररोज दोन वेळा नाश्ता दिला जातो.

यात केळी, अंडी, दुध, पोहे, मटकीची ऊसळ आदी पदार्थ दिले जातात. सकाळी साडेसातला नाश्ता, सकाळी साडेदहाला भोजन, दुपारी साडेतीनला नाश्ता आणि संध्याकाळी साडेसात वाजता भोजन असा येथील नित्यक्रम आहे. येथे मुली सर्व प्रकारचे विविध सण, उत्सव साजरे करतात. त्या येथील झाडांनाच आपला भाऊ मानून त्यालाच राखी बांधतात. ही आश्रमशाळा येथील प्रसिद्ध अशा चणकापूर धरणाच्या कुशीत वसलेल्या कनाशी गावात आहे. त्यामुळे पाण्याचा तुटवडा नाही. मुबलक पाणी याठिकाणी असते. त्यातही पाण्यातून कोणतेही आजार होऊ नये याबाबत दक्षता घेऊन पिण्यासाठी पाच ठिकाणी वॉटर प्युरीफायर बसविले आहे. शाळा आहे त्या परीस्थितीत उत्तम नवे काही तरी उपक्रम राबवत असल्याने महाराष्ट्रात सर्वदूर या शाळेची ख्याती पसरत आहे. मुली केवळ शाळेतच न रमता प्रत्यक्ष त्यांना कार्यानुभव घेता यावा यासाठी विविध अभ्यास सहलींचे आयोजन करण्यात येते. या भागातील आदिवासी आश्रमशाळा सक्षम व्हाव्यात यासाठी शासकीय स्तरावरूनही सक्रीय प्रोत्साहन आणि पाठींबा दिला जातो.



**क्षेत्रभेट : शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र**



**विद्यार्थीनीचे B.P.(रक्तदाब) चेक करतांना**

**आरोग्य शिक्षण:-** मुलींनी स्वत:चे आरोग्य सांभाळावे यासाठी विशेष शिक्षणही त्यांना दिले जाते. जेणे करून ते आपल्या पुढील आयुष्यात सजग राहून निरोगी जीवन जगू शकतील. यासाठी मुलींची मल्टी स्कील अंतर्गत क्षेत्रभेट नेली जाते. यात शासकीय दवाखान्याचीच सैर करवली जाते. त्यात तेथील डॉक्टरांकडून विविध विभागांची माहिती दिली जाते.

**शाळेची यशोगाथा:-** कनाशीच्या आश्रमशाळेला जिल्हा आणि राज्यपातळीवर अनेक मानाचे पुरस्कार लाभले आहेत. त्यात २३ फेब्रुवारी २००४ रोजी राज्यस्तरीय "आदर्श आश्रमशाळा प्रथम पुरस्कार" तत्कालीन मा. राज्यपालांच्या हस्ते मिळाला आहे. ९ ऑगस्ट २००९ रोजी राज्यस्तरीय कायापालट नेत्रदीपक कामगिरी पुरस्कार तत्कालीन मा. आदिवासी विकास मंत्री यांच्या हस्ते मिळाला आहे. त्याच प्रमाणे या शाळेतील मल्टी स्कील विषयाचे प्रशिक्षक मधुकर घायदार हे यांत्रिकी अभियंता असून यांनाही जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कार आणि मानसन्मान लाभले आहेत. त्यात २०१७-१८ चा महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेतील पुरस्कार, २०१७-१८ आणि २०१८-१९ चा राष्ट्रीय स्तरावरील 'टीचर इनोव्हेशन अवार्ड', २०१७-१८ आणि २०१८-१९ चा महाराष्ट्र शासनाचा जिल्हास्तरावरील नवोपक्रम स्पर्धेतील पुरस्कार तसेच २०१७-१८ चा तंत्रस्नेही शिक्षक समुहाचा राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान शिक्षक पुरस्कार' यांचा प्रामुख्याने समावेश आहे. शाळेला आयएसओ मानांकनही प्राप्त झालेले आहे.

अशा दुर्गम भागात शिक्षणाची ज्योत तेवत ठेवणे अत्यंत कठीण असते. मात्र इथले शिक्षक अहोरात्र या मुलींच्या भवितव्यासाठी झटत आहेत. वेळोवेळी त्यांच्या पालकांचे जमेल तसे प्रबोधन करून मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवण्यासाठी सातत्यपूर्ण ते प्रयत्न करत असतात. या बदलत्या कालखंडात कौशल्याचे महत्व अधिक वाढते आहे. प्रत्येक वेळी

जगासोबत तंत्रज्ञान बदलले. सोयीसुविधा बदलल्या तरी मुलभूत काही गोष्टीत पारंपारिक कौशल्यांना तेवढीच किंवा किंबहुना त्याहून अधिक मागणी लाभणार आहे. त्यामुळे कनाशी येथील शासकीय कन्या आश्रमशाळेने आतापासूनच या आदिवासी मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासोबतच त्यांच्यात काळाप्रमाणे आवश्यक असलेले कौशल्य हातात दिले आहे. डोंगरदऱ्यातील आदिवासी पाड्यांवर ज्या ठिकाणी या मुली मोठ्या झाल्या, त्याच रानातील वृक्ष जसे ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता जसे खंबीरपणे वर्षानुवर्षे उभे राहतात. त्याचप्रमाणे याही मुली त्याच झाडांचा आदर्श घेऊन कोणत्याही परिस्थितीचा आणि आव्हानांचा सामना शिक्षणाच्या माध्यमातून करण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. त्यामुळे आजच्या काळात कनाशीसारख्या आदर्श आश्रमशाळांची संख्या वाढवणे आणि त्यासाठी प्रयोगशील शिक्षण पध्दती उभी करणे हे आजच्या शिक्षणपद्धती पुढचे आव्हान आहे.





## कनाशी आश्रमशाळेला आयुक्तांची भेट

सकाळ वृत्तसेवा

कनाशी, ता. १८ : येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेला राज्याचे आदिवासी विकास विभागाचे आयुक्त रामचंद्र कुलकर्णी यांनी अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी मुलींचे वसतिगृह, भोजनकक्ष, स्वयंपाकगृह, डिजिटल वर्ग, संगणक कक्ष, कोठीगृहाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. अधीक्षक उल्हास पाचपांडे, अधीक्षिका सुमन बागूल यांच्या कामाचे कौतुक केले.

यावेळी आयुक्तांचा सत्कार प्राचार्य सुभाष बावा यांनी केला. सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) डी. सी. जगदाळे यांचा सत्कार एस. के. खैरनार यांनी केला. या वेळी व्ही. टी. खैरनार, आर. आर. बोरसे, एम. के. खैरनार, ज्योत्स्ना सूर्यवंशी, प्रफुल्ल महाले, शांताराम कनोज, एन. जी. देवरे, नामदेव चौधरी, कांचन उकिरडे, छबूताई भोये, सविता शिंदे, चंद्रकला बागूल, सुमन बागूल, छाया सोनवणे, जयश्री दुसाने, एस. एम. चव्हाण, प्रतिभा पवार, दादाजी गावित, राहुल पवार, काशीनाथ गायकवाड, काशीनाथ चौरे, हिराबाई वार्गे, रमेश थोरात, पंडित पालवी, सुलोचना गोधडे, बनीबाई वाघ, आनंदा कराटे, शिवाजी वाघ, योगेश गोयल, संजय गावित, जनाबाई गावित, शिवा चौरे, शंकर जगताप उपस्थित होते.

कनाशी : डिजिटल कक्षाची पाहणी करताना आयुक्त रामचंद्र कुलकर्णी, डी. सी. जगदाळे, सुभाष बावा, एस. के. खैरनार, एन. जी. देवरे, व्ही. टी. खैरनार आदी.

**विद्यार्थिनींना करिअरविषयी मार्गदर्शन करतांना कळवणचे सहा.जिल्हाधिकारी अमन मित्तल**

शाळा आहे त्या परीस्थितीत उत्तम नवे काही तरी उपक्रम राबवत असल्याने महाराष्ट्रात सर्वदूर या शाळेची ख्याती पसरत आहे. त्यामुळे यासारखे मॉडेल आपल्या शाळेत राबवता यावे यासाठी कायम अभ्यासक आणि शासकीय अधिकाऱ्यांचा येथे राबता असतो. मुली केवळ शाळेतच न रमता प्रत्यक्ष त्यांना कार्यानुभव घेता यावा यासाठी विविध अभ्यास सहलींचे आयोजन करण्यात येते. या भागातील आदिवासी आश्रमशाळा सक्षम व्हाव्यात यासाठी शासकीय स्तरावरूनही सक्रीय प्रोत्साहन आणि पाठींबा दिला जातो.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. शिवाजी औटी** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, नाशिक. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, पारेगाव, ता.चांदवड, जि. नाशिक

**ई-मेल:-** hmashramparegaon@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :–** श्री.प्रभाकर बन्सीधर अहिरे **ई-मेल :-** prabhakarahire1963@gmail.com




**शासकीय माध्यमिक आश्रमशाळा पारेगाव- मुख्य इमारत**

**विद्यार्थी विकास:-** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत प्रथम विद्यार्थी आरोग्य चांगले राहण्यासाठी अधिक्षक, अधिक्षिका यांना प्रेरीत करून दर रविवारी विदयार्थी तपासणी, नखे काढणे, आंघोळ करणे, हातपाय स्वच्छता नियमीत करणे, शालेय व वसतीगृह तसेच वर्गखोल्या स्वच्छ व टापटीप ठेवण्यात यश आले. जागोजागी कचराकुंडया ठेवण्यात आल्या. ओला कचरा सुखा कचरा आणि इतर कचरा असे तीन भाग करून कच-याची विल्हेवाट लावणे त्यासाठी 6 X 4 चे तीन खड्डे तयार केले, विद्यार्थी त्यात दररोज कचरा टाकतात त्यामुळे शाळेची स्वच्छता दररोज होते व शाळा, परीसर स्वच्छ व सुंदर होण्यास मदत झाली. RTE 2009 या शिक्षणाच्या अधिकारानुसार सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासाठी शालेय व गाव स्तरावर तसेच परीसरात सर्व विद्यार्थ्यांना समता व समानता या तत्वावर स्त्री-पुरूष, गरीब-श्रीमंत असा भेद न करता सर्वच मुलामुलींना शाळेत प्रवेश दिला, सर्वांना नियमीत व चांगल्या प्रकारे शिक्षण व मार्गदर्शन केले. गैरहजर राहणारे, शाळेत अनियमीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या घरी, गावी जवून त्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडचणी, समस्या जाणून घेतल्या, त्यावर चर्चा करून मार्गदर्शन व मदत केली. विद्यार्थ्यांना दररोज व नियमीत शाळेत आणले. त्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण देउन मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविला व अभ्यास करण्यास प्रेरणा दिली. लहान मुले तसेच मुलींना विशेष लक्ष देऊन वेळोवेळी मार्गदर्शन केले. एकंदरीत बालकांना समतेचा समानतेचा शिकण्याच्या अधिकाराचा व समान संधीचा लाभ उपलब्ध करून दिला. बालकांना शाळेतील सर्व कर्मचारी मुख्याध्यापक, शिक्षक, अधीक्षक, अधीक्षिका, वर्ग चार कर्मचारी सर्वांनी त्यांचे मूलभूत अधिकार, आरोग्य शिक्षण, समानता इत्यादी अधिकारा नुसार त्यांना संधी उपलब्ध करून दिली.

**अध्ययन अध्यापन पद्धतीत बदल:-** शालेय अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत बदल केला. त्यात अध्यापनात सक्रिय अध्ययन पद्धतींचा (गट पद्धती) वापर केला. विद्यार्थ्यांसाठी भाषा विषयासाठी शब्दांचे छोटे-छोटे तक्ते बनवले, प्रत्येक विद्यार्थ्यास

एक एक तक्ता देऊन त्यावरून एक अर्थपूर्ण वाक्य बनविण्यास सांगितले. तसेच इ.2री, इ.3री तील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे अध्यापनात वर्णांचे तक्ते तयार करून श, र, द असे तक्ते वाटून त्यांना एक अर्थपूर्ण शब्द बनवण्यास सांगितले. गणित विषयासाठी सुद्धा इयत्ता 2 री ते 4 थी पर्यंत बेरीज वजाबाकी शिकविण्यासाठी तीन ते चार विद्यार्थ्यांचा गट तयार करून टप्प्यावर संख्या लिहून त्यांना बेरीज ४+३=७ वजाबाकी ५-३=२ शिकवून विद्यार्थ्यांना बेरीज वजाबाकी चे अध्ययन-अध्यापन करण्यात आले. त्यांना कथाकथनातून विषय वाटण्यात आले विचार करा, चर्चा करा, या अध्ययन त्या विषयावर आपले मत मांडायला व चर्चा करण्याला सांगितले. विद्यार्थ्यांना टीव्हीवर चित्रफित दाखवून बघितलेल्या चित्रफिती वर चर्चा करण्यास सांगितले त्यावर काही प्रश्न विचारले जसे चित्र फित दाखवून प्रश्न विचारून त्यावर विद्यार्थ्यांना चर्चा करण्यास सांगितले. वर्गात वादविवाद स्पर्धा घेतल्या. विद्यार्थ्यांना वाद-विवाद साठी एक विषय देण्यात आला. त्यावर दोनही बाजूनी गटातून मते मांडण्यास सांगितली .विद्यार्थ्यांना ज्ञान रचनावाद पद्धतीने अध्ययन अध्यापन केले. स्वअध्ययन पद्धतीचा वापर-विद्यार्थ्यांना वाचनासाठी एखादी कविता किंवा परीक्षेत देण्यात आला त्यास वाचून झाल्यावर त्यावर प्रश्न विचारण्यात आले विद्यार्थ्यांनी प्रश्नांची उत्तरे शोधून वहीवर लिहिली व सांगितली. वरील पद्धतीने अध्ययन अध्यापनात बदल केल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास चांगल्या पद्धतीने समजण्यास मदत झाली ते उत्तर देऊ लागले त्यांचा आत्मविश्वास वाढला विद्यार्थी स्वतः वाचन करून प्रश्नांची उत्तरे सांगू लागली लिहू लागली विद्यार्थी स्वयंप्रेरणेने दिलेला स्वाध्याय व गृहपाठ लिहू लागले या अध्ययन निष्पत्ती मध्ये 80 टक्के विद्यार्थी नियमित गृहपाठ करणे, वाचन लेखन करणे, अध्ययन अध्यापनात कृतीयुक्त सहभाग घेऊ लागले.



**स्वयंअध्ययन करतांना विद्यार्थी**



**विज्ञानाचे प्रात्यक्षिक करतांना विद्यार्थी**

**लोकसहभाग:-** शाळा विकासात शिक्षक पालक संघ, शालेय व्यवस्थापन समिती, पालक सहभाग, अत्यंत महत्वाचा असतो. मुलांचा विकास आणि शिक्षण यांना मदत करण्यामध्ये पालक व कुटुंबाकडे सामर्थ्य व संभाव्य आव्हानांचा स्रोत असतो. मुख्याध्यापक व शिक्षक हे या पालकांच्या सामर्थ्याचा उपयोग करून शाळा व विद्यार्थी यांचा विकास करू शकतात. शाळेत येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी पालक शाळेला मदत करतात. शिक्षक-पालक संघ शाळेत स्थापन केल्याने तसेच पालकांचा सहभाग वाढल्याने मुलांच्या शिकण्यात प्रगती झाली. मुलांना व शाळेला येणाऱ्या समस्या पालकांच्या मदतीने सोडविल्या. पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी, शिक्षक-पालक संघ स्थापन केल्याने मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी पालक यांच्यात चांगली आंतरक्रिया होण्यासाठी मदत झाली.त्यासाठी वर्षातून दोनदा शिक्षक पालक संघाची बैठक बोलावली जाते व सर्व प्रकारच्या अडचणी मांडून चर्चा करून समस्या निराकरण केले जाते.

शाळा व्यवस्थापन समिती ही एक अशी समिती आहे ज्यात मुख्याध्यापक, शिक्षक,पालक पुरुष माता पालक, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती, गावातील मान्यवर सदस्य इत्यादींचा समावेश समितीत असतो. या समितीची मीटिंग दरमहा घेतली जाते त्यावर शाळेतील भौतिक गरजा, अडचणी, विद्यार्थी समस्या, शाळेतील कर्मचारी समस्या, सर्व प्रकारच्या समस्या या ठिकाणी चर्चेला मांडून त्या सोडवल्या जातात. आमच्या शाळेत विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुविधा अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी नळ स्टॅन्ड दोन संच प्रत्येक संचात 12 एकूण 24 नळ बांधले. मुलांसाठी 5 संडासाचे बांधकाम केले. मुलांचे मुलींचे वस्तीगृह किरकोळ दुरुस्ती रंगकाम केले. स्वयंपाक खोली कोठी गृह किरकोळ दुरुस्ती व रंगकाम केले. शालेय इमारतीत किरकोळ लाईट दुरुस्ती, नळ दुरुस्ती, वर्गखोल्या कडी-कोयंडा दुरुस्ती केली. मार्च एप्रिल महिन्यात पाण्याची कमतरता भासत असल्याने शाळा व्यवस्थापन समिती बरोबर चर्चा करून ग्रामपंचायत मध्ये अर्ज करून ग्रामपंचायती मार्फत नळ कनेक्शन उपलब्ध करून घेतले. शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने विद्यार्थी अभ्यास मार्गदर्शन केल्यामुळे शाळेचा विकास झाला सर्व विद्यार्थी स्वयंप्रेरणेने अभ्यास, स्वच्छता, व आरोग्य सांभाळतात अशाप्रकारे शाळा व विद्यार्थी बदल होण्यास मदत झाली.




**शाळा व्यवस्थापन समितीची मिटींग**

**शालेय नवोपक्रम:-** मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यांनी राबविलेल्या नवोपक्रमाचा शाळेत झालेला फायदा खालील प्रमाणे आहे. पाणी समस्या-आमच्या आश्रम शाळेत विशेष करून विद्यार्थी निवासी असल्याने त्यांना पाणी अपूरे पडत होते, त्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने चर्चा करून विद्यार्थ्यांसाठी संडास बाथरूम जवळ पाण्याची व्यवस्था होण्यासाठी, अंदाजे १००० लिटरच्या चार ठिकाणी चार सिमेंटच्या टाक्या बनवल्या तसेच त्या चारही ठिकाणी चार शोषखड्डे तयार केले. तसेच 12 नळांचा एक संच स्टँड पोस्ट व मुलांसाठी 12 नळांचा एक संच तयार केला. अशाप्रकारे विद्यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राहण्यास व कपडे, भांडी इत्यादी स्वच्छ ठेवण्यास मदत झाली. सुरुवातीला शाळेत वृक्ष कमी होते. शाळेला वॉल कंपाऊंड अपूर्ण व तुटलेले असल्याने परिसरातील काही म्हशी, शेळया, आवारात येत असत व लावलेली झाडे रोपे खाऊन जात असत, परंतु शालेय आवाराची संरक्षक भिंत बांधून घेतल्यावरशालेय आवारात आम्ही गेल्या तीन वर्षात ६०० इतकी झाडे लावली. प्रत्येक वर्गशिक्षकांनी त्यासाठी विद्यार्थ्यांना सूचना देऊन, मार्गदर्शन करून, झाडांची निगा राखली तसेच विद्यार्थ्यांनी वेळोवेळी झाडांना पाणी दिले. सुट्टीच्या कालावधीत शाळेतील कर्मचाऱ्यांच्या मदतीने, विशेषत: उन्हाळी सुट्टी असताना रोपांना पाणी दिले, निगा राखली, त्यामुळे वृक्षारोपण उपक्रम यशस्वी होण्यास मदत झाली. पाण्याच्या सिमेंट टाक्या बनविल्यामुळे झाडांना पाणी देणे सोपे

झाले व नियमित पाणी दिल्यामुळे जास्तीत जास्त झाडी जगविण्यात आम्ही यशस्वी झालो. शाळेत तीन खड्डे जेसीबी च्या साह्याने तयार करण्यात आले. कचऱ्याची वर्गवारी करून ओला कचरा , सुखा कचरा, इतर कचरा, तीन प्रकारच्या खड्ड्यात वेगवेगळा कचरा टाकून, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात आले. शालेय आवार, वसतिगृह, वस्तीगृह परिसर ,शाळा वर्गखोल्या, शालेय परिसर दररोज स्वच्छ करून झाडून कचरा वेगळा करून त्या त्या खड्ड्यात टाकण्यात आला व शालेय परिसर स्वच्छ करण्यात आला. त्याचप्रमाणे वस्तीगृह, स्वयंपाक गृह, शालेय इमारतीत कचरापेट्या ठेवण्यात आल्या. त्यामुळे शालेय परिसर नियमित स्वच्छ ठेवण्यास मदत झाली. वरील नवोपक्रम अमलात आणून शालेय विद्यार्थ्यांच्या सुविधा वाढवल्या,शालेय परिसर स्वच्छ ठेवण्यास मदत झाली, शालेय वातावरण वृक्षारोपणमुळे हिरवेगार व रमणीय झाले. एकूण शालेय परिसर उत्साहवर्धक व आनंदमय झाला विद्यार्थ्यांचे मन आनंदी व प्रसन्न होण्यास मदत झाली.

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर** :- संसाधनांचे व्यवस्थापन शाळेमार्फत होत असल्यास माहिती आमच्या शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, पारेगाव येथे इ.1 ली ते इ.10 वी च्या सर्व विद्यार्थ्यांना संगणक शिक्षक मार्गदर्शन करतात. संगणकांचे प्राथमिक ज्ञान,संगणक हाताळणे,संगणकाची माहिती इ. वर्ग शिक्षक शिकवितात.करडी पथ नावाचे इंग्रजी Action -Story telling, टीव्ही, पेन ड्राईव्ह माध्यमातून शिकवले जाते. प्रोजेक्टर द्वारा विविध चित्रफीती दाखवल्या जातात. त्यावर निरीक्षण, चर्चा, आपले मत मांडण्यास विद्यार्थ्यांना सांगण्यात येते. विविध प्रयोग, ग्रहतारे माहिती, मंगळयान माहिती चित्रफित दाखवून त्यांचे ज्ञान समृद्ध केले जाते. तसेच नवनीत पब्लिकेशन द्वारा शैक्षणिक सॉफ्टवेअर वर सर्व वर्गांचे व विषयांचे पाठ, कविता तसेच इतिहास, सामाजिक शास्त्र इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जाते. Blue tooth (V.C.) द्वारे लॉकडाउन कालावधीत इ.9वी, इ.10वी विद्यार्थ्यांचे (V.C.)घेण्यात आली. त्यात कोरोना जनजागृती, अभ्यासक्रम मार्गदर्शन, स्वाध्याय देणे, तपासणे इ.मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे लॉकडाउन कालावधीत विद्यार्थ्यांचे what's app ग्रुप तयार करून वर्गनिहाय ग्रुप स्थापन करून त्या त्या वर्गाला त्याच्या विषय शिक्षकाने ऑनलाइन मार्गदर्शन केले. पेन ड्राईव्ह T.V. प्रोजेक्टर द्वारा तज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन केले. अशा पद्धतीने शाळेत तंत्रज्ञानाचा उपयोग शैक्षणिक व प्रशासकीय कामात करण्यात आला.






**ऑनलाईन अध्ययन अध्यापन** **संगणक प्रशिक्षण**

**विविध प्रशिक्षणे :-** शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम **(SLDP)** प्रशिक्षण (मुख्याध्यापकांसाठी) त्यामुळे शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन स्व-विकास अध्ययन-अध्यापनातील बदल संघ बांधणी व नेतृत्व नवोपक्रम राबवण्यात आले. **ETF** (English Teachers Forum) हे प्रशिक्षण घेतल्यावर इ 9वी, इ 10वीच्या विद्यार्थ्यांना शिकविताना, इंग्रजी अध्यापनातील कठीण भाग समजण्यात मदत झाली. निष्ठा प्रशिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गरजा व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी, सदर प्रशिक्षणाचा उपयोग झाला **CHESS** (Continuous Help to teachers of English from Secondary School) या प्रशिक्षणामुळे इ.9 वी, इ.10 वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे अध्यापन सुलभ पद्धतीने होण्यास मदत झाली. ऑनलाइन तंत्रस्नेही व भविष्यवेधी शिक्षण हे ऑनलाईन प्रशिक्षण दहा दिवस केले, त्यात तंत्रज्ञानाच्या मूलभूत संकल्पना माहिती करून घेतल्या, प्रशासकीय कामात त्यांचा उपयोग झाला,

**शाळेची यशोगाथा :-** जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तरावर यशस्वी उपक्रम क्रीडा प्रकार कला प्रकार यात नैपुण्य. शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, पारेगाव, चांदवड येथे विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडा गुणांना वाव मिळण्यासाठी दररोज योगासने, व्यायाम, खेळ, घेतले जातात. त्याच प्रमाणे विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. व्यायाम, खेळ, नाट्य स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, कथाकथन, वैज्ञानिक प्रयोग घेतले जातात. खेळात शाळेतील विद्यार्थ्यांनी गतवर्षी कबड्डी (मुले) मोठा गट, तालुका स्तरापर्यंत प्राविण्य मिळवले होते तसेच प्रकल्पात घेतलेल्या नाट्यस्पर्धेत शाळेच्या मुलींच्या गटाने तालुका स्तरापर्यंत नैपुण्य मिळवले. विज्ञान मध्ये (Inspire Awards) अंतर्गत प्रयोगाची निवड जिल्हा स्तरावर गेल्या वर्षी झालेली आहे. अशा पद्धतीने शाळेतील विद्यार्थ्यांना दररोज खेळ, व्यायाम, कला, संगणक, शिकवले जाते.






**क्रिडा प्रकार – कबड्डी विजेता संघ** **कला प्रकार - वारली चित्र व फुलांची रांगोळी**

अश्या प्रकारे कला, क्रीडा, व तंत्रज्ञान यामध्ये शासकीय आश्रमशाळा ,पारेगावचे विद्यार्थी अग्रेसर आहेत. यापुढेही राहतील. विद्यार्थ्यांची ही यशस्वी वाटचाल होण्यामागे शाळेतील शिक्षकांचा सिंहाचा वाटा आहे. यापुढेही असाच राहील यात काही शंका नाही.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. शिवाजी औटी** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, नाशिक. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कदमवाडी(आरळी), ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

ई-मेल:- zppskadamwadiatuljapur@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव :- श्री बापुराव बब्रुवान मोरे ई-मेल :- bapuraomore2@gmail.com



**जि.प.प्रा.शा.कदमवाडी शाळेची इमारत**

जून 2011 मध्ये कदमवाडी शाळेची पटसंख्या 20 होती. गुणवत्ता व पालक संपर्क या माध्यमातून सन 2019-20 या वर्षात शाळेची पटसंख्या 64 आहे. 2012-13 या वर्षात शाळेत इ.1 लीते 5 वी च्या वर्गशिक्षकांची शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा घेऊन शिक्षकांना प्रेरणा व मार्गदर्शन करण्यात आले. 2013-14 या वर्षात शाळेला गुणवत्ता विकास कार्यक्रमात तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे 5000 रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले. 2016-17 या वर्षात शाळेला आय.एस.ओ. मानांकन प्राप्त झाले. 2016-17 या वर्षात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत **'प्रगत शाळा'** म्हणून घोषित करण्यात आले. 2017-18 पासून शाळेत मिशन स्कॉलरशिप राबविण्यास सुरुवात. 17-18 व 18-19 या दोन वर्षात 2 विद्यार्थ्यांची नवोदयसाठी निवड झाली. स्कॉलरशिप मध्ये 14 विद्यार्थी पात्र व 4 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. 2019-20 मध्ये मिशन स्कॉलरशिप अंतर्गत बीटमधील टॉप 30 विद्यार्थ्यांचे दोन दिवसीय निवासी शिबीर शिक्षकांच्या निधीतून आयोजित केले. याचा खूप सकारात्मक निकाल यावर्षी लागला. शाळेतील 8 पैकी 8 विद्यार्थी पात्र व 4 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले. सन 2011 पासून "सायंकाळचा अभ्यास" हा उपक्रम राबवीत आहोत. पालकांची बैठक घेऊन या उपक्रमाची माहिती दिली. घंटीच्या सूचनेनुसार सायंकाळी 6.30 ते 7.30 या वेळेत विद्यार्थी घरी अभ्यास करतात. या वेळेत एकही विद्यार्थी रस्त्यावर किंवा इकडे-तिकडे दिसणार नाही. अधून-मधून या वेळेत गावात फेरफटका मारून शिक्षक आढावा घेतात.



**शाळेतील आकर्षक HAND WASH STATION**

**शाळेतील HAND WASH STATION :-** जेवणापूर्वी विद्यार्थ्यांना हात धुवायची सवय लागावी, विद्यार्थ्यांनी वारंवार हात धुवावेत यासाठी शाळेत HAND WASH STATION तयार करण्यात आले आहे. शाळेच्या वेळेत पुरेसा पाणी पुरवठा, साबण अथवा लिक्विड साबण उपलब्ध करून दिला जातो. विद्यार्थ्यांना हात धुण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले आहे. शाळेत शिक्षकांच्या निरीक्षणाखाली विद्यार्थी हात धुतात. यामुळे विद्यार्थी आजारी पडण्याचे प्रमाण खूप कमी झाले आहे.





**विविध मान्यवरांच्या शाळेस भेटी**

**मान्यवरांच्या शाळेस भेटी :–** शाळेतील उपलब्ध सुविधांचा पुरेपूर वापर करून विद्यार्थ्यांची गुणवत्ता लक्षणीय वाढल्याने, शाळेला भेट देणाऱ्या अधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थीयांची संख्या वाढली. विद्यार्थी कसे शिकतात? हे त्यांनी जवळून पाहिले. तसेच शाळेतील विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. जिल्ह्यातील व परजिल्ह्यातील जवळपास 300 पालक, ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, शिक्षक व अधिकारी यांची शाळेस अभ्यास दौऱ्यानिमित्त भेट दिली आहे. शाळेचा नावलौकिक ऐकून माजी खासदार मा.गोपाळराव पाटील, शिक्षण महर्षि मा. आलुरे गुरुजी, श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. विनायकराव पाटील व राजर्षि शाहू महाविद्यालयाचे माजी प्राचार्य यांनी शाळेस भेट देऊन शाळेतील विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे स्वीय सहाय्यक यांच्या नेतृत्वाखाली काटेवाडी ता.बारामती जि.पुणे येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व शाळेतील शिक्षक यांनी शाळेस भेट देऊन शाळेतील विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली.





**शाळेतील गांडूळ खत निर्मिती प्रकल्पाची पाहणी करतांना मान्यवर**

**शाळेतील गांडूळ खत निर्मिती प्रकल्प :–** शाळेत भरपूर झाडे आहेत. झाडांची पडलेली पाने, फाटलेले कागद, काडी-कचरा रोज जमा केला जातो. त्यापासून गांडूळ खत तयार केले जाते. या खताचा वापर शाळेतील परसबागेसाठी केला जातो. सदर गांडूळ खत विक्री करून शाळेला आर्थिक उत्पन्न मिळाले आहे.



**ISO प्रमाणपत्र स्वीकारतांना शाळेतील शिक्षक**

**ISO प्रमाणपत्र :–** शाळेतील उपलब्ध भौतिक सुविधा,सुविधांचा नियोजनबद्ध व पुरेपूर वापर, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, त्यातील सातत्य, विविध योजनांची परिणामकारक अंमलबजावणी, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थ व शिक्षकां कडून होत असलेले प्रयत्न यांमुळे शाळेस ISO मानांकन मिळाले आहे.

**शाळेतील उपक्रम :-** विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करण्यात येतो. शाळेतील 100 टक्के विद्यार्थ्यांचे वाढदिवस शाळेत साजरे केले जातात. लहानसा कार्यक्रम आयोजित केला जातो. याचे नियोजन सर्व विद्यार्थी मिळून करतात. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्याला प्रेरणा मिळतेच शिवाय इतर विद्यार्थ्यांमध्ये एकमेकांना सहकार्य करण्याची भावना वाढीस लागते.



**मासेमारी व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाशी चर्चा करताना विद्यार्थी**

**मासेमारी व्यवसायास विद्यार्थ्यांसह भेट :–** जेथे जेथे शक्य होईल तेथे विद्यार्थ्यांना Field Visit साठी नेले जाते. गावाशेजारील तलावात मासेमारी व्यवसाय केला जातो. या व्यवसायाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी संबंधित

व्यक्तीकडून मार्गदर्शन घडवून आणले. त्याचबरोबर गावातील पोस्ट ऑफीस, ग्रामपंचायत, गुऱ्हाळ इ. ठिकाणांची क्षेत्रभेट आयोजित केली जाते.

**लोकसहभागातून शाळेस पाणी फिल्टर भेट :–** शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी श्री.प्रभाकर व धनंजय कावरे, तुळजापूर यांच्याकडून शाळेस फिल्टर व कुलर प्राप्त झाले आहे. त्यामुळे शालेय वेळेत विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी मिळत आहे. शाळेत सौर ऊर्जेवरील विद्युत सुविधा लोकसहभागातून उपलब्ध झाली आहे. शाळा सर्व भौतिक सुविधांनी परिपूर्ण आहे. तसेच शाळेला रोख व वस्तुरूपाने जवळपास 40 हजार रुपयांची मदत मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे स्वीय सहाय्यक यांच्या यांच्या टीमने दिले आहेत.



**शाळेस फिल्टर भेट देतांना मान्यवर**

**लोक सहभाग :–** शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी श्री.प्रभाकर व धनंजय कावरे, यांच्याकडून शाळेस फिल्टर व कुलर प्राप्त झाले आहे. त्यामुळे शालेय वेळेत विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी मिळत आहे. शाळेत सौर ऊर्जेवरील विद्युत सुविधा लोकसहभागातून उपलब्ध झाली आहे. शाळा सर्व भौतिक सुविधांनी परिपूर्ण आहे. तसेच शाळेला रोख व वस्तुरूपाने जवळपास 40 हजार रुपयांची मदत मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे स्वीय सहाय्यक यांच्या यांच्या टीमने दिले आहेत.

शाळेतील विविध उपक्रमांमुळे शाळेचा नावलौकिक वाढला. राज्यातील अनेक मान्यवरांनी शाळेला भेटी दिल्या. त्यामुळे शालेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, या सर्वांना एक नवीन उमेद मिळाली. त्यामुळे अधिक मेहनत करून शाळेला उज्वल भविष्याकडे नेण्यासाठी सर्व एकजुटीने कार्य करीत आहेत.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. बिराप्पा शिंदे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, उस्मानाबाद. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामकुंड, ता.भूम, जि. उस्मानाबाद.

**मुख्यध्यापकाचे नाव :-** श्री. दादासाहेब अभिमान साळुंके **इ-मेल:-** salunkedadasaheb577@gmail.com



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामकुंड, शाळेचा रंगीत परिसर**

शाळेमध्ये इयत्ता 1 ते 4 थी चे वर्ग असून त्यामध्ये एकूण 85 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेमध्ये शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर यांची आहेत. एकही विद्यार्थी नोकरदार वर्गाचा नाही. गावचा भौगोलिक परिसर हा डोंगराळ व माळरानाचा आहे. तसेच पाण्याचे शाश्वत स्त्रोत नसल्याने सर्व शेती ही कोरडवाहूची आहे. त्यामुळे गावातील नागरीक शेती बरोबरच पशुपालन करुन शेतमजूरी ही करतात. शाळेच्या पहिल्याच दिवशी आम्ही शैक्षणिक व सामाजिक कार्य प्रमाणिकपणे व निष्ठेने करायचे अशी शपथ घेतली. त्यानुसार कार्याला सुरुवात केली. सुरवातीस सर्व पालकांचा पालक मेळावा आयोजीत करुन आमचा मनोदय पालकासमोर व्यकत केला. तसेच पालकांच्याही अपेक्षा जाणून घेवून कार्याला सुरुवात केली. या कार्यासाठी राज्य पातळीवर मिळालेल्या मुल्यवर्धन प्रशिक्षणाची योग्य साथ मिळाली. आम्ही शाळेमध्ये व गावामध्ये विविध उपक्रम राबवू लागलो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये व पालकामध्ये सकारात्मक बदल होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे पालकांचा शाळेवरील विश्वास वृद्धीगंत झाला. शाळेबद्दल व गावाबद्दल गावकऱ्यांना आपुलकी वाटु लागली. प्रत्येकाला शाळेचा आदर व अभिमान वाटू लागला. आम्हा शिक्षकांना वेगवेगळया स्तरावरील जसे विभाग, जिल्हा, तालुका, केंद्र, प्रशिक्षणे मिळत गेली.त्यामुळे आमच्या कार्याला वेग प्राप्त झाला. आम्ही सर्वानी सांघीकपणे व उत्साहाने, आनंददायी पद्धतीने अध्ययन अनुभव देवू लागलो. त्यामुळे विद्यार्थ्यांची 100% उपस्थिती झाली. विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पती संपादणूक 90% च्या वर गेली.

**लोकसहभाग :-** शाळेमध्ये होत असलेले कार्य पाहुन गावकऱ्यांमध्येही उत्साह निर्माण झाला. शाळेच्या विकासात शिक्षक पालक संघ, माता पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती, शाळेचे माजी विद्यार्थी, ग्रामपंचायत कार्यालय, गावकरी मंडळी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. शाळेच्या माजी विद्यार्थाचा Whats App ग्रुप तयार करुन शाळेमधील अडी-अडचणी विषयी तसेच चांगल्या बाबीं यांची देवाण-घेवाण सुरु झाली. शाळेची मुख्य अडचण म्हणजे शाळेला मैदानच नव्हते. परिपाठ घेण्याइतपत ही जागा नव्हती ही बाब लक्षात घेवून या सर्वांनी वर्गणी गोळा करुन शाळेसाठी मैदान तयार करुन दिले. पालक व गावकरी यांनी शाळेच्या रंग-रंगोटी साठी व भौतिक सुविधेसाठी तीन लाख रुपये पर्यंतचा लोकवाटा गोळा करुन शाळेकडे सुपूर्द केला. त्यातुन शाळेला आकर्षक रंग रंगोटी करुन घेतली व आवश्यक ते साहित्य खरेदी केले ग्रामपंचायत ने शाळेसाठी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले त्यांच्या निधीमधून शाळेसाठी संरक्षक भिंत, सौरविज, ई-लर्निंग प्रोजेक्टर, शाळेच्या आतील भागात पेव्हर बॉल्क टाकणे, पाण्याची कायम स्वरुपी सुविधा करुन दिली.

**शालेय उपक्रम:-** आमच्या शाळेमध्ये वेगवेगळया प्रकारचे उपक्रम राबवले जातात. याशाळेने उपक्रमशिल शाळा म्हणून तालुक्यात नावलौकिक प्राप्त केला आहे. ते उपक्रम पुढील प्रमाणे आहेत. मूल्यवर्धन उपक्रम, विद्यार्थी बचत बँक, पुस्तकांचा दवाखाना, कृतीतून आनंददायी शिक्षण, आदर्श परिपाठ, क्षेत्र भेटी, शैक्षणिक सहल, बालआनंद मेळावा, फिरते वाचनालय, ई-लर्निंग द्वारे शिक्षण, वृक्ष रोपन व संगोपन, सांस्कृतीक कार्यक्रम, पोहण्याचे प्रशिक्षण असे वेगवेगळे उपक्रम राबवण्यात येतात. तसेच करोना काळामध्ये या उपक्रमामध्ये प्रसंगानुसार भर पडली ती म्हणजे आमुचे आंगणच आमुची शाळा, ग्रहभेट, झाडाखालील शाळा, पारावरील शाळा, झूम व गूगल मेट द्वारे अध्यापन, कॉल कॉन्फरन्स शाळा, सुट्टीतील शाळा, या प्रकारचे उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थी व शिक्षक यांच्या मधील नाते हे अधीकच घट्ट झाले.

**पुस्तकांचा दवाखाना** :- हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतुन व चर्चेतून पुढे आला आणी कार्यान्वित झाला. या उपक्रमामुळे विद्यार्थाना पुस्तकांची काळजी घेणे, पुस्तक फाटले तर दुरुस्त करुन पुनर्वापर करणे तसेच एकमेकांना मदत करणे ही मुल्य रुजवली जाऊ लागली.

**भाषा गणित पेटी चे व्यवस्थापन** :- शासनाकडून मिळालेल्या भाषा व गणित पेटीमधून साहित्याचे शाळेमध्ये व्यवस्थितपणे मांडणी करुन विद्यार्थ्यांना सहजतेने हाताळता येतील असे ठेवण्यात आले. साहित्य नियमित वापरात येऊ लागले त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये सकारात्मक बदल दिसून आला.



**पुस्तकांचा दवाखाना**



**गटातून अध्ययन**

शालेय गुणवत्ता वाढ होण्यासाठी वेगवेगळया प्रशिक्षणाचा फायदा झाला राज्य पातळीवरील मुल्यवर्धनाचे प्रशिक्षण, विभाग पातळीवरील बालरक्षक व भाषा प्रारंभिक प्रशिक्षण तसेच जिल्हा, तालुका व केंद्र स्तरावरील सर्व प्रशिक्षणाचा खूप मोठ्या प्रमाणात फायदा झाला. अशी वेगवेगळी नाविन्यपूर्ण व दर्जदार प्रशिक्षणे मिळत रहावीत ही आपेक्षा या शाळेने तालुका व जिल्हा स्तरावर अनेक प्रकारची पारितोषिके मिळवलेली आहेत.

**सांस्कृतिक कार्यक्रम :-** आमची शाळा ही पहिली ते चौथी पर्यंतची असल्याने स्पर्धा परिक्षा जरी नसल्या तरी सांस्कृतिक, कला प्रकारामध्ये शाळेने घवघवीत यश मिळवलेले आहे. तालुका स्तरावर लोकनृत्य, समुहगायन, एकपात्री नाटक, काव्य वाचन या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून जिल्हा स्तरावर सादरीकरण करण्याची संधी मिळाली. शाळेतील उपक्रमांची दखल देशातील आघाडीचे दैनिक Times of India या वर्तमानपत्राने घेतली.





# This Marathwada-based ZP school didn't let Covid stop it from imparting education

Prasad.Joshi@timesgroup.com

**Aurangabad:** While classrooms and campuses of primary schools across the state wear a deserted a look due to the ongoing pandemic, the zilla parishad-run school at Ramkund village in Bhoom taluka of Osmanabad district, located around 200km from here, is an exception to such blanket closure.

The school, having a total of 84 students of classes I to IV, has been operating non-stop since the outbreak of Covid-19 upon the request of parents.

School principal Dadasaheb Salunke said most of the parents are marginal farmers and farm workers who toil hard in the fields and cannot take care of children during the day.

"A group of parents requested us to conduct the classes in order to ensure that their wards remain engaged. We accepted their demand after getting the nod from the local gram panchayat. Now, the academic activities are on by following all the Covid-prevention norms since March," he said.

At the early stages of Covid outbreak, school authorities did not allow the children to enter the campus and instead reached out to their homes. "We formed a group of students and a guardian for every group. Later, the teaching-learning process was carried out in small groups under a large banyan tree located near the school. For last few weeks, students are allowed to enter the campus and we are working in a more organized and vigorous manner," Salunke said.

Appasaheb Hake, a parent whose daughter and son are studying at the school concerned, said his children did not witness any academic loss during lockdown. "Even zilla parishad officials visited our school and lauded the uninterrupted process of teaching and learning during the pandemic by ensuring necessary safety precautions. We remain grateful towards the school authorities who extended helping hand not only to us, but also to our children," he said.

The school has 84 students of classes I to IV

**लोकनृत्य सादर करताना विद्यार्थी** | **Times of India ने घेतलेली दखल**

**शैक्षणिक सहल:-** शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून मुलांना शैक्षणिक अनुभव दिले जातात. जर वर्षी मुलांची शैक्षणिक सहल काढली जाते.

**शिक्षणाची वारी:-** शाळेत शिक्षणाची वारी उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने मुलांनी विविध शैक्षणिक साहित्य तयार केले.गावात प्रभात फेरी काढली.विविध मान्यवरांनी यावेळी भेटी दिल्या.



**शिक्षणाच्या वारीत सहभागी विद्यार्थी व शिक्षक**

अशा अनेकविध उपक्रमामुळे शिक्षकांच्या तसेच पालक, गावकरी यांच्या सहकार्यामुळे, तालुका व जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे शाळेचा व गावांचा आलेख उंचावत आहे. यामुळे शाळेची गुणवत्ता तर वाढलीच त्याचप्रमाणे शाळेचा पट ही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. बाहेर गावचे विद्यार्थी या शाळेमध्ये प्रवेश घेऊ लागले आहेत.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. बिराप्पा शिंदे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, उस्मानाबाद. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोचाळे, ता.मोखाडा, जि. पालघर

**मुख्याध्यापकाचे नाव:-** श्री.दिनकर पांडुरंग फसाळी **ई-मेल:-** dinkarfasale1@gmail.com




**पूर्वीची शालेय इमारत आत्ताची**

पालघर नुसते जिल्ह्याचे नाव उच्चारले तरी आपल्या डोळयासमोर येतात ते नागमोडी वळणाचे रस्ते, धुवाधार पाऊस, बहूल जिल्हा, येथील शिक्षण आरोग्य व मुलभूत सुवीधा, वाहतूक सुविधा यांची भौगोलीक परिस्थीतीमुळे तशी वाताहतच आहे १५ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होवून स्वतंत्र पालघर जिल्हा अस्तित्वात आला. ठाणे पालघर आणि नाशिक ता तीन जिल्ह्यांच्या सिमेवर मोखाडा तालुक्यातील मध्यवैतरणा धरणाच्या काठावर, डोंगराच्या कुशित वसलेली कोचाळा हे गाव. जिल्ह्याच्या मुख्यालयापासुन १२० किलोमिटर व तालुक्याच्या मुख्यालयापासून ३५ किलोमिटर अंतरावर १००% आदिवासी ७२० लोकसंख्येचे गाव. या गावात इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतची १२० विद्यार्थी आणि ४ शिक्षक असलेली जिल्हा परिषद उच्य प्राथमिक शाळा,कोचाळे.

**शालेय विकास :-** जि.प.शाळा, कोचाळे, केंद्र–किनिस्ते, ता. मोखाडा, जि. पालघर या शाळेत दोन्ही शिक्षक हे बदली करून दुसऱ्या ठिकाणी रुजु झाले होते. आणि आम्ही नवीन शिक्षक येथे रुजू झालो होतो. आमच्या दृष्टिने ती एक संधी आणि तेवढेच आव्हान होते. ते आव्हान स्विकारून आम्ही पुढील कामासाठी म्हणून वर्ग, शाळा, पालक व इत्तर शाळेची पुर्व स्थिती याबद्दल माहिती जाणुन घेतली. 'जबादारी मोठी होती पण अशक्य नव्हती.शाळेची भौतीक सुविधा तशी गरजे पुरती, पण अजुन परिपुर्ण भौतिक सुविधा कशी साधता यईल त्या बद्दल आम्ही सतत विचार करत रहायचो. कारण या ठिकाणी शाळेभोवती पक्के कंपाउंड, मुबलक जागा, वर्ग, मैदान, मुबलक होते. ग्रामस्थ व पालकांच्या सहभागातून याला फक्त एक आदर्श शाळेचा आकार द्यायचा होता. शाळा सर्व सुविधांच्या बाबतीत परिपुर्ण कशी करता यईल याकडे कटाक्षाणे लक्ष द्यायचे होते. तर काय बरे करता यईल याचा विचार आम्ही करू लागलो. मग आम्ही शाळेला उन्हाळी सुट्या लागत आहेत व आपल्याकडे भरपुर वेळ आहे. आणि जर आपल्याला लोकसहभाग मिळवायचाच आहे, तर मग आपल्याला हिच संधी आहे. म्हणतात ना "आधि केले मग सांगितले". या उक्ती प्रमाणे काम करण्याचे ठरवले व उन्हाळी सुट्यांना सुरुवात झाली. शालेय इमारती बघून असे वाटले की जर बर्यापैकी चित्रकला जमते, तर या सुट्टिच्या कालावधीत आपणच शाळेचे

बाह्यांग व अंतरंग चित्र काढून सुशोभित केले तर? दुसऱ्या दिवसापासून सकाळी ९:०० ते संध्याकाळी ६:०० सतत न थकता हातात ब्रश व रंगाचे डब्बे घेऊन सर्व शाळा अतिशय सुंदर रंगवून काढली. रंगवताना निकष मात्र एकच ज्या वर्गात ज्या इयत्तेची मुले बसतील त्या इयत्तेचा अभ्यासक्रम तसेच त्यांच्या मनाला प्रसन्न वाटेल अशी बोलकी चित्रे भिंतीवर काढायची हळु हळू शाळा खुलून दिसायला लागली. शाळेसाठी सौर उर्जा संच मिळाला होता पण अजून तो उपयोगात आला नव्हता. शाळेचा विद्युत पुरवठा देखील भरमसाट विज बिलामुळे खंडीत झालेला होता. मग विचार आला या सुट्टीत हे सौर उर्जा किट सुरळित सुरू केला तर? खुप शोधाशोध करून शेवटी ते सौरउर्जा संच बसवुन सर्व शाळा प्रकाशमय केली जेणेकरून शाळा उघडल्यावर जेव्हा माझी चिमुकली शाळेत येतील तेंव्हा त्याना वेगळा आनंद अनुभवता यावा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद मला अनुभवता यावाकारण चिमुकल्यांचे हास्य हेच आमचे समाधान ! आजुनही शाळा उघडणे दुरच होते पण आमची स्वप्नातली शाळा हळु हळू आकार घेत होती. ती ही पालक संपर्काविन शाळा रंगरंगोटी, विज या दोन्ही गोष्टी आत्ता व्यवस्थित पार पडल्याहोत्या.

**शाळा बाह्य मुलांचा प्रवेश:-** १५ जुनला शाळा उघडणार म्हणुन दोन दिवस आधी दाखलपात्र विद्यार्थ्यांच्या गृहभेटी घेत आसताना एक भयान वास्तव समोर आले. ते म्हणजे चक्क ११ वेगवेगळया वयोगटातील मुले आजही शिक्षणाच्या प्रवाहा पासून वंचीत होते. चौकशी केली असता कातकरी समाजातील मुले ती आपल्या कुटुंबा सोबत वेगवेगळया गावातून राहायला आली होती. पालकांशी संपर्क करून, शिक्षणाचे महत्व पटवून देत शाळेच्या पहिल्या दिवसा पासुनच त्यांना शाळेत दाखल करायचे ठरवले. आज मुलांचा शाळा प्रवेशोत्सव साजरा करावयाचा होता. गाडी सजली, गावातील बॅन्ड तयार झाला, दाखलपात्र विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन सजलेल्या गाडीत बसवून वाजत गाजत शाळेत दाखल करून घेतले. दिपवाळी सुट्टी नंतर असे लक्षात आले की ज्यांना आम्ही शाळाबाह्य म्हणून शाळेत दाखल केली होती ती मुले शाळेत दिसत नव्हती. मग तपास सुरू झाला कातकरी वाडी गावापासून थोड्या अंतरावर आसल्यामुळे सहसा तिकडे जान होत नसे, पण या गैरहजर मुलांच्या गृहभेटी देण्यासाठी वाडीत गेल्यानंतर समजले की . पाच सहा वयोवृद्ध सोडले तर संपुर्ण वाडी स्थलांतरीत झाली होती. शाळेपासून जवळपास २०० ते २५० कि मि. अंतरावर रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात काही विटभट्यांवर आमच्या शाळेतील मुले सापडली. स्थानिक शिक्षकांच्या मदतिने त्याना जवळच्या शाळेत दाखल करुन घेतले आणि आम्ही परतलो.

**लोकसहभाग :-** शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळा व्यवस्थापण समिती व पालक सभा पार पडली सभेमध्ये भविष्यातील शाळा कशी असेल याचा आराखडा त्यांच्यासमोर मांडला. शाळा म्हणजे गावाचा आरसा आसतो, हे गावकऱ्याना पटवून दिले. शाळा विकास हा लोकसहभागा शिवाय शक्य नाही, पण लोकसहभाग मिळवायचा कसा? कारण लोक सगळी हंगामी शेती आणि मोलमजुरी करून आपला उदर्निर्वाह करणारी त्यातच एक उपक्रम सुचला “गावाचा एक दिवस शाळे साठी श्रमदानाचा” महिण्याच्या दुसऱ्या मंगळवारी प्रत्येक घरातील एक व्यक्ती शाळेत येऊन शिक्षक सांगतील किंवा पडेल ते काम करायचे. पालकानी नुसते आश्वासनच दिले नाही तर शाळा विकासासाठी चक्क प्रतिज्ञाच घेतली. उन्हाळी सुट्टितील आमचे काम सार्थकी लागले. वर्ष भरातील कामांची यादी तयार झाली. एक एक काम मार्गी लावायचे ठरवले. पावसाळा सुरू झाला. शाळेत जुनी अस्ता व्यस्त वाढलेली काही झाडे होती पावसाळयात वाऱ्याने कधीही मोडून पडतील अशी पहिल्याच आठवड्यात पालकानी झाडांच्या वाढलेल्या फांद्या तोडून जागा मोकळी केली. नविन झाडे लावण्यासाठी जागा उपलब्ध झाली. मुलाना गर्द सावली मिळेल अशी छानशी झाडे नर्सरीतून आणल. दुसऱ्या दिवशी गावातील सर्व मंडळी शाळेत जमा झाली आणि नियोजन पद्धतिने झाडे लावली. प्रत्येक वर्गातील मुलाना झाडे वाटून दिली मुले आपल्या झाडाची काळजी घेऊ लागली .





पालक सभा

शाळा विकासासाठी पालकांनी प्रतिज्ञाच घेतली.

फक्त शाळा व्यवस्थापन समितीच नाही तर पालक आणि ग्रामस्थयांची दर महिण्याला सभा होत होती. डिसेंबर महिण्याची सभा शाळेला वेगळा आकार देणारी ठरली. सभे मध्ये कामं ठरली, लोकांचे गट तयार केले, कामे वाटून दिली आणि दिवस ठरला ३१ डिसेंबरचा माझ्या शाळेसाठी अत्यंत महत्वाचा. शाळेतील झेंड्याच्या खांबाची व खेळण्यांची जागा बदलल्यामुळे जस्तिची जागा उपलबद्ध होणार होती. ज्याला कोनाला गवंडी काम जमत त्यानी बांधकामाला सुरुवात केली. शाळेचा झेंडा, दर्शनी भागात भिंत, रंगमंचाची दुरुस्ती, शौचालय दुरुस्ती, संरक्षक भिंतीला रंगारंगोटी, शाळेच्या गेटची दुरूस्ती, शाळेची माहिती लावण्यासाठी बोर्ड व कमान, शाळेच्या पटांगणात आसलेले मोठ मोठे दगड काढण्याचे काम ज्याला जमेल तसे काम गावातील तरूण, तरुणी, जेष्ट माणसे, करू लागली. विशेष म्हणजे हे काम सतत पाच दिवस चालले आणि तेही कुठलाही मोबदला न घेता फक्त श्रमदानातून. त्यांच्या या कार्यामुळे आम्हा सर्व शिक्षकांमध्ये नविन उत्साह आला. तसेच कामाची मजुरी वाचल्यामुळे शाळेचा पैसा शाळेच्या इत्तर कामांसाठी वापरता आला. ग्रामपंचायत ला सतत पाठपुरावा करून ओबडधोबड आसलेल्या शाळेच्या पटांगणात फेव्हर ब्लॉक बसवून देण्यात आले. आत्ता खऱ्या अर्थाने शाळा खुलून दिसू लागली.



............ आणि सारा गाव शाळेत आला !

लोकसहभागातून शाळेसाठी झेंडा फडकावण्यासाठी चबुतरा तयार केला

**शाळेतील विविध उपक्रम :-** दरम्यान ह्या कामांबरोबर शैक्षणिक तसेच इत्तर कामे ही चालूच होती. यातच क्रिडा स्पर्धा, विविध गुणदर्शन स्पर्धा, या स्पर्धेत कबड्डी ,संगीत खुर्ची, ई. स्पर्धेत तालुक्यात प्रथम येऊन प्रथमच जिल्हा स्तरापर्यंत मजल मारली व विविध गुणदर्शन स्पर्धेत तालुका स्तरापर्यंत मजल मारली. शैक्षणिक बाबतीत आमची घोडदौड सुरुच होती. आमच्या शाळेतील एक विद्यार्थीनी प्रज्ञाशोध परिक्षेत केंद्रात प्रथम आली. तर राज्याच्या गुणवत्ता यादित ८८ वि आली. मुले आत्ता खुप अभ्यास करू लागली आहेत. शाळेच्या आधी शाळेत येऊन अभ्यास पुर्ण करतात. खऱ्या अर्थाने आम्ही घेतलेल्या कष्टाचे चिज होऊ पाहत आहे. याचे मनस्वी समाधान आहे. मुलाना अवांतर वाचनाची गोडी लागावी म्हणून गावातील एका दानशुर व्यक्तिने शाळेसाठी ५०० पुस्तकांची भेट वाचनालयास दिली. अनेक सामाजीक संस्था शाळेशी जोडल्या गेल्या आहेत. शाळेला एका सामाजिक संस्थेकडून ३ संगणक भेट मिळाले आहेत. आमच्या एका मित्राने शाळेसाठी एक एम्लिफायर आणी चार साऊंड भेट दिली आहेत. त्यामुळे सकाळी, मधल्या सुट्टित, आणि संध्याकाळी शाळेचे वातावरण संगितमय असते. शाळासिद्धि मध्ये शाळ " अ" श्रेणित असून जिल्ह्यासाठी आदर्श शाळा आहे. तंबाखु मुक्त शाळा म्हणून तालुक्यात दुसरी तर जिल्ह्यात पाचवी शाळा आहे, शाळाबाह्य विद्यार्थी मुक्त शाळा आहे. आठवडाभर चालणारी शाळा, दप्तर मुक्त शनिवार, किचन गार्डन असे विविध उपक्रम शाळेत राबविले जातात. आज शाळेत सुंदर रंगरंगोटी, सुसज्य पुरेशे शैक्षणिक व क्रिडा साहित्ये, डिजिटल साहित्ये, प्रशस्त व सुंदर वर्गखोल्या, नाविण्यपुर्ण ऑफीस, आवांतर वाचनासाठी ग्रंथालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, हॅन्डवॉश स्टेशन, उच्चत्तम दर्जाचा पोषण आहार, तसेच संपुर्ण शाळेसाठी सौर उर्जेचा वापर या मुळे शाळा झिरो एनर्जी स्कूल आहे.

शिक्षकांचीही नाविण्यपुर्ण उपक्रमात जिल्हास्तरावर निवड झाली आहे. शिक्षकांच्या कामाची दखल घेत गेल्यावर्षी मुख्याध्यापक यांना विविध संस्थे मार्फत दिलेजाणारे दोन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. शाळेच्या भविष्यातील वाटचालीसाठी क्रिडास्पर्धा, विविध गुणदर्शन स्पर्धा, स्पर्धा परिक्षा यासाठी सराव तसेच स्कॉलरशिप व नावोदय परिक्षेसाठी विद्यार्थी पात्र व्हावे म्हणुन त्यांच्याकडे वैयक्तिक लक्ष देवून सराव करून घेणे सुरू आहे. यासाठी आम्ही कठोर परिश्रम घेत आहोत. यात आम्ही आमच्या शाळेस ISO मानांकन मिळावे म्हणून प्रयत्न करत आहोत. तसेच कोचाळे शाळा ही जिल्ह्यातील शाळांना पथदर्शी ठरावी या साठी आम्ही प्रयत्नशिल आहोत.

शाळा विकास हेच आमचे ध्येय !

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. तानाजी डावरे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, पालघर . | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद शाळा, पावळेपाडा [ गांधीधाम ], ता.डहाणू , जि.पालघर

**मुख्याध्यापकाचे नाव:-** श्री.रवींद्र मंगीलाल जाधव **ई-मेल:–** rj4384333@gmail.com




**जिल्हा परिषद शाळा, पावळेपाडा शाळेची इमारत**

पावळेपाडा ( गांधीधाम ) पालघर जिल्ह्यात, पालघर-डहाणू या कोस्टल हायवेवर, पालघर पासून ३० कि.मी. अंतरावरील वरोर ग्रामपंचायत मध्ये वसलेला एक छोटासा आदिवासी पाडा आहे . या पाड्याची लोकसंख्या जेमतेम ७५० आहे. या ठिकाणी आदिवासी समाजातील वारली जमातीचे लोक राहतात. त्यांचा प्रमुख व्यवसाय मजूरी, गावातील काही बोटावर मोजण्या इतक्या लोकांचा व्यवसाय डाइमेकिंगचा आहे. साधारणत 30 टक्के लोक बोटीत काम करण्यासाठी स्थलांतरीत होतात. या पाड्यापासून अगदी जवळच अरबी समुद्र आहे. आर्थिक आणि शैक्षणिकदृष्टया हा पाडा मागासलेला आहे. पाड्यावर समाधानकारक शैक्षणिक वातावरण नव्हते. आदिवासी समाजातील वारली जमातीचे लोक पावळेपाडा येथे राहतात. हा समाज उत्सवप्रीय आहे. विविध सण साजरे करणे, चित्र काढणे, गायन करणे, तारफा नृत्य करणे. असे अनेक कलागुण उपजतच त्यांच्या अंगी असतात. त्या कलागुणांना वाव देणे गरजेचे असते.

**शालेय विकास :-** शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे वर्ग होते. या सात वर्गातील विद्यार्थी केवळ तीन वर्ग खोल्यांमध्ये बसवले जायचे. शाळेची इमारत अतिशय धोकादायक होती. शाळा भेटीसाठी जे प्रशासकीय अधिकारी यायचे ते धोकादायक इमारतीचा शेरा दिल्याशिवाय जायचे नाही. धोकादायक इमारतीचा प्रश्न तसेच इतर अनेक समस्या शाळेत `आ` वासून उभ्या होता. या सर्व समस्येवर उपाय शोधण्यासाठी विचार प्रक्रिया सुरू झाली. त्यासाठी शिक्षण विस्तार अधिकारी केंद्रप्रमुख यांच्या मार्गदर्शनाने, ग्रामस्थांच्या सहकार्याने व सहकारी शिक्षकांच्या संघनमताने सर्व प्रथम धोकादायक इमारती संदर्भात विचार करण्यात आले. सामाजिक बांधिलकी फंडातून शालेय इमारतीचे बांधकाम, सामाजिक संस्था करून देतील का, याचा शोध आम्ही घेऊ लागलो अनेक ठिकाणी पत्र-व्यवहार करण्यात आले. तसेच पाठपुरावा पण करण्यात आला.

पालघर जिल्हातील न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड [एनपीसीआयएल] तारापूर ता. जि. पालघर यांच्याकडे जुलै २०१६ मध्ये नविन शालेय इमारत बांधून द्यावे यासाठी विनंती अर्ज देण्यात आले. एनपीसीआयएल तारापूर यांच्याकडील सामाजिक जबाबदारी फंडातून शैक्षणिक कार्य करण्यात येतात. याची माहीती आम्हाला मिळाली होती. निरंतर पाठपुराव्यानंतर शाळेची भौतिक स्थिती, पाड्याची शिक्षण विषयक गरज, इतर अनेक बाबीच्या सर्वेक्षणानंतर शालेय इमारतीसाठी बांधकाम कामासाठी तब्बल दीड कोटी रुपये सामाजिक जबाबदारी कक्षाद्वारे मंजूर करून घेण्यात

आम्ही यशस्वी ठरलो. पण शालेय इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देणे व त्या जागेचे सर्व कागदपत्र एनपीसीआयएल तारापूर या संस्थेला निर्धारित वेळेत देणे अपेक्षित होते. परंतु अनेक अपरिहार्य कारणांमुळे विलंब होत होता. जुनी शालेय धोकादायक इमारत पाडून त्याच ठिकाणी नविन इमारत बांधण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. आणि त्यानंतर जुनी इमारत पाडण्याची व नविन इमारत बांधण्याची परवानगी मिळविण्यात बराच कालावधी गेला व त्यासाठी आर्थिक भारही सोसावा लागला. सर्व परवांगीसाठीच्या प्रक्रिया आनंदाने करत राहिलो, कारण धोकादायक इमारतीच्या ठिकाणी अप्रतिम शालेय इमारत साकारावी हे स्वप्न उराशी आम्ही बाळगलेले होते. सर्व परवानगी व प्रक्रिया सप्टेंबर २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आल्या. नोव्हेबर २०१८ मध्ये शालेय इमारत बांधकाम सुरू करण्यात आले. बांधकाम करताना आलेल्या समस्येवर मात करत सन २०१९ मध्ये प्रशस्त, अप्रतिम, सुंदर अशा पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद मॉडेल स्कूलचे बांधकाम पूर्ण झाले.

**विद्यार्थी विकास :-** नविन इमारत तयार झाल्यानंतर या इमारतीचे आकर्षण सर्वांनाच होते. इमारत तयार झाल्यानंतर सुद्धा काही विद्यार्थी शाळेत आनंदाने येत नव्हते. आम्ही नेहमी गृहभेटी देऊन त्याला शाळेत येण्यासाठी सांगायचो पण तो हो बोलायचा आणि शाळेत यायचा नाही. बऱ्याच दिवसाच्या अनुभवानंतर त्याला गोट्या खेळण्याची व मच्छी पकडण्याची आवड असल्याचे समजल्यानंतर त्याच्याकडे जाऊन थोडा वेळ गोट्या खेळायचो तसेच त्याला शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले, त्याच्याशी मैत्री झाली. या मैत्रीमूळे नितेश नियमित शाळेत येतो. असे अनेक अनुभव आले .

आमच्या शाळेतील विद्यार्थी संदेश संदीप बाबर ह्या विद्यार्थ्यामध्ये चित्र काढण्याची आवड निर्माण करून त्याला प्रोत्साहन देण्यात आले . चित्रकलेच्या विविध परीक्षेला बसण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली . सन २०२० मध्ये संदेश युनेस्कोच्या राष्ट्रीय स्तरावरील चित्रकलेच्या स्पर्धेत सहभागी झाला होता. सदर स्पर्धेत त्याने काढलेल्या सुंदर वारली चित्राबद्दल युनेस्कोचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. ही बाब पालघर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरली.


मुंबई, सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२० २

तीन विद्यार्थ्यांना युनेस्कोचा पुरस्कार

**युनेस्कोचा राष्ट्रीय पुरस्कार**

**लोकसहभाग :-** इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मात्र आम्ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी धडपडू लागलो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी कोणत्या बाबी करायला हव्यात जेणे करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल, यासाठी विचारविनिमय सुरू झाले. अधिकारी वर्ग, शाळा व्यवस्थापन समिती, सहकारी शिक्षक, तसेच सर्व पालक आम्ही सर्वांनी मिळून विद्यार्थ्यांचा विकास साधण्यासाठी प्रयत्न सुरू केले. विविध सभेच्या माध्यमातुन पालकांमध्ये शिक्षणविषयक जागृती निर्माण केल्यामुळे पालक विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देवू लागले. पालकांचा शाळेशी असणारा संपर्क वाढला. तसेच आपला पाडा आजतागात शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला होता. बचत गट, पाड्यावरील तरुण-तरुणी, पालक यांच्या सहकार्याने पाड्यावर शैक्षणिक वातावरण तयार झाले. काही विद्यार्थी वाडीत कामाला जायचे त्यांना सुद्धा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात आम्ही यशस्वी ठरलो.

शाळेची एकूणच प्रगती फिनिक्स पक्ष्याप्रमाणे होत असताना, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मोठ्या प्रमाणावर गरज भासायची. शैक्षणिक साहित्याची तरतूद विविध एन.जी.ओ. तसेच परिसरातील दानशुर व्यक्तीकडून करण्यात यायची. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी गणित, इंग्रजी, विज्ञान अशा विषयांसाठी जादा तासिकेची व्यवस्था करण्यात आली. अध्यापनात डिजिटल साधनांचा वापर वाढल्यामुळे विद्यार्थी अध्ययनात रस घेऊ लागले. विद्यार्थ्यांचे इंग्रजी वाचन सुधारावे यासाठी ‘सेंटेन्स-टू-वर्ड’ हा एक उपक्रम आम्ही राबविला. विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला, या उपक्रमाची सर्वत्र फार चर्चा झाली. आदिवासी समाजातील विद्यार्थी सुद्धा चांगल्या प्रकारे इंग्रजी वाचन करू शकतात हे दाखवून देण्यात वेगळाच आनंद होता.



**बाल आनंद मेळावा कार्यक्रम**

**शलेय उपक्रम :-** पालघर जिल्ह्यातील एक मॉडेल स्कूल असल्यामुळे अनेक शिक्षणप्रेमी, शिक्षक, बंधू-भगिनी पंचक्रोशीतील बांधव शाळेला भेटी देत असतात. त्यांच्याकडून मिळालेली कौतुकाची थाप आम्हा सर्वांनाच निश्चितच नवीन ऊर्जा देत असते. पूर्वी शाळेला मदत करण्यासाठी फारसे दाते धजावत नव्हते, पण आज घडीला विद्यार्थ्यांची प्रगती व शालेय इमारत पाहून स्वत:हून अनेक प्रकारची मदत शाळेला मिळत असते. कोणत्याही गोष्टीत सकारात्मक बदल घडून आले तर त्याचा सकारात्मक परिणाम एकूणच प्रगतीवर होत असतो. जोपर्यंत शाळा समाजात जात नाही व समाज शाळेत येत नाही तोपर्यंत शाळेचा सर्वांगीण विकास होत नाही. हे माहित असल्यामुळे समाजातील, गावातील लोकांचा सहभाग शालेय कामकाजात वाढवला. त्यांचे उत्तम उदाहरण म्हणजे जानेवारी २०१९ मध्ये आम्ही आमच्या बडापोखरण केंद्रातील ११ शाळेतील विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव मिळावे त्यांचे सुप्त गुण वृंधिगत व्हावे यासाठी बाल आनंद मेळावा आयोजित करण्याचे ठरवले. बाल आनंद मेळावा यशस्वी करण्यासाठी पाडयावरील आबालवृद्ध अगदी तन-मन-धनाने एकरूप होऊन कार्यक्रम यशस्वी केले. या कार्यक्रमामुळे पावळेपाड्यावर एकता साधता आली. जणूकाही आपल्या घरचा कार्यक्रम आहे, असे समजून प्रत्येक जण धडपडत होते. एकूणच हे सर्व पाहून शाळा आणि समाज जर एकरूप झाले तर काहीही घडू शकते. हे चित्र पाहावयास मिळत होते.



**शाळेतील सुसज्य ग्रंथालय .**

भौतिकदृष्ट्या समृद्ध असणाऱ्या शाळेत अनेक प्रकारच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी आहेत. 'वाचाल तर वाचाल' ही वाचन संस्कृती सुधारावी भावी लेखक, कवी निपजावे विद्यार्थ्यांची डोकी समृद्ध व्हावे यासाठी शाळेमध्ये थिंकशार्प फाऊंडेशन, मुंबई यांच्या सौजन्याने अनोखे प्रकारचे सुसज्ज ग्रंथालय आहे. विद्यार्थी ग्रंथालयातील पुस्तके आवडीने वाचतात व वाचलेल्या पुस्तकांच्या नोंदी ठेवतात. पुस्तकातील वाचलेल्या कथा, माहिती विद्यार्थी तसेच पालकांना सांगतात. शाळेमध्ये गट करून वाचलेल्या माहितीविषयी चर्चा करतात.



**शाळेतील सभागृहात शिवणकला प्रशिक्षणाचे आयोजन.**

शाळेत प्रशस्त सांस्कृतिक सभागृह असून या सभागृहात विविध शैक्षणिक, सामाजिक कार्यक्रम घेतले जातात. विद्यार्थ्याच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सभागृहात होतात. बहुतांश वेळ इनडोर खेळासाठी सुद्धा सभागृहाचा वापर केला जातो. अशाप्रकारे बहुउद्देशीय तत्त्वावर सभागृहाचा वापर केला जातो. पाड्यावरील बेरोजगार महिलांना रोजगार मिळवा म्हणून ग्रामपंचयात वरोर व जिल्हा परिषद शाळा पावळेपाडा च्या संयुक्त विद्यमाने एक महिन्याचे शिवण कला प्रशिक्षण आयोजन करण्यात आले. ज्यामुळे आमच्या पावळेपाडा येथिल अनेक महिला भगिनींना रोजगार उपलब्ध होऊ शकला. या सभागृहाचा वापर योगा, प्राणायाम, व्याख्यान, वाढदिवस साजरा करणे, तसेच मुक्त शिक्षणाच्या माध्यमातून विविध साहित्य निर्मिती करण्यासाठी विद्यार्थी उपयोग करतात. अशा अनेक कारणांसाठी सभागृह आम्हाला उपयोगी पडते.

जल ही जीवन है। ही संकल्पना लक्षात घेऊन पाणी बचत ही काळाची गरज असुन प्रत्येकाने पाण्याची बचत करणे आवश्यक आहे. हे समजुन शाळेच्या लोकसहभागातून जलपुनर्भरण टेरेस वरील पावसाळयातील साचलेले पाणी पाईपद्वारे बोरवेल मध्ये सोडण्यात आले आहे. बोरवेल मध्ये पाणी सोडल्यामुळे जमिनीत पाणी मुरण्यास निश्चितच फायदा होतो मात्र

सर्वात जास्त फायदा कोणता होत असेल तर आमच्या शाळेच्या बोरवेलचे खारट पाणी असणारे पाणी गेल्या दोन वर्षापासून हळूहळू गोड बनत चालले आहे. आमची आशा आहे की, येणाऱ्या दोन वर्षात बोरवेलच्या पाण्याचे क्षाराचे प्रमाण कमी होऊन पाणी पिण्यायोग्य बनेल.

**तंत्रज्ञानाचा वापर :-** विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शाळा १००% डिजिटल करणे. व त्या डिजिटल साहित्याचा वापर अध्ययन-अध्यापनात वापरणे अत्यंत गरजेचे होते. शाळेतच विद्यार्थ्यांना टी. व्ही. दाखवायचा तसेच प्रोजेक्टर् वर शाळा भरण्याच्या अगोदर त्यांना आवडणारे शैक्षणिक चित्रपट दाखवू लागलो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी रात्री इतरांच्या घरी टी. व्ही. पहावयाला जाणे हळूहळू बंद केले व चित्रपट शाळेतच पाहायला मिळत आहे म्हणून लवकर शाळेत येऊ लागले. सरकारी नियमानुसार शाळा सकाळी साडे दहा वाजता सुरू होत असते परंतु आमची शाळा सकाळी नऊ वाजताच सुरू होत असते. त्यामुळे गैरहजरीचे प्रमाण कमी झाले. उपस्थिती वाढण्यास मदत झाली. आजमितीस शाळेमध्ये तीन प्रोजेक्टर्, दोन एल. सी. डी, स्मार्ट टी व्ही, दोन संगणक संच, एक टॅब तसेच प्रत्येक शिक्षकांकडे वैयक्तिक लॅपटॉप असून या सर्व डिजिटल साधनांचा वापर विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी करण्यात येत आहे. आनंदाची बाब म्हणजे काही विद्यार्थ्यांनी सुद्धा डिजिटल साधने हाताळण्याचे तंत्र अवगत केलेले आहे. ते स्वत: आपल्या आवडीनुसार विविध विषयाचे पाठ, कविता किंवा शैक्षणिक व्हीडिओ पाहू शकतात.

डिजिटल साधनांच्या अकर्षणबरोबरच आमच्या शाळेतील विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारात प्राविण्य मिळविले आहे. अभ्यासाबरोबर खेळाचे महत्त्व विद्यार्थ्यांना वारंवार पटवून सांगण्यात येते. आमच्या शाळेतील विद्यार्थी धावणे, कबड्डी, क्रिकेट, लांब उडी, लंगडी, अशा क्रीडा प्रकारात रस घेतात व शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये आपले कौशल्ये दाखवतात. विद्यार्थ्यांना क्रीडा विषयक आवड निर्माण व्हावी म्हणून विविध क्रिडाप्रकारातील नावाजलेल्या क्रिडापटूंची माहिती विडिओच्या माध्यमातून दाखवली जाते. इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या इयत्ताना शिकवतांना ज्ञानरचनादी पद्धतीने अध्यापन केले जाते. विद्यार्थी पारंपरिक अध्यापन पद्धतीपेक्षा ज्ञानरचनावादी पद्धतीने अधिक चांगल्या प्रकारे शिक्षण घेतात. अध्यापन करताना कृतियुक्त अध्यापन पद्धतीचा वापर केला जातो. वर्गात तसेच वर्गाबाहेर सुद्धा मुक्तपणे अध्यापन केले जाते.



**ज्ञानरचनावादी पद्धतीने शिक्षण घेताना विद्यार्थी**

शालेय इमारत प्रशस्त असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध आहे. आम्ही कृतीला प्राधान्य देतो शिकवण्यापेक्षा मुले जास्त कृती करण्याचा प्रयत्न करतात. त्यात स्वयंअध्ययन कार्डस, गोष्टीचे कार्डस, शब्द कार्डस काही साहित्य शिक्षकांनी तयार केलेले आहे. आता शासनाकडून गणित, भाषा व इंग्रजी, विज्ञान साहित्यपेटी पुरवण्यात आलेली आहे. व त्याचा वापर आम्ही दैनदिन अध्ययन-अध्यापनात करतो. शैक्षणिक साधनांचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांना

संकल्पना स्पष्ट होण्यासाठी मदत होते व विद्यार्थी अध्ययनात रस घेतात. विद्यार्थ्यांना दिलेला गृहपाठ नियमित पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला जातो.



**विद्यार्थी सूत्रसंचालक व विद्यार्थी पाहुणा असे कार्यक्रमाचे नियोजन**

महापुरुषांची जयंती-पुण्यतीथी कार्यक्रम, विद्यार्थी वाढदिवस कार्यक्रम, तसेच इतर अनेक कार्यक्रमाच्या वेळी विद्यार्थी पाहूणा म्हणून एका विद्यार्थ्याला स्टेजवर बसण्याची संधी दिली जाते. विद्यार्थी पाहुणाची निवड सर्व विद्यार्थी मिळून बहुमताने ठरवतात. सदर विद्यार्थी कार्यक्रमादरम्यान आपले मनोगत व्यक्त करतो. इतर मान्यवरांबरोबर त्याचाही सन्मान केला जातो. तसेच शाळेतील कोणताही कार्यक्रम असो सुत्रसंचालन करण्याची संधी विद्यार्थ्यांना दिली जाते. सुरुवातीला विद्यार्थी बोलताना अडखळत असत परंतु आता अगदी अस्सखलीतपणे शालेय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतात. त्यामुळे विद्यार्थी न घाबरता निर्भीडपणे बोलू लागले. या गोष्टीचा सकारात्मक परिणाम लहान वर्गातील विद्यार्थ्यांवर पडू लागला. ते विद्यार्थी सुद्धा परिपाठात बोधकथा वारली भाषेत सांगतात. अनेक वेळा आम्ही आमच्या शाळेत कथाकथन स्पर्धा आयोजित करत असतो. विद्यार्थी आपल्या मातृभाषेतून आजी-आजोबा किंवा इतर मंडळीकडून एकलेल्या कथा सांगतात. उत्तमप्रकारे सांगितलेल्या कथांना क्रमांक देवून त्या विद्यार्थ्यांना बक्षिस म्हणून शैक्षणिक साहित्य दिले जाते.

**विविध प्रशिक्षण :-** निष्ठा प्रशिक्षण शिक्षणाप्रती शिक्षक, मुख्याध्यापक व अधिकाऱ्यांची निष्ठा वाढावी व काळाची पाऊल ओळखून प्रत्यकाने बदल स्विकारण्याची गरज आहे. हे पटवून देण्यासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली, एन.सी.ई.आर.टी व एस.सी.ई.आर.टी. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकस्तरीय निष्ठा प्रशिक्षण आमच्या शाळेत आयोजित करण्यात आले होते. ४० दिवसीय प्रशिक्षणा  दरम्यान एकूण १२०० शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. ही बाब आमच्या शाळेसाठी अभिमानास्पद होती.





लोकमत

विद्यार्थ्यांची इको फ्रेण्डली गणेशा जिल्हास्तरीय स्पर्धा

ऑनलाइन आयोजन : ग्रामीण भागात प्रतिसाद

Hello Vasai
Page No. 2 Sep 06, 2020

**ऑनलाइन जिल्हास्तरीय इको फ्रेंडली गणेश मूर्ती निर्मिती स्पर्धेत विद्यार्थीनी जिल्ह्यात प्रथम**

अनपेक्षितपणे आलेल्या जागतिक करोना काळाच्या संकटातही आमची शाळा ऑनलाइन व ऑफलाइन दोन्ही पद्धतीने चालू होती. आम्ही विद्यार्थ्यांच्या घरी गृहभेटी देऊन विद्यार्थ्यांना अध्यापन करत होतो. फारच कमी विद्यार्थ्यांकडे मोबाईल उपलब्ध होते. ऑफलाइन पद्धतीने अध्यापन करताना पाठनिहाय प्रश्नोत्तराचे प्रिंट देण्यात आले व सराव करून घेण्यात आला. पाड्यावर विद्यार्थ्यांचे गट पाडून पाडयावरील सुशिक्षित तरूणांच्या साह्याने अध्यापन चालू ठेवले. लॉकडाऊन काळात ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या घरी ५० पुस्तके समावेशित ग्रंथालय देण्यात आले व वाचनासाठी प्रोत्साहन देण्यात आले. लॉकडाऊन काळात ऑनलाइन जिल्हास्तरीय इको फ्रेंडली गणेश मूर्ती निर्मिती स्पर्धेत आमच्या शाळेतील कु. तनिषा मनोज वांगड ही विद्यार्थीनी जिल्ह्यात प्रथम आली. तसेच जिल्हा परिषद पालघर आयोजित जिल्हास्तरीय दिव्यांग विद्यार्थी चित्रकला स्पर्धेत हार्दिक विजय बरफ हा विद्यार्थी जिल्ह्यात प्रथम आला. अनेक विद्यार्थी राज्यस्तरीय व राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत सहभागी झाले.

**शाळेची यशोगाथा :-** लोकसहभागातून शाळेचा कायापालट केल्याबद्दल शाळेतील शिक्षक व केंद्रप्रमुखांचा अनेक ठिकाणी सन्मान करण्यात आला आहे. बाडापोखरण केंद्र संपूर्णपणे प्रगत केल्याबद्दल व पावळेपाडा येथील बदलासाठी ज्यांनी नेहमी मार्गदर्शन केले असे निवृत्त केंद्रप्रमुख श्री. विजय भाई पाटील यांना आदर्श केंद्रप्रमुख म्हणून सन्मानित करण्यात आले. तसेच शाळेत आमूलाग्र बदल घडून आणल्याबद्दल सन २०१९ मध्ये बालआनंद मेळाव्यात सर्व शिक्षकांचा नागरी सन्मान करण्यात आला. सन २०१८ मध्ये न्यूक्लीयर पॉवर कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एनपीसीआयएल), तारापूर यांच्याकडून सर्वोत्कृष्ठ शिक्षक पुरस्कार, सन २०१९ मध्ये महाराष्ट्र शिक्षक ॲडमीन पॅनल कडून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, सन २०२० मध्ये ग्लोबल बंजारा अस्तित्व फाऊंडेशन, जळगाव यांच्याकडून राज्यस्तरीय आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार मिळाला आहे.

सद्यस्थितीला शाळा सर्व भौतिक सोई-सुविधांनी युक्त आहे. शाळासिद्धी मुल्यांकनामध्ये ‘अ’ श्रेणी प्राप्त असून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या महाराष्ट्र शासनच्या उपक्रमांतर्गत आमची शाळा प्रगत आहे. पटसंख्या वाढत आहे. गुणवत्तेचा सुद्धा आलेख काळानुरूप वाढत आहे. सर्व पालक अधिकारी व पदाधिकारी व जिल्हा परिषद शाळा, पावळेपाडा च्या एकूण वाटचालीवर समाधानी आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आलेख वाढत आहे. गावातील पाहुण्यांचे पाल्य शिक्षणासाठी पावळेपाडा येथे शिक्षणासाठी येऊन राहत आहेत. तसेच वाडीत काम करायला येणाऱ्या मजुरांचे पाल्य शिक्षणासाठी आमच्या शाळेत प्रवेश घेत आहेत. अशा एक-ना-अनेक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी जिल्हा परिषद शाळा, पावळेपाडा ता.डहाणू, जि.पालघर या ठिकाणी अधिकारी व पदाधिकारी वर्गाच्या मार्गदर्शनाखाली व शाळा व्यवस्थापनसमिती, सहकारी शिक्षक बांधव यांच्या मदतीने पूर्णत्वास जाऊ शकल्या व आदर्श इमारत उभी राहू शकली. आज या भव्य इमारतीत विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास घडत आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. तानाजी डावरे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, पालघर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा, बोरगव्हाण, ता. पाथरी, जि. परभणी

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री गिल्डा बी.एम. **ई-मेल :-** bajaranggilda@gmail.com



**शाळेचे प्रवेशद्वार व शाळेची भव्य कमान**

**लॉकडावूनच्या काळात माझी शाळा माझे उपक्रम:-** शाळेच्या मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, SMC सदस्य यांच्या सहकार्याने शाळेच्या १ ते १० वर्गाच्या विद्यार्थीयांचे Whatsaap Group तयार करून online शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. त्यामाध्यमातून सर्व विषयाच्या PDF स्वरुपात सामग्री उपलब्ध करून देण्यात आली. प्रत्येक वर्गासाठी मुलांचे गट तयार करण्यात आले, पैकी एका मुलाला त्या गटाचा प्रमुख म्हणून नेमण्यात आले. गट प्रमुखा मार्फत गटातील सर्व विद्यार्थ्यांचा अभ्यास पूर्ण करून घेण्यात आला. COVID -19 च्या परस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थीचे ONLINE शिक्षणासाठी ZOOM App चा वापर करून तास घेण्यात आले. विद्यार्थीच्या आरोग्यासाठी शाळेच्या लोकवर्गणीतून निर्जंतुकीकरण करण्यात आले. हे कार्य दर आठवड्याला शिक्षकांच्या निरीक्षणा खाली व SMC सदस्य यांच्या सहकार्याने करण्यात आले. गावातील मंदिरात व मंदिराच्या परिसरात TV च्या माध्यामतून वेगवेगळया वर्गातील विद्यार्थीच्या विषयानुसार व नियोजनानुसार TILI MILI सारखे कार्यक्रम दाखविण्यात आले. त्यातून विद्यार्थीचे अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आले. प्रोजेक्टर द्वारे दररोज संध्याकाळी एका वर्गाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे अश्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील करून घेण्यासाठी त्याच्याच गल्लीतील, वर्गातील मित्राच्या मोबाईलवर online क्लास साठी जोडण्यात आले .विद्यार्थ्यांना घरी राहून online क्लास मध्ये जो पाठ्यक्रम शिकविला आहे .त्याचा सराव व्हावा यासाठी वर्ग शिक्षकांनी आपल्या स्वखर्चातून विद्यार्थ्यांना स्वाध्याय पुस्तिका दिल्या.



**शाळा निर्जंतुकीकरण करताना**

**शालेय उपक्रम :- विज्ञान प्रयोग शाळा :-** समग्र शिक्षा अभियानांतर्गत दहा लक्ष रुपयाची अत्याधुनिक प्रयोगशाळा उपलब्ध करून दिली आहे. तसेच विद्यार्थी स्वतः प्रयोगाचे साहित्य हाताळतात. रोज एक तास विज्ञान प्रयोगासाठी नियोजन केले आहे. विविध प्रयोग विद्यार्थी स्वतः घरी करून बघतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो.

**३६५ दिवस शाळा :-** शाळा 365 दिवस चालते. प्रत्येक शिक्षक वेळ देतो गुणवत्ता प्रथम क्रमांकाची कशी राहील याकडे प्रत्येक जण लक्ष ठेवून आहे. एकही अप्रगत विद्यार्थी राहणार नाही तसेच अध्ययन निष्पत्ती मध्ये शंभर टक्के .गुणवत्ता व उपस्थिती टिकवण्यासाठी सर्व शिक्षक जातीने लक्ष देतात. विविध स्पर्धा परीक्षेचे वेळापत्रक करून जादा तासिका चे नियोजन केले आहे. रात्रीचे अभ्यास वर्गासाठी नियोजन करून सर्व शिक्षक भेटी देतात.

**सामाजिक समस्या वर उद्बोधन :-** शाळेने सामाजिक समस्या वर प्रबोधन केले. पालक मेळावा महिला मेळावा घेतला यातून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. कोल्हापूरला मदतफेरी काढून पाच हजार रुपये निधी जमून पाठविला. अंधश्रद्धा निर्मूलन साठी उपक्रम घेतले. विना फटाके दिवाळी साजरी केली. कचऱ्याची होळी, रंग न वापरता रंगपंचमी, नैसर्गिक रंगाचा वापर करण्यासाठी पालकांना प्रवृत्त केले.

**वृक्षारोपण पुढाकार :-** शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रत्येकी एक झाड लावले त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी घेतलेली आहे. शिक्षकांनी प्रत्येकी पाच झाडे लावली आहेत ,त्यास जाळी बसवणे संवर्धन करणे असे उत्कृष्ट काम केले. शाळेच्या परिसरात 5000 झाडे लावली असून ती जिवंत आहेत. गाव, ग्रामपंचायत, नागरिक, यांच्या सहकार्यातून गावात, पाच हजार झाडे लावली आहेत.

**डिजिटल शाळा :-** शाळेत इयत्ता पहिली पासून दहावी पर्यंत पंधरा तुकडया आहेत. तसेच सर्व वर्गात led बसवलेले आहेत. लोकवर्गणीतून 100% वर्ग डिजिटल केलेले आहेत. संगणकावर, प्रोजेक्टवर, शिक्षण दिले जाते.



**प्रोजेक्टर द्वारे अध्यापन करताना**

**शाळा विकास नियोजन:-** शालेय नेतृत्वातील संकल्पनात्मक मुद्दे प्रक्रिया ज्यात शाळा विकास नियोजनची अमलबजावणी करताना शाळा परिवर्तनाच्या तत्वाचा अंगीकार केला. ज्यात समानता, समता ,बालसंरक्षण ,बालधिकार, शालेय संस्कृती यांचा समावेश आहे. मुला मुलींना स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय आहे. पिण्यासाठी फिल्टर पाणी उपलब्ध, सर्वांसाठी हॅंडवॉश सुविधा उपलब्ध, प्रशस्त इमारत, सुसज्ज वर्ग, समृद्ध वाचनालय उपलब्ध, स्वतंत्र प्रयोग शाळा, सौर ऊर्जा, inverter सोय,

लोकवर्गणीतून 24 तास लाईट, स्वतंत्र 5 एकर ग्राऊंड लोकवर्गणीतून निर्माण केले आदर्श परिपाठसाठी 60*100 चे कायम स्वरूपी सभागृह निर्माण केले. शाळेच्या ग्राऊंड व इमारतीवरचे पाणी तसेच नळ हापसा यांचे सांडपाणी पुनरभरण व्यवस्था केली . ओला कचरा सुका कचरा यांचे वेगवेगळे खड्डे निर्माण करून खत निर्माण केल. शाळेच्या सांडपाण्यावर उत्कृष्ट परसबाग व भाजीपाला निर्मितीकरण्यात येते. शालेय भिंतीची आकर्षक रंगरगोट, भिंतीवर अभ्यास, जनरल नॉलेज व आकर्षक चित्रे काढलेली आहेत.

**लोक सहभाग :-** लोकवर्गणीतून चाररूम बांधल्या. शाळा व्यवस्थापन समिति, पालक संघ, यांनी 4 रूम बांधून दिल्या व बसण्याची आडचण सोडवली. धुर विरहित शालेय पोषण आहारासाठी गॅस शेगडी दिली. लोकवर्गणीतून मुला-मुलीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधले. सर्व मुलासाठी हँडवॉश बांधले. स्पर्धा परीक्षेस पालकांनी बक्षिसे ठेवली,शाळेत मुलांना खेळण्या साठी 5 एकर ग्राऊंड निर्माण करून दिले. फिल्टर पाणी,बोअर,मोटार नळजोडणी करून दिली. परिपाठ साठी ग्रीन शेड निर्मिती, रात्रीची अभ्यासिका चालवणे ,विद्यार्थी गट ,निर्माण केले त्यावर शालेय, व्यवस्थापन समिति सदस्य नेमले,सर्व वर्गात फॅन,लाइट,प्रोजेक्टर टीव्ही बसवले.





**लोकवर्गणीतून हँडवॉश स्टेशन बांधले व धुर विरहित गॅस शेगडी पालकांनी भेट दिली**

**स्व विकास :-** मुख्याध्यापक व शिक्षकांच्या विकासासाठी विविध प्रशिक्षणे उपयुक्त ठरली. ज्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था परभणी यांनी व MEAPA औरंगाबाद यांनी आयोजित केलेले विविध प्रशिक्षण गुणवत्ता वर्धक ठरली .निष्ठा प्रशिक्षण अध्ययन अध्यापनासाठी महत्वाची ठरली अग्लो इंडियन औरंगाबाद यांनी दिलेले इंग्रजी प्रशिक्षण अध्यापनासाठी फायद्याचे ठरले . गटसाधन पाथरी येथील साधन व्यक्तीने दिलेले प्रशिक्षण 1 ली ते 5 वी साठी फायद्याचे ठरले . एनसीआरटी नि दिलेले प्रशिक्षण1 ली ते3री साठी फायद्याचे ठरले. ऑनलाइन नेतृत्व विकास प्रशिक्षण शाळा विकासासाठी फायद्याचे ठरले .

**शाळेची यशोगाथा :-** 2019-2020 मध्ये नवोदय विद्यालयास विद्यार्थिनीची निवड झाली. 2020-2019 मध्ये 5 वी तील1 विद्यार्थी व 8 वी तील 3 विद्यार्थी शिष्यवृती धारक ठरले. 2020-2019 मध्ये शालेय गुणवत्ता जिल्ह्यात द्वितीय वकृत्व स्पर्धेत राज्यात द्वितीय अंकिता गरड पुस्तक परीक्षण 3 विद्यार्थी राज्यात क्रमांक जनरल परीक्षेत 4 विद्यार्थी राज्य यादीत चमकले . एकंदरीत गुणवता वाढली. शाळेला लोकवर्गणीतून ग्राऊंड उपलब्ध करून दिल्याने क्रीडा प्रकारात विद्यार्थी उत्कृष्ट झाले. 2017-2018 मध्ये बोरगव्हाण शाळेचा खो-खो संघ जिल्ह्यात प्रथम आला.

2018-2019 मध्ये खो-खो संघ राज्यस्तरावर गेला 2018-2019 मध्ये रनिंग मध्ये एकनाथ कोकाटे राज्यस्तर राष्ट्रीय स्तरावर गेला. 2019- 2020 मध्ये रनिंग मध्ये 2 मुली 2 मुले विभागस्तरावर गेले. कराटे मध्ये 2 गोल्ड 2 सिल्वर1 कांस्य पदक मिळाले . वकृत्व स्पर्धेत राज्यात प्रथम कु अंकिता शिंदे आली. गायन स्पर्धेत राज्यात प्रथम कु वैष्णवी गिरी आली. विविध स्पर्धेत विद्यार्थी सतत उज्वल यश मिळवतात.




**शाळेचे क्रीडा व सांस्कृतिक विभागात विजेते विद्यार्थी**

शाळा आपल्या शाळेच्या नवा प्रमाणे उज्वल यश मिळवत आहे. व यापुढे ही मिळवत राहील. त्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, सतत प्रयत्नशील आहेत व पुढेही राहतील हे नक्की.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. सूर्यवंशी भारत** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, परभणी. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माळीवाडा, ता.पाथरी, जि.परभणी

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री सुभाष नामदेव चिंचाणे **ई-मेल :-** pb1.maliwada.mieb@gmail.com




**शाळेची इमारत**

**COVID-19 कलावधीत शाळेने राबवलेले उपक्रम:-** Lab in bag उपक्रम, गावात मंदिरात T.V. शासकीय tilimili सारखे कार्यक्रम. Zoom app द्वारे इयत्ता 1 ली ते 8 वी वर्गाचे तास. इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यन्त सर्व वर्गाचे what's app ग्रुप तयार करणे. What's app मार्फत pdf पाठवणे. मुलाचे गट केले. एक गटप्रमुख नेमून त्याच्या मार्फत अभ्यास. Online वेळापत्रक तयार व अमलबजावणी. शाळा लोकवर्गणीतून दर आठवड्याला निर्जंतुकीकरण. Online पालक बैठका, संध्याकाळी प्रोजेक्टरद्वारे रोज एक वर्गाचा अभ्यासक्रम दाखवणे. एका मोबाईलवर 2 ते 3 मुले online. 100% विद्यार्थी उपस्थित. स्वाध्याय पुस्तिका दिल्या. दोन तीन मुलात online प्रमुख नेमला. त्यांच्या मार्फत pdf online तास जॉइन करणे. Zoom app द्वारे वर्गाचे तास, शिक्षक प्रत्येक वार्डात, गटास भेटी व मार्गदर्शन, संध्याकाळी गावातील शिक्षण प्रेमीच्या मदतीने प्रोजेक्टरच्या माध्यमाने रोज तीन वर्गाला शिक्षण.

**शालेय गुणवत्ते साठी प्रशिक्षणे:-** SCERT अभ्यासमाला, निष्ठा प्रशिक्षण, SLDP मिपा, DIET CPD प्रशिक्षण,मुख्याध्यापक प्रबोधन प्रशिक्षण, आठवडा निहाय दिनदर्शिका, या प्रशिक्षणाचा शालेय गुणवत्ता वाढीसाठी लाभ झाला. तसेच शिक्षकांच्या स्व विकासात देखील लाभ झाला.

**शाळेची वैशिष्ट्ये :-** 365 दिवस चालणारी शाळा,रात्रअभ्यासिका चालवणारी शाळा, NMMS परीक्षेत 13 विद्यार्थी धारक करणारी शाळा, MTS ऑलंपियाड परीक्षेत राज्य स्तरावर विद्यार्थी असणारी शाळा, 100% विद्यार्थ्यांना गणवेश देणारी शाळा, विशेष विद्यार्थ्यावर लक्ष देणारी शाळा, विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवणारी शाळा,क्रीडास्पर्धेत राज्यस्तरावर विद्यार्थी आणणारी शाळा, वक्तृत्व स्पर्धा विभाग स्तर (प्रथम पारितोषिक), शिवजयंती निम्मीत्त आयोजित नृत्यस्पर्धेत तीन ठिकाणी प्रथम क्रमांक मिळवणारी शाळा, भौतिक सुविधे सोबत गुणवत्ता सिद्ध करणारी शाळा पाथरी तालुक्यातील एकमेव

शाळा. उदा.गुणवत्ता वाढीसाठी राबवलेले विशेष उपक्रम, डिजीटल शाळा--प्रत्येक वर्ग डिजिटल. हँडवाश सेंटरविद्यार्थी संख्येच्या प्रमाणात उपलब्ध. वृक्षारोपण पुढाकार शालेय परिसरात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन. सामाजिक समस्यावर उदबोधन गावातील प्रत्येक घरात स्वच्छतागृह. दारूबंदी आणि अंधश्रद्धा निर्मुलन इ. विद्यार्थ्यांचे क्रिडा स्पर्धातील यश केंद्र,तालुका,जिल्हा व राज्य स्तरावर विवीध क्रीडा स्पर्धेत नेत्रदिपक यश. शाळेत राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण उपक्रम.



**गुणवत्ता वाढीसाठी राबवलेले विशेष उपक्रम**

**डिजीटल शाळा :-** डिजीटल शाळा करण्यासाठी लोकवर्गणी 2 लाख रुपये गोळा करून त्यातून विद्यार्थ्यांना त्यातून SMART TV  घेण्यात आला. पालकांनी भेट दिलेल्या स्मार्ट टीव्ही सामाजिक समस्यावर उदबोधन करण्यात आले.




**लोकसहभागातून डिजीटल शाळा**

**विद्यार्थ्यांचे क्रिडा स्पर्धातील यश** :- बौद्धिक क्षेत्रातच नाही, तर शारीरिक क्रीडा स्पर्धा मध्येही, अगदी कुस्ती ,कराटे यांसारख्या अवघड खेळातही चि. राहुल मुंजाजी कांबळे या अष्टपैलू गुणवंत विद्यार्थ्याच्या रूपात, शाळेने जिल्हा स्तरापर्यंत चमक दाखवली आहे.



पुण्य नगरी

**राहुल कांबळेची निवड**

**पाथरी** - परभणी येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा माळीवाडाचा विद्यार्थी राहुल मुंजाजी कांबळे हा १४ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रथम आला असून त्याने सुवर्णपदक पटकाविले. त्यामुळे त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यास क्रीडाशिक्षक विजय माळी, गंगाधर चिंचाणे यांचे मार्गदर्श मिळाले आहे. त्याच्या यशाबद्दल मुख्याध्यापक सुभाष चिंचाणे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी यांगीकर आदींनी कौतुक केले.




**शाळेचे क्रीडा स्पर्धेतील यश**

**प्रथम क्रमांकाची हॅट्रिक:-** दि. 24/01/2019 रोजी दिव्यांग मुलांच्या जिल्हास्थरिय क्रीडा स्पर्धेत भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळेच्या इयत्ता 2री च्या अनिकेत लिंबाजी चिंचाणे या विद्यार्थ्याने तीन प्रथम क्रमांक मिळवून विजयाची परंपरा कायम ठेवली. या विद्यार्थ्याला दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालक मेळाव्यात प्रमाणपत्र मिळाले. भविष्यात नोकरीसाठी ही या गुणांची खेळाडू म्हणून नोंद घेतली जाते.










**दिव्यांग विद्यार्थ्यास विजेते पदाचा तिहेरी मुकुट**

**गणित उपक्रम:-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळीवाडा येथे गणित विषयाची विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हावी तसेच स्पर्धापरीक्षेची तयारी व्हावी यासाठी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची रविवारी गणित विषयाची चाचणी घेतली जाते. या चाचणीमध्ये प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक काढून विद्यार्थ्यांना बक्षीस दिले जाते. त्यामुळे प्रत्यक्ष गणिताची कृती करताना कोणत्या चुका होतात, हे विद्यार्थ्याला समजते झालेल्या चुका नुसार विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते. गणित चाचणी मध्ये अध्ययन निष्पत्ती वर आधारित देखील प्रश्नांचा समावेश केला जातो.गणित विषयाचे अध्ययन अध्यापन करताना प्रत्यक्ष व्यवहाराशी सांगड घातली जाते. तसेच व्यवहारांमध्ये गणिताचा वापर कशा पद्धतीने होतो याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना देण्यात येतो. गणितातील संकल्पना व संबोध स्पष्ट करण्यासाठी गणित पेटीतील साहित्याची देखील मदत घेतली

जाते.शाळेमध्ये गणित विषयातील प्रगतशील विद्यार्थ्यांसाठी गणित विषय मित्राची नेमणूक करण्यात आलेली आहे. गणित विषय मित्र व विद्यार्थी यांच्या मधील होणाऱ्या आंतरक्रिया मुळे गणितातील संबोध अधिक स्पष्ट होऊ लागले आहेत. शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शन बरोबर गणित जत्रेचे आयोजन करण्यात येते त्यामुळे गणित विषय विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबर आनंदही देऊन जात आहे.

**विज्ञान प्रयोगशाळा**:- शाळेत अद्ययावत प्रयोगशाळा आहे मुले त्यांच्या आवडीनुसार प्रयोग करतात व शिक्षक माहिती देतात.



**शाळेची सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा**

**भाषा उपक्रम:-** भाषा उपक्रमात सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेतली जाते. मराठी भाषा दिनानिमित्त प्रश्नमंजुषा घेतली जाते. तसेच वक्तृत्व स्पर्धा घेतली जाते. त्याचाच परिणाम म्हणजे श्रेया अवचार नावाची विद्यार्थीनी वक्तृत्व स्पर्धे मध्ये विभाग स्तरावर प्रथम आली. तसेच वक्तृत्व स्पर्धेच्या क्षितीजावरही शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांनी तालुका, जिल्हा पातळीवर माळीवाड्यचं नाव रोशन केलं आहे.

**शाळेसाठी ग्रंथालय :-** शाळेसाठी भव्य ग्रंथालय असावे अशी संकल्पना तीला सत्यात उतरवण्यासाठी सतत चार दिवस शिक्षकांनी स्वत: कलरिंग केले व त्याला भक्कम पाठिंबा दिला. एखाद्या अनुदानित ग्रंथालयाला लाजवेल असे ग्रंथालय उभा केले.अश्या सुसज्ज ग्रंथालयाचे उद्घाटन आपल्या जि. प. परभणी च्या प्राथमिक शिक्षण अधिकारी आदरणीय पाटेकर मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले



**जि.प परभणी च्या प्राथमिक शिक्षण अधिकारी आदरणीय पाटेकर मॅडम ग्रंथालयाचे उद्घाटन करताना**

**शाळेची यशोगाथा :-** शाळेत जे अनेक उपक्रम घेतले जातात, त्यापैकी काही उल्लेखनीय व स्तुत्य उपक्रम म्हणजे अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीयस्तरीय स्पर्धा परीक्षांचे यशस्वी आयोजन. या अनुषंगाने दरवर्षी विद्यार्थ्यांना असंख्य स्पर्धा परीक्षांना बसवून त्यांचा उत्तम प्रकारे सराव घेऊन, सहजसोप्या TRICKS चा भरणा करून , मुलांत आत्मविश्वास व परिश्रमांचं बाळकडू पाजलं जातं. त्यांची स्पर्धा परीक्षांची भीती पूर्णपणे घालवून ,त्यांना जास्तीतजास्त ज्ञानामृताचं विद्याधन दिलं जातं.....! गेल्यावर्षी NAVODAY 2019 च्या परीक्षेत इयत्ता 5 वी च्या चि . संस्कार नीलकंठ चव्हाण या विद्यार्थिनीने शिष्यवृत्ती धारण करून शाळेचे नाव उंचावले. 2020 मध्ये नवोदय परीक्षेत माळीवाडा शाळेचे दोन विद्यार्थी नवोदय विद्यालयासाठी पात्र झाले आहेत. मागच्यावर्षी NMMS परीक्षेत मनोज डहाळे 8 वी च्या मुलांने तर शिष्यवृत्ती मिळवून नवा इतिहासच रचला. यावर्षी NMMS परीक्षेत 13 मुलांनी तर शिष्यवृत्ती मिळवून नवा इतिहासच रचला आणि शाळेला गुणवत्तेची एक उंची प्राप्त करून दिली. 6 वी तील विद्यार्थिनी कु. मोहिनी राजेश डहाळे हीने RTSE 2019 या परिक्षेत राज्यात सर्वप्रथम येण्याचा विक्रम केला नि शाळेला राज्यपातळीवर नेऊन ठेवलं. याहीवर्षी RTSE 2020 मध्ये, राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाची माळीवाड्याची विजयीपताका अबादीत राखण्याचं धारिष्ट्य दाखवून, माळीवाडा शाळेची गुणवत्ता अस्मानाला भिडवण्याचं सामर्थ्य लीलया पेललं ...ते आमच्याच शाळेतील इयत्ता 2 री तील कु. प्रांजल प्रेमनाथ डोंगरे या LITTLE CHAMP ने...... ITS श्रेया 2019 परीक्षेत, इयत्ता पहिलीच्या 7 चिमुरड्यानी राज्यस्तरावर प्रथम येण्याचा मान मिळवून गुणवत्तेचा नवा अध्यायच जणू सुरू केला होता.

**रात्र अभ्यासिका आयोजन:-** आपल्या शाळेतील, गावातील, प्रत्येक गल्लीतील मुलांनी, संध्याकाळी 7 ते 9 दरम्यान TV न पाहता ,एकत्र येऊन वाचन केल्यास वेळेचा सदुपयोग होऊन, मुलांचं भविष्याला आकार येईल. केवळ याच निरपेक्ष भावनेनं शाळेतील शिक्षकांनी आपला बहुमोल वेळ देऊन व पालकांचे शैक्षणिक प्रबोधन घडवून आणले. मागील जुन ते डिसेंबर पर्यंत, जवळपास 25 रात्रशाळांचे यशस्वीरीत्या आयोजन केले होते. की ज्याचा आदर्श घेऊनच अखिल जिल्ह्यात नंतर या रात्रशाळांचा सर्वत्र बोलबाला झाला. हे ही अभिमानस्पदच म्हणावं लागेल...!!

कृतीयुक्त व आनंददायी अध्ययन अनुभव, असंख्य उपक्रमांचे आयोजन आदरणीय मुख्यध्यापक, शिक्षकवृंद, SMC अध्यक्ष व संपुर्ण टीम द्वारे केले जाते. शालेय समिती व गावातील संस्थेच्या माध्यमातून, 2 शिक्षकांना कामाची पावती म्हणून दरवर्षी महात्मा फुले आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार दिला जातो. हेही अवर्णनीयच ..!!
अधिक महितीसाठी शाळेच्या ब्लॉग ची लिंक --https://zppsmaliwadapathri.blogspot.com/p/video-gallary_5.html
शिक्षण विभाग जिल्हा परिषद परभणी आयोजित facebook live कार्यक्रम लिंक https://youtu.be/v3odjw7KKIE

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. सूर्यवंशी भारत** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, परभणी. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विठ्ठलवाडी, ता.दौंड, जि.पुणे

**मुख्याध्यापकाचे नाव :–** श्री.दत्तात्रय प्रभाकर दिवेकर **ई-मेल :–** dattatraydivekar41@gmail.com



**शाळेचा परिसर**

शासनाच्या धोरणानुसार जेथे वस्ती तेथे शाळांची निर्मिती करण्यात आली. प्रत्येक मूल शाळेत आहे पाहिजे, शाळेत टिकले पाहिजे आणि शिकले पाहिजे, असा उदात्त हेतू या पाठीमागे होता. त्यानुसार महाराष्ट्रभर वाडी-वस्तीवर शाळांची निर्मिती केली गेली. एक शिक्षकी शाळांवर कमीतकमी दोन शिक्षक नेमले गेले. सर्व शिक्षा अभियानांतर्गत सुसज्ज इमारती उभारल्या गेल्या आणि विविध प्रयत्नांमधून शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्याचे प्रयत्न चालू झाले. आमची शाळा ही एका उजाड माळरानावर वसली होती. शाळेत पाहिजे अशा कोणत्याही विशेष सुविधाही नव्हत्या. हे सर्व पाहिल्यावर आमचीही शाळा आम्ही समृद्ध करण्याचे ठरवले. कोणत्याही पालकाला आपला पाल्य गुणवंत घडावा असे वाटते. तो त्याप्रमाणे त्याला योग्य शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करत असतो. शाळेत गुणवत्ता असेल तर पालक आपले पाल्य शाळेत नक्कीच दाखल करतील आणि असे गुणवंत विद्यार्थी घडवून पालकांचा विश्वास जिंकण्याचे आम्ही ठरवले. त्या जिंकलेल्या विश्वासाच्या बळावर सर्व सुविधांयुक्त शाळेची निर्मिती करून एक समृद्ध शाळा घडवण्याचा संकल्प केला.


**शाळेचा विकास :-** शाळेचा विकस करताना जी उद्दिष्टे डोळ्या समोर होती, त्यात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणे, यासाठी विद्यार्थ्यांना वेगगेगळ्या संधी निर्माण करणे, जिल्हा परिषद शाळांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलणे, या लोकांच्या बदललेल्या सकारात्मक दृष्टीकोनामधून शाळेचा पट वाढवणे. बदललेल्या दृष्टीकोनातून या सर्व नागरिकांचा शाळेतील लोकसहभाग वाढवून सर्वांग सुंदर अशी समृद्ध शाळा घडवणे. आम्ही केलेल्या प्रयत्नांमुळे शाळेत सकारात्मक बदल दिसू लागले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीत खूप सुधारणा झाली. त्यामुळे वाडीबाहेरील विद्यार्थीही शाळेत दाखल होऊ लागले. विविध स्पर्धांमध्ये जिल्ह्यात सर्वांत जास्त बक्षिसे विठ्ठलवाडी शाळेस मिळाली. ग्रामस्थांचा लोकसहभाग खूप वाढला. विविध उपक्रम आणि कार्यक्रमाची माहिती वर्तमानपत्र व सोशल मिडीयाच्या माध्यमातून इतरांपर्यंत पोचली. अनेकांनी आपल्या गावातील शाळा विठ्ठलवाडी प्रमाने घडवण्याचे प्रयत्न चालू केले.आपल्या वाडीचे नाव महाराष्ट्रभर पोचत आहे, याचा आनंद ग्रामस्थांना वाटत होता. या सकारात्मक दृष्टिकोनाचा वापर आम्ही समृद्ध शाळा निर्माण करण्यासाठी केला. उपक्रम राबवताना काही अडचणीही आल्या. वीटभट्टी कामगार स्थलांतर करत. त्यांच्या शिक्षणासाठी स्थलांतर

रोखणे गरजेचे होते. त्यांना मुलांच्या शिक्षणासाठी वीटभट्टीचा हंगाम संपल्यानंतरही वाडीतच राहण्याचे महत्व समजून सांगितले. हे पालकही शेतीचे काम करणे,इतर कामे करणे यावर आपली उपजीविका करत वाडीतच थांबले.

**मुख्याध्यापक व शिक्षक स्वविकास :-** आमची शाळा ही द्विशिक्षकी शाळा आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक अशा बाबींचा अभ्यास केला. व्हिडिओ निर्मिती कशी करावी, कॉम्प्युटरचा वापर कसा करावा, वादन कला, इतर कला शिक्षकांनी स्वतः शिकल्या. त्यामुळे या शिकलेल्या विविध गोष्टींचा विद्यार्थ्यांसाठी उपयोग करण्यात आला. वाबळेवाडी, कार्डेलवाडी, शिवनगर, कराड नगरपालिका शाळा क्र.३ या महाराष्ट्रातील आदर्श शाळांना भेटी देऊन त्या शाळांचा अभ्यास केला. शाळेच्या प्रगतीसाठी आवश्यक गोष्टींचा विचार करून त्यानुसार कार्यवाही करण्यात आली.

**अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील बदल:–**आम्ही शाळा दररोज एक तास आधी भरवू लागलो. या अतिरीक्त कालावधीचा उपयोग विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करणे, अध्यापन करणे, अभ्यासाचे विविध उपक्रम राबवण्यासाठी करण्यात आला. इंग्रजी साठी स्पेलिंग पाठांतर, संवाद, प्रश्नोत्तरे सराव, सुंदर हस्ताक्षर आदि उपक्रम राबवण्यात आले. नियमितपणे स्पेलिंग पाठांतर,वाचनाचा सराव घेण्यात आला.या मुळे विद्यार्थी इंग्रजी विषयात परिपूर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच ग्रामस्थांचा शाळेतील सहभाग वाढवण्यासाठी शाळेत अनेक सहशालेय उपक्रम आयोजित केले गेले. विद्यार्थ्यांना स्वअभिव्यक्तीसाठी संधी मिळू लागली. ते शाळेत रमू लागले. त्यांना शाळेची गोडी निर्माण झाली. ग्रामस्थांना शाळेत बदल दिसू लागला. शाळेतील विविध उपक्रम आणि कार्यक्रमाचे व्हिडिओ आपणास यु-टयूब वर पहावयास मिळतील.

**सांस्कृतिक कार्यक्रम :-** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेत विविध कार्यक्रमांतून संधी देण्यात आली. नृत्य, नाट्य, गायन, वादन इ. कलागुणांसाठी शाळेत १५ऑगस्ट, २६ जानेवारी, प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले.या निमित्तानेही ग्रामस्त व पालकांचा शाळेतील सहभाग वाढला.



**रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी**

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर त्यांच्या अंगी असलेल्या इतर गुणांचा विकासही त्यांच्या सर्वांगिण विकासात महत्वाचा असतो. त्यासाठी वेगवेगळया स्पर्धातील सहभागही महत्वाचा आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती आयोजित स्पर्धा, तसेच लेझीम स्पर्धेसाठी ढोल ताशा वाजवायला शिकवणे,भजन, नृत्य आदी स्पर्धांची तयारी शाळेत नियमितपणे सुरु होती. त्यानंतर झालेल्या नृत्य, नाट्य, लेझीम, भजन, वक्तृत्व, मराठी अध्ययन समृद्धी स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये तालुका आणि जिल्हास्तरीय मिळून एकूण १२ बक्षिसे मिळवली. लोकनृत्यास जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला. शाळेतील ७६ विद्यार्थ्यांपैकी ६० विद्यार्थी या स्पर्धांत सहभागी झाले. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना आपले कलागुण दाखवण्याची संधी उपलब्ध झाली.




**तालुका आणि जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये विजयी स्पर्धक**

**शाळा विकासात शिक्षक पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती, पालक सहभाग :-** विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पालक-शिक्षक संवाद साधण्यात आला. विद्यार्थ्यांच्या अभ्यासामधील अडचणी, प्रगतीमधील समाधानकारक बाबी, विद्यार्थ्यांच्या समस्या याबाबत पालकांबरोबर चर्चा करण्यात आली. याचा विद्यार्थ्यांच्या प्रगतीत खूप फायदा झाला. पालकांचा शाळेतील शिक्षकांवरील विश्वास वाढला. शाळेत समाज जागृतीपर उपक्रम आयोजित करण्यात आले. जागतिक कन्या दिन, महिला दिन, साक्षरता दिन, स्वच्छ भारत अभियान, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, तंबाखू मुक्ती अशा विविध उपक्रमांतून समाजाशी एकरूप होण्याचा शाळेने प्रयत्न केला. या विविध उपक्रमांमुळे ग्रामस्थ आणि शाळा यांचे एक नाते तयार झाले. " शाळेला वाडीचा आधार - वाडीला शाळेचा अभिमान " असे नाते निर्माण करण्यात आम्ही यशस्वी ठरलो.



**शाळेतील विविध कार्यक्रमात पालकांची तुडूंब गर्दी**

**लोकसहभागातून समृद्ध शाळा :–** बदललेल्या सकारात्मक दृष्टीकोनातून या सर्व नागरिकांचा शाळेतील लोकसहभाग वाढवून सर्वांगसुंदर अशी समृद्ध शाळा घडली. ग्रामस्थांच्या शाळेवरील विश्वासाचा उपयोग आम्ही शाळेत विविध भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी केला. लोकसहभागातून शाळेस तसेच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची माहिती आम्ही सर्वासमोर ठेवली. त्यानुसार वाडीतील अनेकांनी रोख रक्कम तसेच आवश्यक वस्तू शाळेस दिल्या. सुमारे ७ लाख रुपयांचा निधी छोट्याशा वाडीत उभा राहिला. या रकमेतून प्रवेशद्वार, कलामंच, वॉटरफिल्टर, शाळा परिसर सुशोभीकरण, बोलक्या भिंती, प्रोजेक्टर, प्रिंटर,साउंड सिस्टीम, खेळाचे साहित्य, विविध पुस्तके, वृक्षारोपण विविध स्पर्धांसाठी साहित्य आदी भौतिक सुविधा लोकसहभागातून शाळेत निर्माण करण्यात आल्या. शाळा सर्व बाबतीत समृद्ध झाली. वाडीतील बहुसंख्य लोक हे शेतकरी आहेत. त्यामुळे "एका उजाड माळरानावर शेतकऱ्यांच्या सहकार्यातून उभी राहिलेली आदर्श शाळा " अशी या शाळेची ओळख आम्ही सर्वांपुढे मांडली. अशा सहकार्यातून उभी राहिलेली " स्वच्छ शाळा-सुंदर शाळा पाहून " काही कंपन्या, संस्था, क्लबनेही शाळेस सहकार्य केले. या सहकार्यातून शाळेत बाह्य रंगरंगोटी, बालोद्यानासाठी खेळाचे साहित्य, सुसज्य शौचालय, सौर पॅनेल, हँडवॉश स्टेशन, डिजिटल क्लासरूम साठी टीव्हीसंच आदी गोष्टींची पूर्तता झाली. अशाप्रकारे मिळालेल्या मदतीतून " समृध्द शाळा " उभी राहिली. पंचायत समिती दौंड याच्या वतीने आदर्श शाळा म्हणून देण्यात येणारा पहिला " सभापती चषक " पुरस्कार विठ्ठलवाडी शाळेस देण्यात आला .

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर :-** लोकसहभाग तसेच कंपन्यांचा सी.एस.आर.फंड, ग्रामपंचायत निधी या मधून शाळेत प्रोजेक्टर, कॉम्पुटर, प्रिंटर, साउंड सिस्टीम आदी विद्यार्थी उपयोगी भौतिक सुविधा उभारण्यात आल्या. या सुविधांचा उपयोग अध्ययनासाठी करण्यात येतो. या कोरोना कालावधीत सुमारे ३०० शैक्षणिक व्हिडिओ तयार केले. या सर्व व्हिडिओंचा उपयोग विद्यार्थ्यांना झाला आणि यापुढेही होईल .

**शाळेची यशोगाथा:- स्वच्छ भारत अभियानाच्या उपक्रमाची दखल देशपातळीवर** ऑक्टोबर २०१७ रोजी शाळेत स्वच्छ भारत अभियानांतर्गत विविध उपक्रम घेण्यात आले. त्यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेला स्वच्छ भारत अभियानाचा लोगो मोदींच्या फोटो मध्ये दिल्ली येथे संसदेमध्ये प्रदर्शित झाला. विठ्ठलवाडी शाळेचा झेंडा दिल्लीत फडकला. त्यावेळी या उपक्रमाचे फोटो, व्हिडिओ व लेख केंद्र सरकारच्या ब्लॉग वर तसेच महाराष्ट्र सरकारच्या पोर्टलवरही झळकले. युवराज

घोगरे यांच्या या कार्याचे कौतुक महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट करून केले. पुणे जिल्हा परिषदेनेही २०१८ मध्ये या शाळेच्या स्वच्छतेविषयीच्या कार्यास प्रसिद्धी दिली. यशाप्रकारे विठ्ठलवाडी शाळा स्वच्छ शाळा-सुंदर शाळा म्हणून नावाजली गेली.




**स्वच्छ भारत अभियानाचा लोगो मोदींच्या फोटो मध्ये दिल्ली येथे संसदेमध्ये प्रदर्शित**

**महाराष्ट्र सरकारकडून "शाळेची यशोगाथ" तयार** लोकसहभागातून उभी राहिलेल्या या शाळेची दखल महाराष्ट्र सरकारनेही घेतली. सरकारच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने मंत्रालयातील स्टुडिओमध्ये याशाळेच्या यशोगाथेची क्लिप चित्रीत केली. अशाप्रकारे सरकारने या शाळेचा गौरव केला.

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये सहभाग** युवराज घोगरे यांनी या शाळेच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल म्हणून महाराष्ट्र सरकारने १५ जून २०१८ रोजी देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांच्या व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये सहभागी होण्याची सुवर्णसंधी त्यांना दिली. **शाळेसाठी मंदिराचे काम बंद** शाळेसमोर एक मंदिर आहे. त्याचे काम २०१५ पासून सुरू होते. परंतु जानेवारी २०१७ पासून गावकऱ्यांनी शाळेच्या विकासाचे ध्येय समोर ठेवले. तेव्हापासून या मंदिराचे काम बंद आहे. अशाप्रकारे शाळारूपी ज्ञानमंदिरे घडवण्याचा ध्यास विठ्ठलवाडीतील ग्रामस्थांनी घेतला. **ग्रीन आर्मीची स्थापना** शाळेत २०१० पासून सुमारे १५ हजार रुपयांची झाडे लावली. शाळेत सद्ध्या वेगवेगळया प्रकारची ११७ झाडे आहेत. झाडे लावूया-झाडे जगवूया या संकल्पनेनुसार प्रत्यक्ष कृतीतून वृक्षारोपणाचा संदेश देण्यात आला. शाळेतील या सर्व झाडांची निगा राखण्यासाठी शाळेत "ग्रीन आर्मीची स्थापना " करण्यात आली. या विविध वृक्षांमुळे शालेय आवारात नेहमी पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येतो. दौंड मधिल 'एक मित्र -एक वृक्ष' या गृपच्या वतीनेही शाळा वृक्षारोपणाच्या कार्यात आपले योगदान दिले आहे. **नेत्रदानाचा संकल्प** जागतिक नेत्रदानाचे औचित्य साधून शाळा व प्रशांत मुथा यांच्या 'एक मित्र-एक वृक्ष' या गृपच्या संयुक्त विद्यमाने शाळेत नेत्रदान जागृती अभियान राबवण्यात आले. या वेळी वाडीतील ९७ लोकांनी नेत्रदान करण्याचा संकल्प केला.

**तंबाखुमुक्तीच्या उपक्रमाबाबत महाराष्ट्ररत्न आणि महाराष्ट्रभूषण** सलाम मुंबई फाउंडेशन आणि महाराष्ट्र सरकार याच्या वतीने शाळेत तम्बाखुमुक्तीसाठी “एक पत्र व्यसनमुक्तीसाठी” हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी पालकांच्या यशस्वी तम्बाखुमुक्ती साठी प्रयत्न केले. त्याबद्दल सलाम मुंबई फाउंडेशन आणि महाराष्ट्र सरकारच्या वतीने शाळेतील ११ विद्यार्थ्यांना “महाराष्ट्र भूषण” व शिक्षक युवराज घोगरे यांना “महाराष्ट्ररत्न” प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले .




**पंचायत समिती दौडच्यावतीने सभापती चषक पुरस्कार – २०१९**

अशाप्रकारे **“गुणवत्तेतून शाळेच्या समृद्धीकडे”** या मार्गाचा वापर करून, लोकसहभागातून एक समृद्ध शाळा उभी राहिली. विठ्ठलवाडी शाळा एक आदर्श शाळा म्हणून महाराष्ट्रभर ओळखली जाऊ लागली आहे. दिवसेंदिवस शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख वाढत होता. विविध स्पर्धांमध्ये शाळेने नेत्रदीपक यश मिळवले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी शाळेचे ट्वीट द्वारे कौतुक केले होते. स्वच्छ भारत अभियानाच्या निमित्ताने दिल्ली पर्यंत शाळेचे नाव गेले होते. केंद्र सरकारच्या ब्लॉगवर आणि महाराष्ट्र सरकारच्या पोर्टलवर शाळेचे लेख, फोटो, व्हिडिओ प्रसिद्ध झाले होते. शाळेच्या परिसराचा व्हिडिओ फेसबूकवर १२ हजार लोकांनी share केला. सुमारे ३० लाख लोकांनी पाहिला. “स्वच्छ शाळा-सुंदर शाळा” म्हणून विठ्ठलवाडी शाळा आता ओळखली जाऊ लागली.


| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. प्रभाकर बुधाराम** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, पुणे. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## छत्रपती शाहू महाराज माध्यमिक विद्यालय, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड

**मुख्याध्यापकाचे नांव: -** श्री.पाटील मोहन चिंधू **ई-मेल:-** mohanpatill1234@gmail.com




**शाळेची भव्य इमारत**

**शाळा विकास :-** खोपोली नगरपरिषद माध्यमिक विभाग संचलित छत्रपती शाहू महाराज माध्यमिक विद्यालय, खोपोली या विद्यालयात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण मिळावे, शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये या उदात्त हेतूने खोपोली नगरपरिषदेच्या सहाय्याने प्रयत्न केले जातात. या विद्यालयाने गेल्या 28 वर्षात शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रिडा क्षेत्रात चांगले योगदान दिले आहे. सन 1991 मध्ये इ.5 व इ. 8वी चे वर्ग सुरू झाले. त्यावेळी विद्यार्थी संख्या 90 एवढी होती. मात्र 15 वर्षात विद्यालयाने इ.5वी ते इ.10वी चे एक हजाराहून अधिक विद्यार्थी संख्या वाढविली. असे असले तरी पटसंख्या वाढविण्यासाठी प्रामुख्याने शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबरच भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**विद्यार्थी विकास :-** विद्यालयाने गेल्या 28 वर्षात शैक्षणिक सांस्कृतिक सामाजिक क्रिडा विज्ञान असे विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे. त्याचबरोबर केंद्रशासनाच्या आंतरराष्ट्रीय योगदिन, स्वच्छ भारत अभियान, राज्य शासनाच्या पल्स पोलिओ, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान, ध्वजदिन, निधी संकलन, या सारखे उपक्रमही यशस्वीपणे राबविले आहेत. विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासाबरोबरच अनेक प्रकारच्या सहशालेय उपक्रमाचे आयोजन करण्यांत येते. यामध्ये स्काउट आणि गाईड, पर्यावरण मंडळ, ग्राहक क्लब, हरित सेना, व्यावसाय शिक्षण, संगणक शिक्षण, वाचन प्रेरणा दिवस, बालमेळावा अभ्यासजत्रा, विविध स्पर्धा मार्गदर्शन अश्या विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय, राज्य पातळीवर अनेक पारितोषिके प्राप्त केली आहेत.या विद्यालयाचा विद्यार्थी शालांत प्रमाणपत्र परिक्षेत मराठी माध्यमात खालापूर तालुक्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे, ही विशेष उल्लेखनिय बाब आहे. विद्यालयात इ लर्निंगची सुविधा, स्पर्धा परिक्षांसाठी मार्गदर्शन केले जाते.

**स्व विकासासाठी प्रशिक्षणे :-** मुख्याध्यापक व शिक्षकांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी वेगवेगळया शैक्षणिक प्रशिक्षणाचा उपयोग अध्ययन अध्यापनात बदल घडवुन आणला. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले. त्यांना वेगवेगळया उपक्रमात सहभाग घेण्यास सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांनं मध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ झाली.

**शिक्षक पालक संघ व शाळा व्यवस्थापन समिती :-** शाळेत शिक्षक-पालक संघाची स्थापना केली आहे. प्रत्येक महिन्याला शिक्षक-पालक संघाची सभा होते. या मध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेतला जातो. पालकांच्या समस्या व सूचनांचे पालन केले जाते. शाळेसमोर येणा-या समस्या त्यांना सांगितल्या जातात. यातून समन्वय साधून व पालकांचा सहभाग घेवून शाळेचा विकास साधला जातो. काही पालक जे विद्यार्थी गरीब आहेत. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. अशा विद्यार्थ्यांचे पालकत्व घेतात. त्यांना वर्षभर मदत करतात. या शिवाय शाळेत अद्ययावत कंप्यूटर लॅब, अद्ययावत प्रयोगशाळा, वाचनालय, स्टडी रूम, तसेच अभ्यास कोपरा निर्माण करोसाठी व डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे मोठया प्रमाणात सहकार्य मिळते.

**लोकसहभाग :-** 26 जून 2018 पाउलवाट मैत्रिची या संस्थेमार्फत शाळेतील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यांत आले. इ.9वी व इ.10वी 23 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 1 डझन वहयांचे वितरण करण्यांत आले. इ.10वी च्या पाच विद्यार्थ्यांना पाठयपुस्तकांचे पुर्ण सेटचे वितरण करण्यांत आले. 17 जून 2019 - शाळेतील इ.5वी ते इ.8वी च्या विद्यार्थ्यांना सर्व मुली व एस.सी, एस.टी मुले यांना मोफत गणवेश वाटप मा.सभापती यांचे हस्ते सर्वशिक्षा अभियानांतर्गत करण्यांत आले. या व्यतिरिक्त जे विद्यार्थी गणवेश व शैक्षणिक साहित्यापासून वंचित रहात होते अश्या विद्यार्थ्यांना आमच्या प्रयत्नातून नगरपरिषदेस विनंती करून इ.5वी ते इ. 8वी चे उर्वरीत विद्यार्थी व इ. 9वी व इ.10वी चे सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाची व शैक्षणिक साहित्याची तरतूद करून, नगरपरिषदेकडून वाटप करण्यांत आले. त्याचप्रमाणे नगरपरिषदे मार्फत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत दप्तरही वाटप करण्यांत आले.



**शालेय गणवेष व शैक्षणिक साहित्याचे वाटप करतांना मान्यवर.**

तसेच वेगवेगळया सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून शाळेसाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता करून घेतली. रोटरी क्लब व लायन्स क्लब या संस्थानी शाळेच्या विकासासाठी सहकार्य व मदत केली .

**Student police cadet program:-** दिनांक 8 जूलै 2019 रोजी विद्यालयामध्ये student police cadet program म्हणजेच SPC ची स्थापना करण्यांत आली. विद्यार्थ्यांनी समाजामध्ये कसे आचरण असावे, कसे वागावे व त्यांना

स्वयंशिस्तीचे धडे व  इतरांना मदत करण्याची वृत्ती वृध्दींगत करण्यासाठी या युनिटची स्थापना करण्यांत आली. या प्रसंगी जिल्हा समन्वयक खालापूर तालूक्याचे पोलिस उपविभागीय अधिकारी, खोपोलीचे पोलिस निरिक्षक, पत्रकार मंडळी, शाळेचे शिक्षक, व शिक्षकेत्तर कर्मचारी,  व या युनिटमधील  50 student police cadet उपस्थित होते.




**Student police cadet program च्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित असलेले मान्यवर**

**शालेय परिसरात औषधी वनस्पतींची लागवड:-** शाळेच्या मुख्य इमारतीच्या परिसरात काही मोकळी जागा होती. लोकसहभागातून या जागेचे सपाटीकरन करून घेतले. त्याचबरोबर माती टाकून घेतली. या जागेत नगरपरिषदेच्या माध्यमातून मिळणारे गांडूळ खत  मिसळून बगिचा तयार करण्यांत आला. या जागेमध्ये आयुर्वेदिक औषधी वनस्पती गवतीचहा, तुळस, हिरडा, शेवगा, सदाफुली, जास्वंद पानफुटी, आवळा, शतावरी पिंपळी काळी हळद अडूळसा  कडूनिंब त्याचबरोबर  फणस, केळी, अननस पेरू,पपई,डाळींब अंबा,शेवगा, रताळी या सारख्या फळ व भाज्यांची  लागवड विद्यार्थ्यांच्या मदतीने करण्यांत आली. यामुळे रिकाम्या जागेचा योग्य वापर होवू लागला. औषधी वनस्पतींची विद्यार्थ्यांना ओळख होवू लागली. यातील काही वनस्पतींचा  विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी प्रत्यक्ष उपयोग होण्यात मदत झाली. सदर बगिच्यामध्ये 27 नक्षत्रांवर आधारित वनस्पतींची लागवड करणेचा मानस आहे.




**शालेय परिसरात औषधी वनस्पती लागवड**

**वैद्यकीय उपचार व आरोग्य तपासणी:-** नगरपरिषदेमार्फत सर्व विद्यार्थ्यांना मोफत जंतावरील गोळ्यांचे वाटप करण्यांत आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यासाठी खोपोली नगरपरिषद आरोग्य अधिकारी तसेच महालॅब चे प्रमुख यांचे मार्फत ब्लड सॅम्पल घेण्यांत आले. हिमाग्लोबिन तपासणी इ. 5वी ते इ.10वी च्या सर्व विद्यार्थ्यांची करण्यात आली. दंत आरोग्य ,कान, डोळ इ. ची तपासणी करण्यांत आली.

**तंत्रशिक्षण :-** राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांनमध्ये विविध प्रकारची कौशल्य विकसित करण्यांसाठी विद्यालयामध्ये ऑटोमोबाईल व रिटेल या विषयांचे अध्यापन इ.9वी व इ.10वी च्या विद्यार्थ्यांना करण्यांत येते.




**ऑटोमोबाईलचे प्रात्यक्षिक करताना विद्यार्थी**

**विज्ञान प्रदर्शन व विज्ञान मेळावा :-** दिनांक 2 जानेवारी 2018 रोजी विद्यालयात अपूर्व विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यांत आले होते. विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या संकल्पना अधिक स्पष्ट व्हाव्यात. प्रयोगशिलता निर्माण व्हावी. प्रयोग त्यांनी स्वतः करावेत. विज्ञानाची गोडी वाढावी यासाठी विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यांत आले होते. या निमित्ताने विज्ञान रांगोळी, निबंध स्पर्धा, विद्यार्थी प्रयोग मांडणी यांचे आयोजन करणेत आले होते. व त्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितिय,तृतिय क्रमांक काढून त्यांना प्रोत्साहन मिळावे या साठी बक्षिसे दिली. त्याचप्रमाणे प्रत्येक वर्षी 28 फेब्रवारी हा दिवस विज्ञानदिन म्हणून साजरा करण्यांत येतो. दिनांक 31 जानेवारी 20 ते 2 फेब्रुवारी 2020 रोजी रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांचे मार्फत घेण्यांत आलेल्या जिल्हा विज्ञान प्रदर्शनात या शाळेतील विद्यार्थ्यांना विज्ञान प्रदर्शनात आधूनिक शेती अवजार या प्रतिकृतीस द्वितिय क्रमांक, निबंध स्पर्धेत तृतिय क्रमांक प्राप्त झाला असून त्या प्रकल्पाची राज्यस्तरावर निवड झाली आहे. तसेच दि. 24 फेब्रवारी 2020 ते 27 फेब्रवारी 2020 रोजी आत्मामालिक माध्यमिक व उच्च माध्यमिक गुरूकुल कोकमठाण ता.कोपरगांव जि.अहमदनगर येथे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रतिकृती सहभाग नोंदविला.






**राज्य स्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभाग**

**विविध स्पर्धांतील यश** :- दिनांक 7 फेब्रवारी 2020 डैडम् विकास संस्था मुंबई, सुक्ष्म लघु और माध्यम उदयम मंत्रालय भारत सरकार यांचेकडून निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यांत आले होते. या स्पर्धेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता या स्पर्धेत कु.लक्ष्मी संजय देवकर या विद्यार्थीनीचा चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून तीला रू 10000/- रोख बक्षीस प्राप्त झाले आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल रायगड यांचे मार्फत सन 2019-20 या शैक्षणिक वर्षात विद्यालयामध्ये विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यांत आले होते. यामध्ये कु.दिपाली दशरथ ठिकडे या विद्यार्थिनीस उच्च प्राथमिक गटामध्ये वादविवाद स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. राज्यस्तरावर घेण्यांत आलेल्या इतिहास प्रज्ञाशोध परिक्षेत या विद्यालयातील विद्यार्थीनी कृ.साक्षी घाणेकर व कु लक्ष्मी जांगळे या विद्यार्थीनींचा अनुक्रमे द्वितिय व तृतिय क्रमांक प्राप्त झाला आहे. कै.वसंतराव कुंटे स्मृति प्रीत्यर्थ चित्रकला व काव्यलेखन स्पर्धा घेतल्या जातात. सन 2018-19 या शैक्षणिक वर्षात काव्यलेखन स्पर्धेत कु.तेजश्री चंद्रकांत शेजवळ व कु.पल्लवी राजेंद्र क्षिरसागर या विद्यार्थीनिंचा प्रथम व द्वितिय क्रमांक आला. तसेच सन 2019-20 या शैक्षणिक वर्षात घेण्यांत आलेल्या चित्रकला स्पर्धेमध्ये कु.राहूल जोगिंदर शहा व मौला इस्माईल शेख या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितिय क्रमांक मिळाला.



**विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेली बक्षिसे**

**कराटे प्रशिक्षण :-** महिलांवर होणा-या अत्याचार व लैंगिक शोषणाविरूद्ध सक्षमपणे तोंड देता यावे व मुलींमध्ये स्वसंरक्षणाची जाणीव जागृती व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व स्वयंसिध्दा संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने कराटे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यांत आले. घर शाळा समाज कुटूंबा मध्ये वावरतांना विशेषतः मुलींना अनेक व्यक्तींशी संपर्क येत असतो. अश्या वेळी समोरच्या व्यक्तीने आपल्याशी वागतांना अथवा स्पर्श करतांना तो चांगला की वाईट हे कसे ओळखावे यासाठी खोपोली पोलिस स्टेशनच्या दामिनी पथकाच्या माध्यमातून विद्यार्थीनीसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यांत आले होते.

**SOUND MIND IN SOUND BODY**:- निकोप मनासाठी सशक्त शरीराची आवश्यकता असते या उक्तीचा अंगीकार करणेसाठी शालेय जीवनात क्रीडा कौशल्ये विकसित होणे आवश्यक आहे. यासाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यांत येते. तसेच विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांची माहिती तंत्र याविषयी प्रशिक्षणासाठी शहरातील नामांकीत खेळाडू पंच यांच्या मार्फत मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन करण्यांत येते. या विद्यालयातून क्रिकेट, थाळी फेक, कुस्ती, यासारख्या क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी शालेय राज्यस्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून पारितोषिके पटकावली आहेत.



**विविध क्रीडाप्रकारात सहभागी विद्यार्थी**

**प्लास्टिक टाळा पर्यावरण वाचवा :-**सध्या विविध प्रकारच्या प्रदुषणामुळे पर्यावरणाची प्रचंड हानी होत आहे. विद्यार्थी दशेतच विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणासाठी मार्गदर्शन केल्यास विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने पर्यावरण रक्षणासाठी प्रवृत्त होतात. खोपोली नगरपरिषदेच्या कचरा गोळा करण्याच्या मोहिमेत विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यासाठी विद्यार्थ्यांना नोंदवही देण्यांत आले होते. विद्यार्थ्यांनी गोळा केलेला प्लास्टीक कचरा वर्गशिक्षक नोंदवहीमध्ये नोंद करत. व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र दिली गेली. तसेच विद्यालयात प्लास्टीक पिशव्या ऐवजी कापडी पिशव्या वापराव्यात यासाठी प्रत्यक्ष कापडी पिशव्या कश्या तयार कराव्यात यासाठी मार्गदर्शन करण्यांत आले. यातून विद्यार्थ्यांना कमवा व शिका हा मंत्र मिळाला.



**प्लास्टिक कचरा संकलन**



**कापडी पिशव्या तयार करतांना**

महाराष्ट्र शैक्षणिक व नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद आयोजित शालेय नेतृत्व विकास अंतर्गत या विद्यालयात विविध उपक्रमांचे लोकसहभागातून आयोजन करून विद्यालयात सकारात्मक व शाश्वत असे बदल झाले असून शालेय गुणवत्ता विकासास मदत झाली.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती सुनिता राठोड** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, रायगड. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## रोहा नगर परिषदेचे, डॉ. सी. डी. देशमुख माध्यमिक विद्यालय, रोहा, जि.रायगड.

**ई-मेल:-** cddeshmukh92@gmail.com

**मुख्याध्यापिकेचे नाव:-** सौ.ज्योत्स्ना बाळासाहेब कदम **ई-मेल:-** jyostnakadam19@gmail.com




**शाळेचा दर्शनी भाग व परिसर**

रोहा नगर परिषदेच्या डॉ.सी.डी.देशमुख माध्यमिक विद्यालयाची स्थापना सर्व सामान्य वर्गातील व आजूबाजूच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत व चांगले शिक्षण घेता यावे या हेतूने करण्यात आली. स्वतंत्र भारताचे पहिले अर्थमंत्री रिझर्व्ह बँकचे पहिले भारतीय गव्हर्नर डॉ.सी.डी.देशमुख या महान विभूतीचे नाव शाळेला लाभले आहे. त्यांच्या नावलौकिका प्रमाणे शाळेचीही प्रगती व्हावी शाळेतील विद्यार्थी सुसंस्कृत, सुजाण, जीवनात यशस्वी व्हावा असे आम्हा सर्व शाळेतील शिक्षकांना वाटते. शाळेची स्थापना झाल्या पासून शाळेची वाटचाल प्रगतीकडे आहे. शहरी भागातील आमची शाळा नगरपालिकेची असल्याने शाळेकडे विद्यार्थांना वळवण्यासाठी शाळेची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने भौतिक सुविधा परिपूर्ण करणे, विद्यार्थांना अभ्यासाची आवड निर्माण करणे, अध्यापनात नवनवीन तंत्राचा वापर करणे, असे आम्ही ठरविले व ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न केले.

**शाळा विकास नियोजन आणि अंमलबजावणी :-** कोणतेही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य धोरण ठरवणे आवश्यक असते खालील ध्येये निश्चित केली. शाळेतील परिसर स्वच्छ करून घेणे, स्वच्छ व शुद्ध पाण्याची व्यवस्था करणे, अध्ययन अध्यापनात नवनवीन तंत्राचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण करणे, शाळेत विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणे. त्यासाठी विविध योजना आखून त्याचे नियोजन करण्यात आले. शाळेची सुरवात परिपाठाने होते राष्ट्रगीत, संविधान वाचन सुविचार, बातम्या यांचे वर्गानुसार वाचन केले जाते सर्व विद्यार्थांना यामध्ये सहभागी करून घेतले जाते. शाळेचा पहिला दिवस आनंद सोहळ्या सारखा असतो नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थाचे पुष्प देवून स्वागत केले जाते या स्वागता मुळे नवागतामधील बुजरेपणा कमी होतो. नवीन व जुन्या विद्यार्थामध्ये स्नेहाची भावना निर्माण होते. शाळेतील ज्या विद्यार्थांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही त्या विद्यार्थांना आम्ही सर्व शिक्षक स्वतः पैसे खर्च करून मोफत गणवेश व वह्यांचे वाटप करतात.



**मोफत गणवेश वाटप**

शाळेमध्ये मुलांना स्वच्छ व शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे यासाठी प्रयत्न केले एक्सलं कंपनीकडून कुलर व फिल्टर उपलब्ध झाले. त्यामुळे मुलांची पिण्याच्या पाण्याची सोय झाली. शाळेत स्वतंत्र प्रयोग शाळा आहे विद्यार्थाना विज्ञानातील संकल्पना प्रात्यक्षिका द्वारे शिकवल्या जातात. विद्यार्था स्वतः प्रयोग करीत असल्याने त्यांची जिज्ञासा कुतूहल वाढते.

**व्यवसाय शिक्षणाची सोय :-** शालेय शिक्षणामध्ये माध्यमिक व उच्चमाध्यमिक स्तर महत्वाचा असून या स्तरामध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक मुलभूत कौशल्य व क्षमता प्राप्त करून दिल्यास विद्यार्थ्याना उच्च शिक्षणामध्ये प्रवेश घेतांना अथवा भविष्यातील व्यवसाय क्षेत्राची निवड करण्यास मदत होते. समग्र शिक्षा अंतर्गत शाळेमध्ये Automotive Service Technician व Store Operations Assistant (रिटेल) हे विषय विद्यार्थ्यासाठी सुरु आहे. शाळेमध्ये या विषयांचे विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यासाठी सुज्ज कार्यशाळा उपलब्ध आहे. या शिक्षणाचा विद्यार्थ्यास स्वयंरोजगार व कौशल्य तंत्र विकसित करण्यासाठी उपयोग होतो.





**ऑटो कार्यशाळा** **रिटेल कार्यशाळा**

**मुख्याध्यापक व शिक्षक स्वविकास :-** शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांचे ज्ञान अद्ययावत असणे आवश्यक आहे. आजचा विद्यार्थी हा संगणक युगातील इंटरनेटद्वारे विविध प्रकारची माहिती प्राप्त करणारा आहे. त्याच्या प्रश्नाची उत्तरे सांगण्यासाठी

शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी विविध माध्यमाद्वारे आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.शिक्षकांनी अध्यापन अध्ययन संदर्भात शासनाच्या विविध प्रशिक्षणाचा लाभ घेतला. नवीन अध्यापन पद्धतीचा वापर केला मोबाईल इंटरनेट वापर ई-लर्निंग तंत्रज्ञान शिकून घेतले. विद्यार्थ्यांना अध्यापन करताना या आधुनिक पद्धतीचा वापर केल्याने त्यांच्यात अभ्यासाची आवड निर्माण झाली. ज्याचा फायदा विद्यार्थाच्या ज्ञानात व आकलनात वाढ होण्यासाठी झाला.विविध विषयांसाठी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक साहित्याचा वापर अध्यापना साठी केला. शिक्षणक्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या माहितीची देवघेव, इलेक्ट्रॉनिक शैक्षणिक साधने वापरण्याचा सराव करणे यासाठी सहकारी शिक्षकांचे गट एकमेकांना सहकार्य करतात.शासनाने राबवलेल्या उदबोधन वर्गाचा, प्रशिक्षणाचा शिक्षक व मुख्याध्यापक यांना स्वविकास साधण्यास उपयोग झाला. SLDP च्या प्रशिक्षणामुळे स्वतःची जाणीव झाली. नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. एकमेकांचा अनुभवाचा, विचारांचा शाळेत आल्यावर शालेय कामकाज करतांना फायदा झाला. स्वतः च्या ज्ञानात वाढ केली पाहिजे, नवीन तंत्रज्ञान शिकून घेतले पाहिजे, शाळेत त्याचा वापर केला पाहिजे हे लक्षात आले. SLDP प्रशिक्षण घेताना तज्ञ मार्गदर्शकांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

**अध्ययन अध्यापन प्रक्रिया :-** शाळेसंबंधी विविध मुद्यावर एकत्रीत पणे सभा घेऊन शैक्षणिक सुधारणा घडवण्यासाठी विद्यार्थाच्या वेगवेगळया अध्यापन गरजा, नवीन अध्यापन कृती उपक्रम असे जे घटक विद्यार्थ्याच्या अध्ययन वाढीसाठी उपयुक्त होतील या संबंधी चर्चा केली. शाळेत विविध विषयासाठी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक साहित्याची माहिती विचारून नवीन शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी सुचवले. शाळेच्या प्रगतीसाठी व सुनियंत्रणासाठी शाळेतील सर्व शिक्षकाचा सहभाग घेतला.शाळेतील शिक्षकांच्या संख्येचा विचार करून विषय समित्या नेमल्या विषय शिक्षकानी आपल्या विषयांबाबत सहकार्याशी विचार विनिमय केल्याने अध्यापनात सुधारणा करणे शक्य झाले. विषयांचे वर्गाचे वेळापत्रक असल्याने कामकाज सुरळीतपणे चालण्यास मदत झाली. शाळेतील विविध विषयांचे अध्यापन करताना अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे नवीन लागलेल्या शिक्षकांची भीती कमी झाली. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.अध्ययन क्षमतेत कमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी व त्यांचा अधिक सराव व्हावा या साठी शाळेच्या वेळे व्यतिरिक्त ज्यादा तासिकांचे नियोजन केले. शाळेत येणारी बहुतेक विद्यार्थ्याची आर्थिक परीस्थीती चांगली नाही. त्यांच्या समस्या जाणून घेवून शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी प्रयत्न केले.

**शाळा विकासात शिक्षक पालकसंघ शाळा समिती सहभाग :-** अध्यापनातून सुजाण सुसंस्कृत नागरिक घडविला पाहिजे. शाळा विकासात समाजाचा पालकांचा सहभाग असणे आवश्यक आहे. शाळेत शिक्षक पालकसंघ कार्यरत आहे त्यांच्या दर महामिंटीग आयोजित केली जाते त्यामुळे पालकांचा शालेय व सहशालेय उपक्रमात सहभाग घेतला जातो. शाळेतील भौतिक सुविधा परिसर स्वच्छता प्राप्त होतात. समाजातील विविध घटकांचे सहकार्य मिळत असल्याने शालेय कामकाज सुरळीतपणे होऊ शकले.

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर :-** अध्ययन अध्यापन प्रक्रियेत अध्यापन करतांना ते अधिक परिणाम कारक आकर्षण होण्यासाठी शैक्षणिक साहित्य उपयोगी ठरते त्यामुळे विद्यार्थी एकाग्र होऊन ज्ञान आत्मसात करतात. त्यामुळे त्यांनी आत्मसात केलेले ज्ञान पक्के होते. आजकाल अनेक वैज्ञानिक कल्पनावर आधारित शैक्षणिक साधने उपलब्ध आहेत. टेपरेकॉर्डर, रेडीओ, स्लाईट प्रोजेक्टर, टी .वी संगणक, पेनड्रईव्ह संगणक ई लर्निंग चा वापर शिक्षक अध्यापन करतांना करतात. आकाशवाणी वरून सादर होणारे कार्यक्रम एकण्यास विद्यार्थ्यांना सांगितले. शालेय विषया संदर्भातील चित्रे, फोटो, शिक्षकांनी तयार केलेले शैक्षणिक साहित्य, विज्ञानाचे प्रयोगाचे प्रात्यक्षिक यांच्या वापर संगणकाचा अध्ययन व अध्यापन आवड निर्माण होण्यास मदत झाली. प्रशासकीय कामकाज करतांना संगणकाचा वापर केल्याने अनेक पत्रव्यवहार जतन करणे सोपे झाले इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून घेतल्यामुळे विविध प्रकारच्या वेबसाईट सहजपणे ओपन होत असल्याने प्रशासकीय कामकाज सुरळीत होण्यास मदत झाली.

**शाळेत राबवलेले विविध उपक्रम :-** दि.२१जून हा दिवस योग दिन म्हणून साजरा केला जातो. मुलाच्या शारिरीक विकासासाठी व आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. विविध प्रकारचे योगासने मुलांकडून करून घेतले जातात. डॉ.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यादिवशी विद्यार्थ्याकडून अवांतर पुस्तकाचे वाचन करून घेतले जाते मुलांमध्ये

वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी शासनाकडून आलेल्या निधीतून पुस्तके खरीदी केली आहेत. विद्यार्थ्यांनी पुस्तकांचे वाचन करावे यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले जाते.



**वाचन उपक्रम**




**विज्ञान प्रदर्शन**

शाळेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. या प्रदर्शनात विद्यार्थी आनंदाने सहभागी होतात या प्रदर्शनामुळे विद्यार्थायामध्ये विज्ञान या विषयी अभिरुची निर्माण होते. वेगवेगळया प्रतिकृती, प्रयोग विद्यार्थी सादर करतात. तालुका प्रदर्शन, जिल्हा विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांना बक्षीस प्राप्त झाले आहे. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या साठी व त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, आयोजित केल्या जातात. विद्यार्थी आनंदाने सहभागी होतात.



**रांगोळी स्पर्धा**




**चित्रकला स्पर्धा**

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. नृत्य, नाटक, एकांगिका या विविध प्रकारातून विद्यार्थी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करतो.






**विद्यार्थ्यांचे सादरीकरण** **अंधश्रद्धा निर्मुलन कार्यक्रम**

**शाळा एकसंघ :-** शाळा ही एक संघच आहे. शाळेतील विद्यार्थ्यांची प्रगती साधण्यासाठी शाळेतील सर्व घटकांचे सांघिक प्रयत्न उपयोगी ठरतात. सांघिक कार्य केवळ शाळेच्या सुयोग्य कार्यप्रणालीत कामकाजात मदत करत नाही तर प्रत्येक सदस्याची क्षमता व कौशल्य देखील विकसित करते. शिक्षकांनी प्रभावीपणे शिकविण्या करिता पुरेसा शिक्षक वर्ग आणि संसाधने यांची सुनिश्चीती करणे, विद्यार्थ्यांना घडविणारे म्हणून विकसित होत जाणारी शालेय संस्कृती तयार करणे, संघ तयार करणे, सर्व विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करणे, अध्यापनाची पद्धती अधिक चांगली करण्यास वर्गात अध्यापन करतांना नवनवे प्रयोग करण्यास प्रोत्साहित करणे, त्यामुळे विद्यार्थाच्या निकालात सुधारणा होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांचे अध्ययन हे आनंददायी झाले पाहिजे मुलांना त्यांची जास्तीत जास्त क्षमता मिळवून देण्यासाठी त्यांच्यात चिकित्सक विचार करण्याचे कौशल्य व चौकस वृत्ती वाढीसाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यास प्रोत्साहन दिले. स्वंयअध्ययन, निरीक्षण, मत प्रदर्शित करणे, गट सादरीकरण करणे, प्रकल्प राबवणे अशा विविध उपाययोजनाद्वारे सक्रीय सहभाग विद्यार्थाचा घेतल्याने अध्ययनाची त्यांच्यात आवड निर्माण झाली.

शाळा विकास करताना शिक्षक, पालक, व्यवस्थापकीय मंडळ यांच्या योग्य सहकार्या मुळे शाळेची वाटचाल यशस्वी पणे चालू आहे. पुढेही अशीच चालू राहील.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती सुनिता राठोड** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, रायगड. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळा अंजनवेल नं.२(कातळवाडी) ता.गुहागर, जि.रत्नागिरी

**मुख्याध्यापकाचे नाव –** श्रीमती ममता विचारे **ई-मेल :–** mamatamvichare@gmail.com



**भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जि.प.आंतरराष्ट्रीय शाळेची इमारत**

**पवित्र मंगल मंदिर अमुचे नित्य देते ज्ञानाची ग्वाही | असे तळपती अगणित तारे तेज तयांचे दिशांत दाही ||**

जिल्हा परिषद शाळा अंजनवेल नं २ कातळवाडी तालुका गुहागर जिल्हा रत्नागिरी या शाळेची स्थापना सन १९४७ मध्ये झाली. या शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांनी अंजनवेल सारख्या ग्रामीण भागात कातळावर नंदनवन फुलविले आणि विविध उपक्रमांनी शाळेचे नवलौकिक वाढविले. त्याचाच परिणाम असा की, ४ नोव्हेंबर २०१५ रोजी संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यात पहिली आय एस ओ शाळा म्हणून जिल्हा परिषद शाळा, अंजनवेल नं २ या शाळेने सन्मान मिळविला. तसेच महाराष्ट्र शासनाने सन २०१६ -१७ मध्ये राज्यातील मुलांना आंतरराष्ट्रीय शिक्षण मिळावे यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग व शालेय शिक्षण विभाग यांच्या शाळांमधून आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दर्जाच्या १०० शाळा निर्माण करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र शासनाच्या या निर्णया प्रमाणे महाराष्ट्रात एकूण ८१ शाळांना आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा म्हणून मान्यता मिळाली. त्यामध्ये अंजनवेल नं २ शाळेने ऑनलाइन अर्ज भरून आंतरराष्ट्रीय मंडळाचे सर्व निकष निर्मल ग्रुप ग्रामपंचायत अंजनवेल, शाळा व्यवस्थापन समिती अंजनवेल नं २, ग्रामस्थ अंजनवेल, पालक व विद्यार्थी यांच्या सहकार्याने पूर्ण केले त्यामुळे जिल्हा शिक्षणाधीकरी रत्नागिरी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी यांचे समितीने नामनिर्देशन करून व आंतरराष्ट्रीय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य याचे समितिने केलेल्या तपासणीमधून प्राप्त अनुकूल अभिप्रायामुळे दि. ०९/०५/२०१९ रोजी शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा म्हणून मान्यता मिळाली.






**ISO मानांकन स्विकारताना**

**शिक्षकांचा स्व विकास :-** भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळा अंजनवेल नं २ कातळवाडी शाळेतील मुख्याध्यापक व सर्वप्राथमिक व पूर्वप्राथमिक शिक्षक यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे शाळेत काम करण्याचे म्हणजे चाकोरीबाहेरचे शिक्षण विद्यार्थ्यांना देणाचे ठरविले आहे. महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाकडून आलेल्या लिंक भरून लेखी परीक्षा व मुलाखत अश्या सिलेक्शन प्रक्रियेने शाळेत कार्यरत आहेत, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेतलेले सर्व शिक्षक आहेत. एम.एस.सी.आय. टी. प्रमाणपत्र धारक आहेत. तसेच तंत्रज्ञांनातील विविध गोष्टी आत्मसात केलेले आहेत. त्याचा उपयोग कोरोंना कलावधीत शाळेला फार मोठ्या प्रमाणात झाला. विविध शालेय व सहशालेय उपक्रम व विद्यार्थांना दैनंदिन अध्ययन -अध्यापनाचा प्रत्यक्ष अनुभव वर्गवार live पठाद्वारे देण्यात आला.

**विद्यार्थी विकास :-** आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा मान्यता मिळाल्यानंतर अंजनवेल गावातील जिल्हा परिषद शाळा अंजनवेल नं. १ व अंजनवेल नं. ३ या शाळांचे अंजनवेल नं. २ मध्ये करण्यात आले. अंजनवेल नं. १ या शाळेचे माध्यम सेमी इंग्रजी होते. आंतरराष्ट्रीय शाळेचे माध्यम मराठी असल्याने गणितीय संकल्पना समजावून देताना समस्या येऊ लागल्या. त्यावर विविध शैक्षणिक साहित्याचा वापर करून वस्तु व कृतीद्वारे तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षकांनी मात केली आहे. यामध्ये दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी पालकसभा घेऊन पालकांना आपल्या पाल्याच्या प्रगतीविषयी चर्चा करून त्यातील चांगल्या बाबीबाबत कौतुक व जेथे कमी आहे तेथे शिक्षक व पालक मिळून काय उपाययोजना करता येईल याविषयी जाणीवपूर्वक निर्णय घेतले जातात.






**शाळा व्यवस्थापन समिती व पालक सभेचे आयोजन**

**लोकसहभाग :-** शाळा विकासात शिक्षक पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती,पालक सहभाग तसेच निर्मल ग्रुप ग्रंपंचायत अंजनवेल यांचे मोलाचे योगदान आहे. त्यानुसार जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे कडील जिल्हा परिषद अंजनवेल नं२ (कातळवाडी) मध्ये जि.प. शाळा अंजनवेल नं.१ व जि.प. शाळा अंजनवेल नं.३ चे समायोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय शाळा मान्यता प्रस्तावामध्ये कबूल केल्याप्रमाणे निर्मल गृप ग्रामपंचायत अंजनवेल यांनी शाळेसाठी १०० गुंठे जागा दिली आहे. इमारत बांधून देत आहेत. त्यातील पहिल्या टप्प्यामध्ये शालेय ९ वर्गखोल्या, मुलामुलींसाठी पुरेशी स्वच्छतागृहे, स्वयंपाकगृह, कार्यालय, Handwash station, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाईट, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प, शाळेपर्यंत रस्ता, सुरक्षित विद्यार्थी प्रवासासाठी ३ स्कूल बसेस इत्यादी भौतिक सुविधा पुरविल्या आहेत. ग्रामस्थांच्या भरीव कामगिरीमुळे आजूबाजूच्या परीसारतील विविध गावां मधून नवीन विद्यार्थी प्रवेश झाल्यामुळे सध्याची भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जि. प. आंतरराष्ट्रीय शाळा अंजनवेल नं. २ (कातळवाडी) ही प्राथमिक वर्गाची १८६ व पूर्वप्राथमिक वर्गांची १०० अशी २८६ पाटाची शाळा झाली आहे.



**ग्रामपंचायतने दिलेल्या स्कूलबसचे उद्घाटन**



**नूतन शाळासंकुल ईमरतीचे भूमिपूजन**

**नवोपक्रम :–** मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, यांनी बालक-पालक मेळावा, बालसभा, दफ्तरमुक्त शाळा, उपक्रमाचा शनिवार, संगीतमय पाढे, माझे चांगले काम, मी100% उपस्थित, कृतियुक्त संबोध स्पष्टीकरण, माझी गोष्ट, समुहगीत गायन, माझी शाळा –माझा गाव, अशा विविध नवोपक्रमांचा शाळेला शाळा विकासात फायदा झाला आहे.




**समुहगीत गायन स्पर्धा**




**ऑनलाइन बालिका दिन**

**तंत्रज्ञानाचा उपयोग :-** भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जि.प.आंतरराष्ट्रीय शाळा अंजनवेल नं. २ (कातळवाडी) ही डिजिटल शाळा आहे. सर्व वर्गांमध्ये स्मार्ट टीव्ही आहेत. शालेय प्रोजेक्टर आहे , शाळेत नेटसुविधा आहे . तसेच सर्व शिक्षक तंत्रस्नेही आहेत. विविध अभ्यास घटकांचे यूट्यूब, पेनड्राइव्ह, स्मार्टफोन व्दारे अध्यापन करत आहेत. विद्यार्थ्यांनाही शाळेच्या आवारात ग्रंपंचायतीने सुरू केलेल्या कम्प्युटर सेंटर मध्ये तंत्रज्ञानात प्रगत होण्यासाठी, तंत्रज्ञान विषयक ज्ञान दिले जात आहे. तसेच सर्व प्रशासकीय कागदपत्रे डिजिटल स्वरुपात दिली जात आहेत. विविध app निर्मिती, पर्सनल शैक्षणिक ब्लॉग, यूट्यूब चॅनेल, वेबसाईड निर्मिती शाळेच्या टिमने केली आहे.

**शाळा बंद पण शिक्षण सुरु :-** शाळेच्या पूर्वप्राथमिक व प्राथमिकच्या प्रत्येक वर्गाचे स्वतंत्र whatsapp group शैक्षणिक वर्ष जून २०१९ मध्ये करण्यात आले होते. त्यामुळे कोरोना कालावधीत नव्याने whatsapp group बनवण्याची शाळेला गरज भासली नाही. लॉकडाऊन होऊन शाळा बंद झाल्या तर पुढील शैक्षणिक बाबींचे नियोजन व सूचना SMC च्या सहकार्याने whatsapp group वर देण्यात येतील असे सांगण्यात आले. आणि त्याच दिवशी तालुका गुहागर मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील पहिला कोरोन रुग्ण सापडला आणि जिल्हाभर १७ मार्च पासून लॉकडाऊन सुरु झाले,शाळा बंद झाल्या परंतु आमच्या शाळेचे सुरवातीपासूनच पूर्वनियोजीत whatsapp group असल्यामुळे रोजचा अभ्यास नियमितपणे सुरु झाला. शैक्षणिक वर्ष जून २०२०पासून आजपर्यंत सुरु असलेले सर्व शैक्षणिक उपक्रम Online सुरु झाले. zoom App व Google Meet व्दारे Online SMC मिटिंग, गंदगीमुक्त गाव, विविध जयंती-पुण्यतिथी, हात धुणे दिन, वाचनप्रेरणा दिन, बालदिन याविषयीच्या सर्व स्पर्धा घेण्यात आल्या. सर्व शिक्षक आपापल्या वर्गाच्या whatsapp group द्वारे सतत कार्यरत आहेत. पालकही उत्तम प्रतिसाद देत आहेत. इयत्ता पहिलीच्या मुलांनी शाळा वर्गशिक्षक व आपले वर्गमित्रही पाहिलेले नाहीत त्यामुळे पहिलीच्या मुलांचे जास्तीतजास्त Google Meet द्वारे अध्ययन, गप्पा, गाणी, गोष्टी यावर भर दिला जात आहे. तसेच कॉन्फरन्स कॉल द्वारे सतत मुलांना शाळेशी जोडले जात आहे .

शासन स्तरावरून सुरु असलेला शाळा बंद शिक्षण सुरु, स्वाध्याय पुस्तिका, रोजचा स्वाध्याय व विविध शासन परिपत्रका नुसार जिल्हा परिषद रत्नागिरी शिक्षण विभाग यांचेकडून आलेले सर्व उपक्रम Online पद्धतीने राबवत आहे. कोरोना कालावधीमध्येही हे सर्व उपक्रम विद्यार्थी, पालक, शा.व्य. समिती, सर्व शिक्षक, मुख्याध्यापक उत्तम रीतीने राबविले जात आहेत.






**कोरोना कालावधीतील उपक्रम**

**माजी विद्यार्थी शिक्षणमित्र वर्ग घेताना शाळेबाहेरची शाळा**

**शाळेची यशोगाथा :-** भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जि.प. आंतरराष्ट्रीय शाळा अंजनवेल नं. २ (कातळवाडी) या शाळेतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये उज्वल यश संपादन केले आहे. तसेच मंथन - महाराष्ट्र राज्य सामान्य ज्ञान परीक्षा यामध्ये शाळेच्या ४ विद्यार्थ्यानी गुणवत्ता यादीत उज्वल यश संपादन केले आहे. राज्य चित्रकला स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तसेच शाळास्तर, केंद्रस्तर, बिटस्तर,तालुकास्तर, विविध क्रीडा स्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा, व्हीआयव्हीआयडीएचए ऑनलाईन व ऑफलाईन स्पर्धा यामध्ये विद्यार्थ्यानी उज्वल यश संपादन केले आहे.






**कराटे स्पर्धेत यशस्वी विद्यार्थी**

निर्मल ग्रुप ग्रामपंचायत अंजनवेल, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ अंजनवेल, पालक व विद्यार्थी यांच्या सहकार्याने,जिल्हा शिक्षणाधीकरी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी यांचे समितीने नामनिर्देशन करून व आंतरराष्ट्रीय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य याचे समितिने केलेल्या तपासणीमधून प्राप्त अनुकूल अभिप्रायामुळे शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा म्हणून मान्यता मिळाली. आता शाळा आंतरराष्ट्रीय दर्ज्याचे शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खंबीरपणे व ताठमानेणे सामोरे जाण्यास सज्ज करत आहे.

**यशोगाथा लिंक** - https://photos.app.goo.gl/WZBi9xM3r1bay7ac9

वर्गउपक्रम लिंक –

https://drive.google.com/file/d/1KVnyPSrmAtLB2zCVdZg4USPQCAif97sG/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1MoXg6q-ONGrdoFWxXeqRkCMPFqcYwJ_3/view?usp=drivesdk

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री.बबन वसेकर** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, रत्नागिरी. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जि.प.आदर्श प्राथमिक शाळा, पाचल बौद्धवाडी, ता.राजापूर, जि.रत्नागिरी

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री.नितीन प्रभाकर पांचाळ **ई-मेल:-** nitinpanchal161286@gmail.com



**जि.प.आदर्श प्राथमिक शाळा, पाचल बौद्धवाडी शाळेची टुमदार इमारत**

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील सह्याद्रीच्या कुशीत निसर्गरम्य वातावरणात पाचल हे गाव वसले आहे. लोकसंख्या तसेच क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठे असणारे हे गाव. शिक्षण व सामाजिक घडामोडींचे केंद्र मानल्या जाणाऱ्या या गावात श्रावास्तीनगर नावाची एक वस्ती आहे. लोकसंख्या फक्त २१० आणि या वस्तीमध्ये लुंबिनी बुद्धविहाराच्या नयनरम्य परिसरात वसली आहे. जिल्हा परिषदेची आदर्श प्राथमिक शाळा पाचल बौद्धवाडी. २००१ साली वस्तीशाळा म्हणून शाळेची सुरुवात झाली. शाळेचा पट १० च्या आत. केवळ एका वस्तीवरील मुलांची सोय म्हणून पालकांच्या प्रयत्नातून ही शाळा सुरु झाली. ही सुरुवातच होती विकासाची. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत वस्तीशाळा म्हणून २००८ पर्यंत शाळा चालू होती. ती भरत होती एका छोट्याश्या घरात. सन २००८ मध्ये शाळेला जि. प. शाळेमध्ये वर्ग करण्यात आले आणि नाव मिळाले. वस्तीशाळेचे नामकरण झाले. जि. प. प्राथमिक शाळा, पाचल बौद्धवाडी. ग्रामस्थांच्या मदतीने एक छोटीशी वर्गखोली बांधण्यात आली. शाळा स्वतःच्या ४ भिंतीमध्ये भरायला सुरुवात झाली.

**शालेय विकास :-** सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शाळेला इमारत मंजूर होऊन बांधकाम सुरु झाले. शाळेची सुंदर इमारत उभी राहिली. नेतृत्वाला साथ देणारा पालकवर्ग,शाळा व्यवस्थापन यामुळेच ही गोष्ट शक्य झाली असे म्हणावे लागेल. समाजाचा शाळेकडे बघण्याचा दृष्टीकोन हळू हळू बदलू लागला होता. शाळेच्या वस्तीवरील लोकसंख्या फक्त २००. अश्यात शाळेची पटसंख्या टिकवायची कशी हा महत्वाचा प्रश्न सतत सतावत होता. यासाठी शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीला प्रशिक्षित करण्यात आले. पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. शाळेचे vision व mission ठरवण्यात आले. यातून एक प्रचंड उत्साह पालकांमध्ये व शाळा व्यवस्थापन समिती मध्ये निर्माण झाला. यामध्ये भौतिक सुविधा, शालेय परिसर विकास, शैक्षणिक उठाव, गुणवत्तापूर्ण शिक्षण, संधीची उपलब्धता, समावेशित शिक्षण, ग्रामस्थांचे उद्बोधन,त्याचबरोबर परिसरातील विद्यार्थ्यांना शाळेकडे आकर्षित कसे करता येईल याची चर्चा करण्यात आली. याची सुरुवात झाली शैक्षणिक उठावाने. उठाव

होता १,००,००० च्या वर निधी जमवण्याचा. या शैक्षणिक उठावातून शाळेच्या  भौतिक सुविधा हळू हळू पूर्ण होत गेल्या. यातून खेळाचे साहित्य, रंगरंगोटी, फर्निचर ,परिसर विकास या गोष्टी पूर्णत्वास नेणे शक्य झाले. एक छोटीशी शाळा पटसंख्येअभावी बंद होऊ नये यासाठी प्रत्येक पालक आणि ग्रामस्थ सकारात्मक प्रयत्न करत होता. याची सुरुवात परिसर विकासाने झाली. शाळेच्या समोर ग्रामस्थांनी एक सुंदर बाग तयार केली. यामुळे शाळेच्या सौंदर्यात आणखी भर पडली.



**ग्रामस्थांच्या प्रयत्नातून फुललेली सुंदर बाग आणि परिसर**

**विद्यार्थी विकास :-** शाळा टिकली पाहिजे यासाठी ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक  खूप मेहनत घेत होते. अशातच मा.केंद्रप्रमुख यांच्या सूचनेनुसार शाळेत सेमी इंग्रजी सुरु करण्याचा निर्णय शाळा व्यवस्थापन समितीने घेतला. सन २०१२-१३  मध्ये शाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु करण्यात आले. हाच निर्णय शाळेच्या विकासाला पोषक ठरला. जिथे शाळेच्या वस्तीवरचेच विद्यार्थी शाळेत दाखल होत होते, तिथे आसपासच्या वस्तीमधून पालक आपल्या पाल्याला शाळेत प्रवेशासाठी उत्सुक दिसू लागेले. आम्ही दोनही शिक्षक  इंग्रजी माध्यमातून असल्याने  विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची गोडी निर्माण करण्यास व संकल्पना समजण्यास अधिक सोपे झाले. अध्ययन अध्यापन प्रक्रिया खूप प्रभावी होत गेली. यानंतरचा महत्वाचा टप्पा म्हणजे RTE निकषांची पूर्तता करणे.

**लोकसहभाग :-** ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शाळेला पक्की संरक्षक भिंत बांधण्यात आली. यामुळे प्रवेशद्वाराचा प्रश्न दूर झाला. मा.श्री.आत्माराम सुतार, सदस्य, ग्रामपंचायत पाचल यांनी शाळेला स्वत: ५००००/- चे handwash station बांधून दिले. ग्रामस्थांच्या मदतीने शाळेला greeling करून शाळा सुरक्षित व बंदिस्त करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या सहकार्याने शाळा डिजिटल झाली. ग्रामस्थांनी शाळेला स्वतंत्र संगणक कक्ष उभारला. मुख्याध्यापकांसाठीचे सुंदर कार्यालय तयार केले. शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून प्रिंटर व साउंड सिस्टीम शाळेला प्राप्त झाली. महिला बचत गट स्वयंस्फुर्तीने शाळेच्या विकासाच्या प्रवासात सामील झाले. या सर्व प्रयत्नांतून विद्यार्थ्यांना शाळेकडे आकर्षित करण्यासाठी आम्ही यशस्वी झाले.

**शालेय उपक्रम :-**“सर्वसामान्य विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास”  हे शाळेचे vission ठरले. या vission नुसार  शाळेची प्रगती सुरु झाली. शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी गुणवत्ता विकास कार्यक्रम व शालासिद्धी हे दोनही उपक्रम अतिशय उपयुक्त ठरले. गुणवत्ता विकास व शालासिद्धी मध्ये कायम "अ" श्रेणी मध्ये शाळा राहिली पाहिजे यासाठी शाळेने कायम प्रयत्न केलेलं आहेत. ABL आणि BALA नुसार शाळा हेच शैक्षणिक साधन यासाठी सर्व मुलभुत  संकल्पना शाळेच्या अंतरंगात व बह्यारंगात चित्रित करण्यात आल्या. ABL मुले विद्यार्थीकेंद्रित अध्ययन अध्यापन प्रक्रियेची सुरुवात शाळेत झाली. EACH ONE TEACH

ONE हि संकल्पना प्रत्यक्षात अवतरली. दैनिक अध्ययन अध्यापन प्रक्रियेत डिजिटल साधनांचा वापर करण्यात येऊ लागला. शाळेने राबवलेला अभिनव उपक्रम म्हणजे




**ग्रामपंचायतीच्या सहकार्याने शाळा डिजिटल झाली**

**तंत्रज्ञानाचा वापर :-** दररोजच्या अध्ययन कृतींमध्ये डिजिटल साधनांचा वापर करण्यात येऊ लागला. शाळेमध्ये सध्या उपलब्ध असणाऱ्या दोन संगणक, चार tab, प्रोजेक्टर, प्रिंटर इत्यादी डिजिटल साधनांचा वापर दररोजच्या अध्ययन कृतींमध्ये करण्यात येऊ लागल्या. विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी स्वनिर्मित व्हिडिओ, उपलब्ध असलेले इतर व्हिडिओ त्याचप्रमाणे इतर ई साहित्याचा वापर करण्यात येऊ लागला. यामुळे विद्यार्थ्यांना अनेक किचकट संकल्पना विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने समजू लागल्या. अध्ययन कृतींचे दृढीकरण होण्यासाठी खूपच फायदा झाला. त्यामुळे डिजिटल साधनांचा वापर हा या उपक्रमासाठी खूपच फायदेशीर ठरला. स्वाध्याय देण्यासाठी पालकांचा एक **whatsapp ग्रुप** तयार केला गेला. या ग्रुप वर वरील वेळापत्रकाप्रमाणे अभ्यास दर दिवशी share करत होतो. online अभ्यास शेअर करताना एक अडचण जाणवली. ती म्हणजे काही विद्यार्थ्यांकडे online ची सोय नव्हती. यावर उपाय म्हणजे संपूर्ण **स्वाध्यायांच्या worksheets** तयार करण्यात आल्या. प्रत्येक दिवशी प्रत्येक विषयाची worksheet विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. यासाठी एक फोल्डर विद्यार्थ्याने देण्यात आले. सदर सर्व worksheets या याच फोल्डर मध्ये ठेवण्याबाबत सर्वांना सूचना देण्यात आल्या.

**माझी दप्तरमुक्त शाळा :-** यामध्ये ग्रामपंचायतीच्या सहकार्याने शाळेत प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र लॉकर ची सोय करण्यात आली. विद्यार्थ्याला अभ्यासाठी १ वही त्याचप्रमाणे फोल्डर चा वापर, तंत्रज्ञानाचा वापर, whatsapp ग्रुप, गृहभेटी यासारख्या विविध उपक्रम यांच्या सहाय्याने शाळा दप्तरमुक्त झाली आहे .गप्पा-गोष्टी, गाणी, योगासने, व्यायाम, अभ्यासपूरक खेळ, व्यक्तिमत्व विकास असे विविध उपक्रम या दिवशी राबवत होतो. त्यामुळे विद्यार्थ्याला शनिवार कधी येतोय असे वाटू लागले. शालेय वातावरण भयमुक्त आणि आनंदी होण्याच्या या छोट्याश्या प्रयत्नातून जन्माला आली **"माझी दप्तरमुक्त शाळा "**. अध्ययन कृती कोणत्या घ्यायच्या, साहित्य कोणते आणि किती वापरावयाचे, कुणाकुणाशी चर्चा करायची याबाबत विचार करण्यात आला.उपक्रम राबवायच्या आधी सदर उपक्रमाची माहिती शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ तसेच इतर संबंधित घटक यांना देण्यात आली. या सर्वांमध्ये प्रत्येकाची भूमिका काय असणार आहे याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. शनिवार साठी वेगळा ड्रेस कोड राबवण्यात आला. गणवेश अनुदानामधून शानिवार साठी विद्यार्थ्यांना TRACKSUIT खरेदी करण्यात आले. एखाद्या पब्लिक स्कूल मध्ये मुले जशी जातात तशा वेशात विद्यार्थी शनिवारी शाळेत येऊ लागली. शनिवारची सुरुवात

योगासने,व्यायामाने होत होती. त्यानंतर विविध अभ्यासपूरक खेळ, छोटे छोटे खेळ, सामुहिक कृती अशा बऱ्याच कृतीसहित शनिवारचा दिवस संम्पन्न होत होता.



**दप्तरमुक्त शाळेतील आनंददायी दिवस**

**स्वयंअध्ययन :-** भाषा व गणिताचे स्वयं अध्ययन, साहित्य पेट्या मधील साहित्य वापरायचे असे ठरले. सदर साहित्य हे अतिशय उपयुक्त आहे. सदर साहित्याचा वापर करून अध्ययन निष्पत्ती कशा पूर्ण करता येतील यायाबत चर्चा केली. त्यानुसार दिवसभरातील कृतींमध्ये जास्तीत जास्त स्वयं अध्ययन साहित्य वापरावयाचे असे ठरले. विद्यार्थी अपेक्षित क्षमता व सद्यस्थितीत प्राप्त क्षमता यांचा विचार करून विद्यार्थ्यांचे स्तरनिहाय गट करण्यात आले.यामध्ये उच्चतर, मध्यम स्तर, निम्न स्तर प्राप्त क्षमतानुसार विद्यार्थ्यांचे गट करूनत्यानुसार अध्ययन साहित्य वापरून विद्यार्थ्यांना अपेक्षित क्षमतांपर्यंत नेण्याचा प्रयत्न चालू होता.

**स्वयं अध्ययन करताना विद्यार्थी :-** स्वयं अध्ययन साहित्य कसे वापरावे याबाबत प्रत्येक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर साहित्य वापरताना, अध्ययन कृतींमध्ये स्वतःला मिळणारा आनंद, आपल्याला व्यक्त होता येत आहे, हि भावना विद्यार्थ्याला दररोज शाळेत येण्यास व आनंददायी वातावरण अनुभवण्यास भाग पडत होती. आनंददायी वातावरणात विद्यार्थी रममाण होत अध्ययन कृतींचा आनंद घेत होते. बोलताना प्रमाण भाषेचा वापर करणे,घड्याळ वाचन संकल्पना, आवडत्या विषयावर बोलण्यास प्रवृत्त करणे, घरातील वस्तूंची इंग्रजीतून नावे सांगणे, नोटांचा व नाण्यांचा वापर करून अंक, प्राथमिक क्रिया संकल्पना, व्यवहारापुरती तोंडी बेरीज वजाबाकी, घरातील भांड्यांचा वापर करून मापन संकल्पना, जुन्या पुस्तकातील कात्रणांचा वापर करून वाचन, या आणि इतर कितीतरी गोष्टीतून आपण स्वतः विद्यार्थ्यांचा स्वाध्याय कसा घेऊ शकतो याबाबत मार्गदर्शन केले. स्वाध्याय सोडवण्यात पालकांचा सहभाग वाढवलं.

**ग्रंथालयातील पुस्तके वाचन :-** मधल्या सुट्टीत खूप मोठा वेळा हा विद्यार्थ्यांना मिळत होता. या सुट्टीत विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तके वाचन करण्यासाठी देण्यात आली. विद्यार्थ्याने स्वतःच्या आवडीचे पुस्तक घेऊन ते पुस्तक वाचायचे असा दिन क्रम करण्यात आला. विद्यार्थी न चुकता दररोज एक पुस्तक वाचू लागले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रकटवाचन, गतीवाचन, मुकवाचन

या गोष्टी सुधारत जाऊ लागल्या. दुपारच्या सुट्टीच्या वेळेचा सदुपयोग विद्यार्थी स्वतः करण्यास शिकले. याचा खूप मोठा फायदा विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्ती पूर्ण करण्यासाठी निश्चितच झाला.



**ग्रंथालयातील पुस्तक वाचन करताना विद्यार्थी**

**सांस्कृतिक कार्यक्रम :-** शाळा दरवर्षी उत्कृष्ट असे सांस्कृतिक कार्यक्रम राबवते यामध्ये विविध राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय तसेच विभागस्तरीय नृत्य स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभाग नोंदवून पारितोषिके प्राप्त केलेली आहेत. शाळेचे सांस्कृतिक कार्यक्रम उच्च दर्जाचे करण्याचा नेहमीच नेतृत्वाचा प्रयत्न असतो. दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून ५०००० च्या दरम्याने शैक्षणिक उठाव होत असतो. त्याचा वापर व मिळालेल्या पारितोषिक रकेमचा वापर विद्यार्थी विकासाच्या कामासाठी केला जातो.



**सांस्कृतिक कार्यक्रमाची काही क्षणचित्रे**

शाळेत एकूण ४५ अल्पसंख्यांक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या लाभांच्या योजनामुळे आणि सतत शैक्षणिक पाठपुराव्यामुळे शाळेत टिकून राहण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येते. उपस्थिती भत्ता, सा.फु.द.पा. योजना, अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती, इतर मागास शिष्यवृत्ती तसेच अनेक विद्यार्थी लाभाच्या योजनाची अंमलबजावणी शाळेत केली जाते. अशा अनेकविध योजना शाळेत राबवल्या जातात. जेणे करून विद्यार्थी पालक शाळेत टिकून राहील व शाळेचा सर्वांगीण विकास होईल.

**शाळेची यशोगाथा :-** vission, mission आणि goal या path नुसार शालेय नेतृत्वाने आखलेल्या नियोजन व कार्यवाहीमुळे शाळेने गेल्या ११ वर्षांमध्ये विविध उच्चांक गाठले आहेत. सन २०१५/१६ चा आदर्श प्राथमिक शाळा पुरस्कार : शाळेच्या कामाची दखल सन २०१५/१६ साली जि.प.रत्नागिरीने घेतली. प्राथमिक इयत्ता १ ते ५ च्या गटातील रत्नागिरी जिल्हा परिषदेचा **"आदर्श शाळा पुरस्कार "** मिळाला. शाळाला जिल्ह्यात एक ओळख मिळवून दिली. विविध मान्यवरांच्या शाळेला भेटी झाल्या. त्यातून आणखी काय बदल करता येतील याचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. सन २०१८-१९ साली शाळेच्या कामाची दखल कै.मनोहर विचारे प्रतिष्ठान,मुंबई या स्वयंसेवी संस्थेने घेतली. संस्थेने आंतरराष्ट्रीय स्तरावर दिला जाणारा मराठी गौरव पुरस्कार आदर्श शिक्षण संस्था म्हणून देऊन शाळेच्या शिरपेचात मनाचा तुरा खोवला. गेल्या ११ वर्षात शाळेचा पट हा कायम वाढता राहिलेला आहे. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे प्रमाण वाढले आहे. परिसरातील विविध भागातील विद्यार्थी शाळेत प्रवेश घेण्यास उत्सुक आहेत.




**आंतरराष्ट्रीय स्तरावरील मराठी गौरव पुरस्कार**

सर्वसामान्य विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे ध्येय अंगीकारून 2001 पासून वस्तीशाळा सुरु झाल्यापासून ते आज दप्तरमुक्त आदर्श प्राथमिक शाळेचा इथवरचा प्रवास हा शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ तसेच सर्व प्रशासन यांच्या सहकार्याने सुलभ होत गेला. जिथे मार्गदर्शन हवे तिथे हितचिंतकांनी मार्गदर्शन केले. सर्वांगीण विकासाचा हा प्रवास असाच निरंतर राहील यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून शाळेला एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवण्याचा सदैव प्रयत्न राहील .

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री.बबन वसेकर** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, रत्नागिरी. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## अजितराव घोरपडे विद्यालय, कळंबी, ता.मिरज,जि.सांगली

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री. दादासो नरसगोंडा पाटील **ई-मेल-** patildnhm@ymail.com



**अजितराव घोरपडे विद्यालयाची प्रशस्त इमारत**

**विद्यार्थी विकास नियोजन –** सर्व सह शालेयउपक्रम, अंतरशालेय सर्व भाषा विषयांच्या हस्ताक्षर, निबंध, वक्तृत्व स्पर्धा व इतर नावीन्यपूर्ण उपक्रम व सहशालेय उपक्रम यांचे कोणत्या महिन्यात कोणता उपक्रम घ्यावयाचा याचे जून महिन्यातच शाळा सुरू होणेपूर्वी नियोजन पूर्ण होते. शाळेच्या आवश्यक भौतिक सुविधा, उपकरणे, साहित्य, शालेय गरजा, यांची सूची करून समाज, लोकसहभाग, पालकमेळावा इत्यादि संपर्क यातून वरील बाबीची पूर्तता केली जाते. शालेय सर्व नवोपक्रम, सहशालेय उपक्रम, सर्व स्पर्धा यावेळच्या वेळी पार पडल्यामुळे नियोजनामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगती होण्यास मदत होते.15 मे पासून उन्हाळी सुट्टीत सर्व विषयांचे जादा तासांचे नियोजनकेले जाते. प्रत्येक महिन्याला शिकवलेल्या अभ्यास क्रमावर आधारित चाचणी परीक्षा व निकाल करून प्रगतीचा आढावाघेतला जातो. गणित- इंग्रजी साप्ताहिक चाचणी परीक्षा घेतली जाते, दिवाळी सुट्टीत जादा तासाचे नियोजन तसेच गणित इंग्रजी विषयांचे दररोज सकाळी 9 ते 10 जादा तासाचे नियोजन केले जाते. तीन सराव परीक्षांचे आयोजन व निकाल तयार करून प्रगतीचा आढावा घेतला जातो त्याचा परिणाम विद्यालायचा सलग10 वर्ष 100% निकाल आहे. शाळेतील शिक्षकच विद्यार्थ्यांचे पालकत्व घेत असल्यामुळे दहावीच्या विद्यार्थ्यांची सर्व विषयाची तयारी शाळेतच करून घेतली जाते. मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासात व्यक्तिगत मार्गदर्शन करून, मुख्य प्रवाहात आणले जाते. " विद्यार्थ्यांचे पालकत्व हेच या यशाची गुरुकिल्लीआहे." शाळेत सर्व वर्गांमध्ये एलईडी टीव्हीचा वापर सर्व विषयांच्या ई –लर्निंग चा अध्यापनात प्रभावी वापर करण्यात आला आहे. तसेच विद्यार्थी ई-लर्निंग सॉफ्टवेअर सुध्दा हाताळतात. तसेच प्रोजेक्टर चा अध्यापनात प्रभावी वापर केला जातो. विद्यालयाची गुणवत्ता व विद्यालयाचा सातत्याने असणारा शंभर टक्के निकाल यामुळे विद्यालयात परिसरातील गावातून विद्यार्थी शिक्षणासाठी स्वखर्चाने येतात.

**किशोरवयीन विद्यार्थी स्वतंत्र समुपदेशन -:** 14 ते 18 वयोगटातील वयात आलेल्या मुला मुलींना शारीरिक-व मानसिक बदल, व हार्मोन्स चेंज यामुळे मुले गोंधळतात या वयामध्ये सामोरे जात असताना विद्यार्थ्यांचे वर्तन कसे असावे, या विषयी प्रत्येक सत्रात तज्ञ मार्गदर्शका कडून स्वतंत्रपणे समुपदेशन शाळेचे आयोजन केले जाते ,महिन्यातून एकदा मुले व मुली यांना स्वतंत्र करून सेफ टच व अनसेफ टच याबाबत माहिती दिली जाते .तसेच शारीरिक बदला बाबत खुलेपणाने चर्चा केली

जाते ,मार्गदर्शन केले जाते. प्रत्येक सत्रात मुलींच्या सुरक्षिततेे बाबत पोलिस दलाचे दामिनी व निर्भया पथकाला शाळेत पाचारण करून विद्यार्थिनि व माता पालकांशी संवाद साधला जातो तक्रारी बाबत ,मार्गदर्शन केले जाते .मुलीना कठीण प्रसंगी संरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण दिले जाते .विद्यालया मधील मुलींसाठी अद्यावत चेंजिंगरूम उपलब्ध आहे . चेंजिंगरूममध्ये सॅनिटरी नॅपकिन डिस्ट्रोय मशीन सुस्थितीत आहे. या मशीनमध्ये दररोज 35 ते 40 नॅपकिन बर्न करण्याची क्षमता आहे .सदर मशीनचा नियमितपणे वापर केला जातो. अशा प्रकारची सुविधा पुरविणारे सांगली जिल्ह्यातील पहिले विद्यालय आहे .सॅनेटरी नॅपकीन ची उपलब्धता विद्यालयाच्या वतीने करण्यात आल्यामुळे त्याचा चांगला सकारात्मक बदल मुलींमध्ये दिसून येत आहे .https://youtu.be/j6CKYRnQyKYस्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय लिंक) )



**तज्ञ मार्गदर्शका कडून समुपदेशन**



**निर्भया पथक समुपदेशन**

**मुख्याध्यापक व शिक्षक स्व विकास :-** स्कूल लीडरशिप अँड मॅनेजमेंट चे जून 2018 मध्ये NIEPA New Delhi तर्फे 10 आठवडे ऑनलाइन प्रशिक्षण घेण्यात आले होते ते पुर्ण करण्यात आले. सतत तीन वर्ष SCERT पुणे येथे घेण्यात आलेली तीन प्रशिक्षणे पुर्ण केली.राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, यशदा पुणे ची तीन प्रशिक्षणे, शाळा सिद्धि निर्धारक प्रशिक्षण तीन दिवस कार्यशाळा डायट सांगली, सर्व शिक्षण मोहीम सेवांतर्गत प्रशिक्षण 20 दिवस, माध्यमिक मुख्याध्यापक उद्बोधन प्रशिक्षण तीन दिवस, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद येथे बालकांचा हक्क व सुरक्षितता ऑनलाइन प्रशिक्षण, गूगल डिजिटल टूल्स फॉर एजुकेशन. SCERT पुणे, अटल टिंकरिंग लॅब टीचर्स ट्रेनिंग चार दिवस AIMNITI Aayog, निष्ठा प्रशिक्षण–ऑनलाइन प्रशिक्षण, MH_M1ते MH_M6 सहा ऑनलाइन प्रशिक्षण, विद्यालय शिक्षा मे नई पहल, विद्यालय नेतृत्व संकल्पना और अनुप्रयोग, कृती संशोधन संकल्पना व स्वरूप,विज्ञान का शिक्षाशास्त्र या सारखी अनेक प्रशिक्षणे मुख्याध्यापकांनी पुर्ण केली. शाळेतील इतर शिक्षकानी पूर्ण केलेली प्रशिक्षणे म्हणजे अविरत –1,2,3 SCERT पुणे,राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यशदा पुणे, सर्व शिक्षण मोहीम सेवांतर्गत प्रशिक्षण, बालकांचा हक्क व सुरक्षितता ऑनलाइन प्रशिक्षण, निष्ठा प्रशिक्षण, यासारखी प्रशिक्षणे पुर्ण केली आहेत.स्कूल लीडरशिप अँड मॅनेजमेंट, अविरत, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, शाळासिद्धी,माध्यमिक मुख्याध्यापक व संशोधन प्रशिक्षण, सर्व शिक्षा अभियान इत्यादी प्रशिक्षणे मुख्याध्यापकांनी पूर्ण केल्यानंतर त्या प्रशिक्षणावर आधारित विद्यालयातील शिक्षकांची दहा प्रशिक्षणे चर्चासत्र उद्बोधन वर्ग घेतले. त्याचबरोबर covid-19 काळात ऑनलाइन शिक्षणाकरिता मुख्याध्यापकानी झूम, गुगल मॅप, सर्वे हार्ट, गुगल ड्राईव्ह, गुगल फॉर्म, इझी टेस्ट इत्यादीचे प्रशिक्षण स्वतः घेऊन नंतर शिक्षकांना त्याबाबत चर्चा व मार्गदर्शन केले. त्यामुळे शिक्षकांमध्ये सकारात्मक बदल झाला. https://youtu.be/fWn3z7NYniY

**अध्ययन – अध्यापन प्रक्रिया :-** विद्यार्थी श्रेणीवाढ करण्याची साठी उच्च स्तर, मध्यम स्तर, निम्नस्तर अशा सर्व श्रेणीतील आठ ते दहा विद्यार्थ्यांचा एक अभ्यास गट, असे प्रत्येक वर्गात केले व सहा ते आठ प्रभावी स्वाध्याय गट तयार करण्यात आले. पाचवी ते दहावी सर्व वर्गात मिळून 78 प्रभावी स्वाध्याय गट निर्माण केलेले आहेत. स्वाध्याय गटातील सदस्य स्वाध्यायाचे अवलोकन, गटचर्चा, स्वाध्याय मार्गदर्शन, शब्द सराव, पाढे सराव निर्मिती इत्यादी कामे गटात मिळून करतात. अशा स्वाध्याय गटामुळे अभ्यासात मागे राहणारे विद्यार्थ्यांची श्रेणी वाढ, हस्ताक्षर सुधार, शब्द सराव वाढ, स्वाध्याय वेळेत पूर्ण, संघभावनेची निर्मिती, यात वाढ झाली. रोज एक तास समूह मार्गदर्शन यामध्ये मराठी विषय समृद्धीसाठी पत्रलेखन, निबंध लेखन, मुद्द्यावरून गोष्ट या भागांची 100% विद्यार्थ्यांच्या कडून सराव करून घेतला, अध्ययन निष्पत्ती कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाच्या किमान बाबी समजावून देऊन त्यावर चर्चा मार्गदर्शन व सराव करून घेतला जातो. जोपर्यंत शेवटचा विद्यार्थी दिलेले उदिष्ट पूर्ण करत नाही तोपर्यंत सतत सराव घेण्यात आला. सदर अध्ययन निष्पत्ती कार्यशाळेमध्ये शंभर टक्के विद्यार्थ्यांना मराठी, इंग्रजी, लेखन, वाचन यावे यावर भर देण्यात आला. शंभर टक्के विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी हस्ताक्षर सुधार पंधरवडा साजरा करण्यात आला. अध्ययन निष्पत्ती कार्यशाळेमध्ये इंग्रजी विषय समृद्ध करण्यासाठी शंभर टक्के विद्यार्थ्यांना इंग्रजी लेखन व वाचनाचा सराव करून घेतला जातो. छोट्या छोट्या दोन अक्षरी तीन अक्षरी शब्दांचा सराव मुळाक्षरांचा सराव इंग्रजी पत्रलेखनाचा नमुना, लेखन विभाग यावरती सराव करून घेतला जातो. गणित विषय समृद्धीसाठी वेगवेगळी चिन्हे असताना क्रिया करणे यामध्ये प्राथमिक क्रिया त्रिकोण चौकोन व चौकोनाचे प्रकार, पाढे निर्मिती कार्यशाळा, कोणाचे प्रकार अशा पायाभूत बाबींचा अध्ययन निष्पत्ती कार्यशाळेमध्ये गणित विषय समृद्धीसाठी सराव घेतला जातो.

**शाळा विकासात शिक्षक सहभाग पंचायत समिती शाळा व्यवस्थापन व पालक संघ :-** शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला इयत्ता पाचवी ते दहावी च्या सर्व पालकांचे मेळावे आयोजित करण्यात येतात. सदर मेळाव्यात पालकांना विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे वेळापत्रक व शाळेचे वार्षिक, मासिक नियोजन, शिस्त, संस्कार, नियम याविषयी सूचना दिल्या जातात. विद्यार्थी शिस्त, वैयक्तिक स्वच्छता, सवयी, या सर्व मुद्द्यावर चर्चा करून मार्गदर्शन करण्यात येते. विद्यालयात शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ, माता पालक समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, विद्या समिती, शालेय पोषण आहार समिती इत्यादी समित्या कार्यरत असून त्यांची नियमितपणे सभा होते. शाळा विकासाच्यादृष्टीने नवनवीन धोरणे उद्दिष्टे याबाबत चर्चा करून त्याचे अंमलबजावणी साठी व योग्य कार्यवाही साठी महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले जातात. याचा शाळा विकासाच्या बदलसाठी खूप उपयोग झालेला आहे.





**पालक सभेत सहभागी पालक**

**लोकसहभागातून शाळा विकास :-** शाळेच्या विकासासाठी पालक, माजी विद्यार्थी, समाजातील दानशूर लोक यांच्याकडून भरीव आर्थिक मदतीच्या माध्यमातून 31 लाख रुपये पर्यंतची कामे शाळेत झाली. इमारत बांधकाम, सोलार पॅनल, शुद्ध पेयजल, स्लायडिंग खिडक्या, हॅंडवॉश स्टेशन, चेंजिंगरूम, इंसिनेटर, 12 एलईडी टीव्ही, कलर प्रिंटर, झेरॉक्स मशीन, इमारत रंगरंगोटी, सुंदरम सॉफ्टवेअर, जलपुनर्भरण, टॉयलेट नूतनीकरण, यासारखी कामे लोकसहभागातून झाली आहेत.

**नवोपक्रम व विद्यालयाची गुणवत्ता वाढ :-**

**वन पेज ट्रान्सलेशन :–** इंग्रजी विषयाच्या सक्षमीकरणासाठी महिन्याला इंग्रजी विषयातील एका पानाच्या त्यातील सर्व शब्दांचे अर्थ पाठ करून प्रत्येक ओळीचा मराठीत अर्थ सांगितला जातो. अशा पद्धतीने तयारी करून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचे इंग्रजी वाचन व लेखन सुधारण्यामध्ये खूपच मदत झालेली आहे.

**काव्यवाचन व काव्यनिर्मिती कार्यशाळा :-** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यालयात काव्यवाचन कार्यशाळा घेऊन कविता तयार करण्याविषयी मार्गदर्शन केले. विद्यालयात प्रसिद्ध साहित्यिकांना बोलावून विद्यार्थ्यांना त्यांचे मार्गदर्शन दिले जाते, जेणेकरून विद्यार्थी स्वतः काव्यनिर्मिती करतील.

**हस्ताक्षर सुधार पंधरवडा -** शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला जून महिन्यात मराठी, इंग्रजी, हिंदीया सर्व विषयांचे हस्ताक्षर नमुने घेतले जातात .विद्यार्थ्यांचे स्वतंत्र हस्ताक्षर कार्यशाळा घेऊन हस्ताक्षर सुधारणा विषयी मार्गदर्शन केले जाते .सुंदर हसताक्षराचे नमुने दाखवले जातात.दररोज नियमितपणे सुरेख हस्ताक्षर लेखनाचा सराव करून घेतला जातो.पंधरा दिवसानंतर सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन केले जाते.

**शैक्षणिक चित्रपट व्हिडिओ यांचे विद्यालयात प्रदर्शन :-** प्रत्येक सत्रात विद्यार्थ्यांना शालेय प्रोजेक्ट द्वारे शैक्षणिक चित्रपट तसेच प्रेरणादायी व्हिडिओ दाखवले जातात. त्यातून विद्यार्थ्यांचे मनोरंजन व शाळेबद्दल ओढ निर्माण करणे उपस्थिती वाढवणे हे हेतू सफल झालेले आहेत. संस्कारक्षम चित्रपट तसेच देशभक्तीपर चित्रपटामुळे विद्यार्थ्यांना मोठी स्वप्न पाहण्यासाठी एक प्रकारचे उत्तेजन या माध्यमातून मिळते.

**सामुदायिक साहित्य कवायत(रिंग डंबेल्स लेझीम घुंगरूकाठी) :–** विद्यालयात आठवड्यातून एकदा प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांच्या कडून योगासने तसेच वेगवेगळे रिंग, डंबेल्स यासारखे कवायत प्रकार करून घेतले जातात. त्याचबरोबर लेझीमचा मुलांचा गट व मुलींचा गट झांजपथक मुलांचा गट व मुलींचा गट यासारखे पथक विद्यालयात निर्माण करण्यात आलेले आहेत. https://youtu.be/kz8lVJrqmdI





**शाळेचे लेझीम व झांज पथक**

**ग्रंथ प्रदर्शन – ग्रंथ दिंडी :-** विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, तसेच अवांतर वाचनाची सवय लागावी, वाचनबद्दल गोडी निर्माण व्हावी यासाठी वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. यावेळी विद्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित केले जाते. व ग्रंथालयातील सर्व पुस्तके विद्यार्थ्यांसाठी वाचनास सदैव उपलब्ध असतात. विद्यार्थ्यांना विविध ग्रंथ व साहित्यिकांची माहिती होते.

**स्नेहसंमेलन व क्रीडा महोत्सव :-** विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यालया मार्फत स्नेह संमेलनाचे आयोजन केले जाते. यामध्ये विद्यार्थी लोकगीत, पोवाडे, स्टेज गीत, भारुड, गायन, नाटिका, इत्यादीचे सादरीकरण करतात. त्याचबरोबर संगीत खुर्ची स्पर्धा, स्मरणशक्ती स्पर्धा, मेहंदी, रंगभरण, रांगोळी स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, फनी गेम्स अशा प्रकारच्या विविध कार्यक्रमांचे विद्यालय आम्हाला प्रभावीपणे नियोजन करून कार्यवाही केली जाते. विद्यार्थ्यांचा शारीरिक विकासाकरिता विद्यालयात दरवर्षी वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. विविध वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. जसे की खो-खो, कबड्डी, भालाफेक, लांब उडी, उंच उडी रनिंग, क्रिकेट इ.



सांस्कृतिक कार्यक्रम



क्रीडा स्पर्धा

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर :-** ई लर्निंग व डिजीटल क्लासरुम विद्यालयातील सर्व बारा वर्गात 40 इंची एलईडी टीव्ही व सुंदरम ई लर्निंग सॉफ्टवेअर बसविण्यात आले आहे. व त्याचा अध्यापनात प्रभावीपणे वापर केला जातो. त्याचबरोबर विद्यालयात तीन एलसीडी प्रोजेक्टर द्वारे विद्यार्थ्यांना इंग्रजी व गणित विषयांचे विशेष अध्यापन व मार्गदर्शन केले जाते. सर्व बारा वर्गात विद्यार्थी सुरक्षा सीसी टीव्ही कॅमेरेबसविण्यात आले आहेत, त्याचबरोबर संपूर्ण शालेय परिसर, क्रीडांगण, रस्ता इत्यादी ठिकाण सीसी टीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. तंत्रज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांची सुरक्षा व शाळेची सुरक्षा यासाठी करण्यात आलेली आहे. ( https://youtu.be/ZTbTDccYCtQ)

विद्यालयाने covid-19 च्या काळात ऑनलाइन शिक्षणाचे प्रभावी काम केलेले आहे. यामध्ये ग्रामीण भागातील शाळा असतानाही शंभर टक्के स्मार्टफोन उपलब्ध करून देण्यासाठी विद्यालया मार्फत 85 हजार रुपये किमतीचे 18 मोबाइल संच विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले जेणे करून कोणताही गरीब विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी गरीब होतकरू मुलांना मोबाईलचे वाटप करण्यात आले. त्यानंतर विद्यालयाने झूम अॅप, व्हाट्सअप च्या माध्यमातून सर्व वर्गाचे सर्व तासांचे ऑनलाइन वेळापत्रक तयार केले.

**प्रशासकीय कामात तंत्रज्ञानाचा वापर** :- विद्यालयाच्या प्रशासकीय कामात सहजता व सुलभता यावी म्हणून तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केलेला आहे. यात विद्यार्थी बोनाफाईड,कॅटलोग दाखले इत्यादी ऑफिस ची सर्व कामे संगणीकृत करण्यात आलेली आहेत. विद्यालयात इंटरनेटचे ब्रॉडबँड कनेक्शन उपलब्ध आहे, सर्व ऑनलाईन फॉर्म भरणे, व शासकीय शिष्यवृत्ती

फॉर्म भरण्याची कामे विद्यालयात केली जातात, विद्यालयात स्वतंत्र संगणक कक्ष असून त्याचबरोबर झेरॉक्स मशीन, फोटो प्रिंटर मशीन, लॅमिनेशन मशिन, इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

**शाळेची यशोगाथा :- विद्यालयास आंतरराष्ट्रीय स्तरावरील आय,एस.ओ.मानांकन प्राप्त :-** आयएस.ओ. मानांकनात करीता आवश्यक असणारे सर्व 66 मानके व निकष पूर्ण करुन विद्यालयाने आयएसओ मानांकन प्राप्त केले आहे. आयएसओ मानांकन प्राप्त करणारे सांगली जिल्ह्यातील माध्यमिक विभागातील पहिले विद्यालय ठरले आहे.

**जिल्हा गुणवंत शिक्षक पुरस्कार व राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार :-**विद्यालयाची प्रगती व यशस्वीतेसाठी भरीव योगदान देऊन शाळा नावारूपास आणली.या कामाची पोचपावती म्हणून सांगली जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा गुणवंत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग यांच्यामार्फत राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारनी सुद्धा सन्मानित करण्यात आलेले आहे.


**पालकमंत्री श्री.जयंत पाटील यांचे हस्ते पुरस्कार**



**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार**

इयत्ता दहावी सलग दहा वर्ष शंभर टक्के निकाल आहे. तर एनएमएमएस, पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये विद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले आहे.

**कला व क्रीडा विभाग - धवल यश :-** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विद्यालयात नियमित क्रीडा सराव व क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात, दरवर्षी विद्यालयातील विद्यार्थी तालुका- जिल्हा व विभाग स्तरावरील, राज्यस्तरा वरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होतात व यशस्वी होतात.चित्रकला, शासकीय ग्रेड परीक्षा शासनाने आयोजित केलेल्या प्रत्येक वर्षी विद्यार्थी ग्रेड परीक्षेसाठी परीक्षेला प्रवेश घेतात व या परीक्षेचा निकाल 95 ते 99 टक्के आहे. इंटरमिजियट परीक्षेचा निकाल प्रत्येक वर्षी शंभर टक्के असतो व एलिमेंटरी परीक्षेत या विद्यालयाने नियमित धवल अशी कामगिरी केली आहे. शाळेचे कला शिक्षक जागतिक कीर्तीचे रांगोळीकार श्री. आदमअली मुजावर यांनी आपल्या स्वतःच्या कला गुणांचा वापर विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी केलेला आहे.

**शाळेतील कलाशिक्षक आदमअली मुजावर यांच्या रांगोळीची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद :-** या विद्यालयाचे कलाशिक्षक मुजावर सर यांनी आपल्या रांगोळी या कलेमध्ये प्रचंड यश संपादन केले असून. आतापर्यंत त्यांनी भगवान महावीर, भगवान गौतम बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व इतर अनेक राष्ट्रपुरुष यांची रांगोळी काढलेले असून त्याची नोंद **लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड**, **ग्रिनीच बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड** संस्थेचे यादीमध्ये यांच्या विक्रमाची नोंद झालेली आहे. त्यांच्या माध्यमातून विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांना यामुळे प्रोत्साहन मिळालेली आहे . महाराष्ट्र

शासनाने राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करून मुजावर सर यांच्या कामाची दखल घेतलेली आहे. तसेच जिल्हा परिषद सांगली यांनी सुद्धा गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान केला आहे.



**लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ग्रिनीच बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आदर्श शिक्षक मुजावर सर**

**निती आयोग भारत सरकार यांच्या मार्फत अटल टिंकरिंग विद्यालयासाठी मंजूर -:** भारत सरकार यांच्या मार्फत अटल टिंकरिंग लॅब साठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.शैक्षणिक वर्षे 2019-20 मध्ये भारत सरकारने निती आयोगा मार्फत या विद्यालयासाठी विद्यार्थ्यांच्या नवोपक्रमाला, संशोधनाला चालना मिळावी म्हणून अटल टिंकरिंग लॅब मंजूर केलेले असून, याचे उद्धाटन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली श्री राउत साहेबयांच्या हस्ते फेब्रुवारी 2020 रोजी संपन्न झालेली आहे या कार्यक्रमासाठी शिक्षणाधिकारी माध्यमिक तेलंग साहेब व शिक्षणाधिकारी प्राथमिक व इतर वरिष्ठ अधिकारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते .https://youtu.be/qNRSAfTagvI







**अटल टिंकरिंग लॅबचे उद्-घाटन करताना मान्यवर**

सर्वच स्तरावर कला, क्रीडा, सांस्कृतिक,यात आपली विजयपताका उंचावणारी आमची शाळा मानाने सांगली जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रातही प्रसिद्ध आहे. आमच्या शाळेचा हा विजयी ध्वज असाच कायम फडकवत ठेवण्या साठी आम्ही सर्व कट्टीबद्ध आहोत.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती अन्नपूर्णा माळी** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, सांगली | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवणी, ता.कडेगाव, जि.सांगली

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री. तानाजी रामचंद्र देशमुख **ईमेल :-** tanajideshmukh@gmail.com




**जिल्हा परिषद शाळा,शिवणी शाळेची इमारत**

**शाळा विकास नियोजन:–** जिल्हा परिषद शाळा शिवणी, येथील शाळेला भौतिक व शैक्षणिक सुविधांची खूपच कमतरता होती. यासाठी खूप दीर्घकालीन नियोजन आवश्यक असल्याचे दिसत होते. पालक वर्ग, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक शाळेत भौतिक व शैक्षणिक सुविधा सज्ज करण्याच्या मानसिकतेत होते. शाळा दर्जेदार व आदर्श बनू शकते असा विश्वास निर्माण केला. यासाठी पालक सभा, माजी विद्यार्थी मेळावे, स्थानिक स्वराज्य संस्थातील पदाधिकारी, देणगीदार यांच्याशी चर्चा करून शैक्षणिक उठाव समिती स्थापन करून वस्तुरूपाने, रोख, देणगी अशा स्वरुपात गरजा पूर्ण करण्याची संकल्पना पुढे आणली व आराखडा तयार केला.

**लोकसहभाग :-** लोकसहभागातून शाळेत स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, किचनशेड साहित्य, आकर्षक रंगकाम, डिजिटल वर्गखोल्या, डिजिटल तक्ते, LED TV, कणाद प्रयोगशाळा निर्मिती, शेतीशाळा प्रकल्प, स्टडी टेबल, इंग्रजी, गणित कीट मांडणी, या सुविधा निर्माण करण्याचे आराखड्यात निश्चित झाले. एका शैक्षणिक वर्षात 940000 रुपये इतका रोख, वस्तू, बांधकाम आदि रूपाने लोकसहभाग मिळविला. गावातील महिला बचत गटांचा सहभाग घेतला. शाळेतील नियोजन क्रीडा, विविध स्पर्धा परीक्षा, सेमी इंग्रजी वर्ग सुरु करणे. कृतियुक्त अध्यापनासाठी प्रयोगशाळा निर्मिती, याकामी महिला पालकांचा उल्लेखनीय सहभाग दिसून आला.





**शाळा व्यवस्थापन समिती बैठक** **डिजिटल वर्ग LED TV देणगीदार**

**मुख्याध्यापक व शिक्षक स्व विकास :-** मुख्याध्यापकांनी शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक यांना घेऊन नामांकित शाळांना भेटी दिल्या. अशा भेटी देऊन मानसिकता तयार केली की शिवणी शाळा यापुढे यांच्या रांगेत असेल. शिक्षणाची वारी यासारख्या उपक्रमात मुख्याध्यापक, अध्यक्ष, यांनी सहभाग घेऊन चांगल्या शाळांची पाहणी केली. विद्यार्थी विकासासाठी मुख्याध्यापकांनी स्वतः कणाद प्रयोगशाळा, शेतीशाळा, औषधी वनस्पती संवर्धन, लिहू आनंदे, प्रश्नमंजुषा, गणित- इंग्रजी कीट मांडणी, बालवाचनालय अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची निर्मिती करून सहकारी शिक्षकांना हे उपक्रम आपल्या वर्गासाठी कसे राबवायचे याचे शाळा स्तरावर प्रशिक्षण दिले.

मुख्याध्यापक व शिक्षकांनी विविध प्रशिक्षणे घेतली. शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम, समृद्धी पर्व, शिष्यवृत्ती परीक्षा कार्यशाळा, मुल्यवर्धन, इंग्रजी भाषा अध्ययन पूरक उपक्रम, नवोपक्रम लेखन, बालकांचे हक्क व सुरक्षा, माझे कुटुंब- माझी जबाबदारी, गुगल मिट क्लासरूम, नेतृत्व विकास, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, TAG इंग्रजी भाषा प्रशिक्षण, शिक्षण परिषद, अभ्यासमाला, EZEE टेस्ट, COVID-19 WASH IN SCHOOL अशी प्रशिक्षणे स्व- विकासासाठी शिक्षक व मुख्याध्यापक यांनी घेतली.

**उपक्रमशील शिक्षक :-** नाविन्य पूर्ण उपक्रम, शैक्षणिक उठाव, पटनोंदणी, दर्जेदार अध्यापन पद्धती ,समाज सहभाग अशा कार्यासाठी उपक्रमशील शिक्षक आवश्यक असतात. त्यांना शिक्षण विवेक पुणे व टी. बी.लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 2020 चा 'शिक्षण माझा वसा' राज्यस्तरीय उपक्रमशील मुख्याध्यापक हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांना मानपत्र, सन्मानचिन्ह, 6500/- रु चेक देऊन गौरविण्यात आले होते. शिक्षण विवेक पुणे आयोजित ‘ शिक्षण माझा वसा ’ कार्यक्रमांतर्गत उपक्रमशील मुख्याध्यापक म्हणून मुलाखत घेण्यात आली. लिंक- https://youtube.be/olThGmx4DVE



**'शिक्षण माझा वसा' राज्यस्तरीय उपक्रमशील मुख्याध्यापक पुरस्कार**

**शालेय उपक्रम :- कणाद प्रयोग शाळा-परिसर अभ्यास भाग 1 निर्मिती व उपयोग :-** शिक्षणाची प्रक्रिया रंजक व्हावी व विद्यार्थ्यांनी पुस्तका बाहेर पडून सभोवताली डोळसपणे पहावे. यासाठी कणाद प्रयोगशाळा परिसर भाग 1 ही संकल्पना आणली व त्याचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव, कृतीद्वारे शिक्षण घेता येऊ लागले. शिक्षकही या प्रयोगशाळेत जाऊन आपल्या परिसर अभ्यास विषयाला, कल्पनांना मूर्त स्वरूप देऊ लागले. परिणामी मुलांना परिसर अभ्यास भाग 1 या विषयाची आवड निर्माण झाली. प्राथमिक शिक्षणाला वेगळी दिशा देणाऱ्या या कणाद प्रयोग शाळेत वनस्पतीचे वर्गीकरण बीजप्रसार औषधी वनस्पती, पाने, फुले, बिया, मुळे यांच्या प्रतिकृती माहिती दर्शक तक्ते व कृती पत्रिका तयार करण्यात आले आहेत.

प्राण्यांचे वर्गीकरण, परीसरातील व्यवसाय यामध्ये बुरुड, कुंभार, लोहार, चर्मकार, सुतार, गवंडी यांची माहिती व कामाची साधने यांचे डिजिटल तक्ते लावून स्वयं अध्ययनाची संधी निर्माण केली आहे.





शिवणी शाळेत लोकसहभागातून कणाद प्रयोग शाळेची निर्मिती

**कणाद प्रयोग शाळेत विद्यार्थी कृतियुक्त शिक्षण घेताना व वर्तमानपत्र कात्रण**

**शेती शाळा प्रकल्प :-** “शेतीशाळा” प्रकल्पांनी मुलांचे मातीशी घट्ट नाते जोडले. बालवयातच मुलांना शेती शाळेचे धडे देणे, औषधी वनस्पतीच्या गुणधर्माबद्दल माहिति आत्मसात करणे, प्रात्यक्षिक अनुभव घेणे, श्रमप्रतिष्ठा, वृक्षसंवर्धन,वृक्षारोपण, शेती विषयक घटक मुलांच्या आवडीच्या पद्धतीने शिकवणे विद्यार्थ्यांना दृढकरण, स्वयंम अध्ययन, संशोधन इत्यादी संधी देणे व अध्ययन निष्पत्तीत100% वाढ करणे यासाठी ह्या प्रकल्पाची परिणामकारकता दिसून आली. बालवयातच मुलांना शेतीशाळेचे धडे देण्यासाठी शालेय परिसरात भाज्यांची लागवड करून शेती शाळा प्रकल्पाची उभारणी केली आहे. मुलांना बियांची ओळख, वाफे तयार करणे, पाणी देणे, तण नाशके, कीड नियंत्रण, खुरपणे, भाज्या काढणे, पिकांचा कालावधी इत्यादी बाबतचे ज्ञान, प्रात्यक्षिक कृतीतून दिले जाते. उत्पादित होणाऱ्या बाबींचा शालेय पोषण आहारात उपयोग करून मुलांना जीवनसत्त्व युक्त आहार देण्याचा यशस्वी प्रयत्न शाळेने केला आहे. औषधी वनस्पती संवर्धन या प्रकल्पात कोरफड, तुळस, बेल, पानफुटी, हिरडा, बेहडा, आवळा, शतावरी, अडुळसा, गुळवेल, सदाफुली, धोतरा, ओवा, आले, हळद, पळस, पिंपळी, शेवगा, पपई यांची लागवड करून त्यांची महिती दर्शक डिजिटल तक्ते विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी लावले आहेत. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना प्रकल्प पध्दतीने गुणधर्म अभ्यासता येतात. गावातील महिला, मुले, तरुण, वृद्ध, औषधी वनस्पतीचा उपचारा साठी उपयोग करतात.





**शेती शाळा प्रकल्प** **औषधी वनस्पतीचा उपयोग समजावताना**

**इंग्रजी गणित मराठी कीट रॅक मांडणी :-** या उपक्रमात शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडून दिलेल्या किटचा विद्यार्थी, शिक्षकांना सहज वापर करता येईल अशी मांडणी करून वापराची सवय लावली. त्यामुळे यासाहित्याचा अध्ययन अध्यापनात उपयोग केल्यास अन्य कोणतेही शैक्षणिक साधनांची गरज नाही. इतके महत्त्वपूर्ण साहित्य गणित-मराठी-इंग्रजी कीटरॅक स्वरूपात मांडणी करून दररोज वापर होऊ लागला.

**लिहू आनंदे :-** या उपक्रमात इयत्ता पहिलीच्या वर्गात लेखनाची गोडी लागण्यासाठी “स्टडी टेबल” चा प्रभावी उपयोग केल्याने दुपारच्या सुट्टीतअन्य मोकळया वेळेत विद्यार्थी लिहू लागल्याने हस्ताक्षर व लेखन गती सुधारण्याचे जाणवले. इयत्ता पहिलीच्या वर्गातील विद्यार्थी 100% लेखनाचा आनंद घेऊ लागले.





**लिहूआनंदे गुणवत्ता उपक्रम** **इंग्रजीकीट रॅक मांडणी**

**कोरोना काळातील उपक्रम - Learning from home :- what's app ग्रुपनिर्मिती** शाळेतील सर्व वर्गातील विद्यार्थ्यांचे व्हाट्सअप असलेले मोबाईल क्रमांक उपलब्ध करून वर्गनिहाय व्हाट्सअप ग्रुप ची निर्मिती केली. ग्रुप वर इमेज, वेबसाईट, युट्युब व्हिडीओ सुरू केले. त्याला पालकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला शिक्षक भेट अँड्रॉइड मोबाईल नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षक गृहभेटी देऊन संपर्कात ठेवले. पालकांना सूचना देऊन अभ्यास दिला गेला. फोन द्वारे शिक्षण ज्या पालकांकडे साधे मोबाईल आहे, त्यांना फोन कॉल द्वारे पुस्तकातील अभ्यास देणे, अभ्यास विषयक संवाद करणे, घरच्या सदस्यांमार्फत अभ्यास कसा घ्यावा अशा चर्चा करणे किंवा या सुविधेचा वापर केला. गुगल मीट द्वारे अध्यापन आठवड्यातून चार ते पाच दिवस दररोज एक तास गुगल मीट द्वारे अध्यापन केले. चर्चा करणे, विद्यार्थी व पालक यांच्याशी वाचन दृढीकरण यासाठी गूगल मीटचा उपयोग केला. **Miss call करा अडचणी विचारा** कालांतराने काही वेळा बॅलन्स ची अडचण येऊ लागली, विद्यार्थ्यांनी, पालकांनी मिस कॉल करा व अडचणी विचारा हा पर्याय उपलब्ध करून दिला. **व्हरांडा शिक्षण** अप्रगत तसेच अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कोरोना प्रादुर्भाव नसताना किंवा एक महिना कोणताही पॉझिटिव नाही अशी स्थिती असताना, वर्गातील चार ते पाच मुलांना सर्व बाबतची काळजी घेऊन शाळा व्हरांड्यात शिक्षण दिले.

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर :-** शैक्षणिक कामकाजात तंत्रज्ञानाचा पद्धती होत असलेला अनुभव आला. शिक्षण क्षेत्रात वेगवेगळया कार्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा लागतोच. शैक्षणिक प्रक्रियेत अप्लिकेशन, सॉफ्टवेअर, युट्युब, संगणकाचा वापर, L.C.D. प्रोजेक्टर, LED विविध ॲप्स, या साधनांचा शिक्षक सातत्याने उपयोग करतात. शाळेमध्ये शिक्षकांना गुणपत्रिका तयार करणे, शालेय आरोग्य तपासणी संबंधी माहिती साठवणे यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग होतो. संदर्भ ज्ञानासाठी, मूल्यमापनासाठी देखील माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग विद्यार्थी शिक्षक करतात. संगीत, खेळ, कार्यानुभव, चित्रकला या विषयांमध्ये माहिती संप्रेषण वापरण्यात अधिक वाव आहे.विविध

शैक्षणिक व व्यवहारिक संदर्भ इंटरनेटच्या मदतीने मिळवता येतात. पॉवर पॉइंट स्लाइड तयार करणे, व्हिडिओ निर्मिती, स्लाईड-शो अशा कामात शिक्षक तंत्रज्ञानाचा उपयोग करताना दिसतात.

प्रशासकीय कामात तंत्रज्ञानाचा अधिक प्रमाणात वापर होताना दिसत आहे. शालेय पोषण आहार (M.D.M) लाभार्थी दररोज भरावा लागतो. सरळ नोंदी, दाखले मागणी, पाठविणे ही कामे करावी लागतात. तसेच विविध स्पर्धा परीक्षा फॉर्म भरणे, मॅट्रिक पूर्व, समाजकल्याण, अल्पसंख्यांक, सावित्रीबाई फुले गुणवत्ता यासारख्या शिष्यवृत्ती कामकाज तंत्रज्ञानाच्या मदतीने शाळा शिक्षकांना व मुख्याध्यापकांना करावे लागते. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व शिक्षक प्रशिक्षण कामी तंत्रज्ञानाचा उपयोग होतो.

**गुणवत्ता व क्रीडा विकास:-** शिवणी शाळेचा पट 155 असून सांगली शिक्षण संस्थे मार्फत घेण्यात येणाऱ्या प्रज्ञाशोध परीक्षे साठी 80% विद्यार्थी बसविले जातात. त्यापैकी 4 ते 5 विद्यार्थी गुणवत्ता यादीत येतात. परीक्षेत दरवर्षी 2 विद्यार्थी मेडल मिळवितात. पतंगराव कदम गुणवत्ता शिष्यवृत्ती परीक्षेत 7 ते 8 विद्यार्थी प्रतिवर्षी यश मिळवितात. सन 2019-20 या शैक्षणिक वर्षात क्रीडाक्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले. खो-खो जिल्हास्तर, कबड्डी तालुकास्तर तर वैयक्तिक क्रीडा प्रकारात विशेष नैपुण्य मिळविले.



**क्रीडा स्पर्धेत शाळेचा विजेता संघ**

शिवणी शाळा ही जिल्ह्यातील उपक्रमशील शाळा म्हणून नावारूपाला आली आहे. कणाद प्रयोग शाळा निर्मिती व वापर शेती शाळा, औषधी वनस्पती संवर्धन, लिहूआनंदे , १००% उपस्थिती चषक योजना, स्पर्धा परीक्षा वर्ग चालविणे, शैक्षणिक उठाव, बालबाजार, क्रीडा नैपुण्य चाचण्या, हस्तलिखित मासिक, प्रश्नमंजुषा, आहारातून आरोग्याकडे , स्नेह संमेलन असे अनेक नाविन्यपूर्ण शालेय व सहशालेय उपक्रम राबविले जातात. यामुळेच आमची शाळा उपक्रमशील शाळा म्हणून नवारुपास आली आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती. अन्नपूर्णा माळी** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, सांगली. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अपशिंगे (मि.) जि. सातरा

**मुख्याध्यापकाचे नाव :–** श्री. राजेंद्र गायकवाड **ई-मेल -** vishalkadam112217@gmail.com





**शाळेची स्वच्छ सुंदर इमारत**

**शाळा विकास :-** मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी अद्ययावत खोली आहे. अध्यापनासाठी ११ वर्ग खोल्या उपलब्ध असून सुसज्ज व बोलक्या आहेत. शाळेमध्ये मुलामुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत. शाळेच्या ग्रंथालयामध्ये ११७५ पुस्तके उपलब्ध आहेत. ११ संगणक व १ प्रोजेक्टर असून विद्यार्थ्यांच्या वापरात आहेत. शाळेचे क्रीडांगण ८२१९ चौ. फूट असून यामध्ये खो-खो, कबड्डी, लंगडी यासाठी क्रीडांगणे उपलब्ध आहेत. शाळेतील सर्व वर्गात इयत्तानिहाय अभ्यासक्रमाचे सॉफ्टवेअर असलेले LED TV वापरात आहेत. शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी जलशुद्धीकरण यंत्राची उभारणी करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रीय अविष्कार अभियानांतर्गत नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्र उपलब्ध आहे. अपशिंगे मिलिटरी या गावाला सैनिकी परंपरा असल्याने मुलांच्या मनामध्ये देशप्रेमाचे वारे आपसूकच वाहतात. शाळेचे बोधवाक्य **"इथे घडती वीर जवान"** असे आहे. शाळेने गुणवत्ता जपली आहे. बालस्नेही व आनंददायी वातावरणामुळे मुले शाळेत रमली आहेत.

**पायाभूत सुविधा :-** शाळेमध्ये आवश्यक अश्या सर्व पायाभूत सोयी उपलब्ध आहेत त्यात मुख्याध्यापक कक्ष, स्वतंत्र वर्गखोल्या, स्वच्छतागृह ,ग्रंथालय, संगणक कक्ष, स्वयंपाक गृह, क्रीडांगण, रॅम्प, विद्युतीकरण,पाण्याची सुविधा, संरक्षक भिंत, विज्ञान प्रयोगशाळा, स्टेज, परसबाग इत्यादी चा समावेश आहे.



**सौ. नीता ढमाले, अध्यक्ष नंदादीप प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने शाळेसाठी जलशुद्धीकरण यंत्र**

**मुख्याध्यापक शिक्षक स्व विकास:-** संघभावना म्हणजे यशाची गुरुकिल्ली. हीच संघभावना खऱ्या अर्थाने अनुभवण्यास मिळेल ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अपशिंगे येथे. कोणतेही काम असो आणि शाळेतील कोणत्याही शिक्षकाचे काम असो, प्रत्येक काम एकजुटीने आणि मिळून-मिसळून करणे हीच खरी आमच्या शाळेच्या यशाची गुरुकिल्ली आहे.
**"Talent Wins games, but teamwork and intelligence win championships."-- Michel Jordan**
प्रशिक्षणामुळे शिक्षकांना विविध अध्यापन पद्धतींची माहिती झाली तसेच सर्व शिक्षक तंत्रस्नेही बनले व सर्व कौशल्यांचा अध्ययन अध्यापनात प्रभावी वापर केल्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यास मदत झाली.

**अध्ययन निष्पत्ती :-** अध्ययन निष्पत्तीचे प्रशिक्षण झाल्यानंतर सर्व शिक्षकांनी याचा चांगला अभ्यास करून ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धती अवलंबली. आणि विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित वर्तनबदल झाला.



**विद्यार्थी ज्ञानरचनावादी पद्धतीने स्वयंअध्ययन करताना**

**सामाजिक सहभाग :-** लोकसहभागातून शाळेमध्ये अनेक बदल घडून आले. गावातील लोकांनी सढळ हाताने शाळेच्या सोयीसुविधां साठी देणगी दिली आहे. ज्यात श्री.मच्छिंद्र ताटे यांनी संपूर्ण शाळेची रंगरंगोटी करणे व चित्रे काढणे यासाठी ३,५०,००० रुपयांची देणगी दिली.




**देणगीतून बदललेले शाळेचे रूप**

या शिवाय विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी शाळा स्तरावरील पुरस्कार अनेक देणगीदारां कडून प्राप्त होतात व दरवर्षी देण्यात येतात. ज्यात मा. श्री. बी. ए. मोरे (माजी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य) १,००,००० मागासवर्गीय विद्यार्थीनी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थीस दिल्या जाते. मा. मारुती निकम (गुरुजी) यांनी कै.संजय निकम (चेअरमन विकास सेवा

सोसायटी) यांच्या स्मरणार्थ ५०,००० वक्तृत्व, निबंध, चित्रकला, हस्ताक्षर इ. स्पर्धा यशस्वी विद्यार्थी श्री. माणिकराव कदम यांनी कै. शिवराम कदम (गुरुजी) यांच्या स्मरणार्थ ११,००० तर माजी सरपंच सौ. सुचिता गडकरी यांनी आपले वर्षाचे मानधन ७,००० विविध स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांसाठी देऊ केले आहेत. डॉ. रविराज निकम यांनी ५,००० शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांसाठी देऊ केले आहेत. श्री. विजय मोहिते यांनी ५,००० क्रीडा स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांसाठी देऊ केले आहेत. या घवघवीत लोकसहभागा नंतर शालेय बांधकामासाठी शैक्षणिक उठाव करण्यात आल्या त्यास देखील उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यात मा. तानाजी पवार (माजी कमांडंट बीएसएफ) रू. १,११,००० एवढे अनुदान दिले त्याचबरोबर मा. टी. एम. निकम (नाना) रू. ५०,००० व मा. श्री. नथू मोरे रू. ११,००० इतके देणगी स्वरुपात बांधकामासाठी उठावा मधून प्राप्त झाल





**देणगीदारां कडून शाळेच्या विकासासाठी देणगी स्वीकारतांना**

**आय.पी.एल. सामना पाहण्यासाठी शाळेची निवड :-** रिलायन्स फाउंडेशनच्या वतीने जि. प. प्राथमिक शाळा अपशिंगे ता. जि. सातारा या शाळेची मुंबई इंडियन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स हा वानखेडे स्टेडियम मुंबई येथील सामना पाहण्यासाठी चारशे विद्यार्थ्यांची सोय करण्यात आली.



**आय.पी.एल. सामना पाहतांना शाळेचे विद्यार्थी**

**आंतरराष्ट्रीय शाळा :-** तत्कालीन शिक्षणमंत्री मा. विनोदजी तावडे साहेब यांच्या संकल्पनेतून स्व. भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा प्रकल्पात शाळेची निवड करण्यात आली. या प्रकल्पात शाळांची निवड करताना उपलब्ध जागा, पटसंख्या, शालेय गुणवत्ता, लोकसहभाग, शाळासिद्धी इत्यादी निकषांचा विचार करण्यात आला.



**तत्कालीन राज्यपाल मा.सी.विद्यासागर राव व शिक्षणमंत्री मा.विनोद तावडे यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय शाळेचे प्रमाणपत्र स्वीकारताना**

**तंत्रज्ञानाचा वापर** :- पाठ्यपुस्तकाबरोबर सर्व शिक्षक अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. कोरोनाच्या संकटकाळात शाळा बंद पण शिक्षण सुरु यासाठी प्रत्येक वर्ग शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला. एलसीडी प्रोजेक्टर चा वापर, एलसीडी टीव्हीचा वापर, अध्ययन अध्यापनात टॅबचा वापर, वर्गनिहाय व्हाट्सअप ग्रुप, पीपीटी चा वापर, वाय-फाय जोडणी, दीक्षा ॲपचा वापर, युट्युब चा वापर, झूम ॲप व गुगल मीट चा वापर, लॅपटॉपचा अध्यापनात उपयोग, ऑनलाइन टेस्टचा वापर, संगणक कक्ष, फ्लीपबुकचा वापर, रीड टू मी ॲप, ऑनलाईन कृतीपत्रिका, इत्यादींचा प्रभावी पणे अध्यापनात वापर करण्यात आला.

**शाळेची यशोगाथा :-** शाळेला जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तरावर कला क्रीडा यामध्ये अनेक पारितोषिके प्राप्त झाली आहेत. ज्यात गीतमंच समूहनृत्य हस्तलिखित प्रश्नमंजुषा हस्ताक्षर या स्पर्धांमध्ये  जिल्हा स्तरावर प्रथम पारितोषिक प्राप्त. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये देखील शाळेने नेत्रदीपक कामगिरी केली आहे. ज्यात खो खो(मुली) स्व.यशवंतराव चव्हाण बालक्रीडा स्पर्धा जिल्हा  विजेतेपद आणि शालेय (शासकीय) क्रीडा स्पर्धा जिल्हा उपविजेतेपद कोल्हापूर विभागीय खो-खो निवड चाचणी १४ वर्षाखालील मुलींमध्ये शाळेच्या तीन मुलींची निवड झाली. वैयक्तिक क्रीडा स्पर्धा ज्यात १०० मी. धावणे यात जिल्हास्तर द्वितीय क्रमांक मिळाला. तसेच कुस्ती (४२ किग्रॅ) मध्ये  जिल्हास्तर तृतीय क्रमांक मिळाला. राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा ज्यात शाळेला बॉक्सिंग स्पर्धेत कास्यपदक तर शाळेच्य एका विद्यार्थ्याची राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेसाठी निवड झाली.



**क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी**

**'अनंत अमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला'.** गौरवाचा उच्चांक गाठण्यास सज्ज अशी आमची जि. प. प्राथमिक शाळा, अपशिंगे (मि.)**'इथे घडती वीर जवान'** ही उक्ती सार्थ करणारे वीरांचे हे गाव. शैक्षणिक गुणवत्ता टिकविण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न आणि सातत्य जपणारी शाळा, संघभावनेच्या, एकीच्या जोरावर विविध यशाचे मानकरी ठरलेले विद्यार्थी व शिक्षक या सर्वांचा परिपाक म्हणजेच या शाळेची यशोगाथा होय. अनेक समस्यांची उकल करण्याचे मार्ग मिळतील आणि या शाळेच्या दीपस्तंभाच्या प्रकाशात निश्चित ध्येयाकडे जाण्याचा यशस्वी मार्ग मिळेल, असा विश्वास आहे. **शाळा आणि शाळेच्या उपक्रमांच्या अधिक माहितीसाठीच्या युटयूब लिंक्स**.

https://youtu.be/10jBDjLGw0E https://youtu.be/0sdmSUcC7YE

https://youtu.be/wmxA72z2bzM https://youtu.be/sGvhjHp2XPI

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. सतीश फरांदे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, सातारा. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, पेंबर, ता.कराड, जि.सातारा.

**मुख्याध्यापकाचे नाव :-** सौ. राजेश्री मिलिंद तोडकर **ई-मेल : -** zpspember@gmail.com




**जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, पेंबर शाळेची भव्य इमारत**

**शाळा विकास :-** "कर्तुत्व व दातृत्व एकत्र येते जेव्हा....माळरान ही फुलते तेव्हा...." आयुष्यात कोणतीही गोष्ट सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी जिद्द, चिकाटी, परिश्रम अंगीकारणे आवश्यक आहे. शाळेच्या परिवर्तनाचा निश्चय करून नावलौकिक मिळवलेल्या कराड तालुक्यातील पेंबर शाळेची ही यशोगाथा. या शाळेची दलदलयुक्त जमीन, बदलते वातावरण आणि जीर्ण झालेली इमारत दिवसेंदिवस धोकादायक बनत चालली होती. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून नवीन इमारत उभी करणे आवश्यक बनले होते, शालेय इमारत बांधकामाची मागणी जोर धरू लागली. परंतु इतकी मोठी इमारत बांधकामासाठी निधी हा लोकसहभागातून उभा करणं शक्य नव्हतं. शिवाय शासकीय निधी मिळणेही शक्य नव्हते, म्हणूनच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य श्री. वैभव ढाणे यांच्या कल्पनेतून "इमर्सन क्लायमेंट टेक्नॉलॉजी" प्रा. लि. अतीत यांच्याकडे CSR फंडातून ७ वर्गखोल्यांचे बांधकाम करून देण्यासंदर्भात सातत्याने शाळा व्यवस्थापन समिती व शाळेतील शिक्षकांनी पाठपुरावा केला. या मागणीला कंपनीचे प्रोडक्शन मॅनेजर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला त्यामुळे जिल्ह्यातील पहिली **'भूकंप प्रतिरोधक'** सुसज्ज अशी आठ वर्गखोल्यांची इमारत पूर्णत्वास आली. कंपनीच्या माध्यमातून ७० लाखांची इमारत सात वर्गखोल्या बांधकाम केले व समग्र शिक्षा अभियान १ वर्ग खोली बांधकाम केले. शाळेला भौतिक सुविधांनी संपन्न करण्यावर भर दिला आहे.

**लोकसहभाग :-** शाळेची इमारत बांधून तयार झाली असली तरी अनेक सोयी सुविधांची आवश्यकता होती. त्यासाठी मोठ्या प्रमाणवर लोकसहभाग जमवून त्याद्वारे कामे करण्यात आली. इप्सन कंपनीचा प्रोजेक्टर व संगणक ग्रामपंचायत पाल काढून मिळाले. कालांतराने परत स्मार्ट प्रोजेक्टर, स्मार्ट टीव्ही, ग्रामपंचायत पाल यांचे काढून मिळाला. वर्गखोली बोलक्या भिंती, रॅम्प, ग्रील, मुलींचे स्वच्छता गृह, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सिस्टीम पाथ वे, कंपाउंड रंगकाम, हॅन्ड वॉश स्टेशन, ई बाबी बांधकामा सोबत इमर्सन क्लायमेट टेक्नॉलॉजी प्रा.लि. अतीत यांनी पुर्ण करून दिले. संगणक लॅब फर्निचर, श्री दत्त संस्थान, पालयांच्या काढून मिळाले. सागवानी टेबल, खुर्ची, वर्गखोल्या पडदे, स्टुल, वर्गखोली कपाटे, चप्पल स्टॅन्ड, कुंड्या व रोपे अध्ययन पूरक साहित्य ई. साहित्य शाळेतील आजी व माजी शिक्षकांनी पुरविले. C.C.TV

यंत्रणा १३ पाल गावातील आजी- माजी शिक्षक यांच्या काढून प्राप्त. इंटरनेट सुविधा, संगणक हे गावातील दानशूर व्यक्तींनी दिले. यातून शाळा समृद्ध झाली.



**शाळेतील उपलब्ध भौतिक सुविधा पहा -** https://youtu.be/4kkGFXGvA5E

**मुख्याध्यापक व शिक्षक स्व विकास** :-स्व विकसासाठी विविध प्रशिक्षणे पुर्ण केली. महाराष्ट्र राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी प्रशिक्षणे अध्यापन अद्ययावत करण्यास प्रभावी ठरली आहेत. भाषा व गणित विकास प्रशिक्षण यामुळे भाषा व गणित विषयक संबोध स्पष्ट होण्यास तसेच विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत वाढ होण्यास मदत झाली आहे. भाषा गणित व इंग्रजी पेटी प्रशिक्षण यामुळे शैक्षणिक साधनांचा सहज सुलभ वापर करणे व शैक्षणिक जाणीव समृद्ध करण्यास मदत झालीनिष्ठा प्रशिक्षण शिक्षकांच्या व्यक्तिमत्व विकासाबरोबर विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व व सर्वांगिण विकास करणेसाठी हे प्रशिक्षण शिक्षकांना मार्गदर्शक ठरले. अध्ययन निष्पत्ती प्रशिक्षण या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील उणिवा दूर करणे व त्यास उच्चतम पातळी कडे नेण्यास मदत झाली. मूल्यवर्धन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक विचार, सामाजिक भावना, नेतृत्व, व सहकार्य इत्यादी गुणांची जाणीव जागृती करण्यास मदत झाली.अपंग समावेशित शिक्षण दिव्यांग मुलांना सामान्य मुलाबरोबर शिक्षणाची संधी निर्माण करणे यासाठी हे प्रशिक्षण लाभदायी ठरले लॉकडाऊन काळातील प्रशिक्षण झूम, गुगल मीट चा वापर, प्रशिक्षण इत्यादी मुळे अध्ययन - अध्यापनात प्रभावी बदल घडून येण्यास मदत झाली.

**अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर :-** सध्याच्या संगणक युगात स्वत: वापरण्याबरोबरच आपले विद्यार्थी देखील संगणक युगात अगदी सहजतेने रमावेत यासाठी शिक्षक व मुख्याध्यापकांनी आधुनिक तंत्रज्ञान अवगत केले. संगणक व प्रोजेक्टर शिक्षकांबरोबरच मुले देखील सहजतेने हाताळू लागली. गुगल, युट्युब या माध्यमाद्वारे शैक्षणिक माहिती शोधू लागली. नवनवे शोध व शंका निरसन देखील या तंत्रज्ञानामुळे सुकर झाले .स्मार्ट टी.व्ही.मुळे वर्गात पाठ्यपुस्तकातील पाठ,कविता यांचे बोलके चित्र विद्यार्थाना दाखविता आले. Q R कोड च्या माध्यमातून, दिक्षा ॲप च्या मदतीने, पालक देखील मुलांचा अभ्यास तंत्रज्ञानाच्या मदतीने घेऊ लागली. तसेच प्रत्येक वर्गाचे व्हाट्सअप ग्रुप केल्यामुळे पालकांशी सहज संवाद साधला गेला. वर्गातील व शाळेतील कृती, सराव, गृहपाठ घरापर्यंत पोहचू लागला. या आधुनिक तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा फायदा covid-19 च्या लॉकडाउन काळात शिक्षक व विद्यार्थी, पालक यांना झाला. 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' या उपक्रमांतर्गत मुले पालक व शिक्षक शाळेशी जोडून राहिले. याच काळात शिक्षकांनी विविध ऑनलाईन प्रशिक्षणे केली. तंत्रज्ञान विकासात वाढ झाली.



**लॉकडाउन काळातील ऑनलाईन शिक्षण व उपक्रम** https://youtu.be/DL5FF8bw5tY

**२१ शालेय उपक्रम :-** व्या शतकाकडे वाटचाल करीत असताना नवनवीन शोध तंत्रज्ञान व विकास झपाट्याने घडवून घडून येत आहे .पण त्याचबरोबर त्याच गतीने पर्यावरणाचा ऱ्हास देखील होत चालला आहे. म्हणूनच पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी पर्यावरण नवोउपक्रमाची निवड करण्यात आली. वृक्षदिंडी व जनजागृतीपर फेरी झाडे लावणे व त्याचे संरक्षण व संवर्धन करण्याची शपथ घेणे. जून महिन्यात वृक्षदिंडी काढणे व झाडांचे वाटप. कुंडीतील लागवड शाळा व घर येथे कुंडीत झाडे लावणे .एक मूल एक झाड प्रत्येकाने एक झाड आपल्या परिसरात लावणे. पर्यावरण विषयक व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. परिसरातील वनस्पतींची माहिती संकलन करणे. हा प्रकल्प मुलांनी राबविला. भारतीय सण व निसर्ग या संदर्भात विविध वृक्षांची माहिती मुलांनी गोळा केली. पर्यावरण विषयक व पर्यावरण पूरक सण व उत्सव होळी लाकडे न जाळता, कचऱ्याची होळी करणे, ग्राम स्वच्छता करणे. फटाके मुक्त दिवाळी साजरी करणे. यामुळे प्रदूषणाला आळा बसण्यास मदत झाली. गणेश उत्सव इको-फ्रेंडली गणेश मूर्ती बसवली. व त्याचे विसर्जन घरीच हौदात करून ते पाणी झाडांना घालने. सण, कार्यक्रम इत्यादी मध्ये प्लास्टिक, थर्माकोल चा वापर न करणे. या संदर्भात जागृती करणे. पर्यावरण संरक्षण व संवर्धन या विषयावर संदर्भात शाळेमध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, व चित्रकला स्पर्धा घेतल्या. 'खंडोबा यात्रा' पाल गावात संपन्न झाल्यानंतर ग्रामस्वच्छता उपक्रम राबवला. अशाप्रकारे वेगवेगळया मार्गांनी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणा विषयी जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



**उपक्रमाची क्षणचित्रे**

**अध्ययन अध्यापन पद्धती :-** शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जा लाभल्यामुळे अध्ययन- अध्यापन पद्धतीत देखील अनेक सकारात्मक बदल घडून आले. विषय गोफ पद्धती यामध्ये एका विषयातून दुसऱ्या विषयात जाणे. एका विषयाचा संबंध दुसऱ्या विषयाशी घालणे. यामुळे विद्यार्थ्यांना अवघड विषय ही सोपे वाटू लागले. आनंददायी शिक्षण, चर्चा पद्धती, गटपद्धती, खेळातून शिक्षण, क्षेत्रभेटी, कला कार्यानुभव कार्यशाळा, साहित्य संगितमय कवायत, प्राणायाम, योगासने इ. चा वापर अध्ययन-अध्यापन समृद्ध करण्यास होत आहे. त्याचबरोबर भाषा, गणित, इंग्रजी पेटी चा वापर केल्यामुळे अध्ययन-अध्यापन सोपे होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांचा सराव होण्यास याची मदत झाली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरामुळे अध्ययन-अध्यापन सोपे व परिणाम कारक झाले. 'ई लर्निंग' हा शिक्षणाचा केंद्रबिंदू होऊ लागला. यासाठी शिक्षकांनी आपले ज्ञान अद्यावत ठेवण्यासाठी प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन ची सवय लागण्यासाठी शाळा सुटल्यानंतर ज्यादा तास घेतले जातात. संगणक कक्ष शाळेत असल्यामुळे विद्यार्थी संगणक प्रेमी बनले. संगणक सहजतेने हाताळू लागले. त्यांच्यामध्ये सृजनशीलता निर्माण होऊ लागली.याचाच परिणाम म्हणून विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये आत्मविश्वासाने भाग घेऊ लागले. यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होण्यास मदत झाली. लॉकडाऊन काळात सर्व शिक्षक व मुख्याध्यापकांनी झूम ॲप, गूगल मीट, व्हाट्स ॲप ग्रुप या माध्यमातून विद्यार्थी व पालक संपर्क ठेवण्यात यश मिळाले आहे. दीक्षा ॲप वापरातून पालक देखील मुलांचा अभ्यास घरी घेऊ लागले. गुगल फॉर्म द्वारे विद्यार्थीचे मूल्यमापन करता आले. शैक्षणिक दिनदर्शिका महिनावार, आठवडा, निहाय शैक्षणिक नियोजन, पीडीएफ सर्व पालकांपर्यंत पोहोचून त्यांची माहिती देण्यात आली आहे. 'गोष्टींचा शनिवार' दर शनिवारी मुले मोबाईल वर आलेली गोष्ट आवडीने वाचतात. त्यामुळे वाचन प्रभावी होण्यास मदत झाली आहे.अशाप्रकारे तंत्रज्ञानामुळे अध्ययन व अध्यापन प्रक्रिया सहजसोपी बनली आहे. पहा https://youtu.be/BoBQf7wCqgY

**आंतरराष्ट्रीय शाळा निवड :-** सन २०१९- २० मध्ये शाळेला महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाकडून शाळेला 'आंतरराष्ट्रीय शाळा' संलग्नता मिळाली. महाराष्ट्र राज्यातील ८१ निवडक शाळांमध्ये पेंबर शाळेची वर्णी लागली.





**तत्कालीन राज्यपाल मा.विद्यासागर राव, तत्कालीन शिक्षणमंत्री,मा.विनोद तावडे यांचे हस्ते आंतरराष्ट्रीय शाळा संलग्नता प्रमाणपत्र स्वीकारताना मुख्याध्यापक**

**शाळा विकासात शिक्षक – पालक संघ व शालेय व्यवस्थापन समितीचा सहभाग:-**दर महिन्याला शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक-पालक सभाघेतल्या जातात. त्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती पालक व शिक्षक यामध्ये समन्वय साधला गेला व याचा उपयोग शाळा व विद्यार्थी विकास यासाठी झाला.व्यवस्थापन समिती सदस्य शिक्षक व शाळेच्या समस्या समजून घेऊन त्याचे निराकरण करतात. वेळोवेळी शिक्षकांना मोलाचे मार्गदर्शन करतात. त्यामध्ये

विविध कौशल्य मुलांना पालक ग्रामस्थ शिकवतात. तसेच दर महिन्याच्या शेवटचा शनिवार क्षेत्रभेटीचा उपक्रम आयोजित केला जातो. यामध्ये देखील पालक सहभाग घेतात. व गरज असेल तेथे मदत देखील करतात. शाळेतील उपक्रमात, कार्यक्रमात पालक व व्यवस्थापन समिती उत्साहाने भाग घेतात.



**'आदर्श शाळा व्यवस्थापन समिती' तालुकास्तरीय पुरस्कार**

**व्हर्च्युअल क्लासरूम** :- सन २०१९ -२० या वर्षात शाळा, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व ग्रामपंचायत यांच्या मदतीने शाळा डिजिटल करण्यात यश मिळाले आहे. शाळेमध्ये प्रोजेक्टर, संगणक, प्रिंटर, वायफाय इत्यादी सुविधा असल्यामुळे अध्ययन- अध्यापनात व प्रशासकीय कामात तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. व्हर्च्युअल क्लासरूम व संगणकाचा वापर मुले व शिक्षक सहजतेने करतात. व यामुळे शिक्षण प्रक्रिया सुकर बनली आहे. संगणकातील एज्युकेशन सॉफ्टवेअरमुळे पुस्तके बोलकी झाली. सरावासाठी मुले त्याचा वापर करू लागली. महाराष्ट्र शासनाकडून शाळेला व्हर्च्युअल क्लासरूम मिळाली आहे. त्यामुळे राज्य स्तरावरून दिलेले प्रशिक्षण व माहिती आमच्यापर्यंत सहजतेने पोहोचण्यास मदत झाली आहे.



**व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन करताना मा.शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड मा.विशाल सोळंकी, शिक्षण आयुक्त मा.दिनकर पाटील संचालक SCERT पुणे.**

**शाळेची यशोगाथा :-** यशवंत व्यक्तिमत्व विकास स्पर्धा यामध्ये तालुका स्तरापर्यंत विद्यार्थ्यांनी यश मिळविले. लहान गट, मोठा गट, कुस्ती स्पर्धा, प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक. लोकनृत्य- शेतकरी नृत्य, कविता सादरीकरण, चित्रकला स्पर्धा, तृतीय क्रमांक, बुद्धिबळ सहभाग, लंगडी, द्वितीय क्रमांक. कराड तालुका शिक्षण महोत्सवात शाळेने आधुनिक तंत्रज्ञान व दिक्षा ॲपचा, अध्ययन-अध्यापनात वापर करणे या विषयावर शैक्षणिक स्टॉलची मांडणी व सादरीकरण केले. बहुजन समाज समिती मार्फत शाळेस 'आदर्श शाळा व्यवस्थापन समिती' चा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. स्काऊट गाईड तालुकास्तर मेळाव्यात विद्यार्थी सहभाग व लेखी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला.स्पर्धा परीक्षांमध्ये शिष्यवृत्ती, नवोदय इ.मध्ये १००% विद्यार्थी सहभाग. गतवर्षी शिष्यवृत्ती परीक्षेचा शाळेचा 75 टक्के निकाल लागला.



**शाळेतील विजेते तारे**

१ कोटी शैक्षणिक उठाव असणाऱ्या व लोकसहभागाचे एक उत्तम उदाहरण असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, पेंबर ची यशोगाथा. सर्व भौतिक सुविधांनी संपन्न भूकंप प्रतिरोधक इमारत व आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देणारी उपक्रमशील शाळा म्हणून शाळेला नावलौकिक मिळालेला आहे. शाळेच्या यशस्वी वाटचालीत आम्हाला शाळा व्यवस्थापन समिती, इमर्सन क्लायमेट टेक्नॉलॉजी प्रा.लि. अतीत व ग्रामस्थ यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळालेले आहे. या सर्वांच्या साथीने यापुढेही शाळेच्या प्रगतीचा आलेख चढता ठेवण्यास आम्ही सदैव प्रयत्नशील राहू.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ.सतीश फरांदे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, सातारा. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# केंद्रशाळा खारेपाटण नं.१, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग

**मुख्याध्यापकाचे नाव :-** प्रदिप दत्ताराम श्रावणक **ई-मेल :-** zp27330306101@gmail.com




**केंद्रशाळा खारेपाटण नं.१ शाळेची इमारत**

गोवा मुंबई महामार्गावरील निसर्गसंपन्न अशासिंधुदुर्ग जिल्ह्यातील 'खारेपाटण' हे एक खेडे गाव. यामध्ये स्थापन झालेली डोंगर माथ्यावर समृद्ध निसर्गाच्या सान्निध्यात असलेली खोरपाटण केंद्रशाळा नं 1. सिंधुदुर्ग मुख्यालयापासून सुमारे 65 कि.मी. दूरवर असणारी ग्रामीण भागातील हीच शाळा आज संपुर्ण जिल्ह्याच्या अभिमानाचा केंद्रबिंदू ठरली आहे. 1860 सालापासूनची दीर्घ परंपरा लाभलेली ही शाळा. कालच्या जगापेक्षा आजचे जग वेगळे आहे, सर्वच क्षेत्रांत नवनवीन विचारांचे वारे वहाताहेत. अशा वेळी या शाळेनेही कात टाकून जणू नवीन तेजस्वी रूप धारण केले आहे. नवनवीन विचारांच्या रेट्यात या शाळेवर परिणाम होऊन पटसंख्या घटत गेली होती. पण गेल्या सहा वर्षात शाळेने विकासाच्या दिशेने भरारी मारली आहे. यासाठी विचार, कृती, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सर्वांच्या प्रयत्नांचा समन्वय इत्यादी अनेक गोष्टी घडल्यात. यामध्ये शाळा मुख्याध्यापक, शिक्षक ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती इत्यादी गावातील विविध घटकांच्या प्रयत्नांच्या समन्वयातून हे सारे थक्क करणारे परिवर्तन घडू शकल "नवी भरारी नवी दिशा, नवे स्वप्न नवी आशा, नवे शिक्षण हे तंत्र समजुन घेऊ मिळे आयुष्याला नवी दिशा " या उक्तीप्रमाणे शाळेशी संबधित सर्व घटकांनी शिक्षण क्षेत्रात येणारे नवीन विचार, नवीन तंत्रे समजुन घेतली. फार झपाट्याने बदलत चाललेल्या काळाशी जुळवून घेण्याची मनाची तयारी केली. आपआपसांतील मतभेद बाजूला ठेवून शाळेचा विकास हा एकच ध्येयाचा तारा समोर ठेवला आणी शाळेच्या रुपात आंतर-बाह्य बदल घडवून आणला. अशा दृढ निश्चयाने सर्व भारावून गेले. शाळेच्या विकासासाठी शाळेशी संबधित प्रत्येक घटकाने योगदान दिले. आणि त्यामूळेच आजच्या, आमच्या वेगळया अस्तित्वाने झळाळून गेलेल्या शाळेचे स्वरुप शाळेला प्राप्त झाले. संपूर्ण पालक वर्ग, ग्रामस्थ ,शाळा व्यवस्थापन समिती शिक्षक इत्यादी सर्व घटकांच्या प्रयत्नांतून शाळेत पुढीलप्रमाणे बदल घडवून आणले. https://youtu.be/odbrb2Z8tRw

**शालेय विकास :-** शाळेच्या भिंतीच्या आत एक छोटेसे पण अत्यंत चैतन्यदायी असे विश्व असते. त्या चिमुकल्या विश्वाच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण शाळेला भोवताली भिंत बांधण्यात आली, शाळेचे प्रवेशद्वार आकर्षक कमानीने सजविण्यात आले.

शाळेच्या कंपाऊंडच्या आत आलेल्या  मुलांची मने प्रसन्न राहिली पाहिजेत म्हणून शाळे भोवती सुंदर फुलबाग व परसबाग फुलवली गेली. मुलांना केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर सर्व प्रकारचे ज्ञान पुरवून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा यासाठी शाळा कटीबध्द असते. मुलांच्या अंगच्या चांगल्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या कलागुणांचाही विकास व्हावा यासाठी आकर्षक अशा रंगमंचाबरोबरच संगीत साथीच्या साधनांची उपलब्धता करुन दिली लोकसहभागातून संगीत शिक्षक,शिपाई यांची नियुक्ती केली गेली. https://youtu.be/im0lhE1ByNg




**शाळेचे विद्यार्थी आपले कलागुण सादर करतांना**

**लोकसहभाग :-** पालक आणि ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्यातून  शाळेचा सर्वांगीण विकास सामावलेला आहे या जाणिवेतून सर्वांनी मिळून आजपर्यंत 6 वर्षात सुमारे 60 लाखांचा शैक्षणिक उठाव करुन शाळेला आवश्यक अशा सर्व भौतिक आणि शैक्षणिक सुविधा पूर्ण केल्या. यातील ठळक बाबी शाळेला प्रवेशद्वारासहीत पुर्ण संरक्षक भिंत तयार करण्यात आली. सुंदर फुलबाग व हिरवाई परसबाग. भव्य व आकर्षक रंगमंच. सर्व इ.1 ते 7 वर्गखोल्यांमध्ये संगणक सेवा, नाविण्यपुर्ण प्रयोगशाळा संगीत साहित्य उपलब्धता. TATA CSR फंडातून सुमारे 3 लाखाचे डिजिटल साहित्य उपलब्धता. इंटरकॉम साउंड सिस्टिम. इंटरनेट सेवा broadband उपलब्धता. 24 तास स्वच्छ शुद्ध पाण्याची सोय, water cooler व purifier. स्वतंत्र विद्यार्थी ग्रंथालय सुविधा. आवश्यकतेनुसार मुला-मुलींसाठी पुरेशी शौचालय व्यवस्था. वीज सुविधेसह ज्ञानरचनावादी वर्गखोल्यांची रचना.लोकसहभागातून संगीत,कार्यानुभव शिक्षक व शिपाई नियुक्ती देखील करण्यात आली.

**विद्यार्थी विकास :-** विद्यार्थ्यांनी अभ्यासेत्तर अवांतर वाचनही केले पाहिजे यासाठी “वाचाल तर वाचाल “ अशा नुसत्या उक्ती लिहून नाही तर विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज असे ग्रंथालय निर्माण केले. वाचनालयामध्ये विद्यार्थ्यांना वाचनीय पुस्तकांबरोबर त्यांना मोकळया वेळात येऊन वाचता यावे यासाठी त्यांची बैठक व्यवस्था टेबल व बेंचेस  ठेवून केली आहे.




**"शोध नवा, बोध नवा, नव्या कल्पना नित्य आणू अमलात नव्या योजना"**

**अध्ययन – अध्यापन पद्धती :-** प्रत्येक वर्गखोलीत वीजेची सोय करून वर्गखोल्यांची रचना ज्ञानरचनावादी वर्गाप्रमाणे करण्यात आली. शाळेच्या भिंती बोलक्या करण्यात आल्या. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीवर लक्ष केंद्रीत केले त्यासाठी अनेक उपक्रम राबवले.त्यासाठी अनेक गोष्टींचा बारकाईने विचार करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांच्या मनांना चैतन्याचा, सर्जनशीलतेचा,उपक्रमशीलतेचा, प्रयोगशीलतेचा आणि नाविन्याचा स्पर्श झाला पाहिजे. त्यासाठी ज्ञानरचनावादी तंत्रज्ञानाद्वारे अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुरु केली. 'ओपन डे' ही कल्पना राबवून पालक,विद्यार्थी,शिक्षक,मुख्याध्यापक या सर्वांनी एकत्र येऊन चर्चा घडवू आणली, यामुळे शाळेशी संबधित विविध घटकांमध्ये समन्वय घडवून आणला. शैक्षणिक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. त्यातील ठळक मुद्दे ज्ञानरचनावादी व तंत्रज्ञानाद्वारे अध्ययन-अध्यापन, सराव चाचण्या आणि जादा तासिकांचे आयोजन, नवोदय विद्यालय, MTS, शिष्यवृत्ती परीक्षा इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग ज्यादा तासिकांचे नियोजन करण्यात आले.

**तंत्रज्ञानाचा वापर :-** आजच्या नव्या शतकातील नवनवीन आव्हानांना सामोरा जाणारा सक्षम असा गावचा विद्यार्थी घडावा यासाठी 'नवीन व अत्याधुनिक तंत्राचा उपयोग केला. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग करून पाहता यावेत, साहित्य हाताळता यावे यासाठी सुसज्ज अशी प्रयोगशाळा उभी राहिली, 1 ली ते 7 वी च्या वर्गखोल्यांमधून संगणक सेवा पुरवण्यात आली. TATA CSR फंडातून सुमारे तीन लाख रुपयांचे डिजीटल साहित्य उपलब्ध करण्यात आले, इटरकॉम साऊंड सिस्टीमची सुविधा उपलब्ध करण्यात आली.




**डिजिटल वर्गाचे उद्घाटन करतांना मान्यवर**

**शालेय उपक्रम :-** केवळ विद्यार्थीच नव्हे तर गावातील सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक विकासाचे केंद्रबिंदू शाळा बनली यासाठीही विविध उपक्रम राबविले. गावातील उत्सवात विद्यार्थी व शिक्षकांचा आवश्यकतेनुसार सहभाग ठेवला.सर्व धर्मीय सणांमध्ये शाळा व शाळा व्यवस्थापन समिती यांचा सहभाग ठेवला. 'उत्कर्षा' माध्यमातून समाज प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न केला, आजही ग्रामीण भागातील महिला ही अंधश्रद्धेच्या जाळयात आहे. महिला मेळावे घेऊन महिलांचे प्रबोधन घडवून आणले. त्यातून शाळेचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोप-यात पोहचले त्यातूनच शाळेला 'राज्यस्तरीय शिक्षणाची वारी' साठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातून प्रातिनिधिक रूपाने शैक्षणिक सादरीकरण करण्याची सुसंधी मिळाली शाळेचा नावलौकिक ऐकूण सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातून तसेच अन्य भागातूनही शाळेला भेटी देणाऱ्या लोकांची,अभ्यासकांची,तज्ञांची संख्या वाढली. आपले सामाजिक भान राखत गावासाठी शिक्षक, विद्यार्थी, व पालक यांनी मिळून वनराई बंधारा बांधला. एक दिवस बळीराजाचा या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतात अनुभव दिला जातो. लोकसहभाग शाळेशी संबधित सर्व घटकांचा योग्य समन्वय असेल तर शाळेचा विकास पर्यायाने गावाचा विकास साधणे अशक्य नसते याचा वस्तूपाठ जणू खारेपाटण केंद्रशाळा नं 1 या शाळेने घालून दिला. एक 'आदर्श शाळा' म्हणून जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेरही शाळेची प्रतिमा निर्माण झाली आहे. https://youtu.be/Y9LviKBYG9A




**सामाजिक उपक्रमात शालेय सहभाग** https://youtu.be/EFx8hGh5BUE

**शाळेची यशोगाथा :-** नवोदय विद्यालयाच्या परीक्षेतून विद्यालयासाठी विद्यार्थ्यांची निवड झाली MTS परीक्षेचा निकाल १००% लागला. शाळेतील विद्यार्थी विविध कीडा- स्पर्धां मधूनही आपले क्रीडा नैपुण्य दाखवतात. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून दिली जाते.शालेय गुणवत्तेत वाढ होण्यासाठी योगा,निष्ठा या शिक्षकांनी घेतलेल्या प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत आमूलाग्र बदल दिसून आला. विद्यार्थ्यांचे इंग्रजी प्रशिक्षणामूळे विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये या विषयाचे संभाषण कौशल्य विकसित झाले. जिल्हा तालूका स्तरावर वेगवेगळया कब्बड्डी ,खो खो ,वैयक्तिक क्रिडा प्रकारा मध्ये तसेच जिल्हा स्तरीय नृत्य व समुह गायन स्पर्धेमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सहकार्य, ऐक्य, प्रयत्नातील सातत्य, घटकांचा एकमेकांशी योग्य समन्वय, योग्य नियोजन व कठोर कार्यवाही इत्यादी अनेक गोष्टींमुळे खारेपाटण केंद्रशाळा नं 1 ही एक आदर्श शाळा बनली आहे. इ.स.1860 साली खारेपाटण गावातील डोंगर माथ्यावर शाळेच्या रुपाने एवढेसे लावलेले रोप पण आज त्याचा वेलू गगनावरी जात आहे. हे सर्व परिवर्तन आणि विकासाप्रती होत असलेली वेगवान वाटचाल गावातील सर्व लोकांच्या आभिमानाचा केंद्रबिंदू ठरत आहे, शैक्षणिक क्षेत्रातील घटकांना मार्गदर्शक ठरत आहे. यासाठी गावातील अनेकांनी बौद्धिक, शारिरीक,आर्थिक शक्ती खर्ची पडलेली आहे. सुमारे 60 लाखांचा निधी गावातून उभा राहिला. लोकसहभागातून शाळेचा असा अभूतपूर्व विकास घडून आला. खारेपाटण केद्रशाळा नं 1 मध्ये विकास प्रक्रियेच्या या नदीचा उगम झालेला आहे. ती भविष्यातही अशीच वेगाने वहात रहावी. **"विश्वास हा मनीचा दावू या जगाला, आम्ही रवी उद्याचे अंधार भेदण्याला."** याप्रमाणे या शाळेतून व्यक्तीमत्वाचे रोपटे घेऊन बाहेर पडणारे विद्यार्थी भविष्यातले समाजातील तळपते तारे बनून अंधाराचा भेद करतील.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
| --- | --- | --- |
| **डॉ. शोभा मिसाळ** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, सिंधुदुर्ग. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## श्री देवी सातेरी हायस्कूल, वेतोरे, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग

**ई-मेल:-** saterihighschool@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** सौ. स्वाती रविंद्र वालावलकर **ई-मेल :-** swati.walawalkar64@gmail.com




**श्री देवी सातेरी हायस्कूल, वेतोरे शाळेची इमारत**

**शालेय विकास :-** वाडीवारावडे, तेंडोली, गोवेरी, खानोली आणि वेतोरे या पंचक्रोशीतील मान्सूनवर अवलंबून असणाऱ्या होतकरू शेतकऱ्यांच्या बालकांना माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणाच्या उद्देशाने वेतोरे येथील शिक्षणप्रेमींनी शिक्षणप्रसारक समिती, वेतोरे या संस्थेअंतर्गत १६ डिसेंबर १९६० रोजी श्री देवी सातेरी हायस्कूल, वेतोरेची स्थापना केली. त्या वेळी केवळ७ मुलांच्या संख्येवर प्रशालेच्या इयत्ता ८ वी च्या वर्गाचा श्री गणेशा सुरु झाला. हायस्कूलच्या भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी संस्थेने विविध देणगीदारांतर्फे निधी उपलब्ध करून ७ खोल्यांची कौलारू इमारत १९६८ पर्यंत पूर्ण केली. त्यानंतर या हायस्कूलला इयत्ता ५ वी चा वर्ग जोडण्यात आला. विद्यार्थ्यांची वाढती संख्या विचारात घेता मार्च २००६ मध्ये एस.एस.सी. स्थापना करण्यात आली. पालक आणि विद्यार्थी वर्गाच्या मागणी नुसार जून २०११ पासून प्रशालेमध्ये इयत्ता ८ वी पासुन सेमी माध्यमाचे वर्ग चालू करण्यात आले. जुलै २०११ मध्ये महाराष्ट्र संचनालय, पुणे व केअर प्रोजेक्ट & टेक्नोलॉजी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ICT योजनेंतर्गत प्रशालेत अद्यावत संगणक प्रयोगशाळेची निर्मिती करण्यात आली. एप्रिल २०१३ मध्ये प्रशालेतील सर्व कर्मचार्यांच्या आर्थिक योगदानातून प्रशालेच्या आवारात बोअरवेलची निर्मिती हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला गेला. जून २०१३ पासून विद्यालयात इयत्ता ५ वी पासून सेमी माध्यमाचे वर्ग सुरु करण्यात आले. जून २०१४ पासून प्रशालेत इयत्ता ८ वी पासून संस्कृत संयुक्त हा विषय सुरु करण्यात आला. त्याचबरोबर स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर संस्थेन११ वी विज्ञान शाखा जून २०१४ पासून सुरु केली केवळ ७ विद्यार्थी संख्येवर संस्थेने सुरु केलेल्या या विद्यालयात २०२० -२०२१ या चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी च्या वर्गात एकूण ४०३ विद्यार्थी तसेच इयत्ता ११ वी ते १२ वी च्या वर्गात एकूण २७५ विद्यार्थी मिळून एकूण ६७८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**नाविन्यपूर्ण उपक्रम:- ज्ञानकंदील निर्मिती :-** प्रत्येक कृती विचारांना जन्म देते, विचारांची ठिणगी पेटविते. विद्यार्थ्यांचा अध्यायनामध्ये वैशिष्ठ्यपूर्ण सहभाग हवा असेल तर कृती, उपक्रम, प्रयोग यांचा वापर करायला हवा. दिवाळीचे औचित्य साधून दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी ज्ञानकंदील निर्मितीचा आगळावेगळा उपक्रम घेण्यात येतो. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची सृजनशीलता आणी चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित होते. निरिक्षणातून त्यांना स्वनिर्मितीची संधी उपलब्ध करून दिली जाते. ज्ञानकंदीलची निर्मिती करण्यासाठी लागणारे साहित्य विद्यार्थ्यांना पुरविण्यात येते आणि हे काम प्रत्येक विद्यार्थ्याकडून वैयक्तिकरित्या करून घेतले जाते.



दिवाळी भेट कार्ड बनवितांना विद्यार्थी सोबत शिक्षक वृंद

**पेपर सुक्ष्मदर्शकाची निर्मिती :-** जे आपल्या डोळयांना दिसत नाही अश्या सुक्ष्म वस्तू पाहण्यासाठी बहिर्गोल भिंगाचा वापर करतात. अश्या वस्तूंसाठी प्रयोगशाळेत सुक्ष्मदर्शक यंत्र वापरले जाते की जे वजनाने जड आणि किंमतीने महाग असते. परतू डॉ.शांभवी नाईक पोतदार यांच्या मार्गदर्शनातून प्रशालेतील ५० विद्यार्थ्यांनी पेपर सुक्ष्मदर्शकाची निर्मिती केली. ही कार्यशाळा विद्यालायातच घेण्यात आली. या सुक्ष्मदर्शकाची किंमत अमेरिकन १ डॉलर म्हणजेच भारतीय चलनात रु.८० आहे. या सुक्ष्मदर्शकाचे वैशिष्ठ्य म्हणजे हा सुक्ष्मदर्शक पेपरचा असूनही पाण्यात पडलातरी तो पुन्हा वापरता येतो या द्वारे विद्यार्थांना परिसरातील वेगवेगळया पेशींचा आभ्यास करता येतो आणि ती माहिति अपलोड करून ठेवता येतो.



तरुण भारत

बुधवार, १५ फेब्रुवारी २०१७

पन्नास विद्यार्थ्यांनी केली पेपर सूक्ष्मदर्शकाची निर्मिती

पत्रकारिता माध्यमांनी घेतलेली दखल

**गणित जत्रा :-** शिक्षक आणि विध्यार्थी यांच्या दरम्यान सुसंवाद साधावा, अध्ययन करताना विध्यार्थ्यांना कृतीतून आनंददायी शिक्षण मिळावे आणि अध्यन व अध्यापन ही प्रक्रिया अर्थपूर्ण व आशयमुक्त व्हावी यासाठी प्रशाळेत नाविन्यपूर्ण गणित जत्रा हा आगळावेगळा उपक्रम प्रशालेने हाती घेतला आहे. गणित प्रश्नमंजुषा, गेट सेट गो, अलिबाबाचा खजिना गणितातून पर्यावरण, जोडा आकार चमत्कार, ज्याचे त्याला द्या संख्यातुला, प्रायोगिक भूमिती, जादूची मनकवडी, गणिती कोडी, हरवलेल्या रेषा, बौधिक करामत, मेंदूला खुराक, गणिती तराजू, मनोरंजनातून गणित इत्यादी उपक्रम मांडण्यात आले आहेत. नेहरू विज्ञान केंद्र वरळी-मुंबई या ठिकाणी संपन्न झालेल्या पश्चिम भारत जत्रेतमध्ये आमच्या प्रशाळेने महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करीत गोवा दादर नगर हवेली, दिव – दमण, राजस्थान, छत्तीसगड, गुजरात आणि मध्यप्रदेश या राज्या समवेत मांडलेली गणित प्रयोगशाळा **"खूल जा सीम सीम"** ही प्रतीकृती राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली.

**गेट सेट गो – खुल जा सीम सीम**

**इंग्लिश जत्रा English Exhibition :-** शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांसाठी सतत धडपडणाऱ्या जिल्ह्यातील शाळांपैकी वेतोरे हायस्कूल ही एक शाळा. ग्रामीण भागातील विद्यार्थी इंग्रजी या विषयात मागे राहतात .विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची भिती कमी व्हावी आणि अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी यासाठी शाळेच्या प्रवेशद्वारापाशी विद्यालयाने मांडलेले English Exhibition म्हणजे हा एक जिल्ह्यात नाविन्यपूर्ण उपक्रम आहे. प्रशालेतील इंग्रजी विषयाचे शिक्षक यांच्या संकल्पनेतून आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून इंग्रजी विषय अतिशय सुलभ आणि आनंददायी होण्यासाठी प्रशालेच्या प्रवेशद्वारापाशी विविध मॉडेल्स, तक्ते कोडी पझल्स यांची मांडणी केली. आपल्या दैनंदिन जीवनात उपयोगी असणाऱ्या विविध वस्तू, हत्यारे, भांडी, शेतीची अवजारे, वेगवेगळी कडधान्ये फळे इत्यादींची इंग्रजी भाषेतील नावे विद्यार्थ्यांना अवगत व्हावी या उद्देशा बरोबरच इंग्रजी ही परकीय भाषा शिकण्यास सोपी जावी, शिक्षण प्रक्रिया रंजक व्हावी, विद्यार्थांना इंग्रजीतून संभाषण कौशल्य साधता यावे ही उद्दिष्टे समोर ठेवून या English Exhibition चे नियोजन केले. आजच्या घटकेला जगातील अनेक देश राज्य व्यवहारांसाठी इंग्रजीचा भाषेचा वापर करतात. व्यापार आणि उद्योगांमध्ये ही भाषा दिवसेंदिवस समृद्ध आणि संपन्न होत असल्याने एक ज्ञानभाषा म्हणून जगासमोर येत आहे.






**English Exhibition**

**प्रशालेतील हळद लागवड प्रकल्प :-** वेतोरे सारख्या ग्रामीण भागात भाजीपाल्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. येथील शेतकरी भाडेतत्वावर जमिनी देऊन भाजी पाल्याची लागवड करून आपले अर्थार्जन करण्याची धडपड करतात. या धडपडीला आधार देण्याच्या उद्देशाने प्रशालेने गेल्यावर्षी पासून शालेय परिसरात हळद लागवड प्रकल्प राबविण्यास

सुरुवात केली. शालेय परीसरात पाण्याचा निचरा होणारी काही प्रमाणात पडीक जमीन त्यासाठी निवडली. अशा या कमी जागेत हळदीचे उत्पन्न घेता येते ही संकल्पना विद्यार्थ्यांमार्फत सर्व पालकांपर्यंत पोहोचावी म्हणून हा प्रकल्प प्रशालेने हाती घेतला आहे. या प्रकल्पासाठी खर्च १२८० रु इतका आला. २६५४ रु चे उत्पादन झाले. यातून १३७४ रु नफा मिळाला.



**हळदीच्या पिकात काम करताना विद्यार्थी**



**तयार झालेली हळद**

**कुक्कुटपालन प्रकल्प :-** ग्रामीण भागातील नुलांच्या आहारात पुरेसे प्रोटीन्स यावेत, शाळेतील मुलांना अभ्यासाबरोबर शेती पूरक उद्योगाची आवड निर्माण व्हावी आणि घरा पाठीमागील परिसराकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन बदलावा या उद्देशाने प्रशालेने कुक्कुटपालन प्रकल्प हाती घेतला आहे. प्रशालेने शाळेतील मुले आणि गावातील महिलांचा दृष्टीकोन बदलण्याच्या प्रयोगावर विचार सुरु केला आणि त्यातून परसबागेतील लक्ष्मी म्हणजेच कुक्कुटपालन या अनोख्या प्रकल्पाची आखणी झाली. प्रशालेने शाळेतील मुले आणि गावातील महिलांचा दृष्टीकोन बदलण्याच्या प्रयोगावर विचार सुरु केला आणि त्यातून परसबागेतील लक्ष्मी म्हणजेच कुक्कुटपालन या अनोख्या प्रकल्पाची आखणी झाली. या प्रयोगामध्ये प्रशालेतील विद्यार्थ्यांना व गावातील बचतगटातील महिलांना कुक्कुटपालनाचे प्रशिक्षण देऊन कावेरी जातीची एक महिन्याची पाच कोंबडीची पिल्ले आणि पाच किलो खाद्य दिले. प्रत्येक विद्यार्थ्यांनी ती पिल्ले घरी नेऊन शास्त्रोक्त पद्धतीने वाढविली. त्यातून मिळणारी अंडी बाजारपेठेत विक्री केली. त्यानंतर कोंबडीची पूर्ण वाढ झाल्यानंतर बाजारपेठेत नेवून त्यांची विक्री केली.विद्यार्थ्यांना कोंबडी पालन शिकवणे हा त्यामागचा मुळीच हेतू नाही. या कोंडी पालआ नाच्या माध्यमातून शालेय मुलांना अभ्यासाबरोबर शेतीपूरक व्यवसायाची आवड निर्माण व्हावी, त्यांना रोजगाराचा एक नवा पर्याय मिळावा हा या मागचा प्रमुख हेतू आहे.





**कुक्कुट प्रकल्प सहभागी विद्यार्थी**

**अनुभवातून शिक्षण :-** शालेय मंत्रीमंडळ विद्यार्थ्यांच्या अंगातील नेतृत्वगुणांचा विकास करणे आणि लोकशाहीत लोक त्यांचा प्रतिनिधी द्वारे देशाचा कारभार कसा करतात, हे प्रतिनिधी कसे निवडले जातात, निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देण्यासाठी, प्रशालेमध्ये दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला शालेय जिमखाना मंत्रिमंडळाची निवडणूक घेतली जाते. या मध्ये निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे, उमेदवाराकडून अर्ज मागविणे, अर्जाची छाननी, आचारसंहिता, प्रचार, प्रचारसभा, प्रत्यक्ष मतदान मतमोजणी आणि निकाल यासर्व प्रक्रीयामधून विद्यार्थी जात असल्याने तो मानसिक सक्षम बनतो. प्रशालेमध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, क्रीडामंत्री, सांस्कृतिकमंत्री सहलमंत्री, बागकाममंत्री, सफाईमंत्री, वाचनालयमंत्री आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी अश्या एकूण दहा पदांसाठी निवडणूक घेतली जाते व त्यांची कामे विभागून देवून संपूर्ण वर्षभरामध्ये वेगवेगळया उपक्रमाद्वारे त्या त्या विभागावर जबाबदारी देवून कारभार चालविला जातो. यामुळे शालेय शिस्त चांगल्याप्रकारे राखण्यास मदत मिळते.

**पंचरंगी कवायती :-** निरोगी शरीरात निरोगी मन वास करीत असते. लहान कोवळया वयात विद्यार्थ्यांच्या शरीराला आणि मनाला योग्य वळण लावायचे काम ह्या कवायती करीत असतात.विद्यार्थ्यांच्या नकळतपणे शरीराला व मनाला लवचिक बनविणे हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून शरीराला व्याधीपासून दूर ठेवणे हा भविष्यकालीन फायदा करून घेण्यासाठी शालेयस्तरावर विविध शाररीक कसरती घ्याव्या लागतात आणि यातूनच पंचरंगी कावायतींचा जन्म होतो. त्यांच्या शरीराला आणि मनाला योग्य वळण द्यायचे असेलतर काहीतरी वेगळी शक्कल लढवावी लागते. त्यांच्या अंगीचे सुप्त गुण, कला, लवचिकपणा यांचा सुयोग्य मिलाफ करून त्यांच्या कलाने शाररीक हालचालींकडे वळवावे लागते. यातूनच विविध कवायतींचा जन्म होतो रंगी बेरंगी पोशाख, साहित्य आणि संगीताची साथ दिली तर विद्यार्थी नकळत पणे विविध कलाविष्कार सादर करतात ते पाहाणे रोमहर्षक वाटते. संगीताच्या तालात विद्यार्थी विविध लयबद्ध शारीरिक हालचाली करताना पाहणे हे नेत्रसुखद असते. विद्यार्थ्यांच्या विविध शारीरिक लकबी रंगीबेरंगी पोशाखातील फेर धरणे हे पाहणे म्हणजे फुलांच्या भोवताली फुलपाखरे पिंगा घालत असतानाचा जो भास होतो तो भास ही पंचरंगी कवायत पाहताना होत असतो. नकळत आपण आपल्या भावविश्वातून मुलांशी एकरूप होवून आपली मनेही फेर धरू लागतात.




**डॉ. प्रेरणा राणे फाऊंडेशन व खगोल मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम "आकाशदर्शन"**

अश्या प्रकारे विविध उपक्रमाद्वारे श्री देवी सातेरी हायस्कूल, वेतोरे नावारूपास आलेली आहे. शाळेचे हे नावलौकिक असाच वाढत राहील यात कांही शंका नाही.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. शोभा मिसाळ** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, सिंधुदुर्ग. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, माळेवाडी(अ), ता.माळशिरस, जि.सोलापूर.

**ई-मेल :-** zpmalewadi01@gmsil.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री.दत्तात्रय चतुर्भुज कोरे **ई-मेल :-** Dattatraykore1469@gmail.com




**भव्य प्रांगण असलेली शालेय इमारत**

**'विश्व उद्याचे इथेच किलबिलते'** हे ब्रीद घेऊन जन्माला आलेली जिल्हा परिषद शाळा. शालेय शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांची जोपासणा करणारा नागरिक तयार करणे. शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत इयत्ता पहिली पासून वयोगटानुसार व आकलनशक्ती नुसार कृतीवर आधारित उपक्रमांची आखणी करून विद्यार्थीकेंद्रित, बालस्नेही व आनंददायी पद्धतीने विविध अभिवृत्ती व कौशल्ये निर्माण करणे हेच आमच्या शाळेचे उद्देश होय. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासा करीता परिणामकारक, मनोरंजन व आकर्षक स्वरुपात अध्ययन अध्यापन केले जाते तसेच पालक व समाज सहभागातून शाळा अधिकाधिक अनुभव संपन्न करण्यात येत आहे.

**शिक्षकांचा व्यावसायीक विकास :-** शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी आत्तापर्यंत झालेल्या नॅशनल, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय प्रशिक्षणास सहभाग नोंदवला असून आपल्या अध्यापनात त्यानुसार अमुलाग्र बदल घडवून आणले आहेत .मुख्याध्यापक व शिक्षकांनी भाषा, गणित, विज्ञान तसेच निष्ठा प्रशिक्षण ऑनलाइन व ऑफलाइन तसेच मुख्याध्यापक शालेय नेतृत्व व व्यवस्थापन कार्यक्रम याद्वारे आपले व्यावसायिक विकास करत आहेत. सर्व शिक्षक आपली शैक्षणिक अर्हता वाढवत स्वतः ला अपडेट ठेवत आहेत.

**लोकसहभाग :–** शालेय संस्कृती अधिक गुणवत्तापूर्ण होणे करिता माजी विद्यार्थी सहभाग हा एक फार उत्तम मार्ग आहे . कोरोंना कलावधीत माजी विद्यार्थी संघाची फार मोठी मदत झालेली आहे. शाळेचा सर्वांगीण विकास करण्यामध्ये समाजाचा सहभाग महत्वाचा असतो या उद्देशयाने शालेय व्यवस्थापन समिती तसेच गावातील दानशूर पालक व माजी विद्यार्थी यांच्या मार्फत देणगी व वस्तुरूपाने मदत होत आहे. शाळेचा शैक्षणिक उठावही लाखांच्या घरात आहे. शालाव्यवस्थापन समिती,शिक्षक

पालक संघ,पालक सहभाग अतिशय उत्कृष्ट आहे. या सर्वांच्या समन्वयाने शाळेत झाडांसाठी ड्रीप योजना,कवायत साहित्य,बँन्ड साहित्य,वॉटर फिल्टर,हॅन्डवॉश स्टेशन ,प्रत्येक वर्गात काचफलक व टी.व्ही. बसविण्यात आले आहेत.

**तंत्रज्ञानाचा वापर :-** शालेय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ व परिणामकारक केल्या जाते. संगणक कक्ष, इ-लर्निंग साठी प्रोजेक्टर, प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी टॅब सुविधा असणारी डिजिटल शाळा म्हणून आमची शाळा ओळखली जाते. युट्यूबच्या माध्यमातून विविध प्रकारचे समाजप्रबोधन, श्यामची आई कथामाला असे संस्कारक्षम उपक्रम घेण्यात येतात. इ-लर्निंगचा नियमितपणे अध्यापनात वापर करणारे सर्व तंत्रस्नेही शिक्षक आहेत. विद्यार्थी शिक्षक व्हॉटस्अप ग्रुप आहेत त्यामुळे कोवीड सारख्या परिस्थिती मध्ये सुद्धा या डिजिटल माध्यमातून आपले काम चालू ठेवले आहे. विद्यार्थ्यांसाठी विविध ऑनलाईन उपक्रम सुरु करून मुलांना शिक्षण देत रहावे व मुले आपल्या शाळेपासून दुरापास्त होणार नाहीत हाच उद्देश ठेवून उपक्रमाला सुरुवात झाली. विद्यार्थी व शिक्षक व्हॉटस्अप ग्रुप, साधे फोन असणाऱ्या विद्यार्थ्यांना मेसेज योजना व ऑफलाईन विद्यार्थ्यांना पीडीएफ वितरण करण्याचे नियोजन केले. वरील सर्व उपक्रमा बरोबरच शाळेतील सर्व विद्यार्थी लर्निंग फ्रॉम होम या उपक्रमात ही आवडीने सहभागी होतात. ऑनलाईन चाचण्या सोडवतात. विज्ञान विषयावर आधारित अभ्यासक्रमानुसार व्हिडिओ यु-टयुब च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुरविले जातात. झुम अँप व गुगल मीट अँपच्या माध्यमातून नियमितपणे वर्ग अध्यापन केले जाते.




**टॅबच्या सहाय्याने विद्यार्थी अध्ययन करतांना**

**शाळेतील उपक्रम:-** एखाद्या मोठ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेला लाजवेल अशी सेमीइंग्रजी, इंग्रजी विषयाची तयारी, सुसज्ज नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा, शाळेच्या स्थापनेपासून ते आजतागायत शाळा प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहे. शाळेतील उल्लेखनीय उपक्रम म्हणजे पक्षी,मुके प्राणी यांना पिण्यासाठी पाणी ठेवणे, परसबागेतील झाडे जोपासणे, गायन ,नाटय असे छंद जोपासणे, नियमितपणे प्रकटवाचन करणे, पाढे पाठांतर करणे, घरातून विज्ञान विषयक प्रयोग ऑनलाइन सादर करणे, ऑनलाईन भाषणे करून थोर महात्म्यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, वक्तृत्व स्पर्धेत सहभाग, असे ऑनलाईन स्पर्धांमध्ये सहभागी होणे आजतागायत निरंतरपणे चालूच आहे. पायपुसणी बनविणे, फुलांची वेणी बनविणे, बाज विणणे, लोकरीच्या उपयुक्त वस्तू तयार करणे यातही उत्कृष्ट सहभाग नोंदवला. मान्यवरांचे मार्गदर्शक सत्रांचे ऑनलाइन आयोजन केले.यात मा.श्री.राहुल लोंढे यांचे काष्टशिल्प व विनोद भोसले यांचे गिटार वादन लक्ष्यवेधी ठरले. त्याचबरोबर सणांचे वैज्ञानिक महत्व हा उपक्रम ही गतवर्षी पासून चालू आहे. युट्यूबच्या माध्यमातून "श्यामची आई कथामाला" आजही अविरतपणे चालू आहे. तसेच पालक व विद्यार्थी यांच्यात पर्यावरण संरक्षण व पर्यावरण जागृती निर्माण करण्यासाठी युट्यूबच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण ही तासिका सुरू केली. याअंतर्गत वृक्षारोपण, सीडबॉल निर्मिती, सीडबँक, प्लॅस्टिक वापर टाळणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मार्च २३ रोजी माळेवाडीतील विध्यार्थ्यांनी जागतिक पुस्तक दिन पुस्तकाचे ऑनलाईन वाचन करून साजरा केला. वसुंधरा दिन साजरा करत अनेक औषधी वनस्पती आपल्या परिसरात लावल्या. इकोफ्रेंडली गणेश मुर्ती तयार करणे, गणेश मुर्त्यांमध्ये बिया खोचणे.इकोफ्रेंडली मखर बनविणे.गौरींसाठी कापसापासून अलंकार बनविणे. त्यांचे विसर्जन न करता ते झाडावर ठेवून त्याचा वापर पक्ष्यांना घरटी बांधण्यासाठी होईल या पद्धतीने प्रयत्न करणे.रंगगंध कलासक्त न्यास चाळीसगाव यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय ऑनलाइन कथाकथन स्पर्धेत स्वतः व तीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली व ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय शाखा अकलूज यांच्या नेतृत्वाखाली विश्व सकास मेडीटेशन उपक्रमात सर्व सातवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. युनेस्को क्लब न्यु दिल्ली मार्फत घेण्यात येणाऱ्या कोरोना जनजागृती चित्रकला स्पर्धेत सर्व विद्यार्थी सहभागी.रयतेचा वाली वर्धापन दिन निमित्त घोषवाक्य स्पर्धेत सहभाग. ऑक्टोबर ऑनलाइन गांधी जयंती साजरी केली. यात बऱ्याच विद्यार्थ्यांनी भाग घेतला. वाचन प्रेरणा दिन ऑनलाइन साजरा केला. यात घरच्या प्रयोग शाळेतून या उपक्रमात विविध ऑनलाइन प्रयोग सादर केले.

**शाळेची यशोगाथा :-** विद्यार्थी विविध व्यक्तीमत्व स्पर्धेत राज्यस्तरावरुन विजयश्री खेचून आणतात. त्यासाठी शाळेतील शिक्षक सतत झटत असतात. शाळेत दरवर्षी दर्जेदार वार्षिक स्नेहसंमेलन घेतले जाते. जिल्हा परिषद सोलापूर आयोजित टॅलेंट हंट स्पर्धेत मोठ्या गटात या शाळेतील विद्यार्थ्यीनीने प्रथम क्रमांक पटकावला. तर गायन व वादन यात मोठा गट तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांची चित्रे राज्यस्तरीय तंत्रस्नेही शिक्षक समुहात विशेष आकर्षक ठरली. "कवीश्री" या कवी समुहाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय चारोळी लेखन स्पर्धेत इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक पटकावला. घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त १४ एप्रिल रोजी, वसुंधरा कला महाविद्यालय जुळे ,सोलापूर. मराठी विभाग यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या निबंध लेखन स्पर्धेत ही सातवीतील स्नेहल गोडसे हीने प्रथम क्रमांक तर रिद्धी महेश गिरमे हीने द्वितीय क्रमांक पटकावला. तंत्रस्नेही शिक्षक समुह महाराष्ट्र यांच्या मार्फत

२८ मे रोजी घेण्यात आलेल्या जागतिक मासिक पाळी दिनानिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत कु.सिमरन रफिक काझी या विद्यार्थ्यांनीने प्रथम क्रमांक पटकावला तर स्नेहल अंकुश गोडसे या विद्यार्थ्यांनीने निबंध लेखन स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. शिक्षकांनी जोपासलेल्या या गुणवत्तापूर्ण प्रयत्नांना यश मिळाले आणि लॉंकडाऊन असूनही शाळेचा पट उचांकी वाढला. सोलापूर जिल्ह्यात शाळा पटवाढीसाठी प्रथम क्रमांकावर आहे. ऑनलाईन प्रवेश देणारी जिल्ह्यातील पहिली शाळा म्हणून माळेवाडीची शाळा ओळखली जाते.




**पर्यावरण जनजागृती साठी शाळेने राबविलेले विविध उपक्रम**

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
| --- | --- | --- |
| **डॉ. इरफान इनामदार** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, सोलापूर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्रशाला, माढा, ता. माढा, जि.सोलापूर.

**ई-मेल :-** zphighschoolmadha@gmail.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री नागेश नरसिंह खेडकर **ई-मेल :-** nageshmadha@gmail.com



**जिल्हा परिषद प्रशाला माढा शाळेची विस्तीर्ण इमारत**

सोलापूर जिल्हा परिषद संचलित, जिल्हा परिषद प्रशाला माढा ही सोलापूर जिल्ह्यातील एकमेव माध्यमिक शाळा आहे. या शाळेची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळातील 18 जुलै 1947 ची, स्पर्धेच्या युगात शाळेची गुणवत्ता टिकून रहावी म्हणून आम्ही सर्व शिक्षक सदैव प्रयत्नशील असतो. यासाठी शाळेत अनेक उपक्रम सुरू आहेत. प्रशालेत इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंत प्रत्येकी तीन तुकड्या असून त्यात 2 सेमी इंग्रजी तर एक मराठी माध्यमाची तुकडी आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत खाजगी शाळांमधील विद्यार्थी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमध्ये प्रवेशित होऊन प्रशालेच्या विद्यार्थी संख्येत वाढ झाल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते मुख्याध्याकांचा नागपूर येथे गौरवपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

**शिक्षकांचा व्यावसायिक विकास :–** शाळेचे मुख्याध्यापक यांनी शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण घेतले असून त्यामधील विविध संकल्पनाचा उपयोग आपल्या रोजच्या कामकाजात करत आहेत. कार्यालय कामकाज करताना कायझन तत्व तसेच झिरो पेंडन्सीचा अवलंब केला जात आहे. मुख्याध्यापक व शिक्षकांनी भाषा, गणित, विज्ञान तसेच निष्ठा प्रशिक्षण ऑनलाइन व ऑफलाइन पुर्ण केले. आत्तापर्यंत झालेल्या नॅशनल, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय प्रशिक्षणास सहभाग नोंदवला आहे. सर्व शिक्षक आपली शैक्षणिक अर्हता वाढवत स्वतः ला अपडेट ठेवत आहेत.

**शिक्षक पालक संघ सहभाग :–** शाळेचा सर्वांगीण विकास करण्यामध्ये समाजाचा सहभाग महत्वाचा असतो या उद्देशयाने शालेय व्यवस्थापन समिती, गावातील दानशूर पालक, व माजी विद्यार्थी यांच्या मार्फत देणगी व वस्तुरूपाने मदत होत आहे. पालक प्रबोधन व प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे पालकांना मदत केली जाते.

**विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेतील यश :-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदने आठवीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना परीक्षा(NMMS) सुरु केली. सन 2016-17 पासून प्रशालेत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना या परीक्षेत सहभागी करून त्यासाठी शाळेत विशेष मार्गदर्शन वर्ग सुरू केले.त्यासाठी वेळोवेळी सराव चाचणी घेतल्या जातात. या शैक्षणिक वर्षात प्रशालेचे 9 विद्यार्थी या परीक्षेत गुणवत्ता यादीत चमकले. त्यांना इयत्ता नववी ते बारावी शिष्यवृत्ती मिळाली. सन 2018-19 या वर्षात जिल्ह्यात सर्वाधिक 23 विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळाली. तर सन 2019 -20 या वर्षात 21 विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झाले आहेत. गेल्या चार वर्षात एकूण 75 विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती पटकावली असून या सर्व विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची एकूण रक्कम 36 लाख रुपये इतकी उच्चांकी शिष्यवृत्तीची रक्कम आहे. प्रशालेने या परीक्षेत जिल्ह्यात एक वेगळा ठसा उमटवला. जिल्हा परिषद हायस्कूल माढ्याचा 'एन.एम. एम. एस. परीक्षा पॅटर्नची' संपूर्ण जिल्ह्यात वाहवा होत आहे.


लोकमत

माढ्यातील २२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

Hello Solapur
Page No. 2 Jun 28, 2017
Powered by: erelego.com


माढ्याच्या विद्यार्थ्यांचे ऑलिंपियाड स्पर्धेत यश

माढा, ता. ११ : येथील जिल्हा परिषद शाळेत तीन विद्यार्थ्यांनी ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेत सुवर्णपदक तर सहा विद्यार्थ्यांनी रौप्य व कांस्यपदक पटकाविले आहे. नवी दिल्लीतील सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनच्या सातव्या इंग्लिश ऑलिंपियाड स्पर्धा या इंग्रजी माध्यमातून घेतलेल्या परीक्षेत प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे.

सपना माळी, तेजस कांबळे, हार्दिक शहाणे यांनी सुवर्ण तर प्रतीक्षा जाधव, आदित्य राऊत, पायल कांबळे यांनी रौप्यपदक व राजश्री चवरे, स्वप्नील होवाळ, ज्ञानेश्वरी जाधव यांनी कांस्यपदक पटकावले. यशस्वी विद्यार्थ्यांचे जिल्हा परिषद सदस्य रणजितसिंह शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार भांगे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादेव जगदाळे, मुख्याध्यापक उत्तम यादव यांच्यासह शिक्षक, पालकांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना भरत डुचाळ, किरण शेलार, किरण भांगे, विभाग प्रमुख नागेश खेडकर यांनी मार्गदर्शन केले.

माढा : येथील जिल्हा परिषद प्रशालेतील ऑलिंपियाड परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापक उत्तम यादव व मार्गदर्शक शिक्षक.

**शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या घवघवीत यशाची वृत्त पात्रांनी घेतलेली दखल**

प्रशालेत सन 2016- 17 पासून इयत्ता आठवी साठी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी सुद्धा वर्ग सुरू केले या शिष्यवृत्ती परीक्षेत मागील चार वर्षात 18 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. सन 2018-19 या शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती परीक्षेत प्रशालेचा विद्यार्थी शहरी विभागातून राज्यात पाचवा तर जिल्ह्यात पहिला आला. तर 2019-20 मध्ये राज्यात आठवी तर जिल्ह्यात पाचवी आली आहे. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी मध्ये मागील तीन वर्षात 18 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झालेले आहेत. प्रशालेचा इयत्ता दहावीचा निकाल ही नेहमी चांगला असतो प्रशालेत 2016-17 पासून इंटरनॅशनल सायन्स ऑलंपियाड, इंटरनॅशनल मॅथ्स ऑलिम्पियाड, इंग्लिश ऑलिम्पियाड तसेच जनरल नॉलेज ऑलिम्पियाड या उपक्रमात दरवर्षी अनेक विद्यार्थी सहभागी होतात व प्राविण्य मिळवतात.

**विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक स्पर्धेतील यश :-** सोलापूर जिल्हा परिषद आयोजित सोलापूर टॅलेंट हंट स्पर्धा 2017-18 मध्ये अनुष्का किरण शेलार ही गीत गायन स्पर्धेत मोठ्या गटातून जिल्हा जिल्ह्यात प्रथम तर वादविवाद स्पर्धेत मोठ्या गटातून हार्दिक किरण शहाणे जिल्ह्यात प्रथम, प्रश्नमंजूषा स्पर्धत प्रतीक्षा नागेश खेडकर मोठ्या गटातून जिल्ह्यात द्वितीय , चित्रकला स्पर्धेत मोठ्या गटातून कु. वैष्णवी दत्तात्रय बोराडे जिल्ह्यात प्रथम तर लहान गटातून यशराज वैजनाथ मोगल जिल्ह्यात द्वितीय आला. वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यानी विविध बक्षीस मिळवले आहेत तसेच ऑनलाईन स्पर्धांमध्येही यश मिळवले आहेत.



**करोना काळात जनजागृतीसाठी प्रभात फेरी तसेच मास्क व सॅनिटायझरचे वाटप करताना**

**शालेय उपक्रम :-** विद्यार्थ्यांनी विविध टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनविणे, चित्रे काढणे, रंगभरण करणे, रांगोळी असे अनेक उपक्रमात ऑनलाईन सहभाग घेतला. पर्यावरण संरक्षण व पर्यावरण जागृती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. कोरोंना कालावधीत ऑनलाइन व ऑफलाइन उपक्रम राबविले आहेत तसेच विद्यार्थ्याकरिता बैठे खेळ उदा. बुद्धिबळासारखे खेळही खेळण्यासाठी प्रोत्साहन दिले. कोरोना जनजागृती करण्यासाठी गृहभेटी, प्रभात फेरी तसेच मास्क व सॅनिटायझर याचे वाटप केले आहे.

प्रशालेतील आम्ही सर्व शिक्षक असे अनेक उपक्रम राबवून विदयार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्नशील आहोत. सध्या परगावचेही अनेक विद्यार्थी प्रशालेत शिक्षण घेत आहेत. प्रशालेत आसपासच्या दहा ते पंधरा गावातील सुमारे 250 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षण क्षेत्रात झपाट्याने होणाऱ्या बदलाचा स्वीकार करून आमचे विद्यार्थी सध्याच्या शैक्षणिक वातावरणात कसे यशस्वी होतील त्यासाठी आम्ही सर्व शिक्षक प्रयत्नशील आहोत.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **डॉ. इरफान इनामदार** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, सोलापूर. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद सेमी इंग्लिश उच्च प्राथमिक शाळा, रहाटोली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे.

**ई-मेल:-** zpsrahatoli@yahoo.com

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री. मिलिंद श्रीरंग कांबळे **ई-मेल:-** milindk660@gmail.com




**शालेय इमारत**

**शालेय विकास :-** **कर्तुत्व व दातृत्व एकत्र येते जेव्हा....... माळरान ही फुलते तेव्हा..........**

आयुष्यात कोणतीही गोष्ट मिळवायची म्हटलं की सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी परिश्रम, मेहनत घेतल्यानंतर निश्चितच यशप्राप्ती होते. ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील बदलापूर शहरापासून पाच ते सहा किलोमीटर अंतरावर बारवी धरणाच्या शेजारी असलेले रहाटोली हे गाव. रहाटोली गावाच्या पूर्वेस बारवी धरण रस्त्यावर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा रहाटोली वसलेली. साधारण 200 कुटुंब वस्ती असलेले हे रहाटोली गाव. आजूबाजूच्या ४-५ छोट्या गावांतून सुद्धा या शाळेत विद्यार्थी येतात. सर्व पालक मजुरी, शेती करणारे. जिल्हा परिषद शाळा रहाटोली येथे सुरुवातीला शाळेची भौतिक परिस्थिती आणि शालेय वातावरण नव्हते. सुविधा अपूर्ण असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत गोडी दिसून येत नव्हती. शाळेच्या विकासासाठी सुरुवातीला सर्व शिक्षक शाळा व्यवस्थापन समिती यांची सभा घेऊन सर्वांना विश्वासात घेतले व एक ध्येय निश्चित केले. पुन्हा पालक सभा घेऊन पालकांना ध्येयाची जाणीव करून दिली. “शाळा गावात अन गाव शाळेत” आणले, लोकसहभाग वाढवला. लोकसहभागातून शाळेचे आंतरिक व बाहेरील रंगकाम करून बोलक्या भिंतीसह शाळेचे सुशोभिकरण केले. शाळेत १ प्रोजेक्टर आणून सर्व वर्गांचे डिजिटल क्लासरूम बनवले. या कामी शिक्षकवृंद SMC यांनी अपार मेहनत घेतली. आणि शाळेचा कायापालट केला. दोन मजली नवीन इमारत, विद्यार्थी व शिक्षकांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, पूर्व प्राथमिक वर्ग अशा अनेक सुविधा लोकसहभागातून निर्माण केल्या. शाळेतील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होतो म्हणून प्रशासनाकडे पाठपुरावा करून सौर उर्जेची सुविधा उपलब्ध करून घेतली. शाळेच्या सुरक्षेच्या दृष्टीने CCTV कॅमेरे बसविण्यात आले. मुलांना पिण्याच्या पाण्याची उत्तम सुविधा निर्माण करून दिली. नेतृत्व व संघकार्य यांच्या माध्यमातून शाळेचा विकास कसा झाला.

**विद्यार्थी विकास :-** उत्कृष्ट नियोजन हे कोणत्याही कार्यात महत्वाचे असते. त्याप्रमाणे शाळेत सर्व शिक्षकांनी अभ्यासक्रम व पाठ्यक्रम याचे उत्कृष्ट नियोजन केले. ज्यामुळे विद्यार्थ्यांसमोर मांडताना त्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य किंवा इतर साहित्याची गरज भागविणे सोपे ठरते. या नियोजनामुळेच विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास साधण्यासाठी मदत झाली.

या अभ्यासक्रमाच्या वार्षिक नियोजनातच मासिक, नियोजन, सर्व जयंत्या, पुण्यतिथी, उत्सव, विशेष दिन, सहशालेय उपक्रम यांचे देखील उत्कृष्ट नियोजन करण्यात आले. या उपक्रमांमुळे शाळेच्या अभ्यासक्रम नियोजनावर काहीही फरक पडला नाही. सर्व सहशालेय उपक्रमांच्या योग्य नियोजनामुळे त्याचा प्रभावीपणा जाणवला. या सर्व गोष्टींमुळे शाळेच्या भौतिक विकासाबरोबरच गुणवत्ता विकासात भर पडलेली दिसून आली. ज्यामुळे विकासात परिवर्तन घडून आले. त्यासाठी शाळेने काही तत्वांचा स्वीकार केला, शाळेच्या संपूर्ण कामकाजाचे नियोजन करण्यात येऊन त्याप्रमाणे अंमलबजावणी होईल. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस शाळा विकास आराखडा तयार करण्यात येईल व त्यात शाळेशी संबंधित सर्व गोष्टींचा समावेश असेल शाळेचा भौतिक व गुणवत्ता विकास साधण्यासाठी पालक संपर्क वाढविण्यात येईल. दर्जेदार शिक्षण व बालकांच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण करणे. बालसंरक्षण कायद्याचे महत्त्व जाणणे.बालकांना ज्ञानेंद्रियांचा वापर करण्याची संधी प्राप्त करून देणे. हा बालशिक्षणाचा मुलभूत आशय होऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उद्योग, क्रीडा, कला, विज्ञान, प्रज्ञा व सेवा यांचा अविष्कार शालेय उपक्रमांतून करणे. अथक परिश्रमातून शाळेने केलेल्या भावी योजना यशस्वी झालेल्या दिसून आल्या. वरील सर्व तत्त्वांच्या माध्यमातून रहाटोली शाळेला भावी योजनांची अंमलबजावणी होण्यास मदत झाली.

**बालसंरक्षण :-** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची जुलै २००७ मध्ये स्वायत्त मंडळ म्हणून बाल हक्क संरक्षण कायदा २००५ अन्वये राज्यातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण प्रचलन आणि रक्षण करण्यासाठी स्थापना करण्यात आली. आणि या अंतर्गत जिल्हा परिषद शाळा रहाटोली येथे राबविण्यात येणाऱ्या योजना खालीलप्रमाणे –बाल संरक्षणासाठी संपूर्ण शाळेत नैसर्गिक आपत्ती जसे, भूकंप, अतिवृष्टी, साप चावणे, कुत्रा चावणे यासारखे अपघात यांच्याविषयी माहितीपर बोर्ड लावण्यात आले आहेत. बाल संरक्षण म्हणून शाळेत जागोजागी CCTV कॅमेरे लावण्यात आले आहेत. ज्यामुळे मुलांच्या सुरक्षिततेकडे जाणीवपूर्वक लक्ष देता येते. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उतार असलेल्या Ramp ची सोय केलेली आहे. आगीपासून सुरक्षेसाठी शाळेत अग्निशामक यंत्र असून जागोजागी Helpline क्रमांक लिहिण्यात आले आहेत. बाल हक्क कायद्याची माहिती देणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. कांबळे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्व संरक्षणासाठी इयत्ता ६ वी आणि ७ वी च्या ४० मुलींना ICDS मार्फत ४५ दिवसांचे कराटे प्रशिक्षण देण्यात आले. याचप्रमाणे लैंगिक शोषण आणि गैरवर्तन यापासून बचाव करण्यासाठी विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

**स्व विकास :-** बदल हा निसर्गाचा नियम आहे. मानवाच्या अवतीभवती असणाऱ्या नैसर्गिक, सामाजिक, औद्योगिक, आर्थिक इ. परिस्थितीमध्ये सातत्याने बदल होत असतात. या बदलाचे प्रतिबिंब शिक्षण प्रणाली मध्ये दिसून येते. त्यामुळेच काळानुरूप शिक्षकांमध्ये स्व विकास करणे महत्वाचे ठरते. यासाठी शिक्षकांनी वेगवेगळे प्रशिक्षण घेतले पाहिजे तसेच आपल्या शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रतेत वाढ केली पाहिजे. स्व-विकासाचा उपयोग विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी नक्कीच होतो. या अनुषंगाने आमच्या शाळेतील सर्व शिक्षकांनी आपली शैक्षणिक पात्रता वाढवून विविध पदव्या संपादन केल्या आहेत. स्वतःचे ज्ञान,कौशल्ये यांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी केला जात आहे. स्वतःला अद्ययावत ठेवण्यासाठी विविध प्रशिक्षणे घेतली आहेत.CWSN दिव्यांग विद्यार्थी समायोजन प्रशिक्षण, स्पोकन इंग्लिश प्रशिक्षण,TAG प्रशिक्षण, पहिले अक्षर प्रशिक्षण, स्काउट गाईड प्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मूल्यवर्धन ,तंत्रस्नेही प्रशिक्षण, मानवसंपदा प्रशिक्षण, गुगल क्लासरूम,योग प्रशिक्षण, माहितीचा अधिकार प्रशिक्षण,निष्ठा प्रशिक्षण, या सारखी प्रशिक्षणे घेऊन स्व विकास करण्याचा प्रयत्न केला.

**शालेय उपक्रम :-** आमच्या जिल्हा परिषद शाळा रहाटोली शाळेमध्ये शासनामार्फत आलेले अनेक उपक्रम शाळेत राबविले गेल्याने त्याचा फायदा आमच्या विद्यार्थ्यांना झाला. त्यामध्ये प्रामुख्याने ABL हा शासन पुरस्कृत उपक्रम अतिशय चांगल्या

प्रकारे राबवण्यास आला व यशस्वी होण्या साठी प्रयत्न करण्यात आला.सर्व प्रथम विषयानुसार ABL कार्डचे वर्गीकरण करून माइलस्टोन नुसार साहित्याची मांडणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना त्या त्या माइलस्टोन नुसार बसवून त्या त्या पद्धतीने त्यांचा अभ्यास करून घेतला.

**ज्ञानरचनावाद -** मराठी विषयाचा अभ्यास घेताना शब्द डोंगर रचना करून शब्द संपत्तीत वाढ झाली व त्यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासाने बोलू लागले.गणित विषयाचा अभ्यास घेते वेळी व इतर विषयांचा अभ्यास घेताना मुलांना वर्तुळाकार, चौरसाकृती व गटागटाने बसून विद्यार्थी अभ्यास करत होते. त्यामुळे मुले आनंदाने अभ्यास करत होते. अध्ययन अध्यापन प्रक्रियेत ज्ञानकुंभ, कौन बनेगा करोडपती यासारखे बुद्धीला चालना देणारे उपक्रम राबविल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासात गोडी निर्माण झाली, तसेच गुणवत्ता वाढ होण्यास मदत झाली.

**लघु उद्योग :**अध्ययन अध्यापनात विद्याथ्यांना लघु उद्योगाची माहिती देत असताना प्रत्यक्ष ज्या लघु उद्योगाची माहिती सांगत आहोत, त्या उद्योगाच्या ठिकाणी मुलांना प्रत्यक्ष नेऊन त्या उद्योगाची सविस्तर माहिती दिली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूती मिळते. तसेच कामाचा आनंद सुद्धा घेता येतो. लोहारकाम, गवंडीकाम, स्थानिक कुशल कारागीरजे लोहारकाम करतात त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले. शाळेजवळच्या परिसरात बांधकाम सुरु होते त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना नेऊन कामाची माहिती दिली. गवंडी कामासाठी चोख नजर, परिश्रम करण्याची तयारी, ताकद, सहनशक्ती या गोष्टींची आवश्यकता असते. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.





**लघुउद्योगांना भेटी व मार्गदर्शन घेताना काही क्षण चित्रे**

पाढे तयार करणे उपक्रम विद्यार्थ्यांना बे च्या पाढ्यापासून ३० च्या पाढ्यापर्यंत सर्व पाढे तयार करण्यासाठी प्रभावी युक्त्यांचा वापर केला गेला. त्यामुळे पाढ्यांचे दृढीकरण होण्यास मदत झाली.अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी होण्यासाठी विविध विषयांची मंडळे स्थापन करण्यात आली त्यात गणित मंडळ, समाज शास्त्र मंडळ, विज्ञान मंडळ, आशा विविध मंडळांची स्थापना करण्यात आल. मुलामुलींना समान संधी, दैनंदिन बैठक व्यवस्थेत समान संधी, बालिका दिन, मासिक पाळी व्यस्थापन प्रशिक्षण, स्काउट – गाईड, मुला-मुलींना कराटे प्रशिक्षण (SELF DEFENCE) आजच्या युगात मुलींचे संरक्षण फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी मुलींना सक्षम करणे गरजेचे असते. म्हणून त्यासाठी जि. प. शाळा रहाटोली शाळेत ४० मुलींना ४५ दिवस कराटेचे प्रशिक्षण दिले. त्यामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास, स्व:ताचे संरक्षण करू शकतात याची जाणीव निर्माण झाली. ICDS (integrated Child Development Services) अंगणवाडी यांच्या मार्फत SELF DEFENCE कार्यक्रम राबविण्यात आला.



**शाळेतील मुले-मुली कराटे प्रशिक्षण घेताना**

**गुणवत्ता विकास :-** विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणवत्ता विकास हे अंतिम ध्येय असल्यामुळे त्यानुसार विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, विविध स्पर्धा, अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांची गुणवत्ता संपादन केली जाते. त्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. प्रश्न मंजुषा, अध्यापन अध्ययनात तंत्रज्ञानाचा वापर, शै. गु. वि. कार्यक्रम जि. प. शाळा रहाटोलीने गुणवत्तेचे संपूर्ण निकष पूर्ण केले असल्याने तसेच शाळासिद्धी मध्ये 'अ' श्रेणी आणि 100% विद्यार्थी प्रगत असल्याने जि. प.ठाणे यांचेकडून शाळेला सन्मानपत्र व ७००० रु. रोख देऊन सत्कार करण्यात आला होता. विविध स्पर्धा आयोजन त्यात वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा या स्पधांच आयोजन केले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला व जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी झाले.ज्ञान कुंभ  गुणवत्ता वाढीसाठी ज्ञान कुंभा सारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात "कौन बनेगा करोडपती", ज्ञान विषयक प्रश्नमंजुषा, कोडे सोडवा, यासारखे विविध खेळ घेण्यात आले.त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण झाली.कोडे सोडवा या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची विचार करण्याच्या क्षमतेत वाढ झाली.विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत भर पडला.स्वयंअध्ययन विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास साधण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची सवय  निर्माण केली.



**सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य सादर करताना**

**अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाच वापर :-** अध्ययन अध्यापनात संगणकाचा, प्रोजेक्टर चा वापर केला जातो. प्रशासनाकडून शाळेला Tab मिळाले आहेत. त्यांचा वापर करून अनेक activity घेतल्या जातात. त्याचबरोबर शालेय प्रशासन कामासाठी संगणकांचा वापर केला जात आहे. कोणतेही प्रशासकीय काम शाळेतच पूर्ण करून त्याची प्रिंट तात्काळ मिळते. त्यासाठी अत्याधुनिक असा कलर प्रिंटर शाळेत आहे. पालक संपर्कासाठी whats app ग्रुपचा वापर त्यामुळे शाळेतील उपक्रम पालकांपर्यंत पोहोचले आहेत. E-learning सुविधा संगणक शिक्षण आज आपल्या जीवनामध्ये स्थिरावले आहे . वर्ग अध्यापनात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून मुलांना बहुश्रुत करण्याची पद्धती म्हणजे ई लर्निंग. प्रोजेक्टर, मोबाईल, tab,

रेडीओ, दूरदर्शन, LCD संगणक यांचा वापर अध्यापनात केला जातो. वेगवेगळे शैक्षणिक video दाखवले जातात. लहान वयापासून मुलांना संगणकाची माहिती व्हावी यासाठी शाळेत 'संगणक कक्ष' उपलब्ध आहेत.तंत्रज्ञानाचा वापर होत असल्यामुळे विद्यार्थी पट वाढला आहे,उपस्थितीमध्ये सुद्धा लक्षणीय वाढ झाली आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढ झाल्यामुळे प्रगत शाळा म्हणून तालुका तसेच जिल्ह्यात रहाटोली शाळेचा नावलौकिक आहे.





**विद्यार्थ्यांना संगणक विषयी माहिती देतांना** **पालकांना डिजिटल शिक्षणाचे महत्व समजावताना**

**लोकसहभाग :-** जि. प. शाळा रहाटोली दरवर्षी शाळा विकास आराखडा तयार करण्यात येतो इ त्यानुसार त्या कार्यक्रमांची अंबलबजावणी करण्यात येते. लोकसहभागातून १ प्रोजेक्टर, CSR माध्यमातून २ प्रोजेक्टर तसेच लोकसहभागातून शाळेच्या इमारतीची रंगरंगोटी करण्यात आली. तसेच बोलक्या भिंती करण्यात आल्या. शाळेसमोर येणारी नवनवीन आवाहने स्थानिकांच्या मदतीने सोडविण्यात आली.उदा. मुलांसाठी शौचालये ग्रामस्थ निधी आणि शासकीय निधीतून नवीन बांधण्यात आले. पिण्याच्या व स्वयंपाकाच्या पाण्यासाठी ग्रामपंचायत कडून १०,००० लिटर पाण्याची टाकी बसवून देण्यात आली. शाळेला लोखंडी जाळया, ४ शौचालयांना लोखंडी दरवाजे, किचन शेडला लोखंडी जाळी बसविण्यात आली.

**शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण –** विद्यार्थ्यांच्या प्रगतीची मुख्य जबाबदारी जरी शिक्षक आणि शाळांची असली, तरी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनीही योगदान द्यायला हवे. या समितीमध्ये पालकांना महत्त्वाचे स्थान दिल्याने गेल्या काही वर्षात शिक्षक आणि पालक यांनी एकत्र येऊन समाज सहकार्यातून रहाटोली शाळा ही डिजिटल, ज्ञानरचनावादी शाळा तयार करण्यात यश मिळवलेआहे.






**पालक सभा व हळदी कुंकू कार्यक्रम आयोजन** **शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण**

**शाळेची यशोगाथा :-** शाळेतील सर्व शिक्षकांचे तंबाखू मुक्त शाळा प्रशिक्षण झाले आहे. तंबाखू मुक्त शाळेचे सर्व ११ निकष शाळेने पूर्ण केले असून रहाटोली शाळा तंबाखूमुक्त शाळा म्हणून घोषित झाली आहे. मागील २ वर्षात तालुका तसेच जिल्हास्तरावर खालील उपक्रम तसेच स्पर्धांमध्ये यशस्वी सहभाग घेतला आहे. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन, तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा यासेच वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम, तालुकास्तरीय समूहगान स्पर्धा सहभाग , तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये कबड्डी, खो खो उपविजेतेपद, तालुका व जिल्हा पातळीवर कबड्डी या खेळाचे क्रीडास्पर्धेतील प्रथम ,द्वितीय क्रमांकाचे परितोषिक शाळेस प्राप्त झाले आहे





**शाळेचे विद्यार्थी हॉलीबॉल खेळताना** **भारत माता,मनोरे बनवताना**

**'राहू एकोप्याने, देश घडवू गुणवत्ता विकासाने'** या उक्ती प्रमाणे शाळा शिक्षक, विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ हे एकोप्याने एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी पर्यायाने देशासाठी कार्य करीत आहेत .

**शाळेची अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील लिंक पहाव्या Videolink शाळेचे बाह्यरंग व अंतरंग**

**https://drive.google.com/file/d/1XY0EAh-uoapWoMrTOEqdSWNelvL8Q-O1/view?usp=drivesdk**

https://drive.google.com/file/d/1XC8Pege7e3KHeM5WGGl90QvZvVedwbBu/view?usp=drivesdk

**video link डिजिटल वर्गखोली**

**https://drive.google.com/file/d/1X8aLiOwpzpnoZKdDbo3Il6HK-faWcoO8/view?usp=drivesdk**

**video link संगणक कक्ष डिजिटल क्लासरूम गटामध्ये अभ्यास करताना**

**https://drive.google.com/file/d/1XEJTReYR52-LErAnA-KazpyotunXtt8Y/view?usp=drivesdk**

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. संभाजी भोजने** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, ठाणे. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद शाळा, शेलवली (बांगर), ता.शहापूर, जि. ठाणे.

**मुख्याध्यापकाचे नाव :–** श्री.बाळू कान्हू धानके **ई मेल :-** zpschoolshelavalibangar@gmail.com



**जिल्हा परिषद शाळा शेलवली बांगर शाळेची इमारत**

**'आकांक्षा पुढती जिथे गगन ठेंगणे'** या उक्तीप्रमाणे जिल्हा परिषद शाळा शेलवली बांगर केंद्र अल्याणी तालुका शहापूर जिल्हा ठाणे या शाळेच्या भौतिक आणि गुणात्मक विकासाचा संकल्प शिक्षकवृंद, युवावर्ग आणि ग्रामस्थ मंडळ यांनी केल्यानंतर लगेचच प्रत्यक्ष अंमलबजावणीला सुरुवात झाली आणि बघता बघता शाळेचा अंतर्बाह्य कायापालट झाला.

**लोकसहभाग :-** पालक शाळेचा कणा असतो. शाळेच्या भौतिक विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका ग्रामस्थांनी घेतल्यानंतर सर्व शिक्षकांचा कामाचा हुरूप वाढला. ज्याला जसे जमेल तसे योगदान देण्याची भूमिका पालकांनी घेतली. परिणामी काही पालकांनी आर्थिक मदत तर काही पालकांनी श्रमदान करत शाळेच्या उत्क्रांतीमध्ये मोलाची भूमिका निभावली. गावातील युवा वर्गाचा समावेश असलेली नवीन शाळा व्यवस्थापन समिती आकारास आली. बहुतेक युवक शाळेचे माजी विद्यार्थी असल्याने त्यांनी शाळेसाठी पडेल ते काम करण्याची भूमिका घेतली. नियोजनाचा आराखडा तयार केला गेला. त्यानुसार शाळेची रंगरंगोटी, वर्ग डिजिटल करणे, बोलक्या भिंती निर्माण करणे, वाचनालयाची निर्मिती करणे, विज्ञान प्रयोग शाळेची निर्मिती, साऊंडसिस्टिम खरेदी करणे, संगणक, प्रिंटर, अत्याधुनिक सोयी सुविधा, शाळेसाठी वॉल कंपाऊंड, वृक्षारोपण, 24 तास पाण्याची उपलब्धता व्हावी यासाठी बोअरवेलची सुविधा निर्माण करणे, यातील शक्य त्या सुविधा प्राधान्यक्रमाने उपलब्ध करण्याचे नियोजन झाले. याच बरोबर गुणवत्ता विकासासाठी ज्यादा तासिकांचे नियोजन झाले. ग्रामस्थ व शिक्षक यांनी मिळून सुमारे बारा लाखापेक्षा जास्त रकमेचा शैक्षणिक उठाव करून ग्रामीण भागातील शाळेला शहरी शाळेचा साज चढवला. शाळेला सर्व बाजूंनी वाल कंपाऊंड असावे अशी मागणी ग्रामस्थांकडे केल्यानंतर खासदार निधी मधून शाळेसाठी वॉल कंपाऊंडची उभारणी करण्यात आली. ठाणे येथील सन्माननीय व्यक्ती अरुण सेठ यांनी शाळेसाठी वॉटर प्युरीफायर उपलब्ध करून दिला असून विद्यार्थी शुद्ध पेयजलाच आस्वाद घेत आहेत. शाळा हे विद्येचे मंदिरवाटावे यासाठी शाळेची आकर्षक रंगरंगोटी करण्यात आली. याकामी गावातील माजी विद्यार्थी यांनी महत्त्वपूर्ण

भूमिका पार पाडली. केवळ आकर्षक रंग देऊन नव्हे तर प्रत्येक ठिकाणी विद्यार्थ्यांना ज्ञानामृत मिळेल अशा महत्त्वपूर्ण माहितीचे फलक तयार झाले. गणित, इंग्रजी, मराठी, इतिहास, भूगोल,विज्ञान इत्यादी विषयातील जटील संकल्पना चित्ररूपाने भिंतीवर साकारल्या.






**विद्यार्थ्यांना ज्ञानामृत मिळेल अशा महत्त्वपूर्ण माहितीचे फलक भिंतीवर**

**डिजिटल शाळा :-** पारंपरिक शिक्षण पद्धतीला आधुनिकतेची जोड देण्यासाठी शाळा डिजिटल असली पाहिजे या भूमिकेतून शिक्षकवृंदाने आपल्या परीने योगदान देत दात्यांचा शोध घेतला. शाळा व्यवस्थापन समितीची विनंती मान्य करीत ग्रामपंचायत शेलवली यांनी देखील प्रोजेक्टर शाळेला देणगी म्हणून दिला. ग्रामपंचायत शेलवली मार्फत 65000 रुपये प्रोजेक्टर सप्रेम भेट दिल्यानंतर विविध संस्थांच्या मार्फत डिजिटल क्रांती साठी शैक्षणिक उठाव करून शाळा संपूर्ण डिजिटल करण्यात आली.यशवंत नारायण चाफेकर ट्रस्ट यांनी शाळेची विनंती मान्य करत शाळेसाठी एक 32 इंची स्मार्ट टिव्ही भेट म्हणून दिला. संजय फाउंडेशन ठाणे यांनीदेखील शाळेच्या विनंतीला मान देत शाळेसाठी बत्तीस इंची स्मार्ट टीव्ही देणगी म्हणून दिला.पंचायत समिती शहापूर शिक्षण विभाग यांच्यामार्फत शाळेची व्हर्च्युअल क्लासरूम साठी निवड झाली आणि शाळेला अत्याधुनिक व्हर्च्युअल युनिट प्राप्त झाले.






लोकमत

६५ टॅबचे केले वाटप : आदिवासी उन्नती मंडळाचा पुढाकार, पालकांमध्ये समाधान

शहापूर तालुक्यातील शेलवलीचे विद्यार्थी घेणार ऑनलाइन शिक्षण

**शाळेला विविध सेवाभावी संस्था कडून स्मार्ट टिव्ही व टॅब उपलब्ध**

दरम्यानच्या काळात आदिवासी उन्नती मंडळ, मुंबई यांनी आमच्या शाळेत सदिच्छा भेट देऊन शाळेत सुरू असलेले उपक्रम समजून घेतले. आमच्या शाळेच्या प्रगतीवर बेहद्द खुश होत त्यांनी शाळेला सुंदर वृक्षारोपण केलेले आहे परंतु पाण्याची सुविधा नाही हे लक्षात येताच त्याने शाळेसाठी बोअरवेलवर इलेक्ट्रिक पंप शाळेसाठी उपलब्ध करून दिला परिणामी शाळेसाठी 24 तास पाण्याची उपलब्धता होऊ शकली. ज्यामुळे शाळेत परस बागेसह वृक्षारोपन व संगोपन करणे शक्य होऊन खडका वरील शाळेचे उघडे बोडके रूप वृक्ष वल्लीने सजू शकले.कालांतराने लॉकडाऊन आले आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन पूर्ण थांबले तरीही शाळेतील शिक्षकांनी प्रयत्नांची शिकस्त करत माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळवत विद्यार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन सुरू ठेवले. शिक्षक करत असलेले प्रयत्न पाहून आदिवासी उन्नती मंडळ, मुंबई यांनी आमच्या शाळेसाठी तब्बल 65 मोबाईल टॅब उपलब्ध करून दिले. आज जि. प. शाळा शेलवली येथील विद्यार्थी मोबाईल टॅब द्वारे ऑनलाईन शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. गुगलमिट वर दररोज शाळेचे ऑनलाइन वर्ग सुरू होतात. अध्ययन अध्यापन प्रभावी होण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. स्वतः व्हिडिओ निर्मिती करून तसेच विविध यु ट्यूब चॅनल वरील व्हिडीओ दाखविण्यासाठी स्मार्ट टीव्ही, डिजिटल साधने व व्हर्चुअल क्लासरूमचा वापर केला जातो.

**शालेय उपक्रम :-** शेलवली शाळा ही अनेक उपक्रमांची खाण समजली जाते. ज्ञान रचनावादी अध्ययन अध्यापन करत असताना नवनवीन तंत्रांचा अवलंब केला जातो. शालेय परिपाठातून संख्या प्रकारांचा सराव आणि चला शिकूया कॅलेंडर असे दोन नवोपक्रम महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे कडे पाठवलेले आहेत. त्यापैकी चला शिकूया कॅलेंडर हा नवोपक्रम ठाणे जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक विजेता ठरला असून राज्याच्या स्पर्धेत पात्र ठरला आहे.

**ज्ञानकुंभ** :- शाळेतील शिक्षक यांनी तालुक्यातील इतर शिक्षकांना सोबत घेऊन लॉकडाऊन काळाचा सदुपयोग करून घेत ज्ञानकुंभ शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता 5 वी साठी प्रश्नांचा अनमोल खजिना या पुस्तकाची निर्मिती केली असून आदिवासी उन्नती मंडळ, मुंबई यांनी या पुस्तकाच्या छपाईचा संपूर्ण खर्च करून हे पुस्तक संपूर्ण शहापूर तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व आश्रम शाळांना मोफत दिले जाणार आहे.




**तत्कालीन शिक्षण सचिव मा. नंदकुमार साहेब यांच्या शुभ हस्ते 'शिष्यवृत्ती क्लूस्या व सूत्रासह 'ज्ञानकुंभ' मार्गदर्शिका प्रकाशन**

**प्रज्ञाशोध :-** मंथन प्रज्ञाशोध परीक्षा मध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रविष्ट केले जात असल्याने विद्यार्थी अतिरिक्त अध्ययन करीत आहेत. माजी विद्यार्थी याकामी शाळेसाठी योगदान देत आहेत शाळेचे दरवर्षी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत विद्यार्थी झळकत आहेत. शिष्यवृत्ती परीक्षा पाचवी ते आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत शाळा दरवर्षी उज्वल यश संपादन करत असून यावर्षी शाळेचे 13 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून आठ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

**वक्तृत :-** शासनातर्फे व इतर खाजगी संस्थांतर्फे आयोजित करण्यात येत असलेल्या वक्तृत्व स्पर्धेत शाळेचे विद्यार्थी सहभाग घेत असत सातत्याने यशस्वी होत आहेत. वक्ता घडविणारी शाळा अशी शाळेची नवी ओळख निर्माण होऊ लागले आहे.

**विद्यार्थी कविता संग्रह** विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेने विद्यार्थ्यांना बोलते केले, तसेच लिहिते केले. त्यातूनच विद्यार्थ्यांची प्रतिभा बहरून आली आणि विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीतून किलबिलाट हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला.






शिक्षण परिषदेत 'किलबिलाट'

विद्यार्थ्यांचा काव्यसंग्रह : जि.प. शाळेचा उपक्रम

भातसानगर : शेलवली जि.प. शाळेत अल्याणी केंद्राची मासिक शिक्षण परिषद झाली. या शिक्षण परिषदेत शालेय विद्यार्थ्यांच्या 'किलबिलाट' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन शहापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी आशिष झुंजारराव यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी राज्य शिक्षक सेनेचे राज्य कोषाध्यक्ष चिंतामण वेखंडे, किन्हवली परिसरातील लघु उद्योजक जगन धानके, केंद्रप्रमुख तथा कवी विलास वेखंडे, अल्याणी केंद्राचे केंद्रप्रमुख चंदन ठाकरे, शेलवली(बां.)चे ग्रामस्थ, तसेच अल्याणी केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते

या काव्य संग्रहात शेलवली (बां.) शाळेतील सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या भाव विश्वावर आधारित काव्य लेखन केले आहे. आई, वडील, शिक्षक, विविध सण समारंभ, शाळा, निसर्ग, ऋतू अशा विविध स्वानुभवांवर आधारित विद्यार्थ्यांची काव्य प्रतिभा यांचा 'किलबिलाट' या काव्यसंग्रहात अनुभवास मिळतो. विद्यार्थ्यांचा असा एकत्रितपणे काव्य संग्रह प्रकाशित करणारी जिल्ह्यातील ही पहिलीच जिल्हापरिषद शाळा आहे.

गटशिक्षणाधिकारी झुंजारराव यांनी या अभिनव उपक्रमाचे तसेच शाळेच्या गुणवत्तेचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले. (वार्ताहर)

**किलबिलाट हा काव्यसंग्रह प्रकाशित करताना**

**विज्ञानप्रयोग शाळा** :- विद्यार्थ्यांना विज्ञानवादी बनवायचे असेल तर प्रात्यक्षिकातूनच विज्ञान अध्यापन झालं पाहिजे या भावनेतून शाळेची स्वमालकीची स्वतंत्र विज्ञान प्रयोगशाळा तयार झाली असून विद्यार्थी स्वतः शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रयोगाची अनुभव घेत असतात.

**प्रश्नमंजुषाः** हा शाळेचा एक वैशिष्टयपूर्ण उपक्रम असून शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांचे चार समान गट केलेले आहेत. यामध्ये पहिली ते आठवीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी आहेत. प्रत्येक गट आपापले प्रश्न तयार करतात आणि इतर गटांना विचारतात. अचूक उत्तराला गुणदान केले जाते. जास्त गुण मिळवणारा गट त्या दिवशी विजयी घोषित केला जातो. वर्षभर सर्वाधिक वेळा विजयी गटाला पारितोषिक देऊन गौरविण्यात येते.

**इंग्रजी वाचन सुधार :-** इयत्ता पहिली पासुनच LFW चा अभ्यासक्रम राबवून वाचन लेखन व व्याकरणाचा दैनंदिन सराव घेतला जातो. हजेरी घेताना दररोज वेगळा शब्द सांगणे, माझी डिक्शनरी अंतर्गत दररोज दिलेल्या अल्फाबेट्स वरून शब्द लेखन करणे इत्यादी उपक्रम घेतले जातात.

**वाचनालय :-** विंग्ज फॉर ड्रीम  या संस्थेच्या सौजन्याने शाळेत वाचनालयाची निर्मिती केली असून 500 पेक्षा जास्त पुस्तकांचा समावेश असलेले समृद्ध वाचनालय शाळेत उपलब्ध आहे पुस्तक वाटपाचे सुयोग्य नियोजन  केले असून विद्यार्थी पुस्तकांची देवाणघेवाण सांभाळत असतात.



**पुस्तक जत्रेत रममाण विद्यार्थी**

**विषय आपला मते आमची :-** महिन्यातून दोन शनिवारी ठरलेल्या विषयावर विद्यार्थी आपली मते वादविवाद स्पर्धा,समीक्षण आदीतून मांडतात. व्यसन,विज्ञान शाप की वरदान मोबाइल फायदे तोटे आदि विषयावर आपली मते मांडण्यासाठी विद्यार्थ्यांचे गट केले असून निर्भयपणे अभ्यासपूर्वक दिलेल्या विषयावर मत मांडतात.

**सेल्फी विथ सक्सेस :-** विद्यार्थ्यांना  प्रोत्साहित करण्यासाठी विविध विषयात उत्कृष्ट कामगिरी करणार्या विद्यार्थ्या सोबत सेल्फी काढून संपूर्ण दिवस त्याचा स्टेटस वा डीपी ठेऊन सन्मान केला जातो.

**गीतमंच व वाद्यवृंद :-** शाळेतील विद्यार्थ्यांचा स्वतःचा वाद्यवृंद असून विद्यार्थी हार्मोनियम, ढोलकी वाजवतात. विद्यार्थीच गायन करतात, शाळेचा वैशिष्ट्यपूर्ण संगीतमय परिपाठ हे शाळेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. विविध स्तरावरील स्पर्धेत सहभागी होतात. आजपर्यंत शाळेला तीन वेळेस जिल्हा स्तरीय विजेतेपद मिळाले असून भरघोस पारितोषिके प्राप्त केली आहेत.

**सुट्टीच्या दिवशीची शाळा :-** रविवार अथवा सुट्टीच्या दिवशीची विद्यार्थी स्वयंप्रेरणेने शाळेत येतात. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वरच्या वर्गातील विद्यार्थी, माजी विद्यार्थी कला,क्रीडा व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करतात.

**माझा घटक माझं सादरीकरण :-** प्रत्येक विषयातील आवडता घटक विद्यार्थी स्वतः निवडतात. आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना  समजावून सांगून  इतर विद्यार्थी व शिक्षकांशी चर्चा करतात. घेतलेल्या घटकाचे सादरीकरण करतात.






**शाळेच्या गीतमंच गट जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक स्वीकारताना**

विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळेच्या परिसरात सांडपाण्याच्या उपयोग करीत परसबाग फुलवली जाते. ज्याचा उपयोग दैनंदिन पोषण आहारात केला जातो. शाळेच्या एकंदर गुणात्मक व दर्जात्मक विकासाचा सकरात्मक परिणाम होऊन दिवसेंदिवस शाळेची पटसंख्या वाढत आहे. गुणवत्ता व भौतिक सोयीसुविधा या सर्वांच्या जोरावर शाळा जिल्ह्यात आपले नावलौकिक वाढवत आहे.

शालेय उपक्रम पाहण्यासाठी खालील लिंक चा उपयोग करावा.

जिल्हा स्तरीय प्रथम गीते https://youtu.be/h7LoD2WPilo https://youtu.be/jGKH1wFntMY

समाज सहभागातून सजावट https://youtu.be/yU7lAriAyLM उपक्रम https://youtu.be/64JDORxI1aE

माझी शेलवली शाळा https://youtu.be/F-rz8ebu018 https://youtu.be/MwK4wn5hVgY

महिला दिन व महिला मेळावा https://youtu.be/YhDeevm2fGs

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री संभाजी भोजने** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, ठाणे | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, लाहोरी, ता. समुद्रपूर, जि. वर्धा.

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री कमलाकर विठ्ठलराव ठाकरे **ई.मेल:-** purushottamvbawanen@gmail.com



**लाहोरी शाळेचा दर्शनी भाग**

**शाळा विकास नियोजन :–** जि.प.शाळा, कायापालट करूण स्थानिक स्वराज संस्थेच्या शाळांचा कायापालट आपल्या पासून करायचा या उद्देशाने शाळा डिजिटल कशी बनवायची, त्यात काय काय असेल?, कसे?, किती?, कधी मिळवायचे? असा संपूर्ण आराखडा तयार करून आम्ही संपूर्ण शिक्षकांनी नियोजन केले. शालेय व्यवस्थापन समितीस नियोजन दाखवले. त्यानंतर गावातील जबाबदार व्यक्ती, नंतर आमसभा घेऊन गावातील संपूर्ण व्यक्तींना डिजिटल शाळेचा विकास आराखडा व त्याचे महत्व समजावून सांगितले. शिक्षणाचे, आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाचे महत्व गावक-यांना समजल्यामुळे गावकरी आमच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले.

**लोकसहभाग :-** शाळा विकास नियोजना प्रमाणे प्रत्येक कुटुंबाच्या कुटुंब प्रमुखाला आमसभेत निमंत्रण पत्रिका देऊन ग्रामपंचायतच्या ठिकाणी सभा घेऊन डिजिटल शाळेची संकल्पना माडली. वर्गणी देतेवेळी आम्ही चार शिक्षकांनी प्रथम ४५,००० हजार रुपये दिले व हळूहळू गावक-यांनी पैसा जमा करण्यास सुरुवात केली. त्या एकाच रात्री १,००,५०० रुपये जमा झाले. आठ दिवसात छोट्याश्या आदिवासी बहूल गावातून ३,००,००० रुपये गोळा झाले. मिळालेल्या पैशाचे व्यवस्थित नियोजन करुण नियोजना प्रमाणे स्मार्टबोर्ड, प्रोजेक्टर, tablet, रंगरंगोटी, परसबाग, इत्यादी. शैक्षणिक साहित्य घेऊन उद्घाटनासाठी मा.समिरभाऊ कुणावर आमदार हिंगणघाट, समुद्रपूर सिंधी विधानसभा क्षेत्र महाराष्ट्र राज्य यांना बोलावले. शालेय परिसर, लोकांचा उत्कृष्ट सहभाग, विधार्थी गुणवत्ता ह्या बाबी पाहून मा. आमदार महोदयांनी ही शाळा दत्तक घेऊन आजपर्यंत शाळेला tablet, सोलर इलेक्ट्रिक संच, खेळ साहित्य व सौंदर्यीकरणासाठी लॉन,शोभेची झाडे, संगणक, संगणक कक्ष यासाठी एकूण १७,४१,०००रु. चे आमदार स्थानिक विकास निधीतून मदत केलेली आहे .अशाप्रकारे P.S.R. , C.S.R. अंतर्गत व जिल्हापरिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी या लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था या सगळयांकडे कडे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष भेटून शाळेच्या भौतिक सुविधा वाढवण्यास अविरत प्रयत्न केला. मा. आमदार महोदयांनी शाळा दत्तक घेतली. तर मा. पोपटराव पवार सरपंच हिवरेबाजार यांनी गाव आदर्श करण्यासाठी दत्तक घेतले.

**विद्यार्थी विकास :-** शासनाच्या निकषा प्रमाणे १०० % पटनोंदणी, १००% उपस्थिती आणि त्याला किमान अध्ययन क्षमता प्राप्त झाल्या पाहिजे या निकषावर आधारित नियोजना प्रमाणे तांत्रिक साधनांचा वापर करून त्यांना tablet देऊन, त्यामध्ये विविध शैक्षणिक app, स्मार्टबोर्ड, तर कधी ज्ञानरचनावादाचा उपयोग करून गुणवत्ता सुधारण्याचा प्रयत्न करण्यात आला. विविध स्पर्धा परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविलेले आहे. आजपर्यंत ७ विध्यार्थी नवोदय विद्यालयाला, तीन विद्यार्थी रेसिडेन्सी स्कूलला, महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्तीसाठी ६ विद्यार्थी पात्र, तर एन.एम.एम. एस. परीक्षेत २ विद्यार्थी पात्र ठरले आहे. ऑनलाईन राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी एक विद्यार्थिनी महाराष्ट्रातून दुसरी आलेली असून तिलाही शिष्यवृत्ती मिळालेली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा शैक्षणिक साहित्य म्हणून वापर केल्यामुळे शैक्षणिक

गुणवत्ता उंचावते हे लाहोरी शाळेने अनुभवले आहे. या साधनांचा उपयोग आता लॉकडाऊन काळात उत्तम प्रकारे झाला. थोडक्यात आजपर्यंतच्या रटाळ शिक्षण पद्धती सोडून स्मार्ट वर्क केल्यामुळे मनोरंजक पण परिणामकारक अध्ययन अध्यापनातून आवश्यक क्षमता विकसित करण्यात आम्ही यशस्वी ठरलेलो आहोत.

**शाळा विकासात शिक्षक - पालक संघ व शालेय व्यवस्थापन समिती चा सहभाग :-** लाहोरी शाळेची प्रगती होण्यामागे शिक्षक पालक संघ व शायेल व्यवस्थापन समितीचा सिंहाचा वाटा आहे. पालक, व व्यवस्थापन समिती सोबत नसती तर केवळ शिक्षकांकडून हे होणे अशक्य होते. कोणत्याही लोकप्रतिनिधीकडे जावयाचे म्हटल्यास कर्मचा-या पेक्षा गावातील लोकांचा जास्त परिणाम होत असतो. हा मुद्धा लक्षात घेऊन आम्ही शिक्षक, पालक, व्यवस्थापन समिती यांचा सहभाग मिळवून घेतला. यामुळे विद्यार्थी व शाळा विकासात खालील बदल झालेले आहेत. शालेय व्यवस्थापन समिती व शिक्षक एकत्र आल्यास शाळेचा कायापालट होऊ शकतो ही संकल्पना अधिक दृढ होऊन इतरही लाहोरी शाळेचे अनुकरण करू लागले. शिक्षक - पालक आणि विद्यार्थी यांच्यात सहसंबंध असल्याने पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या अडचणींचे सहज निरसन होऊ लागले. शालेय परिसराचे शुशोभीकरण झाले व त्याच्या संगोपनाची जबाबदारी शालेय व्यवस्थापन समिती व पालकांनी घेतल्याने शालेय परिसर उत्तम ठेवण्यास मदत झाली. याचा दृश्य परिणाम म्हणजे उन्हाळी सुट्टीतही परसबाग, शोभेची झाडे, लॉन हिरवीगार राहिले. शालेय परिसरातील तोडफोड, विध्वंसक प्रवृत्तीला आळा बसला.

**तंत्रज्ञानाचा वापर :-** विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी व आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात उपयोग व्हावा या उदात्त हेतूने समाज सहभागातून शाळा डिजिटल करणे हा नवोपक्रम आम्ही केला. यातून शैक्षणिक, भौतिक सुविधा, गुणवत्तेत वाढ, वेगवेगळया प्रवेशपूर्व परीक्षेत विद्यार्थी पात्र झाले. विध्यार्थ्यांच्या पायाभूत संकल्पना स्पष्ट होण्यासाठी tablet, स्मार्टबोर्ड, संगणक, रोबोर्ट इत्यादी आधुनिक शैक्षणिक साहित्याचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली. समाजसहभागातून शैक्षणिक तांत्रिक साहित्याची खरेदी केलेली आहे. शाळेने आजपर्यंत १४ संगणक संच, ७४ tablet, १ स्मार्ट बोर्ड, तीन प्रिंटर, रोबोर्ट, २ प्रोजेक्टर, ऑनलाईन परीक्षा संच, इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचे साधने वापरल्यामुळे अमूर्त संकल्पना मूर्त करण्यासाठी ह्या साहित्याचा उपयोग उत्तम ठरलेला आहे. शालेय रेकार्ड तयार करणे, गुणपत्रक तयार करणे, प्रश्नसंच तयार करणे, ऑनलाईन प्रश्नसंच तयार करणे, निकाल तयार करणे, शिष्यवृत्तीचे किंवा वेगवेगळी शैक्षणिक माहिती पोर्टलवर भरने, वेगवेगळी माहिती त्वरित द्यावी लागते. तेव्हा कोरे प्रोफार्मे तयार असल्यास माहिती त्वरित देता येतो. वाचलेल्या वेळेचा उपयोग हा विद्यार्थ्यांसाठी देता येतो.

**शाळेची यशोगाथा :-** शाळा डिजिटल झाल्यामुळे व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढल्यामुळे शाळेला विविध गुणगौरव प्राप्त झाले. आतापर्यंत शाळेला मिळालेले पुरस्कार आदर्श शाळा पुरस्कार प्रथम जि. प. वर्धा, आदर्श शिक्षक पुरस्कार, जि. प. वर्धा, आदर्श परसबाग प्रथम पुरस्कार, जि. प. वर्धा, स्वच्छ शाळा प्रथम पुरस्कार, जि. प. वर्धा, आदर्श शाळा व्यवस्थापन समिती पुरस्कार, पं.स. समुद्रपूर. 'शाळा सिद्धी' भारत सरकार यांच्या गुणतालिकेत जि. प. वर्धा येथून शाळा प्रथम क्रमांक आहे. शाळेची उत्तरोत्तर प्रगती पाहून मा. श्री पोपटराव पवार कार्याध्यक्ष आदर्श गाव प्रकल्प व संकल्प योजना महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी लाहोरी गाव दत्तक घेतलेले असून गावास पायाभूत सुविधेकरिता निधी उपलब्ध करून दिलेला असून त्याचे कामे ७०% ते ८०% झालेली आहे. शाळा स्वतः विजनिर्मित करून एम.एस.ई.बी.ला वीज देणारी एकमेव शाळा म्हणून नावलौकिक. महाराष्ट्र शासनाकडून आदर्श शाळा (MODEL SCHOOL) करिता निवड झाली आहे.

थोडक्यात शासनाचे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांचा विकास करण्याची अनुकूल भूमिका, शिक्षकांची कल्पकता, समर्पणाची वृत्ती, योग्य नियोजन, श्रम करण्याची तयारी, गावक-यांचे सहकार्य, स्थानिक प्रतिनिधींनी दिलेला प्रतिसाद या गोष्टी शिक्षकांच्या कल्पकतेने एकत्र आणल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांचा कायापालट होऊ शकते.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती रत्नमाला खडके** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, वर्धा. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुलतानपूर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा.

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्रीमती शुभांगिनी मनोहरराव वासनिक **ई-मेल :-** shubhangin517@gmail.com





**शाळेची इमारत**

**शालेय विकास :-** आमच्या जिल्हा परिषदेच्या शाळेची इमारत 1963 सालची बांधकाम असलेली. शाळेची जीर्ण झालेली इमारत, फरशांना भेगा गेलेल्या त्या ही अशा की, कुठून कधी आणि कसे साप विंचू बाहेर येतील याचा अजिबात नेम नसलेल्या, पावसाळयात तर काही विचारायची सोय नाही एखाद्या चाळणीतून पाणी गळावे तसेच शाळेचे छत गळायचे. ह्या सगळयातून मार्ग काढत अध्यापन कार्याकडे वळलो असता, जास्तीत जास्त विद्यार्थी अनुपस्थित असायचे. परंतु ठरविले की ह्या अडचणींचा बाऊ न करता त्या अडचणींनाच संधी समजून कार्य करायचे व कंबर कसून नव्या प्रवासाची सुरुवात केली. **'गुणवत्तापूर्ण मुले व बागेतील फुले'** हे उद्दिष्ट लवकर साध्य होणारे नसून त्याचे परिणाम दीर्घ काळाने दिसणारे होते. विद्यार्थ्यांना हिरवळयुक्त फुले असलेला परिसर आवडतो, विद्यार्थी तेथे रमतो त्यामुळे हातात घेतली ती लॉन युक्त व फुलांनी सजलेली छोटीशी बाग निर्माण करण्याचे कार्य. शाळा छोटीशी विद्यार्थीही वयाने छोटेसे. दोघींनीही पुढाकार घेऊन सकाळी नऊ वाजता शाळेत येणे, खड्डे खणणे, नर्सरीतून स्वखर्चातून, मिळेल तेथून फुलझाडे गोळा करणे, परिपाठाच्या आधी त्या रोपांची लागवड करणे, हे नित्याने सुरू केले. हे करत असताना शाळेतील दोन शिक्षिका हे काम करतात म्हणून सुरवातीला लोक मजा घेण्याच्या दृष्टिने आमच्याकडे बघत होते. परंतू कामातील सातत्य बघून गावातील तरुणवर्ग आपोआपच सहकार्याच्या भावनेने मदतीला धावून आला. शाळेतील लहान विद्यार्थीही या कार्यात त्यांच्या क्षमतेनुसार सहभाग घेऊ लागली. त्यांना शाळेबद्दल आपुलकी वाटू लागली. बाह्य सजावटीसाठी करत असलेल्या या प्रयत्नांची मदत शाळेच्या आंतरिक बदलासाठी मोलाची ठरली. आधीच ठरविलेले उद्दिष्ट होते की, 'बागेतील फुले व गुणवत्तापूर्ण मुले, ' या उद्दिष्टपूर्तीसाठी आम्ही कामाला लागलो. ज्ञानरचनावाद या पद्धतीचा अवलंब केला. प्रत्येक विद्यार्थ्यांचा स्तर ओळखून स्तर निहाय अध्यापन सुरू

केले. प्रत्येक विद्यार्थी सहभागी होतील अशा कृतींचे आयोजन करण्यात आले. याचा परिणाम असा दिसू लागला विद्यार्थी नियमित शाळेत उपस्थित राहू लागले. अनेकाविध कृतीतून शिकण्याचा आनंद घेऊ लागले.

**विद्यार्थी विकास :-** विद्यार्थ्यांची शिकण्याची समजण्याची गती दिवसेनदिवस वाढतच होती. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत 25 निकष पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र वरील 25 निकषांची परीपूर्तता करणारा पाठ शाळेवर राबवला. मुले 25 निकशात खरी उतरू लागली. 25 निकषांची पूर्तता करणारा पाठ इतरांनाही मार्गदर्शक ठरावा ,या हेतूने मे 2017 च्या जीवन शिक्षण मासिक मध्ये 'शिकूया भाषा नव्या पद्धतीने' या शीर्षकाखाली प्रकाशित झाला. गणिताचेहि तसेच विद्यार्थी बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, स्थानिक किंमत, दर्शनी किंमत, विस्तारित रूप. अब्जावधी संख्यांचे वाचन व लेखन, गणिताचा व्यवहारात उपयोग इतकेच नव्हे तर दोन अंकी तीन अंकी संख्यांचा पाढा तयार करून एका स्ट्रोकमध्ये आत्मविश्वासपूर्वक गुणाकार, भागाकार क्रिया करू लागले. ज्ञानरचनावादातील विविध पद्धती, जसे गुणाकाराची गणेश पद्धती,साहित्याचा वापर करून भागाकार म्हणजे समान वाटणी, ही संकल्पना रुजू लागली. आणि नोटांच्या माध्यमातून वजाबाकी क्रिया जलद व अचूकरित्या करू लागले. दिवसंदिवस विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची भूक ही अधिकच वाढत होती त्यातूनच स्वयंअध्ययन बोर्डची कल्पना उदयास आली. शाळेच्या प्रांगणात प्रवेशद्वारा जवळच स्वयंअध्ययन बोर्ड उभारल्या गेले. विद्यार्थी फावल्या वेळात तेथे स्वयं अध्ययन करू लागले. हे सर्व चित्र गावकऱ्यांसाठीही कुतूहलाचे होते. हा उपक्रम गावकऱ्यांचा, पालकांचा दृष्टिकोन बदलण्यासाठी उपयोगी ठरला. या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रवास विद्यार्थी घरापर्यंत नेत होते. शाळेत काहीतरी सुरू आहे या जाणिवेने पालक शाळेशी सुसंवाद साधू लागले.

**लोकसहभाग :-** पालकांचा शाळेविषयी चा दृष्टीकोन बदलू लागला. आमच्या अध्यापनाला तंत्रज्ञानाची जोड मिळावी असे आम्हाला नेहमीच वाटायचे. त्यासाठी गरज होती ती लोकसहभागाची. बजाज फाउंडेशन चा पहिला एलईडी विथ एअरपीसी शाळेला प्राप्त झाला. विद्यार्थ्यांची अध्ययनाची गती अधिक वाढली. आमची मुलं संगणकावर शिकतात याचा त्यांच्या पालकांना अतिशय आनंद वाटू लागला. विद्यार्थ्यांच्या संकल्पना मूर्त रूपात स्पष्ट होऊ लागल्या. करायचं खूप होतं पण गरज होती ती आर्थिक पाठबळाची . दात्यांचा शोध घेत असतानाच टीव्ही टेक्स्टाईल चे प्रबंधक श्री भूपेन्द्र शहाणे साहेब यांना शाळेला भेट देण्यास आमंत्रित करण्यात आले . वेळेच्या अतिव्यस्ततेमुळे पाच मिनिटांसाठी ते शाळेत आले व विद्यार्थ्यांना प्रश्न विचारता - विचारता त्यांना पाच कधी वाजले हे कळलेच नाही. दुसऱ्या दिवशीच त्यांचा फोन आला. आणि त्यांनी शाळेला एक लक्ष रुपयांचा धनादेश सीएसआर फंड अंतर्गत देत असल्याचे सांगितले. मिळालेल्या सीएसआर फंड मधून सर्वप्रथम शाळेचे अंतर्बाह्य रूप पालटवले. बोलक्या भिंती, आकर्षक चित्रे, वर्ग सजावट, नकाशे, अध्ययनास पोषक वातावरण निर्मिती, करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा व स्वच्छतेचा विचार करता हॅन्ड वॉशस्टेशन, मुलांसाठी,मुलींसाठी टाईल्ससह, नळाच्या सुविधेसह टॉयलेट्स बांधण्यात आले. विद्यार्थ्यांना बसायला डेक्स बेंच ची सुविधा करून घेतली. लॉन युक्त आकर्षक फुल झाडांसह परिसर तयार करण्यात आला. जिथे विद्यार्थी रमू लागले. शाळेचे अंतर्बाह्य बदललेले रूप त्याचा सन्मान करण्यासाठी 'सन्मान दातृत्वाचा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास आमदार श्री समीर भाऊ कुणावर यांना आमंत्रित करण्यात आले. जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवात आमच्या शाळेतील विद्यार्थिनी गंगुबाईची भूमिका नाट्यछटेतून मांडून जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान पटकावला व बक्षीस समारंभाच्या अनुषंगाने आमची शाळा आमदार साहेबांच्या लक्षात होतीच व इथे आल्यानंतर विद्यार्थ्यांनी ज्ञानरचनावादाने केलेल्या कृतीचे प्रात्यक्षिक पाहून ,आमदार साहेबांची इंग्लिश मध्ये अस्खलितपणे घेतलेली मुलाखत पाहुन, आमदार साहेब भारावून गेले मी ही शाळा आत्ताच

दत्तक घेत आहे असे जाहीर केले. आपल्या आश्वासनाची पूर्तता करत शाळेला 'दोन लक्ष बारा हजार नवशे नव्यान्नव' रुपयाची डिजिटल साधने प्राप्त करुन दिली. अशाप्रकारे आम्ही प्रगतीचा एक एक टप्पा गाठत गेलो. परंतु अजूनही प्रश्न आवासून उभा होता तो गळक्या छपराचा. गावकऱ्यांच्या सहकार्याने जिल्हा परिषद अध्यक्षांकडे हा प्रश्न मांडला .त्यांनीदेखील शाळेची प्रगती बघता, शाळेला तीन लक्ष शहानव हजार रुपयाची ची मेजर रिपेरिंग मंजूर केली. आता आमच्या इमारतीच प्रश्न सुटला नव्हता तर टाईल्ससह सुसज्ज अशी इमारत तयार झाली होती. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ पाणी आवश्यक होते. तेव्हा ग्रामपंचायतला अर्ज केला असता 14 व्या वित्त आयोगातून तीस हजार रुपयाचे आरो वॉटर प्लांट शाळेला त्यांनी दिला. प्रवास इथेच न थांबता कॉन्व्हेंटच्या युगात प्रेरणादायी ठरणारी ही शाळा ब्लेजर गणवेश युक्त असावी या उद्देशाने वणा नागरी सहकारी बँकेचे संचालक श्री. सुधीर बाबु कोठारी यांच्याशी भेट घेऊन त्यांच्या सहकार्याने लोकसहभागातून हिंगणघाट मधील पहिली ' ब्लेझर गणवेश ' असलेली शाळा असण्याचा बहुमानही आमच्या सुलतानपूर च्या शाळेला प्राप्त झाला आहे.भौतिक सुविधे अंतर्गत 4 वर्षाच्या अथक प्रयत्ना नंतर जि.प.वर्धा यांचे निधीतून सहा लक्ष रुपयांचे वॉल कंपाऊंडचे बांधकाम नुकतेच पूर्ण झालेले आहे. बारा लक्ष रुपयांची वर्ग खोली देखील शाळेला मंजूर केलेली आहे. अशा प्रकारे शाळेचा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रवास हा अविरतपणे सुरू आहे त्यासाठी शाळा विविध उपक्रम राबवित आहे.

**गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राबवलेले विविध उपक्रम :-शंभर टक्के उपस्थितीस बक्षीस (मासिक) :-** जोपर्यंत विद्यार्थी जास्तीत जास्त उपस्थित राहणार नाहीत, तोपर्यंत तो लवकर शिकणार नाही म्हणून विद्यार्थी 100% शाळेत उपस्थित राहणे आवश्यक ठरते. महिन्याच्या शेवटी जो विद्यार्थी जास्तीत जास्त उपस्थित राहील त्यास बक्षीस देण्यात येते. म्हणून वर्गाची उपस्थिती ही नेहमीच शंभर टक्के असते.

**शिक्षक व विद्यार्थी यांचे एकरूपतेचे नाते :-** माझ्या बाई अगदी माझ्या आईसारखीच आहे. त्या वेगळया नाहीत. ही भावना विद्यार्थ्यांच्या भावविश्वाला स्पर्शून जाणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्यांच्याजवळ जाऊन बसणे, त्यांच्या कुटुंबाविषयी प्रश्न विचारणे ,त्यांच्या आवडीनिवडी वर चर्चा करणे, त्यांच्यासाठी खाऊ नेणे,त्यांच्यासोबत खेळने... या अगदी छोट्या छोट्या गोष्टी परंतु विद्यार्थ्यांच्या जवळ येणाऱ्या. त्यांना आपल्याकडे ओढणाऱ्या. व शिक्षकांविषयी विद्यार्थ्यांना जी अनामिक भीती असते ती आपल्या या कृतीमुळे निश्चितच कमी होते.

**विद्यार्थी अध्ययन जोडी :-** फक्त हुशार विद्यार्थ्यांचा विचार न करता, जे विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या मागे पडलेली आहेत, त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी देखील उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. जसे वर्गातील प्रगत विद्यार्थ्यांची जोडी, मागे पडलेल्या विद्यार्थ्यासोबत लावणे. प्रगत विद्यार्थ्यां कडे त्यांच्या गृहपाठात मदत करण्याची जबाबदारी सोपविणे.

**संदर्भ साहित्याची उपलब्धता :-** आजही ग्रामीण भागात वर्तमानपत्रे ही येत नाही. म्हणून त्यांना अधिकचे संदर्भ साहित्य पुरविणे जसे दैनंदिन वर्तमानपत्र ,मासिके, तसेच शाळेत उपलब्ध असलेले वाचनालयातील पुस्तके नियमित वाचनास देणे, व त्याचे टिपण काढावयास लावणे ,दैनंदिन परिपाठाचे वेळी त्याचे वाचन घेणे, व अभिनंदन करणे. 'फुलासंगे मातीस वास लागे' या उक्तीप्रमाणे आम्हास परिणाम दिसून आला तो म्हणजे असा की, विद्यार्थ्यांमध्ये चढाओढ, स्पर्धा निर्माण होऊन 100 % विद्यार्थी प्रगत झाले.

**सत्कृत्य लेखन :-** विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रुजवणूक व्हावी, या उद्देशाने 'सत्कृत्य लेखन ' हा उपक्रम आम्ही सुरु केला. मी केलेलं चांगलं काम याचं लेखन करायला लावायच व दुसऱ्या दिवशी त्याच वाचन घ्यायच अस नित्यनियमाने सुरू केल. त्यातून 'चांगलं काम ' याची रोजनिशी तयार झाली. आणि संस्काराची शिदोरी विद्यार्थ्यांच्या गाठीला बांधली जात असल्याचा आनंदही आम्हाला देऊन गेली.

**माझे अभ्यासाचे वेळापत्रक :-** 'माझे अभ्यासाचे वेळापत्रक ' या उपक्रमा मध्ये असे ठरले ' सकाळी सहा वाजता पासून सायंकाळी दहा वाजेपर्यंत, सायंकाळी सहा वाजता पासून तर दहा वाजेपर्यंत ', विषयानुसार वाचन-लेखन, गणन, पाठांतर, खेळ, चित्रकला, स्वाध्याय पुस्तिका सोडविणे, सामान्य ज्ञान.... इत्यादींची वेळेच्या नियोजनात वाटणी करून एक वेळापत्रक तयार केले. विद्यार्थ्यांचा नियोजन बद्ध व नियमित अभ्यास होऊ लागला. वाचन व लेखन गतीत कमालीची प्रगती दिसून आली. एवढेच नव्हे तर विद्यार्थी स्वतः गृहपाठाची स्वरूप ठरवू लागले. गृहपाठ मी तयार करतो या भावनेने त्यांच्यामध्ये निर्णय क्षमता, आत्मविश्वास, परिपक्वता यात वाढ झाल्याचा अनुभव आला. आजही विद्यार्थी याच वेळापत्रका ने अध्ययन करतात याचा आनंद वाटतो.

**कलागुणांना वाव व जोपासना :-** सांस्कृतिक विकास हा व्यक्तिमत्व विकासाचा अविभाज्य घटक. म्हणून शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय नियोजनबद्धरीत्या साजरा केला जातो. जिल्हा परिषद शाळांच्या तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत तालुकास्तरीय पुरस्कार प्राप्त झाला 'चला प्रगत होऊ या ' ही नाट्यछटा अतिशय वेगाने वर्धा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करून गेली. यातूनच सुहानी अभिनय व नाट्यछटा क्षेत्रात जिल्ह्यातून प्रथम. 'चला बघूया whatsapp ची दुनिया ' या नाट्यछटेतून नव्या तंत्रज्ञानाशी आपली नाळ कशी जुळली याचे प्रात्यक्षिकच जणू सादर केले.

**स्पर्धापरीक्षांची तयारी व यश:-** माझा विद्यार्थी शाळेतच नाही तर इतर विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत टिकावा. म्हणून लक्ष घातले ते शिष्यवृत्ती परीक्षेकडे. शिष्यवृत्ती परीक्षा व नवोदय परीक्षा यात विद्यार्थ्यांना बसवले. त्यांची परीक्षेच्या दृष्टीने तयारी करून घेतली. माझे विद्यार्थी सोळा-सतरा मध्ये जिल्ह्यातून अनुक्रमे तीन व चार क्रमांकावर झळकले, आणि प्रयत्नांना यश मिळतेच मिळते हे पुन्हा दृढ झालं. पुन्हा 2017 -18 मध्ये शाळेची विद्यार्थिनी तालुक्यातून प्रथम व चौथ्या क्रमांकावर येऊन यशाची परंपरा कायम राहिली. तसेच 2018 - 19 मध्ये तालुक्यातून शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेचा विद्यार्थी पाचव्या क्रमांकावर आला आमची शिष्यवृत्ती ची ही परंपरा अशीच कायम टिकावी यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो.

**ज्ञानरचनावादी पाठाची निर्मिती व अध्यापन:-** अध्ययन-अध्यापनची नवी पद्धत 'ज्ञानरचनावाद ' या ज्ञानरचनावादी पद्धतीतून पाठाचे अध्यापन करण्यास सुरुवात केली. त्यात पाठाचे प्रकट वाचन, आरोह-अवरोह ,विरामचिन्हे युक्त वाचनाचा सराव ,शब्दांचा अर्थ, शब्दांच्या जाती, शब्दांची माळ, डोंगर ,वाक्य निर्मिती ,प्रश्न निर्मिती, यमक जोडून कविता निर्मिती, कोणतेही तीन शब्द घेऊन अर्थपूर्ण व बोधपूर्ण गोष्ट तयार करणे, नाट्यीकरण करणे, कृतीयुक्त सादरीकरण करणे, कल्पनाप्रधान प्रश्नांची उत्तरे सोडविणे ,पाठाला अनुसरून चित्र रेखाटन करणे, त्याचप्रमाणे कार्यात्मक व्याकरणाचा ही सराव घेऊन पाठ हा चिरकाल विद्यार्थ्यांच्या लक्षात राहून त्याचा सार विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरेल या हेतूने या उपक्रमाचे स्वरूप वाढत जाऊन विद्यार्थी उत्तम कवी होऊ शकतात याची देखील प्रचिती आली.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर:-** स्पर्धेच्या युगात ग्रामीण विद्यार्थी टिकावा, त्याला तंत्रज्ञानाची, डिजिटल साहित्याची, ओळख व्हावी, साहित्य हाताळता याव व इंटरनेटचा वापर करून त्याच्या ज्ञानाची कक्षा रुंदावत विज्ञान निष्ठा, तार्किकनिर्णय क्षमता, वृद्धिंगत व्हावी या हेतूने समाज सहभागातून बजाज फाउंडेशन तर्फे एलईडी टीव्ही प्राप्त करून घेतला त्यातून डिजिटल साहित्याची हाताळणी अध्ययनात व अध्यापनात तंत्रज्ञानाचा विषयानुरूप वापर होऊ लागला. विद्यार्थी आनंदाने डिजिटल साहित्याचा आस्वाद घेऊ लागले. 52 इंच चा स्मार्ट ओनिडा टीव्ही प्रयत्नपूर्वक प्राप्त करून घेतला आणि विद्यार्थ्यांचा युट्युब आणि आंतरजाल शी संपर्क आला आणि विद्यार्थीच डिजिटल झाले. आज माझे हे विद्यार्थी माझी शाळा युट्युब वर झळकत आहे हेच या प्रयत्न मागील यश. विद्यार्थी झुम मीटिंग द्वारे दुसऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. नवनवीन गोष्टी शिकतात. गुगल क्लाऊड वरून ताजमहल, यमुना रिव्हर ,वाघा बॉर्डर यांची प्रत्यक्ष भेट दिल्याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला आहे. तसेच विद्यार्थी इंटरॲक्टिव बोर्ड हाताळता हाताळता हे छोटे सुलतान कधी तंत्रस्नेही झाले कळलच नाही व यातूनच 'तंत्रस्नेही झाले छोटे सुलतान 'या नवोपक्रमाचा देखील उदय झाला.

**शाळेची यशोगाथा :-** बाहेर गावातील पालक आपल्या मुलांना नातेवाईकाजवळ शिकण्यास ठेवतात . व ती मुल आमच्या सुलतानपूर शाळेत दर्जेदार शिक्षण घेत आहेत. जिथे मुले शाळेची घंटी कधी वाजेल व घरी जाण्याची सुट्टी कधी होईल याची वाट पाहतात तिथेच या शाळेतील मुलांची पावले सुट्टी झाल्यावरही घराकडे वळत नाही. शाळेतील 'तंत्रस्नेही बनले छोटे सुलतान ' या नवोपक्रमाचा उदय झाला आहे. गावची लोकसंख्या 350 एवढीच परंतु गुणवत्तापूर्ण शिक्षण या शाळेत मिळते या विश्वासाने नातेवाईकांची मुले सदर शाळेत दाखल करण्यात येत आहे. त्यामुळे शाळेची पटसंख्या चा आलेख दिवसेंदिवस वाढतच आहे. सदर शाळेची प्रेरणा घेऊन शिक्षक आपल्या क्षेत्रात कार्य करण्यास प्रेरित झालेले आहेत. नुकताच covid-19 या आजाराने जगभरात थैमान घातले होते. त्याचा सर्वात जास्त परिणाम शाळांवर झाला. तेव्हा ऑनलाइन तंत्रस्नेही प्रशिक्षणाचा आम्ही लाभ घेतला . *तंत्रस्नेही बनले छोटे सुलतान* राज्य पुरस्कार प्राप्त कु. शुभांगिनी वासनिक यांचा नवोपक्रम covid-19 च्या काळात अतिशय उपयुक्त ठरला. 'शाळा बंद पण शिक्षण सुरू ' या अंतर्गत ऑनलाइन एज्युकेशन ला फार महत्त्व आले आणि शाळेच्या विद्यार्थ्यांना डिजीटल साधनांच्या वापरा बाबत माहिती होतीच त्याचाच उपयोग या काळात झाला.

शाळा आता गुणवत्तापूर्ण शिक्षणा बरोबरच भौतिक सुविधेने ही परिपूर्ण होत होती. शाळेला हॅट्रिकचा चान्स मिळाला तो पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या माध्यमातून, सलग तीन वर्ष आमचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरत आहेत. नाट्यक्षेत्रात प्रथम क्रमांक मिळणारी आमची विद्यार्थिनी कुमारी सुहानी भगत हिने 'बिऱ्हाड' ह्या चित्रपटात बालकलाकाराची भूमिका वठवली आहे. अशाप्रकारे शाळेचा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रवास हा अविरतपणे सुरू आहे. त्यासाठी शाळा विविध उपक्रम राबवित आहे. अशाप्रकारे शाळा सर्वांगीण यशस्वीतेचा टप्पा गाठत आहे.


| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती रत्नमाला खडके** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, वर्धा. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, कारखेडा, ता.मानोरा, जि. वाशीम.

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री गोविंद मनोहरराव पोतदार **ई-मेल :-** govindpotdar1982@gmail.com



**शाळेचे दर्शनी छायाचित्र.**

**शाळा विकास नियोजन :-** सर्वांच्या मनात शाळा विकासबद्दल विचार येत होते. मुख्याध्यापकानी सर्व पालक व शिक्षकांची सभा घेतली. शाळा विकासा बद्दल शिक्षक व पालकांनी आपले विचार मांडले. पालकांनी अतिशय उत्स्फुर्त असा प्रतिसाद दिला. या नियोजन सभेत पुढील उदेश ठेवण्यात आले. शाळा१००% डीजीटल करणे प्रत्येक वर्गात LED TV WITH ANDROID VERSION तसेच शाळेला एक संगणक लोकवर्गणीतून घेणे, शालेय परिसर सजावट, शालेय परिसरात झाडे लावून पर्यावरण रक्षण करणे. शालेय रंग रंगोटी करणे व भिंती बोलक्या करणे. शिक्षक पालक समन्वय साधने, विद्यार्थी प्रगतीसाठी व त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी शिक्षक व पालक यांचा समन्वय साधने हा अतिशय गरजेचा मुद्दा आहे. पालक सभेत जीउद्दिष्टे ठरविण्यात आली होती ती पूर्ण करण्यासाठी विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली.





**शिक्षक पालक व व्यवस्थापन समिती सभा**

**लोक सहभाग :-** शाळा विकासातील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे शाळेसाठी निधी. सुरुवातीला लोकवर्गणीला अल्प प्रतिसाद मिळाला, पण नंतर सर्व शिक्षक वृंद, पालक लोक वर्गणीसाठी गेले असता भरपूर निधी जमा झाला. पालक व शिक्षकांनी मिळून एकूण १९५०००/- रुपये लोकवर्गणीद्वारे जमा केले. यात गावातून शिकुन मोठ्या पदावर असलेल्या कर्मचाऱ्यांचा सहभाग जास्त होता. जमा झालेल्या निधीतून शाळा १००% डीजीटल करण्यात आले. प्रत्येक वर्गाला ANDROID TV घेतला. एक संगणक घेण्यात आला. याचाच फायदा शिक्षकांना होऊन अध्ययन अध्यापन डीजीटल झाले. संपूर्ण शाळेला रंग-रंगोटी करण्यात आली. शालेय भिंती बोलक्या करण्यात आल्या. जसे. भिंतीवर पाढे, वर्णमाला, प्राण्यांची माहिति इत्यादी रंगविण्यात आली.



**शालेय रंगरंगोटी**

**शालेय उपक्रम :-** विद्यार्थ्यांमध्ये समता हे तत्व रुजविण्यासाठी शाळेत सर्व जातीचे, धर्माचे सण साजरे करण्यात येतात. या उपक्रमामुळे विद्यार्थांचा उत्साह वाढत गेला आणि सर्व महापुरुषां बद्दल माहिती मिळाली.

**सांस्कृतिक कार्यक्रम.** :- विद्यार्थीच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विद्यार्थांच्या आवडी निवडी लक्षात घेऊन शालेय सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. यात विद्यार्थांचा उत्साह अवर्णनिय होता. अध्ययानात जे विद्यार्थी मागे होते. त्यांनी आपली विशेषता सांस्कृतिक कार्यक्रमातून दाखवली. तालुका स्तरीय नृत्य स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारखेडा येथील विद्यार्थ्यानी दुसरा क्रमांक पटकावला.



**सांस्कृतिक कार्यक्रमाचे छायाचित्र**

**शैक्षणिक सहल.** :- फेब्रुवारी २०२० मध्ये शाळेची शैक्षणिक सहल "वेद नंदिनी" तालुका जिल्हा अकोला येथे आयोजित केले होते. विद्यार्थी शाळेच्या बाहेर जावुन शिस्तीने राहतात व स्वच्छंदीपणे शिकतात असे या सहलीतून जाणवत होते. शाळेतील १०५ विद्यार्थी पैकी ६० विद्यार्थिनी सहलीत सहभाग घेतला होता. विद्यार्थांची निरीक्षण, आकलन व उपयोजन क्षमता या सहलीतून लक्षात आल्या.



**शैक्षणिक सहलीचे छायाचित्र**

**बाल आनंद मेळावा.** :-विद्यार्थांचा कल्पकतेला वाव मिळावा या हेतूने तसेच त्यांच्या सर्जनशिलतेचा विकास व्हावा या हेतूने बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थांनी फार आवडीने आणि कल्पकतेने वेगवेगळे दुकाने थाटली होती. यातून विद्यार्थात असलेली व्यवसायिकता दिसून आली.

**मुख्याधापक व शिक्षक - स्व विकास :-** विद्यार्थांना सर्वांगीण विकास प्रतीकडे नेण्याकरिता शिक्षकाला स्व विकास साधावा लागेल. म्हणून शाळेतील शिक्षकांनी स्वतःची शैक्षणिक व व्यावसायीक पात्रता वाढविली आहे. विविध प्रोत्साहनपर भाषणे ऐकणे, आयोजित करणे, विविध पुस्तके वाचन करणे, इत्यादी प्रयत्न स्व विकासा साठी करण्यात येत आहे. स्व विकासा साठी विविध प्रशिक्षणे लाभदायक ठरली. जसे ELCRLM प्रशिक्षण इंग्रजी अध्यापनात अतिशय उपयुक्त असे हे प्रशिक्षण होते. इंग्रजी पेटीतील साहित्य कसे वापरावे या बदल हे प्रशिक्षण होते. NISHTHA प्रशिक्षण हे प्रशिक्षण उपयोजनात्मक असल्यामुळे अतिशय परिणामकारक होते.

**अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील बदल:-** शाळा १००% डीजीटल झाल्यामुळे अध्ययन अध्यापन डीजीटल झाले ANDROID TV वर विविध शैक्षणिक व्हिडीओ पाहणे, ऐकणे. QR Code Scan करून विद्यार्थांना पाठावर आधारित विविध व्हिडीओ दाखवणे. अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील बदलामुळे असा अतिशय उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. विद्यार्थांना शालेय अभ्यासक्रमासह सामान्य ज्ञानाची माहिती असावी. यासाठी परिपाठात दररोज ३ सामान्य ज्ञानाची प्रश्न विचारणे व दुसऱ्या दिवशी त्या प्रश्नावर चर्चा घडवून आणणे असे या उपक्रमाचे स्वरूप होते. या उपक्रमास अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्व शिक्षकांनी स्वतः लक्ष देऊन या उपक्रमाची प्रक्रिया राबवली.

**लॉंक डाऊनच्या काळात राबविलेले उपक्रम. :-** कोविड-१९ मुळे शाळा बंद झाल्या. पण या काळात विद्यार्थी अभ्यासा पासून दूर राहू नये याकरिता शाळेतील सर्व शिक्षकांनी या काळात उपक्रम राबविले. या उपक्रमांतर्गत दररोज संध्याकाळी प्रत्येक विद्यार्थाला फोनकॉल द्वारे संपर्क करण्यात आला व त्यांनी दिवसभरात केलेल्या अभ्यासाचा मागोवा घेण्यात आला. ज्या पालकांकडे android मोबाईल नाहीत त्यांचा sms ग्रुप तयार करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थांना दररोज sms आणि whats app ग्रुप द्वारे अभ्यास देण्यात आला व त्याचा मागोवा घेण्यात आला. विविध शैक्षणिक व्हिडीओ टाकण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थांना गृह भेटी देण्यात.



**विद्यार्थानसाठी गृह भेटी देवून अभ्यासाचा आढावा घेतांना शिक्षक**

**जिल्हास्तरावर उपक्रमाला पुरस्कार**:- या काळात राबविलेल्या उपक्रमाची दखल DIET WASHIM यांनी घेतली आणि सदर उपक्रमाचे सदरीकरण जिल्हास्तरावर केले त्याकरिता त्यांचे DIET WASHIM कडून प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. विविध वृत्तपात्रांनी उपक्रमाची दखल घेऊन बातमी दिली. Thanks a teacher या उपक्रमांतर्गत शाळेतील शिक्षक श्री रणजीत जाधव सर यांचा पंचायत समिती मानोरा यांनी सर्वोतकृष्ट शिक्षक म्हणून सत्कार केला. शाळेबाहेरची शाळा या नागपूर आकाशवाणीने सुरु केलेल्या उपक्रमात विविध विद्यार्थांची मुलाखत घेतल्या जाते. कारखेडा शाळेची वर्ग ३ रीत शिकणाऱ्या कु. तनवी गोपाल चव्हाण या विद्यार्थिनीची मुलाखत घेण्यात आली. त्या करिता कु.तन्वी चव्हाण हिचा शाळे तर्फे सत्कार करण्यात आला.

**सेमी इंग्रजी माध्यमाला सुरुवात** :- जिल्हा परिषद वाशीम येथील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मार्ग दर्शनाने जिल्हातील पहिली सेमी इंग्रजी शाळा म्हणून सुरु करायचा संकल्प २०२०-२०२१ सत्रात केला आहे व पालकाकडून या संकल्पनेला भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे शाळेच्या पट संख्येत वाढ झाली आहे.

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर :-** प्रशासकीय कामकाज जसे मासिक पत्रके, शालेय पोषण आहार माहिती, विद्यार्थी वर्गवार,जातवार माहिती इत्यादी सर्वबाबी माहिती शालेय संगणकात जतन केलेले आहे. महिन्यातून एकदा प्रोजेक्टरचा वापर करून शैक्षणिक चित्रपट दाखविला जातो.

उपरोक्त विविध उपक्रमांच्या मुळे शाळेचा प्रवास यशस्वीतेकडे होत आहे. हा प्रवास असाच अविरत चालत राहणार आहे, हे नक्की.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. जगदीश करडे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, वाशीम. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रशाळा, निजामपूर, ता.रिसोड, जि.वाशिम

**मुख्याध्यापकाचे नाव :-** श्री. अर्जुन कृष्णाजी वरघट **ई-मेल :-** warghet30@gmail.com



**शाळेचा दर्शनी भाग**

2500 लोकसंख्या असलेलं निजामपुर हे गांव वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येते. अतिशय दुरावस्थेत असलेली ही शाळा आज शाळा विकास नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी, लोकसहभाग, शाळा, व शाळा व्यवस्थापन समिती, समन्वय व ग्रामपंचायतच्या वित्त आयोगाच्या माध्यमातून डिजीटल झाली असून विविध उपक्रमाच्या माध्यमातून नावारुपाला आली आहे.

**शाळा विकास :-** शाळेचा कायापालट घडवण्यासाठी वास्तविक शालेय आव्हानांशी जोडून शाळेत परिवर्तन, सुधार घडवूण आणणे हा याचा उद्देश आहे. मुख्याध्यापक शिक्षकांच्या सहकार्याने शाळेचा विकास होतो हे निर्विवाद सत्य आहे. वरील सर्व बाबींचा विचार करुन शाळा विकसनाचे नियोजन सर्व शिक्षक, व्यवस्थापन समितीच्या माध्यमातुन करण्यात आले. यामध्ये ग्रा.पं.वित्त आयोगाच्या मदतीने शाळा सुभोभन, रंगरंगोटी, शाळेसाठी 24 तास पाणी, विज व्यवस्था, शौचालय दुरुस्ती आदी बाबी प्राप्त करुन घेतल्या.शाळा परिवर्तनामध्ये सामाजिक परिवर्तन होणे अत्यंत गरजेचे असते. सर्व शिक्षक व व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने कमी झालेली पटसंख्या वाढविणे मोठे आव्हान होते. प्रवेशपात्र व विद्यार्थ्यांच्या घरी जावून त्यांना प्रबोधन केले. याची फलश्रृती म्हणजे 54 विद्यार्थ्यांचा शाळेत नव्याने प्रवेश होय. प्रचलित शिक्षण प्रणाली बरोबरच सातत्यपुर्ण सर्वंकष मुल्यमापन, आनंददायी शिक्षण, डिजीटल शिक्षण व सहशालेय शिक्षणाचा अवलंब केल्याने या नव्या शैक्षणिक परिवर्तनामध्ये सर्व विद्यार्थी सक्रीय व आनंदाने सहभागी होतांना दिसली.

**लोकसहभाग :-** लोकसहभाग व शैक्षणिक उठवांतर्गत शाळेच्या भौतिक विकासासाठी व सौंदर्यीकरणासाठी नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने पुढाकार घेतला. काहींनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी लॅपटॉप, शारीरिक शिक्षण गणवेश, वॉटरबॉटल, वह्या पेन आदी वस्तू भेट दिल्यात. उपलब्ध्र संगणकामुळे व शैक्षणिक परिवर्तनामुळे सर्व विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्वक शिक्षण पोहचून

शैक्षणिक समानता होण्यास मदत झाली. लोक सहभागातून शाळेला एल.ई.डी. शाळेचा दर्शनी फलक, डिजीटल वर्ग, भिंतीवरील चित्रे (बोलक्या भिंती), विद्यार्थ्यांना भेटवस्तू, खेळाचे साहित्य, पंखे, खुर्ची, टेबल, शैक्षणिक साहित्य इत्यादी स्वरुपात भेटवस्तू, साहित्य मिळाले.



**ग्रा.पं. माध्यमातून शाळा सुशोभिकरण व लोकसहभागातून शाळा विकास**

**विद्यार्थी विकास :-** शाळाबाह्य विद्यार्थी, स्लांतरित बालके, कुपोषित व बहुविकलांग मुले ही काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली बालके आहेत. त्यांना शाळा प्रवाहात आणने व त्यांचे पूनर्वसन करणे आवश्यक आहे. परिसरातील 2 शाळाबाह्य विद्यार्थी, कोविड-19 मुळे स्थलांतरित होवून आलेले 4 विद्यार्थी शाळा प्रवाहात दाखल करण्यात आलीत समानते बरोबरच समान संधी व सुविधा प्राप्त करण्याचा अधिकार आहे, त्याच अनुषंगाने शाळेत दाखल वरील सर्व विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येतो. शाळेतील 2 बहुविकलांग विद्यार्थीनी यांना दिव्यांग प्रोत्साहनपर भत्ता व मदतनीस भत्तांचे वाटप करण्यात आले.

**शालेय उपक्रम :-** मानसाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रथम शाळा संस्कृतीच परिणाम करत असते. जिथे शिक्षण व शिक्षण मूल्यमापन केले जाते, जिथे सहकार्य व सांघिक बाबींना महत्त्व दिले जाते, ती शालेय संस्कृती ! जेव्हा शालेय संस्कृतीत सकारात्मकता असते तेव्हा प्रत्येक शिक्षक व विद्यार्थी आनंदाने राहतात. सकारात्मक वातावरणात अनेक आश्चर्यकारक बदल घडत असतात. सकारात्मक शाळा संस्कृती विकसित करण्यासाठी सहयोग, विश्वास बदल, संधी,सहभाग,अभिमान इत्यादी गोष्टींची आवश्यकता असते. शाळा संस्कृती विकसनाच्या दृष्टीने शाळेत काही उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामूहिक कवायत, वनभोजन, एक दिवसीय सहल, सामूहिक मध्यान्ह भोजन,सामूहिक क्षेत्र भेटी, जयंती व पुण्यतिथींचे आयोजन, पर्यावरणपुरक होळी, शाळेमार्फत गुरांसाठी पाणपोई, हळदी-कुंकू कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा आयोजन,वाढदिवस साजरे करणे. अश्या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये सहयोग, विश्वास, समता, संधी, अपेक्षित वर्तन बदल, एकात्मता, देशाभिमान, वैज्ञानिक दृष्टीकोन आदि मूल्यांची रुजवणूक करता आली.



**शाळेत राबविले जाणारे विविध उपक्रम**

**स्व विकास :-** स्पर्धेच्या या युगात आपल्या ज्ञानाच्या कक्षा अद्ययावत करणे गरजेचे आहे. यासाठी स्वत: मुख्याध्यापक व शिक्षक यांनी काळानुरूप स्वत:मध्ये विधायक बदल करणे गरजेचे असते. शाळेत संगणक कक्ष असल्याने संगणक ज्ञान मिळविणे, संगणक हाताळण्यासाठी व अद्ययावत संगणक ज्ञान प्राप्त करण्याच्या दृष्टीने ज्यांचा MS-CIT कोर्स करणे बाकी होते. त्यांनी तो प्राधान्यक्रमाने पूर्ण केला. दिक्षा ॲप व अध्ययन-अध्यापन प्रकियेची माहिती देणारे विविध ॲप्स डाऊनलोड केलीत. विविध प्रशिक्षणात शालोपयोगी ज्ञान व तंत्रज्ञान आत्मसात केलं. विविध शैक्षणिक ब्लॉग्स ला संकेतस्थळावर भेटी दिल्यात. विविध प्रशिक्षणे ज्यात तालुका तथा जिल्हास्तरावर शिक्षकांनी प्रशिक्षणे घेतली. यामध्ये निष्ठा प्रशिक्षण, स्पोकन इंग्लिश, टॅग प्रशिक्षण, वाचन क्षमता सुधार प्रशिक्षण, भाषा व गणित पेटी साहित्य आदी प्रशिक्षणाचा समावेश होता. सेमिनार, V.C. व्दारे मिटींग आदी माध्यमातून मिळविलेले शैक्षणिक तंत्रज्ञान, विचारांची देवाण-घेवाण व परस्परातील आंतरक्रिया याव्दारे समविचारी शिक्षकांचा एक संघ तयार झाला. 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीप्रमाणे स्वविकास अंगीकारून शाळा व विद्यार्थ्यांसाठी काही सकारात्मक करता आले, याचे मनस्वी: समाधान आहे.

**अध्ययन्न अध्यापन पध्दती :-** प्रचलित शिक्षण पध्दती बरोबरच विद्यार्थ्यांच्या बोली भाषेचा वापर अध्ययन्न अध्यापन पध्दतीत संकल्पना व संबोध स्पष्ट करण्यासाठी करण्यात आला. मातृभाषेतून शिक्षण दिल्यास अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुलभ होते हे अनुलक्षूण खालील बाबींची पूर्तता करण्यात आली. श्रवण व वाचनासाठी पूरक साहित्य उपलब्ध करुन दिले. भाषा प्रयोगशाळेची निर्मिती करण्यात आली. अध्ययन कोपरा निर्मिती करण्यात आली. आदर्श वाचन विकास प्रकल्पाचे आयोजन केले. परिसरातील उपलब्ध शैक्षणिक साधनांचा वापर करण्यात आला. सातत्यपुर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. संगणकाच्या माध्यमातून – शैक्षिाक तंत्रज्ञान मिळविण्याचा प्रयत्न. डिजीटल वर्गनिर्मिती करण्यात आली. एक दिवस दप्तराविणा' उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. विषयतज्ञांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेण्यात आले. वरील सर्व बाबींचा परिणाम असा झाला की, सर्व विद्यार्थी शाळेत नियमित येऊ लागले. बोलीभाषेचा वापर केल्याने

अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ झाली. विद्यार्थी संगणक व अध्ययनात रुची घेवू लागली. डिजीटल वर्गामुळे विद्यार्थी शाळेत रममाण झाली. विविध प्रयोग करुन पाहू लागली. टाकाऊ पासुन टिकाऊ वस्तुंची निर्मिती करु लागली. विद्यार्थी विविध उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवू लागली.

**शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक पालक संघ :-** या शाळांच्या दोन महत्त्वांच्या समित्यांच्या माध्यमातून शाळा विकास शक्य आहे. व्यवस्थापन समिती मासिक सभांमध्ये विविध विषयावर चर्चा होवून शाळास्तरावरील अडचणी, समस्या यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने कृती आराखडा तयार करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समिती व सर्व शिक्षक यांनी प्रत्येक प्रवेशपात्र विद्यार्थ्यांच्या घरी भेटी दिल्या. पालक सभा व माता-पालक सभा यामधुन शाळेच्या विविध बाबीवर चर्चा झाली. शाळेच्या भौतिक विकासासाठी अनेक मदतीचे हात पुढं आलेत. किशोरवयीन मुली व मातांसाठी शाळा स्तरावर वैद्यकीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. तसेच गावातील मातांसाठी मकर संक्रांतीचे औचित्य साधून माता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पालकांचा शाळा संपर्क व सर्व शिक्षक शाळेसाठी घेत असलेली मेहनत यामुळे शाळेविषयी त्यांना अपुलकी वाटु लागली. शाळेच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी व शाळा विकासासाठी ते स्वयंस्फुर्तीने पुढे आले.



**माता-पालक मेळावा व विविध कार्यक्रमाचे आयोजन**

**नवोपक्रम :-** पारंपारिक पध्दतीपेक्षा वेगळा, नाविण्यपूर्ण मार्ग वापरुन केलेला सर्जनशिल उपक्रम म्हणजे नवोपक्रम होय. विविध नवोपक्रम राबविण्यासाठी आमचे शिक्षक विद्यार्थी नेहमी अग्रेसर असतात. शाळा स्तरावर राबविलेले काही नवोपक्रम स्वच्छ शाळा, सुंदर शाळा, सुंदर खराटा स्पर्धा, गुरांसाठी पाणपोई, किशोर वयीन मुलींसाठी वैद्यकीय मेळावे, बोलीभाषेतून प्रमाण भाषेकडे, स्वच्छतादूत मोहिम, तंबाखुमुक्त शाळा, एक दिवस दप्तराविणा, हरित शाळा उपक्रम, कौन बनेगा ज्ञानपती, बालआंनद मेळावा, एक तास संगणक, समस्या व सूचना पेटी, विविध शिबीरातून विद्यार्थी विकास, टाकाऊ पासून टिकाऊ साहित्य, योग शिबीर आयोजन, शैक्षणिक सहल, शालेय परसबाग, विविध दिन साजरे करणे, एक दिवस गावासाठी, शालेय व वैयक्तिक स्वच्छता अभियान.वरील सर्व उपक्रमामुळे शाळा स्वच्छ व सुंदर बनली. वृक्षसंवर्धन वृत्ती विकसित झाली. प्राणीमात्रावर दया, व्यसनमुक्ती, संगणक ज्ञान, संशोधक वृत्ती वाढीस लागली. सहकार्य वृत्ती वाढीस लागून आयुष्यात व्यायामाचे व योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळले.

**तंत्रज्ञानाचा वापर :-** शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा योग्य़ वापर करण्यासाठी आपल्या शाळेसाठी योग्य़ तांत्रिक उपकरणे निवडणे हे अत्यंत महत्वाचे आहे. आमच्या शाळेत रेडिओ, डिव्हिडी, मोबाईल फोन, संगणक, ई-मेल, ब्लॉग, यु-ट्युब अशा विविध तंत्रज्ञानाचा वापर शैक्षणिक कार्य सुलभ, परिणामकारक व प्रभावी करण्यासाठी करण्यात येतो. माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन शिक्षणाच्या दर्जात उल्लेखणीय सकारात्मक सुधारणा आम्हाला करता आल्या. शिक्षणाची व्याप्ती न वाढविता गुणवत्ता वाढविणे तंत्रज्ञानामुळे शक्य़ झाले. प्रशासकीय कामकाजही करणे सुलभ झाले. शिक्षकांच्या शिकविण्याच्या पध्दतीत व विद्यार्थ्यांच्या अभ्यास करण्याच्या क्षमतेत वाढ, सुधारणा व्हावी हा उद्देश डोळयासमोर ठेवून शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर आमच्या शाळेत करण्यात येतो. शेवटी असे निदर्शनास आले की, तंत्रज्ञानाचा योग्य़रित्या वापर केल्यास विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याविषयी आवड शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते.

शाळेत राबविलेले विविध नवोपक्रम, लोकसहभागातून शाळा विकास, शाळा संगणकीयकरण, गुणवत्तापूर्वक शिक्षण शालेय व सहशालेय उपक्रम व केलेल्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याची दखल घेवून शाळेच्या मुख्याध्यापकाना महाराष्ट्र शासनाने 'राज्य़ आदर्श शिक्षक पुरस्कार' दि. 5 सप्टेंबर 2018 रोजी प्रदान केला.


निजामपूर येथे विद्यार्थ्यांसाठी 'घर घर शाळा' उपक्रम

शैक्षणिक, सामाजिक उपक्रमातून विद्यार्थ्यांचा विकास

जि.प. शाळेत गुरांसाठी पाण्याची व्यवस्था

निजामपूर जि.प. शाळेत विद्यार्थ्यांना पोषण आहार वितरण

आदर्श शिक्षक पुरस्काराने वरघट, मोटघरे सन्मानित

**शाळेच्या विविध उपक्रमांना व यशाला मिळालेली वृतपत्रातील प्रसिद्धी**

आपली शाळा हेच आपले वैभव आहे. हे वैभव असेच वाढावे म्हणून मुलांना आपले सर्वस्व मानून जसे देशासाठी जवान तयार होतात. तसे शाळेतून संवेदनशील व्यक्ती आपल्या हातून घडविणे हेच व्रत या पुढे चालवायचे आहे. यातून देशाचेही वैभव वाढवायचे आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्री. जगदीश करडे** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, वाशीम. | मिपा, औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सातेफळ, ता.कळंब, जि. यवतमाळ.

**मुख्याध्यापकाचे नाव :- हेमंत लक्ष्मणराव शेंडे ई-मेल:- hshende1013@gmail.com**



**शाळेची इमारत**

'शिक्षकी पेशा' हा केवळ उपजीविकेचे साधन नसून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे करिता समर्पित असणे हा उदात्त हेतू या मागे आहे. 'अध्ययन, अध्यापन, संशोधन.' या ब्रीद वाक्याच्या आमची शाळा सतत प्रयत्नशील असते. विविध प्रकारचे प्रयत्न करून अपेक्षित असे यश प्राप्त होत नसल्याने प्रयत्नांची दिशा बदलविणे आवश्यक वाटत होते. त्याप्रमाणे शाळेचा विकास कसा साध्य करता येईल याअनुषंगाने कार्य नियोजन करण्यात आले. त्याअंतर्गत पुढील मुद्यांवर काम करण्यात आले.

**शाळा विकास नियोजन :-** शाळेला विद्यार्थ्यांशिवाय अर्थ नाही. शाळा ही निर्जीव इमारत आहे. शाळेला जिवंतपणा आणण्याकरिता विद्यार्थ्याला नजरेसमोर ठेवून नियोजन करण्यात आले. रमणीय शाळा, शिक्षकाविना वाचन, इंग्रजी परिसर प्रयोग शाळा, सर्वधर्मसमभाव कक्ष, गणित प्रयोगशाळा, दप्तराविना शाळा, डिजिटल शाळा, परसबाग , रेन वॉटर हार्वेस्टिंग, आधुनिक गणवेश, सेमी इंग्लिश वर्ग, इंग्रजी संवाद, आनापान साठी ध्यान वर्ग.

वरील उपक्रमाच्या आयोजनाकरिता शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ, शिक्षक-पालक संघ, केंद्रप्रमुख व डायटचे अधिकारी व विषय सहाय्यक व सरपंच व ग्रामसेवक, पालक यांच्याशी चर्चा केली. त्यांनी संपूर्ण मदतीचे आश्वासन दिले. याकरिता लागणारा निधी लोकवर्गणी व ग्रामपंचायत कडून घेण्याचे ठरले. त्यानुसार हा निधी गोळा केला व मुख्याध्यापक श्री हेमंत शेंडे यांनी आपल्या जवळची रक्कम घालून संपूर्ण उपक्रमाला मूर्तरूप दिले.त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक साहित्य निर्मितीचे काम करण्याकरिता शिक्षकांनी ठरविले.

**क्षमतेनुरूप अध्ययन** : आमच्या शाळेत संपूर्ण अभ्यासक्रम ज्ञानरचनावाद पद्धतीने शिकविता यावे याकरिता तसेच प्रत्येकाला आपापल्या क्षमतेने शिकता यावे याकरिता ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. अध्ययन, अध्यापन व परीक्षण एकाच वेळी करता यावे याकरिता नियोजन करण्यात आले. त्या पद्धतीचे संपूर्ण पाठ्यपुस्तक शैक्षणिक साहित्याची निर्मिती करण्यात आली.

**आनंददायी शिक्षण** :100% उपस्थिती 100% अध्ययन हे ध्येय साधण्याकरिता विद्यार्थी ज्याप्रमाणे खेळण्यात रुची घेतो त्याप्रमाणे अभ्यास सुद्धा खेळण्यातून व्हावा याकरिता शैक्षणिक साहित्य, डिजिटल बॅनर्स तयार करण्याचे नियोजन केले.

**शाळेचा रमणीय परिसर शाळा**: या उपक्रमांतर्गत शाळेला अतिशय सुंदर बनविण्याकरिता शाळेच्या चहुबाजूने मेहंदी ची लागवड करण्यात आली व अशोक वृक्षाची लागवड करण्यात आली. त्याचप्रमाणे शाळेत लॉन्स तयार करण्यात आले. वॉल कंपाउंडवर सुंदर चित्र काढण्यात आले. फुलांचे ताटवे तयार करण्यात आले. गावातील प्रेक्षणीय स्थळ म्हणजे शाळा हे समीकरण बनविण्यात आम्ही यशस्वी झालो.



**शाळेचा रमणीय परिसर**

**इंग्रजी परिसर प्रयोगशाळा** :- इंग्रजी भाषा वर्तमान काळाची गरज बनली आहे. त्यात आमचे विद्यार्थी कमी पडू नये याकरिता शालेय परिसराचा सुंदर वापर करण्यात आला. इंग्रजीचे शैक्षणिक साहित्य, बॅनर तयार करण्यात आले व विविध कृतींची परिसरात रचना करण्यात आली. इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांप्रमाणे आमच्या शाळेतील विद्यार्थी इंग्रजी संवाद करतात. दररोज इंग्रजी प्रयोगशाळेत संपूर्ण विद्यार्थी सराव करतात. त्यात इंग्रजी शब्द भंडार, इंग्रजी वाक्य, व्याकरण, संभाषण करण्याचा सराव होतो, हा संपूर्ण सराव स्वयंअध्ययनातून होतो.

**दप्तराविना शाळा** :- आमच्या शाळेत वर्ग एक ते पाच चा अभ्यासक्रम ज्ञानरचनावादी पद्धतीने शिकविला जातो. याकरिता अभ्यासक्रम साहित्याच्या माध्यमातून शिकविला जातो. याकरिता अभ्यास पाठ्यपुस्तकात बंदिस्त न राहता तो परिसरातून शिकविला जातो. संपूर्ण परिसर जणू अभ्यास केंद्र बनला आहे. इंग्रजी, गणित विषयाचे विभाग तयार करण्यात आले. विद्यार्थी स्वयंअध्ययनातून शिकतात.

**डिजिटल शाळा** :- डिजिटल इंडिया च्या स्वप्नपूर्ती करिता आमची शाळा डिजिटल करण्यात आली. शाळेत संपूर्ण अभ्यासक्रम संगणक व स्मार्ट टीव्ही च्या माध्यमातून शिकविला जातो. याकरिता ग्रामपंचायत व लोकवर्गणीच्या माध्यमातून शाळा डिजिटल केली. विद्यार्थी संगणक स्वतः हाताळतात व अभ्यास करतात.

**शिक्षकाविना वाचन: (कोरोना काळातील शिक्षण)** :- स्वयंअध्ययन, खेळ, गटकार्य, शिक्षकाची देखरेख,याकरिता 3 × 10 चे बॅनर तयार केले जाते. त्या बॅनर पासून 20 बंच तयार केले व त्या बॅनर मध्ये प्रत्येक शब्दाचे 4 याप्रमाणे 20 पट्ट्या टाकतात व त्यातील अक्षराचे 20 ते 25 अक्षर पट्ट्या टाकल्या जाते. अशाप्रकारे 20 बंच चा सराव दिला जातो. यात विद्यार्थी खूप आनंदी राहतो. या उपक्रमामुळे खडू, दप्तराला संपूर्णपणे सुट्टी दिली जाते. अभ्यास म्हणजे केवळ खेळ आहे. खेळातून संपूर्ण वाचन शिकण्याची प्रक्रिया पूर्ण होते. आमच्या गावात कोरोना काळात सर्व विद्यार्थ्यांच्या घरी हे बंच पोहोचविले. त्यातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन क्षमता प्राप्त झाली.



**स्वयं अध्ययन करताना विद्यार्थी**

**सर्वधर्मसमभाव स्थळ** : आधुनिक युगात विकासासोबत विनाश सुद्धा वाढतांना दिसत आहे. याला कारण धर्मांधता, जातीयता, वंशवाद वाढताना दिसत आहे. याकरिता सर्वधर्मसमभावाचे संस्कार बालपणात मिळाल्यास ते चिरकाल टिकते. याकरिता शालेय परिसरात अतिशय सुंदर असे प्रार्थनास्थळ तयार केले. नियमित सर्वधर्मसमभाव प्रार्थना व कथा गोष्टी ध्यानाच्या माध्यमातून संस्कार केले जाते.



**सर्वधर्म समभाव प्रार्थना करताना विद्यार्थी**

**रेन वॉटर हार्वेस्टिंग** :-शालेय परिसराला पावसाळ्यात तलावाचे स्वरूप प्राप्त होत होते आणि उन्हाळ्यात बोअरला पाणी मिळत नव्हते यावर उपाय म्हणून रेन वॉटर हार्वेस्टिंग करण्यात आले. त्यामुळे शाळेचे मैदान आता मैदानच राहिले आणि बोअरला भरपूर पाणी आहे.

**शाळा विकासात गावाचा सहभाग :-** शाळा विकासात शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ, शिक्षक-पालक संघ व गावकरी यांची खूप मोठी भूमिका आहे. लोकवर्गणी गोळा करणे, विविध उपक्रमाचे आयोजन करणे, सांस्कृतिक कार्यक्रम, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, आठवडी बाजार इत्यादी करिता शाळा व समाज एकरूप होऊन काम केले. त्यामुळे शाळा नावारूपाला आली, काम करताना शिक्षकांना उत्साह मिळाला. यात महिलांची भूमिका फार मोलाची ठरली.



**माता पालक संघ सभा**

अध्ययन, अध्यापन, संशोधन या ब्रीदवाक्याच्या पुर्तीकरिता शिक्षकांनी स्वतःच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला. त्यात पुढील शिक्षण घेतले. विविध पुस्तकांचे वाचन केले. यूट्यूब च्या माध्यमातून इंग्रजी भाषेचे अध्ययन करून त्याचा वापर शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविण्यात करण्यात आला. शाळेत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यात शिक्षका विना वाचन या उपक्रमाचा विशेष फायदा झाला. शालेय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर केल्या जातो. आमची शाळा सातत्याने विविध उपक्रमाचे आयोजन करीत असते. याकरिता शाळेला नवोपक्रम स्पर्धेत जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळाला आहे. या उपक्रमांमुळे शाळेची यशाची कमान वर वर चढत आहे.

मार्गदर्शन
**श्रीमती. किरण रापतवार**
नोडल अधिकारी,
डायट, यवतमाळ.

समन्वयन
**डॉ. ज्योती कुलकर्णी**
समन्वयक,
मिपा, औरंगाबाद.

प्रेरणा
**डॉ. नेहा बेलसरे**
संचालक,
मिपा, औरंगाबाद.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुकळी, ता.कळंब, जि.यवतमाळ.

**मुख्याध्यापक नाव :-** अमोल सुभाषराव पालेकर **ई-मेल:-** palekaras@gmail.com




**जि.प. प्राथमिक शाळा, सुकळी शाळेचे प्रवेशद्वार**

शाळेत भौतिक समस्यांच्या डोंगराखेरीज विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा हे सुध्दा आव्हान होते.या सर्व समस्या व आव्हानांवर मात करण्याचे सामर्थ्य खऱ्या अर्थाने मिळाले ते आमच्याकडे आशेने बघणाऱ्या पालक व हसऱ्या चेहऱ्याने आमचे स्वागत करणाऱ्या आमच्या विद्यार्थ्यांमुळे. पाचशे लोकवस्ती असणाऱ्या या गावातील विद्यार्थी व लोकांच्या माध्यमातूनच आपण आपल्यावर आलेल्या या जबाबदारीला समर्थपणे सामोरे जावून शकतो हा आशावाद मनात जागा झाला. शाळेमध्ये दिसत असणाऱ्या प्रत्येक समस्यारूपी संकटांना संधी माणून काम करण्याचा आशावाद जागा झाला आज केवळ दोन वर्षाच्या अल्प कालावधीत शाळेच्या सर्व भौतिक गरजांची परिपूर्ती तर झालीच या शिवाय उपक्रमशील शाळा म्हणून संपूर्ण जिल्ह्यात व राज्यात नावलौकीक आमच्या शाळेने प्राप्त केला आहे. दोन वर्षापूर्वी 'क' श्रेणीत असणारी जि.प. प्राथमिक शाळा, सुकळी ही 'अ' श्रेणीत असून विद्यार्थ्यांची संपादणूक व दर्जा हा इतर शाळेसाठी प्रेरणादायी आहे. हा सर्व बदल केवळ आम्हा शिक्षकाच्या प्रयत्नातून साध्य झाला नसून शाळा व्यवस्थापन समितीची साथ, पालकांचा व गावकरी मंडळीचा सहकार्याचा हाथ,आमच्या विद्यार्थी वर्गाचा सकारात्मक प्रतिसाद ,तसेच अधिकारी वर्गाचे प्रेरणादायी मार्गदर्शन या सर्वांमुळे आमची शाळा ही नवनव्या शैक्षणिक प्रयोगाची व गुणवत्तेची प्रयोगशाळा बनली आहे.

**शालेय विकास :-** शालेय भौतिक गरजांची परिपूर्ती व शैक्षणिक गुणवत्तेत आमुलाग्र बदल या दोन्ही आघाडयांवर काम करून कमीत कमी कालावधीत परिणामकारक बदल घडवून आणण्यासाठी शाळा विकासाचे नियोजन व अंमलबजावणी करतांना खालील मार्गाचा अवलंब केला.

**शाळा व्यवस्थापन समितीचे सक्षमीकरण -** शाळेच्या शाश्वत बदलासाठी शाळा व्यवस्थापन समिती ही कार्यक्षम असणे गरजेचे आहे, शालेय विकासासंदर्भात समिती सदस्यांची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत विविध समस्या व त्या सोडविण्यासाठीचे नियोजन या दृष्टीने विचारमंथन झाले. काही गुणवत्तापूर्ण शाळेंच्या चित्रफीती त्यांना दाखविल्या. समिती सदस्य प्रत्येक सभेला आवर्जुन उपस्थित राहायला लागले. ठराविक कालावधीनंतर त्यांची प्रशिक्षणे व कार्यशाळा आम्ही घेतल्या ज्याचा शाळेत व्यवस्थापन समितीच्या सक्षमीकरणात लाभ झाला.

**माता-पालकांचा निर्णय प्रक्रीयेत सहभाग :–** शालेय विकासाचे नियोजन करतांना मातापालकांना समानतेच्या सुत्रानुसार निर्णयप्रक्रीयेत योग्य सहभाग देण्यात आला. माता-पालक संघाचे पुनरूज्जीवन करण्यात येवून दर महिन्याला माता-पालक संघाच्या बैठका घेण्यात येवू लागल्या. माता-पालकांनी सुचविलेल्या सुचनांची प्रामाणिकपणे दखल घेतल्यामुळे ही शाळा आपली आहे ही भावना मातापालकांची झाली. त्यामुळेच शाळेतील प्रत्येक उपक्रमात माता-पालकांचा उत्स्फूर्त सहभाग वाढला. शालेय भौतिक विकासाबरोबरच आपापल्या मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी मातापालक अधिक जागृतपणे कार्य करू लागल्या.

**पालकांची शैक्षणिक कार्यशाळा –** विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी पालकांनी गृहपाठ सोडवतांना आपल्या पाल्यास कशी मदत करावी व आपल्या मुलांच्या मोकळया वेळेचा सदुपयोग कसा करून घ्यावा यासंबंधी पालकांची ठराविक कालावधीनंतर कार्यशाळा घेण्यात येवू लागल्या. कोरोना संकटाच्या या कालावधीतसुध्दा आमची पालकांची कार्यशाळा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. यामध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सुद्धा आमच्या पालकांना मार्गदर्शन केले. शालेय शाश्वत बदलासाठी पालकांना सदैव प्रेरीत ठेवण्याच्या दिशेने आमची पालकांची कार्यशाळा मैलाचा दगड ठरली आहे.



**पालकांची कार्यशाळा**

**बालरक्षण व बालहक्कासाठीच्या उपक्रमाचे नियोजन -** बालस्वयंरक्षण प्रशिक्षणाचे आयोजन, लोकांवर येणारे मानवीय व नैसर्गिक संकटाच्या संदर्भ बालकांना जागृत करण्यासाठी शाळा पातळीवर आम्ही बालकांचे प्रशिक्षण घेतले. ज्यामध्ये बालकांना स्वयंरक्षणाचे विविध मार्ग व प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या प्रशिक्षणांमुळे संभाव्य संकटाची जाणिव होऊन त्यावरील उपाया संदर्भात जाणिव जागृती झाली. विद्यार्थ्यांच्या आहार व आरोग्यासंबंधी जागृती संतुलीत आहार व त्यायोगे चांगले आरोग्य हा बालकांचा हक्क आहे. परंतु चुकीच्या सवयीमुळे किंवा अज्ञानामुळे म्हणा माझ्या शाळेतील काही मुले ही कुपोषित असल्याची व बऱ्याच मुलांचा B.M.I. हा कमी असल्याचे आढळले होते. चांगल्या आरोग्याशिवाय शैक्षणिक संपादणूक शक्य नाही हे ओळखून प्रत्येक मुलांच्या आरोग्यासंबंधी पालकसभेत चर्चा केली. मुलांच्या पोषणासाठी उपलब्ध खाद्यपदार्थ व पोषणमूल्ये, जेवणाच्या वेळा, या संबंधी प्रत्येक विद्यार्थी व पालकांना निर्देश दिले. रोज त्याचा आढावा

घेतला या सर्व बाबींचा सकारात्मक परिणाम म्हणजे मुलांच्या आरोग्यात कमालीची सुधारणा होऊन त्याचा लाभ शैक्षणिक संपादणुकीसाठी ओघानेच झाला. बालसंरक्षण गटाची निर्मिती शालेय विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी लागाव्या त्यांचे सर्व प्रकारच्या शोषणा पासून संरक्षण व्हावे. त्यांच्या समस्यांच्या निराकरणासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे याकरीता गावचे पोलिस पाटील यांचे अध्यक्षतेखाली बालसंरक्षण गटाची निर्मिती करण्यात आली. या समितीतील सदस्य मुलांना वाईट गोष्टीपासून दूर राहण्यास व चांगल्या गोष्टींचे अनुकरण करण्यासाठी प्रोत्साहित करतात. तसेच त्यांचे सर्व प्रकारच्या शोषणा पासून संरक्षण करण्यास कटिबध्द असतात.

**5) लोकसहभागातून शाळाविकास -** शाळेच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी जनसहभागास प्रोत्साहित करण्यात आले. या कामी शाळा व्यवस्थापन समितीचे भरीव योगदान असून, अल्प कालावधीत 1,52,000 रू. एवढा जनसहभाग गोळा करण्यात आला. यातून शाळेस महत्वपूर्ण गरजांची परिपूर्ती करण्यात यश प्राप्त झाले आहे. शालेय विद्युत योजना शाळेमध्ये विद्युत जोडणी नव्हती. जनसहभागातून शाळेत नविन जोडणी घेवून शाळेचे देयक हे सुध्दा जनसहभागातून भरण्यात येवू लागले. पाणी पुरवठा योजना शाळेतील हातपंप नादुरूस्त होता. तो काढून टाकून त्या कुपनलिकेत बोअर मशीनचा वापर करून पाणी आता सरळ टाकीत जाते. सर्व शाळेत ठिकठिकाणी नळांची योजना केली आहे. जनसहभागाच्या माध्यमातून पाण्याचा महत्वपूर्ण प्रश्न सोडविण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांना शुध्द पाण्याचा पुरवठा व्हावा या उद्देशाने B.S.I. या कंपनीकडे गावकऱ्यांनी मागणी केली ती जलशुध्दीकरण सयंत्राची. ती मागणी, कंपनीने C.S.R. निधीतून पूर्ण करून दिली. यामुळे आज आमच्या शाळेतील विद्यार्थी शुध्द पाणी पिण्यासाठी वापरतात.



**लोकसहभागातून शाळेच्या भिंती प्रसन्न व बोलक्या झाल्या**

शाळेत प्रवेश केल्याबरोबर मुलांना प्रसन्न वाटावे भिंतीवरील मजकूर हा ज्ञानत भर टाकणारा असावा. मुलांना शाळेत अधिक आनंद मिळेल. अशी भावना व्यवस्थापन समिती सभेत व्यक्त केल्याबरोबर शाळा व्यवस्थापन समितीने माझ्या शब्दास दुजोरा दिला. केवळ एका दिवसात 55000 रू. निधी गावकऱ्यांनी संग्रहित करून दिला. या निधीद्वारे शालेय रंगरंगोटीचे काम करण्यात येवून आज शाळेच्या भिंती प्रसन्न, बोलक्या व माहितीपूर्ण झाल्या आहेत. शाळेतील

कोणताही कार्यक्रम साजरा करण्यासाठी रंगमंच फार आवश्यक आहे ही गरज ओळखून सुसज्ज असा रंगमंच 10000 रू. खर्चुन बांधण्यात आला. हे सर्व जनसहभागातून साध्य झाले. शाळेला केवळ दोनच वर्गखोल्या असल्यामुळे इतर साहित्य ठेवण्यास शाळेत जागा नव्हती यामुळे खुप समस्या व अडगळ निर्माण होत होती. यावर उपाय म्हणून एक लहान भांडार कक्ष जनसहभागातून उभारण्यात आला. याच बरोबर प्रवेशद्वारा जवळ सुशोभिकरण करून शाळा आकर्षक करण्यात आली.शाळेच्या अंगणात पावसाचे पाणी मोठया प्रमाणावर गोळा होत असल्यामुळे गंभीर समस्या निर्माण होत होती. जनसहभागाद्वारे मुरूम टाकून व स्तरीकरण करून शालेय प्रांगणाला योग्य रूप देण्यात आले व मैदान निर्मिती करण्यात आली.अशा पध्दतीने गावकऱ्यांच्या सहयोगातून शाळेचा भौतिक विकास साध्य झाला असून शाळेमध्ये नवचैतन्याचे वारे वाहू लागले. शिक्षक व सोबतीला शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांच्या सांघीक शक्तीमुळे शाळेचा केवळ भौतिकच नव्हे तर गुणात्मक विकास अधिक वेगाने झाला.

**शालेय उपक्रम :-** सांघिक शक्तीमुळे शाळेने राबविलेले 51 वैशिष्टयपूर्ण उपक्रम यशस्वी झाले असून त्याचा लाभ विद्यार्थ्यांला व पर्यायाने संपूर्ण गावाला होत आहे. आज उपक्रमशील शाळा म्हणून शाळेचा नावलौकिक सर्वदूर पसरला आहे.

**बिनघंटीची शाळा -** शाळेची काटेकोर वेळ न राहता विद्यार्थ्यांना मुक्तपणे विद्यार्जन करता यावे यासाठी दोघांच्या सांघिक प्रयत्नातून आमची शाळा बिनघंटीची झाली आहे. शाळा सकाळी 9.00 वाजेपासून उघडते व सध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत सुरू राहते. शाळेच्या सर्व जबाबदाऱ्याचा विद्यार्थी सांघिक पध्दतीने पूर्ण करतात.

**पालकांचे सांघिक सहकार्य -** केवळ शिक्षकच नव्हे तर पालकही सांघिक वृत्तीने शाळेसाठी कार्य करत असून बंधारा निर्मीती शाळेतील इतर उपक्रम जसे स्नेहभोजन यामध्ये आनंदाने पुढाकार घेतात. आदरणीय शिक्षणाधिकारी जि.प. यवतमाळ यांच्या शाळेला भेटीप्रसंगी माता पालकांनी केलेल्या उत्कृष्ट आयोजनाने अधिकारी वर्ग भारावून गेला होता हे पालकांच्या सांघिक सहकार्याचे उत्कृष्ट उदाहरण सांगता येईल.

**अध्ययन - अध्यापन प्रक्रिया :-** शाळेच्या वैशिष्यपूर्ण अध्ययन - अध्यापन तंत्रामुळे आज जि.प. प्राथमिक शाळा ही आंतरराष्ट्रीय शाळेकडे वाटचाल करीत आहे.

**शैक्षणिक साहित्याचा वापर-** विद्यार्थ्यांचा मुलभूत भाषा व गणितीय संबोध विकसीत करण्यासाठी मोठया प्रमाणावर शैक्षणिक साहित्याची निर्मिती करून त्याचा वापर दैनंदिन अध्यापनात करण्यात येतो. ज्याचा लाभ विद्यार्थ्यांच्या संपादणूकीत झालेला दिसून येत आहे.

**साहित्य पेटीचा वापर :-** शासनाने पुरवठा केलेल्या गणित, मराठी व इंग्रजी साहित्य पेटीतील दर्जेदार साहित्य विद्यार्थी हाताळतात ज्याचा लाभ त्यांना संबोध विकसनासाठी होत आहे.

**प्रत्यक्ष अनुभूती :-** विद्यार्थ्याचा संबोध विकसीत होण्यासाठी शाळेबाहेर जाऊन, त्या त्या स्थळाला अथवा व्यक्तीला भेट दिली जाते. ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूतीद्वारे अध्ययन सुगम होते. उदा. वजन - मापे व्यावहारीक गणित रूपये-पैसे हे संबोध स्पष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष किराणा दुकानात भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूतीचा लाभ दिला जातो.

**मान्यवरांचे मार्गदर्शन :-** प्रत्यक्ष अथवा आभासी पध्दतीने वेगवेगळया क्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळत असल्यामुळे विद्यार्थ्यांना सदैव प्रेरणादायी वातावरणाचा लाभ होतो.

**कौशल्य विकासासाठी उपक्रम :-** आमच्या शाळेतील विविध उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या भाषिक, विकासाला पुरक असेच असतात अशाच उपक्रमाचे नियोजन- आयोजन शाळेतर्फे केले जाते. उदा. बालसाहित्य संमेलन, मुक्त वाचनालय, ध्वनीक्षेपकाद्वारे शिक्षण, हस्तलिखीत, क्षेत्रभेटी ई.

**मूक्त शिक्षण प्रणालीचा अवलंब :-** शिक्षण हे केवळ चार बंदिस्त भिंतीत होत नसून मुलांना मोकळया वातावरणात शैक्षणिक अनुभूर्ती लाभावी यासाठी मुक्त शिक्षण प्रणालीचा अवलंब केला. विद्यार्थी आवडेल तो विषय व आवडेल त्या ठिकाणी गटात बसून अध्ययन- अनुभव घेतात. आमची शाळा बिनगंटीची असल्यामुळे वेळाचेही बंधन आमच्या विद्यार्थ्यांना नाही. विद्यार्थी आवडीने सकाळी 9 वाजतापासून शाळेत गोळा होतात व संध्याकाळी 6 वाजता घरी जातात.या सर्व नवनविन तंत्रामुळे आमच्या विद्यार्थ्यांचा गुणात्मक दर्जा अत्यंत चांगला असून अनेक शिक्षक व अधिकाऱ्यांनी शाळेला भेटी देऊन आनंद व्यक्त केला आहे.

**शालेय नवोपक्रम :-** विद्यार्थी विकासासाटी आम्ही दर्जेदार असे नवोपक्रम राबविले असून त्याचा लाभ आमच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी होत आहे.

**ध्वनिक्षेपकाद्वारे शिक्षण :-** हा महत्त्वपूर्ण उपक्रम शाळेने सुरू केला असून, तो आजतागायत सूरू आहे. सुटीच्या दिवशी व रोज संध्याकाली विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मार्गदर्शन लाभावे, तसेच गावात शैक्षणिक वातावरण निर्मिती व्हावी, या प्रयत्नातून सुरू केलेला हा उपक्रम कोरोना काळात आणखीच लाभकारक ठरला. शाळा बंद असली तरी ठरलेल्या वेळी ध्वनिक्षेपकाद्वारे आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षण अखंड सुरूच राहिले.

**फिरते मुक्त वाचनालय :-** शाळा सुरू असो की बंद पण विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्य वाचायला मिळाले व त्याची सृजनशक्ती वाढावी, तसेच संपूर्ण गावात वाचनसंस्कृतीचा विकास व्हावा, शाळेतील पुस्तके विद्यार्थ्यांबरोबर गावकऱ्यांनाही वाचायला मिळावी, या उद्देशाने 'फिरते मुक्त वाचनालय' हा उपक्रम आम्ही सुरू केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची अवांतर वाचनाची गोडी वृध्दिंगत झाली. विद्यार्थी वेगवेगळया विषयावर कथा कविता तयार करतात दरमहिन्याला निघणारे हस्तलिखीत मासिक व वार्षिक अंकात दर्जेदार साहित्य विद्यार्थी लिहीतात हे या उपक्रमाचे फलित आहे. या कोरोना कालखंडात सर्व वाचनालये बंद व ग्रंथालयीन पुस्तके कुलुपबंद असतांना आमचे फिरते मुक्त वाचनालय विद्यार्थ्यांसाठी, विद्यार्थ्यांद्वारे व विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत साहित्य गंगोत्री पोहचवत होते.

**वार्षिक बालसाहित्य संमेलन :-** शाळेतर्फे दरवर्षी बालसाहित्य संमेलन भरविले जातात. यामध्ये विद्यार्थ्यांच्या स्व-रचित, काव्य, कथा यांचे सादरीकरण होते. तद्वतच साहित्यीकांना आमंत्रित करून त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना दिला जातो.दोन वर्षापूर्वी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या भव्य व्यासपिठावरून शाळेच्या विद्यार्थ्यांने कविता सादर केली ती अतिशय गाजली. या कोरोना कालखंडात आमच्या शाळेचे आभासी पध्दतीने बालसाहित्य संमेलन पार पडले असून विद्यार्थ्यांनी आपले साहित्य सादर केले तद्वतच विविध स्पर्धेत आभासी पध्दतीने सहभाग घेतला या संमेलनात मान्यवर साहित्यीकांचे मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला. राज्यतरीय व जिल्हास्तरीय विविध साहित्यलेखन स्पर्धेमध्ये आमच्या शाळेने बाजी मारली असून विद्यार्थी यशाचे नवे उच्चांक गाठत आहे.

**पालकांची शाळा -** शाळा विकसातील एक महत्वपूर्ण घटक म्हणजे पालक होय. पालकांसाठी एक खास उपक्रम आम्ही

दरवर्षी राबवत असतो. या उपक्रमाचे नाव आहे. 'पालकांची शाळा'. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे पालक, वर्षातील एक पूर्ण दिवस शाळेत घालवितात. यादिवशी त्यांच्याकरीता वेगवेगळया खेळ व स्पर्धांचे आयोजन केले जाते. पालकांच्या कलागुणांना सर्व गावापुढे सादर कवण्याचे व्यासपीठ प्रदान केले जाते. हा संपूर्ण उपक्रम गावकरी व शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा केला जातो. या उपक्रमाच्या माध्यमातून पालकांचे शाळा विकासातील योगदान वाढले आहे. आपल्या मुलांच्या सर्वांगिण विकासाकरिता ते सजग झाले असून इतर अनेक उपक्रमात हे स्वयंस्फूर्तीने सहभाग घेऊ लागले आहेत.

**शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर :-** आजच्या माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग शैक्षणिक प्रक्रीयेत केला गेल्यास त्याचा लाभ निश्चीत होतो. हे जाणून दैनंदिन अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करतो. दिक्षा ऍपचा वापर क्यू-आर कोड व दिक्षा ऍपच्या मदतीने अध्ययन- अनुभव सुलभतेने दिले जातात.युटयूब चॅनेल शाळेतील शिक्षकांचे स्वत:चे युटयूब चॅनेल असून वेगवेगळे व्हिडीओज टाकून त्याचा लाभ आमच्या विद्यार्थ्यांना देतो.आभासी वर्ग गुगल मीट व झूम ऍपचा वापर करून सुटीच्या दिवसातही आम्ही आभासी वर्ग घेतो. याचा फायदा सुटीच्या दिवसात घरी गृहपाठ सोडवतांना व प्रत्यक्ष तासिकेसाठी होतो. कोरोना कालखंडात आमची शाळा या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुरू राहून डिसेंबर महिन्यापर्यंतच आमचा अभ्यासक्रम पुर्ण झाला होता.

विविध क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी साहित्यीक याचे मार्गदर्शन आमच्या विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी आम्ही तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर केला असून स्काईप मीट, झुमच्या मदतीने आमच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांचे मार्गदर्शन शाळेत मिळवून दिले जाते. स्मार्ट टि.व्ही. व लॅपटॉपचा वापर दैनंदिन अध्यापनात करून दैनंदिन अध्ययन- अध्यापन मनोरंजक, आकर्षक व माहितीपूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न असतो.माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आमच्या विद्यार्थ्यांची संपादणूक वृध्दींगत झाली त्याच्या सर्वांगिण विकासासाठी तंत्रज्ञान पोषक ठरले आहे.

**स्व विकास :-** स्व विकासासाठी तसेच शालेय गुणवत्तेत वाढ होण्यासाठी विविध प्रशिक्षणे लाभदायी ठरलेली आहेत. ज्यात इंग्रजी साहित्यपेटी प्रशिक्षण- जिल्हास्तरावर इंग्रजी साहित्यपेटी प्रशिक्षण मिळाले. ते प्रशिक्षण तज्ञ मार्गदर्शक म्हणून तालुकास्तरावर इतर शिक्षकांना दिले. या प्रशिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना प्रत्येक साहित्य वापराच्या अनुषंगाने लाभकार ठरले. गणित व भाषा समृध्दी- शासनाने पुरविलेल्या साहित्यपेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गणित व भाषाविषयक संबोध स्पष्ट होण्याकरीता हे प्रशिक्षण हितकारक ठरले. निष्ठा प्रशिक्षण - बदललेल्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध विषयांच्या संकल्पना स्पष्ट करणारे 'निष्ठा' प्रशिक्षण स्वविकासासाठी व विद्यार्थी विकासासाठी पुरक ठरले.TAG Training- शिक्षकांमध्ये इंग्रजी भाषिक कौशल्याचा समग्र विकास व्हावा यासाटी जिल्हा पातळीवर `TAG Training' घेऊन, पंचायत समिती स्तरावर `TAG Coordinator' म्हणून शिक्षकांच्या सभा प्रशिक्षणे घेण्याची संधी मिळाली. यामुळे विद्यार्थ्यांना तर लाभ झालाच शिवाय शेजारी शाळेतील विद्यार्थ्यांकरीता वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी शिक्षकांना प्रेरीत करण्याची संधी मला मिळाली.

**शाळेची यशोगाथा :-** जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा - शैक्षणिक सत्र 2018-19 मधील जिल्हास्तरीय सांस्कृति स्पर्धेत शाळेने यशस्वी सहभाग घऊन तृतीय पुरस्कार संपादीत केला. काव्यस्पर्धा जिल्हास्तरीय काव्य स्पर्धेत शाळेची विद्यार्थीनीने तालुक्यातून द्वितीय क्रमांक मिळविला असून इतरही 10 विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते.निबंध लेखन स्पर्धा कोरोना कालखंडात वयम मासिकांतर्फे घेतलेल्या राज्यस्तरीय निबंध लेखन, स्पर्धेत शाळेची विद्यार्थीनी ऐश्वर्या दरणे हिने प्रथम सहामध्ये येऊन शाळेचा गौरव राबविला. युनिसेफ समन्वयांकडून कौतूक –



**विविध स्पर्धेमध्ये विजेते विद्यार्थी पारितोषिक स्वीकारतांना**

शाळेच्या फिरत्या मूक वाचनालयाचे युनिसेफ महाराष्ट्र समन्वयकांनी कौतूक केले असून फिरते मुक्त वाचनालय चालविण्यात पुढाकार घेणाऱ्या शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. या संबंधीचा लेक कोवीडचा धडा व त्यावरील प्रश्न या शिर्षकाखाली लोकसत्ता या दैनिकात मेधा कुळकर्णी यांनी लिहिला असून कोरोना कालखंडात उत्कृष्ट कार्याकरीता माझे व माझ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. अशा प्रकारे शाळेवर वेगवेगळया नाविण्यपूर्ण उपक्रमामुळे कौतुकाचा वर्षाव होत असून आज शाळा सर्वदूर उपक्रमशील शाळा म्हणून प्रसिध्द आहे. शाळेने दोन वर्षाच्या अल्प कालावधीत 'अ' श्रेणी प्राप्त केली असून शाळेची वाटचाल आंतरराष्ट्रीय शाळेकडे होत आहे.

| मार्गदर्शन | समन्वयन | प्रेरणा |
|---|---|---|
| **श्रीमती. किरण रापतवार** | **डॉ. ज्योती कुलकर्णी** | **डॉ. नेहा बेलसरे** |
| नोडल अधिकारी, | समन्वयक, | संचालक, |
| डायट, यवतमाळ. | मिपा,  औरंगाबाद. | मिपा, औरंगाबाद. |

## Z. P. HIGH SCHOOL, BAZAR SAWANGI, TAL. KHULTABAD, DIST. AURANGABAD

**Head Master: -** Mr. Vijay Ananda Raut **E-mail :-** vijayraut9421@gmail.com



**Gest lecture organized by school to develop student**

**'We are building skills not resume.'** Just 2 years back we read an article from the Times of India stating that how number of private schools has increased in India.

Not only this, but there were so many statements which were promoting to the private schools. This really shattered and set a warning alarm for all the Government schools. Why people refused to take admission of their ward in the government school and preface the private schools. Then we realize we are not listening to the need of an hour. Our school is situated in Bazar Sawangi village. we decided to have a dialogue with the parents for what exactly they are expecting from the schools. Then we realize that parents don't want mear piece of paper of degrees but they wants that their child should stand and survive in this competitive era. We all teachers sat together and had brainstorming discussions and we come up with the thought that we need to develop the skills of the students. so that they can survive and can stand on their own in this new competitive era. Brainstorming becomes fruitful with the two technical trades in our school that was Automobile, Multi skill (food processing etc.). Now it was the time to make parents aware about the things happening in the school. So we had a meeting of parents and teachers where we had discussed and convey the importance of these technical skills and they were as follows-





While listening carefully to guidance | While taking a training

**Self-employment**: A skillful person is a self-employed person and a self-employed person can never go hungry.

**To break away from white collar jobs**: People with skills don't go hunting for white collar jobs because their skills are better off to most white collar jobs.

**People with skills are self-reliant and independent**: Most skillful individuals cater for themselves and some even go as far as seeing themselves though higher institutions without the financial involvement of their parents.

**Diverse job opportunities**: Those who have many skills stand the chance of gaining more jobs from many establishments. People who have many skills are being poached by many companies. They are in hot demand because of the skills they possess.

**To generate employments**: There will be a lot of jobs generated for citizens if they are well equipped with skills. This is why it is necessary for government to organize skill acquisition programmers for the masses.

**Reduction in crime:** Research has shown youths are mostly involved in crimes. People begin to think of many dirty activities they will do to make money when they do not have anything to do. But with acquired skill by an individual he/she works and makes money from his/her acquired skill. Parents were quite convinced with these 6 virtues and they all came front to help this cause. We made two batches of 40 students each for these 2 courses. We emphasize on giving practical knowledge rather

than theoretical. We arrange study tour, we invited guest lecturers, local skilled persons, site visits and we also made students to work practically at the shops and at different sites.

This resulted into building up the confidence and the skill level of the students. Fame of our schools reaches far and wide which resulted into increasing strength of the school students still increasing. Students like Subhash Pawar, Ravindra Nalawade, Shubham Kale, watole started their own automobile service centers at different places in nearby villages, while continuing their further studies where as students like Rishikesh Chaudhari, Aditya Gaikwad are working at others service center while continuing their further studies. This all kids are supporting to their families financially, this has earned them lots of respect in society as well as in their family.





**While visiting and observing automobiles skill**

We have a dream that someday students from our school will become entrepreneurs & have their startup to develop a unique product or service and bring it to market with huge success and we are confident enough that sooner or later this is going to be happen because in our school **"we are building skills not resume."**

| Guidance | Co-ordinator | Motivation |
|---|---|---|
| **Shri. Yogeshwar Jadhav** | **Dr. Jyoti Kulkarni** | **Dr. Neha Belsare** |
| Nodal Officer, | Co-ordinator, | Director, |
| DIET, Aurangabad. | MIEPA, Aurangabad. | MIEPA, Aurangabad. |

## ANAND NAGAR ENGLISH MUMBAI PUBLIC SCHOOL, DAHISAR EAST, MUMBAI

**Head Mistress :-** Mrs. Jagruti Pritam Wade **E-MAIL** -anandnagarrn@gmail.com




**School Building**

Anand Nagar English Mumbai Public School, located in Dahisar East, Mumbai. School building renovation work is in progress. It is attractive externally and internally too. School building and classrooms are also decorated and made students friendly. It takes a lot of effort to bring the students into the stream of education, it is necessary to change the standards of the parents, for which the school management committee is very important factor. No doubt the students have to work at home too. It takes time to overcome the obstacles. Our school is trying its best to find a new share without any hesitation. The school has classes from 1st to 8th standard. It is result of our efforts that number of students increasing every year! It is as clear as the sunlight that our students are keen interested in various competitions e.g. drawing, singing, essay writing, dancing, and sports. Students participate in the government's scholarship examination. Teachers are working to make the students aware of social values, to make them truly happy to live with their studies. While imparting information on various subjects, the seeds of life values should be sown in the minds of the students, they should germinate, the right culture should be inculcated in it and the right steps should be taken to develop the student's instincts.

**School Management Competence in School Development**- Community Partners School and Society are two sides of the same coin, School is our partner, it is our responsibility to work together for the progress of the school. In order to increase the progress of the school, Wee created love in the

society and created awareness about education and school. Even though the Municipal Corporation provides the necessary physical and educational facilities to the school, it felt the need to help the society, to increase the enthusiasm of the children. The special thing is that during the teacher's leave period, the school management committee members are available for monitoring.

**Public Participation in school development:-** Syllabus of the relevant classes is pictured over the walls of school. It is said that they are “speaking walls” telling something the students every time. They were painted by NGO PIRAMAL FOUNDATION.  NGO like toy bank helps our students by giving them work to learn by play way method. 21computers and well-furnished computer lab were provided to the school by D MART.

**About our computer lab:-** 21computers and well-furnished computer lab were provided to the school by D MART. Students are handling the computers very well and learning easily.

**Prosperous Library:-** There are a lot of books available for the students in the school. Books have been made available by the Mumbai Municipal Corporation through a comprehensive curriculum. Reading Day is a government initiative for schools which is being implemented very successfully in schools. Reading has started boosting the self-confidence of the students. Little Poets and writers have started expressing themselves through stories, poems as well.  Reading helped students to enrich their vocabulary. Surprisingly some of them started to compose poems!




**Online Reading Day celebration**

**Playground:-** School playground is spacious and all kinds of games and sports can be played by students. Lots of greenery makes it more attractive and beautiful. Many flowering and decorative

plants are planted and taken care of daily. Students have achieved a great success in many sports and games.




**Various activities on school playground**

**Self-Development:-** Our hardworking teachers have word as nodal officer for state level youtube channel and also have given youtube live lessons for standard 3.Teachers and HM are constantly taking online trainings to improve and update the knowledge and to become more tecnosavy which is need of the day. Various certifications are done to update the knowledge. These online trainings are really very helpful and the trainers are also taking so much efforts to make it more interesting and clear the doubts.

**Online education in the pandemic situation:-** In the pandemic situation, students stayed tuned with education is the greatest achievement of our school. Regular meeting, online classes, various competitions, area visits, proper evaluation with monthly worksheets and teaching-learning process effective, meaningful, happy and healthy! Due to corona pandemic physically schools are not opened for children but we are trying to make online learning fun for kids with the use of various media and innovative ways of fun learning. Online classes all the staff to do the best. Teachers also takes a lot of efforts to make the teaching learning process interesting for kids. Their doubts are discussed & cleared time to time. Various online programs are conducted during this lockdown period. Student's response is always fabulous. School is presenting the work done by teachers and students through social media. We have our facebook page, you tube channel and whats app group to stay connected with all. This is possible only because of teacher's guidance and motivation and

innovative ideas. https://youtube.com/channel/UCHYGykLJtygLc-8-iDpZmmQ the link given above is our school you tube channel where all the online celebrations videos are uploaded.

Students are actively taking part in all the competitions held at ward level or even above and achieving great. One of our gem master Ajay Kambli from 8th standard got the opportunity and done the best to present drawing. Our student Dhankala Dholi from std. 8th got the opportunity to present herself in front of our education minister Hon.Varsha Gaikwad in state level Bal e-sahitya sammelan. Our teachers are always ready to present them and their work.




**Our student's opportunity to present themself in state level Bal e-sahitya sammelan and ward level to present drawing.**

We have reached to each and every child through online or offline teaching learning process. This corona pandemic cannot stop our education process because always "when there is a will there is a way", our whole team of Anand Nagar English School was working, is working and will be working hard for our students. To make them shine in each and every field and in the society.

| Guidance | Coordinator | Motivation |
|---|---|---|
| **Mrs. Manisha Pawar** | **Dr. Jyoti Kulkarni** | **Dr. Neha Belsare** |
| Nodal Officer, | Coordinator, | Director, |
| DIET, Mumbai. | MIEPA, Aurangabad. | MIEPA, Aurangabad. |

## VIKAS NIGHT SCHOOL AND JR. COLLEGE, VIKHROLI EAST, MUMBAI.

**Email: -** vikasratrajrcollege3305004@gmail.com

**In-charge Headmaster: -** Mr Narendra Haribhau Shirke. **Email: -** narendrashirke.ns@gmail.com



**VIKAS NIGHT SCHOOLS BUILDING**

Vikas Education Society runs Vikas Ratra Shala Junior College at Kannamwar Nagar, Vikhroli (East) Mumbai-400083. It is ISO Nominated 9001-2008 Institution. President Shri P.M. Raut Sir established Vikas Night School through Vidya Vikas Education Institute in 1962. In 1979 Started college. Today, about 500 students are benefiting from Vikas Night School and Junior College. For the holistic development of students, participation in annual get-togethers, oratory competitions, special days, Guru Pournima, tie day, sari day, sports day, study camps, educational trips, health check-ups, AIDS awareness programs, intercollegiate sports competitions, etc. Various activities like Science Exhibition, career guidance, etc. are implemented for 10th and 12th class students. Vidya Vikas Education Society itself has 19 different institutions in Mumbai, Thane, and Sindhudrug, of which one in Vikhroli and two night schools situated in Ghatkopar. Around twelve thousand students are enrolled across various courses.

**How different night school students are? : -** All the students are working in the day or night shift in Mumbai and the suburbs. Most of them were compelled to stop their education due to the socio-economic condition of the family, death of the elderly person, parents are suffering from illness, school dropouts, are migrated. These students are very functional. They are ready to overcome

the challenges. They have great respect for their teachers. The teachers are the sole source of knowledge. Our students are multilingual. The age group is average 16 years to 52 years. It indicates that there is no age limit for education.

**Challenges Faced:-**The enrolment ratio was very low. Students were unaware of the concept of night school. Also many were economically challenged Students were indiscipline. Illiterate parents working on a daily wage basis and in small scale factories were unaware of night schools. The school dropout ratio was high. Student attendance was not adequate. Students were the victim of bad habits and addiction. Stress to provide for family and peers had a psychological impact on these young minds, falling for the prey of intoxication. Ignorance about health and hygiene. Hygiene awareness is an important need in government schools. Sessions on hygiene are conducted among school children, which stress the importance of cleanliness and personal hygiene. Lack of sanitation facilities at home was also a contributing factor. Many students had a behavioral problem, low attention due to whole day daily wages work. Socio-economic background, criminal atmosphere, poverty, uninterested in studies, social media impact, gender issue, bias attitude, and girl child safety concerns also hampered their wholesome development.

**Remedies: -** We started our enrolment drive in April every year. Data was collected of students and parents who want to seek admission while keeping the follow-up. Spreading the message on Whats App groups FB and other social media. Street shows were performed in the areas. Banners erected at prime spots. We set up information counters stalls at public places, gardens, railway stations. Door to door survey is completed in April and June. This year the institute hired a time slot on the Den TV channel having a network from Sion to Ambernath to advertise admission due to pandemics. We have developed one concept ‘I am The Ambassador of my school and college’. Students feel proud to be a student of night school & college. We appoint mentors who usually our alumnus students to communicate with the parents and students. Parent's orientation program is organized by SMDC.  One to one interaction is performed in the meeting to keep the students away from bad habits and addiction. Workshops are conducted by Jeevan Vidya Mission to know their responsibilities as students and to be a good citizen of our country. Counselling sessions by Doctors on health and hygiene. Specular program is taken for girls and women. We have some sports kits when they are bored, we take them to the ground to burst their stress.

**Academics: -** After tremendous efforts taken by our school we were able to increase our schools academic results and sustaining in quality education using various strategies and activities.



**Felicitation of our successful student**

**Teachers training programs :-** Since 2013, we have been involved in various ambitious projects organized by the Department of Education, Government of Maharashtra as a subject Expert, Guide. I along with my team have trained more than 1500 English teachers in MMR. Under the Samgra Shiksha CHESS Project, Education Training Program is being implemented through ETF and Online from 2017-18 for teachers teaching English language subjects in Class IX and X in Government, Local Self Government Institutions, and Government Aided Private Management Secondary Schools in the State as District wise expert guide. Spoken English Project for Primary and Upper Primary Departments has also served as the English Language Ambassador of the Regional Academic Authority, Aurangabad. ELCRM training is provided. Headmasters of secondary schools implementing State Board curriculum through Maharashtra State Council of Educational Research and Training Vidya Pradhikaran Pune with the main objective of raising the standard of teaching and learning at upper primary and secondary level to 100% enrolment of students in all the learning outcomes, capabilities fixed for that class. And for the teachers of Marathi, English, Urdu, Mathematics, Science, and Sociology, the stage of the Secondary Headmaster Teacher Enlightenment Program was fixed. These pieces of training, workshops, seminars, webinars, conferences, MOOCs helped me for our Continuous, Sustainable Professional Development (CPD). Learning new trends and applying them where ever it is necessary always keeps me developing our self as a lifelong learner. It would be a great opportunity to complete this journey with such dignitaries and expert.





CHESS Symposium organised by English Dept. RAA Mumbai ELCRM Mumbai District Training ( RAA Mumbai )

**Career guidance and counselling: -** In a role of a State-counsellor. It helps us to overcome the challenges of the students in night school and junior college. We have taken 10 online sessions of renowned people working in various areas in National and International institutions these sessions give them the vision to choose their career. Some of our students have migrated from Mumbai to the natives as they have lost their jobs. Our motivation and positive thoughts gave them the strength to cope up with the stress. Till now we have given the information about 150 careers on Whats app status. It is very helpful for them. Students feel free to share their views and Ideas well as challenges. During the pandemic, 425 counsellors in Maharashtra have done Tele counselling for near about 2 lakh students in Maharashtra.




Rayat Shikshan Sanstha Online Webinar Series to support Online Edcuaction of our students in the Lockdown

**Co-curricular activities:-** Vikas Ratra Shala and junior college organize various competitions and campaigns instructed and announced by the Government of Maharashtra as well as the institute. Annual Gathering, Inter night school college competitions, AIDS awareness campaign, Vachan Prerna Divas, Savitribai Phule Jayanti, Marathi Bhasha Diwas, English Day, Elocution

competition, Storytelling competition, Essay writing competition. Students of all faculties take part enthusiastically and also bag prizes Teachers also help the students.




**Various Initiatives and Activities of Schools at District and State Level**

**Social initiatives: -** Last year one of the parents donated 200 notebooks with the help of a local MLA. Professor P R Patil Sir donated a thermal gun. This year one professor has donated 10000 rupees for the education of girl students in our school and college. Every year teachers adopt the students to pay the school, college fee. Our alumnus students give their contribution for the upliftment of the poor and needy students in school and college we also provide study material to the students. Support by Masoom (NGO) Headed by Hon. Nikita Ketkar an IAS officer who is working for the upliftment of the night schools in Mumbai every year they provide books notebooks school bags writing material this year they are also provided smartphones for needy students, sanitizer, and Masks. Nutrition is also so given to the students who attend the school.




**Received Notebooks from Local MLA., Distribution of Smartphone by Masoom**

**Achievements: -** In-charge Headmaster got Lok Sakta Sangharsh Adarsh Shikshak Ratna Puraskar, Karmvir Bhau Rao Patil Adarsh Shikshak Puraskar, Indian Humanitarian award 2020, Rotary International West Coast Nation Builder award 2020, Professor Kamlakar More, Subhash Chandra Bose National Best Service award 2021 for Health Food and Services. Students got First prize at Inter Night School College Kho-Kho event organized by Masoom.




**Achievements of our schools teacher and student**

**Future plans -** Establishment of the placement cell. Raising funds for needy boys. Mentoring students through alumni Association 4 Starting short term vocational courses for girls. Raising the financial status of students. Up gradation of Library. Building of student biometric attendance system. Getting sports materials and tabs through corporate social responsibility (CSR) CPD of Teachers & Professors through Designed Modules.

**Winners Are Not People Who Never Fail, But Those Who Never Quit.**

Guidance

**Mrs. Manisha Pawar**

Nodal Officer,
DIET, Mumbai.

Coordinator

**Dr. Jyoti Kulkarni**

Coordinator,
MIEPA, Aurangabad.

Motivation

**Dr. Neha Belsare**

Director,
MIEPA, Aurangabad.

# ZP Primary School, Wadgaon Bande, Tal. Daund, Dist. Pune.

E- Mail :- zppsvadgaonbande07@gmail.com

**Name of the headmistress:-** Sunita Vijay Katam **E-Mail :-** katamsunita78@gmail.com




**School Building**

ZP Primary School, Wadgaon Bande is surrounded by river, reserved pastures & agricultural area and also it is situated in the central part of the village in such a scenic area. Class I to VII includes 250 or more students and it keeps on increasing. The school is ISO certified and also has Semi-English medium. As our school is a central school, students from other schools in the surrounding areas as well as children from across the river in Shirur taluka are admitted to our school due to our educational quality.

**Girls Empowerment: -** The number of girls in each class is high. These children, who are accustomed to hard work in a farming family, were very interested in playing and learning new things. But for some period of the month, the girls were absent, so after finding out the reasons for this, I got to know that the parents were not sending the girls to school because of menstruation cycles, these parents were from the area of reserved forest. At the same time, I also noticed that the toilets in the school were not available for boys and girls. Our school got toilets for boys and girls from Shirur Rotary Club, and Wadgaon Bande, Gram Panchayat repaired our old toilets.

While talking to them, I also got to know that, for them menstruation cycle is a problem which is fixed thought in their head. They felt after they have come of age their childhood is over.

They got constant suggestions from home. These girls were emotionally confused. After the 1 to 2 workshops, the girls started talking. The girls started to understand the situation of other girls. While talking to them I realized that they didn't knew exactly how to use sanitary napkins, how to dispose it. They started discussing about menstruation without any hesitation but, the problem did not end there. We slowly realized that the school's initiative was being discussed in the village. We decided first to organize a cultural program in the school for the parents. A program was organized for parents in which they had to participate and answer some of the questions after picking up some chits with topics like problems faced by women, menstruation cycle.






**Discussing about Menstruation and Providing Sanitary Napkins**

While creating facilities in the school, we felt that the mentality of the parents should also change. All teachers started organizing parents' meet, also for women's various activities were planned in the school, information was given to the parents about the use of sanitary napkins, superstitions and misconceptions about menstruation. We started taking care of girls at school by providing sanitary napkins. This trust created in parents and girls helped them and girls started coming to school regularly.

Menstruation is not seen as a problem now but just looked as an easy process which is important. We also decided that from that time, not only girls will have access to adolescent health education, but also boys will be given information about changes in their body, diet, and exercise habits. In 2019, this adolescent health education topic was presented in 'Shikshan Wari' and our

school was a pioneer in presenting it all over the state. Today, the teachers and parents of our school look at the menstruation process with ease.




**Adolescent Health Education Topic Was Presented In Shikshan Wari**

**Students Development: -** Our students were going out of school because of sports competitions. But their participation in science exhibitions was low. To overcome this situation the children were asked to make a working model which were useful in agriculture, they were allowed to make the use of waste. Nearly 80 working models were created, such as windmills, harvesters, threshing machines, juice makers, cooler storage, and many other. But when the students were asked information about their project, they were feeling shy and had low confidence. So, we asked the children to make information chart that would help them while delivering the information.

**Use of Technology in Education: -** The technology-friendly movement has been going on all over Maharashtra for the last few years. We were thinking about how we can use technology for the students. At the same time, out of 70 students in the class, only certain children gave answers. Not all student participated in class activities. Some students were good at remembering things such as Bharuds, speeches, monologue etc. The children were doing very well. The work started with the view that technology can be used to increase the confidence and development of qualities of the children. YouTube channel named 'Sunita Katam' was created for children in year 2018.

Students started practicing and learning things by themselves as they knew that their performances were being recorded and eventually will be showcased on You Tube Channel. When students realize that people were observing their creativity and talent, they started working

so hard. After realizing that you can present your artistic talents, the children started trying their best. No one in the class was left behind. Everyone started trying on their own and this helped in development. The vision began to unfold.

As the children's artistic speech skills reached to their parents and village authorities, the children became more motivated, so they started to put in more effort and then the project was applied for the whole school. So remaining students from all school came up with their presentations and in this way every individual child was able to understand and use to handle mike, camera, headphones, laptop and mobile technology.

Considering the possibility to do more work on the YouTube channel, there was a realization that there are many rural games that are becoming rare. It was planned to record them with a demonstration so that many people should know about them. Demonstrations of 60 games like saat challas, gotya, lagorchya, hututu & Kachkawadya were shown. A YouTube channel

(https://youtube.com/channel/UC_Dw4FeBoK1AQU5fLUjJhdg)

**School Activities :-** Along with all these things, various activities like making 2000 seed balls, election demonstrations, composing poems or stories from words and sentences, street plays and writing, spelling recitation, seed compilation, tree planting, reading project, accounting project are carried out in the school. Slowly the school was working towards novel ideas and development. Then we organized a science exhibition at school level and invited parents and villagers to come and give the children a chance to showcase their skills. After this, our school participated in taluka level science exhibition and won the 1st prize.



**Taluka level science exhibition 1st prize winner experiment**

**Achievement: -** After looking at my poetry books, the students asked me if they can also write poem and publish. So, we decided and started poetry writing workshops in our school which are held for children two days in a week. We have published a book last year named “Mashagat Kovalya Manachi” which is collection of poems written by all children’s. This writing of children has helped them to develop their writing ability but at the same time it has helped us to understand their emotional world. We practiced rhyming, writing charoli, free verses, reciting poems, but even after that, when the students started writing, their emotions were clearly visible in their poems.

**Social initiatives: -** Last year the school was given a compound by the Gram Panchayat, Zilla Parishad, Pune repaired five old rooms and built three new classrooms. The school received modern sports equipment worth Rs. 2.5 lakhs from the Social Welfare Department, Pune. This valuable material was made available in the garden.

Due to the cooperation and participation of the parents in the school activities, various sports competitions, cultural programs, writers came to visit us. The school is successfully carrying out various activities. The activities in our school are not very different but they are carried out in their own way. However, the work done after understanding the children is very effective. Our Wadgaon Bande School, creates awareness and hope by which we can easily advance in today's competition.

| Guidance | Coordinator | Motivation |
|---|---|---|
| **Dr. Prabhakar Budharam** | **Dr. Jyoti Kulkarni** | **Dr. Neha Belsare** |
| Nodal Officer,<br>DIET, Pune. | Coordinator,<br>MIEPA, Aurangabad. | Director,<br>MIEPA, Aurangabad. |